म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भूप्रवास
सं. क्र. ६२६

REFBK-0023554
REFBK-0023554

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२६
दा. क्र. २३५५४
शुक्रवार २५।६।८२
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

सदर्भ भूप्रवास
६२६
२३५५४
२५।६।८२

# अफग़ाण डायरी

कॉन्टिनेन्टल

लेखिकेची इतर पुस्तके

कादंबऱ्या

बदनसीब
लामाचे रहस्य (अनुवादित)
बंद दरवाजा ( अनुवादित )

कथासंग्रह

परकं रक्त

# अफगाण डायरी

प्रतिभा रानडे

REFBK-0023554
REFBK-0023554

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

प्रकाशक :
रत्नाकर अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११ ०३०

✩

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय,
२९१, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

✩

मुखपृष्ठ :
सुभाष अवचट

प्रकाशन क्रमांक ९०६
प्रथमावृत्ती : १९८२
सर्व हक्क सुरक्षित
किंमत बावीस रुपये

ज्यांनी फार फार सोसलंय,
अजूनही सोसत आहेत,
त्या माझ्या अफगाण मित्रमैत्रिणींना

## निवेदन

सोमनाथाच्या समुद्रकिनाऱ्यावर मी उभी होते. पाठीमागून मंदिरातल्या संध्याकाळच्या आरतीचा गंभीर घंटानाद कानावर येत होता. मंदिरात जाऊन सोमनाथाला नमस्कार करण्याऐवजी, इथे उसळत्या समुद्रलाटांकडे पाहताना त्या काळभैरवालाच नमोनमः म्हणावेसे वाटत होते. कारण डोळ्यांसमोर धूळभरलं, दरिद्री गझनी येत होतं. आणि कानात आमच्या अफगाण मित्रांचे शब्द घोळत होते, "इतके वेळा तुमचा हिंदुस्थान आम्ही लुटला, सोमनाथाचं मंदिर लुटलं, एकदाही तुम्हाला आमचा पराभव कसा करता आला नाही ?"

या प्रश्नाला आमचं उत्तर असायचं, "तुम्ही आम्हाला लुटलंत, अतोनात लुटलंत, अमाप संपत्ती आणलीत इथे. असे असूनही आजही तुम्हाला सगळ्या जगाकडे भीक मागायची पाळी का यावी ? आजही तुम्हाला आमच्याकडून मदत हवीच आहे, असं का ? लुटून आणलेली ती अगणित संपत्ती काय केलीत तुम्ही ?"

वादविवाद सुरू झाला की, काही तरी बोलायचं म्हणून हे असं म्हणणं ठीकच असे. पण तेव्हाच ठरवून टाकलं होतं की, भारतामध्ये परत गेल्यावर प्रथम सोमनाथ पाहायचं.

पहिली संधी मिळाली आणि सोमनाथ गाठलंच. तिथे पोचल्यावर पुन्हा पुन्हा गझनी डोळ्यांसमोर येत होतं. पुन्हा पुन्हा मनात तुलना होत होती. 'त्या' दिशेनं आलेल्यांची आजची स्थिती आठवली की काळभैरवाच्या वाटचालीची जाणीव होत आहे. या काळभैरवाला न ओळखता, त्याच्या चालीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून, फटकून, दुस्वासानं वागणारी इस्लामी जमात... त्यांनी जुन्यातच धन्यता मानली.

अर्थात त्यातल्याच काही पुरोगामी विचारांच्या लोकांनी नवीनतेचे वारं आणायचा प्रयत्न केला. पुन्हा पुन्हा प्रयत्न केला. पण त्या त्या वेळी तो निष्फळ ठरत होता, पुन्हा पुन्हा कोंडलेपणा येत होता. की पुन्हा कोणी तरी येऊन गतिमानता आणायचा प्रयत्न करीत होते.

आणि प्रक्रिया चालू असताना, एकदमच त्यांच्यावर विळ्या-कोयत्याचे लोखंडी

घणाघात झाले आहेत. इस्लाम आणि कम्युनिझम या दोन अतिशय कडव्या आणि समाजावर आपली पोलादी पकड घट्ट ठेवणाऱ्या या दोन चाकोरीबद्ध धर्मांच्या संघर्षातून आता काय निष्पन्न होणार आहे ?

हा टप्पा म्हणजेसुद्धा त्या गतिमानतेच्या प्रक्रियेमधलीच एक पायरी आहे का ?

इतर एखाद्या अडाणी, मागासलेल्या देशात लालक्रांती होणं आणि अफगाणिस्थानसारख्या मागासलेल्या अडाणी आणि शिवाय इस्लामी देशात लालक्रांती होणं या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत का ?

जर अफगाणिस्थानात ख्रिश्चन, हिंदू किंवा बौद्ध धर्म प्रचलित असता तर त्यांनी या लालक्रांतीला एवढा विरोध केला असता का ?

एवढ्या लहानशा, अविकसित राष्ट्राला एका बलाढ्य शक्तीशी टक्कर देणं शक्य आहे का ? अफगाणिस्थानात कम्युनिस्ट आले म्हणूनच नव्हे तर इथे अमेरिका जरी घुसली असती तरी थ..ड्याफार प्रमाणात तिथे हे असंच घटित घडलं असतं. अमेरिकेलाही अशाच प्रकारचा विरोध ..न करावा लागला असता.

स्वातंत्र्याची ईर्षा धर... ही चैन छोट्या अविकसित राष्ट्राला परवडण्यासारखी असते का ?

असे किती तरी प्रश्न पडतात. त्यांची उत्तरं शोधायची झाली तर, अशा प्रसंगाला एखादा छोटासा देश जेव्हा सामोरा ..तो तेव्हा त्या राष्ट्रात नक्की काय घडलं होतं ते तपासून पाहायला हवं.

दुसरं म्हणजे, हा देश आपल्या डोक...च्या आहे. इतिहासपूर्व काळापासून या देशात जेव्हा जेव्हा परकीय आले तेव्हा तेव्हा . परकीय पुढे भारतात आले. अफगाणिस्थानात येणारा प्रत्येक आक्रमक नंतर भारतात आ.. . प्रत्येक वेळेला त्याने भारतीय इतिहासाला, संस्कृतीला धक्के दिले. नवे वळण दिलं. आजही तिथं आलेले आक्रमक, जुनाच पारंपरिक मार्ग अनुसरून पुढे भारतामध्येही येतं.. का ? हा विचार मला भयंकर अस्वस्थ करतो. म्हणूनच हे सगळं मला सांगावंसं ..तंय. इषारा द्यावासा वाटतो आहे.

'मदत' घेऊन येणारे परकीय काय किंवा परकीय कल्पना ... अट्टाहासानं आणल्या गेल्या की त्या, त्या राष्ट्राला जड जातातच. शेकडो वर्षांच्या वाट... अनुभवांतून जात जात एखादा लोकसमूह राष्ट्र म्हणून उदयाला येतो. राष्ट्र म्ह... लागतो, आणि अचानक परकीय आक्रमणाखाली ते राष्ट्र मृत्युपंथाला लागतं. ... डोळ्यांसमोर ही प्रक्रिया पाहणं हा फार भयंकर अनुभव आहे. अफगाणिस्थाना.. आमचे पहिले दीड वर्ष सुखाचे गेले. आणि एकदमच या वरून शांत दिसणाऱ्या पण आतून धुमसणाऱ्या वातावरणाचा स्फोट झाला. कल्पनेपलीकडल्या गोष्टी ऐकल्या; पाहिल्या; स्वतः अनुभवल्या. माझ्या डायरीत वेळोवेळी काळजीपूर्वक टिपूनही ठेवल्या. एका राष्ट्राचा मृत्यू पाहिला ! त्या काळाचा हा विस्मयपट आहे.

काबूलमध्ये असतानाच तिथल्या घटनांवर, व्यक्तींवर, महाराष्ट्र टाइम्स, केसरीमध्ये लेख लिहिले होते. ' माणूस 'च्या श्री. माजगांवकरांनी तर आग्रहाने ' माणूस 'साठी लेख लिहवून घेतले होते. त्या सर्वच लेखांचा या पुस्तकासाठी उपयोग झाला.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी अतिशय आनंदाने या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे ठरविले. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. काही कारणामुळे ४–६ महिने पडून राहिलेले हे हस्तलिखित त्यांनी वाचले तेव्हा, " अरेरे, हे पुस्तक केव्हाच व्हायला हवं होतं !" अशी हळहळ त्यांना वाटली होती. या पुस्तकाची प्रेसकॉपी तयार करताना कॉन्टिनेन्टलचे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांचे अतिशय मौलिक मार्गदर्शन झाले. ज्या उत्साहाने त्यांनी या पुस्तकावर चर्चा केल्या त्याच उत्साहाने त्यांनी छपाईलाही सुरुवात केली. सुलभ मुद्रणालयाचे श्री. देव यांनी तर पहिल्याच भेटीत, " बाई, पुस्तक सुंदर लिहिलं आहेत; पण त्यांतले काही मुद्दे आपल्याला पटत नाहीत बरं का ?" असं मोकळेपणानं सांगून टाकलं. आणि स्वतः जातीनं लक्ष घालून या पुस्तकाचे सुबक मुद्रण वेगाने पुरे केले, त्याबद्दल त्यांचे आभार.

श्री. सुभाष अवचट यांची मुखपृष्ठे नेहमीच चांगली असतात. पुस्तकातला आशय क्षणात वाचकांपर्यंत पोचवण्याचे कसब त्यांच्या मुखपृष्ठांमध्ये असते. या परंपरेला साजेसे मुखपृष्ठ तयार करून त्यांनी या पुस्तकाला चांगलाच उठाव आणला आहे.

सर्वात जास्त आभार मानायचे ते मुकुंदाचे. बायकोने नवऱ्याचं किंवा नवऱ्याने बायकोचे आभार मानले की वाचक गालातल्या गालात हसतो. ' माझ्या कामगिरीमागे माझ्या बायकोची ( किंवा नवऱ्याची ) फार मोठी तपश्चर्या उभी आहे.' असं कुणी म्हटलं की ऐकणाऱ्याच्या चेहऱ्यावर ' कळलं बरं चच्चंजी ' असे मिस्किल भाव येतात. अशा वेळेला आत्ता–आत्तापर्यंत माझ्या डोळ्यांसमोरसुद्धा जुन्या काळचा नवराबायकोचा फोटो उभा राहायचा. नथ, बुगड्या घालून, टोपपदरी लुगडं नेसलेली बायको खुर्चीवर बसलीय आणि डोक्याला भला मोठा रुमाल बांधलेले नवरोबा खुर्चीमागे उभे आहेत ! म्हणून हे नवराबायकोनं एकमेकांचे आभार मानणं हास्यास्पदच ठरलंय.

पण जेव्हा एखादा नवरा आपल्या बायकोला खरोखरच मदत करतो तेव्हा काय करायचं ? .ध्ये असताना खूप हिंडले, जायला नको तिथं गेले, शेकडो अफगाण ची केल्या. दुर्मिळ फोटो मिळवले, (विशेषतः सरय्या–अमानुल्लाचे) प्र नाही ते धोके पत्करले. पण हे सगळं मुकुंद पाठीशी होता म्हणून. एका र देशाची, समाजाची, संस्कृतीची सुखदुःखं, मानापमान स्वतःचे मानून च्याशी चर्चा केल्या, वादविवाद केले, प्रसंगी भांडलेसुद्धा. त्यातूनच पुष्कळ काही मिळवलं. आणि हे पुस्तक लिहिलं तेही त्याच्या हट्टापायीच. म्हणून त्याचे आभार. ते मानले नाहीत तर तो कृतघ्नपणा ठरेल.

आमच्यासारखेच अफगाणिस्थानात काम करणारे किती तरी भारतीय होते. त्यांच्याकडून बरीच माहिती मला मिळत गेली. पण असंख्य अफगाण लोकांनी मला

हरतऱ्हेनं माहिती पोचवली, त्याला तोड नाही. मी वृत्तपत्रात लिहिते आहे हे कळल्यावर सोसासोसाने, कधीकधी तर धोका पत्करूनही ही मंडळी मला त्यांचे मनोगत सांगत होती. हेअर-ड्रेसरपासून अर्ग महालामध्ये कामं करणाऱ्यांच्या भावंडांपर्यंत आणि प्रोफेसर मंडळींपासून वेगवेगळ्या मिनिस्ट्रींत कामं करणाऱ्यांनी, सर्वांनी आपापल्या हकिगती सांगितल्या. त्या सगळ्यांचाच समावेश या पुस्तकात करणं अशक्यच होतं. पण जो काय अफगाणिस्थान मला कळला तो याच लोकांमुळे. त्यांचे आभार मानायला माझ्याजवळचे शब्द फार अपुरे आहेत. हे पुस्तक वाचून झाल्यावर वाचकाने थोडा वेळ थबकून जरासा विचार केला तरच त्यांचे आभार मानले जातील.

**प्रतिभा रानडे, मुंबई**

# अफगाण डायरी



अफगाणिस्थान
हेरत
फराह
निमरोझ
हेलमंड
कंदाहार
झबूल
गझनी
उरूझगान
बादगिस
घोर
फर्याब
जोझजान
बल्ख
बामियान
कुंदुझ
तखार
बदक्षान
बागलान
परवान
काबूल
लघमान
नानग्रहार
वारदक
लोगर
परक्तिया
NOT TO SCALE



एक खास अफगाण खेडे.



शांत व संथ अफगाण जीवनात एकदम रणगाड्यांचा खडखडाट आणि तोफांचा गडगडाट ऐकू आला आणि सारे जीवन उध्वस्त होऊ लागले.




नव्या अफगाणिस्थानचा नवा लाल झेंडा.



भरवस्तीमध्ये असे रणगाडे सतत पहायची शिक्षा अफगाण माणूस भोगतो आहे.



**सरय्या, अमानुल्ला :**
छोटयाशा देशाचे स्वप्न पहाणारे
राजा-राणी

**हाफिजुल्ला अमीन :**
तराकीला मारुन अमीन अफगाणिस्थानचा
सत्ताधीश झाला आणि याला मारुन,
रशीयन्स सत्ताधीश झाले.





२७ एप्रिल १९७९ रोजी
झालेल्या बॉम्ब वर्षावात
कोसळलेला अर्ग पॅलेसमधला
क्लॉकटॉवर



लालक्रांतीने गोंधळलेल्या सर्वसामान्य अफगाणांना खेड्यापाड्यातून जबरदस्तीने आणवून, त्यांच्या अशा मिरवणुका काढल्या जात होत्या.

दाऊदखानला मारले ते याच घरात.
खिडकीतून आत डोकवणाऱ्यांची गर्दी.





अफगाणीस्थानातले क्रांती नाटय घडले ते येथेच - या! अर्ग पॅलेसमध्ये.



नूर महंमद तराकी आणि त्यांची पत्नी, एका समारंभाला येताना.



'रोज-ए-बैराग' दिवसाच्या मिरवणुकीमधले आमचे अफगाण मित्र-मैत्रिणी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३६
दा. क्र. २३५५७
भूप्रवास २५।७।८२
शाखा (स्थळ प्रत)

## प्रथम दर्शन

मघाचीच ती स्वतःला लावण्यवती समजणारी उर्मट हवाई सुंदरी खोट्या खोट्या लडिवाळपणानं सांगतीय, " आता पाच मिनिटांत आपण काबूल विमानतळावर उतरणार आहोत. पट्टे बांधा."

हे सांगायला एवढं लाडवायला कशाला लागतं कुणास ठाऊक, असा विचार करीत, पट्टा बांधून मी खिडकीतून बाहेर पाहिलं. एका बाजूनं अप्रतिम, अद्भुत निळ्या रंगाचं नितळ, स्वच्छ आभाळ दिसत होतं, तर दुसऱ्या बाजूच्या खिडकीतून चकचकीत पिवळंधमक ऊन. या बाजूला बिलकुल ऊन नव्हतं तर त्या बाजूला निळा रंग औषधालाही नव्हता. हा काय चमत्कार ?

हातातल्या मनगटी घड्याळात भारतीय वेळेऐवजी काबूल वेळ जुळवून ठेवताना मनात आलं, आज ३० मे १९७६. पण पुढे विचार करायच्या अगोदरच विमान झेपावत खाली उतरू लागलंय. पांढऱ्याशुभ्र बर्फाच्या सोनेरी, रुपेरी चकचकीत शाली पांघरून निळे-जांभळे डोंगर गुरगुटून पडलेत. हळूहळू त्यांचा आकार मोठा होतोय. आता विमान आणखी खाली उतरले. हिरव्यागार प्रशस्त दरीमध्ये पाळण्यात शांतपणानं पहुडलेल्या तान्ह्यासारखं छोटुकलं काबूल शहर दिसायला लागलंय. इतक्या उंचीवरून उत्खननात सापडलेल्या एखाद्या प्राचीन शहरासारखं दिसतंय हे शहर. मातीची चौकोनी आकाराची, एकमेकांपासून दूरदूर असलेली सुबक, छानदार घरं... कुठेही कारखान्यांची धुराडी धूर ओकत नाहीयेत की उंचच्च उंच इमारती आकाशाला कवटाळायला निघाल्या नाहीत. दिवाळीमध्ये मुलं मातीचे किल्ले करून त्यांच्या पायथ्याशी एखादं गाव वसवतात. तसंच दिसतंय हे काबूल शहर. अद्ययावत जगापासून शेकडो मैल दूर, हिंदुकुश पर्वताच्या वळचणीला सात हजार फूट उंचीवर, काबूल शहर ' रुसू बाई रुसू ' होऊन बसलंय काय ?

आंतरराष्ट्रीय विमानतळ असूनही लुटुपुटीचंच वाटणाऱ्या त्या काबूल एअरपोर्टवरचे कस्टम्स वगैरे सगळे सोपस्कार आटपून बाहेर आले. समोरच क्षितिजापर्यंत सरळ रेषेत जाणारा प्रशस्त रुंद, स्वच्छ रस्ता आहे. रस्त्याच्या दुतर्फा चिनाराची,

देवदाराची उंचच उंच झाडं स्वागत करताहेत. ऐन उन्हाळ्यातले भरदुपारचे साडेचार वाजले होते तरी हवेत गारवा आहे. गाडीतून शहरात येतानाच जाणवतंय की इथे लोकवस्ती खूपच कमी असली पाहिजे. कारण डोक्याला भलंमोठं पागोटं घातलेले, पायघोळ पायजमे, त्यावर ढगळ डगले घातलेले अफगाण लोक कमीच दिसत आहेत.

बायका तर रस्त्यावर दिसणारच नाहीत म्हणा. दिसल्या तरी गोषातल्या. कारण हा मुस्लिम देश आहे. इथे बायकांना गोषा वापरावा लागतो. भारतामधल्या बायकां-सारख्या इथल्या बायका सर्रास वावरत नसतील. असा काहीसा विचार मनात येतो आहे तेवढ्यातच समोरून एका टांग्यातून तीनचार अगदी तरुण अफगाण मुली येताना दिसल्या. आमची गाडी आणि त्यांचा टांगा समोरासमोर येताच त्या सगळ्याजणी आमच्याकडे पाहून हसत हसत एकदम कुर्ररर्रर्र ऽऽऽ करून ओरडल्या. मी बावरून पाहिलं. टांगा पाठीमागे गेला होता. पण त्या मुलींना पाहून घेतलं. सगळ्यांनी अगदी अद्ययावत पद्धतीनं केस कापले होते, अत्याधुनिक वेषभूषा, रंगभूषा केलेली होती. ' कशी गंमत केली एका माणसाची ' अशा भावनेनं हसतखिदळत एकमेकींना टाळ्या देत होत्या ! या एवढ्या धीट आणि आधुनिक स्त्रिया, मागासल्या समजल्या जाणाऱ्या एका मुस्लिम राष्ट्रातल्या ? या अशा अफलातून अफगाणी स्वागतामुळे मी मात्र जाम नर्व्हस झालेय. बाप रे ! अशा लोकांत तीनचार वर्षं कशी काढायची ?

दुसऱ्या दिवशी, साडेचार वाजल्यापासूनच उजाडलं. डोक्यावरून ब्लँकेट घेऊन पडून राहिलं तरी उजाडल्यानंतर किती वेळ पडून राहणार ? शेवटी सहा वाजता उठलेच. कॉफीचे मग भरीपर्यंत एक बुरखा घेतलेली बाई आपले उंच टाचांचे बूट टॉक टॉक वाजवत आली.

मुकुंदा म्हणाला, " ही आपली मोलकरीण, हिला बेगम म्हणायचं."

" बेगम ? बेगम कशी ? बेगम तर बादशहाच्या बायकोला म्हणायचं ना ? आणि ही बेगम तर मग मी कोण ? "

" ही बेगम तर तू खानम ! "

" आणि तू कोण मग ? खान ? "

तोपर्यंत त्या बेगमेनं आपला बुरखा व्यवस्थित घडी करून कपाटावर ठेवला होता. अतिशय नीटनेटक्या, व्यवस्थित पोशाख केलेल्या त्या बेगमेशी माझा पहिला संवाद झाला तो असा—

" सलाम आलेकुम "—बेगम.

" सलाम आलेकुम "—मी.

" खूब अस्ती ? ( ठीक आहेस ना ? ) "—बेगम

" खूब अस्ती ? " —मी.

" चतूर अस्ती ? " ( मजेत आहेस ना ? ) —बेगम.

" चतूर अस्ती ! " —मी.

"जाने जोर अस्ती ? ( तब्येत चांगली आहे ना ? ) " —बेगम.

"जाने जोर अस्ती !" —मी.

आता हे सगळं संभाषण रोज म्हणायचं. आणि श्वास घ्यायलाही उसंत न देता, भराभरा म्हणायचं सगळं. मुकुंदा माझ्यापेक्षा चार महिने अगोदर इथे आल्यामुळे, इथले सगळे रीतिरिवाज शिकवतोय मला. म्हणाला, बेगमेशीच नव्हे तर जो कोण भेटेल त्याच्याशी हस्तान्दोलन आणि ही प्रश्नोत्तरं व्हायलाच हवीत. तशीच पद्धत आहे इथे. एखादा कोणी दिवसातून दहा वेळा भेटला तरी दहाही वेळा हे संभाषण व्हायलाच हवं. आणि शिवाय बेगमेपासून, अफगाणिस्थानचा खुद्द प्रेसिडेन्ट, स्वतः दाऊदखाना-पर्यंत कोणीही भेटलं तरी हेच बोलणं.

सकाळी साडेसात वाजता ड्रायव्हर हजर. त्याला फाटकातून आत शिरताना पाहूनच मी घाबरले. आता पुन्हा खूब अस्त, चतूर अस्त करायला लागणार. मुकुंदा म्हणाला, तेवढंच नव्हे तर त्याच्याशी हस्तान्दोलन कर. रोज करायला नको; पण आज कर. नाही तर तो फार मोठा अपमान समजतात.

एवढं बोलणं होईपर्यंत तो हॉलमध्ये आलाच. मग अगोदर मुकुंदाचं आणि त्याचं खूब अस्त, चतूर अस्त वगैरे झालं. मग मुकुंदानं त्याच्याशी अगदी पाश्चात्य पद्धतीनं माझी ओळख करून दिली. त्याचं नाव गुलअमीर. मग खूब अस्त वगैरे, हस्तान्दोलनाचा कार्यक्रम पार पडला.

मी मुकुंदाला म्हटलं, "हा काय आचरटपणा ? दर वेळी प्रत्येकाशी ही एवढी लांबलचक प्रश्नोत्तरं करायची म्हणजे यांच्या या लोकशाहीचा जरा अतिरेकच नाही का ? "

"हे काहीच नाही. घरी फार तर तुला दिवसातून तीन चार वेळाच ही सर्कस करावी लागेल. ऑफिसमध्ये तर मेयरपासून साइटवरचा कामगार आला तरी सर्वांशी तेच बोलायचं. दिवसातून शंभर वेळा तरी मला ही कसरत करावी लागते. पाचसहा जण बसलेले असताना बाहेरून एकजण जरी खोलीत आला की सगळे जण त्याला तेच विचारतात. तोही तीच उत्तरं देतो. तो माणूस दिवसातून दहा वेळा जरी खोलीत आला तरी दहाही वेळा तेच चालतं. सुरुवातीला चमत्कारिक वाटतं. पण नंतर मग सवय होते हळूहळू...."

कोपऱ्या कोपऱ्यावर 'नान'ची दुकानं आहेत. दीड-दोन फूट लांब, सात-आठ इंच रुंदीचा ब्रेड आणि पोळी यामधला प्रकार म्हणजे ही 'नान'. ही नान दिवसातून तीनदा करतात. अफगाण बायकांना रोज उठून पोळ्या 'बडवायला' लागत नाहीत ! ( किती सुखी बिचाऱ्या ! ! ) कोपऱ्यावरच्या नानच्या दुकानातून नान आणल्या की स्वयंपाक होतो; दोन अफगाणींना एक नान. म्हणजे आपल्याकडचे अठ्ठावीस पैसे. पण अफगाण लोकांचा आहार भरपूर असल्यामुळे एका अफगाण माणसाला दिवसभरात ४ ते ६ नान लागतात. प्रत्येक नानचं वजन सरकारनं ठरवून दिलेलं आहे. सरकारी

लोक मधूनच केव्हा तरी येऊन या नानचं वजन पाहतात. एखाद्या औंसानं जरी कमी भरलं तरी भरपूर दंड करतात. पुन्हा वजन कमी आढळलं तर तुरुंगात रवानगी करतात. पुन्हा पुन्हा ताकीद देऊनही एखादा 'नानभाई' खोटेपणा करू लागला तर खुदासुद्धा त्याला वाचवू शकत नाही. अशाच एका नानभाईला एकदा त्या नान भाजण्याच्या भट्टीतच फेकलं होतं म्हणे!

इथल्या गरीब लोकांचं जेवण म्हणजे ही नान आणि किटली भरुन अगदी हलका चहा. बिन दुधाचा, बिन साखरेचा. त्यामुळे इथे उपाशी सहसा कोणी मरत नाही. श्रीमंत लोकही नानच खातात, त्याच दुकानातली. पण मग त्याबरोबर मटण, पुलाव, चिलाव वगैरेही असतं. त्यांचा चहासुद्धा हलकाच. दूध नाही, साखर नाही असा. फार तर कोणी मग या चहाबरोबर लिमलेटची गोळी, साखरेत घोळवलेले बदाम किंवा 'बंगला देश' खातात. बंगला देश म्हणजे आपल्याकडचे साखरफुटाणे! त्याला हे असे विचित्र नाव का पडलंय कुणास ठाऊक. कुणाला तरी विचारायला पाहिजे.

* * *

एखाद्या ठिकाणाचं खरोखरचं अस्सल रूप पाहायचं असेल तर तिथले बाजार पाहावेत. 'तोराबसखान' हे इथलं सर्वात फॅशनेबल मार्केट. 'जादेमेवांड', 'बदाम मार्केट' हे इथले जुन्या शहरातले जुने बाजार. इथे अस्सली काबूल पाहायला मिळतं. चार पाच फूटच रुंदीच्या लहान लहान किती तरी गल्ल्या, सांडपाण्यानं चिखल झालेले रस्ते, आणि सगळ्या प्रकारची घाण या रस्त्यांवर विखुरलेली असते. बुरखे घेतलेल्या बायका, आणि अद्ययावत वेश, रंग, केशभूषा केलेल्या बायका हातात हात घालून हिंडताहेत. ढगाळ कपड्यांतले अफगाण हातात सॅलडचे भलेमोठे हिरवेगार गड्डे घेऊन खात चालले आहेत. दोन्ही बाजूंना जगभरातल्या बाजारपेठांतून आलेला सर्व तऱ्हेचा माल खच्चून भरलाय. काडेपेट्या आणि पत्र्याच्या बादल्यांपासून सर्व माल परदेशांतून येतो. इथे फक्त सुकामेवा आणि गालिचे तयार होतात. काराकुल या जगप्रसिद्ध जातीचं कातडं तयार होतं. काही दुकानांतून सर्व तऱ्हेचा सुकामेवा, आपल्याकडे भडभुंजाच्या दुकानातून चुरमुरे फुटाणे जसे ढिगांनी रचून ठेवतात तसा ढिगांनी रचून ठेवलाय. इथे सामान 'मांडून' ठेवणं, शोभिवंत करणं, आपल्या मालाची जाहिरात करणं वगैरे गोष्टी यांच्यापासून खूप दूर आहेत. शहरातही कुठे जाहिराती नाहीत, की निऑनसाइन्सचा झगझगाट नाही, होर्डिंग्ज नाहीत. सिनेमांच्या जाहिरातीसुद्धा गावात कुठेही लावत नाहीत. एका ठिकाणी मात्र दोनचार जाहिराती एकाखाली एक – त्यासुद्धा हाताने लिहिलेल्या – पत्रकासारख्या तेवढ्या लावलेल्या दिसतात. अर्थात जाहिरात केलेला चित्रपटच थिएटरमध्ये असेल असेही नाही. थिएटरचा मालक बघतो की अमुक शोला गर्दी नाही, मग तो मालक नंतरच्या शोला सिनेमाच बदलून टाकतो. हिंदी चित्रपट इथे भलतेच लोकप्रिय आहेत. जुने केव्हाचे

चित्रपट यांच्याकडे असतात, नवीन चित्रपट क्वचित कधी येतात, तेच सिनेमे आलटून पालटून परत परत लागतात. लोकांना हिंदी क्वचितच कळतं. त्यामुळे एखादा सिनेमा परत परत पाहिला तरी त्यांना त्याबद्दल वाईट वाटत नाही. इथे धर्मेन्द्र, हेमामालिनी अत्यंत लाडके आहेत. एकदा धर्मेन्द्रचा कुठला तरी सिनेमा पाहायला गेलो होतो. माझ्या शेजारी जवळ जवळ सत्तर वर्षांची एक गोड अफगाण म्हातारी बसली होती. माझ्या मोडक्यातोडक्या फारसीत तिला विचारलं, " तुला धर्मेन्द्र खूप आवडतो का ?"

तर ती सत्तर वर्षांची म्हातारी मला म्हणते, " धर्मेन्द्र बरा आहे; पण देव आनंद जास्त गोड आहे !"

' कोना बाजार ' ही इथली अशीच एक अफलातून संस्था आहे. कोना म्हणजे जुनं. तर या दुकानातून माणूस सोडून बाकी सगळ्या गोष्टी सेकंडहॅन्ड मिळतात, कमी किंमतीत. अगदी घरी पाळण्यासाठी कुत्री, रंगीबेरंगी पक्षीसुद्धा ! घरात लागणारं सगळं सामान या जुन्या बाजारात मिळतं. युरोपमधून ट्रक्स भरभरून जुने किंवा सेकंड क्वालिटीचे नवे कपडे हे लोक इथे आणून विकतात. हे कपडे खूपच स्वस्त असतात. आणि तुमची भटकण्याची तयारी असेल तर अगदी उत्कृष्ट कपडे अत्यंत स्वस्त भावात तुम्ही मिळवू शकता. त्यामुळे इथल्या महाभयानक थंडीतही, हा देश एवढा गरीब असूनही, कितीही गरीब माणूस असला तरी थंडीत कुडकुडून मरत नाही.

एक आश्चर्य म्हणजे इथल्या बाजारातले बहुसंख्य दुकानदार सरदारजीच आहेत. मुलांच्या शाळेच्या गणवेषांच्या शर्टस्‌चं कापड घ्यायला दुकानात गेलो. दुकानदार सरदारजी आहे हे पाहूनच किती तरी आनंद झाला. बारा वर्षं दिल्लीला काढल्यामुळं असेल, पण अगदी घरचं माणूस भेटल्यासारखं वाटलं. आणि मुख्य म्हणजे घडाघडा बोलता आलं. त्यांच्याकडून बरीच माहिती कळली. रणजीतसिंहानं जेव्हा काबूलवर स्वारी केली होती तेव्हापासून किती तरी सरदारजी इथे आलेत. रणजीतसिंग तर नंतर माघारी गेला, पण त्याच्याबरोबर आलेले शेकडो शीख लोक इथे राहिले. ते व्यापार करू लागले, कोणी फळबागा लावल्या. पण मुख्यतः सगळ्यांनी व्यापार आणि सावकारी सुरू केली. इतकी वर्षं इथे राहूनही त्यांच्या राहण्यात, खाण्यात, बोलण्यात काहीही फरक पडलेला नाही. पंजाबमधला एखादा लहानसा सुभाच जणू इथे आहे. त्यांची आपापसांतच लग्नं होतात. भारतातून मुली इथे येण्यासाठी फारशा उत्सुक नसतात, इथल्या मुलींना तर भारतामध्ये मुळीच जायचं नसतं. इथे त्यांचा मोठा गुरुद्वारा आहे. लंगर असतो. ' बैसाखी 'च्या वेळी तर जलालाबादच्या गुरुद्वारामध्ये केवढी तरी मोठी, तीन दिवसांची जत्रा भरते. घरात हिंदी-पंजाबी बोलतात. त्याच्या जोडीने फारसीही बोलतात. इथला कापडबाजार तर जवळजवळ शीखांच्याच ताब्यात आहे. आज अफगाणिस्थानात वीसएक हजार शीख आहेत. त्यांतले पुष्कळसे सरदार काबूलमध्येच राहतात.

*  *  *

सर्वसाधारणपणे अफगाण लोक आम्हाला अगदीच न चुकता पाकिस्तानीच समजतात. काय कारण असेल कुणास ठाऊक, कदाचित मुकुंदानं दाढी वाढवली आहे म्हणून असेल. पण मग आम्हाला कळत नाही की, काय उत्तर दिल्यावर काय प्रतिक्रिया होईल ? हिंदुस्थानी आहोत असं सांगितल्यावर एकदा एका दुकानदाराने हळू आवाजात विचारले, " हिंदू ? मुसलमान ?"

हिंदू म्हणून सांगितल्यावर त्याचा चेहरा जरा पडला असावा असं मला वाटलं. पण मग खूब अस्त, खूब अस्त, छान छान... वगैरे म्हणाला.

पण या सगळ्या प्रश्नोत्तरांचं रहस्य मिसेस अझीझ भेटल्यावर माझ्या लक्षात आलं. श्री. अझीझ हे इंग्रजीचे प्राध्यापक दिल्लीहून आमच्यासारखेच दोनचार वर्षांसाठी इथे आले आहेत. तिला तर आम्ही अफगाणच वाटलो. मग तिला मी सगळे लोक आम्हाला पाकिस्तानी कसे समजतात ते सांगितलं. त्यावर, अफगाण लोकांना एक फर्मासपैकी खास उत्तर हिंदुस्थानी शिवी देऊन मिसेस अझीझ म्हणाली, " तू खुशाल सांग की आम्ही पाकिस्तानीच आहोत म्हणून. भाव लोच कमी करतात. आम्ही त्या दुकानदारांना म्हणतो की, आम्ही भारतीय असलो म्हणून काय झालं ? आम्हीही मुसलमानच आहोत. तुम्हीही मुसलमान, मग आम्हाला भाव का कमी करीत नाही ? त्यावर ते दुकानदार म्हणतात, " तुम्ही भारतीय मुसलमानच ना ? मग तुम्ही कसले मुसलमान ? तुम्ही काही खरे मुसलमान नाही. पाकिस्तानी मुसलमान हे खरे मुसलमान."

मिसेस अझीझचा अनुभव ऐकून गंमत वाटली. भारतीय मुसलमानांना इथले लोक अस्सल मुसलमान समजत नाहीत, हे कळल्यावर त्यांना काय वाटेल ते मिसेस अझीझच्या संतापावरून मला कळलंच. म्हणूनच आपल्याकडच्या प्रतिष्ठित मुसलमानांना ' आम्ही मूळचे गझनीचे...हेरतचे ' हे सांगण्याचा, पुन्हा पुन्हा सांगण्याचा एवढा सोस का असतो, याचं रहस्यही कळलं. पण भारतीय मुस्लिमांना त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे भारतीय, पाकिस्तानी, अफगाण यांपैकी कुणालाच अरब मुसलमान, अस्सल मुसलमान समजत नाहीत.

पख्तूनीस्तानच्या प्रश्नामुळे पाकिस्तानशी राजकीय संबंध चांगले नाहीत; म्हणून अफगाण लोकांना पाकिस्तानचे मुळीच प्रेम नाही. पण दोघांचाही धर्म मुस्लिम म्हणून त्यांना पाकिस्तानी माणसाचं प्रेम आहे. उलट भारताशी राजकीय संबंध चांगले, पण आपण हिंदू म्हणून त्यांना भारतीय माणसाबद्दल प्रेम नाही.

भारतीय तंत्रज्ञांच्याप्रमाणे इथे रशियन तंत्रज्ञ फार मोठ्या प्रमाणावर काम करत आहेत. त्यांची संख्या सर्वात जास्त आहे. एकंदर पाच हजार वेगवेगळ्या शाखांतले रशियन तंत्रज्ञ इथे काम करीत आहेत. त्यातले बहुसंख्य खुद्द काबूलमध्येच आहेत. त्याशिवाय फ्रेंच, अमेरिकन, जर्मन, कॅनेडियनही आहेतच.

पण रशियनांची वागण्याची पद्धत मात्र एकदम चमत्कारिक. त्यांची तंत्रज्ञांची

टीम येते तीच मुळी टाइपिस्टस्, इंटरप्रिटर्स, क्लार्कस् वगैरे घेऊनच. त्यामुळे त्यांना इतर कुणाचीही गरजच पडत नाही. ही मंडळी कधीही कोणामध्येही मिसळत नाहीत. सगळेजण काबूल शहराच्या ठराविक भागातच घोळक्यानं राहतात. त्या भागाला 'मेक्रेरियॉन' असं नाव असूनही लोक त्याला 'रशियन कॉलनी' म्हणतात. सगळेजण एकदमच ऑफिसला येतात आणि सगळे मिळून एकदमच परत जातात. ठराविक दुकानांतूनच वस्तू विकत घ्यायच्या. हवी असलेली वस्तू दुकानात मिळाली नाही तर दुसऱ्या दुकानात कधीही जाणार नाहीत. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे जाणं येणं तर दूरच राहिलं, रस्त्यात जरी कोणी भेटलं तरी साधं 'हॅलो'सुद्धा म्हणत नाहीत.

पण मिसेस खन्ना भली वस्ताद बाई! एकदा तिनं आपल्या एका रशियन शेजारणीला जिन्यात गाठलंच आणि म्हणाली, "आपण एकाच बिल्डिंगमध्ये राहतो. तू एकदा ये ना आमच्याकडे चहा प्यायला, गप्पा मारायला."

त्यावर केविलवाणं हसून ती बाई म्हणाली, "मी आले असते हो, पण आम्हाला तशी परवानगी नाही. मी मजबूर आहे."

काबूलमध्ये एकटादुकटा रशियन कधीही दिसत नाही. सगळे घोळक्या घोळक्यानंच फिरतात. कुठे जायचं, किती वेळ जायचं, कोणी काय बोलायचं, सगळं काही आखून दिल्याप्रमाणे. आठवड्यातून चार सिनेमे त्यांना दाखवले जातात. आणि प्रत्येक शो ला सगळ्यांनी आलंच पाहिजे हा दंडक. त्यामुळे त्यांना रिकामा वेळ फारसा शिल्लकच नसतो, म्हणा.

रशियन लोकांबद्दल अफगाण माणसाच्या मनात फार संशय आहे. भारतीयांबद्दल फारसा आपलेपणा त्यांना नाही. पण रशियनांबद्दल मात्र संशय आहे. भीती आहे. गोऱ्या कातडीच्या माणसाबद्दल भारतीयांना अजूनही 'जे' काय वाटतं, 'ते तसं–' अफगाण माणसाला वाटत नाही. त्याला सगळ्याच परकीयांबद्दल— मनात संशय वाटतो.

* * *

आमच्या घराचे मालक आमच्या शेजारच्याच बंगल्यात राहतात. इथे आल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी दुपारी जेवायच्या वेळी पंचवीस माणसांना पुरेल एवढं अन्न पाठवून आमची चांगली मेहमानदारी केली होती. दोनचार मटणाचे प्रकार, पुलाव, चिलाव, नान, दही, फळं वगैरे भरपूर अन्न त्यांनी पाठवलं होतं. एवढा भलाभक्कम पाहुणचार पाहूनच माझा जीव दडपला होता. मुख्य म्हणजे आता या एवढ्या भांड्यांतून परत काय पाठवू म्हणून मी चांगलीच फिकीरीत पडले होते. रिकामी भांडी परत करायची तर इच्छा नव्हती. शेवटी खूप विचार करून करून बऱ्याचशा पापड–कुर्डया तळल्या आणि त्या एकावर एक रचून मालकिणीची भांडी परत केली. आता तिनं परत अशी 'मेहमानदारी' केली तर पुन्हा तिला काय द्यायचं हा प्रश्न मला

अस्वस्थ करतोय.

घरमालकाचं नाव मुरादअली. हा पूर्वी जाहीरशहाचा आर्मी जनरल होता. याचं वय ७०–७५ वर्षांचं आहे, पण तब्येत अगदी ठणठणीत. मागे एकदा जाहीरशहाबरोबर शिकारीला गेला असताना, जाहीरशहाच्या मुलीच्या अंगावर धावून आलेल्या रानडुकराला यानं ऐन वेळी भाल्यानं मारलं होतं. म्हणून शहाने केवढी तरी लांबलचक इम्पाला गाडी त्याला भेट दिली होती. याचं सगळं खानदानच आर्मीचं. याचे दोन भाऊही आर्मीमध्ये सध्या जनरल्स आहेत. हा स्वतःही एके काळी जनरल असल्यामुळे यांच्या घरी, सतत कोणी ना कोणी प्रतिष्ठित मंडळी येत असतात.

घरमालकीण बरीच म्हातारी आहे, आजारी पण असते. गोरीपान, सुरेख. एकदा गप्पा मारायला आली. पण बोलायचं कसं काय हा प्रश्नच. कारण तिला हिंदी-इंग्रजी मुळीसुद्धा येत नाही, आणि माझं फारसीचं ज्ञान अजून तरी जुजबीच आहे. तरी पण कशा कुणास ठाऊक, पण चांगल्या तास दीड तास आमच्या गप्पा रंगल्या होत्या. तुला मुलं किती ? माझी मुलं किती ? मुलांच्या शाळा, अभ्यास, आजारपणं, तुम्ही जेवता खाता काय ? वगैरे विषयांवरून बोलता बोलता विषय अफगाण स्त्रियांवर आला. मला अफगाण स्त्रियांबद्दल खूप उत्सुकता वाटते आहे. एवढ्या अदबयावत पद्धतीनं राहणाऱ्या या अफगाण मुली. ज्या घरात चारचार लग्नाच्या बायका आणायची कायद्यानं परवानगी, त्या घरात तिचं काय स्थान असेल ? बहुसंख्य मुलींच्या नजरेत वखवखलेपणा, अस्थिरता, कारुण्य, चीड यांचं अस्वस्थ करणारं मिश्रण कसं पाहायला मिळतं ! ज्या समाजात गोषा अगदी परवापर्यंत होता– अजूनही गोषा पाळणाऱ्या बाईला वेगळाच मान मिळतो– त्या समाजात तिचं कोणतं स्थान असेल ?

मालकिणीनं सांगितलं, सातआठ वर्षांपूर्वीपर्यंत बायका इतक्या सर्रासपणे गोषाशिवाय हिंडत नव्हत्या; अलीकडे मात्र आता किती तरी मुली ऑफिसांतून वगैरे कामं करायला लागल्या आहेत. सर्वसाधारणपणे मुली शालान्त वर्गापर्यंतच शिकत असल्या तरी आता मेडिकल, इंजिनिअरिंग वगैरे शिक्षण घेण्याकडेही मुलींचा ओढा वाढतो आहे. या मुली न चुकता श्रीमंत, सुशिक्षित, पाश्चात्य प्रभावाखालील घरातूनच येतात. तरीसुद्धा नातेवाइकांशिवाय इतर पुरुषांशी न बोलण्याचीच पद्धत चालू आहे.

लग्नं जमवण्याची पद्धत वेगळी. मुलीच्या बापाला ठराविक रक्कम देऊन मगच ती मुलगी विकत घेऊनच तिच्याशी निका लावला जातो. मुलींच्या किंमती मग तिच्या सौंदर्याप्रमाणे, खानदानाप्रमाणे, बापाच्या प्रतिष्ठेप्रमाणे वाढत्याच असतात. सर्वसाधारणपणे अफगाण मुली भलत्याच सुंदर आणि सुदृढ प्रकृतीच्या असतात. कधी कधी ही किंमत मग लाख दीडलाख अफगाणींपर्यंतही जाते. तेवढी किंमत परवडणारे मुलगे असतील तर मुलींची लग्नं होतात; नाही तर पुष्कळदा मुली मोठ्या वयापर्यंत अविवाहितच राहतात. किंवा अगदी खालच्या वर्गातील लोक मामुली पैसे देऊन, आपल्यापेक्षाही गरीब घरातल्या मुली विकत घेऊन

एकापेक्षा जास्त लग्नं करतात. त्यामुळे एकापेक्षा जास्त लग्नं करण्याची ही चैन फक्त श्रीमंतांना परवडते किंवा अगदीच गरीब बापाच्या असाहाय्यतेचा फायदा घेणाऱ्यांना परवडते. मध्यमवर्गीयांमध्ये बिनलग्नाच्या मुली राहण्याचं प्रमाण जास्त! केव्हाही सवत घरी येण्याची टांगती तलवार सतत त्यांच्या डोक्यावर असते. सवत आली की नवऱ्याकडून, स्वतःसाठी, मुलांसाठी अन्नवस्त्र निवारा मिळणं बंदच होतं. त्या बायकांची आयुष्ये म्हणजे यातनाच. आता मात्र सुशिक्षितांमध्ये एकापेक्षा जास्त लग्नं करणं चांगलं मानत नाहीसे झालेत. आणि मुख्य म्हणजे, या बाबतीत त्यांना काही विचारलेलं आवडत नाही. कारण पैशांचा सौदा करून बायको विकत घेणं, आणि तेही एकापेक्षा जास्त, या गोष्टी प्रगत जगात चांगल्या मानल्या जात नाहीत, याची त्यांना जाणीव व्हायला लागली आहे. ही मालकीण, मी एक बाई म्हणून माझ्याशी एवढं बोलली. तिच्या म्हाताऱ्या मनात कोणती शल्यं बोचत असतील? कोणते अपमान गिळून तिचे केस पांढरे झाले असतील? कोणते मनस्ताप सोसून तिची कातडी सुरकुतली असेल? लग्नं होऊन सासरी गेलेल्या आपल्या दोन्ही लेकुरवाळ्या मुलींची सतत पोखरणारी काळजी ती करीत असेल काय?

* * *

हे अफगाण लोक आहेत सौंदर्याचे भोक्ते. बागेची आवड अतिशय. घराच्या मागेपुढे हरतऱ्हेच्या फळाफुलांची झाडं, वेल लावतात. साधा न्हावीसुद्धा आपल्या दुकानात सुंदर फुलांच्या कुंड्या लावून ठेवतो. मनीप्लांटचे वेल सोडतो. खरं आश्चर्य म्हणजे, माझ्या घराच्या शेजारीच कोपऱ्यावर इंडोनेशियन राजदूताचा भलामोठा बंगला आहे. त्या बंगल्यासमोरच एका अगदी लहानशा लाकडी सेंट्रीबॉक्समध्ये एक अफगाण पोलीस सतत पेंगत, पहारा करीत बसलेला असतो. ती सेंट्रीबॉक्स अगदी रिकामी. पण खिडकीमध्ये तो पोलीस एका टोमॅटोसॉसच्या बाटलीत नेहमी वेगवेगळी फुलं लावून ठेवत असतो. कधी कधी तर त्या बाटलीत एकच फूल असतं, पण फुलाशिवाय ती खिडकी कधीही दिसत नाही. मला फोटोग्राफी चांगली येत नाही म्हणून, नाही तर अम्बॅसॅडरच्या भव्य बंगल्याच्या पार्श्वभूमीवरची ती रंग उडालेली, ढलप्या उडालेली लाकडाची एवढीशी सेंट्रीबॉक्स— त्या बॉक्सच्या दाराबाहेरच एका पत्र्याच्या खुर्चीवर सतत पेंगणारा तो अफगाण पोलीस आणि त्याच्या उजव्या बाजूला खिडकीतली ती रंगीबेरंगी सदा टवटवीत असलेली ती फुलं असा एक सुरेखसा फोटो काढला असता मी.

हे अफगाण आहेत सुंदर, सुदृढ, राहतात चांगले, वागतात चांगले, पण इथे, काबूल शहराच्या जुन्या भागात गटारांची काहीही व्यवस्था नसल्यामुळे या निसर्गरम्य शहराला एक किळसवाणी अवकळा आली आहे. अर्थात आता नवीन घरं, नवीन कॉलनी बांधताना ही खबरदारी घेतली जात आहे. पण जुन्या काबूल शहराच्या बाजूलाही फिरकवत नाही. विशेषतः उन्हाळ्यामध्ये असह्य घाण, दुर्गंधी, भयानक माशा, यामुळे

हे लोक असे राहतातच कसे याचं आश्चर्य वाटतं. कदाचित थंडीमधले पाच महिने पांढऱ्या शुभ्र बर्फाखाली ही घाण झाकली जाते, म्हणून त्याकडे कोणी लक्षच देत नाही का ?

या लोकांनी रस्त्यावरच्या दिव्यांचा प्रश्न मात्र फारच सोपा करून टाकलाय. फक्त मोठ्या रस्त्यांवर म्युनिसिपालिटीचे दिवे असतात. इतरत्र प्रत्येकाने–आपापल्या घरासमोर, दुकानासमोर, रात्रभर दिवा लावायला हवा, हा कायदा असल्यामुळे बल्ब फुटलेत, चोरीला गेलेत, लाइन बिघडलीय म्हणून अंधारे रस्ते–ही भानगडच इथे नाही. रस्त्यावरच्या दिव्यांप्रमाणे, शुद्ध पाणीपुरवठा आणि भूमिगत गटारांची काही व्यवस्था करण्याचं या लोकांना कसं सुचलं नाही ? पण मला आश्चर्य वाटतं, राग येतो तो इतर देशांचा. जगातले किती तरी देश पाण्यासारखा पैसा अफगाणिस्थानात ओतत आहेत. सर्व प्रकारची भलीमोठी तांत्रिकी,–यांत्रिकी मदत देत आहेत. पण इथे रस्त्याखालच्या गटारांची व्यवस्था करावी, पाणी शुद्ध करून नळातून घरोघरी जाईल याची व्यवस्था करावी, हे कुणाच्या कसं लक्षात येत नाही ? की राजकीय संबंध दृढ करण्यासाठी जनतेच्या डोळ्यांत भरतील अशाच योजना फक्त हाताळायच्या असतात ?

इथे हे सांगताना, आपल्याला अभिमानास्पद गोष्ट म्हणजे, भारतानं अफगाणिस्थानला पूर्वीच एक मुलांसाठी, एक स्त्रियांसाठी, मदत म्हणून एक मोठं हॉस्पिटल दिलं आहे. भारतीय डॉक्टरांवरती तर या लोकांचा केवढा विश्वास आहे ! या वैद्यकीय मदतीचं अफगाण लोकांना फार अप्रूप वाटतं. त्याशिवाय गझनी गावात भारताच्या मदतीने पाण्याची योजना अमलात आणली जात आहे.

या योजनेमध्ये काम करणारे एक भारतीय इंजिनिअर घरी आले होते. गप्पा मारता मारता ते म्हणाले, "ज्या गझनीच्या महंमदानं आमच्या सोमनाथाचं मंदिर भ्रष्ट केलं, त्याच गझनीसाठी आम्ही कामं करतोय. यार, हे काही मनाला बरं वाटत नाही."

इतिहास हा असा असतो. विसरू म्हणता विसरता येत नाही. शेकडो वर्षांपूर्वी झालेले मान-अपमान असे खोल रुतून बसलेले असतात. वेळ आली की त्यांची आठवण अशी उफाळून वर येते.

काळाची वेगवान वाटचाल पाहिल्यावर देश, धर्म, संस्कृतीबद्दल वाटणाऱ्या संवेदनांचा तीव्रपणा कमी होतो. तरीसुद्धा शब्दांच्या चौकटीत न मावणाऱ्या 'आपलेपणा'बद्दलचा आपलेपणा जात नाही.

ज्या मुस्लिम आक्रमकांनी, हूणांनी, शकांनी भारतावर अत्याचार केले, तेवढेच अत्याचार हा देश मुस्लिम व्हायला लागल्यावरही त्यावर केलेच होते. तरीसुद्धा इथले विचारवंत त्यांना दोष देताना, त्यांना शत्रू म्हणताना, त्यांच्या 'मुस्लिमपणाकडे' संपूर्ण दुर्लक्ष करून, ते पर्शियन होते, मोगल, तुर्की, मंगोलियन किंवा इतर कोणी टोळीवाले होते यालाच महत्त्व देतात. त्याप्रमाणेच त्यांना ओळखतात. म्हणजे एवढे अत्याचार सोसूनही धर्माच्या सारखेपणाचा चिवट धागा त्यांनाही कुठे तरी असा बांधून ठेवतो !

हे सगळे विचार सुचायचे कारण, " चौराहा याकूब "वरचा एक हॉटेलवाला. तिथे आम्ही आइस्क्रीम खात होतो. आमचं आपापसांतलं बोलणं ऐकून हॉटेल-मालक आपणहून बोलायला आला, " तुम्ही हिंदुस्थानातून आलात काय ? " त्यानं विचारलं.

मला वाटलं याचा पुढचा प्रश्न असणार, " तुम्ही हिंदू का मुस्लिम ? "

पण तसं काही न विचारता तो म्हणाला, " आमचा एक पाकिस्तानी दोस्त सांगत होता की, हिंदुस्थानात म्हणे मुस्लिमांना रस्त्यारस्त्यांतून धरून मारतात. गावा-गावांतून मुस्लिमांविरुद्ध दंगे होतात. हे खरं काय ? "

आता हा विषय म्हणजे अत्यंत दाहक, तेवढाच नाजूक. पण मुकुंदानं शांतपणानं त्याला सांगितलं, " गावातून काही वेळा दंगे झाले होते, पण तेव्हा मुस्लिम मारले गेले, हिंदूही मारले गेले. आणि जर, तुझ्या पाकिस्तानी मित्रानं सांगितल्याप्रमाणं, रस्त्या-रस्त्यांतून मुसलमानांना मारत असले तर भारतातले सगळे मुसलमान स्वतःचा जीव वाचवण्यासाठी पाकिस्तानात पळून नाही का जाणार ? उलट भारतामध्ये कोट्यवधी मुसलमान आहेत. त्यांची संख्या पाकिस्तानातल्या मुस्लिमांपेक्षा जास्त आहे. ते तर पाकिस्तानला जाण्याचं नावही काढत नाहीत. उलट इतर मुस्लिमच हिंदुस्थानात येण्याचा प्रयत्न करीत असतात. पाकिस्तान्यांनीच बंगला देशच्या कोट्यवधी मुसलमानांना मारलं, ते तुला माहीत आहे ना ? "

हे उत्तर त्या हॉटेलवाल्याला पटलेलं दिसलं.

हा माणूस अतिशय हुषार, अद्ययावत माहिती असणारा, इतिहासाची बारीक सारीक माहिती असणारा आहे. ऋग्वेद, अवेस्ता इथेच लिहिले गेले हे मोठ्या अभिमानानं त्यानंच प्रथम सांगितलं. मग त्याचा उल्लेख मी इतिहासाच्या एका पुस्तकात वाचला.

एकदा तर बोलता बोलता म्हणाला, " रशियाचा झार राज्यकारभारात लक्ष घालत नसे. त्याची बायको जादूटोण्यावर विश्वास असलेली, देवभोळी होती. रासपुतीनची जुलमी सत्ता तिथे चालायची म्हणून रशियात क्रांती झाली. नाही तर कम्युनिझमचं रशियासारख्या मागासलेल्या देशात काही कामच नव्हतं."

त्याचं हे बोलणं ऐकून आम्ही त्याच्याच दुकानातल्या आइस्क्रीमसारखे थंडगार झालो होतो. शाळेत शिकत असताना रशियन राज्यक्रांतीची कारणं पाठ करता करता आमची फेसाटी उडाली होती. ती कारणं त्यानं चुटकीसरशी सांगितली होतीन्.

मुकुंदाचं सविस्तर उत्तर ऐकून तो मान हालवीत म्हणाला, " धर्माचं हे प्रकरण मोठं पैनं ( हा त्याचाच शब्द. पैनं म्हणजे तीक्ष्ण, धारदार ) आहे. पाकिस्तानचा, इराणचा आणि आमचा धर्म एक. पण ते देश आमच्याशी शत्रुत्वानं वागतात. आणि तुम्ही हिंदू, तरी पण आमच्याशी दोस्ती करता, आम्हाला मदत देता. धर्म आणि राजकारणानं जगाचा इतिहास सारखा बदलतोय. माणूसही बदलत चाललाय."

किती तरी दिवसांपासून माझ्या मनात ठाण मांडून बसलेला प्रश्न मग मी त्याला

विचारला, " हे बघ, तुला आपल्या देशाचा एवढा अभिमान वाटतो आहे; पण पूर्वी तर तुमचा देश मुसलमान नव्हता. जेव्हापासून तुमचा देश मुसलमान झालाय तेव्हापासून तुमच्या देशात शांती फारच कमी काळ होती. सतत लढाया, अत्याचार, विध्वंसच सुरू होता! मग आता मला सांग, कोणत्या काळाबद्दल तुला जास्त अभिमान वाटतो? देश मुस्लिम होण्याच्या अगोदरच्या काळाबद्दल की नंतरच्या काळाबद्दल?"

माझा प्रश्न ऐकून आइस्क्रिमवाला चांगलाच दचकला. आत्तापर्यंत आपल्या पाकिस्तानी मित्राबद्दल, जगाच्या बदलत्या इतिहासाबद्दल, रशियाच्या झारबद्दल विद्वत्तेनं बोलणाऱ्या त्या माणसाचा चेहरा एकदम पालटला. अबाउट टर्न करून, काहीही उत्तर न देता तो निघून गेला.

पण त्याच्या या निरुत्तर राहण्यानंच मला बरंचसं उत्तर मिळालं होतं.

## अफगाण माणूस

सर्वसाधारण अडाणी माणसाला, फुकटची मग्रुरी, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांबद्दलची उदासीनता, वैचारिक ग्लानी, क्रौर्य याशिवाय इतर संवेदना सहसा नसतातच. थोडंबहुत शिक्षण झालेले, मध्यमवर्गी लोक, यांची संख्या इतर देशांतल्या मध्यमवर्गीयांच्या टक्केवारीच्या तुलनेत फार कमी आहे; आपल्या खास मध्यमवर्गीय बाण्याला जागून सतत नाराज असतात. सतत टीका करतात. अगदी प्रेसिडेन्ट दाऊदखानच्या राजवटीपासून ते साताठ दिवसांत कोणीच मेलं नाही म्हणून ' फतेहा ' पढण्याच्या निमित्तानं ऑफिसला दांडी मारता आली नाही, इथपर्यंत! आधुनिक संस्कृतीशी जवळचं नातं सांगणारे, उच्च विद्याविभूषित, सुसंस्कृत आणि आपल्या जाणीवा धारदार असणारे लोक मूठभरच आहेत. हे बहुतकरून जमीनदार, सरदारांच्या खानदानातलेच असतात.

' अफगाण संस्कृती ', ' अफगाण संस्कृती ' असे उल्लेख जेव्हा येतात, तेव्हा मला कळत नाही, या अफगाण संस्कृतीचे आधारस्तंभ कोण? कुराणनिष्ठ, हातात सतत बंदुका बाळगत आधुनिक जगाशी फटकून वागणारा, खेडेगावातलं अत्यंत मागासलेलं जिणं जगणारा अशिक्षित अफगाण माणूस, की आधुनिक संस्कृतीत चपखल बसणारा श्रीमंत वर्ग? पण हा प्रश्न सगळ्याच देशांसमोर असतो, तसा तो अफगाणिस्तानसमोरही आहेच. वरवर पाहणाऱ्याला तरी धार्मिक, सामाजिक, राजकीय पातळीवर काही फारशी खळबळ माजलेली दिसतच नाही. तसं असतं तर संप, मोर्चे, दंगेधोपे— काही तरी गडबड झाली असती. आपल्या भारतात सतत काही ना काही गोंधळ सुरूच असतो. त्या मानाने इथे अगदी बिनधास्तपणाच दिसतो. पण मग कळले की संप, मोर्च्यांना इथे बंदीच आहे. दाऊदखानच्या सत्तेखाली अफगाणिस्थान हे रिपब्लिक असलं तरी प्रत्यक्षात इथे लष्करी हुकूमशाहीच आहे असं बोललं जातं.

या संदर्भात एक अत्यंत गंमतीचा अनुभव आला. मुकुंदाच्या ऑफिसच्या प्रेसिडेन्टची निवडणूक व्हायची होती. ऑफिस प्रेसिडेन्ट ही बरीच मानाची, अधिकाराची जागा असते. ही निवडणूक खरोखरच किती लोकाभिमुख आहे हे दाखविण्यासाठी ऑफिसातल्या सर्व थरांवरच्या लोकांना बोलावून जेवणाच्या वेळात सभा सुरू झाली. उघड मतदान सुरू झाले तेव्हा चतुर्थश्रेणी, तृतीय श्रेणीच्या सगळ्यांनी "आमचा प्रेसिडेन्ट दाऊदखान... आमचा प्रेसिडेन्ट दाऊदखान..." म्हणून घोषणा द्यायला सुरुवात केली. तेव्हा वरच्या लोकांना कळेना ही काय भानगड आहे? कारण कोणताच दाऊदखान ऑफिस प्रेसिडेन्टशिपसाठी उभा नव्हता. बराच वेळ चर्चा, सवाल-जबाब झाल्यावर मग उलगडा झाला. त्या मतदारांना वाटलं होतं की, प्रेसिडेन्टची निवडणूक म्हणजे, आपल्या देशाच्या प्रेसिडेन्टची निवडणूक. म्हणून त्यांनी अत्यंत इमानदारीनं दाऊदखानच्या नावाचा ओरडा चालवला होता!

हा अनुभव जेवढा गंमतीचा वाटतो, तेवढाच तो विदारक आहे. १९७६ मध्ये सर्वसामान्य अफगाण माणसाच्या राजकीय जागीवा किती आंधळ्या होत्या असं म्हणता येईल, त्याप्रमाणेच लष्करी हुकूमशाहीत राहणाऱ्या सर्वसाधारण माणसाची मनोवृत्तीही पाहायला मिळते, असंही म्हणता येईल. अर्थातच या प्रसंगावरून सरसकट मत बनवता येणार नाही; पण एक उदाहरण म्हणून निश्चितच उद्‌बोधक आहे.

त्याचप्रमाणे जगभरातल्या सगळ्या देशांतून कोट्यवधी रुपयांच्या मदतीचा ओघ इथे येतो आहे. कशासाठी ही मदत आपल्याला मिळते आहे? या मदतीचे काय परिणाम होत आहेत? जे होत आहेत ते चांगले की वाईट? कशाच्या बदल्यात आपल्याला ही मदत दिली जातेय? याबद्दलही सर्वसाधारणपणे उदासीन वृत्तीच आढळते. थोड्याशा बोलण्यावरूनच लक्षात येतं की, आपल्याला सगळ्या देशांनी मदत दिलीच पाहिजे. तो आपला अधिकारच आहे. असंच सर्वसाधारणपणे सगळ्या थरांवरच्या अफगाण माणसाला वाटतं. "तुम्ही नाही दिलीत मदत, तरी आम्हाला मदत देणारे आहेत पुष्कळ!" अशी मग्रुरीही कमी आढळत नाही.

असे कसे हे लोक?

त्यांना कळून घेण्याची उत्सुकता वाटते आहे. अत्यंत आवश्यकच वाटतंय ते. त्यासाठी दर शुक्रवारी, म्हणजे आठवड्याच्या सुट्टीदिवशी ओळखीच्या अफगाण माणसांना आलटून पालटून घरी चहाला बोलवायची पद्धत ठेवली. अट एकच की, येताना त्यानं आपल्या बायकोला, बहिणीला, मैत्रिणीला, काकी, मामी, —कुणा तरी एका बाईला बरोबर आणलं पाहिजे. त्यामुळे प्रत्येक अफगाण पुरुषाच्या बरोबरीने एका अफगाण बाईशी बोलण्याची संधी मला मिळाली.

त्याशिवाय या देशात काय चाललंय याचा कानोसा घ्यायचा हमखास उपाय म्हणजे इथली वृत्तपत्रं वाचणं! 'अनीस' हे फारसी वृत्तपत्र. त्यामुळे ते वाचण्याचा प्रश्नच येत नाही. इंग्रजी वर्तमानपत्र 'काबूल टाइम्स.' फक्त एकच इंग्रजी वृत्तपत्र.

अनीस आणि काबूल टाइम्स ही दोन्हीही सरकारी वृत्तपत्रं. इतर वृत्तपत्रंच नाहीत. दाऊदखानाने सत्तेवर आल्याआल्या वृत्तपत्र स्वातंत्र्य हिरावून घेतलं होतं.

आणि दीड दोन फुटांच्या, चारपानी काबूल टाइम्सची किंमत एक रुपया आहे! किंमत फार वाटते. एवढं महागडं वृत्तपत्र कोण घेत असेल बरं? मला खास मध्यम-वर्गीय प्रश्न पडला. पण इथेही कुणाच्या मर्जीचा प्रश्न नाही, हेसुद्धा कळले. 'अनीस' काय किंवा 'काबूल टाइम्स' काय, ज्यांना सरकारशी गोडीगुलाबीचे संबंध ठेवायचे आहेत त्यांना ही वृत्तपत्रं घ्यावीच लागतात. सरकारी दफ्तरातून काम करणाऱ्यांनाही ती घ्यावीच लागतात. म्हणजे तसा नियम नाही, पण अलिखित रिवाज आहे. आणि लोकच काय समजूत उमजूत वागायचं तसं वागतात. या काबूल टाइम्सचा अवतारही अतिशय निराशाजनक वाटला. मुख्य म्हणजे हे वर्तमानपत्र दैनंदिन असूनही रोज निघतंच असं नाही. जेव्हा निघतं तेव्हा ते दुपारी चारच्यापुढं निघतं. सरकारनं विविध प्रकारची मागवलेली टेंडर्स, त्याच मजकुरानं किती तरी जागा व्यापलेली असते. ही टेंडर्स म्हणजेच हा पेपर. बहुधा वेगवेगळ्या देशांना मदत द्यायला सोयीचे पडावे म्हणूनच मुख्यत्वेकरून हे वृत्तपत्र काढत असावेत, असा विचार मनात आल्याशिवाय राहिला नाही. चित्र-पटांची एखाददुसरी जाहिरात. आणि इतर माहिती म्हणजे सरकारी जाहीरनामे, इतर देशांतून आलेल्या पाहुण्या मंडळींची खबरबात. इथले कोण लोक कुठे बाहेरच्या देशात गेले वगैरे माहिती. कोणत्या देशानं कोणतं नवं प्रोजेक्ट बहाल केलंय वगैरे सगळा एकसुरी मामला. बातम्या सगळ्या शिळ्याच असतात. सकाळी उठल्यावर, एकच बातमी दोनतीन वृत्तपत्रं किती वेगळ्या तऱ्हेनं देतात हे वाचण्याची चटक लागलेल्या मला, हा काबूल टाइम्स फारच बोचत होता.

या लोकांना समजावून घ्यायचं असेल, हा देश असा कसा हे पाहायचं झालं तर याचा जुना इतिहास वाचायलाच हवा अशी खूणगाठ मी मनाशी बांधली.

घराशेजारीच ब्रिटिश कौन्सिलची टुमदार बंगली आहे. तिथल्या छोट्याशाच लायब्ररीमध्ये पुस्तकांनी भरलेली तीनचार मोठी कपाटं आहेत. त्यात अफगाणिस्थानचा इतिहास, भूगोल, इथली प्रवासवर्णनं, इथल्या जुन्या राजकारणाची चर्चा– सब कुछ अफगाणिस्थान, कुलुपबंद आहेत.

असं का? म्हणून चौकशी केल्यावर कळलं की, इथल्याही लायब्ररीचे सदस्य ही पुस्तकं चोरतात, घेऊन जातात आणि आणून देत नाहीत, म्हणून ही खबरदारी घेण्यात येते! पुष्कळदा संकोच वाटायला लावणारी, म्हाताऱ्या लायब्ररियन बाईची, खणखणीत आवाजातली, अखंड बडबड सतत ऐकून घेण्याच्या दिव्यातून पार पडत असतानाच, 'त्या' कपाटातली पुस्तकं मला मिळू लागली. शिवाय आरंभी त्या तापदायक म्हातारीची पुढे मला खूपच मदत होऊ लागली. पुस्तकं मिळवण्यासाठी, गावातल्या बातम्या मिळवण्यासाठी, कुणाबद्दल कोण काय बोलतं, काबूलमधल्या कुणाचे लागेबांधे कुणा-पर्यंत पोचतात, कुणाचं खानदान कशासाठी प्रसिद्ध आहे,–तसंच अप्रसिद्ध आहे,

हे सगळं काही ती मला सांगायची.

१७ एप्रिल १९७८ च्या संध्याकाळी इथल्या एका प्रबळ कम्युनिस्ट नेत्याचा, मीर अकबर खैबरीचा, रस्त्यावरच, अज्ञात इसमांनी खून केला होता. तेव्हा, 'ही काही चांगली लक्षणं नाहीत.' असं म्हणून एरवी बारीकसारीक गोष्टीसाठी माझा किती तरी वेळ खाणारी ही बडबडी बाई, या वेळी मात्र फक्त मान हालवत गप्पच बसली होती.

"कोण हा खैबरी?" मी मग आपणहूनच विचारले.

"होता एक कम्युनिस्ट लीडर.... त्यांचं एक वृत्तपत्रही चालवायचा तो." एका वाक्यातच तिनं उत्तर दिलं.

"दाऊदखानच्या माणसांनीच मारलं असेल का त्याला? की आणखी कुणी?" तिला बोलतं करायचा माझा आणखी एक प्रयत्न.

"देवाला माहीत. आपल्याला काय कळणार त्यातलं? पण हे चांगलं झालं नाही." तिचं पुन्हा जेवढ्यास तेवढंच उत्तर.

नंतर २० तारखेला बी. बी. सी.नं आपला अंदाज व्यक्त केला होता, "आता लौकरच अफगाणिस्थानामध्ये क्रांती व्हायची लक्षणं दिसत आहेत. ही क्रांती भयंकर असेल. रस्त्यातून रक्ताचे पाट वाहतील!"

दुसऱ्या दिवशी लायब्ररीत गेल्यागेल्याच ती म्हणाली, "बघ, मी म्हणाले नव्हते तुला? बी. बी. सी.चं पण तसंच म्हणणं आहे."

ते सगळं नंतरचं. सध्या तरी मिळतील तेवढी पुस्तकं वाचायची आहेत. जमतील तेवढी ठिकाणं पाहायची आहेत. लोकांशी चर्चा करायच्या आहेत. गप्पा मारायच्या आहेत.

## २

### भग्नावशेषांचा देश

अफगाणिस्थानातल्या प्राचीन इतिहासाचे दाखले, भग्नावशेषांच्या स्वरूपात संपूर्ण देशभर, विपुल प्रमाणात विखुरलेले आहेत. ‘भग्नावशेषांचा देश’ असं या देशाचं वर्णन केलं तर ते चूक ठरू नये. हाताच्या बोटांवरच मोजता येतील इतकेच आणि तेही लहानशाच आकाराचे कारखाने सोडले, आणि फक्त काबूलमधल्याच श्रीमंत लोकांची अत्याधुनिक राहणी सोडली, तर इतर अफगाणिस्थानचं, विसाव्या शतकाशी फार फार दूरचं नातं आहे. एकीकडे सामर्थ्यवान, वैभवशाली, प्रबुद्ध हिंदू, बौद्ध राजांचा जुना काळ, आणि ज्ञानाच्या, विज्ञानाच्या कक्षा अपरंपार विस्तारलेला आजचा नवा काळ यांच्यामध्ये मध्येच इस्लामी टोळीवाल्यांच्या आक्रमणांमुळे मुसलमान झालेला, टोळीवाल्यांच्या आपापसांतल्या भांडणांत, आपलं सगळं पूर्वीचं वैभव गमावून बसलेला, आजचा सर्वसाधारण अफगाण माणूस, आपली उमगच हरवून बसलेला वाटतो.

बल्ख शहराला जाण्याचे आम्ही ठरवले तेव्हा ओळखीच्या लोकांनी आम्हांला वेड्यातच काढले. त्यांचं म्हणणं आज बल्खमध्ये पाहण्यासारखं काहीही नाही. तिथं आता केवळ धुळीचं साम्राज्य आहे. पण आम्हाला हे धुळीचं साम्राज्यच पाहायचं होतं. म्हणून आम्ही प्रस्थान ठेवलं. आमचा ड्रायव्हर म्हणाला, ‘एवीतेवी अर्धी गाडी रिकामीच आहे. माझ्या बायकोला आणि दोन लहान मुलांना बरोबर घेऊ का? बल्ख अलिकडच्या मजार-ए-शरीफच्या मशिदीमध्ये माझा नवस फेडायचा राहिलाय.’ अर्थात तोही मग आपला कुटुंब कबिला बरोबर घेऊन निघाला.

काबूल शहराच्या बाहेर पडतापडताच गुलअमीरने आपल्या बायकोला ‘बुरखा काढ आता’ म्हणून कधी समजावून तर कधी रागावून सांगायला सुरुवात केली. पण त्या बहाद्दरणीनं काही शेवटपर्यंत बुरखा काढला नाही. नवरा खेकसला की आपल्या चेहऱ्यावरून हातभर पुढे आलेला बुरखा ती इंचभर मागे सरकवायची. या सगळ्या झटापटीतून मी एकदा तिला पाहिलंच. फारच सुरेख होती ती.

“गावाबाहेर आल्यावर कोण पाहणार आहे तुला? उकडतंय कोण. काढ

बुरखा. कसं छान, गार वारं लागतंय बघ.'' असं मी म्हटल्यावर ती म्हणाली, "मी काही बुकं वाचली नाहीत. मी कशी बुरखा काढणार?'' त्यानंतर तिनं बुरखा काढला नाही तरी आमच्या गप्पा चालू झाल्या.

काबूलपासून थेट बल्खपर्यंतचा जवळजवळ २५० कि. मी.चा रस्ता सुरेख, अगदी पायघड्या घातल्यासारखा गुळगुळीत आहे. काबूलपासून पन्नास साठ किलोमीटर वरच्या सलांग पासवर, तेरा हजार फूट उंचीवर, जगातला सर्वात उंच आणि तेवढाच लांब बोगदा बांधलेला आहे. वाटेल तेवढी बर्फवृष्टी झाली तरी हा रस्ता, हा बोगदा वाहतुकीसाठी वर्षभर चालू असतो.

"हा रस्ता, हा बोगदा रशियन सरकारनं आम्हाला बांधून दिलाय. वर्षभर याची देखभालही तेच करतात. पण ते स्वतःच्या फायद्यासाठी. हा रस्ता जातो तो थेट रशियन सरहद्दीला जाऊन मिळतो. कशीही हवा असली तरी रशियन माल भरलेले ट्रक्स वर्षभर थेट काबूलपर्यंत जाऊन पोचतातच.'' गुलअमीर नाराजीनं सांगत होता.

एकदा हिंदुकुश पर्वत ओलांडून पलीकडे गेल्यावर पठार सुरू झाले. अफगाणिस्थानची उत्तर सीमा जवळ येऊ लागली तशी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अथांग पसरलेली वाळवंटं दिसू लागली. तिकडे नजर टाकून गुलअमीर म्हणाला, "दाऊदखानानं १९७३ साली जेव्हा आपल्या काकाकडून सत्ता बळकावली, त्या दिवशी रशियाने स्वतःची शेकडो मिलिटरी हेलिकॉप्टर्स इथे आणून तयार ठेवली होती. वेळ पडली तर दाऊदला मदत करण्यासाठी म्हणून. उघडपणानं तसं कोणीही कबूल करीत नाही, पण सगळ्यांना माहीत आहे ते. आमच्या देशाच्या भानगडीत रशियन सरकार फार लुडबुड करतं. पण काय करणार? आमचं सरकारच तसलं नालायक.''

ही गोष्ट आहे सप्टेंबर १९७७ मधली; म्हणजे अफगाणिस्थानात नूर महंमद तराकीचे रशियाधार्जिणे कम्युनिस्ट सरकार सत्तेवर येण्याअगोदर सात महिने.

करबलाच्या लढाईत जखमी झालेला, महंमदाचा जावई अली, गाढवावरून इथपर्यंत आला. शेवटी त्याने इथेच प्राण सोडला. 'मजार ए-शरीफ'मधली अलीची मजार पाहून, गुलअमीरचा नवस फेडून आम्ही भर दुपारी बल्खला पोचलो. मजार-ए-शरीफ पासून फक्त वीस मैलांवर बल्ख आहे. बल्ख गावात शिरण्याअगोदर चार पाच मैलांपासूनच, उजव्या हाताला, बारा पंधरा फूट उंच, बारा पंधरा फूट रुंदीची, मातीची भिंत सुरू झाली होती. मधून मधून त्या भिंतीमध्ये मातीचेच लांब-रुंद प्रशस्त, उंच बुरूज होते. कुठे कुठे ही भिंत तुटली होती, खचली होती, पण धापा टाकीत, जिवाच्या कराराने उभी होती. अलेक्झांडर खिस्तपूर्व ३३१ मध्ये अफगाणिस्थानात आला होता. तेव्हा त्याने या बल्ख शहरात आपली छावणी टाकली होती. त्या वेळेस त्याने या शहराभोवतीने संरक्षणासाठी जी भिंत बांधली होती, त्याच भिंतीचे हे अवशेष होते. गोल गोल फिरणाऱ्या भन्नाट वाऱ्यामध्ये थरथरत उभी असलेली ही भिंत या शहराच्या वयोवृद्धत्वाची साक्ष देत होती.

वर्षांनी, ते रशियन, शेरखान बंदरच काय पण संपूर्ण अफगाणिस्थानातच ठाण मांडून बसणार आहेत !

## बामियान

हिंदुकुश या शब्दाचा अर्थ दोन तऱ्हेनं सांगितला जातो. कोणी म्हणतात की, इस्लामी टोळीवाल्यांनी भारतातून हजारो हिंदू गुलामांना आणले. परतीच्या वाटेवर हा भयंकर पर्वत ओलांडताना बर्फवृष्टी, अवघड प्रवास यामुळे ते हिंदू गुलाम मरून जात. कुश म्हणजे मरणे– म्हणून हा हिंदुकुश पर्वत.

दुसऱ्या म्हणण्याप्रमाणे हा हिंदुकुश नसून हिंदुकश पर्वत आहे. कश म्हणजे ओढून घेणे. इथपर्यंतचा प्रदेश, हिंदूंनी ओढून आपल्या साम्राज्याला जोडून घेतला होता, म्हणून तो हिंदुकश.

वास्तवामध्ये दोन्हीही अर्थ खरेच आहेत. इस्लामी काळात जसे हिंदू गुलाम हजारोंच्या संख्येनं इथे मेले, तसेच हिंदू राजांचे साम्राज्यही इथे, त्याहीपूर्वीच्या काळात टिकून होते. त्याच्या खुणा संपूर्ण अफगाणिस्थानभर सापडतात. अशोकाचे शिलालेख कंदाहारसारख्या दूरवरच्या ठिकाणीही सापडतात. काबूल म्युझिअम पाहताना प्रश्न पडतो की, हे अफगाणिस्थानातलं म्युझिअम आहे की मथुरेचं ? एवढ्या मोठ्या प्रमाणात इथे भारतीय संस्कृतीशी निगडित असलेल्या वस्तू पाहायला मिळतात.

मध्य अफगाणिस्थानात विश्वकर्म्याने कसल्या तरी आक्रान्ताने निसर्ग घडवल्या-सारखा वाटतो. इथल्या प्रचंड मोठ्या सरळसोट, वर आकाशाला भिडणाऱ्या, लाल जांभळ्या पहाडांमधून, परिकथेतल्या भयानक राक्षसांची तोंडे, दुर्गम किल्ले, प्रचंड हत्तींची गंडस्थळे अंगावर धावून आल्यासारखी वाटतात, तर कुठेकुठे लडिवाळ वळणे घेत घेत धावणारा चिमुकल्या बामियान नाही तर घोडबंद नद्या, जंगलातली उंचच उंच देवदार, चिनार आणि बदामाची सुंदर कुसरदार हिरवीगार झाडी, सोनपिवळी शेते, अत्यंत नितळ निळ्या रंगाचे आकाश नजरेला सुखावते. हे बामियान गाव कुणी वसवले वगैरे काहीच संदर्भ लागत नाही.

इ. स. पूर्व ३३४ ते ३२७ च्या दरम्यान अलेक्झांडर हिंदुस्थानात जाताना इथेच कुठे तरी जवळपास थांबला होता. स्वतः अलेक्झांडर निघून गेल्यावर, दोनशे वर्षे ग्रीकांनी येथे राज्य केले. हा सगळा परिसर गांधार देश म्हणून ओळखला जायचा. हिंदुस्थानात इ. स. पूर्व २६० मध्ये सम्राट अशोकाने बुद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्या वेळच्या इतिहासाला वेगळेच वळण लागले. अशोकाने बुद्धधर्माच्या प्रसारासाठी चीन, पूर्व आशिया, सिलोन ते थेट इराणपर्यंत श्रमण पाठवले होते. कंदाहारमध्ये अशोकाचा शिलालेख सापडला आहे. गांधार देशाने– त्यामध्ये बामियानचाही राजा होता,– बुद्धधर्माचा स्वीकार केला. अशोकाने पाठवलेल्या श्रमणांबरोबर जसा बुद्धधर्म

आजच्या अफगाणिस्थानात येऊन पोचला होता, त्याबरोबरच हिंदुस्थानी कलाही इथे येऊन पोचली होती.

इ. स. पूर्व १३५ मध्ये शक इथे आले. आणि त्यांनी ग्रीकांची सत्ता नामशेष केली. त्यानंतर शंभर वर्षांनी कुशाण टोळीवाले चीनमधून इथे आले, आणि त्यांनी शकांना हुसकून लावले. कनिष्क हा कुशाणांचाच एक अत्यंत सामर्थ्यशाली सम्राट. त्याचे साम्राज्य गांधारपासून थेट मथुरेपर्यंत पसरले होते. कपिसा ( अफगाणिस्थान ), पुरुषपूर ( पेशावर, पाकिस्तान ), आणि यमुनेकाठची मथुरा या तीन त्याच्या राजधान्या होत्या. या कुशाणांचा अमुक असा धर्म नव्हता की सुसंस्कृत, एकसंध, अशी संस्कृती त्यांच्याजवळ नव्हती. कनिष्क राजा हा जसा पराक्रमी योद्धा होता तशीच त्याला ज्ञान, कला, तत्त्वज्ञानाची आस होती. त्याने गांधार काबीज केल्यावर तिथला बुद्धधर्म स्वीकारला. बुद्ध तत्त्वज्ञानाच्या चर्चेसाठी, अभ्यासासाठी पेशावर, कपिसा, कंदाहार, इथे तो सभा बोलावीत असे. बामियान इथेही बुद्धधर्माचा अभ्यास आणि धर्मप्रसारासाठी जाणाऱ्या श्रमणांना तयार करण्यासाठी मोठमोठे बुद्धविहार होते. त्यांना कनिष्काचा बलशाली आधार मिळाला.

एखादा सम्राट जेव्हा अत्यंत बलिष्ठ राज्य स्थापन करतो, त्याचे वैभवशाली साम्राज्य बनवतो, सत्तेबरोबरच शहाणपणा, कला, तत्त्वज्ञान यांनी त्याच्या साम्राज्याची कीर्ती जगात पसरते. त्याच वेळी त्याच्या मनात एक खंत निर्माण होते. ' मी गेल्यानंतर काय ? माझ्या सर्वांगीण वैभवाची साक्ष देणारी काही तरी खूण कालपटावर राहिली पाहिजे.' म्हणूनच मग जगामध्ये कुठे कुठे ताजमहाल, पिरॅमिडस्, स्फिंक्ससारखी स्मारके उभी आहेत. कनिष्काने स्वतःपेक्षा बुद्धावर जास्त प्रेम केले होते. बुद्ध तत्त्वज्ञानाने, बुद्धचरित्राने तो भारावून गेला होता. त्याला शाश्वत स्वरूप देण्यासाठी बामियानला त्याने प्रचंड मोठी बुद्धमूर्ती उभी करायला सुरुवात केली. या बुद्धमूर्तीसाठी बामियान हेच ठिकाण का निवडले याचे निश्चित असे कारण सांगता येत नाही. पण पूर्व–पश्चिमेला जोडणाऱ्या सिल्करूट या व्यापारी मार्गावरील बामियान हे महत्त्वाचे विश्रांतिस्थान होते. व्यापारी, प्रवासी इथे थांबत असत. इथल्या रमणीय आणि समृद्ध परिसराने सुखावून जात. जाताना इथल्या बुद्धधर्मीय राजाच्या वैभवाने, इथल्या बौद्धभिक्षूंच्या प्रचंड मोठ्या संख्येने, त्यांच्या शिकवणीने भारावून जात. दूरदूर जाणाऱ्या या भारावलेल्या प्रवाशांच्या मनात बुद्धाचा ठसा कायमचा उमटलेला रहावा, म्हणूनही कदाचित बामियान इथेच बुद्धमूर्ती उभ्या करण्याचा हेतू असावा.

सुरेख गुलाबी-जांभळी झाक असलेली, प्रचंड मोठ्या पहाडातून कोरून काढलेली बुद्धमूर्ती १२० फूट उंच आहे. कनिष्कानंतरच्या काळात आणखी एक बुद्धमूर्ती कोरली गेली. ती तर १७५ फूट उंच आहे. या दोन्ही मूर्ती एकमेकींपासून अर्ध्या मैलाच्या अंतरावर उभ्या आहेत. जगात एवढ्या उंच बुद्धमूर्ती कुठेही नाहीत. त्याच ओळीमध्ये आणखी दोन पद्मासन घातलेल्या बुद्धमूर्ती होत्या; शिवाय एक निर्वाण

अवस्थेतला झोपलेला बुद्धही होता. पण शेकडो वर्षांच्या कालप्रवाहात त्या नाहीशा झाल्या. त्यांचे रिकामे कोनाडे फक्त आज आहेत.

या बुद्धमूर्तीवर ग्रीककला आणि हिंदुकला या दोन्हींची छाप पडलेली आहे. आजूबाजूला बुद्ध भिक्षूंना, श्रमणांना राहण्यासाठी लहान मोठे मठ पहाडात कोरलेले आहेत. पूजाअर्चा करण्यासाठी, बुद्धमूर्तींच्या माथ्यावर जाण्यासाठी तिथे पहाडातूनच रस्ते काढलेले आहेत. वर जाताना अध्येमध्ये लहान गुंफा आहेत. बुद्धाच्या मस्तकावरच्या कोनाड्यांच्या भिंतीवर आणि आजूबाजूला, गुंफांच्या भिंतींवर जातक-कथा चितारल्या आहेत. काही ठिकाणची दुर्गा, शक्ती, सूर्य वगैरे देवतांची चित्रे आजही पाहायला मिळतात. काहींचे रंग अजूनही बरेचसे टिकून आहेत. त्यांतील व्यक्तींच्या पेहरावांवर, आभूषणांवर, केशभूषेवर, हालचालींवर ग्रीकांची छाप पडलेली आहे. ग्रीक संस्कृती इथे इतक्या खोलवर रुजली होती की, त्याचा ठसा या परिसरात उमटला नसता तरच नवल! इथली चित्रे, मूर्ती पहिल्या की अंजठा–वेरूळशीही त्यांचे साम्य आहे हे ध्यानात येते. ग्रीक-कला आणि हिंदुस्थानी कला यांचा सुरेख संगम इथं पाहायला मिळतो. बुद्धमूर्ती कोरलेले हे पहाड तसे ठिसूळच आहेत. बुद्धमूर्ती कोरून काढल्यानंतर त्यावर मातीचा गिलावा करून गुळगुळीतपणा आणला गेला. त्यानंतर मग या प्रचंड मूर्ती रंगवून, सोन्याचा मुलामा देऊन, हिऱ्यामाणकांनी सजवल्या होत्या. मूर्तीवरचा काही ठिकाणचा रंग, सोन्याचा मुलामा अजूनही दिसतो आहे.

कनिष्कानंतर कुशाण साम्राज्य फार दिवस टिकले नाही. इराणच्या ससानिअन राजांनी कुशाणांचा पराभव करून स्वतःचे राज्य स्थापन केले. बामियानचा राजा ससानिअन राजाचा मांडलिक झाला. ससानिअन हे अग्निपूजक होते, झरतुष्ट्राचे अनुयायी. त्यामुळे बामियानमध्ये बुद्धधर्माचे वर्चस्व चालूच राहिले. इ. स. ४०० मध्ये चिनी प्रवासी फाहियान हा इथे आला होता. त्याने बामियानच्या वैभवाचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

"बामियानच्या राजाने आपल्या राज्यातल्या कानाकोपऱ्यातल्या भिक्षूंना, श्रमणांना आमंत्रण देऊन वार्षिक उत्सवासाठी इथे बोलावले. आणि पावसाळ्यामध्ये ढग यावेत तसे शेकडो श्रमण इथे जमले. रेशमी ध्वजांनी आणि पताकांनी सगळा परिसर भरून गेला. सोन्या-रुप्याच्या कमळांनी श्रमणांची आसने सुशोभित केली होती. प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणे बसण्याची व्यवस्था होती. मग इथल्या राजाने श्रमणांना वगैरे दाने द्यायला सुरुवात केली. हा दानधर्म सहासात दिवस सुरू होता. राजाने आपली सगळी संपत्ती श्रमणांना देऊन टाकली. शेवटी फक्त त्याचा घोडा शिल्लक राहिला. तेव्हा त्याच्या मंत्र्यांनी, श्रमणांना राजाला पुन्हा राज्यावर बसण्याची आज्ञा करण्याची विनंती केली. मग श्रमणांनी सगळी संपत्ती राजाला परत दिली. आणि त्याला पुन्हा राज्यावर बसवले. हा समारंभ दरवर्षी वसंतऋतूत होतो."

पण बामियानमधले हे वातावरण फार दिवस टिकले नाही. इ. स. ४२५ नंतर

रानटी हूणांच्या टोळया गांधार देशामध्ये शिरल्या. पेशावरच्या भागातील सगळे बुद्धविहार जमीनदोस्त झाले. पण बामियान हे गाव जरा दुर्गम ठिकाणी, बाजूला पडत असल्यामुळे ते तेवढे बचावले. इ. स. ६३२ मध्ये दुसरा चिनी प्रवासी ह्युएनतसंग हा इथे आला होता. तो तर इथल्या वैभवाने भारावूनच गेला.

याच वेळी अरेबियामध्ये इस्लामचा उदय झाला. आणि त्याने इस्लामचा प्रसार करायला निघालेले इस्लामी टोळीवाले गांधारमध्ये येऊन पोचले. आणि विध्वंसाला सुरुवात झाली. तरी पण हूणांच्या तडाक्यातून सुटलेले बामियान पुन्हा या सुरुवातीच्या इस्लामी टोळीवाल्यांच्या तडाक्यातूनही बचावले. इ. स. ७२७ मध्ये हुअी चाओ हा कोरियन बुद्ध भिक्षू इथे आला होता. त्यानेही बामियानच्या वैभवशाली, पराक्रमी बुद्ध राजाचे, इथल्या बुद्ध विहारांचे आणि बुद्ध-मूर्तींचे खूप कौतुक केले आहे.

त्यानंतर मात्र बामियान मुसलमान आक्रमकांच्या, लुटारूंच्या तडाक्यात सापडले. इ. स. ९७० मध्ये बल्खच्या तुर्की राजाने बामियानच्या राजाचा पराभव केला. बामियानच्या राजाला इस्लाम धर्म स्वीकारावा लागला. लढाई सुरू झाली की, इथले बुद्ध भिक्षू आजूबाजूच्या जंगलात जाऊन राहात आणि सगळे स्थिरस्थावर झाले की पुन्हा आपापल्या विहारात राहायला येत. इथली भयानक थंडी परकीयांना फार दिवस इथे टिकूच देत नसे.

तुर्की आक्रमणाला पुरून उरलेल्या बामियानला पुढे चंगीझखानाने मात्र अक्षरशः जमीनदोस्त केले. बामियानच्या लढाईमध्ये त्याचा तरुण नातू मारला गेला. संतापलेल्या चंगीझखानाने प्रतिज्ञा केली की बामियानमध्ये मी एकही माणूस जिवंत राहू देणार नाही. त्याने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. संपूर्ण शहर अक्षरशः बेचिराग केले, म्हणजे घरात दिवा लावायलाही कोणी माणूस शिल्लक ठेवले नाही. अजूनही त्या शहराच्या, किल्ल्याच्या ढासळत्या भिंती चंगीझखानाच्या आठवणीने थरथरत उभ्या आहेत. त्या गावाचे नाव 'शहर-इ-घुलघुला' असे पडले. घुलघुला म्हणजे भयाण शांततेचे शहर. त्याशिवाय 'किंकाळ्यांचे शहर', 'शापित शहर' या नावांनीही ते ओळखले जाते.

चंगीझखानाने बामियान तर खणून काढलेच, पण बुद्धविहारही लुटले, हजारो बुद्ध भिक्षूंना मारले, उरलेसुरले ते देशोधडीला लागले. बुद्धमूर्तींचा शक्य होता तेवढा विध्वंस केला. त्यांच्यावरचा सोन्याचा मुलामा, अलंकार काढून नेले. चंगीझखानाच्या पाठोपाठ बामियानचे पहिले वैभव गेले, महत्त्व गेले. इथले सगळे विहार ओसाड पडले. तत्त्वज्ञानाच्या, अध्यात्माच्या चर्चा हवेत विरून गेल्या. चंगीझखानाच्या विध्वंसातून वाचलेली आपली अनलंकृत, जखमी शरीरे सावरत, बामियानचे बुद्ध बर्फ, वारं आणि पाऊस अंगावर घेत शेकडो वर्षे उभे आहेत. इस्लाम इथे इतका खोलवर रुजला की जाणाऱ्या येणाऱ्याने नेमबाजीची सवय करण्यासाठी या बुद्धमूर्तींचा उपयोग केला. अगदी आत्ताआत्तापर्यंत, चार–सहा वर्षांपर्यंत. मूर्तिपूजेचा तिरस्कार करणाऱ्या इस्लामने या सुंदर बुद्धमूर्तींची शक्य होती तेवढी विटंबना केली. गुंफांतून, मठांतून,

विहारांतून भटक्या जमातींच्या लोकांनी वर्षोनवर्षे आपले संसार मांडले. भिंतीवरची सुरेख चित्रं चुलीच्या धुराखाली झाकली गेली.

आपले शिक्षणमंत्री, हुमायूँ कबीर एकदा इथे आले होते; तेव्हा शेकडो वर्षांनी या बुद्धमूर्तींची दखल घेतली गेली. कबीरांनी बुद्धमूर्ती पाहिल्या आणि तेव्हाच्या अफगाण-सरकारकडे प्रस्ताव मांडला, आम्ही या बुद्धमूर्ती सावरून घेऊ, त्यांना उजाळा देऊ. पुढे मग श्रीमती इंदिरा गांधींच्या जमान्यात योजना पक्की झाली. सर्व तऱ्हेची तांत्रिक मदत भारताने दिली; आणि काही खर्च अफगाण सरकारने केला, काही भारत सरकारने केला.

१९६९ च्या जूनमध्ये भारतीय तंत्रज्ञ इथे आले होते. त्यापूर्वी फ्रेंच तंत्रज्ञांनी काम केले होते, पण त्यांचे ते ढोबळ काम अफगाण सरकारला पसंत पडले नव्हते. आपल्या तंत्रज्ञांनी मात्र ६–७ वर्षे राबून, मूळातल्या मूर्तींना जरासुद्धा धक्का न लावता दृष्ट लागण्याइतकं सुंदर काम केलं. त्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आली की, नोकरशाहीच्या गाळात रुतलेल्या भारत सरकारला त्या तंत्रज्ञांचे कौतुक वाटले नाही की अफगाण लोकांनाही नाही. त्या वेळच्या अफगाण सरकारला मात्र आपल्या तंत्रज्ञांचे खूपच कौतुक वाटले.

बल्खची मशीद सावरण्याचे काम सुंदर रीतीने पार पाडले, म्हणून अफगाण लोकांना आणि सरकारलाही खूप कौतुक वाटले. त्या कामाचा सांगता-समारंभ खूप मोठ्या प्रमाणावर करण्याचे ठरले असताना, आयत्या वेळी कसाबसा कार्यक्रम उरकून घेण्यात आला. काफरांकडून हे काम करून घेतले म्हणून पाकिस्तानने बराच आरडा-ओरडा केला होता. तेव्हा मग, अगोदर खूप कौतुक करणाऱ्या, कट्टर मुल्लामौलवींचेही माथे भडकले होते. बामियान तर काय जाणून बुजूनच काफरांचा देव. मूर्तिपूजेच्या विरुद्ध असणाऱ्या इस्लामियांनी शेकडो वर्षांपासून या बुद्धमूर्तींची विटंबना केली होती. भारतीय तंत्रज्ञांचे काम सुरू झाल्यावरसुद्धा जाणाऱ्या येणाऱ्याने बुद्धमूर्तींवर बंदुकीतून गोळ्या झाडून, नेमबाजीचे प्रॅक्टिस करण्याची पद्धत सुरूच होती. हे काम सुरू झाल्यावर अफगाण सरकारने एकदा एक मोठा वार्ताहर मेळावा बोलावून भारतीय तंत्रज्ञांची गाठ घालून द्यायचे ठरवले. पण त्या दिवशी एखाद दुसरा परदेशी वार्ताहर आणि फक्त ‘ काबूल टाइम्स ’चाच वार्ताहर आला होता. असे का ? म्हणून विचारल्यावर उत्तर मिळाले होते,

“ तुम्ही हिंदू लोक. तुमच्या मदतीने आम्ही या मूर्ती दुरुस्त करतोय म्हणून कळले तर आमचे मुल्लामौलवी आम्हाला सुखानं जगू देणार नाहीत. म्हणून फक्त ‘ काबूल टाइम्स ’वाल्यालाच बोलावलं. कारण हा पेपर एक तर त्यांच्यापर्यंत जाणारच नाही, गेला तरी त्यांना कुठं इंग्रजी वाचता येतंय ? ”

जसजशी कामाला गती येऊ लागली, तसतशी इथे येणाऱ्या परदेशी प्रवाशांची संख्या वाढू लागली. त्यांच्यासाठी सरकारने हॉटेलं तर बांधलीच, पण घराघरांतून

हॉटेलांचा धंदा वाढला. अर्धपोटी जगणाऱ्या बामियानच्या मूठभर लोकांना चार पैसे मिळू लागले. तेव्हा त्यांच्या लक्षात या कामाचं वेगळंच महत्त्व आलं; आणि आता या लोकांनी बंदुकीच्या गोळ्या वगैरे मारणं तर सोडूनच दिलं होतं. पण दररोज विमानाने, गाड्यांनी, बसेसने येणाऱ्या परदेशी प्रवाशांकडे हे लोक डोळे लावून बसलेले असत.

एके काळी अफगाणिस्थानात बौद्धधर्मी, हिंदू राजांची वैभवशाली राज्ये होती. जागोजागी जुन्या काळची साक्ष देणाऱ्या वस्तू, वास्तू सापडतात. पूर्वी अशा मूर्ती वगैरे सापडल्या की महमद घोरीचे इथले हे वंशज त्या मूर्तींना पायाखालचे दगड म्हणून वापरत. आणि इस्लामची सेवा करीत. पण नंतर मात्र हळूहळू, जरा वरच्या पातळीवर या गोष्टींचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वही कळायला लागले. तेव्हा त्यांच्यासमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहिला की, अशा गोष्टींना किती महत्त्व द्यायचे ? महत्त्व दिले तर इस्लामशी बेइमानी होते, महत्त्व दिले नाही तर राष्ट्रीय इतिहासाकडे, जुन्या संस्कृतीकडे पाठ फिरवल्यासारखे होते. माणसाला काय किंवा राष्ट्राला काय, आपल्या इतिहासाची पाळेमुळे आपल्या मातीत खोलवर रुजलेली हवी असतात. म्हणूनच भुट्टो मागे एकदा म्हणाला होता, 'पाकिस्तानला पाच हजार वर्षांचा जुना इतिहास आणि संस्कृती आहे.' पण तो इतिहास मान्य केल्यावर ती संस्कृतीसुद्धा हिंदूंचीच असे म्हटल्यासारखे होते, इस्लामशी प्रतारणा होते, हे लक्षात आल्यानंतर, त्याबद्दल सगळेच चूप बसले.

आज तर ही हजारो वर्षांची संस्कृती आणि इतिहास, पुन्हा एकदा एका भयानक आक्रमणाला तोंड देत, काळाशी झुंज घेते आहे.

## गझनीचा शेवटचा हिंदू राजा

एखाद्या पराक्रमी, बलाढ्य सत्ताधीशानंतर त्याचं राज्य विस्कळित होऊ लागतं, हा एखादा निसर्गनियमच आहे की काय अशी शंका यावी, इतक्या नियमितपणाने ही गोष्ट घडत असते. कनिष्कानंतरही मथुरेपासून कपिसापर्यंत पसरलेलं कुशाण साम्राज्य आपल्याच ओझ्याखाली दबून जाऊ लागलं. विघटनाची क्रिया चालू झाली.

आणि त्याच वेळी गोरे हूण, इस्लामच्या उदयानंतरचे अरब, तुर्क टोळीवाले झंझावातासारखे चालून येऊ लागले. पाशवी क्रौर्य असलेल्या हूण, अरब, तुर्क, मुघल, मोगल यांच्यापुढे सात्विक रक्त असलेल्या स्थानिक हिंदू, बुद्ध राजांचा निभाव लागणं कठीण होऊ लागलं. संपत्तीच्या लालसेनं त्यांनी श्रीमंत आणि अनुपम सुंदर अशी मंदिरे, बुद्ध विहार, मठ लुटले, मूर्ती फोडल्या, नासधूस केली.

एवढेच करून ते थांबले नाहीत तर त्यांनी आपल्याबरोबर इस्लाम आणला. नवीन विचार, नवीन जीवनपद्धती आणली. त्यांच्या लुटालुटीला, मारामाऱ्या, खून, जाळपोळीला, आत्यंतिक दुष्टपणाला, क्रौर्याला एका धर्माचे अधिष्ठान लाभले होते! जी

दुष्कृत्यं होती त्याला धर्माचा पाठिंबा होता ! हे काही तरी वेगळंच, अफलातून घडत होतं. विद्या, कला, संस्कृती यांची जोपासना करणाऱ्या राजांची शक्ती आणि मती कुंठित झाली.

मध्य आशियातून सबक्तगीन हा आपलं प्रचंड सैन्य घेऊन मजल दरमजल करीत गझनीपर्यंत येऊन ठेपला. तेव्हा काबूलचा हिंदू राजा जयपाल यानं सबक्तगिनाला गझनीमध्येच गाठलं. त्या वर्षी गझनीला कधी नव्हे एवढी भयंकर बर्फवृष्टी झाली. त्याचा फायदा सबक्तगिनाला मिळाला, आणि जयपालचा पराभव झाला. जयपाल गझनीहून पळाला तो पेशावरला ( त्या वेळचे पुरुषपूर ) भाटियाचा राजा विजयपालकडे गेला. दोघांनी पुन्हा एकदा पाठोपाठ आलेल्या सबक्तगिनाशी पेशावरला प्राणपणाने झुंज दिली. पण त्यांचा पराभव अटळ होता. त्या अपमानाने खचून जाऊन जयपाल आणि विजयपाल या दोघांनी आत्महत्या केली !

अशा तऱ्हेनं इ. स. एक हजाराच्या ५–७ वर्षे अगोदर अफगाणिस्थानातून हिंदू राजांचे उच्चाटन होऊन तिथं इस्लामी अंमल सुरू झाला आणि अफगाणिस्थानच्या इतिहासाला एक वेगळेच वळण लागले. इस्लामी टोळीवाले येतच राहिले. पण अजून सरसहा बळजबरीच्या धर्मान्तराला सुरवात झालेली नव्हती. ते काम केलं गझनीच्या महमूद सुलतानानं.

या महंमदाचं चरित्र वाचलं. यानं आपला हिंदुस्थान लुटला, सोमनाथाचं देऊळ लुटलं म्हणून आपला त्याच्यावर राग असणं अत्यंत स्वाभाविकच आहे. पण हा माणूस मोठा कर्तृत्वाचा. त्याचा पराक्रम असा की, हिंदुस्थानवर त्याने स्वाऱ्या केल्याच, पण तिकडे इराणवरसुद्धा स्वाऱ्या करून तिथल्या अरब, तुर्क, ससानाईड टोळीवाल्या सरदारांना जिंकून तिथं स्वतःचा अंमल चालू केला. काबूलपासून ४०–५० मैलांवरचं, दक्षिणेकडचं गझनी हे त्यानं स्वतःच्या राजधानीचं शहर केलं. हे शहर त्यानं आणलेल्या लुटीतून उत्तमोत्तम राजवाड्यांनी, पुस्तकालयांनी, वस्तुसंग्रहालयांनी, बागांनी अप्रतिम सजवलं. 'मूर्तिभंजक' म्हणून नाव मिळवलेल्या या महंमुदानं, आपल्या राजवाड्याच्या भिंतींवर कोरीव काम करून, आपल्या सगळ्या लढायांची दृश्यं चितारली. इराण, हिंदुस्थानातून आणलेली संपत्ती त्यानं गझनीवर उधळली. महंमूद स्वतः अत्यंत हुषार होता. विद्वानांची कदर करणारा होता. आपल्या दरबारी, 'अल-ब्र-रुनी' हा शास्त्रज्ञ आणि इतिहासज्ञ, फिरदौसी 'अन्सारी' हे कवी, इतिहासकार 'अल-उतबी' यांना त्याने मोठ्या सन्मानाने ठेवून घेतले होते.

पुढे ११४९ मध्ये अल्लाउद्दीन घोरीनं या वैभवशाली शहराला आग लावली. आठ दिवस हे शहर जळत होतं, तेव्हा अल्लाउद्दीन स्वतःच्या कविता वाचत एका झाडाखाली बसला होता ! 'जहानसोझ'— जग जाळणारा, म्हणून त्याला जी पदवी मिळाली होती ती या गझनी शहर जाळण्यावरूनच. या आगीत महंमुदाची कबरच तेवढी गावाबाहेर दूर असल्यामुळे वाचली.

त्यानंतर चेंगीझखानानेही आपलं ‘ कर्तृत्व ’ इथे गाजवलं होतं. त्याने हिंदू, बुद्ध वास्तू जाळल्या, लुटल्या, तसेच त्यानं उरलंसुरलं गझनी शहरही जाळलं, लुटलं. तिथल्या लोकांना मारलं. त्यानंतर उरलेले मूठभर लोक किल्ल्याच्या एका अंधारकोठडीत लपून छपून राहू लागले; म्हणून आज दिसतंय तेवढं तरी गझनी गाव शिल्लक राहिलंय, नाही तर अफगाणिस्थानातल्या इतर किती तरी गावांसारखं इथेही फक्त दगडमातीच तेवढी शिल्लक राहिली असती.

पहिल्या अँग्लो–अफगाण युद्धामध्ये (१८३९ ते १८४२) लॉर्ड एडिंबरोनं सुलतान महंमुदाच्या कबरीच्या इमारतीचे प्रचंड मोठे लाकडी दरवाजे काढून हिंदुस्थानात पाठवले, आणि निरोप पाठवला, “महंमुदानं सोमनाथाच्या मंदिराचे जे दरवाजे आणले होते तेच हे दरवाजे मी हिंदुस्थानच्या लोकांना सप्रेम भेट म्हणून पाठवीत आहे.” हिंदुस्थानी लोकांच्या भावनेला हात घालून त्याने त्यांना जिंकण्याचा खासा डाव टाकला होता. तो त्या वेळी तरी यशस्वी झाला होता. पुढे मात्र खरी गोष्ट उघडकीला आली. सध्या हे दरवाजे आग्र्याच्या लाल किल्ल्यात कुलुपबंद आहेत.

या गझनीला निघालो तेव्हा कुणी तरी एक कविता गझनीबद्दल सांगितली होती, ती अशी—

“ निशान-ए-शहर-ए-गझनी-चार चीज अस्त;
अव्वल सुलतान-ए-दीनदार,
से कंगुरा दरद निगूनसार
द्विम याक तक वर हत्त मिनार
अफ्ताबाशमे अफ्तादबा हर किनारा
मकाम-ए-सोवोमिन याक संग अस्त
संग-ए-रुखम
दरमियान-ए-मस्जीद-ए-जामी-मदाम
मकाम-ए-चारमीन मझार-ए-हरबाबा अस्त
बा मेहराब काजदा बा किबलारास्त.”

“म्हणजे, गझनीची चार वैशिष्ट्ये आहेत, तीन कंगोरे असलेली, सूर्य किरणांमध्ये न्हाणारे सात मिनार असलेली, कुरुंदी दगडाची सुलतान मुहंमदाची कबर; आणि हरबाबाची कबर. या कबरीची महिरप अशा खुबीनं बांधली आहे की इथे बसून प्रार्थना करणाऱ्यांचं तोंड ‘ किबला ’कडेच होतं!”

अर्थात यांपैकी कोणतीच खासियत आज नजरेस पडत नाही. सुलतानाची कबर आणि हरबाबाची कबर बदनामीपुरत्याच उभ्या आहेत. महंमुदाने सोमनाथ विजयाचे जे विजयस्तंभ मिनार बांधले म्हणून दाखवतात ते खरे म्हणजे दुसऱ्याच कशाचे तरी असल्याचे सिद्ध झाले आहे. मोडकळीस आलेली महंमुदाची ती छोटीशी कबर, भोवतालीची इवलीशी बाग, थोडीशी कारंजी सोडून दिली तर आज गझनीमध्ये त्याचं नावनिशाण नाही.

गावात शिरता शिरताच कोणी तरी म्हणालं, "या गावात दीड दोन लाख थडगी आहेत." केव्हा तरी मेलेली ही माणसं, कोणत्या काळापासून इथं आपापल्या ढासळलेल्या, मोडकळीस आलेल्या कबरीमध्ये कयामतच्या दिवसाची वाट पाहात झोपलेली आहेत, कुणास ठाऊक ! या विचारांनीच अंगावर सर्रकन काटा आला. आजचं गझनी शहर म्हणजे तीस चाळीस हजार वस्ती असलेलं, पडक्या मातीच्या घरांचं, कुठं तरी एखादी ढासळलेली कमान, एखाददुसरा मिनार जुन्या वैभवाची लक्तरं संभाळत उभं असलेलं केविलवाणं खेडं आहे.

## आम्हाला कसला आलाय इतिहास ?

"आम्हाला कसला आलाय इतिहास ? आमचा इतिहास म्हणजे फक्त बाहेरच्या लोकांची एकापाठोपाठची आक्रमणं, त्यांनी केलेली लुटालूट आणि मारामाऱ्या. अभिमानानं सांगावं असं इथं काय घडलंय ?" काबूल युनिव्हर्सिटीमध्ये काम करणारे इतिहासाचे प्राध्यापक विषण्णपणाने म्हणाले. हा गृहस्थ जर्मनीमध्ये ग्रॅज्युएट झाला, पुढं पोस्ट ग्रॅज्युएशन दिल्लीला केलं. दिसायला अतिशय रुबाबदार. वागणं बोलणं त्याला शोभेसं विनम्र, आणि तरीही कुठे तरी 'स्व'ची भरपूर जाणीव असलेलं. यांचे वडील नूरीस्तानी, आई अफगाण. "नाही म्हणायला शहारुख, त्याची बायको गोहरशाद आणि त्याचा मुलगा उलुगबेग अशी दोन-तीन नावं सांगता येण्यासारखी आहेत."

असं म्हणून प्राध्यापकमहाशयांनी त्यांची हकिगत सांगितली. शहारुख हा तैमूरलंगाचा सर्वात धाकटा मुलगा. शहारुखचा मुलगा उलुगबेग, या दोघांनी तैमूर-लंगाचं पाप धुऊन काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. आतापर्यंतच्या परंपरेनं राजधानी असलेल्या गझनीकडे संपूर्ण दुर्लक्ष करून शहारुखनं आपली राजधानी हेरतला आणली. त्यामुळे इराणमध्येही लक्ष ठेवायला त्याला सोपे जात होते. त्यानं आपली दुसरी राजधानी समरकंदला ठेवली. हेरत आणि समरकंद ही दोन्ही शहरे त्याने सुंदर सुंदर, भव्य इमारतींनी सजवली. 'जामी' या मान्यवर कवीला आणि 'बेहजाद' या कलाकाराला शहारुखने हेरतच्या दरबारात राजाश्रय दिला होता. त्याने ललितकला, साहित्य, संस्कृतीच्या जोपासनेला प्रोत्साहन दिले. समरकंद इथे उलुगबेगनं बांधलेली वेधशाळा अजूनही उत्कृष्ट अवस्थेत आहे. तो स्वतः वेधशास्त्राचा जाणकार अभ्यासू होता.

शहारुखची बायको गोहरशाद, हिनेही हेरतमध्ये आपले स्वतःचे कबरस्तान, मशिदी, शाळा, पुस्तकालये वगैरे इमारती बांधून घेतल्या. त्यांचे अवशेष आजही कसेबसे तग धरून आहेत.

या गोहरशादची एक गंमतच झाली. तिने स्वतःच्या देखरेखीखाली एक विलक्षण सुंदर अशी मुलींसाठी वसतीगृह असलेली शाळा बांधवून घेतली. मोठ्या समारंभाने

किती तरी मुली त्या शाळेत रहायला आल्या. मुस्लिम धर्माप्रमाणे मुलांना त्या बाजूला फिरकायचीसुद्धा अर्थातच बंदी होती. असं असूनही बरीच गुपचूप प्रकरणं तिथं चालूच होती. एकदा गोहरशाद अचानकच आपल्या लाडक्या शाळेला भेट द्यायला आली. मग सगळ्यांची पळापळ सुरू झाली. एक मुलगा मात्र, मुलीचा नखशिखान्त बुरखा घातलेला, (त्याला बिचाऱ्याला पळून जायला वेळच मिळाला नाही.) एका मुलीच्या खोलीतल्या बंद कपाटात अर्धमेला झालेला आढळला. आता तर हा मोठाच गहजब झाला असता. बाहेर कळलं तर लोक काय म्हणतील ? अगोदरच गोहरशादने मुलींच्या शिक्षणासाठी एवढा खटाटोप करून, मुलींना शिकवून तयार करण्याची भलतीच बंडखोरी केली होती. त्यातच या भानगडीची भर पडली होती. आता काय करावं ?

तेव्हा मग घाईघाईनं त्या मुलामुलीचं लग्न लावून देण्यात आलं. ज्या मुलींना इच्छा होती त्यांनाही लग्न करून शिकण्याची परवानगी दिली; आणि मग त्यांच्या नवऱ्यांसाठी, मुलींच्या शाळेशेजारीच आणखी एक शाळा, वसतीगृह बांधण्यात आलं. फक्त पौर्णिमेच्या दिवशी त्यांना आपापल्या बायकांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. पाचशे वर्षांपूर्वी, अफगाणिस्थानामध्ये गोहरशाद या प्रबुद्ध मुस्लिम राणीने, मुलींच्या शिक्षणासाठी एवढा खटाटोप केला होता.

"पुढे मग १८८५ मध्ये अमीर अब्दुर रहमानच्या सांगण्यावरून या सुंदर, बुलंद इमारती ब्रिटिशांनी पाडून टाकल्या होत्या. फक्त एक मिनार तेवढा शिल्लक ठेवला होता." प्राध्यापकांनी आपली हकीगत संपवताना सांगितलं.

इतक्या सुंदर, चांगल्या स्थितीत असलेल्या या इतक्या पुरातन इमारती पाडण्याचं कारण काय ते आम्हाला कळेनाच.

"कारण म्हणजे, तेव्हा अब्दुर रहमानला भीती वाटत होती की, त्या बाजूने, म्हणजे उत्तरेकडून रशिया अफगाणिस्थानवर हल्ला करील. त्या वेळेस या इमारतींचा फायदा रशियन सैन्याला झाला असता, म्हणून त्या इमारतीच पाडून टाकल्या. रशियाची आम्हाला नेहमीच भीती वाटत आलेली आहे." प्राध्यापक गंभीरपणानं म्हणाले. हे संभाषण झालं तेव्हा अफगाणिस्थानात लाल क्रांती व्हायची होती. रशियन सैन्याने अफगाणिस्थानचा कब्जा घ्यायला तर बराच अवकाश होता !

"तुम्हाला इतिहास नाही म्हणता, पण बामियान, हड्डा, बल्ख, कंदाहार इथं तुमच्या जुन्या संस्कृतीचे अवशेष आजही आहेत. काबूल म्युझियम तर तुमच्या जुन्या ऐतिहासिक वस्तूंनी भरलंय. तो तुमचा इतिहास तुम्ही नाकारता का ?" प्राध्यापकांना बोलतं ठेवण्यासाठी मी विचारलं.

"ती आमची फार मोठी राष्ट्रीय शोकान्तिका आहे." ते उदासपणानं म्हणाले, "आम्ही कोण आहोत हे आम्हाला कळत नाही. मी जेव्हा रोज सकाळी दाढी करताना माझा चेहरा आरशात पाहतो तेव्हा मला प्रश्न पडतो, मी कोण ? मुसलमान ! का ? तर शेकडो वर्षांपूर्वी माझ्या पूर्वजांना कोणी तरी परक्या, बाहेरच्या लोकांनी

जबरदस्तीनं मुसलमान केलं होतं म्हणून ! पण मीं तर नेमानं रोज नमाज पढत नाही. रोजे पाळत नाही. मग मी मुसलमान कसा ? पण मी हिंदू किंवा बुद्धही नाहीच. कारण मी कधीकधी नमाज पढतो, रोज्याचा पहिला आणि शेवटचा उपासही करतो. हे माझं धारदार नाक, गोरापान रंग बघितला की माझं मलाच वाटतं, मी ग्रीकही असू शकेन. कारण माझा बाप नूरीस्तानी, म्हणजे थेट अलेक्झांडरशीच नातं आहे आमचं. आम्ही त्याचेच वंशज ! असा सगळा आमचा गोंधळ आहे. आम्ही कोण आहोत, आम्ही कोणत्या इतिहासाचा, संस्कृतीचा अभिमान बाळगायचा तेच कळत नाही. पण आम्हाला अफगाण म्हणून, या राष्ट्राला अफगाणिस्थान म्हणून वेगळं, स्वतंत्र अस्तित्व दिलं ते अहमदशहा अब्दालीनं. म्हणून आम्ही त्याला ‘ अहमदशहा बाबा ’ म्हणतो. आमचा राष्ट्रपिता आहे तो.'' आता कुठं प्राध्यापकसाहेबांच्या चेहऱ्यावर जराशी टवटवी आली होती. त्यांनी मग पुन्हा हेरतचं कौतुक सांगायला सुरुवात केली. पण आज मात्र तिथं फक्त जामी मशीद, ( म्हणजेच पूर्वीचे झरतुष्ट्राचे अग्निमंदिर ) अलेक्झांडरने बांधलेल्या किल्ल्याचे अवशेष, गोहरशादने बांधलेल्या स्वतःच्याच बारा मिनारवाल्या कबरीचा एकच मिनार तेवढा शिल्लक आहे. इतर हेरत शहर म्हणजे दोन तीन मोठे रस्ते, असंख्य अरुंद गल्ल्या, मातीच्या विटांची घरं, घाणेरडे ‘ चायखाने ’, चार दोन त्यातल्यात्यात बऱ्यापैकी हॉटेलं, आधुनिक पद्धतीची थोडी घरं, नखशिखान्त बुरखा घातलेल्या बायका, मुल्लामौलवींच्या आहारी गेलेली साठ सत्तर हजारांच्या घरातील लोकसंख्या, विलक्षण सुंदर गालिच्यांचा बाजार, आणि मुख्य म्हणजे आजच्या अफगाण बंडखोरांचं एक महत्त्वाचं ठाणं.

## अफगाणिस्थान – एक राष्ट्र

दिल्लीच्या बादशहाकडून कोहिनूर हिरा घेऊन जाणारा नादीरशहा म्हातारा झाला होता. त्याचे सरदार डोईजड होत होते. कारस्थानांना ऊत आला होता. त्यांच्यातलाच एक सरदार नादीरशहाला मारायला त्यांच्या तंबूत शिरला असता, अब्दाली टोळीचा सरदार अहमदखान याने त्या सरदारालाच मारून नादीरखानचा जीव वाचवला. अर्थातच नादीरखाननेच आपल्या या चोवीस वर्षांच्या, तरुण, विश्वासू सरदाराला आपला वारस नेमले. नादीरशहाच्या मृत्यूनंतर अहमदखानने इतर सरदारांशी कधी लढून, कधी त्यांना पैसे देऊन, तर कधी मैत्रीच्या कराराने स्वतःच्या अंमलाखाली आणले. त्याने सर्व सत्ता मिळवली, तसाच तो कोहिनूर हिराही त्याच्याच मालकीचा झाला. आणि काबूल, कंदाहार, हेरत, सिंध, मुलतान, काश्मिर, कोहदामन, पेशावर, हजारा हे प्रांत त्याने आपल्या आधिपत्याखाली आणले. आणि प्रथमच अफगाणिस्थान हे एक एकसंध राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले. तिथे एकाच सरदाराची केंद्रसत्ता आली. अब्दालीने आपली राजधानी हेरतहून कंदाहारला आणली. तो स्वतःला दुर-ए-

दुरानी म्हणजे मोत्यांमधला मोती म्हणवून घेत असे. या अहमदशहा अब्दालीला आपली सत्ता दिल्लीपर्यंत वाढवावी याची फार आस होती. आठ वेळा त्याने हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. पानपतच्या लढाईमध्ये जय मिळवूनही तो परत कंदाहारला गेला. कारण आपल्या माघारी आपले सरदार आपल्याला एकनिष्ठ राहतील याची त्याला खात्री नव्हती.

अब्दालीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा तैमूरशहा याने राजधानी काबूलला आणली. त्याने पंचवीस वर्षे राज्य केले. काबूल शहरात आजही त्याची लहानशी कबर आहे. शेजारी 'तैमूरशाही' हे सिनेमा थिएटर आहे, आणि आजूबाजूला खूप मोठा कापड बाजार आहे.

अफगाण लोक म्हणतात, "तैमूरशहानंतरचा आमचा इतिहास म्हणजे इंग्रज आणि रशियन यांच्यामधल्या परस्पर संशय, सत्तास्पर्धेमध्ये झालेली आमची फरपट आहे."

हिंदुस्थानमध्ये ब्रिटिशांची सत्ता बळकट होऊ लागली होती आणि तिकडे रशियाने एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी समरकंद, बुखारा उजबेकिस्तान तुर्कमेनिस्तान ही परंपरागत अफगाण सरदारांच्या अंमलाखालची राज्ये खालसा केली होती. मध्ये होता अत्यंत कमकुवत, सरदारांच्या आपापसांतल्या वैरानं पोखरलेला छोटासा अफगाणिस्थान. ब्रिटिशांना रशियाच्या विस्तारवादाची भीती वाटत होती तर रशियाला ब्रिटिशांची. पुढे तर १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात, हिंदुस्थानी सैनिकांच्या मदतीला झार आपले सैन्य अफगाणिस्थानातून पाठवणार आहे अशा दाट अफवा त्या वेळेस पसरलेल्या होत्या. रशिया आणि इंग्रज यांचा परस्पर संशय, अविश्वास शेवटपर्यंत तसाच होता. ब्रिटिश आणि इंग्रज यांना वाटणाऱ्या परस्पर भीतीवरच पुढचे अफगाणिस्थानचे राजकारण रंगू लागले. आणि खुद्द अफगाणिस्थानला तर रशिया आणि इंग्रज या दोघांचीही भीती वाटत होती.

काबूलच्या दरबारात झारचा वकील आला की पाठोपाठ इंग्रज आपला वकील पाठवीत. अमीरने इंग्रजांशी बोलणी केली की पाठोपाठ झारचे दूत अमीरशी बोलणी करायला येत. त्या बाबतीत हो नाही म्हणण्याएवढं सामर्थ्य अमीरमध्ये नव्हतंच. पण हे शह-काटशहचे राजकारण लक्षात यायला अफगाण सरदारांना वेळ लागला नाही. स्वतः अमीर व्हावे म्हणून इंग्रजांशी तह-मैत्रीचे करार, पाठोपाठ रशियन वकिलाशी गुतगूं, असले प्रकार अफगाण सरदारांनी, अमीरांनी चालू केले. त्यांचा परिणाम म्हणजे १८३९ साली लॉर्ड ऑकलंडने भरपूर सैन्य घेऊन, त्या वेळचा काबूलचा अमीर, दोस्त महंमदला धडा शिकवण्यासाठी कंदाहारवर स्वारी केली. आणि पहिल्या अँग्लो अफगाण युद्धाला सुरुवात झाली. ऑकलंड, कंदाहार, गझनी जिंकून काबूलला पोचला. दोस्त महंमद बुखाऱ्याला, म्हणजेच रशियाच्या आश्रयाला पळून गेला. ब्रिटिशांनी तीस वर्षे पेन्शन देऊन संभाळलेल्या शहासुजाला सिमल्याहून आणून काबूलचा अमीर केले, पण

प्रत्यक्षात सर्व सत्ता इंग्रजांच्या ताब्यातच होती. त्यांना वाटलं, अफगाणिस्थान आता आपल्याच मालकीचा. त्यांनी आपली बायकामुलं हिंदुस्थानातून काबूलला आणली; काबूलमध्ये आपली वस्ती उभी केली.

संशय, भीती, अपमानाने ग्रासलेल्या काबूलमध्ये इंग्रजांनी विलासी आणि ऐषारामी जीवन चालू केलं. त्यांच्या बायका खांदेसुद्धा उघडे टाकून, बग्गीत बसून उजळ माथ्यानं, या पडदानशीन शहरातून हिंडू-फिरू लागल्या. पुरुषांच्या गळयात हात टाकून नाचू लागल्या. काफर इंग्रजांबद्दल शत्रुत्व वाटणाऱ्या अफगाणांना या गोष्टीचा संताप आला. आणि नोव्हेंबरमध्ये चार ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांचे काबूल शहरातच खून झाले! तेव्हा कुठे ब्रिटिशांना भान आले. त्यांनी वेगवेगळया सरदारांना नजराणे पाठवून त्यांची मैत्री मिळवण्याचा प्रयत्न चालू ठेवला. शेरपूरचा भाग सोडून बालाहिसारच्या किल्ल्यात जाण्याचे ठरवले. पण शेरपूरहून बालाहिसारला जाताना इंग्रजांच्या सुरक्षिततेची हमी शहासुजाने घेतली नाही. शेवटी असं ठरलं की, बर्फ पडायचा बंद झाल्यानंतर जर सगळे इंग्रज आपल्या बायका-मुलांना घेऊन परत जाणार असतील तर त्यांच्या सुरक्षिततेची हमी शहासुजा आणि इतर सरदारांनी घेण्याची तयारी दाखवली. पण मध्येच ब्रिटिशांचा प्रतिनिधीच मारला गेला. घाबरलेल्या इंग्रजांनी थंडी संपायची वाट न पाहता, ऐन थंडीत, जानेवारीमध्येच खैबर खिंडीतून हिंदुस्थानात परतायला सुरुवात केली. आणि पूर्वी झालेल्या वाटाघाटींना कवडीची किंमत न देता, अफगाण टोळी-वाल्यांनी खिंडीत सापडलेल्या ब्रिटिश सैन्याला कापून काढले. बायका मुलांनादेखील शिल्लक ठेवले नाही. हजारो ब्रिटिशांना मारलं, तसं हजारो हिंदुस्थानी शिपायांनाही मारलं. फक्त एक डॉ. ब्रायडन याला जिवंत ठेवले. कारण त्याने हिंदुस्थानात जाऊन घडलेली हकीगत सविस्तरपणे कंपनी सरकारच्या कानावर घालावी. पाठोपाठ शहासुजा जाऊन दोस्तमहम्मद काबूलचा अमीर झाला. आणि काबूलवर रशियाचे वजन वाढले.

याचा सूड घेण्यासाठी लॉर्ड एडिंबरो सैन्य घेऊन पुन्हा आला. त्याने गझनी काबीज केली. महंमुदाच्या कबरीचे दरवाजे काढून 'सोमनाथ मंदिराचे दरवाजे' म्हणून हिंदुस्थानात पाठवून दिले. जलालाबाद जिंकून काबूल काबीज केले. तिथले बाजार लुटले. आगी लावल्या, आणि तो निघून गेला. याची एवढी धास्ती दोस्त महंमदने घेतली की त्याने पुढे इंग्रजांशी मैत्रीचे संबंध ठेवले. १८५७ साली दोस्त महंमद दिल्लीच्या बादशहाच्या मदतीला जाणार आहे अशा दाट अफवा पसरल्या होत्या, पण तो गेला नाही.

लॉर्ड एडिंबरोची यशस्वी मोहीम, १८५७ मधला हिंदुस्थानातला इंग्रजांचा विजय, यामुळे घाबरून जाऊन रशियाने अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर हालचालींना सुरुवात केली. पुन्हा एकदा त्या वेळचा अमीर शेरअल्ली याने ब्रिटिशांकडे मदत मागितली. पण 'अफगाणिस्थानच्या अंतर्गत मामल्यात ढवळाढवळ करणार नाही,' असं सांगून इंग्रजांनी मदत देण्याचे नाकारले. पण खरे कारण असे होते की, शेरअलीला अंधारात

ठेवून रशिया आणि इंग्रजांनी मैत्रीचा तह केला होता! रशिया अमू नदी ओलांडून अफगाणिस्थानात घुसणार नव्हता. त्याबद्दल इंग्रजांनी अफगाणिस्थानातल्या राजकारणात ढवळाढवळ न करण्याचे आश्वासन दिले होते. त्याच वेळी रशिया आणि इंग्रजांनी आपापल्या सीमांचे रेखांकन केले. दोघांमध्ये वितुष्ट येऊ नये म्हणून मधला सोळा मैलांचा टापू अफगाणिस्थानात ठेवून इतर भू-भाग त्यांनी वाटून घेतला. अफगाण-सरकारला अंधारात ठेवून त्यांनी परस्परच हा करार केला होता.

शेरअलीला या गुप्त कराराचा सुगावा लागला तेव्हा तो घाबरला. आणि पाठोपाठ रशियाचे एक शिष्टमंडळ काबूल दरबारात येऊन थडकले. मागोमाग ब्रिटिशांनी आग्रह धरला की आमचेही शिष्टमंडळ काबूल दरबारात येईल. शेरअलीने नकार कळवताच पुन्हा एकदा १८७८ मध्ये इंग्रजांनी अफगाणिस्थानवर हल्ला चढवला. शेरशहाला अतिशय अपमानास्पद अटी पत्कराव्या लागल्या. रशिया, अफगाणिस्थान, हिंदुस्थानच्या सीमांचे रेखांकन झाले होतेच. या वेळी ब्रिटिशांनी अफगाणिस्थान हिंदुस्थानच्या सीमा निश्चित केल्या. एकतर्फीच, डयुरांड रेषा आखली गेली. हा भाग सततच गोंधळ, गडबड, दरवडेखोरीचा होता. आजही तो तसाच आहे. पण त्या वेळी इंग्रजांनी त्यांना सोयीची होती तशी सीमारेषा आखली, तिथे राहणाऱ्या टोळीवाल्यांना, अफगाण सरकारला कसलीही किंमत दिली नाही. त्या भागाचे भौगोलिक वैशिष्ट्य लक्षात घेतले नाही. म्हणूनच पख्तुनिस्तानचा प्रश्न पाकिस्तान-अफगाणिस्थानात वितुष्ट आणतो. ब्रिटिशांचा निर्णय पाकिस्तानच्या फायद्याचा असल्यामुळे पाकिस्तान डयुरांड लाइन मानते. पण आम्हाला फसवून ही सीमा ठरवली गेली म्हणून अफगाण सरकारचा त्याला विरोध आहे. अफगाण सत्तेमध्ये कितीही बदल झाला तरी पख्तुनिस्तानच्या बाबतीत सर्वांचे एकमत असते.

या तहानुसार ब्रिटिशांचा दूत कायम काबूलमध्ये राहणार होता. त्याच्या रक्षणाची जबाबदारी अफगाण सरकारची. यापुढे अफगाणिस्थानचे परराष्ट्र धोरण इंग्रजांच्या ताब्यात गेले. कुणा परकीयाने, म्हणजेच रशियाने हल्ला केला तर अफगाणिस्थानला मदत करण्याची जबाबदारी ब्रिटिशांची. खैबर खिंड, मिच्छी खिंड यावर ब्रिटिशांचा ताबा. त्या बदल्यात इंग्रजांनी सालिना साठ हजार पौंडांचा तनखा अफगाण अमीराला द्यायचा होता. म्हणजेच अफगाणिस्थान हे ब्रिटिशांचे मांडलिक राज्य झाले होते.

## नव्याची चाहूल

अशा परिस्थितीत १८८० मध्ये अब्दूर रहमान हा अमीर झाला. काबूल आणि त्याभोवतालचा पाचपन्नास मैलांचा परिसर सोडला तर त्याची सत्ता चालत नव्हती. पण हा माणूस मोठा जिद्दीचा. याने अफगाण सरदारांना पैसा चारून त्यांचे इमान चक्क विकत घेतले. खैबर खिंडीच्या परिसरातल्या लुटारू टोळीवाल्यांना त्याने तनखे

द्यायला सुरुवात केली. टोळीवाल्यांनी जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना लुटले तरी त्याची दखल अमीर घेणार नव्हता. त्या बदल्यात त्यांनी अफगाणांना त्रास द्यायचा नव्हता. म्हणजे कागदोपत्री खैबर खिंड इंग्रजांच्या ताब्यात होती तरी प्रत्यक्षात ती या लुटारू टोळीवाल्यांच्याच ताब्यात होती. त्यांनी इंग्रजांना त्रास देऊ नये म्हणून मग इंग्रजांनीही त्या टोळीवाल्यांना लाच द्यायला सुरुवात केली. आता-आतापर्यंत ही प्रथा चालू होती.

१९७८ साली राज्यक्रांती होऊन कम्युनिस्ट सरकार काबूलमध्ये सत्तेवर आल्यानंतर त्यांनी या लुटारू टोळीवाल्यांचे तनखे बंद केले. म्हणून त्यांनी या नव्या सरकारला शेवटपर्यंत मान्यता दिली नाही. शिवाय नव्या सरकारविरुद्ध कारवाया चालू केल्या. अफगाणिस्थानमध्ये सर्वप्रथम, कम्युनिस्टांविरुद्ध लढाई सुरू झाली होती ती इथे! नंतर मग मुल्ला-मौलवींचे राजकारण त्यामध्ये घुसले.

अबदूर रहमान इंग्रजांशी अत्यंत वस्तादपणाने वागत असे. अफगाण माणसाला इंग्रजांशी बोलायची, इतर कसलाही व्यवहार करण्याची बंदी घातली. त्या बाबतीत संशय जरी आला तरी तो अफगाण माणसाला मारूनच टाकत असे. अबदूर रहमानने निवडलेली माणसेच फक्त इंग्रजांशी संबंध ठेवू शकत होती. त्यांच्या घरची कामं करणारे गडी, त्यांना भाजीपाला, इतर सामान पुरवणारी माणसं ही सगळी अबदूर रहमानची माणसं असत. त्यामुळे इंग्रजांना हेरगिरी करणं शक्य नव्हतं; पण त्यांच्याकडची सगळी बित्तंबातमी अबदूर रहमानला कळत असे.

ब्रिटिशांकडून आलेल्या पत्रांना तो सहासहा महिने उत्तरंसुद्धा पाठवीत नसे. ब्रिटिशांकडून भेटायला आलेल्या माणसांना तो तीन तीन दिवस तिष्ठत ठेवण्याचं धारिष्ट्य दाखवीत असे. त्याच्या या असल्या वागणुकीमुळे सर्वसाधारण अफगाण माणसाला अतिशय आत्मविश्वास येऊन स्वाभिमान वाटायचा.

अबदूर रहमान हा अत्यंत धूर्त राज्यकर्ता होता. नूरीस्तानमध्ये त्याने केलेल्या कारवाईवरून त्याची कल्पना येते. काबूलच्या पूर्वेला दीडदोनशे मैलांवर नूरीस्तान हा छोटासा प्रांत आहे. तिथले लोक, तिथली कला, तिथला निसर्ग नितान्तसुंदर, रमणीय आहे. म्हणूनच अबदूर रहमानने त्याचे नाव नूरीस्तान ठेवले. पूर्वी अफगाण लोक त्याला काफिरीस्तान म्हणायचे. कारण तिथले लोक बिगर इस्लामी होते.

अलेक्झांडरने अफगाणिस्थानात बऱ्याच ठिकाणी आपल्या छावण्या टाकल्या होत्या. नूरीस्तान ही त्याची खूप मोठी छावणी. बरेच दिवस त्याचा मुक्काम इथे होता. इथल्या मूळ यक्षसंस्कृतीशी ग्रीकांचा खूपच घनिष्ठ संबंध आला. तिथल्या लोकांचा तर दावा आहे की, ते लोक खुद्द अलेक्झांडर आणि त्याच्या ग्रीक सरदारांचे वंशज आहेत! दिसण्यात ते लोक इतर अफगाण टोळीवाल्यांपेक्षा वेगळे आहेत हे लक्षात येतंच. ग्रीकांचे रंगरूप अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर टिकून आहे. त्यांची जीवनपद्धती, धर्म, सामाजिक वळण, भाषा, इतरांपेक्षा वेगळे आहे. नूरीस्तानी माणूस इतर अफगाणांसारखा जमिनीवर गालिचे टाकून कधीही बसणार नाही तर त्याच्या घरात छोटी छोटी

स्टुलं, खुर्च्या इ. स. पूर्व काळापासून वापरात आहेत. या नूरीस्तानी माणसाचा धर्म इस्लामी नव्हताच; मूळ वैदिक धर्माशी काही तरी साम्य सांगणारा, पंचतत्त्वांची पूजा-अर्चा करणारा धर्म होता. त्याची घरे लाकडाची, एकावर एक मजले चढवलेली, आणि अनुपम सुंदर कोरीव काम केलेली. अर्थातच माझं हे ज्ञान काबूल म्युझियममधला नूरीस्तान विभाग पाहून आणि काही नूरीस्तानी माणसांशी चर्चा करून मिळवलेलं आहे. कारण नूरीस्तानला जायला मिळणं ही जवळ जवळ अशक्य कोटीतली गोष्ट. जिथे अफगाण माणसालासुद्धा तिथे जाण्यासाठी खास सरकारी परवाने लागत तिथे आमच्यासारख्या परक्यांना परवाना मिळणं केवळ अशक्य होतं.

या दुर्गम ठिकाणच्या, सुंदर प्रदेशावर अबदूर रहमानने १८९५ मध्ये स्वारी केली. तिथे राहून युद्ध लढणे फार कठीण आहे, हे लक्षात घेऊन त्याने एक दिवस जाहीर केले की, आजपासून नूरीस्तानचे सगळे लोक मुसलमान झालेले आहेत! त्यानंतर त्याने पाच ते बारा वर्षांपर्यंतच्या सगळ्या नूरीस्तानी मुलांना काबूलला आणले. त्यांना नव-वातावरण, नवीन जीवनपद्धती, नवीन शिक्षण, नवा धर्म दिला. त्यांच्या सगळ्या जुन्या आठवणी पुसून टाकल्या. काफिरीस्तानचं नाव बदलून त्यानं नूरीस्तान ठेवलं.

त्याबद्दल बोलताना काबूल म्युझियमचे एक अफगाण उच्चाधिकारी म्हणाले, "अमीरने ही फार मोठी चूक केली. इथे काही हजार माणसं बिगर इस्लामी राहिली असती तर काहीही बिघडलं नसतं. पण या इस्लामीकरणामुळे हळूहळू ही प्राचीन संस्कृती आता नाश पावत आहे. हा केवढा मोठा सांस्कृतिक ठेवा आमच्याजवळ होता, तो आमच्या हातांनी आम्ही गमावला आहे. जगाच्या इतिहासातल्या एका खूप जुन्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचा आम्ही नाश केला. फार वाईट गोष्ट झाली ती."

अबदूर रहमाननंतर त्याचा मुलगा हबीबुल्ला अमीर झाला. त्या वेळी पहिल्या महायुद्धात सगळी राष्ट्रे गुंतल्यामुळे अफगाणिस्थानकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नव्हता. त्या काळात अफगाणिस्थानात पहिले कॉलेज सुरु झाले. त्यासाठी त्याने हिंदुस्थानातून प्राध्यापक बोलावून घेतले होते. पहिला मोठा आधुनिक दवाखाना काढला.

जगभरच उलथापालथ चालू होती. त्याचे वारे अफगाणिस्थानातही वाहू लागले. अत्यंत मागासलेल्या या देशातील तरुण पोरं नवीन विचारांनी अस्वस्थ होत होती. मोहम्मद तरझी या सुधारणावादी तरुणाला त्याच्या राजकीय, सामाजिक मतांमुळे अबदूर रहमानने हद्दपार केले होते. पण १९०४ साली हबीबुल्लाने त्याला परत बोलावले. राजकीय, सामाजिक, धार्मिक सुधारणांची, उदारमतवादाची मागणी, असे हट्ट करणाऱ्या तरझीभोवती तरुणांचा ग्रुप जमला. 'मश्रुता' या नावाने हे लोक ओळखले जाऊ लागले. सर्व थरांच्या सुधारणांबरोबरच ब्रिटिश आणि रशियन वसाहतवादाला त्यांचा कडवा विरोध होता. पहिले महायुद्ध संपल्यानंतर तरझी आणि त्याच्या साथीदारांनी हबीबुल्लाकडे मागणी केली की, अफगाणिस्थानने ब्रिटिशांविरुद्ध, त्यांच्या तुर्कस्तानच्या बाबतीतल्या धोरणाविरुद्ध 'जिहाद' पुकारावा. त्या संबंधात बोलणी करण्यासाठी

१९१५ मध्ये तुर्की जर्मन जोडशिष्टमंडळ काबूलमध्ये येऊन ठेपले. पण काहीही उपयोग झाला नाही. हबीबुल्लाने ब्रिटिशांविरुद्ध जिहाद पुकारायला नकार दिला. शिष्टमंडळ परत गेले. परंतु त्या शिष्टमंडळामधले तीन हिंदुस्थानी क्रांतिकारी सदस्य– राजा महेंद्र-प्रताप, मौलाना बरकतुल्ला, ओबेदुल्ला सिंधी– हे तिघेही काबूललाच राहिले.

अफगाणिस्थानला सर्वप्रथम मार्क्सवादी विचारसरणीची ओळख करून दिली ती या तिघा भारतीय क्रांतिकारकांनी !

त्यानंतर दोन वर्षांतच रशियात राज्यक्रांती झाली. झारशाही जाऊन कम्युनिस्ट सरकार सत्तेवर आले. पण त्यांच्या परराष्ट्र धोरणात काहीही बदल झालेला नाही ही गोष्ट हबीबुल्लाच्या लक्षात आली. पण सत्तेवर आल्याआल्याच लेनिनने जाहीर केले की वसाहतवादी, भांडवलशाही ब्रिटिशांविरुद्ध लढणाऱ्या अफगाणिस्थानला आमचा सदैव पाठिंबा राहील. त्यांच्या या प्रयत्नात आम्ही त्यांना मदत करू. त्यांच्याशी आम्हाला मैत्रीचे संबंध ठेवायचे आहेत. लेनिनच्या म्हणण्याप्रमाणे वसाहतवादाशी, भांडवलशाही ब्रिटिशांशी लढणं हा समाजवादी क्रांतिमार्गातला पहिला टप्पा होय; त्या अर्थाने अफगाणिस्थान योग्य मार्गावरच आहे.

आणि अचानक हबीबुल्लाचा जलालाबादला खून झाला ! खून कोणी केला हे कधीच उघडकीला आलं नाही. पण त्याचा मुलगा अमानुल्लावर संशय होता. हबीबुल्ला-नंतर अमीर कोणी व्हावं याबद्दल किंचितशी घडपड झाली. पण अमानुल्लाने काबूलहून, आपण स्वतःच अमीर झाल्याचे जाहीर केले, आणि अफगाणिस्थानच्या इतिहासातले एक सोनेरी पर्व सुरू झाले.

३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ...........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## एक होती राणी

ऐन थंडीचे दिवस. काबूलमधल्या भल्या मोठ्या झरगोना पार्कवर थेट इथपासून तिथपर्यंत बर्फाचा पांढराशुभ्र, चमचमणारा मखमली गालीचा अंथरलेला होता. पाईनचे हिरवेगार वृक्ष आपल्या अंगाखांद्यांवरचं हिमवैभव मिरवीत ठसक्यात उभे होते. बाकीच्या निष्पर्ण झाडांच्या फांद्यांवरून ओघळणाऱ्या बर्फाच्या रेशीमधारांमधून असंख्य चिमुकली इंद्रधनुष्ये फाकत होती.

या सुंदर, रमणीय आलेखावर काळी रेघ ओढत, नखशिखान्त काळाभोर बुरखा घातलेल्या काही अफगाण बायका एकीपाठोपाठ एक अशा रांगेनं, एका बाजूनं आल्या आणि तिथंच असलेल्या कोपऱ्यावरच्या एका बैठ्या इमारतीमध्ये शिरल्या.

ते दृश्य पाहून मला अमृता शेरगीलच्या पेंटिंगची आठवण झाली. उदास, हुरहूर लावणारी, आर्त आणि तेवढीच उत्कट. त्या अफगाण बायका दिसेनाशा झाल्यावर मी माझ्याबरोबरच्या शहानाजला विचारलं, " या कोण बायका ग ? अशा कुठं गेल्या त्या ? "

खाली मान घालून आपल्या कोटावरचं बर्फ झाडत माझी मैत्रीण उडत उडत म्हणाली, " त्या बायका होय ? फतेहा पढण्यासाठी निघालेल्या दिसतात. ती बिल्डिंग म्हणजे बायकांचा फतेहाखाना आहे. त्यांच्या घरचं कोणी तरी मेलेलं दिसतंय. म्हणून निघाल्या असतील तिथं."

" बायकांना परवानगी आहे का फतेहा पढण्याची ? "

" हो, आहे ना. पण बायकांचा फतेहाखाना वेगळा असतो. आणि तिथला मुल्ला असतो तो एक साधारणपणे सत्तर बहात्तर वर्षांच्या पुढचा असतो; आणि त्यातूनही आंधळा. गंमतच आहे की नाही ? " शहानाज डोळे मिचकावीत म्हणाली.

पण मला काही हसूं आलं नाही. उलट मी तर गंभीरच झाले. मेलेल्याच्या आत्म्यासाठी दुवा मागण्यासाठी बायकांना वेगळ्या फतेहाखान्यात जावं लागतं आणि तिथला मुल्ला जख्खड म्हातारा आणि त्यातून आंधळा! मनात आलं, यांचा अमीर अमानुल्ला आणि सरय्याराणीला जर अफगाणिस्थानातून पळून जावं लागलं नसतं तर

आज ही स्थिती राहिली नसती. तसं मी शहानाजला म्हटलंदेखील.

तर ती म्हणाली, " सरय्यामुळं ? कुणास ठाऊक काय झालं असतं ते ! असा जर तरचा विचार करणं तर फार कठीण आहे. ज्याच्या त्याच्या नशिबाप्रमाणंच सगळं घडत असतं बघ ! " स्वतः जगाबरोबर आलेली शहानाज, उच्च वर्गीयांच्या खास उदासीनतेनं म्हणाली. सरय्याबद्दल तिनं दाखवलेल्या अनास्थेमुळं, सरय्यापेक्षा मला तिचीच कीव आली. सरय्या-अमानुल्लाची खरी किंमत या लोकांना कळलीच नव्हती, की अलिकडच्या इतिहासातल्या व्यक्तीबद्दल आस्था न दाखवणं त्यांच्या एवढं रक्तातच मुरलं आहे !

अफगाणिस्थानचा अमीर अमानुल्ला आणि त्याची राणी सरय्या यांनी १९१९ ते १९२९ या आपल्या औट घटकेच्या राज्यात अफगाणिस्थानात सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी जंगजंग पछाडले. स्त्रियांच्या हक्कांसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, समाजात त्यांना योग्य ते सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी, लोकांचे मन वळवण्यामध्ये, सरय्याने सिंहाचा वाटा उचलला होता. अमानुल्लासारख्या आधुनिक विचारसरणीच्या राजाची ती बायको होती; म्हणूनच केवळ तिनं ही जबाबदारी उचलली होती असं नसून, राणी व्हायच्या अगोदरपासूनच तिला ती दृष्टी होती. स्वतः सरय्याराणीचं व्यक्तित्व आणि तिच्या वडिलांनी तिला दिलेलं शिक्षण, त्यांच्या घरचं वातावरण, त्यांचे विचार या सगळ्यांनी भारावून जाऊनच, अमानुल्लाने सरय्याला मागणी घालून तिच्याशी लग्न केलं होतं. मुलंमुलींनी एकमेकांच्या पसंतीनं असं लग्न ठरवणं ही गोष्ट त्या काळात अगदी एखाद्या परिकथेप्रमाणं अद्भुतच होती.

सरय्याचे वडील मोहम्मद बेग तरझी, हे आधुनिक विचारसरणीनं भारावून जाऊन, नवीन विचारांचा प्रसार करण्यासाठी सतत धडपडत होते. ' तरझी ' हे नाव त्यांनी स्वतःच स्वीकारलं होतं. ' तरझी 'चा अर्थ ' आधुनिक '. सर्वसामान्य लोकांना अत्याधुनिक शिक्षण, विशेषतः स्त्रियांना; मुस्लिमांमध्ये आधुनिक विचारप्रवाह, समाज-सुधारणा, या गोष्टींचा तरझींनी एवढा पुरस्कार चालवला होता की, अमानुल्लाचा आजोबा अमीर अब्दूर रहमान यांनी तरझींना अफगाणिस्थानातून हद्दपार केले होते. पण त्यानंतर हबीबुल्लानं त्यांना पुन्हा परत बोलावून घेतले होते. परत आल्यावर तरझींनी ' सिराज अल् अखबार ' हे स्वतंत्र वृत्तपत्र चालू केले. तरझी जेव्हा हद्दपार होते तेव्हा ते सिरीयामध्ये होते. ऑटोमन साम्राज्यात राहिल्यामुळे त्यांच्या आधुनिक विचारांना आणखीनच धार चढली होती. साम्राज्यशाही, वसाहतवाद यांच्याविरुद्ध आणि खास करून ब्रिटिशांना आपला कट्टर शत्रू मानणारे असल्यामुळे, कट्टर राष्ट्रवादी आणि ' आशिया हा आशियनांच्यासाठीच फक्त आहे ' या त्यांच्या आग्रही मतामुळे त्यांच्या-भोवती उत्साही अफगाण तरुण झटकन गोळा झाले. ' मुसलमानांनी जर आधुनिक विचारप्रवाह स्वीकारले नाहीत तर त्यांचा नाश अटळ आहे.' अशी त्यांची दृढ निष्ठा होती. तरझींच्या काळात चार लग्नं करणं हे सामाजिक प्रतिष्ठेचं लक्षण मानलं जात

काबूतानाही त्यांनी एकच लग्न केलं होतं. एवढंच नव्हे तर काकाब आणि सरय्या या आपल्या दोघी मुलींना त्यांनी धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र यांचे धडे दिले होते. काकाब ही त्यांची मोठी मुलगी तर त्यांच्या सेक्रेटरीचे काम करीत असे. ‘ सिराज अल् अखबार ’ ह्या वृत्तपत्राच्या कामकाजातही त्या दोघींची मदत व्हायची. इस्लामच्या कायद्यानुसार घराबाहेर त्यांना बुरखा घालूनच वावरावे लागायचे. तरी पण घरी मात्र कोणी परका आल्यानंतरसुद्धा त्या पडदा पाळत नसत. चर्चा, विवादात त्या भाग घ्यायच्या. अमानुल्लाच्या मोठ्या भावाने काकाबशी लग्न केले होते.

सरय्या दिसायला सुरेख होती. खास अफगाण स्त्रियांप्रमाणे नितळ, गुलाबी गोरापान रंग होता तिचा. पातळ ओठ, धारदार नाक आणि ठाशीव हनुवटी यामुळे तिचा दृढनिश्चयी स्वभाव दिसून येत असे. बुद्धीची चमक काळ्याभोर नितळ डोळ्यांत होती. पाश्चात्य पद्धतीचे तिचे कपडे अतिशय उच्च अभिरुचिपूर्ण असायचे. तरझींची कामं, सिराज अल् अखबारची कामं ती अत्यंत चुटचुटीतपणानं करायची. सिराज अल्-अखबारमध्ये काम करण्यासाठी, तरझींशी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यासाठी अमानुल्ला नेहमी तरझींकडे जायचा. इतका की तो त्यांच्या घरातलाच एक होऊन गेला होता. रोज तो सरय्याला बघत होता. इतरांबरोबर, तिच्याशी कोणत्याही विषयावर गप्पा मारत होता. महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करीत होता, वादविवाद करीत होता.

इस्लामने कायद्यासंबंधीच्या अंमलबजावणीचे सगळे अधिकार मुल्लामौलवींच्या हातात सोपवले आहेत— हा एक वादाचा मुद्दा चर्चेच्या वेळी वारंवार चर्चिला जाई. अमानुल्लाच्या मताप्रमाणे इस्लामी कायदेकानू यांची आखणी होऊन शेकडो वर्षं झाली होती. कुराण लिहिले गेले तो काळ आणि आजचा काळ यांमध्ये जमीन अस्मानाचा फरक पडला आहे. त्यामुळे आजच्या जमान्यात घडणाऱ्या काही विशिष्ट गुन्ह्यांचा कुराणामध्ये उल्लेखही नाही. अशा वेळी कुराणात असलेल्या कायद्यांचा, हे अशिक्षित अडाणी मुल्लामौलवी आपापल्या अकलेप्रमाणे, हवा तसा अर्थ लावून शिक्षा देणार. आजच्या जमान्यात फटके मारणं, हातपाय तोडणं, अशांसारख्या शिक्षा देणं म्हणजे रानटीपणाच आहे. अशा आधुनिक कायद्याचा अभ्यास करून, समाजशास्त्राचा अभ्यास करून तयार केलेल्या संहितेप्रमाणे, सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्यांनीच न्यायनिवाडा करायला हवा.

सरय्याचं म्हणणं असे की, वर्षानुवर्षे डोळ्यांना झापडं लावून फक्त कुराणाचंच वाचन केलेल्या त्या मुल्लांना तरी कितपत शहाणपणा आलेला असतो कुणास ठाऊक! चोरी केली म्हणून हातपाय तोडण्याची शिक्षा देणारे हे मुल्ला, एखाद्या नवऱ्याने आपल्या पहिल्या बायकोला निराधार सोडून, दुसरं लग्न केलं म्हणून, त्याला काहीही शिक्षा देत नाहीत. चोरी करण्यापेक्षा हा गुन्हा किती तरी भयंकर आहे! एका निरपराध माणसाच्या जीवन-मरणाचा प्रश्न असूनही त्याकडे कोणी लक्षच देत नाही. मुलींना विकून त्यांचा सौदा केला जातो तरी त्याकडे कोणाचं लक्ष नाही. शेकडो वर्षांच्या रूढींच्या बंधनात

अडकलेल्या आपल्या समाजाला कोण सोडवणार आहे ?

तरझींचं म्हणणं असे, आपणच आपल्या समाजाला ऊर्जितावस्थेत आणायला हवं. पुन्हा पुन्हा, न दमता, निराश न होता, वाटेल तेवढे कष्ट घेऊन लोकांना ती गोष्ट सतत सांगितली पाहिजे. परत परत ठेचलं की मेलेल्या जनावराचं मटणही मऊ पडतं. मग आपला तर विचार करू शकणाऱ्या जिवंत माणसांशी संबंध आहे. कधी त्यांना ओंजारून, गोंजारून, समजावून सांगितलं पाहिजे. कधी युक्तिवाद केला पाहिजे. कधी धाक दाखवला पाहिजे; तर कधी जबरदस्तीनं कायदे करून त्यांना योग्य त्या मार्गावर आणलं पाहिजे. त्यासाठी त्या देशाचा राजा मात्र सुशिक्षित, समजूतदार, कणखर असायला हवा, नाही तर त्या सगळ्या प्रयत्नांवर बोळा फिरण्याचीच शक्यता फार असते. तरझींचं बोलणं नेहमी नेमकं, हवं तिथे जाऊन भिडेल असं असायचं.

अमानुल्ला राजपुत्र होता तरी युवराज नव्हता. अमीर हबीबुल्लानंतर अफगाणिस्थानच्या गादीवर हक्क सांगणारे त्यांचे दोघे सावत्रभाऊ होतेच. अमीर हबीबुल्लानंतर अफगाणिस्थानचं राज्य कोणाला मिळायचं ते अजून काहीच ठरलेलं नव्हतं. अर्थातच तसं काही अगोदरच ठरविण्याची पद्धत नव्हतीच. तसं म्हटलं तर अफगाणिस्थानच्या इतिहासात अमानुल्लाच्या आजोबांच्या वेळी, अब्दूर रहमानच्या वेळीच आधुनिक अफगाणिस्थान हे एक संघराष्ट्र म्हणून अस्तित्वात आलं होतं. अब्दूर रहमाननंतर प्रथमच काहीही रक्तपात न होता त्याचा मोठा मुलगा हबीबुल्ला हा अमीर झाला होता. आणि त्याच्यानंतर कोण, हा प्रश्न त्याच्या जनानखान्यातच सोडवला जाण्याची दाट शक्यता होती. अमानुल्लाची आई, उल्या हजरत ही अत्यंत धोरणी आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षी बाई होती. तिचं माहेर एका नामवंत सरदार घराण्यातलं होतं. अमानुल्लानंच अमीर व्हावं म्हणून अगदी त्याच्या लहानपणापासूनच तिचे डावपेच सुरू होते. त्याचप्रमाणे अमानुल्लाला अमीर होण्यासाठी, राज्यकारभाराचं आवश्यक ते शिक्षण देण्यासाठी, तिनं उत्तमोत्तम उस्ताद नेमले होते. जगात कुठं काय चाललं आहे याची खडान्‌खडा माहिती मिळवण्याची तिची व्यवस्था चोख होती.

पण अजून अमीर हबीबुल्ला जिवंत होता आणि अमानुल्लाच अमीर होणार हे निश्चित झालेलं नव्हतं. पण तरझी अमानुल्लाकडून बऱ्याच अपेक्षा बाळगून होता. त्याचं स्पष्ट मत होतं की, समाज सुधारण्यासाठी जसं लोकमत जागृत करणं आवश्यक असतं तसेच पुष्कळदा कायदे करून जबरदस्तीने समाज सुधारावा लागतो. कारण सर्वसामान्य माणसाला आपलं स्वतःचं हित-अनहित कळत नाही; म्हणून समाजहिताची दृष्टी असलेल्या राजाने सक्ती करूनसुद्धा त्या समाजाला सुधारायला हवं. सुधारणेची चटक त्या समाजाला लावायला लागते. कारण जुने कायदेकानू, रूढी, रिवाज यांमुळे विशिष्ट वर्गाला आपोआपच काही अधिकार, सवलती मिळालेल्या असतात. समाजसुधारणांमुळे त्यांचे अधिकार, सवलती जाण्याची भीती असते. म्हणून हा वर्ग नेहमीच समाजसुधारणांमध्ये अडथळे आणतो. त्यासाठीच राज्यकर्त्यांनी खंबीर धोरण आखणं

भाग असतं.

सारख्याच विचारांचे असल्यामुळे अमानुल्ला सरय्या यांनी लग्न करण्याचे ठरवले. तरझीला वाटत होतं की, अमानुल्ला नाही म्हटलं तरी शाही खानदानातला आहे. आज सरय्याबरोबर लग्न करून, उद्या तिला सवत आणणार नाही कशावरून ? परंतु अमानुल्लाने त्या बाबतीत स्पष्टपणाने खात्री दिल्यानंतर तरझींनी लग्नाला परवानगी दिली. पण उल्या हजरतला, अमानुल्लाच्या आईला ही सोयरीक पसंत नव्हती. ती स्वतः अत्यंत महत्त्वाकांक्षी बाई होती. उद्या अमानुल्ला अमीर झाल्यावर स्वतःला सत्ता चालवता येईल अशी तिची कल्पना होती. परंतु अमानुल्लाच्या मनात वेगळेच विचार येत होते. त्याला वाटत होतं की, सरय्यासारखी बायकोच मला माझ्या कार्यात साथ देऊ शकते. अशी साथ देणारी मुलगीच मला बायको म्हणून हवी. तिनेच शहाखानम व्हायला हवे. नेमकी हीच गोष्ट उल्या हजरतला पटत नव्हती. तिला वाटत होतं, माझ्यासारखी अनुभवी बाई, अमानुल्लाला सल्ला द्यायला असताना, चार बुकं शिकलेल्या या कालच्या मुलीला अमानुल्ला एवढं महत्त्व का देतो आहे ? तसं म्हटलं तर गुलपरी नावाची एक मुलगी तिने स्वतःच अमानुल्लाला 'भेट' म्हणून दिली होती. तिला मुलगाही झाला होता. पण सरय्याशी निका करण्याचा अमानुल्लाचा हट्ट, तिला स्वतःच्या अधिकारांवर गदा आणील काय याची भीती वाटायला लावत होता. सासू-सुनेचं पुढं पटणार नव्हतं—ही गोष्ट तेव्हाच ठरून गेली होती.

१९१९ मध्ये अमीर हबीबुल्ला शिकारीला गेला असताना, जलालाबाद इथं कोणी तरी त्याचा खून केला. या खुनापाठीमागे कोणाचा हात होता हे शेवटपर्यंत उघडकीला आले नाही. किंवा आणलं गेलं नाही असं म्हटलं तरी चालेल. तरी पण उल्या हजरत आणि अमानुल्ला यांचा त्या खुनाशी संबंध असावा अशा अफवा पसरल्या होत्या.

खून झाला तेव्हा स्वतः अमानुल्ला काबूलमध्येच होता. हबीबुल्ला गेल्यावर अमानुल्लानं घाईघाईनेच स्वतः अमीर झाल्याचे काबूलहून जाहीर करून स्वतःची सत्ता चालू केली.

त्यानंतर तीन महिन्यांच्या आतच त्याने ब्रिटिशांबरोबर सीमावाद उकरून काढून अचानकपणेच, ब्रिटिशांवर हल्ला चढवला. त्या वेळी अतिशय दाट अशा अफवा उठल्या होत्या की, अमानुल्ला सीमावादाचे निमित्त उकरून काढून, महायुद्धाने थकून गेलेल्या ब्रिटिश हिंदुस्थानवर चाल करून जाणार होता! हिंदुस्थानामध्येही त्याच वेळेला ब्रिटिशांविरुद्धचे वातावरण तापतच होते. ब्रिटिशांविरुद्ध असलेल्या अमानुल्लाची कीर्ती हिंदुस्थानात पोचली होतीच. म्हणून जेव्हा तिसरे अँग्लो-अफगाण युद्ध सुरू झाले तेव्हा गांधीजी म्हणाले होते, " जर अमीर अमानुल्ला हिंदुस्थानवर चाल करून येणार असेल तर मी त्याचे दोन्ही हात पसरून स्वागत करीन!" कडव्या अफगाण शिपायांशी लढणं कठीण जाऊ लागल्यानंतर ब्रिटिशांनी एकदोनदा विमानातून काबूल

आणि जलालाबादवर बॉम्बहल्ला केला. आकाशातूनच कोसळणाऱ्या या आगीपुढं कसं लढायचं या विचारानंच अमानुल्लाचे शिपाई हताश झाले होते. परंतु पहिल्या महा- युद्धात लढून थकलेल्या ब्रिटिश सैन्याला, वैमानिकांना या एवढ्याशाच लढाईची काही मातब्बरीच वाटेना. पण त्यांना आता लढायचा कंटाळा आला होता. थकून गेलेल्या ब्रिटिश सैन्याने पुन्हा लढण्यासाठी कुरकुर करायला सुरुवात केली. ब्रिटिशांचा खजिनाही खडखडत होता. ब्रिटन या युद्धासाठी कसलीही मदत, हिंदुस्थानातल्या ब्रिटिश सरकारला द्यायला तयार नव्हते. एक महिनाभरच हे युद्ध जेमतेम चालले होते. दोन्ही पक्षांनी परस्परांनुमते हे युद्ध संपवण्याचं ठरवलं. लष्करी दृष्ट्या विजय कुणाचा झाला हे निर्णयात्मकरीत्या सांगणं तसं कठीणच होतं. तरी पण राजकीयदृष्ट्या अमानुल्लाच विजयी ठरला. अमानुल्लाने अफगाणिस्थानचे सार्वभौमत्व परत मिळवले. अफगाणि- स्थानचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचा अधिकार त्याने परत मिळवला होता. हा अधिकार पहिल्या अँग्लो-अफगाण युद्धात ब्रिटिशांनी हिरावून घेतला होता. अपमानास्पद अटी स्वीकारून गेलेला हा अधिकार परत मिळवणं हा अमानुल्लाचा फार मोठा नैतिक विजय होता. झालेली मानहानी त्याने भरुन काढली होती. या विजयामुळे फक्त अफगाणि- स्थानातच नव्हे तर सर्व इस्लामी देशांमध्ये अमानुल्लाची प्रतिमा उजळली होती. आपला हा नवा हक्क बजावण्यासाठी त्याने लगेच १९२१ साली नोव्हेंबरमध्ये बोल्शेव्हिक रशियाशी मैत्रीचा तह केला. रशियाने अमानुल्लाला शस्त्रास्त्रं दिली, पैसा दिला, नजराणे पाठवले. दोन्ही देशांनी आपापले राजदूत एकमेकांकडे पाठवले.

या मित्रत्वाच्या तहाचे, दर आठ वर्षांनी, आत्तापर्यंत, नूतनीकरण होत आले आहे.

पण सोव्हिएट रशियामधल्या मुस्लिमांनी बोल्शेव्हिकांविरुद्ध बंड उभारले होते. त्या बंडखोरांनी तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थानकडे मदतीची याचना केली होती. अमानुल्लाने बंडखोरांच्या मदतीसाठी, अन्वरपाशाकडे सरहद्दीवर आपले सैन्यही पाठवले. तेव्हा बोल्शेव्हिकांनी अमानुल्लाशी वाटाघाटी चालू केल्या. आणि मग अमानुल्लाने आपल्या सैन्याला माघारी बोलावून घेतले.

पण यानंतर लगेच, रशियाने अफगाणिस्थानला धडा शिकवण्यासाठी अमुनदी- मधले ‘ मांगीकिला ’ हे छोटंसं अफगाण बेट, आपले सैन्य पाठवून काबीज केलं. पुन्हा एकदा वाटाघाटी झाल्या. आणि मग हे बेट रशियाने अफगाणिस्थानला परत केले. या वेळी मैत्रीचा नवा करार करण्यात आला. या करारानुसार दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले न चढवता, तटस्थतेचं धोरण आखण्याचं ठरवलं गेलं. हा तह १९२६ साली झाला. आणि या तहानंतर प्रथमच रशियाचा अफगाणिस्थानात रीतसर राजकीय शिरकाव झाला.

या तहानंतर रशियाने दोन फायटर विमाने अमानुल्लाला दिली. ( ब्रिटिशांनी केलेल्या हवाई बॉम्बहल्ल्यामुळे अमानुल्लाने हाय खाल्ली होती. त्यावर हा उतारा होता. ) ताश्कंद आणि काबूल दरम्यान मधून मधून विमानसेवा सुरू करण्यात आली. त्यासाठी

काबूलमध्ये विमानतळ रशियाने बांधून दिला. रशियाचे तंत्रज्ञ, वैमानिक, इतर सल्लागार तुरळक प्रमाणात अफगाणिस्थानात येऊन राहू लागले. अफगाण दफ्तरातून काम करू लागले. मूठभर अफगाण सोशॅलिस्टांपैकी कोणी कोणी मास्कोची वारी करून येऊ लागले. काबूलपासून थेट रशियन सरहद्दीपर्यंतचा पक्का रस्ता रशियाने बांधून दिला.

साम्राज्यवादी ब्रिटिशांविरुद्ध असलेल्या अमीर अमानुल्लाला सोव्हियट रशियाचा पूर्ण पाठिंबा असला तरी रशियाने अमानुल्लाला अत्यंत संयतपणे मदत दिली. आपल्या मदतीचं दडपण येऊ दिलं नाही, की सोशॅलिस्ट विचारसरणी बुद्ध्या पसरविण्याचा कोणताच सबळ प्रयत्न केला नाही. एक तर त्या वेळी रशिया स्वतःच्या अंतर्गत मारामाऱ्यांमध्ये आणि राष्ट्रउभारणीत आकंठ बुडालेला होता. त्या वेळी त्यांना हे विकतचं श्राद्ध घ्यायचं नव्हतं. आणि दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे, लेनिनच्याच म्हणण्याप्रमाणे, "अफगाणिस्थान हा सरंजामी देश असूनही, खुद्द अमानुल्ला हा इथला राजा असूनही, तो आधुनिक विचारांचा, सुधारणावादी आहे; आणि मुख्य म्हणजे साम्राज्यवादी, वसाहतवादी, भांडवलशाही ब्रिटिशांचा कट्टर शत्रू आहे. पण तेवढ्यानेच तो लगेच समाजवादी विचारांचाच असला पाहिजे असे नाही. अफगाणिस्थान सध्या संक्रमणावस्थेत आहे. अशा वेळी अफगाणांना चुचकारून, गोडीगुलाबीनेच समाजवादासाठी तयार करता येईल. त्या बाबतीत घिसाडघाई उपयोगाची नाही."

## नव्या युगाची सुरुवात

आतापर्यंत तज्ज्ञींकडे चर्चा, वादविवाद यातूनच ज्या योजना आखल्या होत्या, सिराज-अल्-अखबारमधून ज्या विचारांचा पुरस्कार सतत चालला होता त्या योजना, ते विचार आता अमलात येऊ लागले. हळूहळू जुनाटपणाचं घोंगडं फेकून देण्याच्या क्रियेची सुरुवात झाली. काबूलमध्ये मुलींच्यासाठी प्राथमिक शाळा निघाल्या. गुन्हेगारांचा निवाडा मुल्लामौलवींसमोर न होता, सरकारने नेमलेल्या न्यायाधिशांसमोर होऊ लागला. शिपायांचे पगार वाढले. मुल्लामौलवींना सरकारातून मिळणाऱ्या पगारात कपात झाली. मुलांच्या तंत्रविद्येसाठी शाळा निघाल्या. सुटसुटीत असे पाश्चात्य कपडेच स्त्रीपुरुषांनी घालावेत असं लोकांना सांगण्यात येऊ लागलं. त्यासाठी युरोपातून ट्रक भरभरून कमी प्रतीचे (अफगाण लोकांना परवडावेत म्हणून) कपडे आणायला सुरुवात झाली. बायकांनी बुरखा घालू नये, पडदा पाळू नये असं अत्यंत आग्रहानं सांगण्यात येऊ लागलं. कोणत्याही मुलीचं लग्न जबरदस्तीनं होऊ नये, यासंबंधी कायदे केले; गुलामी, वेठबिगारी कायद्यानं बंद केली, सिनेमा-नाटकं अफगाणिस्थानात प्रथमच सुरू झाली. वृत्तपत्रांच्या संख्येत भरपूर वाढ झाली; पुरातत्त्व विभाग सुरू होऊन फ्रेंच पुरातत्त्ववेत्त्यांना अफगाणिस्थानात काम करण्याची परवानगी मिळून त्यांचे काम सुरू झाले; अफगाणिस्थानातली पहिली घटना अस्तित्वात आली; नागरी हक्क अफगाण लोकांना

देण्यात आले. किती तरी युरोपिअन आणि आशियाई देशांशी प्रथमच स्वतंत्रपणे संबंध प्रस्थापित करण्यात आले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, मुलकी वगैरे प्रत्येक क्षेत्रात जगाबरोबर येण्याचे प्रयत्न नेटाने सुरू झाले.

सरय्या हळूहळू मुलींच्या शाळेतल्या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवू लागली. मुलींसमोर ती स्त्रीशिक्षणाचे, स्त्रियांच्या उन्नतीचे विचार मांडू लागली. अशा समारंभांना ती काबूलमधल्या परदेशी वकिलातीतील अधिकाऱ्यांच्या बायकांनाही बोलावीत असे. त्या बायकाही उत्साहाने या समारंभांना यायच्या. पण त्याचे खरे कारण अफगाण मुलींच्या शिक्षणामध्ये त्यांना काही स्वारस्य होते असे नसून सरय्याराणीचे दर वेळचे नवेनवे, अत्याधुनिक फॅशनचे कपडे पाहण्याचे त्यांना जास्त आकर्षण होते. समारंभाला जाऊन आल्यानंतर सरय्याच्या कपड्यांची चर्चा त्या बायकांच्या वर्तुळात व्हायची.

युरोपमधून पुरुष डॉक्टरांबरोबरीने काही स्त्री-डॉक्टरांनाही बोलावण्यात आलं. फ्रॉलिन लेट ही जर्मन डॉक्टर आणि सिनोर टान्झी ही इटालियन डॉक्टर यांच्या मदतीनं सरय्यानं अफगाणिस्थानात स्त्रियांसाठी पहिलं हॉस्पिटल स्थापन केलं. लोकांनी मुलींना मोठ्या संख्येनं शाळेत पाठवावं म्हणून सरय्याचा सतत प्रचार सुरू होता. पण त्यामुळं कंदाहार, मजारेशरीफ, गझनी, जलालाबाद वगैरे ठिकाणच्या लोकांना भीती वाटू लागली की, आज नाही उद्या आम्हालाही आमच्या मुलींना शिक्षणासाठी थेट काबूलपर्यंत पाठवण्याची सक्ती तर होणार नाही ?

१९१९ मध्ये अमानुल्ला राजा झाला आणि १९२४ मध्ये खोस्त भागातल्या टोळीवाल्यांनी अमानुल्लाविरुद्ध बंड केले. हे बंड मुल्लामौलवींनीच चिथावल्यामुळे झाले होते. काबूलमध्ये चाललेल्या सुधारणांचा डोंगरदऱ्यांमध्ये राहणाऱ्या टोळीवाल्यांवर काहीही बरावाईट परिणाम झाला नव्हता. पण अमानुल्ला इस्लामविरुद्ध उठला आहे, असं तिथल्या मुल्लांनी चिथावल्यामुळे 'काफर' अमानुल्लाविरुद्ध बंड करण्याचे कोलीतच त्यांच्या हातात दिले गेले. पण अमानुल्लानं हे बंड आपल्या सामर्थ्यानं स्वामिनिष्ठ शिपायांकडून मोडून काढले. १९२२ मध्ये तिसरे अँग्लो-अफगाण युद्ध जिंकून अमानुल्लाने ब्रिटिशांची सत्ता झुगारून दिली होती. आता टोळीवाल्यांचे बंड मोडून त्याने आपली अंतर्गत सत्ताही बळकट केली. आपल्या विजयी सैनिकांच्या सन्मानार्थ त्यानं एक मोठा समारंभ केला. त्या समारंभाला उल्या हजरत आणि सरय्या, दोघीही उपस्थित होत्या. अफगाणिस्थानातल्या इतिहासात आतापर्यंत सैनिकांसमोर शाही घराण्यातली कुठलीच बाई कधीच गेली नव्हती ! उल्या हजरत आणि सरय्यांनी रिवाजाप्रमाणे नखशिखान्त बुरखा घातला नव्हता. त्यांचे चेहरेच फक्त तेवढे डोक्यावरच्या हॅटला लावलेल्या जाड कापडाने झाकले गेले होते. त्यांच्या हातून रुमालात बांधलेली सोन्याची नाणी घेताना अफगाण सैनिकांनी प्रथमच शाही घराण्यातील बायकांचे पाय कसे दिसतात ते पाहिले. पाश्चात्य पद्धतीचे स्त्रियांचे कपडे कसे दिसतात ते पाहिले. पण त्यांच्या हातून सोन्याची नाणी घेताना, त्यांनी रिवाजाप्रमाणे नखशिखान्त बुरखे घातलेले नाहीत ही गोष्ट त्यांच्या

लक्षातही आली नाही.

बंडात भाग घेणाऱ्या मंगल, झरदान, खिलजी टोळीवाल्यांच्या बायकांची सभा सरय्याने घेतली. त्या बायकांना तिनं सांगितलं, अमीरविरुद्ध असं बंड करणं हा भयंकर गुन्हा आहे! त्यांच्या नवऱ्यांनी हा गुन्हा केला असला तरी त्याची अर्धी जबाबदारी त्यांच्या बायकांचीसुद्धा आहे. कारण बायकांनी सांगितलं असतं तर पुरुषांनी बंड केलं नसतं. अशा भयंकर गुन्ह्याला देहान्ताचीच शिक्षा योग्य! त्या मानानं त्यांना फक्त तुरुंगातच टाकलं ही शिक्षा अतिशय सौम्य आहे; पण पुन्हा जर अशा तऱ्हेचा बंडाचा प्रयत्न कोणी केला तर मात्र प्रत्येक पुरुषाला व प्रत्येक बाईला मारून टाकण्यात येईल.

बंडाचा बीमोड केल्यानंतर अमानुल्लाने 'ज्ञान आणि अज्ञानस्तंभ' उभारून आपल्या विजयाची स्मृती कायम ठेवली. या समारंभासाठी अमानुल्ला आपल्या रुपेरी रोल्स रॉइस गाडीतून, सरय्याला बरोबर घेऊन रस्त्यावरून मिरवीत गेला होता. आजही सरय्यानं नेहमीप्रमाणेच फक्त एक जाड कापड हॅटला लावून फक्त चेहऱ्यावरूनच सोडले होते. त्यांच्या पाठीमागच्या दुसऱ्या गाडीतून सरय्याच्या दोन्ही तरुण मुली येत होत्या. उजळ माथ्यानं! कसलाही बुरखा न घेता! अफगाणिस्थानात हे काही तरी अघटितच घडत होतं! मुलगी दहा बारा वर्षांची झाली की ती बुरख्यात गेलीच पाहिजे असा जिथला दंडक होता, तिथं खुद्द राजकन्याच बुरख्याशिवाय रस्त्यातून मिरवीत जात होत्या! दुतर्फा उभे राहिलेले लोक टकाटका बघतच राहिले. आणि हे लोक समारंभानंतर जेव्हा आपापल्या गावात, दूरदूर गेले तेव्हा दबत्या आवाजात एकमेकांना सांगू लागले, 'त्या तिकडे काबूलमध्ये शाही मुली बुरखा तर घालीतच नाहीत आणि खुद्द शहाखानमसुद्धा फक्त चेहऱ्यावरूनच तेवढा बुरखा घेते. फिरंग्यांचे कपडे घालते. पाय उघडे टाकते!'

तरी पण या सगळ्या गोष्टी दूर तिकडे काबूलमध्ये घडत होत्या. खेडेगावांतून, डोंगरदऱ्यांमधून राहणाऱ्या टोळीवाल्यांना त्याचं काही फारसं सोयरसुतक नव्हतं. त्यांच्या रोजच्या आयुष्यात त्यामुळं काहीच फरक पडत नव्हता. पण सरय्याचं नाव मात्र या नाही त्या निमित्तानं पुन्हा पुन्हा कानांवर पडत होतं. ती बाई चक्क आपल्या नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून हिंडत फिरत होती. सैनिकांना बक्षिसं देत होती, बायकांना दवापाणी देण्यासाठी दवाखाने काढत होती, मुलांना कसं वाढवावं हे सांगत होती, फिरंगी कपडे घाला म्हणत होती... हे मात्र काही तरी वेगळंच घडत होतं!

अमीर अमानुल्ला जेव्हा परकीय वकिलातीतील अधिकाऱ्यांना मेजवानीसाठी बोलवायचा त्या वेळी सरय्या त्या अधिकाऱ्यांच्या बायकांनाही मेजवानीसाठी बोलवायची. त्या वेळी काबूलमधील प्रतिष्ठित अफगाण लोकांच्या बायकांनाही आमंत्रणं द्यायची. पूर्वी उल्या हजरत राणी असताना तीसुद्धा अशा 'पडदा मेजवान्या' द्यायची; पण त्या वेळी निमंत्रित बायका उल्या हजरतच्या हाताचा मुका घेऊन मग नंतर फालतू गप्पाच मारत बसायच्या. सरय्या मात्र सुरुवातीचा नेहमीप्रमाणे ओळखीचा, स्वागताचा,

कार्यक्रम झाला की, युरोपिअन बायकांना स्वतःच्या कामाबद्दल माहिती द्यायची, त्यांच्या देशातून कुठे कुठे काय काय प्रयत्न चालू आहेत त्याबद्दल माहिती विचारून घ्यायची. त्यांचे रीतिरिवाज, पद्धती, स्त्रीगीतं याबद्दल माहिती विचारायची.

अशाच एका पार्टीच्या वेळी, युरोपियन स्त्रियांना अफगाणिस्थानातले ' अत्तान ' हे लोकनृत्य दाखवणे सुरू होते. या अत्तानमध्ये खुद्द सरय्यानंही भाग घेतला होता. एका जाड पडद्यामागं टमटम, रबाब वगैरे अफगाण-वाद्यं वाजवीत वाद्यवृंद बसला होता. ' अत्तान ' संपल्यानंतर सरय्यानं आपल्या युरोपियन पाहुण्यांना त्यांचा एखादा नाच दाखविण्याची विनंती केली. पण कुठल्या तरी अनोळखी सुरांच्या त्या अफगाण वाद्य वृंदावर त्यांना कोणताच नाच करता येईना. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरुष माणसं नसताना फक्त बायका-बायकांनीच नाच करणं त्यांना ऐकूनसुद्धा माहीत नव्हतं. त्या युरोपियन बायकांना पुरुषांच्या बरोबरीनं, त्यांच्या हातात हात घालूनच फक्त नाचता येत होतं! सरय्याला या गोष्टीचं केवढं तरी नवल वाटलं!

अशाच एका मेजवानीच्या वेळी अमानुल्ला सरय्याला तिच्या कामगिरीबद्दल, उच्च पुरस्कार देणार होता. असा पुरस्कार आत्तापर्यंत कोणत्याही बाईला मिळाला नव्हता. अफगाणिस्थानातला हा उच्च दर्जाचा पुरस्कार होता. त्या समारंभाला जमलेल्या सगळ्या बायका युरोपिअनच होत्या. त्यांमध्ये तुर्कस्थानच्या एका मंत्र्याची बायको पण होती. अमानुल्ला तिथे येणार म्हटल्यावर, आपल्या निकटच्या कुटुंबाबाहेरील एका पुरुषासमोर आपण कसं जायचं, म्हणून ती बाई तिथून निघून जाऊ लागली. सरय्यानं तिला खूप समजावलं. खुद्द तुर्कस्थानमध्ये कमालपाशा बुरखा काढून टाकण्याचे, पडदा न पाळण्याचे प्रयत्न करीत होता. पण जुन्या वळणाच्या त्या बाईला काही ते पटेना. शेवटी अमानुल्ला तिथं येण्याअगोदरच त्या बाईला तिथून निघून जाण्याची परवानगी देण्यात आली.

ही हकीगत घडल्यानंतर अमानुल्ला, सरय्या दोघेही संतापले, चिडले, निराश झाले. आपल्या पुढचं काम केवढं अवघड आहे त्याची त्यांना कल्पना आली. पण त्यासाठी वाटेल ते कष्ट घेण्याची, त्यासाठी हवे तेवढे प्रयत्न करण्याची, वाट पाहण्याची त्यांची तयारी होती. त्यांनी निराश होण्याचे नाकारले, प्रयत्न चालूच ठेवले.

## एक होता राजा

अफगाणिस्थानातलं राजकारण हे टोळीवाल्यांचं राजकारण आहे. अत्यंत हुशार, डावपेचात मुरलेला, आपल्या लोकांसाठी वाटेल तो धोका पत्करायची तयारी असलेला, असे गुण असलेल्या माणसाकडे टोळीचे नेतृत्व आपोआपच जाते. अमानुल्लामध्ये हे गुण होतेच. शिवाय त्याचं बोलणं, वागणं अतिशय आकर्षक, लोकांना जिंकून घेणारं होतं. आपल्या लोकांसाठी काही चांगलं करण्याची त्याची आणि सरय्याची तळमळ

एवढी तीव्र होती की, जुन्या विचारांच्या लोकांना विशेषतः मुल्लामौलवींना त्याच्या सुधारणा पसंत नव्हत्या, तरी त्यांच्या तळमळीबद्दल कोणाच्याही मनात शंका नव्हती. हरुन-अल-रशीदप्रमाणे अमानुल्ला हासुद्धा वेष बदलून बाजारातून हिंडायचा. सामान्य लोकांमध्ये वावरायचा, जनमानसाचा कानोसा घ्यायचा. लोकांच्या तक्रारी ऐकून त्या दूर करायचा. पूर्वी अमीर आणि सामान्य लोक यांच्यामध्ये प्रत्यक्ष अल्ला आणि सामान्य लोक एवढं अंतर मुद्दामहूनच ठेवलं जात होतं. हे अंतर अमानुल्लानं अगदीच कमी करून टाकलं; 'आमच्यासाठी आमचा अमीर काही तरी करतो आहे,' या भावनेमुळे तो लोकांचा लाडका अमीर झाला होता.

ब्रिटिशांशी लढून त्याने आपलं सार्वभौमत्त्व परत मिळवलं होतं, त्यामुळे जगामध्ये त्याची प्रतिमा खूपच उजळली गेली. ब्रिटिश वर्चस्व झुगारून देऊन त्याने रशिया, जर्मनी, इराणशी स्वतंत्रपणे, अफगाणिस्थानला फायदेशीर असे संबंध वाढवायला सुरुवात केली. त्याचा मुस्लिम जगामध्ये एवढा चांगला परिणाम झाला की, तुर्कस्थानचा खलिफा गेल्यानंतर, अमानुल्लानेच खलिफा व्हावे अशी सगळ्या मुस्लिम जगाने इच्छा प्रगट केली होती. अमानुल्ला अर्थातच फार खुश झाला; पण एवढ्यातच त्याची तयारी नव्हती. आणि शिवाय त्याच वेळी खिलाफत प्रकरण सुरू होऊन सगळंच चित्र बदललं.

पहिल्या महायुद्धानंतर मुस्लिम जगामध्ये हळूहळू सामाजिक सुधारणांविरुद्धचा पूर्वीचा कडवटपणाही गेला होता. अमानुल्ला हाच आपल्याला उद्याच्या नवीन जगाकडे घेऊन जाणारा तारणकर्ता आहे, अशी सुशिक्षित मुस्लिमांप्रमाणेच, सर्वसाधारण लोकांतही भावना निर्माण होऊ लागली. त्यामुळे त्याच्या आधुनिकीकरणाकडेही लोक कौतुकानं पाहू लागले. अमानुल्ला लोकप्रियतेच्या कळसावर पोचला होता, अशा वेळी त्यानं युरोपचा दौरा काढला. स्वतंत्र, सार्वभौम अफगाणिस्थानचं अस्तित्व युरोपिअन राष्ट्रांच्या मनावर ठसविण्याचा, या दौऱ्यामागे त्याचा हेतू होता. त्या वेळच्या भारतातील ब्रिटिश सरकारने त्याच्या या बेतामध्ये मोडता घालण्याचा प्रयत्न केलाच, तरी पण त्यांनाही शेवटी हार मानावी लागली. पण अमानुल्ला सरय्या यांच्या शाही स्वाऱ्या जेव्हा हिंदुस्थानातून प्रवास करीत होत्या तेव्हा त्यांची अत्युत्कृष्ट व्यवस्था ब्रिटिश सरकारने ठेवली होती.

व्हॉइसरॉयची इच्छा होती की, अमानुल्लाने दिल्लीला येऊन व्हॉइसरॉयची प्रत्यक्ष गाठ घ्यावी; पण अमानुल्ला दिल्लीला गेला नाही. तो म्हणाला, 'ब्रिटिश सरकारशी संबंध ठेवायचे झाले तर मी इंग्लंडच्या राजाशीच संबंध ठेवीन, बरोबरीच्या नात्यानं! व्हॉइसरॉय कोण? तोही इंग्लंडच्या राजाचा एक तऱ्हेचा पगारी नोकरच की!'

अमानुल्ला सरय्या मुंबईला आल्यावर त्यांचे महाप्रचंड उत्स्फूर्त स्वागत मुंबईच्या लोकांनी केलं. एक तर दिल्लीला जाण्याबाबतचं अमानुल्लाचं मत लोकांना फार आवडलं होतं. शिवाय जालियनवाला बागेचं हत्याकांड झाल्यानंतर अमानुल्लानं काबूलमध्ये

दुसऱ्याच दिवशी जाहीर सभा घेऊन, जालियनवालाची हकीगत लोकांना वाचून दाखवली होती. ( त्या वेळी अमानुल्ला रडत होता ! ), आणि असे अत्याचार करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध लोकांना त्यानं भडकावलं होतं. त्याच वेळी हिंदुस्थानचे लोक हे आमचे मित्र आहेत. त्यांच्यासाठी काहीही करण्याची तयारी त्याने दाखवली होती. त्यामुळेही अमानुल्ला इथल्या लोकांना आवडत होता. भारतीय मुस्लिम त्याच्याकडे आपला नेता म्हणून पाहात होते. तसेच हिंदूंनाही त्याच्या सामाजिक सुधारणांमुळे, त्याच्या ब्रिटिश-द्वेषामुळे तो आवडत होता. त्याला पाहण्यासाठी, त्याच्याशी हस्तान्दोलन करण्यासाठी, प्रत्येक ठिकाणी एवढी गर्दी व्हायची की ब्रिटिश सरकारची अवस्था मोठी कठीण झाली. एका सभेमध्ये अमानुल्लानं गर्दीतल्या एका हिंदू माणसाला व एका मुसलमान माणसाला व्यासपीठावर बोलावून घेतले. त्यांचे हात एकमेकांच्या हातांत दिले, आणि " हिंदुस्थानातले हिंदु-मुस्लिम जर बंधुत्वाने राहिले तर मला सर्वात जास्त आनंद होईल ! भारतीय हिंदू माझे शेजारी आहेत, तसेच ते माझे भाऊही आहेत." असं जाहीरपणाने सांगितलं. कस्तुरबा गांधींना ( गांधीजी त्या वेळी तुरुंगात होते. ) अमानुल्ला सरय्या रेल्वेस्टेशनवर भेटले तेव्हा अक्षरशः मुंगी शिरायला जागा नव्हती, अशी गर्दी झाली होती.

ब्रिटिश सरकारने अमानुल्लाच्या या प्रचंड लोकप्रियतेची चांगलीच खूणगाठ तेवढी बांधून ठेवली !

मुंबईकरांचा निरोप घेऊन, शाही स्वाऱ्या ' राजपुताना ' बोटीवरून निघाल्या त्या वेळी, बोटीवरच्या इतर परक्या लोकांत वावरताना सरय्यानं प्रथमच आपल्या चेहऱ्यावरचा बुरखाही काढून टाकला, आणि तिनं उजळ माथ्यानं युरोपच्या प्रवासाला सुरुवात केली.

मुंबईनंतरचा पहिला मुक्काम होता पोर्टसैद. इजिप्तचे, एका मुस्लिम देशाचे एक महत्त्वाचे बंदर. एकदा बुरख्याविना वावरायला सुरुवात केल्यानंतर सरय्या, अमानुल्लाची धाकटी बहीण नूर-उस् सिराज, यांना पुन्हा बुरखानशीन व्हायची मुळीच इच्छा नव्हती. पण जर बोटीवर वावरत होत्या तशा उजळ माथ्यानेच त्या पोर्टसैदला उतरल्या तर, इजिप्त, इराण, इराक, तुर्कस्थान, सौदी अरेबिया– सगळ्याच मुस्लिम राष्ट्रांतून संतापाची लाट उसळेल काय, ही भीती होती. एक मुसलमान राणी बुरखा न घालता वावरते आहे हे त्यांना सहन होईल का ? पण सुरुवातीपासून बुरख्याविरुद्ध बोलत असताना, वेळ आली की स्वतःच बुरखा वापरला म्हणून बाकीचं जग हसणार नाही का ?

अत्यंत कठीण प्रसंग त्यांच्यासमोर आला होता. जेवढा कठीण तेवढाच नाजूक.

आणि मग बोटीवरून पोर्ट सैद बंदरावर उतरताना, सरय्यानं, नूर-उस्-सिराजनं हॅटला लावलेले, फक्त चेहऱ्यावरून तेवढे येणारे बुरखे घातले होते. अत्यंत झिरझिरीत, रेशमी काळ्या कापडाचे. शाही स्वागतासाठी किनाऱ्यावर आलेल्या इजिप्शियन

मुस्लिमांना अत्यंत आश्चर्य वाटले. पण कोणी बोललं मात्र नाही. फोटोग्राफर्सनी फटाफटा फोटो मात्र घेतले. वृत्तपत्रांत छापून आलेले हे फोटो सगळ्या युरोपभर गेले, काबूल कंदाहारलासुद्धा गेले. मात्र अफगाणिस्थानातल्या दऱ्याखोऱ्यांपर्यंत पोचले नाहीत. झिरझिरीत, रेशमी, काळ्याभोर पडद्याआडचा सरय्याचा चेहरा स्पष्ट दिसत होता. युरोपमधल्या बायकांना हा असा पडदा– चेहऱ्याबद्दलची उत्सुकता वाढवणारा– म्हणून अतिशय आवडला. आपल्या राणीनं आणखी एक फॅशन केली म्हणून काबूल-कंदाहारच्या लोकांनी निःश्वास सोडला. सरय्याला त्यांनी नेहमीच अशा बुरख्यात पाहिलं होतं. पण त्या वेळी तो बुरखा असा पारदर्शक नव्हता, त्यांच्या राणीचा चेहरा असा दिसायचा नाही. असं असूनही जिथं जातील तिथं त्यांच्या राजा-राणीचं केवढं तरी भव्य स्वागत होत होतं, याचं कौतुक त्यांना वाटत होतंच. त्यांचा चिमुकला मागासलेला देश, अमानुल्ला सरय्याने जगाच्या भव्य नकाशावर नेऊन ठेवला होता, हे ऋण त्यांना मान्य होतंच.

रोम रेल्वे स्टेशनावर इटालीचा राजा व्हिक्टोरिओ इमॅन्युअल, त्याची राणी आणि बोनिटो मुसोलिनी, अमानुल्ला सरय्याच्या स्वागताला आले होते. स्वागत-समारंभ होता-होताच मुसोलिनी मागच्या बाजूने बुलेट प्रुफ काचा लावलेल्या गाडीत बसून निघून गेला. ही दोन शाही जोडपी मात्र रोमच्या सजवलेल्या रस्त्यांमधून स्वागताच्या घोषणा देणाऱ्या लोकांचे अभिवादन स्वीकारीत, गर्दीतून मिरवीत गेली. आता तर सरय्याने तो झिरझिरीत पडदादेखील काढून टाकला होता. इटलीच्या राजाने दिलेला खूप मोठा, गुलाबपुष्पांचा गुच्छ एका हातात धरून, दुसरा हात लोकांकडे पाहात हालवीत, सरय्या एखाद्या युरोपिअन राणीप्रमाणे मिरवीत जात होती!

सरय्याचा हा फोटोसुद्धा वृत्तपत्रात छापला गेला. ब्रिटिशांनी काही खास फोटोग्राफर्स फक्त सरय्याराणीचेच, वेगवेगळ्या वेशातले, वेगवेगळ्या प्रसंगाचे, जमतील तेवढे फोटो काढण्यासाठीच नोकरीवर ठेवले होते. त्यांचं काम म्हणजे सरय्याचे जास्तीत-जास्त फोटो काढून ब्रिटिश सरकारच्या परराष्ट्रखात्याकडे पोचते करायचे.

या वेळी अमानुल्ला आणि इमॅन्युअलची चांगलीच मैत्री जमली. इमॅन्युअलने 'कॉलर ऑफ द ॲन्युन्झिएट' ही सर्वश्रेष्ठ पदवी अमानुल्लाला देऊन त्याचा सत्कार केला. ही पदवी इंग्लंडच्या राजाला मिळाली होती. अमानुल्ला एकदम इंग्लंडच्या राजाच्या पंगतीलाच जाऊन बसला!

आता या दोघांची सहज म्हणून जमून गेलेली मैत्री, पुढे अमानुल्लाला किती तरी उपयोगाला पडावयाची होती.

रोमनंतर अमानुल्ला सरय्या फ्रान्सला आले. पॅरिसला जाण्यासाठी सरय्याने खास शिंपी बोलावून आपले कपडे शिवून घेतले होते. आतापर्यंतच्या प्रवासामुळे सरय्या आता बरीच धीटही झाली होती. तरीसुद्धा तिचा अकृत्रिम आकर्षकपणा, मुद्दामहून आणलेल्या नटव्या आकर्षक युरोपिअन बायांच्या तुलनेत, युरोपिअन लोकांना

फारच आवडला. तिच्या वागण्यातली पौर्वात्य आदब, ‘ मुलाबाळांची आई ’ ही तिची प्रतिमा, लोकांना आवडत होती. फ्रेंचांनी सरय्यावर स्तुतिसुमनांची उधळण केली. तिची वागणूकच फक्त खानदानी नव्हती, तर ती एका छोट्याशा देशाची राणी होती. आपल्या देशातल्या मागासलेल्या बायकांना अंधारातून उजेडाकडे घेऊन जाण्याचा, अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाण्याचा अत्यंत धोकेबाज, धीरोदात्त खेळ खेळत होती.

बॉ-द-बोलॉ हे सुंदर रेल्वेस्टेशन माणसांनी फुलून गेलं होतं. अमानुल्लाची निळी आगगाडी स्टेशनात आली, ती अशी की, त्याचा खास डबा स्टेशनावर अंथरलेल्या लाल गालिच्याला लागूनच उभा राहिला. सरय्या आता थोडं थोडं फ्रेंच बोलायला शिकली होती. पाश्चात्य रिवाजाप्रमाणे प्रथम सरय्याच डब्यातून उतरली. प्लॅटफॉर्मवर पाय ठेवताच, फ्रेंच पद्धतीप्रमाणे तिने आपला हात हलकेच पुढे केला आणि ती म्हणाली—“ बोन्जोर ...” फ्रान्सचा प्रेसिडेन्ट शाही स्वागतासाठी आला होता. त्याने किंचितसं झुकून, अत्यंत सौजन्याने सरय्याचा हात हलकेच हातात घेतला.

फोटोग्राफर्सनी हा क्षण बरोबर टिपला होता !

तो फोटो छापलेली वृत्तपत्रं जेव्हा अफगाणिस्थानात पोचली तेव्हा सगळे अफगाणिस्थान हादरले ! ही वृत्तपत्रं खेडेगावातूनसुद्धा जातील, याची चोख व्यवस्था ब्रिटिशांनी केली होती. त्यांची राणी बुरखा तर घालत नव्हतीच, पण एका काफीर माणसाच्या हातात खुशाल आपला हात देत होती ! काय भयंकर प्रकार चालला होता त्या युरोपमध्ये !

कंदाहार, हेरत, मजारे शरीफ, जलालाबाद.... सगळीकडे त्याचे पडसाद उमटले; तरी पण बऱ्याच लोकांचं म्हणणं पडलं की, फोटोमध्ये दिसणारी बाई खरी सरय्या नव्हेच, हा ब्रिटिशांचाच काही तरी चावटपणा आहे.

शाही स्वाऱ्यांचे लंडनमधले दिवसही चांगले गेले. इंग्लंडच्या राजाशी बरोबरीच्या नात्याने अमानुल्ला वागत होता. पण खरा प्रश्न आला रशिया भेटीच्या वेळी. अमानुल्लाने ब्रिटिशांशी युद्ध करून त्यांचे वर्चस्व झुगारून दिले होते, रशियाशी सलोख्याचे संबंध वाढवले होते. पण आता या शाही पाहुण्यांचे स्वागत भांडवलशाही पद्धतीनं–राजेशाही पद्धतीनं करायचं की समाजवादी पद्धतीप्रमाणं, बरोबरीच्या नात्यानं करायचं ? कम्युनिस्ट रशियापुढे मोठा प्रश्न पडला होता. पण अमीरच्या मैत्रीत बाध यायला नको, म्हणून रशियाने लाल रंगाचा गालिचा अंथरून परंपरागत पद्धतीनं स्वागत केले. मॅडम अलेक्झांड्रा कोलियेंटल, या नॉर्वेला पाठवलेल्या अम्बॅसॅडरला मुद्दामहून बोलावून घेऊन, सरय्याची देखभाल करण्याचं, यजमानीण म्हणून शाही पाहुण्यांचा आदरसत्कार करण्याचं काम तिच्यावर सोपवलं गेलं होतं.

अमीर अमानुल्ला हा स्वतः मार्क्सवादी नव्हता; तरी रशियाच्या साम्यवादाचं कौतुक त्याला होतं. आकर्षणही होतं. समाजवादी देशातल्या बायकांची काय परिस्थिती असते हे पाहण्याची सरय्याला उत्सुकता होती. म्हणून रशियाला जाण्यामध्ये दोघांच्याही

मनात विशेष हेतू होता, उत्सुकता होती. पण तिथल्या वास्तव्यात दोघांचाही चांगलाच अपेक्षाभंग झाला. साम्यवादाच्या सायीखालचं जळणारं रशियन जीवन लक्षात यायला अमानुल्लाला वेळ लागला नाही. आणि तिथे असताना त्या दोघांच्या हालचालींवर, बोलण्यावर लक्ष ठेवण्यासाठी हेर ठेवले आहेत ही गोष्ट लक्षात येताच दोघांचीही मने कडवटपणाने भरून गेली.

रशियानंतर ते दोघे इराणमध्ये आले. आणि पाच महिन्यांच्या उत्फुल्ल, मुक्त जीवनानंतर सरय्या आणि तिच्या बरोबरच्या बायकांनी पुन्हा एकदा आपापल्या हॅट-वरून झिरझिरीत पडदे सोडले! रोम, पॅरिस, लंडन, बर्लिन, मास्को इथलं वातावरण केवढं वेगळं होतं! केवढं मुक्त, प्रफुल्ल वातावरण होतं ते. आता पुन्हा परतीची वाट सुरू झाली होती. अडचणींची, घुसमटलेली, जुनाट वाट... जुने रीतिरिवाज, कालबाह्य कायदे, परंपरा यांचे खाचखळगे असलेली ती दुर्घट वाट.... धर्मपिसाटांच्या वाटमारीची भीती असलेली... अमानुल्लाबरोबर उघड्या गाडीतून, उजळ माथ्यानं हिंडणारी सरय्या आता पुन्हा बुरखा घालून वावरू लागली! फक्त बायकांच्याच अशा वेगळ्या पडदा मेजवान्यांना जाऊ लागली.

इराणच्या उलेमांनी अगोदरच अमानुल्लाला पत्र पाठवून कळवलं होतं की, इराणमध्ये सरय्यानं संपूर्ण बुरखा घातला पाहिजे. पण त्यांनी या पत्राकडे अजिबात दुर्लक्ष केलं. एवढंच नव्हे तर ' मशद ' इथल्या सोन्याचे कळस असलेल्या जगप्रसिद्ध मशिदीमध्ये नमाज पढायला सरय्या गेली तीसुद्धा अजिबात बुरखा न घेताच! या घटनेनंतर नऊ वर्षांनी इराणच्या शहाच्या बायकोला मात्र, ती बुरखा न घालता तिथे गेली म्हणून मशिदीमध्ये जाऊ दिले नव्हते. सरय्याला मशिदीत जाण्यासाठी कोणी मज्जाव केला नाही, तरी पण ही गोष्ट काही कुणाला आवडली नाही.

सहा महिन्यांनंतर आपला विजयदौरा संपवून, युरोपमधल्या बलाढ्य राष्ट्रांची मैत्री संपादन करून, तिथल्या लोकांची मने जिंकून, अमानुल्ला सरय्या अफगाणिस्थानात परत आले तेव्हा साहजिकपणेच संपूर्ण अफगाणिस्थानचे लक्ष लागले होते ते सरय्याकडे. जगभर काफीर लोकांच्यामध्ये उजळ माथ्यानं वावरलेली आपली राणी, इथं आपल्या देशात कशी वावरणार आहे? कंदाहारला अमानुल्ला सरय्याच्या स्वागतासाठी प्रचंड गर्दी जमली होती. उघड्या मोटरीतून अमानुल्लाबरोबर सरय्या जेव्हा जात होती तेव्हा सगळ्यांचे लक्ष होते सरय्याच्या चेहऱ्याकडे! तिनं बुरखा घातला होता. पण हा बुरखा वेगळाच होता. या कानापासून, नाकावरून, त्या कानापर्यंत असा चेहऱ्यावरून आडवा घेतलेला बुरखा झिरझिरीत कापडाचा होता. तेवढाच का होईना पण बुरखा सरय्यानं घेतला होताच. चेहरा अगदीच उघडा टाकला नव्हता. अफगाणिस्थानच्या लोकांना बरं वाटलं.

युरोपच्या दौऱ्यानंतर अमानुल्ला आणि सरय्या यांची दृष्टीच फाकली. स्वतंत्रतेच्या कक्षा किती रुंद असतात हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलं. सामाजिक सुधारणा, आधुनिक

कायदे, आधुनिक यंत्रे, आधुनिक तत्त्वविचार, आधुनिक जीवन, एवढंच काय, व्यक्तीच्या जीवनाच्या, राष्ट्राच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणारी आधुनिकता, हे सगळं पाहून, दुप्पट उत्साहानं, अट्टाहासानं दोघं कामाला लागले. त्यांच्यामध्ये झपाटलेपणा आला, घाई आली.

अफगाणिस्थानमध्ये आर्थिक ऊर्जितावस्था आणायची असेल तर बाहेरच्या जगाशी संबंध वाढवले पाहिजेत, व्यापार वाढवला पाहिजे, हे अमानुल्ला ओळखून होता. म्हणून त्याने अफगाणिस्थानात रेल्वे आणायची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आखली. इराण आणि हिंदुस्थानला रेल्वेने जोडण्याची योजना आखली गेली. अफगाणिस्थानातून आडव्या जाणाऱ्या हिंदुकुश पर्वताचा दुर्गमपणा लक्षात घेता, या रेल्वेसाठी अतोनात पैसा लागणार होता. परंतु फ्रान्स आणि जर्मनी थोडीशी मदत द्यायला तयार झाले होते. सुरुवातीला तर ब्रिटिशांनाही ही कल्पना आकर्षक वाटत होती. रेल्वे आली असती तर खैबर खिंड दर वेळी ओलांडत बसण्याचा केवढा तरी व्याप वाचला असता, आणि व्यापाराच्या दृष्टीने रेल्वे असणं ब्रिटिशांना खूप फायद्याचंही होतं.

परंतु जेव्हा ती योजना पक्के रूप घेऊ लागली तेव्हा ब्रिटिशांच्या लक्षात आले की जर ही रेल्वे तयार झाली तर रशिया–अफगाणिस्थान सीमेवरचे ( उत्तर–पश्चिम ) ' कुश्क ' हे रशियन रेल्वेस्टेशन, या अफगाणरेल्वेलाइनवरच येणार होते. मग रशियाला अफगाणिस्थानात शिरकाव करून घेणे फारच सोपे जाणार होते. रशियाबद्दल वाटणाऱ्या भीतीमुळे ही गोष्ट ब्रिटिशांना कदापि व्हायला नको होती. त्यांनी अमानुल्लाच्या या रेल्वे आणण्याच्या बेतात अनंत अडथळे उभे केले.

अजूनही अफगाणिस्थानात रेल्वे आलेली नाही. १८७२ सालापासून दर ५–१० वर्षांनी अफगाणिस्थानात रेल्वे आणायचे बेत, योजना केल्या जातात, पण वेगवेगळ्या घटकांना, आपापल्या सोयीसाठी अफगाणिस्थानात रेल्वे येणं नको आहे; म्हणून तिथे रेल्वे येत नाही.

अमानुल्लाने अत्यंत हौशीनं आणि फार मोठ्या हुरूपाने युरोपहून मागवलेले, मीटर-गेजचं रेल्वेइंजिन आणि तीन डबे काबूल शहराच्या वेशीबाहेर अजूनही पाहायला मिळतात. रूळ मात्र मातीमध्ये बुजून गेले आहेत.

सरय्यानं आपल्या एका लेखात म्हटलं होतं की, आपल्या अजूबाजूचं सगळं जग पुढं धावत असताना, आपण पूर्वी होतो तिथेच अट्टाहासाने उभे राहिलो तर ते आपलं सगळ्यात मोठं नुकसान ठरेल. मानवी संस्कृतीच्या वाटचालीमध्ये स्त्रियांचा अर्धा वाटा असताना, त्यांना जर आपण अशिक्षित, अडाणी ठेवलं, पडद्याआड बंद करून ठेवलं तर मानवजातीचंचे नुकसान होईल. जर आपल्या बायकांना आपण पडदा पाळायची सक्ती केली तर पुढे अशी वेळ येईल की, आपल्याच बायका पाश्चात्यांचं एवढं अनुकरण करतील की अगदी दुसरं टोक गाठलं जाईल. पण त्याबरोबरच शैक्षणिक

क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात जी सुधारणा व्हायला हवी ती झाली नाही तर फक्त आचार तेवढाच बदलेल.

१९२८ मधलं सरय्याचं हे भाकित अगदी तंतोतंत खरं ठरलं आहे. पन्नास वर्षांनंतर!

अमानुल्लानं आतापर्यंत तरी बुरख्याविरुद्धचा कायदा केला नव्हता. फक्त प्रचार सुरू होता. पण युरोपहून परत आल्यानंतर, १९२८ मध्ये 'लोया जिरगा' पार्लमेन्ट भरवून, सरकारी अधिकाऱ्यांनी फक्त एकच लग्न केलं पाहिजे, आणि लग्नासाठी मुलीच्या बापाला फक्त २९ अफगाणी रुपये द्यावेत, असा फतवा काढला. हा हुकूम मात्र कुणालाच पसंत पडला नाही. कारण चार लग्नं करणं, मुलीसाठी जास्तीतजास्त पैशाचा व्यवहार करणं या प्रतिष्ठेच्या गोष्टी मानल्या जात होत्या.

त्यानंतर अमानुल्लाने एकशेपाच मुलांना तांत्रिक शिक्षणासाठी तुर्कस्तानला पाठवलं तेव्हा पंधरा मुलींनाही पाठवलं.

१९२८ च्या ऑक्टोबर महिन्यात भरलेल्या लोया जिरगाच्या, पार्लमेन्टच्या सभेमध्ये सरय्यानं मध्येच उठून, मोठ्या नाट्यमय रीतीनं आपल्या चेहऱ्यावरचा बुरखा काढून टाकला. तिच्या पाठोपाठ इतर सरकारी, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या बायकांनीही आपापले बुरखे काढून टाकले. अफगाणिस्थानच्या इतिहासात प्रथमच, बुरखा न घेतलेल्या स्त्रिया समाजामध्ये दिसत होत्या.

आपल्या नवऱ्याविरुद्ध, सासूविरुद्ध, बापाविरुद्ध, गाऱ्हाणी मांडण्यासाठी, बायकांवर होणाऱ्या अत्याचारांबद्दल चौकशी करून न्यायनिवाडा करण्यासाठी सरय्याने एक खास न्यायालय बायकांसाठी स्थापन केले. पुरुषांच्या भीतीने बायका तिथे जाणार नाहीत म्हणून म्हाताऱ्या बायकांना काबूलमधल्या घरा-घरांत शिरून कोणत्या बाईवर कुठे अत्याचार होत नाहीत ना, याची चौकशी करण्याचे खास अधिकार त्यांना दिले. सर्व-अफगाण स्त्रियांमध्ये नव्या जाणीवा निर्माण झाल्या, नवे धारिष्ट्य आले. सर्व-साधारण घरातल्या बायकाही बुरखा फेकून देण्याची हिंमत दाखवू लागल्या. कारण आता त्यांना सरकारी रक्षण मिळाले होते. एका बाईने आपला नवरा, सासू आपल्याला छळते म्हणून खास न्यायालयाकडे तक्रार नेली. तेव्हा तिच्या नवऱ्याने तिला मारून, तुकडे करून रस्त्यावर टाकले. तिच्या नवऱ्याला शिक्षा झाली, पण स्त्रियांच्या हक्कांसाठी हा संघर्ष पाहून सगळ्याच अफगाण बायका हादरल्या.

## एका स्वप्नाचा शेवट

हळूहळू अमानुल्ला सरय्याविरुद्धचे जनमत वाढू लागले. सामाजिक सुधारणांच्या विरुद्ध असलेल्या मुल्लामौलवींनी टोळीवाल्यांनाच भडकवायला सुरुवात केली. इस्लाम संकटात आहे. तुमच्या मुलींना बुरखा न घालता शाळेत जाऊन फिरंग्यांचं ज्ञान शिकावं लागेल.

कुराणानं तुम्हाला दिलेले अधिकार अमानुल्ला काढून घेत आहे. सरय्या ही वाईट बाई आहे. तुमच्या बायकांनाही ती तशीच वाईट चालीची करणार आहे. तुमच्या मुलांना जबरदस्तीने तुमच्यापासून ओढून स्वतःच्या सैन्यात भरती करते आहे. वगैरे गोष्टी सांगून टोळीवाल्यांना चिथावणी मिळू लागली. त्याच वेळी अफगाणिस्थानातल्या शहरांतून, गावांतून, डोंगरदऱ्यांमधून, जिथं जिथं माणसं राहात होती तिथं तिथं विमानातून सरय्याचे युरोपमधले फोटो टाकले गेले. लोकांमधून वाटले गेले. एक फोटो तर उघड्यावाघड्या सरय्याचा होता. पण हा फोटो खरा नाही याची शहरवासीयांची खात्री होती. कारण फोटोतली बाई नाचताना दिसत होती. ते पाहून लोक म्हणाले, "कोणत्या तरी नाचणाऱ्या बाईच्या शरीरावर सरय्याचे डोके चिकटवलेले दिसत आहे. आणि फोटोग्राफीमध्ये एवढी सुधारणा फक्त ब्रिटिशांमध्येच झाली आहे. तेव्हा ही फोटोंची फसवणूक ब्रिटिश मुद्दामहून करीत आहेत. आमच्या लोकांना सरय्या अमानुल्लाविरुद्ध भडकविण्यासाठी हा उद्योग ब्रिटिशांनीच केलेला आहे!"

पण टोळीवाल्यांचा त्या फोटोंवर लगेच विश्वास बसला.

अमानुल्लाविरुद्ध उठलेल्या लोकांची पहिली मागणी होती की, त्याने सरय्याला घटस्फोट दिला पाहिजे. त्याशिवाय परराष्ट्रमंत्री महंमद तरझी—सरय्याचे वडील, त्यांना तुरुंगात टाकायला हवे. त्याच्या कुटुंबियांना हद्दपार करावे, पडदापद्धती पुन्हा चालू करावी, पाश्चात्य कपडे घालायची सक्ती होऊ नये, मुलींच्या शाळा बंद कराव्या, तुर्कस्तानला पाठवलेल्या मुलींना परत बोलवावे, नवीन कायदे बंद करून पुन्हा इस्लामी कायदे चालू करावे, मुल्लांना सरकारी अधिकाऱ्यांच्या जागा द्याव्यात; कर कमी करावेत, अशा तऱ्हेच्या त्यांच्या खूप मागण्या होत्या.

सरय्याबद्दल आपल्या लोकांना वाटणारा द्वेष पाहून अमानुल्लाला धक्काच बसला! सरय्याला तलाक द्यायचा? जिच्या बरोबरीनं एवढी वर्षं काम केलं, प्रत्येक गोष्टीत जिची अनमोल मदत झाली, जिच्या मदतीनं हा एवढा प्रचंड खटाटोप केला, तिला तलाक द्यायचा? ज्या गोष्टी केल्या त्या याच लोकांच्या भल्यासाठी केल्या ना? आपल्या देशाला बलवान करण्यासाठी, जगातल्या कुठल्याही देशाच्या बरोबरीनं आणण्यासाठीच केला ना एवढा खटटोप? आणि त्याचं हे फळ? जिच्यामुळं या गोष्टी करणं शक्य झालं, तिलाच घटस्फोट द्यायचा?

अमानुल्ला चक्रावूनच गेला! ज्या लोकांवर एवढं जिवापाड प्रेम केलं, ज्यांच्या कल्याणासाठी झगडलो त्यांनी मला हाच न्याय द्यावा का?

याच सुमारास बचाई साकाव (या शब्दाचा शब्दशः अर्थ पाणक्याचा मुलगा) हा अतिशय अशिक्षित, वाटमार, दरवडेखोर माणूस बराच त्रास देऊ लागला होता. अमानुल्लानं त्याच्या बंदोबस्ताचा प्रयत्न सुरू करताच अगोदरच अमानुल्लाच्या विरुद्ध उठलेले लोक बच्च्याला मिळाले. डोंगरकपारीतून राहणाऱ्या टोळीवाल्यांनी, मुल्ला-मौलवींनी त्याला आपला पाठिंबा दिला, आणि अमानुल्लाविरुद्ध जेहादची हाक

दिली. बच्च्याची शक्ती वाढू लागली. त्याने काबूलवर पहिला हल्ला चढवल्यावर अमानुल्लाने सरय्याला, नूर-उस्-सिराज, कुब्राजान या बहिणींना, उल्या हजरत, सरय्याची बहीण काकाब यांना मुलाबाळांसकट कंदाहारला पाठवून दिले. सरय्याने अत्यंत मेहनतीने चालू केलेल्या मुलींच्या शाळा नुसत्याच बंद केल्या नाहीत तर शाळेचं मुद्दामहून बनवून घेतलेलं फर्निचर लिलावात काढून विकून टाकलं! तुर्कस्तानात शिकणाऱ्या मुलींना परत बोलावलं. पाश्चात्य कपडे वापरण्याची सक्ती काढून घेतली. सरय्यासकट सर्व बायकांनी बुरखा वापरलाच पाहिजे असा जाहीरनामा काढला. मुल्लामौलवींचे जुने सगळे अधिकार त्यांना परत दिले. स्वतः चालू केलेला निजामनामा रद्द करून, पुन्हा एकदा इस्लामी कायदेकानू चालू केले.

नव्या जाणीवांचं, स्वतःच्या हातांनी लावलेलं, सरय्यानं खतपाणी घातलेलं ते रोपटं अमानुल्लानं स्वतःच्याच हातानं उपटून टाकलं! कंदाहारला गेलेली सरय्या बुरखा घालून मुद्दामहून लोकांनी पाहावं म्हणून हिंडूफिरू लागली. लोकांच्या लक्षात येईल अशा पद्धतीनं दिवसातून पाच वेळा नमाज पढू लागली. "पाच वेळा नमाज पढला म्हणजेच कोणी सच्चा मुसलमान होतो असं नव्हे, त्यापेक्षा लोकांनी काम जास्त करावं, आधुनिक ज्ञान मिळवावं," असे म्हणणारा अमानुल्ला स्वतः दिवसातून पाच वेळा नमाज पढू लागला! आपल्याला कोणी 'काफर' म्हणू नये एवढीच त्यांची इच्छा होती.

तरीसुद्धा लोकांचं समाधान झालं नाही. काबूलमधलं वातावरण बिघडतच चाललं होतं, तापत चाललं होतं. लोकांना खुश करण्यासाठी त्याने आपल्या एका चुलत-बहिणीशी, जुन्या रिवाजाप्रमाणे दुसरं लग्न केलं. तरीही लोकांचा अमानुल्लावरचा राग कमी झाला नाही.

बच्चा पुन्हा पुन्हा काबूलवर हल्ले चढवीत होता. गनिमी काव्यानं लढणाऱ्या बच्च्याशी लढणं अमानुल्लाला कठीण जात होतं; आणि शिवाय ही लढाई चालू ठेवणं म्हणजे आपलेच लोक लढाईत मरत राहणं. शेवटी १९२९ च्या मे महिन्यातल्या २२ तारखेला पहाटे दोन वाजता, अमानुल्लानं गुपचूपपणाने काबूल सोडलं! त्याला वाटले, बच्चा, टोळीवाले, मुल्लामौलवी हे सगळे व्यक्तिशः माझ्या विरुद्ध उठलेले आहेत. मीच निघून गेलो तर निदान हा झगडा तरी लौकर मिटेल; आणि बच्च्याला हाताशी धरून पुन्हा एकदा इंग्रजांचा अफगाणिस्थानच्या राजकारणात शिरकाव होणार नाही. त्याची खात्री होती की, हा सगळा बनाव ब्रिटिशांच्या चिथावणीमुळेच झालेला आहे. त्यांच्या मदतीनेच बच्चा, टोळीवाले लढत आहेत. अर्थातच तसं वाटण्याची कारणेही अगदी सबळ होती. अमानुल्लाला वाटत होतं, एकदा हे वादळ शमलं की माझे लोकच मला परत बोलावतील.

अमानुल्ला रात्रीच्या वेळी प्रवास करीत, खुद्द बच्चा त्याच्या मागावर असताना, त्याला चुकवीत, लपतछपत कंदाहारला जाऊन पोचला. तिथे त्याने आपल्याभोवती फौज गोळा करून बच्च्याशी मुकाबला करण्याची तयारी चालवली. पण त्यामध्ये त्याला

यश आले नाही. अफगाणिस्थानबद्दलची केवढी तरी भव्यदिव्य स्वप्नं रंगवणारे, त्यासाठी झगडणारे अमानुल्ला सरय्या ही दोघं, त्यांच्या माघारी, स्वप्नांचे सगळे किल्ले तिकडे काबूल-मध्ये ढासळत असताना, आपला कुटुंबकबिला घेऊन अफगाणिस्थानातून गुपचूपपणानं बाहेर पडले. आता जायचं कुठं हा मोठा प्रश्न होता त्यांच्यासमोर.

ब्रिटिशांचे वर्चस्व पूर्वीच झुगारून दिल्यामुळे, ब्रिटिश सरकारनं अमानुल्लाला हिंदुस्थानात थारा देण्यास नकार दिला. आतापर्यंत अफगाणिस्थानातून परागंदा झालेल्या कित्येक शाही लोकांना ब्रिटिशांनी पेन्शन देऊन हिंदुस्थानात ठेवून घेतले होते. पण अमानुल्लाचा त्यांना पुढे कसलाही उपयोग करून घ्यायचा नव्हता, म्हणून अमानुल्लाला ठेवून घ्यायला ब्रिटिश सरकार तयार नव्हते.

आपल्या कर्तृत्वाने सगळ्या मुस्लिम जगात लोकप्रिय झालेल्या, आपल्या वागण्याने, मिठास वाणीने सबंध युरोपमध्ये आवडत्या झालेल्या, एके काळच्या या राजा-राणीला कुठेच आसरा मिळेना. अमानुल्लाला ठेवून घेतलं तर ब्रिटिशांचा रोष ओढवेल म्हणून मुस्लिम जगातलं एकही राष्ट्र अमानुल्ला सरय्याला ठेवून घ्यायला तयार होईना! ब्रिटिशांची दुष्मनी कोण पत्करणार? कुठे जावे हे त्यांना कळेना. त्या वेळी अमानुल्ला आपल्या नशिबाच्या नावाने खडे न फोडता म्हणाला, "मी काही पूर्वीच्या इराणच्या शहासारखा वाया गेलेला राजा नाही. माझ्या लोकांच्या कल्याणासाठी मी रात्रंदिवस झगडलो. म्हणूनच आता माझ्या पडत्या काळात मला एकच समाधान आहे, की मी कधी गैर गोष्ट एकही केली नाही. सतत माझ्या लोकांच्याच कल्याणाचा विचार मी करीत होतो. रशियाच्या झारप्रमाणे मला माझ्या कुटुंबियांबरोबर मारून टाकलं नाही हेच माझं दुःख आहे. आणि आता मला कुठे कुठे भटकत राहावं लागणार आहे कुणास ठाऊक!"

अशा वेळी अमानुल्लाचा मित्र इटलीचा राजा व्हिक्टोरियो इम्यॅनुअल यानं त्यांना आसरा दिला. रोममधला एक प्रासाद त्यांना राहायला दिला. इनायतुल्ला—अमानुल्लाचा मोठा भाऊ—यालाच राज्यावर बसवून अमानुल्लाने काबूल सोडले होते. पण इनायतुल्लालाही आठ दिवसांत काबूल सोडावेच लागले होते. इनायतुल्ला, काकाब आपल्या मुलांना घेऊन इराणमध्ये राहू लागले. उल्या हजरत, मोहंमद तरझी इस्तंबूलला गेले. रोमला आल्याबरोबर अमानुल्लाने आपल्या दुसऱ्या बायकोला घटस्फोट देऊन तिने दुसरे लग्न करावे अशी विनंती केली; पण अलियाने दुसरे लग्न केले नाही.

अमानुल्ला, सरय्या रोममध्ये अतिशय कष्टाचं, गरीबीचं जीवन जगू लागले. आपल्या वतनवर अतोनात प्रेम केलेल्या या शाही जोडप्याने तुटलेपणाचं अत्यंत एकलकोंडं जीवन व्यतीत केलं. शेवटपर्यंत त्यांना आशा होती की, आज नाही उद्या सगळे काही स्थिरस्थावर झाल्यावर, वातावरण निवळल्यावर, आपल्या लोकांना आपली किंमत कळेल, आणि ते लोक पुन्हा आपल्याला परत बोलावून घेतील!

अमानुल्लानंतर, बच्च्याचा पराभव ब्रिटिशांच्या मदतीने करून, त्याच्याच चुलत घराण्यातील लोकांचे राज्य सुरू झाले होते. त्यांनी अमानुल्लाला भेटण्याची लोकांवर बंदी घातली होती. पुढे बरेच वर्षांनी ही बंदी काढण्यात आली. अमानुल्ला अत्यंत हलाखीत दिवस काढतोय ही बातमी कळल्यावर अफगाण सरकारने–जाहीरशहाने अमानुल्लाला थोडीशी पेन्शन पाठवायला सुरुवात केली. फक्त राज्य करण्याचंच शिक्षण घेतलेल्या या अमीरला दुसरं काहीही करता येत नव्हतं. हौस म्हणून शिकलेलं सुतारकाम तो करत असे. टेबल खुर्च्या तयार करून विकत असे. थोडा तरी पैसा मिळायचा, शिवाय सतत एकच विचार करणाऱ्या डोक्याला जरा दुसरं व्यवधान मिळत असे.

आता अधूनमधून कोणी तरी अफगाण मुद्दाम येऊन भेटत असे. अशाच एका वेळी त्यांचा एक दूरचा नातलग त्यांना भेटायला आला होता. नेहमीप्रमाणेच अमानुल्लाचा पहिला प्रश्न होता, “ माझे अफगाण लोक कसे आहेत ? ”

तो माणूस पाय पुसण्याला पाय पुसून सरय्याच्या खोलीत जाऊ लागला तेव्हा सरय्या त्याला म्हणाली, “ अरे, अरे, तुझे पाय पुसू नकोस. तुझ्या पायाला लागलेली अफगाणिस्तानची माती माझ्या घरात येऊ दे.”

रात्री-बेरात्री उठून अमानुल्ला तासन्तास विचार करीत बसायचा. स्वतःशीच बोलत बसायचा. आपल्या देशावर, आपल्या लोकांवर अपरंपार प्रेम केलेला हा परांगदा झालेला अमीर अमानुल्ला, एकतीस वर्षांच्या निर्वासितपणानंतर, लिव्हरच्या दुखण्याने, स्वित्झर्लंडमध्ये, अगदी अलीकडे, म्हणजे १९६० साली मरण पावला. तोपर्यंत अफगाणिस्थानातले वातावरणही चांगलेच निवळले होते. इटालियन सरकारने शाही इतमामाने, खास विमानातून अमानुल्लाचे शव अफगाणिस्थानात पाठवले. जलालाबादमध्ये त्याच्या शवपेटीला खांदा देणाऱ्या त्याच्या चुलतभावांना, सावत्र-भावांना बाजूला सारून, ज्या शिनवारी टोळीवाल्यांनी अमानुल्लाला परांगदा व्हायला लावले होते, त्यांनीच शेवटी त्याला खांदा दिला. आपल्या लाडक्या अफगाणिस्थानच्या मातीतच मिळून जायची त्याची इच्छा पुरी झाली !

सरय्या १९६८ साली रोममध्ये मरण पावली. पुन्हा एकदा इटालियन सरकारने शाही इतमामाने, खास सैनिकी विमानातून तिचे शव काबूलला पाठवले. विमान-तळावर आणि नंतर जलालाबादच्या कबरस्थानात टोळीवाल्यांनी खूप गर्दी केली होती. अफगाण सरकारला काळजी वाटत होती की, हे लोक काही दंगा वगैरे तर करणार नाहीत ! पण टोळीवाल्यांनी तिच्या शवपेटीला मानवंदना दिली. एका मुल्लाने तर उत्स्फूर्तपणाने तिची, तिच्या कामाची तारीफ करणारे भाषणच केले ! शाही खान-दानातल्या बायका तिच्या दफनविधीसाठी कबरस्थानात आल्या होत्या ! पूर्वी असं कधीही झालं नव्हतं ! अमानुल्लाशेजारीच सरय्याचे दफन करून लोक निघून गेले.

आणि त्यानंतर नखशिखान्त काळा बुरखा घातलेल्या काही अफगाण बायका, मुकाट्यानं तिथं आल्या आणि त्यांनी सरय्याच्या ओल्या कबरीवर फुलं वाहिली ! आपल्या

बुरख्याच्या डोळ्यांसमोरच्या जाळीतून टकाटका पाहात राहिल्या. याच त्यांच्या राणीनं त्यांच्यासमोर नव्या जगाचा दरवाजा उघडला होता. त्यांच्या नजरेसमोर नवीन क्षितिजं आणली होती. पण त्या कशाचाच उपयोग झाला नव्हता. त्या राणीलाच परांगदा व्हावं लागलं होतं, आणि तिच्या कबरीवर फुलं वाहण्यासाठी त्या बायकांना बुरखे घालूनच, कोणालाही नकळत, असं मुकाट्यानं यावं लागलं होतं !

## बच्च्याची कारकीर्द

अमानुल्लानंतर बचा फक्त नऊ महिनेच सत्तेवर राहिला. हा एक अफलातूनच मनुष्यप्राणी होता ! पाणक्याचा हा मुलगा लहानपणी कुणाचा हातपाय मोडून ठेव, लिहायवाचायला शिकवणाऱ्या मौलवीची पगडी बंदुकीच्या गोळीनं अचूक नेम मारून उडवून लाव, जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंना मारामारी करून लुबाड, असले 'खेळ' खेळत असे.

बच्चा मोठा झाल्यावर अमानुल्लाच्या सैन्यात भरती झाला. नवीन तंत्रानं शिकवणाऱ्या आपल्या वरिष्ठांची सतत टिंगलटवाळी करण्यात, कायदे मोडण्यात हा धन्यता मानत असे. पण तो अत्यंत शूर होता, धाडसी होता. पक्का नेमबाज होता. खोस्तभागातलं बंड मोडलं तेव्हा हा अमानुल्लाच्या बाजूने लढला होता, आणि सरय्याकडून याने रेशमी रुमालातली सोन्याची नाणी, बक्षीस म्हणून घेतली होती ! पण याचे फौजेत पटणे शक्यच नव्हते. शेवटी अमानुल्लानेच याच्या विध्वंसक कारवायांना कंटाळून त्याला आपल्या फौजेतून काढून टाकले होते.

मग त्याने ब्रिटिश हिंदुस्थानातून चहा आणून अफगाणिस्थानात विकायला सुरुवात केली. त्या वेळी त्याची खैबर खिंड, खोस्त भागातल्या टोळीवाल्यांशी, दरवडे-खोरांशी चांगलीच मैत्री जमली होती. चहाचा धंदा सोडून मग त्याने सरळ सरळ बंदुका, दारुगोळ्याचा चोरटा व्यापर सुरू केला. पण त्यामध्ये भरपूर नुकसान झाल्यावर त्याने स्वतःच वाटमारीचा धंदा चालू केला, दरवडे घालू लागला. हे प्रकरण वाढता वाढता, अमानुल्लाच्या गव्हर्नरांना पळवून नेणं, सरकारी खजिना लुटणं, इथपर्यंत पोचलं. अमानुल्लाने वाटाघाटीने प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला. पण त्याच वेळी अमानुल्लाच्या सुधारणावादी कायद्यांमुळे खवळलेले, ब्रिटिशांनी चिथावलेले लोकही बच्च्याला मिळाले होते.

सत्तेवर आल्यानंतर बच्च्याने आपल्या नावाची भयंकर दहशत निर्माण केली. अमानुल्लाच्या बाजूला सरदारांना, लोकांना, जमीनदारांना, फौजेतल्या शिपायांना, काबूलमधल्या सर्वसामान्य माणसांनाही बच्च्याने मारून टाकण्याचा सपाटा लावला. बच्च्यासारखा एक अतिसर्वसामान्य माणूस, एका पाणक्याचा मुलगा सत्ताधीश झाला म्हणून सुरुवातीला काही दिवस सोव्हिएट रशियाला बच्च्याबद्दल बरीच आत्मीयता,

उत्सुकता वाटत होती. पण त्याचा अडाणीपणा पाहून रशियाने नंतर बच्च्याशी संबंधच ठेवला नाही. ब्रिटिशांनी मात्र बच्च्याला भरपूर पैसा, दारुगोळा, बंदुकींचा सतत पुरवठा केला होता. त्याच्या बदल्यात त्याने एवढ्या लुटालुटीच्या कारकिर्दीत, लढाईत, ब्रिटिशांना हात लावला नव्हता, आणि काबूलमधल्या ज्या व्यापाऱ्यांनी, त्याला त्याने मागेल तेवढा पैसा दिला होता, त्यांनाही हात लावला नव्हता.

पहिल्या महायुद्धात सगळ्या अरबांना तुर्कांच्या विरुद्ध चिथावून ब्रिटिशांच्या बाजूने करून घेण्यामध्ये फार महत्त्वाची कामगिरी बजावणारा 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' त्याच काळात 'मिरानशहा' या अफगाणिस्थानापासून ब्रिटिश हद्दीमध्ये अवघ्या पंधरा मैलांवर असलेल्या सैनिकी विमानतळावर नोकरीला होता. अमानुल्लाला उलथून टाकण्यासाठी, लोकांना चिथावण्याचे, बच्च्याला मदत पोचवण्याचे काम याच लॉरेन्सने केले, अशा अतिशय दाट अफवा त्या वेळी त्या भागात पसरल्या होत्या.

लढाई संपल्यानंतर पुढची बोलणी करण्यासाठी काबूलमधल्या रेसिडेन्टने बच्च्याला ब्रिटिश रेसिडेन्सीत, बालाहिसार या किल्ल्यात मेजवानीसाठी बोलावले. "गरिबांचा कैवारी", "दुष्टांचा कर्दनकाळ" अशी प्रसिद्धी दिलेल्या बच्च्याला प्रत्यक्ष पाहून रेसिडेन्ट-बहादूर मनात चरकलेच. कारण बच्चा अत्यंत गावंढळ, उग्र होता. जेवत असताना मटण खाऊन हातात उरलेल्या हाडांचे तुकडे बाजूला ठेवण्याऐवजी त्याने शेजारच्या खिडकीतून बाहेर फेकायला सुरुवात केली. हाडं खिडकीतून सरळ बाहेर न जाता, कशावर तरी आपटून आतच पडत असलेली पाहून त्याला खूप आश्चर्यच वाटलं! गंमतच वाटली. खिडकीच्या दारांची काच ही वस्तू त्याला माहीतच नव्हती! बराच वेळ मग तो हा खेळ खेळत बसला होता. बच्च्याचा हा सगळा एकंदर अवतार, लोकांच्या मनात असलेल्या त्याच्याबद्दलच्या अद्भुत कल्पना, की त्याला बंदुकीची गोळी मारली तरी, किंवा सुऱ्यानं भोसकलं तरी तो मरत नाही; आणि म्हणूनच त्याच्याबद्दल लोकांना वाटणारी धास्ती, यांनी ब्रिटिशांना चिंता पडली की, आता यापुढे कसे व्हायचे?

पण त्यांचा हा प्रश्न त्यांनीच सोडवला.

अमीर अमानुल्लाच्या चुलत घराण्यातील, आणि अमानुल्लाच्याच आर्मीतला एक जनरल, नादीरखान, याला ब्रिटिशांनी हाताशी धरले, आणि बच्च्याला पकडले. त्याच्यावर देशद्रोहाचा खटला नादीरखानने चालवला आणि त्याला मृत्युदंडाची शिक्षा दिली! गोळी घालण्याअगोदर त्याला सांगितले, "मरण्याच्या अगोदर तुला नमाज पढून, अल्लाची क्षमा मागायची असेल तर माग." तेव्हा बच्चा उद्गारला, "माझा अल्लावर मुळीसुद्धा विश्वास नाही. तेव्हा मी न केलेल्या पापांबद्दल क्षमा कसली मागणार?"

"तुझी शेवटची इच्छा सांग." त्याला पुन्हा सांगितले गेले.

"मला मारण्याचा कार्यक्रम इतका कंटाळवाणा करू नका. मला वैताग

आलाय. झटकन गोळी घालून रिकामे व्हा." बच्च्याचं वाक्य संपेपर्यंत बच्च्या खाली कोसळला होता. अशा तऱ्हेने अमानुल्ला प्रकरणावर संपूर्णपणे पडदा पडला. अफगाणिस्थानच्या इतिहासातले एक सोनेरी पर्व संपले!

जर अमानुल्लाला परांगदा व्हावं लागलं नसतं तर?

तर अफगाणिस्थानचा पुढचा सगळा इतिहासच बदलला असता. पण तसे व्हायचेच नव्हते. कारण १९१९ ते १९२९ या दहा वर्षांत अमानुल्लाने अफगाणिस्थानात सत्तेवर असणे ही एक कालविपरीत घटना होती. खरं म्हणजे आज जरी अमानुल्लाच्या विचारसरणीचा माणूस अफगाणिस्थानात सत्तेवर असता तरी ती-सुद्धा कालविपरीत गोष्टच ठरली असती. नव्हे तशी ती ठरली आहे. तराकी–अमीन राजवटीला ज्या तऱ्हेनं विरोधाची सुरुवात झाली त्यावरून ही गोष्ट सिद्धच झाली आहे. अमानुल्लाला सत्तेवरून हटविण्यामध्ये जेवढे डावपेच इंग्रजांनी खेळले होते, तेवढेच मुल्लामौलवीही त्याला जबाबदार होते. अफगाणिस्थानातले मुल्लामौलवी पराकोटीचे कर्मठ, आणि बहुसंख्य समाज अत्यंत मागासलेला असल्यामुळे कर्मठपणाएवढेच ते प्रबळही आहेत. त्यांना दुखावून, त्यांना डावलून अजूनपर्यंत तरी कोणीही सत्तेवर राहू शकलेला नाही. अमानुल्लासारख्या लोकप्रिय, लाडक्या अमीरालासुद्धा त्यांनी दे माय धरणी ठाय करून सोडले!

त्या वेळी सोव्हिएट रशियाने अमानुल्लाला पैसा, लढाऊ विमानं देऊ केली होती. पण अमानुल्लाने ही मदत नाकारली होती. त्याचे म्हणणे होते, "परक्यांच्याकडून शस्त्रास्त्रे घेऊन मी माझ्याच लोकांना मारू? गुन्हा ठरेल तो!"

ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे...

४

## रशियाचे पहिले आक्रमण

नादीरखान शहा झाल्यानंतर वर्षभरातच अफगाण सीमेवरच्या दक्षिण रशियामध्ये मुस्लिम बंडखोरांच्या कारवाया पुन्हा सुरू झाल्या. त्यांच्या पाठलागावर असलेल्या रशियन सेना अमू नदी ओलांडून अफगाणिस्थानच्या आत चाळीस मैल घुसल्या होत्या. नादीरशहाने आपले सैन्य पाठवून मुस्लिम बंडखोर आणि रशियन सैन्य, दोघांनाही अमू नदीपलीकडे हाकलून दिले!

अमानुल्ला राजवटीचा आकस्मिकपणे झालेला शेवट, नंतरच्या बच्च्यासारख्या माणसाचा अल्पजीवी कारभार, त्यानंतर सत्तेवर आलेल्या नादीरशहाने विस्कळित होत चाललेल्या अफगाणिस्थानवर आपली जरब बसवण्यासाठी अतिशय कडक हुकुमत चालू केली. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. नव्या जगाशी संबंध जोडू पाहणारा, अमानुल्ला आणि त्याबरोबरच तरझीभोवती जमलेला, उदयाला येत असलेला सुशिक्षित, उदारमतवादी, सुधारणावादी, बुद्धीजीवी मध्यमवर्ग नामशेष होण्याच्या पंथाला लागला.

तीन वर्षांनंतर, अमानुल्लाशी इमान राखणाऱ्या एकाने, एका समारंभामध्ये, गोळी घालून नादीरशहाचा खून केला. ज्या जुलमी नादीरशाही राजवटीबद्दल आजच्या सोशॅलिस्ट अफगाणिस्थानचे सत्ताधीश बोलतात, तोच हा नादीरशहा.

नादीरशहानंतर त्याचा एकोणीस वर्षांचा मुलगा जाहीर हा शहा झाला, पण खरी सत्ता त्याचे तिघे काका, शहावली, मोहम्मद हाशीम, शाह मुहम्मद यांच्याच हातांत होती.

त्यांनी ब्रिटिश हिंदुस्थान, इराण, रशिया यांच्याबरोबर व्यापारी करार करून व्यापाराला सुरुवात केली. त्यातून मिळालेल्या पैशांनी अफगाणिस्थानात प्रथमच कापड, साबण, काडेपेट्या, कातडी कमावणे यांचे अगदी छोटे छोटे कारखाने काढले; आणि अफगाणिस्थानात प्रथमच कामगारवर्ग ही नवीनच जात निर्माण झाली. अर्थातच 'कामगार वर्ग' वगैरे म्हणण्याएवढी काही संख्या नव्हतीच. अजूनही नाही. कामगार आणि मालक यांचे जे परंपरागत संबंध असतात तेही इथे तेव्हा मौजुद नव्हते. या दोन-चार, लहानशाच कारखान्यांचे मालक राजघराण्यातील किंवा सरदार घराण्यांतलेच

असल्यामुळे, त्यांचे इतर जसे नोकर असत तसेच, घरच्या कारखान्यात काम करणारे हे नवीन नोकर, एवढेच त्यांचे अस्तित्व होतें.

दुसरे महायुद्ध आणि त्यानंतरही अफगाणिस्थानने आपला तटस्थपणा सातत्याने जपला. महायुद्ध संपल्यानंतर जर्मनीमधून बरेचसे नाझी आणि दक्षिण रशियामधले हजारो तुर्की, कझाक मुस्लिम, सोव्हिएट रशियाच्या जुलुमाला कंटाळून अफगाणिस्थानात पळून आले होते. हिटलरने स्वतःच्या आर्यपणाचा फारच गवगवा केल्यामुळे आणि 'आपण मूळ आर्यांचेच वंशज आहोत' ही अफगाणांची दृढ भावना असल्यामुळे आणि शिवाय ब्रिटिशांचा द्वेष आणि रशियाबद्दल सतत वाटणारा संशय यामुळे अफगाण लोकांना मदत करणारे जर्मनच होते; त्यांच्याबद्दल अफगाणांना प्रेम, विश्वासही वाटायचा. असं असूनही रशियन्स आणि ब्रिटिश यांच्या सततच्या मागणीमुळे जाहीर-शहाने जर्मन नागरिकांना अफगाणिस्थानातून घालवून दिले. तरीसुद्धा किती तरी जर्मन नागरिक लपूनछपून, अफगाणिस्थानात अजूनपर्यंत टिकून राहिले आहेत.

रशियातून बहुसंख्येने पळून आलेल्या मुस्लिमांचा फायदा रशियाने मात्र करून घेतला. त्या निर्वासितांमधून रशियाने आपल्या निवडीच्या ताजिक, उजबेक, तुर्कमन या टोळीवाल्यांना अफगाणिस्थानात पाठवले. त्यांचे काम होते की ताजिक, उजबेकी, तुर्की भाषा बोलणाऱ्या अफगाण लोकांत मिसळून त्यांना अफगाण जमीनदारांविरुद्ध म्हणजेच पर्यायाने अफगाण सरकारविरुद्ध चिथावून, उठाव करायचा. पण रशियाची ही योजना त्यांच्याच अंगावर उलटली. कारण एक भाषा बोलणाऱ्या या लोकांना आपल्या टोळीवाल्यांची बांधिलकी, राजकीय बांधिलकीपेक्षा जास्त मोलाची वाटली. रशियाने पाठवलेल्या लोकांनी अफगाणिस्थानात असंतोष पसरविण्याऐवजी, ते लोक अफगाण लोकांनाच मिळाले; आणि त्यांच्याकडून ऐकलेल्या झारशाहीच्या आणि सोशॅलिस्ट रशियाच्या जुलमाच्या कथा–कहाण्या ऐकून, अफगाण लोकांचा रशिया द्वेष, रशिया-बद्दल वाटणारी भीती आणखीनच गडद झाली. उत्तर अफगाणिस्थानातल्या या टोळी-वाल्यांना कळून चुकले की, काबूलमध्ये शहा आणि रशियाच्यामध्ये नियमितपणाने होणारे मदतीने मैत्रीचे करार आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये फार मोठं अंतर आहे. बळकटपणानं बांधलेलं टोळीजीवन जगणाऱ्यांना दूर तिकडे काबूलमध्ये कोणता शहा कसा राज्यकारभार करतो आहे, यापेक्षा, नदी ओलांडली की पलीकडे राहणाऱ्या आपल्याच टोळी-बांधवांना छळणाऱ्या रशियन राजवटीचा द्वेष जास्त वाटत होता.

रशियन सीमेजवळच्या अफगाण टोळीवाल्यांची मानसिक स्थिती अशी होती, पण खुद्द काबूलमध्ये पाश्चात्य जगाशी संबंध आलेल्या, आधुनिक तत्त्वप्रणालींशी ओळख असलेल्या, शाही घराण्यातीलच काही उदारमतवादी लोकांना मात्र आधुनिक पद्धतीच्या निवडणुका वगैरे हव्या होत्या. स्वतःचे विशेष अधिकार, हक्क त्यांना गमवायचे नव्हते. पण काही सुधारणाही त्यांना हव्या होत्या, निवडणुका व्हाव्यात असे वाटत असे. १९५१ साली शाही पार्लमेन्टमधल्या उदारमतवाद्यांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याचा कायदा

पास करून वेगवेगळ्या मतप्रवाहांना प्रगट होण्याची, त्यावर चर्चा होण्याची मोकळीक करून दिली.

हा कायदा पास झाला आणि रातोरात काबूलमध्ये किती तरी वृत्तपत्रे निघाली. जवळ जवळ सगळ्याच वृत्तपत्रांनी धर्मान्ध मागासलेल्या मुल्लामौलवींच्यावर आणि त्यांच्या पाठिराख्यांवर टीकेची झोड उठवली. खुल्या निवडणुकांची जोरदार मागणी केली. निवडून आलेल्यांतूनच कॅबिनेट बनवले पाहिजे, आणि हे कॅबिनेट संपूर्ण पार्लमेन्टला जबाबदार असले पाहिजे अशी मागणी सुरू झाली. उदारमतवाद्यांनी 'नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी' ही अफगाणिस्थानातली पहिली राजकीय पार्टी याच वेळी स्थापन केली. पाठोपाठ काबूल युनिव्हर्सिटीमधल्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी परिषदेची स्थापना केली. राजकीय सुधारणा, मार्क्सिझम, कॅपिटॅलिझम, नव्या राजकीय जगात इस्लामचे स्थान, सामाजिक, धार्मिक सुधारणा वगैरे सर्व विषयांवर चर्चा होऊ लागल्या. लोकांचे मतपरिवर्तन करण्यात 'अंगार', 'वतन', 'निदा-ई-खल्क' (जनतेचा आवाज) ही वृत्तपत्रे पुढाकार घेत होती. शिवाय काबूल युनिव्हर्सिटीमधले अमेरिकन, भारतीय, युरोपिअन प्रोफेसर्स, विद्यार्थी परिषदेच्या कामकाजात, चर्चेत उत्साहाने भाग घेत असत. एक वर्षाच्या अवधीतच एक नवेच चैतन्यमय वारं काबूलमध्ये वाहू लागलं.

अर्थातच या गोष्टी सरकारला पसंत पडल्या नाहीत. नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी, विद्यार्थी परिषद यांना उतारा म्हणून सरकारनेच एक राजकीय पक्ष काढला, सरकारधार्जिणा असा. सगळ्या सरकारी नोकरांनी त्या पक्षाचे सभासद झाले पाहिजे असा फतवा काढला. तरीही तो पक्ष उभाच राहीना. सरकारवरचे टीकास्त्र मात्र आणखीनच वाढले. शेवटी १९५२ साली म्हणजे वर्षभरातच अफगाण शाही सरकारने वृत्तपत्रांवर, विद्यार्थीपरिषदेवर, नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टीवर बंदी घातली, आणि सगळ्या राजकीय हालचाली बंद पडल्या.

हा सगळा गोंधळ चालू असतानाच, दाऊदखान या जाहीरशहाच्या चुलतभावाने शाह मोहंमदखान या आपल्या पंतप्रधान काकाकडून, १९५३ साली शहाची पंतप्रधानकी काढून स्वतःकडे घेतली.

दाऊदखान पंतप्रधान झाल्यानंतरही जाहीरशहा नावाचाच शहा होता. सगळा कारभार दाऊदखान पाहू लागला. दाऊदखान स्वतः उदारमतवादी, सुधारणावादी असल्यामुळे त्याच्या कारकिर्दीत सोव्हिएट रशियाशी अफगाणिस्थानचे संबंध आणखीच घनिष्ठ होऊ लागले. हिंदुस्थानच्या फाळणीनंतर पख्तुनिस्तानचा प्रश्न हा अफगाणिस्थानच्या जिव्हाळ्याचा प्रश्न झाला होता. दाऊदखानचा तर तो मानबिंदू होता. १९४७ पूर्वी पख्तुनिस्तानचा भाग हा वादग्रस्त भाग होता. ब्रिटिशांनी त्यावर दावा सांगितला होता. तरी अफगाण सरकारचे म्हणणे होते की, आम्हाला न विचारता हा एकतर्फी निर्णय घेतला गेल्यामुळे तो आम्हाला मंजूर नाही. फाळणी झाल्यानंतर तो भाग पाकिस्तानला जोडला गेला होता. तेवढ्याचसाठी पाकिस्तान अफगाणिस्थानच

वितुष्ट आले होते. त्यानंतर पख्तुनिस्तानचा प्रश्न सतत धगधगत राहिला. दाऊदखानच्या त्या बाबतीतल्या कडक धोरणामुळे तो व्यापारी रस्ता बंद झाला. त्यामुळे व्यापारी मार्गासाठी रशियावरचा अवलंबिलेपणा वाढतच राहिला.

रशियामध्ये स्टॅलिन युग जाऊन क्रुश्चेव्ह युग सुरू झाले. सैनिकी शक्तीच्या बळापेक्षा, आर्थिक मदतीच्या बळाने कमकुवत, छोट्या राष्ट्रांना आपल्या अंकित करून घेणं हे जास्त फायद्याचं, जास्त शहाणपणाचं ठरेल अशी क्रुश्चेव्हची दृढ भावना होती. त्याप्रमाणे त्याने धोरण आखले होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पूर्व युरोपीय राष्ट्रांत रशियाला आलेला अनुभव स्फूर्तिदायक होता. क्रुश्चेव्हच्या अफगाण भेटीनंतर अफगाणिस्थानकडे वाहणारा, आर्थिक मदतीचा रशियन ओघ सततच पण हळूहळू प्रमाणात वाढतच राहिला. १९६३ साली एका करारान्वये उत्तर अफगाणिस्थानातल्या 'शिबीरगान' या प्रांतातल्या नैसर्गिक वायू आणि पेट्रोल शुद्धीकरणाच्या संपूर्ण योजनेसाठी रशियाने मदत दिली. त्या बदल्यात अफगाण पेट्रोल रशियामध्ये जाऊन शुद्ध होणार होते. हे शुद्ध झालेले पेट्रोल, अफगाणिस्थान मग रशियाकडून विकत घेणार होते. पुढे जगभरच पेट्रोलचा प्रश्न धगधगू लागल्यावर, आपल्या मालकीचे पेट्रोल असूनदेखील, पेट्रोलच्या बाबतीत रशियाकडून आपण कसे लुबाडले जात आहोत हे सर्वसामान्य अफगाण माणसालादेखील कळू लागले. परंतु पंचवीस वर्षांच्या मुदतीचा हा करार झाल्यामुळे त्या बाबतीत काही बोलताही येत नव्हते.

ज्याचं अन्न खावं, त्याचा वाण नाही पण गुण ते अन्न खाणाऱ्याला लागतो, असे म्हणतात. हे जसं व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे तसेच ते राष्ट्रांच्या बाबतीतही खरे आहे. आर्थिक गरीबी, सामाजिक जीवनातला कमालीचा मागासलेपणा, अशिक्षितपणा, गरीब–श्रीमंतांच्या मधली प्रचंड मोठी दरी, तरुण वर्गातील अस्वस्थता, राजकीय दिशाहीन गोंधळलेपणा, अशी परिस्थिती ज्या देशात असेल तिथे परकीयांचे स्तोम माजायला वेळ लागत नाही. भरपूर आर्थिक मदत देणाऱ्याचा मिंधेपणा तर घेणारे राष्ट्र स्वीकारतेच, पण पाठोपाठ त्याच्या विचारप्रणालीतही फरक पडू लागतो. आणि हे घेणाऱ्याच्या नकळत घडत असते. रशियन यंत्रसामुग्री, तंत्रज्ञ, अफगाणिस्थानात मदतीच्या रूपाने आल्यानंतर अफगाण मध्यमवर्गीय, सुशिक्षित तरुणवर्गावर समाजवादाचे ठळक संस्कार आपोआपच होऊ लागले. तरी पण रशिया अत्यंत सावधपणाने, जपून पावलं टाकत होता. पूर्वी मुस्लिम टोळीवाल्यांना अफगाणिस्थानात असंतोष पसरविण्यासाठी पाठवण्याचा डाव फसला होता. तो अनुभव जमेस होताच. म्हणूनच रशियाने अफगाणिस्थानला वेळोवेळी मदत दिली ती अफगाण मागणीप्रमाणे न देता त्यांना स्वतःला जेवढी सोयीची, जरुरीची वाटली तेवढीच दिली. आणि तीसुद्धा फारसा गाजावाजा न करता. अमेरिकेनं इराणमध्ये जशी मदत 'ओतली', तशी मदत रशियाने पूर्वी कधीच अफगाणिस्थानात ओतली नाही. पण मदतीच्या प्रत्येक टप्प्यावर अफगाणिस्थानचा रशियाच्या बाबतीतला मिंधेपणा इंचाइंचाने वाढतच चालला होता.

सामाजिक क्षेत्रात दाऊदखानच्या काळात अतिशय हळूहळू सामाजिक सुधारणा होत होत्या. अमानुल्लाचा अनुभव असल्यामुळे दाऊदखानने सामाजिक सुधारणांच्या बाबतीत कसलीच घाई केली नाही. पण अफगाणिस्थानातल्या शाळा–कॉलेजांची संख्या सतत वाढत राहिली. श्रीमंत घराण्यातल्याच का होईना पण उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत राहिली. मुलींचे शिक्षण गाजावाजा न करता सुरू झाले. आणि मुख्य म्हणजे, कोणताही कायदा न करता, बुरखा न घालण्याचे स्वातंत्र्य अफगाण स्त्रियांना मिळाले. सक्ती न करता, ज्यांना बुरखा घालायचा नसेल त्यांना तसा अधिकार मिळाला आणि सरकारी संरक्षणही मिळाले. सुरुवातीला मुल्लामौलवींनी आकांडतांडव केले. बुरखा न घेता रस्त्यावर आलेल्या शाळकरी मुलींच्या आणि बायकांच्या अंगावर ॲसिड टाकण्याचा, त्यांच्या पायांवर छड्या मारण्याचा प्रकारही झाला. त्या वेळी दाऊदखानने मुकाट्याने ठिकठिकाणच्या या त्रासदायक मुल्लामौलवींना पकडून तुरुंगात टाकले. तिथे त्यांचे एवढे हाल झाले की, पुन्हा तोंडातून शब्द काढणार नाही अशी कबुली देऊनच त्यांनी आपली सुटका करून घेतली. कित्येक तुरुंगातच मेले होते!

श्रीमंत, सरदार, शाही घराण्यातल्याच का होईना, पण हळूहळू बुरखा न घेतलेल्या बायकांना पाहण्याची लोकांना सवय झाली. मग एकदा काबूल रेडिओवर अनाउन्सर म्हणून दोघीचौघींची नेमणूक झाली. त्यांचा आवाज जेव्हा घराघरांतून घुमला तेव्हा खळबळ माजली. पण तेव्हाही दाऊदखानने काबूलमधल्या प्रमुख मुल्ला-मौलवींना रेडिओ स्टेशनवर नेऊन मुलींचे रेकॉर्डिंग कसे, पुरुष माणसांपासून दूर, 'पडद्याआड' होते हे दाखवले. तेव्हा त्यांची समजूत पटली, की जेलची आठवण दिली गेली होती म्हणून समजूत पटली, कुणास ठाऊक! पण नंतर सर्वांचाच विरोध कमी झाला. आपापल्या नवऱ्यांबरोबर, वकिलातीत, इतरत्र, परदेशांत जाणाऱ्या बायका बुरखा घालत नाहीत, याबद्दल कुणाचीच तक्रार राहिली नाही. हळूहळू काचकामाच्या फॅक्टरीमध्ये, टेलिफोन एक्श्चेंजमध्ये, आर्याना एअर लाइन्समध्ये, जिथं जिथं बुरखा घालून काम करणं अशक्य होतं, अशा ठिकाणीही मुली थोड्याफार प्रमाणात नोकऱ्या करू लागल्या. १९५७ साली अफगाण बायकांचे पहिले शिष्टमंडळ, आशियायी स्त्रियांच्या कॉन्फरन्सला सिलोनमध्ये गेले. आणि १९५८ साली अफगाणिस्थानने युनोमध्ये अफगाण स्त्रियांचे शिष्टमंडळ पाठवले!

राजकीय बाबतीतला गोंधळलेपणा मात्र अजूनही जात नव्हता. एकदोनदा निवडणुका घेण्याचा झालेला प्रयत्न केविलवाणा, हास्यास्पद वाटावा इतका लहान प्रमाणावर झाला होता. 'लोया जिरगा' (पार्लमेन्ट)ची मजलीस कधी भरायची, कधी बरखास्त व्हायची. पाश्चात्य देशात, तिथल्या संदर्भातले राजकीय तत्त्वज्ञान शिकून आलेल्या, उदारमतवादी, सुधारणावादी लोकांना सर्व बाजूंनी मागासलेल्या अफगाणिस्थानात, आपली मतं, तत्त्वं, सुधारणा कशा फिट बसवायच्या तेच कळत नव्हतं.

शिवाय त्यांना स्वतःचे हक्क, अधिकारही गमावायचे नव्हते. शहाच्या मर्जीनुसार राजकीय पक्षांना, वृत्तपत्रांना परवानगी मिळत होती किंवा त्यांच्यावर बंदीही घातली जात होती.

अशा गोंधळाच्या परिस्थितीतच १ जानेवारी १९६५ साली नूरमहंमद तराकी याच्या घरी गुपचुपपणाने जमायत-ए डेमोक्रॅटिकी अफगाणिस्थान– पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ अफगाणिस्थान या खऱ्याखुऱ्या, थेट मार्क्सिस्ट पक्षाची स्थापना झाली. त्या वेळी या पक्षाचे फक्त तीस सदस्यच होते. ते असे– नूर महंमद तराकी, बबरक कारमल, दस्तगीर पंजशीर, नूर अहमद नूर, डॉ. सालेमहंमद झाईरी, शहरुल्ला शापूर, सुलतान किरतमंद, डॉ. शहावली, ताहीर बदक्षानी. दुय्यम महत्त्वाचे होते– अब्दुल महंमद, बरेक शाहफेई, हमीद शहराई, इस्माईल दनिश्त, अब्दुल करीम मिसाक, वहाबशाफी, जफर ओफाक, डॉ. शाहीर, हाफिजुल्ला अमीब, सुलेमान लायक.

१९७८ पासून आतापर्यंतच्या, अफगाणिस्थानच्या राजकारणात यापैकी प्रत्येकाने (शिल्लक राहिले होते ते) कमीजास्त प्रमाणात महत्त्वाची कामगिरी केली आहे.

## अफगाण समाजवाद

राजकीय पक्षावर बंदीच असल्यामुळे पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना झाली ती अनधिकृतपणे, काहीही गाजावाजा न करता. तरी पण लोकांच्या मागण्या वाढतच होत्या. कम्युनिस्टांच्या बरोबरीने उदारमतवादी, नेमस्त, शहाच्या वर्तुळातले काही लोक, राजकीय, धार्मिक, सामाजिक अशा हरतऱ्हेच्या मागण्या आग्रहीपणाने मांडू लागले. आणि त्या मागण्यांना बगल देण्याचं काम शाही कारभार इमाने इतबारे करीत होता.

अशा परिस्थितीतच १९६५ मध्ये पुन्हा एकदा निवडणुका घेण्याचे जाहीरशहाने जाहीर केले. राजकीय पक्षांना बंदी असल्यामुळे, कोणत्याही पक्षाला निवडणुकीला उभं राहताच येणार नव्हतं. पण कोणत्याही व्यक्तीला उभं राहायची परवानगी होती. परंतु निवडणुकांच्या प्रत्येक टप्प्यावर कुणी निवडून यायचे, कुणी नाही हे ‘ वरून ’ ठरवले जात होते. निवडणुकांच्या सुरुवातीलाच कम्युनिस्ट पक्षाच्या बऱ्याच लोकांना पकडून तुरुंगात टाकण्यात आलं. काहींना सात वर्षांची शिक्षाही झाली. नूरमहम्मद तराकी, हाफिजुल्ला अमीन आणि बबरक कारमल यांनी आपापल्या उमेदवारीचे अर्ज भरले. तेव्हा तराकी आणि अमीन यांच्या अर्जाच्या पाठीमागेच शेरा मारला गेला, “ हा निवडून येता उपयोगाचा नाही.”

त्याचप्रमाणे ते दोघेही ही निवडणूक हरले. पण बबरकच्या अर्जापाठीमागचा शेरा होता की, “ हा निवडून आला तरी चालेल ! ” त्याप्रमाणे बबरक ही पहिली निवडणूक जिंकला. कारण त्याचे वडील जाहीरशहाच्या सैन्यामध्ये जनरल होते. म्हणून तो

कम्युनिस्ट होता तरी त्याने निवडून यायला 'वरच्यांची' हरकत नव्हती!

डॉ. युसूफ हा पंतप्रधान होता. बबरक कारमल आणि त्याची पक्ष-सहकारी डॉ. अनाहिता रेतेब्झाद यांनी पार्लमेन्टच्या कारभारात डॉ. युसूफला सतत विरोध केला. त्यांनी काबूल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा पार्लमेन्टसमोर डॉ. युसूफविरुद्ध मोर्चा आणला. अफगाणिस्थानातला हा पहिला मोर्चा. अशा तऱ्हेचं पब्लिक डेमॉन्स्ट्रेशन अफगाणिस्थानात कधीही झालं नव्हतं!

पार्लमेन्ट बिल्डिंगशी लगट करू लागलेल्या या मोर्चावर, घाबरलेल्या अफगाण पोलिसांनी गोळीबार केला. तीन माणसं मेली. डॉ. युसूफच्या विरुद्ध अतिशय आरडा-ओरडा झाला. त्याने आपल्या पंतप्रधानकीचा राजीनामा दिला. जाहीरशहाने ताबडतोब मोहम्मद हाशिम मेवांडवाल याला पंतप्रधान नेमले. त्याने काही नवीन लोकांची कॅबिनेटमध्ये नेमणूक केली, आणि अफगाणिस्थानच्या इतिहासात प्रथमच एक स्त्री कॅबिनेटमध्ये घेतली गेली. ती म्हणजे डॉ. अनाहिता रेतेब्झाद. मेवांडवालने विद्यार्थी परिषदेला मान्यता दिली. युनिव्हर्सिटीमध्ये स्वतः जाऊन त्याने विद्यार्थी नेत्यांशी बोलणी केली. तुरुंगात टाकलेल्या विद्यार्थ्यांना विनाशर्त सोडून दिले.

त्यानंतरच्या चार वर्षांत आणखी काही वेळा विद्यार्थ्यांनी मोर्चे काढले, कामगारांनीही सभा घेऊन, निवेदनं देऊन, मागण्या मांडून आपला असंतोष व्यक्त केला. 'कामगार संघर्ष' म्हटल्यावर आपल्या डोळ्यांसमोर जे चित्र उभे राहते तसे त्याचे स्वरूप अजूनही तयार झाले नव्हतेच. कारण इथले कारखाने मुळातच बाल्यावस्थेत होते. तिथल्या उद्योगधंद्यांना भांडवलशाहीचं, औद्योगीकरणाचं रूप आलेलंच नव्हतं. विद्यार्थ्यांचा काय किंवा कामगारांचा काय, रोख होता तो धार्मिक असहिष्णुतेला, मागासलेपणाला. सगळ्या कष्टांचं, कटकटींचं, खऱ्या रोगाचं मूळ आहे ते त्यामध्ये, असाच त्यांचा समज होता. कारण हे विद्यार्थी, कामगार, मालकी हक्कांबद्दल, राजेशाहीबद्दल चिंता व्यक्त करुन, आव्हान देऊन आपल्या मागण्या मांडतच नव्हते. सामाजिक, राजकीय, आमूलाग्र बदलाबद्दल त्यांना धूसर, अंधुक अशी कल्पना होती. त्याबद्दल गोंधळलेपणाच होता. आहे ती सिस्टिम बदलून एकदम पाश्चात्य सिस्टिम आणायची त्यांची तयारी नव्हती. तिसरा पर्याय त्यांच्या नजरेसमोर नव्हता. म्हणूनच आहे त्यातल्यात्यात सुधारणा करुन हव्यात, जास्त हक्क हवेत, अधिकार हवेत, अशीच सर्वसाधारणपणे वृत्ती होती.

नंतरच्या सात आठ वर्षांत, १९६९ मध्ये आणखी एक निवडणूक झाली. मेवांडवालनंतर चार पंतप्रधान झाले. वेगवेगळी तीस वृत्तपत्रे निघाली. सरकारने बंदी काढली की ती चालत, नाही तर बंद पडत. त्यांतलं सर्वांत महत्त्वाचं वृत्तपत्र म्हणजे खुद्द नूर महंमद तराकीनं चालवलेलं 'खल्क' हे होय. पण या 'खल्क' वृत्तपत्राचे १९६६ सालच्या एप्रिल व मे या दोन महिन्यांत फक्त सहा अंक निघाले. नंतर यावर बंदी घालण्यात आली. 'खल्क'ने मुस्लिम धर्माच्या मागासलेपणावर, कडवेपणावर सतत

टीका केली. त्याशिवाय खल्कच्या जमीन सुधारणेबद्दलच्या, वारसाहक्कासंबंधीच्या, संपत्तीच्या मलकीसंबंधीच्या मागण्या ह्या इस्लामविरोधी आहेत असा सतत ओरडा होत असे.

'खल्क' वृत्तपत्राने अफगाणिस्थानमधल्या लोकांच्या दैन्यावस्थेचा विचार आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या पातळीवरच केला. अफगाणिस्थानात कशा प्रकारे बदल हवा याचा विचार करताना तराकीच्या डोळ्यांसमोर नेहमी भारत, इजिप्त, ब्रह्मदेश (तेव्हाचा) युगोस्लाव्हिया यांचं उदाहरण असायचे. 'ऑक्टोबर क्रांती' हे त्यांचं स्फूर्तिस्थान होतं; तरी 'टोटल रेव्होल्यूशन'च्या बाबतीत तो साशंक होता. आता या वेळी (१९६६ मध्ये) काही वर्षं तरी निदान अफगाणिस्थानात राजेशाही असायलासुद्धा त्याची हरकत नव्हती.

पण वर्षभरातच म्हणजे १९६७ मध्ये 'खल्क' पक्षातली दुफळी टोकाला जाऊन बबरक कारमल, अनाहिता रेतेब्झाद, सुलेमान लायक वगैरे मंडळी 'खल्क'मधून बाहेर पडून, त्यांनी 'परचम'–'झेंडा', हा आपला वेगळा पक्ष स्थापन केला. या दुफळीचे मुख्य कारण होते पक्षाचे धोरण. वर्गसंघर्ष सतत धगधगता ठेवून, सरकारशी सतत झगडा चालू ठेवायचा, धार्मिक जुलुमाविरुद्ध आवाज उठवायचा, स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणांच्या जाणिवांची सतत मागणी करत राहायची,–या विचारांचा तराकी; तर बबरकचे म्हणणे होते की, वर्गसंघर्ष धगधगत ठेवण्याच्या स्टेज-पर्यंत आपण अजूनही पोचलेलोच नाही. शिवाय एकाच वेळी आपण सरकार, मुल्ला-मौलवी आणि त्यांची लोखंडी पकड असलेला सर्वसाधारण अफगाण माणूस या सर्वांचं शत्रुत्व पत्करलं तर ते आपल्यालाच घातक ठरेल. आपण आताआताच कुठे पक्ष उभा केला आहे. तेव्हा त्याला वाढवण्यासाठी सगळे प्रश्न वाटाघाटींनीच, समझोत्यानेच, पार्लमेन्टच्या तर्फेच सोडवायला हवेत. नाही तर आपल्या पक्षाच्या मुळावरच घाला यायचा.

पक्ष-धोरणाव्यतिरिक्त तराकी आणि बबरक यांची नेतेपदासाठी चाललेली वैय्यक्तिक चढाओढही निर्णायक ठरली. आणि बबरकने 'परचम' हा आपला सवता-सुभा मांडला. त्यानेही 'परचम' नावाचे वृत्तपत्र काढले. त्याचा पहिला संपादक, मुद्रक सुलेमान लायक हा होता. पुढे क्रांतीनंतर हाच सुलेमान लायक, नूर महंमद तराकी पंतप्रधान होता तेव्हा मिनिस्टर ऑफ कल्चर झाला होता. मुकुंदाच्या ऑफिसातले त्याचे अफगाण मित्र त्याला मुरारजींच्या एकेक चमत्कारिक फॅडस्‌वरून चिडवायचे, त्याचा सूड म्हणून तो आपल्या अफगाण मित्रांना म्हणायचा, "तुमच्या पार्लमेन्टमध्ये एक लायक आणि बाकीचे सगळे नालायक आहेत!"

'परचमी' लोक वेगळे झाल्यानंतर महिन्यातच आणखी एक ग्रुप 'खल्क'-मधून वेगळा झाला. त्यांच्या पक्षाचे नाव 'शोला-ए-जावेद'–'न विझणारी ज्योत'. परचमी लोक मास्कोवादी आहेत असं म्हटलं जायचं, तर 'शोलाचे' लोक माओवादी

आहेत, असं म्हटलं जायचं. ‘खल्क’ पक्षाने आपला तटस्थपणा अबाधित ठेवला होता. परचमी लोकांचं सरकारला चुचकारण्याचं धोरण, बबरकचं उच्च, सैनिकी खानदान जाहीरशहाच्या सरकारचं परचमींबद्दलचं मवाळ धोरण, यामुळे त्या वेळी परचम पक्षाला, ‘The Royal Afghan Communist Party’ असं नवं नाव देऊन, लोकांत त्याची भरपूर कुचेष्टा व्हायची.

काही काळानं ‘परचम’मधून काही लोक बाहेर पडून त्यांनी ‘सितम-ए-मिली’– ‘राष्ट्राचं दुःख’– हा आणखी एक पक्ष स्थापन केला.

‘जमियत-ए-सोशल डेमोक्रॅटि अफगाणिस्थान’ या पार्टीनं ‘अफगाण मिलत’– अफगाण राष्ट्र हे वृत्तपत्र बरेच दिवस चालवलं होतं. त्यानं पख्तुनिस्तानचा प्रश्न, फारसी-ऐवजी दरी भाषेचा वापर, सरकारचे आयात धोरण, लाचलुचपत, भूमिहीनांमध्ये जमिनीचे वाटप अशांसारख्या प्रश्नांवरून सरकारवर सतत टीका केली. एकदा या वृत्तपत्राने एक लेख छापून फारच खळबळ माजवून सोडली. एवढी की वर्षभर या वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली. लेखाचे नाव होते ‘आपले सरकारी अंमलदार सी. आय. ए.चे एजंट आहेत का?’ अमेरिकेत शिकत असलेल्या एका अफगाण विद्यार्थ्याने हा लेख लिहिला होता. त्याचा आरोप होता की, इतर देशांतून अमेरिकेत शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना पद्धतशीरपणे शिक्षण देऊन सी. आय. ए.चे एजंट केले जाते. त्याने बऱ्याच लोकांची नावनिशीवार माहितीसुद्धा दिली होती. त्या यादीतलं एक नाव होतं पंतप्रधान मेवांडवाल याचं! वोल्सेजिरगा–लोकसभेमध्ये लोकांच्या प्रश्नांना उत्तरं देता देता त्याची पुरेवाट झाली. या दिव्यातून तो उजळपणानं पार पडला, त्याच्यावर केलेला आरोप हा खोडसाळ होता हे सिद्ध झालं; तरी एकदा त्याचं नाव बद्दू झालं ते झालंच. प्रकृतीचं कारण देऊन नंतर मग त्याने राजिनामा दिला. ‘जमियत-ए-डेमोक्रटिकी मोटाराकी’–प्रगतिशील डेमोक्रॅटिक पक्ष–या नावाचा पक्ष त्याने काढला होता. ‘मुसावत’, ‘एकता’ हे वृत्तपत्र तो चालवायचा. त्याने मध्यममार्ग स्वीकारला होता. इस्लाम हा फक्त वैय्यक्तिक धर्म असावा, आता जरी राजेशाही असली तरी हळूहळू राजेशाही घालवून रिपब्लिक करावे, जमीन सुधार कायदे, संपत्तीचे राष्ट्रीयीकरण अशा त्याच्या मागण्या होत्या.

१९६९ सालच्या निवडणुकांमध्ये यांपैकी कोणत्याही पक्षाला, व्यक्तीला निवडणुकांसाठी उभं राहण्याचीसुद्धा परवानगी नव्हती. फक्त बबरक कारमल आणि हाफिजुल्ला अमीन हे दोघेच तेवढे निवडून आणू दिले होते. याच वेळी एकदा उत्तर अफगाणिस्थानातले काही शेतमजूर, गरीब शेतकरी आपापली गाऱ्हाणी घेऊन काबूलमध्ये मोर्चा घेऊन येण्यासाठी निघाले होते. काबूलपासून ५०–६० मैलांवरच्या सलांगपासपर्यंत ते आल्यावर काबूलमध्ये ही गोष्ट कळली. तेव्हा बबरक स्वतः सलांगपर्यंत गेला आणि त्या शेतमजुरांची समजूत पटवून देऊ लागला. “आता आपलेच सरकार आले आहे. आम्ही पार्लमेन्टमध्ये आहोतच, तेव्हा आता आपण आपली गाऱ्हाणी पार्लमेन्टमधूनच

सोडवून घेऊया. तुम्ही मोर्चा वगैरे काढून उगाचच कडवटपणा कशाला वाढवता ? मी आहे तिथे. मी तुमच्यासाठीच झगडतो आहे." असे सांगून बबरकने त्या शेतकऱ्यांना परत पाठवून दिलं !

पण हे पार्लमेन्टही काही महिन्यांतच कोसळले.

नंतरच्या दहा वर्षांत तराकी, अमीनने अफगाण सैन्य, सरकारी नोकर यांमध्ये खल्क पार्टीचा पद्धतशीर प्रसार चालू केला. तराकी वेळोवेळी जाहीरशहाशी चर्चा करीत असे. काबूल युनिव्हर्सिटीमधले विद्यार्थी, प्रोफेसर्स, शहरी मध्यम वर्ग, बुद्धिवादी, धंदेवाईक लोक, यांना परचम पक्षाने आपलेसे करून घेतले. मेवांडवालने पाश्चात्य शिक्षण घेतलेले, उच्चवर्गीय, जमीनदार, कम्युनिस्टांच्या विरुद्ध असलेल्यांना, पण सुधारणावादी उदारमतवादी लोकांना आपल्या प्रगतिशील डेमोक्रॅटिक पक्षाच्या पंखाखाली घेतले.

आपलं कुठं काय चुकलं ? आपण पुढं काय करायला पाहिजे ? यावरती अटीतटीने चर्चा होऊ लागल्या. प्रत्यक्षात मात्र काहीच होत नव्हतं. खल्क पक्षाचे तराकी आणि अमीन या चर्चेपासून दूरच राहिले. त्यांचं पक्षबळ वाढवण्याचं आपलं काम मुकाट्यानं चालूच होतं.

अशा वेळी जाहीरशहाचा, आणि पूर्वीचा पंतप्रधान दाऊदखान याचा काका शहावली याने दाऊदखानकडे तगादा लावला की, आता प्रत्यक्षात काही तरी करायची वेळ आली आहे. नाही तर सगळंच मोडकळीस येईल. शहावलीचा आग्रह होता की आणखी कुणी काही तरी करण्याअगोदर दाऊदखाननेच सर्वसत्ता आपल्या हातात घेतली पाहिजे; तरच काही तरी भरीव कामगिरी करता येईल. पख्तुनिस्तानच्या प्रश्नावरून दाऊदखानने २-३ वर्षांपूर्वी आपल्या पंतप्रधानकीचा राजीनामा दिलेला होता.

दाऊदखान आणि शहावली लोकांचा अंदाज घेऊ लागले. अब्दूल रफीक झैथी याने परचम पक्षाशी वाटाघाटी करून त्याचा दाऊदखानला पाठिंबा मिळवला. मेजर कादीरच्या पाठोपाठ सैन्यातले बरेचसे उच्चाधिकारी दाऊदमागे होतेच.

आणि जाहीरशहा आपल्या डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी रोमला गेला असताना, दाऊदखान, शहावलीने आर्मीच्या सगळ्या प्रमुख अधिकाऱ्यांना, प्रमुख सरकारी अंमलदारांना मेजवानीला बोलावले. मद्य घेण्यात अफगाण माणूस पटाईत. त्यात त्या दिवशी सगळ्यांना आग्रह करकरून खायला प्यायला दिलं गेलं. उत्तर रात्री एकएक जण 'तब्येतीनं' बाहेर पडू लागताच, एकेकाला धरून सरळ तुरुंगातच ठेवण्यात आलं ! वेगवेगळ्या मिनिस्ट्रींच्या बिल्डिंगवर, गावातल्या मातबर लोकांच्या घरांवर पहारे बसवले गेले. रेडिओ अफगाणिस्थानसमोर, चौका-चौकांत रणगाडे येऊन उभे राहिले. कुठे तरी, मिलिटरी बेसवर चुटपुटता गोळीबार करावा लागला, तेवढाच. पहाटेपर्यंत एवढी तयारी पूर्ण झाल्यानंतर सकाळच्या बातम्यांत जाहीर करण्यात आले की, "यापुढे आता जाहीरशाही संपुष्टात आली असून, अफगाणिस्थानच्या प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली आहे ! नव्या प्रजासत्ताकाचा पहिला अध्यक्ष आणि पंतप्रधान

मोहम्मद दाऊदखान निवडला गेला आहे. प्रजासत्ताकाला पाठिंबा असणाऱ्यांना सरकारतर्फे अभय असून, विरोधी कारवाया कोणी करू नयेत. सर्वांनी आपापल्या ऑफिसात गेले पाहिजे, दुकानं उघडली पाहिजेत. रोजचे व्यवहार सुरळीत चालू राहिले पाहिजेत."

फक्त शाळांना तेवढी सुट्टी दिली होती. शाळकरी मुलं जेव्हा शाळेतून लगेच परत आली, तेव्हा लोकांना कळलं की, आपल्या देशात राज्यक्रांती झाली आहे. आता राजेशाही जाऊन लोकशाही आली आहे !

## खुनांची मालिका

परचम पक्षाने दाऊदखानला पाठिंबा दिला म्हणून खल्क-परचमींचे एकमेकांना बोचकारे काढणं जास्त नेटानं चालू झालं. सरकारला मदत दिली, एक तऱ्हेची भागिदारी पत्करली, म्हणून तराकी, अमीन, बबरकला त्याच्या सहकाऱ्यांना दोषी ठरवीत होते. बबरकने तर तराकी अमीनवर ते दोघेही CIAचे एजंट असल्याचाच आरोप केला ! त्यासाठी तराकी, अमीन या दोघांचे अमेरिका-वास्तव्य, 'मुसावत' वृत्तपत्रात पूर्वी आलेला 'तो' लेख, या दोन्ही गोष्टी बबरकच्या बाजूच्या होत्या. खल्क, परचमचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असताना दाऊदखान मात्र त्याला नको असलेल्या, त्याला सोयीच्या नसलेल्या दोन्ही पक्षांच्या माणसांना उचलून सरळ तुरुंगात टाकत होता.

दाऊदने सर्व सत्ता बळकावली; त्याच सुमारास पूर्वीचा पंतप्रधान मेवांडवाल याच्याही कारवाया सुरू होत्याच. पण दाऊदखानने घाई करून बाजी मारली होती. तेव्हा मेवांडवाल युरोपमध्ये प्रकृती-अस्वास्थ्यामुळे गेला होता. तिथून त्याने रशियाशी संधान बांधले. रशियाने आपली कोरडी सहानुभूती मेवांडवालला दिली, पण प्रत्यक्ष मदत करण्याचे कोणतेच आश्वासन दिले नाही. उलट दाऊद सत्तेवर आल्यावर आपला पाठिंबाही त्याला लगेच देऊन टाकला.

मेवांडवाल काबूलला परत आला तेव्हा दाऊदकडे डाव्या विचारसरणीच्या परचमी लोकांचं भलतंच वजन होतं. आणि यांचं तर मध्यममार्गी, उदारमतवादी मेवांडवालशी शत्रुत्वच होतं. त्यामुळंच काबूलला येतायेताच, दाऊदखान आणि त्याचा भाऊ आणि सल्लागार नईम यांची मुळीसुद्धा इच्छा नसताना मेवांडवालला तुरुंगात टाकण्यात आलं. आणि तुरुंगामध्येच दोन डाव्या विचारसरणीच्या लोकांनी त्याचा खून केला ! अर्थातच सरकारीरीत्या जाहीर करण्यात आलं की मेवांडवालने आत्महत्या केली म्हणून ! मेवांडवालच्या सगळ्या साथीदारांनाही तुरुंगात टाकण्यात आलं. काहींना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली. परचमी लोकांशी संगनमत करून सत्तेवर आलेल्या दाऊदखाननं हळूहळू त्यांना बाजूला सारून आपल्याभोवती स्वतःच्याच नातेवाइकांचा अगदी विश्वासातल्या लोकांचाच गोतावळा जमवायला सुरुवात केली. दिलेली वचनं विसरून

सत्तेवर स्वतःचेच लोक नेमले. दाऊदने वृत्तपत्रस्वातंत्र्यावर बंदी घातली. सगळी वृत्तपत्रं बंद पडली आणि 'शहानाम्यांना'— भूमिगत वृत्तपत्रांना ऊत आला. अफवांचे पेव फुटले. खरं काय खोटं काय ते लोकांनाच काय पण दाऊदखानलाही कळेना. कबूल केलेल्या सगळया सुधारणा प्रत्यक्षात येण्याऐवजी फक्त कागदावरच राहिल्या. अत्यंत आशेनं दाऊदच्या कारभाराकडे डोळे लावून बसलेल्यांची निराशा झाली. असंतोष वाढू लागला. कटकटी वाढू लागल्या. विरोध वाढू लागला. परचमी लोकांची दाऊदकडून घोर निराशा झाली. खल्क पक्षाचे आणि दाऊदखानचे कधीच पटले नव्हते. दाऊदखान सत्तेवर आल्यानंतरही तराकीने त्याला भेटायची, चर्चा करण्याची तयारी दाखविली होती, पण तेव्हाही दाऊदने तराकीला स्पष्ट नकार दिला होता. तेव्हा दाऊदच्या बाबतीत खल्क पक्षाला कधीच आशा नव्हती. परचम–खल्क मधली वाढत जाणारी दरी ओळखून, त्यांचे आपापसांतले अरोप-प्रत्यारोप आधारभूत मानून दाऊद दोन्ही पक्षांना अडचणीत टाकत होता; स्वतःचा फायदा करून घेत होता. ही गोष्ट लक्षात येताच दोन्ही पक्षांना कळून चुकले की, आपापसांत भांडून फायदा तर काहीच पदरात पडत नव्हता, पण तोटाच होत होता. म्हणून मग दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन "पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ अफगाणिस्थान" हा नवा पक्ष स्थापन केला, तो १९७७ च्या जुलै महिन्यात !

आणि अचानक ऑगस्ट १९७७ मध्ये कॅप्टन इनाम-अल-हक ग्रान या विमान पायलटचा खून झाला. मेक्रेरिऑन या भागातल्या स्वतःच्या अपार्टमेन्टच्या प्रवेश-दाराशीच त्याला कुणी तरी गोळया घालून ठार मारलं. आर्याना एअरलाइन्सच्या लोकांनी चालवलेला संप नुक्ताच मिटला होता. ग्रान हा आर्याना एअरलाइन्सच्या कर्मचाऱ्यांचा नेता होता.

ही बातमी ऐकल्यावर आम्हाला तरी फारसं आश्चर्य वाटायचं कारण वाटलं नाही. कारण संपाच्या संदर्भात अशा खून–मारामाऱ्या होतातच. ही गोष्ट आपल्याल तरी नवीन नाही.

पण हळूहळू काही तरी वेगळयाच गोष्टी त्या खुनासंबंधी कळू लागल्यावर मग मात्र गोंधळ वाढला. हे प्रकरण वाटतं तेवढं साधं नाही हेही लक्षात आलं.

आर्याना कर्मचाऱ्यांच्या बऱ्याच मागण्या होत्या. त्यांपैकी अफगाण कस्टम्जकडून होणारा त्रास, कमी पगार, अपुरे वैद्यकीय उपचार या त्यांच्या प्रमुख तक्रारी होत्या. सात दिवस संप झाल्यावर अफगाण सरकारने संपवाल्यांच्या अटी मान्य केल्या होत्या. अफगाणिस्थानातला हा पहिलाच संप इतक्या थोड्याच वेळात यशस्वीही झाला होता.

'संप यशस्वी झाला, पण आता तुला धोका आहे,' असा इशारा ग्रानच्या हितचिंतकांनी त्याला आणि त्याच्या सहकाऱ्यांना दिला होता म्हणे. ग्रानचा खून झाला त्याच्या थोडेच दिवस अगोदर त्याचे दोन सहकारी कॅप्टन मित्र आपापली विमानं घेऊन मास्कोला गेले ते परत आलेच नाहीत. त्यांनी तिथेच पोलिटिकल असायलम घेतलं. पण

ग्रानन असं पळून जाणं साफ नाकारलं होतं, आणि त्याचा खून झाला होता!

दुसरी बातमी ऐकली ती फारच अस्वस्थ करणारी होती. दाऊदखानाचा मिनिस्टर ऑफ इंटिरिअर्स कादीर नूरीस्तानी यानं दाऊदखानच्या कळत किंवा नकळत सगळ्याच डाव्या विचारसरणीच्या नेत्यांना ठार मारण्याचा घाट घातला होता. तराकी, अमीन, बबरक, मीर अमीर खैबरी, नूर अहमद नूर वगैरे सगळ्यांना तो नाहीसा करणार होता. त्याच्या यादीत पहिला नंबर होता बबरक कारमलचा. बबरक ग्रानच्या शेजारच्याच अपार्टमेन्टमध्ये राहात होता. दोघांच्या शरीरयष्टीमध्येही बरेच साम्य होते. त्यामुळे पाठमोऱ्या ग्रानला पाहून संध्याकाळच्या प्रकाशात मारेकऱ्यांना तो बबरकच वाटला. आणि त्यांनी गोळ्या झाडल्या!

कोणी म्हणालं, ते मारेकरी सरकारी नव्हतेच, तर ते खल्क पार्टीचे होते. त्यांनाही बबरकलाच मारायचं होतं, पण त्यांनीही चुकून ग्रानलाच मारलं.

ग्रानच्या खुनानंतर तीन महिन्यांनीच म्हणजे नोव्हेंबर १९७७ मध्ये ग्रानच्या खुनापेक्षाही आणखी एक भयानक खून झाला. या वेळचा बळी होता, दाऊदखानचा प्लॅनिंग मिनिस्टर अहमदअली खुर्रम! हा खून झाला पख्तुनिस्तान चौकातच. म्हणजे ऐन रहदारीच्या ठिकाणी. मुंबईतल्या फोर्टसारखी ही जागा. त्या चौकाच्या कोपऱ्यावर एक चित्रपटगृह, त्याच्या शेजारीच 'अफगाण स्टोअर्स' या भल्या मोठ्या डिपार्टमेन्टल स्टोअर्सची चारपाच मजली उंच प्रचंड मोठी इमारत आहे. त्या सिनेमागृहासमोरच रस्ता ओलांडला की प्लॅनिंग मिनिस्ट्रीचं ऑफिस. सकाळी साडेदहा अकराच्या सुमारास खुर्रम हा आपल्या खोलीत एका जपानी शिष्टमंडळाशी वाटाघाटी करीत बसला होता. तेवढ्यात त्याला भेटायला कोणी आलं म्हणून त्या जपान्यांना तिष्ठत ठेवून खुर्रम खोलीतून बाहेर आला आणि त्या माणसाबरोबर तो जिना उतरून खाली आला. मिनिस्ट्रीच्या पोर्चमध्ये, रस्ता आणि फुटपाथच्या रेषेवरच त्याला गोळ्या घालून ठार करण्यात आले. एकच गोंधळ उडाला. त्याचा फायदा घेऊन खुनी सिनेमाच्या, दुकानांच्या गर्दीमध्ये मिसळून नाहीसा झाला.

नंतर काही दिवसांनी तो सापडला. पण तिथल्या एकंदर राजकारणाचा रंग पाहून असं मनात आल्याशिवाय राहात नाही की खुनी म्हणून पकडलेला माणूस खराच खुनी होता की तोसुद्धा एक तऱ्हेचा डाव होता, कुणास ठाऊक?

सुरुवातीला कळलं की खुर्रमची कुठल्या तरी बाईची भानगड होती, त्या संदर्भात तो मारला गेला होता.

पण नंतरची हकीगत कळली ती फारच वेगळी निघाली. मोहम्मद मर्जान या खुन्यानेच, पोलिसांनी त्याला 'ठीक' केल्यानंतर सांगितलेली. त्याच्या म्हणण्याप्रमाणे झालं ते असं झालं : 'काही लोकांनी' त्यांपैकी चोपन्न लोकांची नावं मर्जाननं पोलिसांना सांगितली होती, खुर्रमशी संधान बांधून असं ठरवलं होतं की, एक दिवस त्यांनी खुर्रमच्या गाडीत बसून, (मागोमाग दुसऱ्या गाडीत बसून आणखीही लोक बरोबर येणार

होते. ) अर्ग पॅलेसमध्ये जायचे. गाडीत खुर्रमला पाहून अर्ग पॅलेसचे गार्डस् अडवणार नाहीतच, अडवलेच तर त्यांची समजूत घालून खुर्रम 'त्या' सगळ्यांना घेऊन दाऊदखानाकडे जाणार होता. एकदा तिथे गेल्यानंतर प्रथम दाऊदखानला धाकदपटशा दाखवून, त्याने नाहीच ऐकले तर त्याला मारून, सर्व सत्ता आपल्या हातात घ्यायची. त्याच वेळी शहरात ठिकठिकाणी पेरलेल्या लोकांनी शहराची, शहरवासियांची 'काळजी' घ्यायची होती. असा सगळा बेत ठरला होता. पण दोनतीनदा खुर्रमनं कच खाऊन माघार घेतली होती. पण त्याला सगळे लोक माहीत झाले होते. सगळा बेत कळला होता. खुर्रमपासून धोका होता. अर्थातच त्याला उडवून लावणं हे भागच होतं.

खुर्रमच्या खुनाच्या निमित्ताने दाऊदखानाने त्याला नको असलेल्या बऱ्याच लोकांना तुरुंगात टाकलं. बऱ्याच लोकांना मारूनही टाकलं.

त्यानंतर पाच महिन्यांनी आणखी एक खून झाला आणि त्यामुळे अफगाणिस्थानचा पुढचा सगळा इतिहासच बदलला !

परचम पक्षाचा एक आधारस्तंभ, 'परचम' वृत्तपत्राचा शेवटचा संपादक, आग्रही डाव्या विचारसरणीचा, उग्र, मीर अकबर खैबरी याचा १७ एप्रिल १९७८ रोजी संध्याकाळी मेक्रेरिऑनच्या रस्त्यावरच खून झाला. तो एकटाच जात असताना मागून एक काळी गाडी आली, त्यातूनच कोणी तरी खैबरीला गोळ्या घातल्या, आणि गाडी भरवेगानं निघून गेली. खैबरीचा खुनी कधी सापडलाच नाही. क्रांतीनंतर त्याचे सगळे मित्र सत्तेवर आले तरी खुनी सापडलाही नाही, की त्या खुनाबद्दल नंतर कोणी काही बोललंही नाही ! आपल्याला आश्चर्याचा धक्का बसल्याचं दाऊदखाननं त्याच वेळी जाहीर केलं होतं. धक्का तर सगळ्यांनाच बसला होता.

त्याचं प्रत्यंतर आलं खैबरीच्या जनाज्याच्या वेळी. १९ तारखेला खैबरीचा जनाजा निघाला त्यात हजारो लोकांनी भाग घेतला होता. एवढा मोठा जनसमुदाय कुणाच्या जनाज्यालाच काय पण कोणत्याच कारणासाठी जमला नव्हता असं जाणकार मंडळींचं मत पडलं. स्मशानामध्ये तराकी, अमीन वगैरे लोकांनी जोरदार भाषणं केली. सरकारची ही अशी दडपशाही आम्ही मुळीच सहन करणार नाही. खैबरीचा खून का झाला, कोणी केला याचा जबाब सरकारला द्यावाच लागेल, असं ठणकावून सांगण्यात आलं. लोकांना पेटवून देणारी भाषणं झाली.

दाऊदखान चरकला, ही लक्षण ठीक दिसत नव्हती.

खरं म्हणजे, अफगाणिस्थानच्या बाबतीत त्याचे स्वतःचेच असे वेगळेच बेत चालले होते. खैबरीच्या खुनापूर्वी एक महिनाभर दाऊदखान भारत, इजिप्त आणि युगोस्लाव्हियाला जाऊन आला होता. अलिप्ततावादाची चळवळ चालू करून त्या परिषदेची स्थापना करणारी ती तीन मुख्य राष्ट्रे होती. त्याशिवाय इराण, लिबिया, तुर्कस्तान, पाकिस्तान आणि त्यानंतर सौदी अरेबिया, कुवेत या राष्ट्रांना भेटी देऊन आला होता. या भेटी साध्यासुध्या नव्हत्या. यामध्ये बराच अर्थ होता.

वर्षोन्वर्षे भिजत पडलेला पख्तुनिस्तानचा प्रश्न समाधानकारकरीत्या सोडवता येईल अशा पातळीपर्यंत दाऊदखान, भुट्टोशी बोलणी करून आला होता. इराणचा शहा दोन बिलियन डॉलर्स एवढी प्रचंड मोठी मदत अफगाणिस्थानला देणार होता. ही रक्कम, अफगाणिस्थानला मिळणाऱ्या इतर सगळ्या परकीय मदतींपेक्षा, कर्जापेक्षा किती तरी जास्त होती. शिवाय इराणशी असलेलं ऐतिहासिक शत्रुत्वही संपुष्टात आलं होतं. ओपेकच्या खास फंडातून, इस्लामिक बँकेतून मदत मिळणार होती. कुवेतनेही मदत देण्याचे कबूल केले होते. अंतर्गत भांडणं, बजबजपुरी माजलेल्या कंदाहार, जलालाबाद या प्रांतांत जाऊन दाऊदखान त्या बाबतीतही समाधानकारक बोलणी करून आला होता. उघडपणानं सरकारनं काहीही म्हटलं नव्हतं तरी या परदेशप्रवासाचा अर्थ स्पष्ट होता. दाऊदखान हळूहळू 'उजव्या' बाजूला झुकत चालला होता. पण त्याच वेळी दाऊदखाननं हेही स्पष्ट केलं होतं की, यापुढं तो आपल्या कॅबिनेटमध्ये मध्यम-मार्गी डावे, उदारमतवादी वगैरे सर्व विचारप्रवाहांच्या लोकांना सामील करून घेणार होता.

पण मध्येच अचानकपणानेच मीर अकबर खैबरीचा खून झाला होता. त्याच्या जनाज्याच्या वेळी भाषणे देताना, जर दाऊदखानने आपले मार्ग बदलले नाहीत तर त्याचा परिणाम वाईट होईल, अशी धमकी देण्यात आली होती !

२० एप्रिलला, म्हणजे तराकी, अमीनच्या भाषणाच्या दुसऱ्या दिवशी, बी. बी. सी.ने त्यांच्या भाषणाची, खैबरीच्या जनाज्याची बातमी देऊन म्हटले होते की, काबूल-मधले वातावरण अतिशय तापले आहे. सरकारविरोधी कारवाया जोरात चालू झाल्या आहेत. येत्या आठदहा दिवसांत या तप्त वातावरणाचा स्फोट होण्याची शक्यता अतिशय आहे. आणि हा उद्रेक अतिशय कडवा असेल. रस्त्यारस्त्यांतून मारामाऱ्या होतील. रक्ताचे पाट वाहतील !

दाऊदखानने विचार करण्यात, निर्णय घेण्यात बराच वेळ घालवला.

२५–२६ एप्रिलच्या मध्यरात्री नूरमहंमद तराकीला पकडून तुरुंगात म्हणजे दाऊदखान राहायचा त्या अर्ग पॅलेसच्या समोरच्याच मिनिस्ट्री ऑफ डिफेन्सच्या तळ-घरातल्या एका खोलीत बंद करून ठेवले.

त्या मध्यरात्री हाफिजुल्ला अमीनला अटक न करता, त्याच्या घरावर धाड घालून आक्षेपार्ह कागदपत्रं जप्त करून त्याला स्थानबद्ध करण्यात आलं. त्याच्या घरावर एका शिपायाचा पहारा बसवण्यात आला. २६ एप्रिलला सकाळी साडेदहा वाजता अमीन-लाही पकडून नेले.

संध्याकाळच्या काबूल रेडिओवरच्या बातम्यांत सांगितले की इस्लामविरोधी, राष्ट्रविरोधी, काफीर, गद्दार लोकांना अटक केली आहे. अफगाणिस्थानचे शत्रू आता तुरुंगात आहेत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. सरकारी बातम्यांनुसार फक्त सातच लोकांना अटक करण्यात आली होती. पण लोकांचा अंदाज होता की हा आकडा

पन्नासाच्या आसपास असावा. राजकीय नेत्यांबरोबरच काबूल युनिव्हर्सिटीमधल्या किती तरी प्राध्यापकांना, विद्यार्थी नेत्यांना रातोरात अटक झाली होती.

रात्री आठच्या बातम्यांत काबूल रेडिओने बातमी दिली की, जर उद्या, म्हणजे २७ एप्रिलला दुपारी १२ वाजेपर्यंत दाऊदखानने सगळ्यांना सोडलं नाही तर खूप प्रचंड मोर्चा घेऊन ते लोक अर्ग पॅलेसवर जाणार होते. पण सरकारने अशा धमक्यांना भीक न घालता, राष्ट्रद्रोही कृत्ये करणाऱ्यांचा काटा काढण्याचा विडा उचलला होता. तसा खंबीर इशारा सरकारने विद्रोही लोकांना दिला होता.

## ५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२६
दा. क्र. २३५५२
भूप्रवास २५।घे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## लाल ठिणगी

२७ एप्रिल १९७८ ला गुरुवार होता. पुढच्याच आठवड्यात अलिप्त देशांच्या संमेलनाची जागतिक जत्रा काबूलमध्ये भरायची होती. त्याच्या तयारीत सगळे गुंतले होते. काबूलमधली सगळी हॉटेल्स केव्हाचीच भरली होती. भारतातून येणाऱ्या लोकांची संख्या अंदाजापेक्षा जास्त होती. त्यामुळे उरलेल्यांची कुणाकुणाच्या घरी पाहुणे म्हणून राहण्याची सोय करण्यात येत होती. आमच्या घरी कुणी तरी दोघं चौघं राहायला येणार होते ते कोण असतील ? ओळखीच्या पैकी कोणी असेल का ? त्यांची राहण्याची व्यवस्था कशी काय करावी ? अशांसारखे प्रश्न समोर होते. दोन दिवस झाले, माझी दाढ भयंकर दुखत होती. संध्याकाळी दाताच्या डॉक्टरची अपॉइंटमेन्ट होती. गावातही काय काय घडत होतं, त्याच्या बातम्या लागत होत्या. आज ऑफिस अर्ध्या दिवसाचंच म्हणून मुकुंदाही घरीच फाइल्स काढून बसला होता. म्हणजे एकंदरीत डोक्याला बरीच व्यग्रता होती.

आणि एकदमच दुपारी १२ वाजता, दणाण्कन मोठा आवाज झाला. काचेची दारं खिडक्या मिनिटभर थरथरत होती. पाठोपाठ तसल्या आवाजांची माळकाच लागली. पाच दहा मिनिटांनी हे आवाज थांबले. परत सगळं नेहमीसारखंच शांत. बाहेर रस्त्यावरही काहीच गडबड नव्हती. नेहमीसारखीच तुरळक वाहतूक चालू होती. जणू काही घडलेलंच नव्हतं !

मुकुंदाचं म्हणणं पडलं की, काबूलच्या भोवतीच्या पहाडात रस्ता करण्यासाठी सुरुंग अधूनमधून लावतात त्याचा आवाज असावा हा. माझं म्हणणं होतं की सुरुंगाच्या स्फोटाने दारं, खिडक्या, छप्पर असं थरथरत नाही. आमची वादावादी चालूच होती. तेवढ्यात मशिनगन फायरिंगचे पट्पट्पट् असे जोरदार आवाज आले. आवाज एवढे स्पष्ट होते की आमचा वाद आपोआपच मिटला होता. पण कशासाठी हा गोंधळ सुरू झालाय हे अर्थातच काहीही कळत नव्हतं.

ते लोक मोर्चा घेऊन अर्ग पॅलेसवर जाणार होते, त्याची काही तरी भानगड झालेली दिसतेय, हे मात्र आम्हा दोघांनाही एकदमच वाटलं.

पहिला विचार मनात आला तो मुलांचा. मुलं शाळेत होती. आज एक वाजता येणारी मुलं, दीड वाजला तरी मुलांचा पत्ता नव्हता. गावातून एवढे आवाज दणदणत होते. शेवटी न राहवून शाळेत फोन केला. जणू काही माझ्या फोनची वाटच पाहात असल्यासारखे व्हाइस प्रिन्सिपलनी फोन उचलला. आतापर्यंत कित्येकांना सांगितलेला निरोप त्यांनी मलाही सांगितला. 'तुमची मुलं खुशाल आहेत. काळजी करू नका. गावात गडबड चालू झाली आहे. म्हणून एम्बसीच्या सूचनेनुसार मुलांना आम्ही शाळेतच ठेवून घेणार आहोत. जरा स्थिरस्थावर झालं की मुलांना घरापर्यंत पोचवून देऊ."

मनाला एक दिलासा होता की, जर मोर्च्याच्या तिथेच गडबड झालेली असेल तर ती अर्ग पॅलेस समोरच असणार. म्हणजे शाळा त्याच्यापासून बरीच दूर होती. म्हणजे मुलांना तशी भीती नव्हती. पण मुलं आता दिवसभर खातील काय, ही नवीनच काळजी लागली. माझी मुलं तर मोठी आहेत. पण छोटी छोटी मुलं किती घाबरली असतील,... भुकेनं त्यांचा जीव कळवळला असेल का.... ?

आता धड घरातही बसवेना. या गडबडीत नळ फुटले तर पाण्याची पंचाईत व्हायची, म्हणून प्यायचं पाणी भरून ठेवलं. घराला कुलुप लावून, मुलांसाठी चिठी लिहून ती दाराच्या स्प्रिंगला अडकवून रस्त्यावर आलो. आता गोळीबाराचे आवाज अगदी जोरात सुरू होते. तरी पण रस्त्यावरची रहदारी नेहमीसारखीच चालू होती. अर्थातच त्यामध्ये घाई फार होती. वाहनं वेगानं जात येत होती. दुकानंही सगळी उघडीच होती. दुकानदार फूटपाथवर येऊन घोळक्या घोळक्यानं उभे होते, बोलत मात्र कोणीच नव्हतं. सगळे कसे गप्पगप्पच होते. अफगाण शाळकरी मुलं, घाबरून घरी पळत सुटली होती.

कोपऱ्यावर आमचा नेहमीचा भाजीवाला सैलपणानं सायकल धरून उभा.

"काय रे, काय गडबड चाललीय ही ?" आम्ही विचारलं.

"छेः छेः, गडबड कुठली ? काही नाही.... तुम्ही घरी जा... घरी जा..." त्यानं घाईघाईनं सांगितलं.

तेवढ्यात दाण्कन् पुन्हा एकदा स्फोटाचा आवाज आला.

"ही गडबड नाही ?"

"असेल... असेल... मला माहीत नाही. तुम्ही परत घरी जा..." असं म्हणून तो सायकलवर टांग टाकून निघून गेला.

ही माणसं अशी गप्पगप्प, घाबरलेली का ते कळत नव्हतं. काय चाललंय ते त्यांना नक्कीच माहीत असणार. इथलेच लोक ते. पण कोणी आपापसांतही बोलत नव्हतं. तर ते आमच्यासारख्या परक्यांशी काय बोलणार ? घरी जायची मुळी इच्छा नव्हती. पलीकडच्या मोठ्या रस्त्यावर एका मोठ्या अपार्टमेन्ट बिल्डिंगमध्ये बरेच भारतीय राहतात. त्यांच्याकडे गेलो. त्या रस्त्यावर आल्यावर आमच्या पाठोपाठ

४–६ मिलिटरी टँक्स, आपली मशिनगन चोहोबाजूंना गरगर फिरवीत दणदणत आल्या. अपेक्षा नसताना एकदम ती महाकाय धुडं इतक्या जवळ, अगदी समोरच आणि त्याही आपल्या गन्स रोखून, अधून मधून फायरिंग करीत असलेल्या पाहून आम्ही अगदी मनातून, प्रथमच घाबरलो. बाप रे, केवढी धुडं असतात ती ! माझ्या उंचीच्या, तर त्यांच्या लोखंडी साखळदंडानं वेढलेल्या टायर्सच्च होत्या. आणि त्या एवढ्या मोठ्या टँकच्या मधोमधच खोल खिडकीच्या छोट्याशा गोल दारातून, लोखंडी हेलमेट घातलेल्या सोल्जरचं डोकंच तेवढं वर आलेलं. त्याची तीक्ष्ण नजर चहूबाजूंना भिरभिरत होती. आम्हालाच काही केलं तर ? दिल्लीला असताना २६ जानेवारीच्या परेड-मधले असलेच टँक्स पाहून अभिमान वगैरे वाटायचा. पण परेडमध्ये टँक्स पाहणं वेगळं आणि आपली गन परजीत, फायरिंग करीत पळणारे टँक्स पाहणं वेगळं.

त्याच रस्त्याच्या दूर कडेला सलांगवटच्या चौकामध्ये २–४ टँक्स उभे दिसले. तिथे बरीच गर्दी दिसली. पण कुणालाही तिथून पुढे जाऊ देत नव्हते. कारण त्याच रस्त्याच्या एका टोकाला मिनिस्ट्रि ऑफ इंटिरिअर्सची इमारत होती; आणि दुसरा मोठा रस्ता थेट पुढे ' करघा ' या मिलिटरी कॅम्पला जायचा. म्हणून ते टँक्स तिथे गस्त घालण्यासाठी उभे होते. त्या रस्त्यावरून फक्त मिलिटरी जीप्स, टँक्स, ए. पी. सी.च्या गाड्या धावत होत्या. आणि तिथेच गर्दीमधला एक पोरगेलासा तरुण मुलगा, सायकल हातात धरून खोटी मशिनगन हातात असलेल्या एका सैनिकाशी हुज्जत घालत होता. त्याला तो मोठा रस्ता ओलांडून आपल्या घराकडे जायचे होते. आणि तो शिपाई त्याला रस्ता ओलांडून पलीकडे जाऊ देत नव्हता. दोघांची ही तात्त्विक बाचाबाची बराच वेळ चालली होती. तो शिपाईही भला त्या पोराशी दांडगाई करीत नव्हता की तो पोरगाही त्या शिपायाला घाबरत नव्हता. शेवटी इतर बाकीचे लोक मध्ये पडले. समजुतीनं घ्या, समजुतीनं घ्या, असं म्हणू लागले. तेव्हा तो वाद मिटला. तो मुलगाही मग लोकांनी सुचवल्याप्रमाणे दुसऱ्या रस्त्याने आपल्या घरी जायचं सोडून तिथेच ' तमाशा ' पाहात उभा राहिला.

आम्हाला असं गर्दीत उभं राहिलेलं पाहून, त्या बिल्डिंगमध्ये राहणारे जरासे वयस्क असे गृहस्थ होते ते आमच्या अंगावर ओरडले. खिडकी उघडून आम्हाला म्हणाले, " रस्त्यावर काय हिंडता ? घरात या... घरात या... काही तरी होईल." आम्ही खरे म्हणजे त्यांच्याकडेच जायला निघालो होतो. पण मध्ये बरंच काय काय बघायला मिळालेलं होतं. त्यांच्या घरी गेलो. शेजार-पाजारच्या फ्लॅटमधले आणखी दोघे तिघे तिथं आले. प्रत्येकजण आपापला अनुभव सांगू लागले. त्यांच्यापैकी एकजण काबूल युनिव्हर्सिटीमध्ये प्रोफेसर होता. एकजण ' मेक्रेरिऑन ' या गावाबाहेरच्या भागात असलेल्या आपल्या ऑफिसातून धावत-पळत आलेला, तिसरा तर बिचारा अर्ग पॅलेस समोरच्याच फायनान्स मिनिस्ट्रीमध्ये काम करणारा, फायनान्स ॲडवायझर. सर्वांत जास्त तोच बिचारा घाबरलेला होता. कारण, काय होतंय,– काय होतंय असं म्हणेपर्यंत

त्याचं ऑफिस फायरिंगमध्ये मोडकळीस आलेलं होतं. तिथून तो अडीच तीन मैल बिचारा लपतछपत, पळतच घरी आला होता. त्याच्या हातापायांची थरथर अजून थांबली नव्हती. त्यानं सांगितलेली माहिती अस्सल होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे ही गडबड मोर्चाची नव्हतीच. अर्ग पॅलेसवर आर्मीचेच लोक फायरिंग करीत होते. पण ते लोक कोण, कशासाठी लढत होते हे काही त्याला सांगता आलं नव्हतं. कारण त्याच्या ऑफिसातल्या अफगाण लोकांनाही ते माहीत नव्हतं. फक्त एवढंच कळलं होतं की, अफगाण सैन्यानेच दाऊदखान विरुद्ध उठाव केला होता. अर्ग पॅलेसभोवतालचा परिसर लष्कराने, टँक्सनी भरलाय.

आतापर्यंत अर्ग पॅलेसच्या बाजूने येणारे धुराचे लोटच्या लोट आकाशात जाताना दिसत होते.

मेक्रिऑनहून आलेला इंजिनिअर माणूस म्हणाला, सकाळी १०–१०॥ लाच त्यांच्या भागात टँक्सच्या वेगवान हालचाली चालू झाल्या होत्या. तेव्हाच त्याला, हे काही तरी वेगळेच प्रकरण आहे अशी शंका आली होती. त्या बिचाऱ्यानं एवढंच सांगितलं, आणि त्याची बायको त्याच्यावर तुटून पडली. तिचं म्हणणं, "जर तुला त्याच वेळी काही तरी कल्पना आली होती तर तू आपल्या मुलाला तेव्हाच शाळेतून का नाही आणलंस ?"

त्याचं म्हणणं होतं, "आता मला काय माहीत ही एवढी लढाईच होणार म्हणून ! काही तरी वेगळं वाटलं होतं, एवढंच. बाकीच्यांची मुलं पण शाळेत आहेतच की ! त्यांचं जे होईल ते आपल्याही मुलांचं होईल."

पण ती बाई काही ऐकूनच घ्यायला तयार नव्हती.

मग आम्ही सगळेच आपापल्या मुलांच्या काळज्या विसरून तिला समजावीत राहिलो की, इथं एवढा गोंधळ सुरू आहे; पण शाळा इथून खूप दूर आहे. म्हणून घरापेक्षा पोरं शाळेतच जास्त सुरक्षित आहेत.... वगैरे....वगैरे.

प्रोफेसरसाहेबांकडून आणखी काही माहिती कळली की, युनिव्हर्सिटी आणि आजूबाजूच्या भागात सकाळी सातपासूनच सुरुवात झाली होती. ते सकाळी आठ वाजता युनिव्हर्सिटीवर गेले तर तिथलं वातावरण अतिशय तंग झालेलं होतं. काल, परवा बऱ्याच विद्यार्थ्यांना, प्रोफेसर्सना पकडून नेलं होतं, ते सगळे कम्युनिस्ट होते. त्यामुळे आजच्या या गोंधळात कम्युनिस्ट चांगलेच गुंतलेले होते. त्यांना तर असंही कळलं होतं की, सकाळी ९ वाजताच मेजर वतबझारने दाऊदविरुद्ध युद्ध पुकारून क्रांतीची घोषणा दिली होती ! हा जो गोंधळ म्हणा, लढाई म्हणा चालू आहे, ती म्हणजे कम्युनिस्टांचा सरंजामशाहीविरुद्धचा, भांडवलशाहीविरुद्धचा उठाव आहे. ही क्रांती आहे !

प्रोफेसरसाहेबांनी अगदी ठोक भाषेत थेट बातमी सांगितली होती. आत्ता कुठं हे काय चाललंय त्याचा पत्ता लागला.

ही कम्युनिस्टांची क्रांती आहे म्हटल्यावर एकदम एक्साइट व्हायला झालं. एका क्षणात आजूबाजूला चाललेल्या घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोणच एकदम बदलला. आतापर्यंत वाटणारी निव्वळ उत्सुकता जाऊन, तिथे आता जागरूकपणा, कसली तरी अपेक्षा, हे जे काय चाललं आहे ते अत्यंत महत्त्वाचं आहे ही जाणीव आली. एका देशातल्या अत्यंत महत्त्वाच्या घटना आपण प्रत्यक्ष घडताना पाहात आहोत, एका देशाचा इतिहास घडताना आपण प्रत्यक्षात पाहतो आहोत ही जाणीव झाली.

रेडिओवर काही सांगतात का पाहावं म्हणून काबूल रेडिओ लावला. तर तिथे नेहमीसारखीच गाणी वगैरे सुरू होती. पण रेडिओचा काटा जरा इकडेतिकडे हालला की तिसऱ्याच कुणाकुणाचं बोलणं ऐकू येत होतं. लढणारे लोक एकमेकांना सूचना देत होते. काही तरी विचारत होते. हुकूम देत होते; ते आम्हाला रेडिओवर ऐकू येत होतं! म्हणजे लढाईच्या त्या तिकडे काय चाललं होतं ते सगळंच्या सगळं समस्त काबूलवासीयांना कळत होतं!

एकदमच रस्त्यावरून जाणाऱ्या एका टँकनं, आम्ही ज्या फ्लॅटमध्ये गप्पा मारत बसलो होतो त्याच्या समोरच, रस्त्यापलीकडच्या घरावर ताड् ताड् ताड् गोळ्या झाडल्या. ते घर होतं पूर्वीच्या एका सर्वसामान्य खानदानातल्या पंतप्रधानाचं! त्याचा मुलगा, अहमद जाहीर, हा सध्याचा अफगाणिस्थानातला एक टॉपचा पॉपसिंगर, तिथं राहतो.

दुसऱ्या दिवशी कळलं की, त्या गोळीबारात त्याच घरातला कोणी एक म्हातारा आणि एक लहान मूल मेलं होतं.

सव्वातीन वाजता प्रथमच फायटर प्लेन्स अगदी खालून, काबूलवरून उडायला लागली. आता आकाशातूनही बॉम्बिंग सुरू झालं होतं!

आम्ही चर्चा आटोपून निघालो, घरी आलो. मुलं अजूनही आली नव्हती. पुन्हा दुसऱ्या बाजूने चौराहा याकूबपर्यंत गेलो. तर इथेही रहदारी चालूच होती. टॅक्सीज पळत होत्या, सिटीबसेसही पळत होत्या! अगदी अर्ग पॅलेसच्या बाजूला जाणाऱ्यासुद्धा! आणि त्या बसेसमध्ये माणसं बसलेली होती! अर्थातच त्यांना अर्ग पॅलेसपर्यंत न नेता, अर्धा मैल अगोदरच उतरवून देत होते. ते तरी नशीबच म्हणा. नाही तर या अफगाण लोकांचं काही सांगता येत नाही. त्यांनी सरळ अर्ग पॅलेसच्या स्टॉपपर्यंतसुद्धा बस नेली असती. आपल्या देशात हे जे काही घडत आहे त्याचं महत्त्व किती जणांना कळत होतं कुणास ठाऊक? रहदारी चालू होती. दुकानं उघडी होती. लोक घोळक्या घोळक्यानं उभे होते. सकाळच्या मानानं आता त्यांचं दबल्या आवाजातलं आपापसांत बोलणं सुरू झालं होतं.

पण ही क्रांतीची प्रक्रिया चालू असताना जी एक्साइटमेन्ट लोकांच्यामध्ये दिसायला हवी, जी इन्व्हॉल्व्हमेन्ट असायला हवी ती दिसतच नव्हती!

नाही म्हणायला सकाळी ट्रॅफिक पोलीस होते त्याऐवजी आता मिलिटरीची माणसं

वाहतुक नियंत्रण करीत होती. एक टॅक्सी रस्त्यातच मोडून पडली होती. त्या बाजूला कुणाला जाऊ देत नव्हते. नंतर कळलं की, यांचा आर्मी चीफ त्याच टॅक्सीतून करघा मिलिटरी कॅम्पकडे निघाला होता. त्यालाच हा ॲक्सिडेन्ट झाला होता. असं वाटत होतं की, या लोकांना ' क्रांती 'चा संपूर्ण अर्थच कळला नव्हता. त्यांच्या दृष्टीनं ही दोन गटांत चाललेली लढाई होती. कोण जिंकते आहे, कोण हरते आहे हे सावधपणानं पहात होते हे लोक. जो कोण जिंकेल त्याच्या नावानं एकदा झिंदाबाद केलं की यांचा आणि त्या क्रांतीचा– लढाईचा संबंध संपणार होता.

साडेपाचला मुलं शाळेतून घरी आली. दोघंही खूपच उत्तेजित झाली होती. त्यांची शाळा जराशी उंचावर. वरच्या मजल्यावरच्या खोल्यांच्या खिडक्यांतून तर त्यांना केवढा तरी मोठा काबूल शहराचा परिसर दिसत होता. अर्ग पॅलेसला लागलेली आग, आजूबाजूच्या इमारतींवरचा धूर, धुरळा दिसत होता; आणि मुख्य म्हणजे त्यांना फायटर्स विमानांची, एअरपोर्टवरची उड्डाणं दिसत होती ! एकदमच तिरक्या रेषेत उडणारी ती विमानं, बॉम्ब्स् टाकतानाही दिसत होती ! ही आतिषबाजी बघत वरच्या वर्गातली सगळी मोठी मुलंमुली सतत वरच्या मजल्यावरच बसलेली होती. प्रिन्सिपल, इतर शिक्षक यांच्या, ' वर बसू नका, खाली या ' या सांगण्याला कोणीही किंमत देत नव्हतं. मध्येच एकदा, गावातल्या एका भल्या भारतीय व्यापाऱ्याने नान, चीज, पनीर, द्राक्षं अशा वस्तू शाळेत पोचवल्या होत्या. त्या वस्तू लहान मुलांना देऊन त्यांना जेवायला घालायच्या कामात या मोठ्या मुलांनी मदत केली होती. लहान मुलं मात्र घाबरली होती. पण ती रडत भेकत नव्हती. दंगा करीत नव्हती. घाबरून स्वस्थ बसून होती. विमानातून बॉम्बिंग सुरू झाल्यावर मात्र एका लहान मुलानं डोळयांत पाणी आणून सरांना विचारलं होतं, " यह बॉम्ब गिरनेसे अब हमारी मम्मी मर जायेगी ? "

तेव्हा कुठं या मोठ्या मुलांनी, सगळ्या धाकट्या पोरांना जवळ बोलावून घेऊन वाघ-सिंहाच्या गोष्टीबिष्टी सांगायला सुरुवात केली होती. लहान मुलं घाबरली होती. तशीच शिक्षक मंडळीही घाबरलेलीच होती. कारण हे जे काय चाललंय ते चांगलं नाही. याचा अर्थ काय ते त्यांना कळत होतं. अर्धवट वयाच्या मुलांना प्रसंगाचं गांभीर्य कळत नव्हतं. त्यामुळं त्यांना भीतीही वाटत नव्हती. युद्धासंबंधीच्या कथा कादंबऱ्यांत जसं घडतं तसंच प्रत्यक्ष घडताना बघता येत होतं. त्याचीच एक्साइटमेन्ट, त्याचंच कौतुक त्यांना वाटत होतं ! जयदेव, सौमित्रलाच नव्हे तर त्यांच्या सगळ्या मित्रमैत्रिणींनाही तसंच वाटत होतं.

घरी आल्यावर मी त्यांना सांगितलं की, ही काही फालतू गडबड नाही. अफगाण कम्युनिस्टांनी दाऊदखानविरुद्ध केलेला हा उठाव आहे.

" बाप रे ! म्हणजे ही रेव्होल्यूशनच झाली की, रशियन रेव्होल्यूशनसारखी ? बाप रे... बाप रे ! " स्वतःचंच बोलणं ऐकता ऐकता जयदेवच्या आणि सौमित्रच्या

डोक्यात प्रकाश पडत होता !

आमच्या घरासमोरच्याच बैठ्या घरात ' बेड अॅन्ड ब्रेक फास्ट ' टाइपचं छोटंसं हॉटेल होतं. तिथं एक टूरिस्ट बस येऊन थांबली. कुठल्या युरोपियन देशातले हौशी प्रवासी होते कुणास ठाऊक! पण आपापल्या चमत्कारिक टोप्या, हॅट्स, गळ्यातल्या रंगीबेरंगी मण्यांच्या माळा, डोक्याला गुंडाळलेले स्कार्फ्स फडकवीत, अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत त्यांची भयंकर धावपळ चालली होती. बसच्या टपावर ठेवलेलं सामान काढून घ्यायची घाई चालली होती. त्या बसबरोबरचे अफगाण नोकर मात्र अत्यंत संथपणानं टपावर चढून, सामानावर गुंडाळलेली दोरी सोडवून, एक एक बॅग खाली उतरवीत होते. त्यांना कसली घाई नव्हती, की वर आकाशातून बॉम्बिंग करणाऱ्या विमानांची भीती वाटत नव्हती. पण काही लंडंभारतींची होणारी तारांबळ पाहून आम्हाला खूप हसूच येत होतं. एकटा सौमित्र हसत नव्हता. उलट आम्हालाच रागे भरत होता, " वेळ कशी आहे आणि तुम्ही हसता काय ? खरंच काही झालं म्हणजे कळेल."

त्यानं असं म्हणायला आणि तेवढ्यातच आकाश फाटल्यासारखा कानठळ्या बसवणारा आवाज व्हायला एक गाठ पडली. आमच्याच घरावर काही तरी पडलं होतं! पाठोपाठ घणाघणा घरंगळत आठ दहा, दहा इंचाच्या पितळी नळकांड्या बंगल्यापुढच्या पोर्चमध्ये, मागच्या अंगणात पडल्या. आयुष्यात प्रथमच अशी लढाई, बॉम्बिंग, शेलिंग वगैरे प्रत्यक्ष पाहात होतो आम्ही. त्यामुळे या नळकांड्या म्हणजे काय भानगड आहे हे आम्हाला काय माहीत असणार ? अशी वस्तू प्रत्यक्षात कधीच पाहिलेली नव्हती. आणि आता या नळकांड्या घराभोवतीनं पडलेल्या होत्या. जिथं जिथं पडल्या होत्या तिथल्या जमिनीचे टवके उडाले होते. कॉंक्रिटला क्रॅक्स गेले होते. त्या नळकांड्या उचलायला मुलं धावली.

मी ओरडले, " अरे हात लावू नका. ते काय आहे कुणास ठाऊक! हात लावल्यावर स्फोट झाला तर ?"

पण तेवढ्यात घरमालकाचा कॉलेजात जाणारा मुलगा, टूरिस्ट बसचे ड्रायव्हर, कंडक्टर, नोकर वगैरे त्या नळकांड्या घ्यायला आमच्या कंपाउंडमध्ये शिरली.

' उचला रे उचला ' मी पण मग मुलांना पिटाळलं, दोघांना दोन नळकांडी सापडली. बाकीची इतरांनी उचलली. केवढी कढत होती ती नळकांडी. नंतर मग आम्हाला कळलं की या नळकांड्यांना पुढे प्रत्यक्ष बॉम्ब जोडलेला असतो. बॉम्ब जेव्हा फेकतात तेव्हा हे नळकांडे खाली पडते आणि बॉम्ब वेगाने पुढे जाऊन नेम मारलेल्या ठिकाणी पडतो. आमच्या घरापासून जवळच, सरळ तिरक्या रेषेत यांची इंटिरिअर मिनिस्ट्री होती. त्या मिनिस्ट्रीवर जे बॉम्ब टाकले होते त्याची ही नळकांडी नेमकी आमच्याच घरावर पडली होती !

संध्याकाळ व्हायला आली होती. बॉम्बिंग, मशिनगन फायरिंग सतत सुरूच होतं. ते काही थांबायचं लक्षण दिसतच नव्हतं. घरावरच शेल्स पडल्यामुळे आम्ही

खरोखरच घाबरलो होतो. भीती वाटत होती की प्रत्यक्ष बॉम्बच पडला तर घर उद्‌ध्वस्त होईल. आग लागेल. काहीही होऊ शकतं.

तेव्हा मुकुंदा म्हणाला की, आपापल्या सूटकेसिस भरून तयार ठेवू या. कोणत्याही क्षणी निघावं लागलं तर आपण तयारीत असू या. प्रत्येकाला आपापली बॅग उचलता आली पाहिजे एवढी छोटीशीच बॅग घ्या. एका छोट्याशाच बॅगमध्ये राहील तेवढंच सामान बरोबर घ्यायचं म्हणजे मोठं मुश्किल काम होतं. काय घ्यायचं आणि काय सोडायचं ? वेळ एवढी कठीण होती तरी चर्चा झालीच. मुलांनी आपापले कपडे भरुन झटकन तयारी केली. मुकुंदाची तयारीही पटकन झाली. सगळयांचे पासपोर्ट, सगळी सर्टिफिकेटस्, घरात होते नव्हते ते सगळे पैसे घेऊन झाले. पण माझी तयारी होईच ना. म्हणजे चार कपडे टाकून बॅग भरून झाली तरी पण मनाची तयारी होईना. मुकुंदा म्हणाला, त्या पंढरपूरला निघालेल्या आवासारखी तुझी स्थिती झालीय. इथं जिवावर बेतली आहे आणि तुझं लक्ष घरात गुरफटलेलं.

पण इथं आल्यावर किती हौशीनं वेगवेगळया वस्तू जमा केल्या होत्या ! आणि त्या आता सगळया टाकून जावं लागणार होतं. सुंदर रंगीत काचपात्रं, तलम, मुलायम, इंद्रधनुषी रंगाचे संगमर्मरी ॲश-ट्रे, मातीची सुबक भांडी, झुळझुळीत पडदे... किती तरी वस्तू... या सगळया इथंच सोडून जायच्या ? इथं आल्यानंतर आलेला भयानक एकाकीपणा घालवण्यासाठी किती तरी वेळ सफरचंदाच्या झाडाखाली, गुलाबाच्या वेलाखाली काढला होता... आपल्याला सगळं माहीत असावं या सोसासोसानं किती तरी ओळखी केल्या होत्या. हे सगळं आता असं एकदमच सोडून जावं लागणार की काय ? जाताना या दोन जळका वास येणाऱ्या शेल्स तेवढ्या घेऊन जाता येतील... असा काहीबाही विचार करीत होते तेव्हाच लक्षात आलं की आता विमानांचा घरघराट कमी झालाय !

दुपारी तीन वाजल्यापासून बंद पडलेल्या काबूल रेडिओने सहा वाजता रेव्होल्यूशनरी कौन्सिलच्या नावाने अत्यंत गंभीर आवाजात एलान केले, " रात्री आठ वाजल्यापासून पहाटे पाच वाजेपर्यंत कर्फ्यू सुरू होईल. रात्री रस्त्यावरचे दिवे कोणी लावायचे नाहीत. सात वाजता एक महत्त्वाची घोषणा करण्यात येईल "

संध्याकाळी सात वाजता हाफिजुल्ला अमीनने या क्रांतीमध्य भाग घेणाऱ्या सगळया आर्मीच्या नेत्यांची रेडिओवरून ओळख करून दिली. मग स्वतः कादीर आपल्या जाड, धीरगंभीर आवाजात फारसीमध्ये बोलू लागला :

" मित्रांनो, अफगाणिस्थानच्या इतिहासात आज प्रथमच लोकांना छळणाऱ्या नादीरखानच्या, जुलमी राजेशाहीच्या शेवटच्या खुणाही आज पुसल्या गेल्या आहेत. आणि आफगाणिस्थानची सत्ता आज लोकांच्या हातात आली आहे. एका नव्या युगाला आज सुरुवात झाली आहे. जुलमी दाऊदचा सफाया करून राष्ट्राची सर्व सत्ता आता सैनिकांच्या रेव्होल्यूशनरी कौन्सिलच्या ताब्यात आहे. नादीर खानदानची जुलमी राजवट

आता संपुष्टात आली आहे.

" साथीदारांनो, तुमच्या आवडत्या देशाचे हे रेव्होल्यूशनरी कौन्सिलचे सरकार तुम्हाला कळवते आहे की, या रेव्होल्यूशनरी कौन्सिलने दिलेले हुकूम, सूचना जो कोणी पाळणार नाही त्याला रेव्होल्यूशनरी कौन्सिलच्या मिलिटरी केन्द्रावर ताबडतोब हजर केले जाईल."

कादरनंतर वतनझारने परतू भाषेत हेच भाषण केले.

ही भाषणं संपेपर्यंतच मालकाचा कॉलेजात जाणारा मुलगा ओमर धावतच आमच्या घरी आला. तोही माझ्या मुलांप्रमाणेच खूप उत्तेजित झाला होता. एक तर तो माझ्या मुलांपेक्षा बराच मोठा होता; आणि त्याच्याच देशात केवढी तरी उलथापालथ झाली होती. त्याचा बाप– म्हणजे आमचा घरमालक हा रिटायर्ड आर्मी जनरल असल्यामुळे कादर, वतनझारबद्दल बोलताना ओमरला फारच अभिमान वाटत होता. तो म्हणाला, " हे सगळं आर्मीच्या लोकांनी घडवून आणलं ! तराकी अमीन सगळे तुरुंगातच तर होते." ओमरचं म्हणणं होतं की कादर लोकात खूपच लोकप्रिय आहे. त्यामुळे बहुधा तोच नवा प्रेसिडेन्ट होईल. रशियानं या लोकांना मिलिटरी मदत खूप दिली असावी असा त्याचा अंदाज होता.

" दाऊदचा सफाया केला असं रेडिओवर म्हणाले. म्हणजे मारलं का त्याला ?"

" अर्थातच !" ओमरला आमच्या प्रश्नाचं खूपच आश्चर्य वाटलं. " त्याला मारल्याशिवाय हे लोक सत्तेवर येतीलच कसे ?"

" तुला आनंद झाला का ?"

" काही सांगता येणार नाही. कादर सगळ्यांचा म्होरक्या आहे ही चांगली गोष्ट आहे. पण आता पुढं काय होतं ते पाहायचं."

दिवसभर चालू असलेलो टेलिफोन संध्याकाळी ७ वाजता बंद झाले होते. त्यामुळे फोनवर कुणाकुणाशी बोलून संपर्क ठेवायचा मार्ग खुंटला होता. सातच्या रेडिओ घोषणेच्या वेळेपासून सगळे रस्ते सुनसान झाले होते. रस्त्यावर अंधार पसरला होता. दिवसभर सतत चाललेली लढाई आता पुष्कळच मंदावली होती. विमानांचा घरघराटही कमी झाला होता, पण थांबला नव्हता. अजूनही कुठेकुठे लढाई चालूच होती.

दिवसभरच्या धकाधकीनं थकून भागून गेलेलो आम्ही आपापसांतच चर्चा करीत होतो. सर्वात मुख्य काळजी म्हणजे उद्या जेव्हा इथल्या क्रान्तीची, लढाईची बातमी सगळ्यांना कळेल तेव्हा घरचे सगळे लोक किती घाबरतील ? किती काळज्या करतील ? याच वर्षी पुण्याच्या कॉलेजात गेलेल्या मंजूला किती काळजी वाटेल ? आपल्या आई-बाबांचं, भावांचं काय झालं असेल, म्हणून किती काळजी करील बिचारी ?

त्यावर मुलांचं मत पडलं की, गेल्या वर्षी तर ती इथंच होती. तिनं गेल्या वर्षीच्या ' जशन 'ची परेड पाहिली आहे. तिला काही भीती वाटणार नाही.

जशन म्हणजे समारंभ. ज्या दिवशी अमानुल्लाने ब्रिटिशांविरुद्धचे युद्ध जिंकले

तो दिवस अफगाण सरकार दरवर्षी राष्ट्रीय दिन म्हणून साजरा करते. त्या दिवशी आपल्या २६ जानेवारीसारखी परेडही असते. पण गेल्या वर्षीची परेड तर चक्क हास्यास्पदच झाली होती. काय ते सैनिक, त्यांचे ते अधिकारी, त्यांचे ते ढगळ कपडे, आणि त्यांचं ते दिव्य मार्चिंग ! शाळकरी पोरांचं मार्चिंग यापेक्षा जास्त चांगलं असतं. मार्चिंग करता करता एका शिपायाची टोपीच खाली पडली. १०–१५ पावलं पुढं गेल्यावर त्याच्या लक्षात आलं. मग तो आपली ओळ सोडून पळतच मागे गेला. तेवढ्यात एका अधिकाऱ्याने त्याला पाहिला. मग तो अधिकारी ओरडला, घाबरलेला शिपाई मग आपली टोपी डोक्यावर बसवीत बसवीत पळतच आपल्या रांगेत येऊन दहिना.... बाया... रास्त.... चाप.... रास्त... चाप करायला लागला. प्रेक्षकांची हसून हसून मुरकुंडी वळली होती. म्हणूनच मुलं म्हणत होती की, अशा सैन्यापासून कोणाला धोका होईल याची शंकाही मंजूला यायची नाही. म्हणून मंजूला काही आपली काळजी वाटायची नाही.

आणि आज त्याच सैन्यानं काय धुमाकूळ घातला होता ! जशनच्या परेडच्या वेळी कादर, वतनदार वगैरे मंडळी कुठे होती ? आपल्या सैन्याच्या एकनिष्ठतेबद्दल संशय आला होता म्हणून, लोकांसमोर सैन्याला हास्यास्पद ठरवण्यासाठीच तर दाऊदने त्या जशनची योजना केली नव्हती ? ओमर म्हणत होता त्याप्रमाणे खरोखरच क्रांतिकारी सैन्याला रशियाकडून सैनिकी मदत मिळाली असेल का ?

आम्हाला सगळ्यात आश्चर्य वाटलं की, एवढा गोंधळ होऊनसुद्धा रस्त्यावर कुठेही पळापळ, घबराट पसरला नव्हता, की वीज, पाणी गेलं नव्हतं. टेलिफोन्ससुद्धा संध्याकाळी बंद पडले होते. दाऊदला मारलं म्हणतात तर त्याची बायको, मुलं, सुना, मुली, जावई, नातवंडं आता कुठं असतील ? त्यांना तुरुंगात टाकलं असेल का ? की, ओमर म्हणतो तसं ते लोक अर्ग पॅलेस जवळच्याच फ्रेंच एम्बसीमध्ये पळून जाऊन सुरक्षित असतील ? ओमर म्हणाला होता तशी जर खरोखरच रशियाने प्रत्यक्ष मदत केली असेल तर ही एका दिवसात उरकलेली क्रान्ती साधी न राहता, चांगलीच रंगतदार होईल का ?

दिवसभर एवढं बॉम्बिंग, फायरिंग सुरू होतं. टॅंक्सचं युद्ध झालं होतं. या सुंदर शहराची काय दशा झालीय कुणास ठाऊक ! आपल्या ओळखीच्यापैकी कुणाला किती त्रास झाला असेल ? या लढाईत कोणी सापडलं तर नसेल ?

एखाद्या देशात क्रान्ती होते तेव्हा त्या देशाचा इतिहास घडत असतो. त्यामुळे कदाचित जगाच्या इतिहासालाही वेगळं वळण मिळण्याची शक्यता निर्माण होते. पण त्याच वेळी व्यक्ती-व्यक्तींच्या आयुष्यांत काय काय उलथापालथी होत असतील ! व्यक्तीच्या आयुष्यात घडणाऱ्या दुर्घटनांना राष्ट्राच्या संदर्भात काहीच किंमत नसली तरी त्या व्यक्तींचं आयुष्य उधळून जातं ते ? पुरात सापडलेल्या वस्तूला जसं स्वतःचं अस्तित्वच नसतं, पुरातल्या पाण्याबरोबर वहात जाणं एवढंच फक्त अस्तित्व उरतं,

तसं या एवढ्या मोठ्या गोष्टी घडत असताना व्यक्तीला काय महत्त्व ? व्यक्तीच्या सुख-दुःखाला काहीच महत्त्व नाही का ?

आणि एकदम आठवलं की, दुपारी बारा वाजता पहिलाच स्फोटाचा आवाज ऐकल्यानंतर माझी दाढ दुखली नव्हती ! सुजलेल्या गालावरून हळुवारपणाने हात फिरवला. चार दिवसांच्या असह्य दाढदुखीचा फक्त सुगावा लागला, प्रत्यक्ष दाढ दुखायची थांबली होती ! केवढा आनंद झाला !

रात्री शांत झोप लागणं शक्यच नव्हतं. कारण रात्रभर थांबून थांबून गोळीबाराचे, स्फोटाचे आवाज येतच होते. पहाटे तर एकदा गोळीबार, स्फोट, विमानांचा घरघराट, टँक्स पळतानाचे दणदणते आवाज, या सगळ्या आवाजांचा धुमाकूळ माजला होता.

दुसऱ्या दिवशी कळलं की रिश्कोरच्या फौजा घेऊन लढणारा लेफ्टनंट जनरल रसूली दाऊदचा सफाया करून रेव्होल्यूशनरी कौन्सिलच्या सत्तेचा एलान केल्यानंतरही अटीतटीनं लढत होता. रात्रभर लढत होता. शेवटी क्रांतिकारी लोकांनी पहाटे त्याच्यावर एकजुटीनं जोराचा हल्ला चढवला. तेव्हा त्याचा विरोध मोडून पडला होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२६
दा. क्र. २३५५७
प्रवास २५।६।८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

६

## क्रांतीचे दिवस

दुसऱ्या दिवशी सकाळीच जामानिमा करून क्रांती ' बघायला ' म्हणून बाहेर पडलो. आणि लगेच लक्षात आलं की, रस्त्यावर एकंदरीतच बायका फारच तुरळक होत्या. अफगाणेतर बाई तर मी एकटीच होते. आमच्या एका स्नेह्यांची कॉलेजकन्यका काबूल पाहायला म्हणून आली होती. ती दोघं आमच्याबरोबर होती. बाकीच्या देशाचे लोकही कोणीच रस्त्यावर नव्हते. यू. एन.चा झेंडा लावलेल्या गाड्यांत बसलेले यू. एन. ऑफिसर्स आपापल्या ' कुळांची ' खबरबात घेत गावातून हिंडत होते. रस्त्यावर गर्दी खूप होती. पण बाया जवळ जवळ नव्हत्याच. कुठे तरी एखाद दुसरी बाई दिसत होती. त्यामुळे जरा चमत्कारिक वाटू लागलं. पण मुकुंदा म्हणाला, पुढच्या चौकापर्यंत जाऊ, वाटलं तर तिथून पुढं जाऊ नाही तर घरी परत फिरू. पुढच्या चौकापर्यंत, पुढच्या चौकापर्यंत असं म्हणत म्हणत सगळीकडे हिंडून आलो.

आज शुक्रवार म्हणजे इथला सुट्टीचा दिवस होता. पण नेहमीसारखीच भाजी, फळं, मटण यांची दुकानं उघडी होती. बेकरी, नानभाई आणि दोन-चार किराणा मालाची दुकानंही उघडीच होती. कोणत्याही वस्तूचे भाव वाढले नव्हते, की असुक एक वस्तू दुकानात नाही असंही कोणी सांगत नव्हतं. टॅक्सीचं भाडं वाढलं नव्हतं, बाकीची दुकानं बंद होती. पण दुकानदार आपापल्या दुकानाची कितपत हानी झाली आहे हे पाहून जात होते. काल दिवसभर बॉम्बिंग होऊनही गावात पडझड झालेली दिसत नव्हती. त्याचा अर्थ बॉम्बिंग अतिशय अचूक होतं. नेमक्या हव्या त्याच ठिकाणी बॉम्ब पडले असावेत. अर्ग पॅलेसकडे जाणारे सगळे रस्ते बंद होते. सगळ्या शहरभर हाताच्या अंतरावर संगिनी घेतलेले, मशिनगन्स घेतलेले सैनिक उभे होते. काळ्या बंद गाड्यांतून, ओव्हरकोटाची कॉलर वर केलेली, फेल्ट हॅट्स् घातलेली, ' कोणी तरी प्रतिष्ठित माणसं ' गावातून सर्रास हिंडत होती. रहस्य-चित्रपटात अशी माणसं पाहायला मिळतात. अर्ग राजवाड्याच्या मागच्या बाजूच्या रस्त्यावर एक बॉम्ब पडला होता तर रस्त्याला केवढं तरी मोठं भगदाड पडलं होतं. पाण्याचे नळ फुटून तळं झालं होतं रस्त्यामध्ये. एक बॉम्ब पडला तर ही अवस्था, जास्त पडले तर काय होत असेल ?

घरांच्या दारं-खिडक्यांच्या काचा, दुकानांच्या शो-केसेसच्या काचा फुटून रस्त्यात काचांचा खच पडला होता. काही काही दुकानांच्या फुटक्या शो-केसेसमधल्या हजारो रुपयांच्या महागड्या वस्तू अगदी उघड्यावर पडल्या होत्या. पण एक वस्तू आपल्या जागेवरून हाललेली दिसत नव्हती! मला इथल्या लोकांचं एवढं कौतुक वाटलं. आपल्याकडे जरा काही गडबड झाली की मोडतोडीचे, दुकानं लुटण्याचे प्रकार किती सर्रास चालतात याची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. ही शिस्त या लोकांच्या रक्तातच आहे की काय? की वर्षोनुवर्षे दडपशाहीच्या राजवटीखालीच काढल्यामुळे अत्यंतिक भीतीपोटी ही शिस्त पाळण्याचं त्यांच्या अंगवळणी पडून गेलंय? परिणाम जर एवढा चांगला होत असेल तर शासनाची भीती असायला काय हरकत आहे? असाही विचार मनात आला. एकच अपवाद होता. चिनी वकिलातीच्या काचेच्या फुटक्या शो-केसमधला, जाणाऱ्या येणाऱ्यांवर सतत लक्ष ठेवून असणारा माओचा खूप मोठा फोटो तेवढा गायब झाला होता.

'अर्ग राजवाड्या'च्या मागच्या बाजूला नईमचं–दाऊदच्या भावाचं घर होतं. त्याच्या घरावर मात्र गोळ्यांचा पाऊस पडलेला दिसत होता. त्या दुमजली घराची प्रत्येक दार आणि खिडकी मोडलेली दिसत होती. त्या घरातल्या माणसांचं काय झालं असेल? त्यांना इथंच मारलं असेल की अर्ग पॅलेसमध्ये नेऊन मारलं असेल? त्याच्या घरासमोरच, फूटपाथवर काळं पडू लागलेल्या लालभडक रक्ताचं थारोळं पाहून केवढं तरी दचकायला झालं. सत्ताबदल होताना, जुलमी राजसत्ता जाऊन त्या जागी समाजवाद येताना, कुणाकुणाचं रक्त सांडलं म्हणून त्याबद्दल भावुक व्हायचं नसतं, हे मला माहीत होतं. पण 'क्रांती' वगैरेसारख्या खणखणीत वाजणाऱ्या शब्दांमागे जो भावुक रोमॅन्टिसिझम आहे त्यापाठीमागं खरं सत्य असतं ते हे काळं पडत चाललेलं लालभडक मानवी रक्त. दारूचा कैफ चढावा तसा या रक्ताचाही कैफ चढतो. त्या कैफाच्या भरात डोळ्यात क्रांती चढलेले लोक काय काय करू शकतात हे सगळं पुढं पाहण्याचं दुर्दैव माझ्या नशिबात लिहिलेलं होतं. वाईट फक्त एकाच गोष्टीचं वाटतं की, या सांडलेल्या रक्ताचा, खरा समाजवाद आणण्यासाठी उपयोग झालेलाच नसतो; फक्त सत्तेच्या राजकारणासाठीच ते रक्त सांडलेलं असतं.

पण आता नईमच्या घरासमोरचं ते मानवी रक्त पाहून मी सुन्न झाले होते. तसेच हजारोंच्या संख्येनं अफगाण लोक निर्विकारपणानं पाहात होते. त्यांना नईमचं प्रेम नव्हतं की दुश्मनीही नव्हती. एका सत्ताधाऱ्याला मारून दुसऱ्यानं सत्तेवर यायचं, हे त्यांना कळत होतं, पण त्यांना ही क्रांतीची भाषा उमगत नव्हती. त्यांच्या चालण्या-बोलण्यात, बघण्यात कसला आनंद नव्हता, कसलं दुःख नव्हतं. फक्त तटस्थ उत्सुकता तेवढी होती.

त्या वेळच्या काही भारतीय वृत्तपत्रांतून बातमी आली होती की, काबूलच्या रस्त्या-रस्त्यांतून लोक क्रांतीचं स्वागत करीत आनंदानं नाचत होते, गात होते. अगदी खोटी गोष्ट आहे ही. फक्त पक्षकार्यकर्त्यांनी आपापल्या भागात आनंद प्रदर्शित केला होता

तेवढाच. बाकीचे लोक, ज्यांना ‘ जनता ’ म्हणतात, त्यांना हे काय झालंय, काय चाललंय याचा अर्थच कळला नव्हता. त्यांना फिकीर पडली होती एकाच गोष्टीची, या सगळया प्रकाराचा परिणाम काय होणार होता ? त्यांच्या रोजच्या आयुष्यात काय फरक पडणार होता ? तोही चांगला की वाईट ?

मनावर विलक्षण दडपण घेऊनच सगळे फिरत होते. एकदमच एक टॅक्सी मुख्य रस्त्यावरून येऊन एका बाजूच्या गल्लीत शिरू लागली. वळणावरचा शिपाई ‘ हाऽऽऽल्ट ’ असं कर्णकर्कश ओरडत हातातली बंदूक रोखून टॅक्सीच्या मागोमाग धावला. वाटलं हा आता बंदुकीचं लोखंडी बॉनेट त्या टॅक्सीवाल्याच्या छातीतच खुपसणार– इतका त्याचा आवेश होता. जडशीळपणानं वाहणारी रहदारी एकदम शॉक लागल्यासारखी निर्जीव झाली. एवढी माणसं होती पण कुणाचा श्वासोच्छ्वासदेखील ऐकू येत नव्हता. आता काय पाहायला मिळतंय कुणास ठाऊक ! ही भीती सगळयांना वाटत होती. टॅक्सीवाल्याचं, शिपायाचं काही तरी बोलणं झालं आणि टॅक्सी मागे फिरून निघून गेली. त्याबरोबर सगळयांनीच सुटकेचा निःश्वास सोडला.

दुसरा दिवसही संपला. ‘ रेव्होल्यूशनरी कौन्सिल ’चा कारभार सुरू होऊन चोवीस तास लोटले होते तरी अजून अफगाणिस्थानच्या नव्या प्रेसिडेन्टच्या नावाचीसुद्धा घोषणा झाली नव्हती. इतर मंत्री वगैरे दूरच. अजूनही रेव्होल्यूशनरी कौन्सिलच्या नावानेच रेडिओवरून सूचना मिळत होत्या. उद्या सकाळपासून शाळा, कॉलेजं, ऑफिसं चालू राहणार होती. सगळी दुकानं, इतर व्यवहार नेहमीसारखेच चालू राहणार होते. जो कोणी ऑफिसला, दुकानात वगैरे न जाता, घरीच बसून राहणार होता त्याला देशद्रोही ठरवून रेव्होल्यूशनरी कमिटीपुढं हजर करण्यात येणार होतं. सर्वसामान्य जीवनात कोणताही खंड पडता उपयोगाचा नाही हे पुन्हा पुन्हा निक्षून सांगण्यात येत होतं.

शनिवारपासून वरवर तरी शहरातले व्यवहार सुरळीत चालू झाले. मुकुंदा नेहमीसारखाच ऑफिसला गेला. दाऊदखानचे ठायी ठायी लागलेले फोटो काढून टाकलेले होते. लोक अजूनही गोंधळलेले, साशंक होते; उत्सुक होते. पण सगळं काही ठीक असल्याचा आव आणून वावरत होते. ऑफिसात कामं करणारे जे पक्षकार्यकर्ते होते ते मात्र अत्यंत उत्साहाने, आनंदाने, नवीन जबाबदारी अंगावर पडल्यासारखे वावरत होते. आपल्या क्रान्तीबद्दल अत्यंत उत्साहाने बोलत होते.

दाऊदचे सगळे मंत्री व हवाईप्रमुख यांना गोळया घालून मारल्याचं काबूल रेडिओनं सांगितलं. नवीन सत्ताधाऱ्यांमध्येच पार्टीचे लोक आणि सैन्याचे लोक यांच्यामध्येच सत्तास्पर्धा, वादविवाद चालू आहेत अशा अफवा पसरल्या होत्या. त्या खऱ्या असाव्यात. कारण क्रांती झाल्यानंतरचा दुसरा दिवस उजाडला तरी अजून राष्ट्राध्यक्ष वगैरेंची घोषणा नव्हती, काही काही गोष्टी कळू लागल्या होत्या.

सैन्याच्या लोकांनी सकाळपासून चालवलेल्या हालचाली दाऊदखानला कळल्या

कशा नव्हत्या ? त्या बाबतीत त्याने काहीच कसं केलं नाही ? या शंका सगळ्यांनाच पडल्या होत्या. पण सैन्याच्या लोकांनी आपला डाव फार हुषारीनं टाकला होता.

२७ एप्रिलच्या आदल्या रात्री बंडखोरांनी खूप मोठ्या मोर्चाची धमकी दिल्यामुळे दाऊदखान काळजीत होताच. त्यामुळे त्या मोर्चाच्या बंदोबस्तासाठी लष्करी हालचाली करूया का ? या बंडखोर लष्कराच्या फसव्या प्रश्नाला दाऊदखानाने अर्थातच 'हो' असेच उत्तर दिले होते. वतनझारचे लष्करी रणगाडे अर्ग पॅलेसभोवतीनं उभे राहिले तेव्हा दाऊदखानला सांगण्यात आलं की ते त्याच्या रक्षणासाठीच उभे आहेत. त्याच्या भोवतीचे बरेचसे रक्षक आणि त्याच्या घरातले काही नोकरसुद्धा फितूर असल्यामुळे हा समजुतीचा घोटाळा किती तरी वेळ तसाच ठेवण्यात आला. जेव्हा वतनझारन अर्ग पॅलेसवरच गोळीबाराला सुरुवात केली तेव्हा कुठे हा सगळा काय प्रकार चाललाय त्याचा पत्ता दाऊदखानला लागला; पण तेव्हा फार उशीर झाला होता. दाऊद पूर्णपणाने बंडखोरांनी वेढला गेला होता.

तीन दिवसांच्या अत्यंत तणावाच्या, संशयाच्या वाट पाहण्यानंतर ३० एप्रिलला रेव्होल्यूशनरी कौन्सिलने सर्वांत महत्त्वाची घोषणा केली. पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या खल्क गटाचा नूरमहंमद तराकी हा राष्ट्राध्यक्ष झाला. हाफिजुल्ला अमीन हा पंतप्रधान, परचम गटाचा बबरक कारमल हा उपपंतप्रधान, आणि सैन्याच्या हालचालींचा सूत्रधार, कॅप्टन कादर हा संरक्षणमंत्री झाला लोकांची अशी अपेक्षा होती की, ज्याच्या बळावर ही क्रांती उभी राहिली, यशस्वी झाली तो कादरच प्रेसिडेन्ट होईल. पण तराकी झाला.

तीन दिवसांच्या अनुभवावरून एक गोष्ट सूर्यप्रकाशाएवढी स्पष्ट झाली होती की, हे लोक जरी याला 'क्रान्ती' 'क्रान्ती' म्हणत होते तरी सर्वसामान्य लोकांची यामधली भागीदारी होती ती फक्त प्रेक्षक म्हणूनच. नव्या सरकारच्या म्हणण्याप्रमाणेच संपूर्ण अफगाणिस्थानात एकंदर लोकसंख्या अठरा दशलक्ष असताना, फक्त पन्नास हजारच लोक पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीचे सदस्य असताना, अत्यंत मर्यादित अर्थाने 'क्रान्ती' म्हणू शकू, अशा या सैनिकी उठावाला झिलई चढवण्यासाठी, तर कादरऐवजी तराकीला राष्ट्राध्यक्ष केले नसेल ?

तीन दिवसांनी शहरातले सगळे रस्ते खुले झाले. अर्थातच एखादी जत्रा भरल्यासारखी रस्त्यावर गर्दी होती. आजही गोरा माणूस कोणीच रस्त्यावर नव्हता. भारतीय मात्र बरेच होते. बायामाणसं खूपच कमी होती. एक गोष्ट मात्र खरी की, अफगाणिस्थानसारख्या मुस्लिम देशात, अशा तंग परिस्थितीतदेखील कुठेही हिंडायफिरायला कधीही भीती वाटली नाही. उलट दिल्लीला मात्र संध्याकाळनंतर जामामशिदीच्या भोवतीच्या भागातून जाता-येताना, भीती वाटली नाही तरी काही तरी चमत्कारिक भावना यायची.

मशिनगनधारी सैन्याची गस्त शहरात सतत चालू होती. शहराच्या महत्त्वाच्या

त्याने निरोप पाठवला की खुद्द कादरने यावे. त्याच्याशी वाटाघाटी करायच्या आहेत. परंतु कादरने स्वतः न जाता, त्याने पुन्हा दुसऱ्याच माणसाला पाठवले. त्या वेळेस दाऊदखान आपल्या मंत्र्यांबरोबर चर्चा करीत याच दिवाणखान्यामध्ये एका गोल टेबला-भोवती बसला होता. तो माणूस आत शिरताच, त्यालाच कादर समजून, एका जाड पडद्याआड लपलेल्या एका गार्डने त्याला सुऱ्याने भोसकून मारण्याचा प्रयत्न केला. पण त्या माणसाला असं काही घडेल याची अगोदरच कल्पना असल्यामुळे तो सावध होता. त्या मारेकऱ्याचा वार चुकवून त्या माणसाने झटक्यातच आपली मशिनगन रोखून फट् फट् फट् भिंतीवर गोळ्या झाडल्या. आणि पुन्हा एकदा दाऊदखानला अत्यंत सन्मानाने ‘ सरदार ’ असं खास अफगाण शैलीनं संबोधून शरणागतीच्या कागदावर सह्या करायला सांगितलं. दाऊदने नाही म्हणताच, त्याने पाठोपाठ पुन्हा एकदा मशिनगनच्या फैरी झाडल्या आणि दाऊदखानसकट सगळ्या मंत्र्यांना मारूनच टाकलं! ही गोष्ट घडायला दोनचार मिनिटंच फक्त लागली असतील!

कोणी म्हणालं, दाऊदखानने शरणागतीच्या कागदावर सह्या करायचं नाकारलं, तेव्हा त्याच्या सगळ्या कुटुंबियांना त्याच्या समोर आणलं आणि “ जर तू सही केली नाहीस तर तुझ्या नातेवाइकांपैकी एकेकाला तुझ्या समोर आम्ही मारू,” अशी धमकी दिली. तरी दाऊदखान बधला नाही. तेव्हा त्यांनी एकेकाला मारायलाही सुरुवात केली. तरीही दाऊदखानने शरणागतीच्या कागदावर सही करण्याचं नाकारलं. तेव्हा संतापून त्यांनी दाऊदखान, त्याची बायको, मुलं, नातवंडं, भावंडं अशी त्याच्या कुटुंबातली छत्तीस माणसं, त्याचे तिथे असलेले मंत्री या सगळ्यांना एका झटक्यात मशिनगनने धडाधड मारून टाकलं! हा सगळा भयंकर प्रकार जिथं घडला तोच हा उबट, कुबट वास येणारा दिवाणखाना!

हिंडून हिंडून आणि काय काय बघून जीव थकला होता. कुठे तरी बसावंसं वाटत होतं. इकडेतिकडे पाहिलं तर एका हिरवळीवर दोनचार किती तरी सुंदर, मौल्यवान गालिचे टाकलेले होते. त्यावर काही लोक बसलेलेही होते. आम्ही पण तिथे गेलो. पण जवळ जाऊन पाहतो तर त्या गालिच्यांवर रक्ताचे डाग ठिकठिकाणी पडलेले होते! उन्हात वाळवणं घालावीत तसे ते गालिचे उघड्यावर पडले होते.

अर्ग महालमध्ये आल्याआल्याच एका मिलिटरी अधिकाऱ्याला विचारलं होतं, की आम्ही फोटो घेऊ का? त्याने आनंदाने, अतिशय उत्साहाने परवानगी दिली होती. तराकी राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर सर्वांत प्रथम रशियाने नवीन सरकारला आपला पाठिंबा दिला होता. पाठोपाठ बल्गेरियाने दिला होता. त्यानंतर भारताने आपला पाठिंबा दिला होता. त्यामुळे अफगाण सैनिक, पार्टी-वर्कर्स अगदी खूष होते. हातात हात घेऊन भारतीयांचे आभार मानीत होते. त्यामुळे फोटो काढण्यासाठी कसलीच, कुठेच अडचण आली नाही. एका सैनिकाचा फोटो काढावासा वाटला, तेव्हा त्याला तसं विचारल्यावर अगदी खूष झाला. लगेच आपली टोपी ठाकठीक करून घातली, कोट ओढून ताणून

घेतलान, हातातली बंदूक व्यवस्थित धरून लगेच ताठ उभा राहिला. आम्ही त्याचा फोटो घेतला. त्याचा केवढा आनंद झाला होता त्याला !

## ‘ क्रांती ’ अशी झाली होती

क्रांतिकारी नवीन सरकार सत्तेवर येऊन आता आठ-दहा दिवस होऊन गेले होते. एखादं स्वप्न पाहावं तशा त्या दोन-तीन दिवसांच्या घटना वाटतात. काबूलमधलं दैनंदिन आयुष्य लगेच सुरळीत सुरू झालं. सगळी ऑफिसं नीटपणानं चालू झाली. ऑफिसातला अधिकारीवर्ग बदलला असला तरी किती तरी चेहेरे दिसेनासेच झाले. कोणी ‘ नाहीसे ’ झाले, कोणी तुरुंगात गेले, कुणाच्या घरावर पहारे बसले. शाळा कॉलेजे नियमित, सुरळीतपणानं चालू झाली. बाजारातली गर्दी पूर्वीसारखीच चालू झाली. नाही म्हणायला पाश्चात्य प्रवाशांनी गजबजलेले रस्ते, हॉटेलं, मॉटेलं आता पुष्कळच रिकामी झाली.

पुष्कळशा डाव्या विचारसरणीच्या लोकांनी आपापले पासपोर्ट्स तयार ठेवले. क्रांती होऊन दाऊदचं राज्य गेल्याची त्यांना खुषी असली तरी सत्ता ज्यांच्या ताब्यात गेली होती, त्यांच्याबद्दल ते नाखूष झाले; संशयी झाले. कारण नवे सत्ताधीश आधारासाठी, मदतीसाठी परक्यांच्या चेहऱ्याकडे पाहणारे आहेत, या गोष्टीची त्यांना भयंकर धास्ती तर वाटलीच, पण त्याचबरोबर त्यांना कसल्या तरी अनामिक संकटाची चाहूल लागली. म्हणून त्यांनी आपापले पासपोर्ट्स तयार करून घेतले. वेळ आली तर पाकिस्तानात पळून जाण्यासाठी !

हळूहळू २६ च्या रात्री, २७ च्या दिवसभर, २८ च्या पहाटे नक्की काय झालं होतं त्याबद्दलच्या बातम्या कुणाकुणाकडून कळायला लागल्या.

२५–२६ एप्रिलच्या मध्यरात्री तराकीला पकडून नेलं होतं; पण अमीनला त्याच्या राहत्या घरातच नजरकैदेत ठेवलं होतं. दारावर एक संत्री रखवाली करीत होता. तेव्हापासूनच अमीनने कामाला सुरुवात केली. काय करायचे, कसे करायचे याचा सगळा बेत त्याने आखला. आणि त्याप्रमाणे आपल्या सतरा वर्षांच्या मुलाबरोबर, अब्दूर रहमानबरोबर त्याने त्या रात्रीच हवाई अधिकारी गुलाबझाई, सैन्याचा कॅप्टन कादीर (त्याने दाऊदखानला सत्तेवर येण्यासाठी खूप मदत केली होती. पण नंतर त्याच्या ‘ डाव्या ’ हालचालींमुळे रागावून, दाऊदखानने त्याला मेजरचा कॅप्टन केला होता.) मेजर वतनझार ( यानेही दाऊदला सत्तेवर येण्यासाठी बरीच मदत केली होती. पण दाऊदची नंतरची वागणूक पाहून याचाही भ्रमनिरास होऊन हासुद्धा कादरप्रमाणे परचमी लोकांच्या आतल्या वर्तुळातला झाला होता. ) आणि आपले इतर राजकीय सहकारी यांच्याकडे भराभर निरोप पाठवले. कुणी काय करायचे, कुठे जमायचे, कुठून कुठे, कसे जायचे याबद्दलच्या सगळ्या बारीकसारीक सूचना अमीनने पाठवल्या. लष्कर, हवाई-

दल, पक्षनेते, पक्षकार्यकर्ते यांच्यामधला दुवा म्हणून फकीर महंमद फकीर याने काम करायचे होते. हा फकीर महंमद फकीर मुकुंदाच्या ऑफिसात अगदी साधा कारकून होता ! नूर महंमद तराकीच्या सुरुवातीच्याच दोनचार टी. व्ही.वरच्या कार्यक्रमांपैकी एकदा हा फकीर, तराकीच्या पाठीमागेच लष्कराचा गणवेष वगैरे घालून मोठ्या रुबाबात उभा असलेला पाहून मुकुंदाला आश्चर्यानं एकदम धक्काच बसला. रोज दृष्टीस पडणारा हा अगदीच सर्वसाधारण माणूस एकदम 'तिथंच' पोचलेला पाहून वाटलेलं ते एक प्रचंड मोठं आश्चर्य होतं !

२६ एप्रिलच्या सकाळी आठ वाजता एंजिनिअर मोहम्मद जरीफ हा अमीनला भेटायला त्याच्या घरी गेला. घरात गेला आणि थोड्या वेळाने टॅक्सीवाल्याला पैसे देण्यासाठी बाहेर आला. पैसे देऊन पुन्हा घरात जाऊ लागला तेव्हा त्याला दारावरच्या सैन्याने अडवले. पण अमीनचा मुलगा मात्र मध्यरात्रीपासून सकाळी साडेदहा वाजेपर्यंत आपल्या वडिलांचे निरोप पोचवण्याचे, हेलपाटे घालण्याचे काम निर्वेधपणाने करत होता. त्याला काही त्या सैन्याने अडवले नव्हते. कदाचित तो कशासाठी एवढे हेलपाटे घालतोय हे त्या सैन्याच्या लक्षातच आलं नसेल. वरून ऑर्डर फक्त दारावर उभं राहण्याची होती. ते काम त्यानं इमाने इतबारे केलं होतं. किंवा अशीही शक्यता असावी की, तो कशासाठी हे हेलपाटे घालतोय याची पूर्ण कल्पना असल्यामुळेच त्याने तिकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून, सगळे काम निर्वेधपणे पार पाडू दिले असावे. कारण लष्करामध्ये सर्व थरांवर तराकी, अमीन, बबरक यांच्याबद्दल आत्मीयता असणारे किती तरी लोक होतेच !

२६ एप्रिलला सकाळी साडेदहा वाजता हाफिजुल्ला अमीनलाही पकडून नेण्यात आलं. ही बातमी कळताच डाव्या वर्तुळात घबराट पसरली. जलसिंचन खात्यामधल्या एका डाव्या ज्येष्ठ कार्यकर्त्याकडे लष्करामधले दोघे घाबऱ्या घाबऱ्या जाऊन म्हणाले, "आता आपण सगळेच जण मोठ्या संकटात आहोत. दाऊदने फार मोठा बेत आखला आहे. कम्युनिस्टांच्या अगदी खालच्या पातळीवरच्या कार्यकर्त्यांपर्यंत तो सगळ्यांची धरपकड करणार आहे. काबूलच्या चौकाचौकांतून त्यांना मारणार आहे."

पण तो कार्यकर्ता म्हणाला, "एवढं घाबरायचं काही कारण नाही. तसं काही व्हायचं नाही. काय काय होतंय ते पाहू या, आणि मग काय करायचं ते ठरवू या."

इकडे दाऊदखानचा वेगळाच बेत घाटत होता. अर्ग महालामध्ये आपला धाकटा भाऊ नईम आणि इतर सहकाऱ्यांबरोबर चर्चा केल्यानंतर त्याने निर्णय घेतला होता की दुसऱ्या दिवशी, म्हणजे २७ एप्रिलला त्या सातही जणांना भरदुपारी बारा वाजता पख्तुनिस्तान चौकात फाशी द्यायचं ! आणि त्यांची प्रेतं तशीच लटकवीत ठेवायची; म्हणजे लोकांना दहशत बसेल !

दाऊदखानचं दुर्दैव असं की, अर्ग महालचे किती तरी संरक्षकच काय पण त्याच्या घरातल्या कित्येक नोकरांपैकी किती तरी लोक क्रांतिकारकांना फितूर होते. त्यामुळे अर्ग

महालमध्ये ठरलेली प्रत्येक गोष्ट क्रांतिकारकांना ताबडतोब कळत होती. पख्तुनिस्तान चौकात फाशी देण्याचा बेत कळल्यावर सगळे कार्यकर्ते भराभरा भूमिगत झाले. संध्याकाळी पाच वाजल्यापासून त्यांनी एका गुप्त ठिकाणी मीटिंग घेतली. संध्याकाळी सात वाजता त्यांनी दाऊदखानकडे आपले मोर्चासंबंधीचे निर्वाणीचे निवेदन पाठवून दिले. त्यांची ही मीटिंग पहाटेपर्यंत चालली होती.

क्रांतिकारकांचा निर्वाणीचा निरोप कळताच दाऊदखानानेही आपल्या बेतात बदल केला. त्या सात जणांना अकरा वाजताच 'मिनिस्ट्री ऑफ इंटीरिअर्स'मध्येच गुपचूपपणानं मारुन टाकायचं त्यानं ठरवलं. पण ही बातमीसुद्धा क्रांतिकारकांना कळली. अमीनने आदल्या रात्रीच आपल्या मुलाकरवी सगळ्यांना आपल्या बेताची कल्पना दिली होती. पण आता खुद्द अमीनच तुरुंगात होता. शेवटी या क्रांतिकारकांच्या गुप्त बैठकीत निर्णय घेण्यात आला की, आता कसलीही वाट न पाहता आपणच हल्ला करायचा.

अमीनच्या बेताप्रमाणे सर्वांनी एकदमच आपापल्या ठिकाणाहून उठाव करायचा बेत काही अंमलात आणता आला नाही. कारण आदल्या रात्रीच बरेच कार्यकर्ते भूमिगत झाल्यामुळे आणि मुख्य लोक पहाटेपर्यंत गुप्त बैठकीतच गुंतल्यामुळे त्यांचे आपापसांतले संधान जुळू शकले नाही. सकाळी ६ ते ८ च्या दरम्यान गुलाबझाई याने 'देहमझांग' या तुरुंगात– जिथे नेहमी राजकीय कैद्यांना वेगळं ठेवलं जायचं, तिथं जाऊन मेजर असदुल्ला, मेजर तरोन वगैरेंनी उठाव करण्याचा निर्णय घेतल्याची बातमी दिली.

त्यानंतर लष्करामध्ये जे पाठिंबा देणारे होते त्यांनाही उठाव करण्यासंबंधीचा निरोप पोचवण्यात आला. सकाळी ९ वाजता मेजर वतनझारने पुल–ए-चरखी इथल्या लष्करी कॅम्पमध्ये बंदुकीच्या फैरी झाडून, मोठ्या उत्साहाने क्रांतीची घोषणा केली. त्याच्या मागे असलेल्या लोकांनी या जाहीर घोषणेचे स्वागत केले.

पण जे लोक दाऊदच्या बाजूचे होते, किंवा ज्यांना कुणाचंच सोयरसुतक नव्हतं, अशांना काय करावे ते कळेना. ते लोक चांगलेच गोंधळात पडले. आणि वतनझारला विरोध करण्याऐवजी, पुढे काय होतंय त्याची वाट पाहात ते स्वस्थच बसून राहिले.

लष्करी वर्तुळात बातमी पसरायला वेळ लागला नाही. दाऊदच्या पाठिराख्यांनी जुळवाजुळव करायला सुरुवात केली. विमानतळाचा रस्ता बंद करण्यासाठी, क्रांतिकारकांना थोपवून धरण्यासाठी दाऊदवाल्यांचे रणगाडे धावू लागले. संरक्षण खात्याचा पुल-ए-चरखीशी संबंध तोडण्याचा हुकूम देण्यात आला. सगळ्या कमांडर्सनी आपापली पथके घेऊन अर्ग महालाकडे जावे असा हुकूम निघाला.

पण बरेचसे कमांडर्स रात्रभर चाललेल्या पार्टीमध्ये रमले होते. आदल्या दिवशी भराभरा सगळ्यांना पकडल्यामुळे बिनधास्त झालेल्या लेफ्टनंट जनरल गुलाम हैदर रसुलीने सगळ्या जनरल्सना, गद्दार, काफर, देशद्रोह्यांना पकडल्याचा आनंद

साजरा करण्याचा हुकूम सोडला होता. आणि त्या हुकुमाची तंतोतंत तामिली रात्रभर चालली होती. इतकी की सकाळी रसुलीने जेव्हा सगळ्या जनरल्सना आपापली पथके घेऊन सज्ज होऊन अर्ग महालाकडे जायला सांगितले. तेव्हा उत्तर मिळाले होते की, सगळे-जण पिऊन इतके तर्र झाले आहेत की लष्करी हालचाली करण्याच्या परिस्थितीत कोणी नाहीच. जे कोणी चांगले होते त्यांनाही घाई करण्याची जरूर वाटत नव्हती. 'काय चाललंय, कोण काय करतंय, कोण जिंकते आहे वगैरे एकंदर रागरंग पाहून काय करायचे ते ठरवू' ही त्यांची वृत्ती होती.

लष्कराचा एकंदर रागरंग पाहून रसुलीने हेरतच्या हवाई कमांडरला मदतीला बोलावले; कारण काबूलजवळच्या चाळीस मैलांवरच्या बेग्राम विमानतळावर त्याचा आता विश्वास राहिला नव्हता. हेरतहून दोन लढाऊ मिग विमानं काबूलला आली.

तोपर्यंत वतनझार आपल्या ४०-५० लहानमोठ्या रणगाड्यांसह काबूलमध्ये घुसला होता. आतापर्यंत दाऊदवाल्यांचेही रणगाडे हळूहळू रस्त्यावर येऊ लागले होते. पण कुणाचाच पायपोस कुणाच्या पायात नाही, अशी स्थिती झाली होती. कोण शत्रू, कोण मित्र तेच कळत नव्हते. समोरून येणारा रणगाडा हा आपला की त्यांचा हे दोन्ही पक्षांना कळत नव्हतं. चार दिवसांनी अर्ग महालाभोवतीनं क्रांतिकारकांचे जे चार विध्वंस झालेले रणगाडे पाहिले होते, त्यांपैकी दोन दाऊदवाल्यांनी उडवले होते तर दोन त्यांच्याच लोकांनी चुकून उडवले होते!

अर्ग महालासमोरच्या संरक्षण मंत्रालयाजवळ आल्यानंतर वतनझारने रणगाड्यां-वरून पॅलेसवरच गोळीबाराला सुरुवात केली; आणि सगळे काबूल दणाणले होते. वतनझारचा तो ४०-५० रणगाड्यांचा ताफा, त्याच्या गोळीबाराचा दणदणाट पाहून छोट्या छोट्या लष्करी पथकांनी लढायचेच नाकारले. त्यांची वृत्ती अशी होती की, या लढाईत कोण जिंकतो ते पाहून मग त्यालाच आम्ही आमचा पाठिंबा देऊ.

दाऊदच्या बाजूने एकटा रसूली सगळी धावाधाव करीत होता. काबूलमधली एकंदर परिस्थिती पाहून तो स्वतः 'करघा' या काबूलपासून ८-१० मैलांवर असलेल्या लष्करी तळाकडे निघाला. उघडपणाने आपण गेलो तर मध्येच आपल्याला कोणी मारील म्हणून बिचारा साध्या टॅक्सीने निघाला. पण दुर्दैव असे की, गोळीबाराचा आवाज ऐकून सैरावैरा धावणाऱ्या रहदारीत तो सापडला. त्याच्या टॅक्सीला अपघात झाला. रसुलीचा हात मोडला. तसाच तो करघाला पोचला. तर तिथला कमांडिंग ऑफिसर रजेवर गेलेला होता. दुय्यम कमांडिंग ऑफिसरने रसुलीकडे लक्षच दिलं नाही. त्याचं म्हणणं होतं, "संरक्षण मंत्रालयाकडून हुकूम आल्याशिवाय मी काही करणार नाही."

पण शेवटी रसुलीचा जावईच एक तुकडी घेऊन काबूलला जायला तयार झाला. तो निघालाही. पण काबूल शहरात शिरतानाच लागणाऱ्या रशियन तंत्र-विद्यालयाजवळ खल्की लष्कराने त्याला अडवल्यावर तो परत करघाला निघून गेला.

तोपर्यंत दुपारचे २-२॥ वाजले होते. आता खल्की लोकांनी बेग्राम विमानतळा-

वरून काबूलवर बॉम्बहल्ला चालू केला. दाऊदचं दुर्दैव असं की त्याच्याजवळच्या विमान-विरोधी बंदुका काही तरी बिघाड झाल्यामुळे चालतच नव्हत्या.

करग्राकडून रसूली रिश्कोर या मिलिटरी कॅम्पवर पोचला. हा कॅम्प दारुलअमन राजवाड्यापासून ४–५ मैलांवर आहे. तिथले सगळेच कमांडर्स दाऊदखानशी इमान राखून होते. रसूली रिश्कोरच्या फौजा घेऊन अर्ग महालाकडे निघाला. त्यांच्यामध्ये आणि पॅलेस फौजांमध्ये फक्त दीडदोन मैलांचं अंतर उरलं होतं. पण त्यांची बिनतारी संदेशाची व्यवस्था मोडल्यामुळे त्या दोघांनाही एकमेकांशी संपर्क ठेवता आला नाही.

संध्याकाळी साडेपाच वाजता खल्की लष्कराने रेडिओ अफगाणिस्थानची इमारत ताब्यात घेतली. त्याच वेळी खल्की फौजेनं तराकी, अमीन वगैरेंची सुटका केली. काही दगाफटका होऊ नये म्हणून कॅप्टन कादरने तराकीला ताबडतोब काबूल हवाई तळावर नेले आणि कडक बंदोबस्तात ठेवले. इकडे अमीन एका रणगाड्यात बसून रेडिओ अफगाणिस्थानच्या ऑफिसमध्ये गेला आणि ताबडतोब ती इमारत ताब्यात घेऊन त्याने वतनझार आणि इतर खल्की जनरल्सशी संपर्क साधला.

सहा वाजता काबूल रेडिओने एकच घोषणा केली, " आठ वाजल्यापासून संचार-बंदी सुरू होईल. सात वाजता महत्त्वाची घोषणा करण्यात येणार आहे."

सात वाजता हाफिजुल्ला अमीनने क्रांती घडवून आणणाऱ्या सर्व लष्करी लोकांची ओळख करून दिली. आणि त्यानंतर कॅप्टन कादीरने नव्या क्रांतिकारी युगाची घोषणा केली !

ही घोषणा ऐकून सगळ्यांनाच वाटलं की, झालं, लढाई संपली. खल्की क्रांति-कारकांचा विजय झाला.

पण तसे झाले नव्हते. लेफ्टनंट जनरल रसूली रिश्कोरच्या फौजा घेऊन पहाटे-पर्यंत लढत होता. आणि हे अर्ग महालाच्या फौजांना कळत नव्हतं. आणि अर्ग महालाच्या फौजा अजून लढताहेत हे रसुलीला कळत नव्हतं. दोघांमध्ये अंतर होतं फक्त एक-दीड मैलांचे. रात्रभर लढाई कुठे कुठे सुरूच होती. पहाटे पहाटे खल्की विमान तुकड्यांनी नेटाचा बॉम्बहल्ला करून रिश्कोरच्या फौजेचा विरोध, रसुलीचा विरोध मोडून काढला. शेवटी शेवटी, लढणारे शिपाई एक एक जण मुकाट्याने लढणं सोडून निघूनच जाऊ लागले. पहाटे साडेचार वाजता रिश्कोरच्या फौजा खल्की फौजेला शरण गेल्या आणि ही चिमुकली लढाई थांबली. हा सैनिकी उठाव यशस्वी झाला. क्रांती घडून आली.

## शुद्धीकरण

नूरमहंमद तराकी यांना १४ जुलै १९७८ रोजी ६२ वर्षे पूर्ण झाली. राष्ट्रीय सण म्हणून त्यांचा वाढदिवस साजरा केला गेला. रोज रात्री अकरा वाजता सुरू होणारी संचारबंदी

त्या दिवशी शिथिल करून बारा वाजेपर्यंत लोकांना हिंडा-फिरायला मुभा दिली होती.

राष्ट्राध्यक्ष तराकी यांचा चेहरा अतिशय सौम्य, शांत होता. दोन दोन तास टी. व्ही.वर भाषणं देऊनही हळू आवाजात, संभाषण–पद्धतीने आणि तरीही ठामपणानं बोलायचा. आवेश, संताप, वरच्या पट्टीचं बोलणं कधीच नव्हतं. एखादी गोष्ट लहान मुलाला समजावून सांगावी तसं, मोठेपणाचं, प्रौढपणाचं बोलणं असे. घरातल्या म्हाताऱ्या आजोबासारखं त्याचं व्यक्तित्व वाटायचं.

त्याउलट पंतप्रधान हाफिजुल्ला अमीनचं व्यक्तित्व उग्र, रागीट चेहरा, आवेशानं, चिडून, आग्रही बोलणं. हा माणूस काय वाटेल ते बरंवाईट करू शकेल असं चेहऱ्यावरून वाटायचं. मी असं एक-दोघा अफगाणांजवळ बोललो तर ते म्हणाले, ‘ ते दोघे तसे दिसतात, पण वागणं अगदी दिसण्याच्या उलट. अमीन सरधोपट माणूस. तराकी मात्र कावेबाज.’ त्या दोघांच्याही निस्पृहपणाबद्दल मात्र कुणालाही संशय वाटत नव्हता. सत्तेवर आल्यानंतर इतके दिवस होऊन गेले तरी त्यांच्या नातेवाइकांना अधिकाराच्या जागा मिळाल्या नाहीत, की त्यांना स्वतःला श्रीमंती आली नाही. अमीन आपल्या जुन्याच घरात रहायचा. तराकी मात्र अर्ग पॅलेसमध्ये राहायला गेला. तेही सुरक्षिततेच्या दृष्टीनं सोयीचं असावं म्हणून.

पूर्वीच्या सगळ्या पक्षकार्यकर्त्यांना मात्र साहजिकपणेच अतिशय महत्त्व आलं. ज्या कार्यकर्त्यांना अधिकाराच्या जागा मिळालेल्या नाहीत ते म्हणत, सगळ्यांनाच कशा अधिकाऱ्याच्या जागा मिळणार ! पार्टीचं काम करायला मिळालं की पुरे. आम्हाला त्याच्याशीच कर्तव्य आहे, आम्हाला लोकांची सेवा करायची आहे. वगैरे....वगैरे.

राज्यक्रांती झाली आणि तराकी राष्ट्राध्यक्ष झाल्याझाल्याच, तराकी हे कोणत्या टोळीचे आहेत याची चर्चा सुरू झाली. महंमदझाई, अचकझाई, युसुफझाई, हजारा की ताजिक ? पण याचं नक्की उत्तर कुणालाच माहीत नव्हतं. तराकी हा मूळचा गझनीचा राहणारा एवढंच लोकांना माहीत होतं. म्हणजे कदाचित ‘ कूची ’सुद्धा असू शकेल. शेकडो वर्षांपासून आपापली मेंढरं, उंट घेऊन थंडी–उन्हाळा या ऋतूंप्रमाणे हिरव्या कुरणांच्या शोधात भटकणारी ही भटकी जमात. अफगाणिस्थानातल्या राज्यकर्त्यांनी यांना फुकट जमिनी कसायला दिल्या तरी स्थायिक न होणारी, ज्यांच्यापुढे हात टेकलेली अशी ही भटकी जमात. यातली थोडीफार कुटुंबं स्थायिक झाली होती. त्यांतलेच एक कुटुंब तराकीचे. टोळीप्रधान अफगाणिस्थानातल्या राजकारणात कोण कुठल्या टोळीचा, जमातीचा, खानदानाचा याला अजूनही फार महत्त्व आहे.

वयाच्या सहाव्या सातव्या वर्षापासूनच मोलमजुरीचं काम करावं लागलेल्या तराकीला ज्ञानाची हाव लहानपणापासूनच होती. कमालीच्या गरीबीतसुद्धा हा मुलगा लिहायवाचायला शिकला. चौदा पंधरा वर्षांचा झाल्यावर सुकामेवा, फळांचा व्यापार करणाऱ्या एका अफगाण व्यापाऱ्याबरोबर थेट मुंबईला गेला. तेथे तेरा वर्षं राहिला. तिथल्या क्रॉफर्ड मार्केटची अजूनही पक्की आठवण आहे असं एकदा त्याने सांगितले

होते. नोकरी करता करता त्याने मॅट्रिकचा अभ्यास केला. आणि मुंबईची मॅट्रिकची परीक्षा पास केली. इंग्रजी शिकला. भरपूर वाचन केलं. तराकी हिंदुस्थानातून परत अफगाणिस्थानात आला तेव्हा इथे हुशार, चुणचुणीत इंग्रजी येणाऱ्यांची कमतरताच होती. म्हणून इथे आल्यानंतर त्याला अमेरिकेतल्या अफगाण वकिलातीत भाषांतर-काराची, प्रेस आताशे म्हणून नोकरी लागली. अमेरिकेत असताना एकदा तराकी, जाहीरशहाविरुद्ध, त्या वेळच्या सर्वसामान्य अफगाण माणसाच्या हलाखीबद्दल, इथल्या गरीब, अशिक्षित जीवनाबद्दल काही तरी बोलला. अर्थातच त्याला पुन्हा परत अफगाणिस्थानात बोलावून घेतले गेले. अपेक्षेप्रमाणे त्याला परत आल्यानंतर तुरुंगात मात्र जावं लागलं नाही, फक्त ताकीद मिळाली. त्यानंतर मग काही वर्षे त्याने मास्तरकी केली, आणि मग अमेरिकन वकिलातीमध्ये भाषांतरकाराचं काम केलं. आणि ही सगळी वर्षे साम्यवादाचा अभ्यास करण्यात, विचार करण्यात, मित्रांबरोबर चर्चा करण्यात गेली होती. मार्क्सवादी तराकी घडत होता.

हाफिजुल्ला अमीनने अफगाणिस्थानात कॉलेजपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र हेच त्याचे विषय होते. मग एका शाळेत मास्तरकीचं काम बरेच वर्षे केले. नंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकन शिष्यवृत्ती मिळाली म्हणून अमीन अमेरिकेत गेला. तिथे दोनचार वर्षे डॉक्टरेटसाठी अभ्यासही केला. पण डॉक्टरेट मिळायला अवघे सहा महिने असतानाच अमीन आपले शिक्षण संपवून परत आला. तो असा घाईघाईने का परत आला, ते सुद्धा हातातोंडाशी आलेली डॉक्टरेट सोडून, त्याचं कारण कोणीच कधी सांगत नाही. अमेरिकन सरकारनेसुद्धा त्या बाबतीत कसलाच खुलासा केलेला नाही.

कादरचा बाप, भाऊ वगैरे जाहीरशहाच्या जमान्यात कशामुळे तरी मारले गेले होते. त्यामुळे कादर लहानपणीच अनाथ झाला होता. दाऊदखानने कादरला स्वतःच्या मुलांच्या बरोबरीने वाढवले, शिकवले. अफगाणिस्थानातले शिक्षण पूर्ण झाल्यावर कादर लष्करी शिक्षण घेण्यासाठी रशियात गेला होता. तिथले शिक्षण पूर्ण करून परत आल्यावर कादर अफगाण आर्मीमध्ये हुद्देदार झाला होता.

२७ एप्रिलला रेव्होल्यूशनरी कौन्सिलने, ‘इस्लामी रिपब्लिक दा अफगाणिस्थान’ हे नाव जाहीर करून आपल्या कारभाराला सुरुवात केली होती. दाऊदखानच्या पाठोपाठच त्याचे भाऊ, बहिणी, काके, मामे वगैरे नातेवाइकांना, त्याच्या मंत्र्यांना आणि इतर संबंधितांना भराभर मारून टाकायला, तुरुंगात टाकायला सुरुवात झाली. त्यांची घरंदारं, इस्टेटी सरकारजमा झाल्या. कादर आणि बबरक यांना एवढ्या रक्त-पाताची जरूर भासत नव्हती. त्यांनी विरोधही दर्शवला पण तराकी–अमीन यांच्यापुढे त्यांचे काही चालले नाही. नवीन राजवटीमध्ये राष्ट्राध्यक्ष कोणी व्हावे यावरून चार दिवसांच्या तंग वातावरणानंतर ‘डेमोक्रॅटिक रिपब्लिक दा अफगाणिस्थान’च्या सरकारची कायदेशीर स्थापना झाली. आता ‘इस्लामी’ हा शब्द काढून टाकण्यात

आला होता.

एखाद्या देशात साम्यवाद्यांचं राज्य सुरू झालं की, ज्या विशिष्ट तऱ्हेने वाटचाल सुरू होते, त्या खास तऱ्हेनं नव्या अफगाण सरकारने आपली पावलं टाकायला सुरुवात केली. दाऊदखानच्या संपूर्ण खानदानाचा नायनाट केल्यानंतर त्यांच्या इस्टेटीच काय पण त्यांची राहती घरं, घरातलं सामानसुद्धा सरकारजमा करण्यात आलं. आणि त्या सगळ्या चीजवस्तूंचं प्रचंड मोठं प्रदर्शन सरकारनं मांडलं. सरकारनं या प्रदर्शनाचा बराच गवगवा केला. ' जुल्म जबरदस्तीचं, दडपशाहीचं, सरंजामशाहीचं राज्य करणारे, आपल्या लोकांना दारिद्र्यात पिचत ठेवून स्वतः किती ऐषारामात राहात होते ते पाहा....' अशी जाहिरातही सरकारने खूप केली. त्यामुळे पहिले काही दिवस खूपच गर्दी उसळली होती ते प्रदर्शन पाहायला. खुद्द दाऊदखान, मग त्याचे भाऊ, काके, पुतणे, मुलं, जावई, बहिणींचे नवरे अशा वीस-पंचवीस जणांच्या घरातलं सामान जसंच्या तसंच आणून वेगवेगळ्या दालनांत मांडून ठेवलं. मुख्य राजवाड्यातल्या मौल्यवान शोभेच्या वस्तू, सोन्या-चांदीची, चिनी मातीची सुंदर भांडीकुंडी, तैलचित्रे, कुणी कुणी दिलेल्या भेटी, तलवारी, कट्यारी असल्या गोष्टींचं दालन वेगळं. त्या वस्तूंवर किमतीची लेबलं लावली पण त्या वस्तू विक्रीसाठी नव्हत्या. त्या वस्तू म्युझियममध्ये ठेवणार होते. पण बाकी सगळ्या घरगुती वस्तू विकायला काढल्या. प्रत्येक वस्तूवर सरकारने ठरवलेल्या किंमतीची लेबलं लावली. आपल्यासारख्यांच्या सर्वसाधारण माणसांच्या घरातसुद्धा किती वस्तू असतात. मग ते लोक तर काय, शाही घराण्यातले. अमाप वस्तूंचं भांडार उघडलं तिथं. बरेचसे लोक विशेषतः बायका तऱ्हेतऱ्हेचे पोषाख, सौंदर्यप्रसाधने, बूट, चपला, पर्सेस, अत्तरे या वस्तू बाजारापेक्षा किती तरी स्वस्त मिळतात म्हणून सर्रास विकत घेत होत्या.

पण गर्दीचाही आपला असा एक ढंग असतो. सुरुवाती-सुरुवातीला निव्वळ उत्सुकतेपोटी गर्दी करणारे लोक नंतर तिकडे फिरकेनासे झाले. एक तर लोकांची अपेक्षा होती की, सरकारनं एवढी जाहिरात केली आहे, तेव्हा ते लोक खरंच अत्यंत ऐषारामात राहात असावेत. पण त्यांच्या घरातलं सामान पाहून काही तसं दिसत नव्हतं. सर्वसाधारणपणे बऱ्यापैकी श्रीमंत असणाऱ्याच्या घरात जेवढं आणि ज्या किंमतीचं सामान असतं, तेवढंच आणि तेवढ्याच किंमतीचं सामान इथं पाहायला मिळत होतं. पिढ्यान् पिढ्या राज्य करणारे हे लोक तसं पाहायला गेलं तर बेताच्या श्रीमंतीतच राहात होते. त्यांच्या श्रीमंतीचा सल वाटावा एवढी श्रीमंती दिसत तरी नव्हती. का त्यांनी आपला पैसा परदेशी बँकांमधून ठेवला होता, कुणास ठाऊक! पण तसंही नसावं. कारण क्रांतिकारी सरकारनेही तसा आरोप केला नव्हता.

असं प्रदर्शन मांडण्याची कल्पनाच अफगाण लोकांना आवडली नाही. काही झालं तरी दाऊद हा त्यांच्या प्रजासत्ताकाचा रईस होता. शाही खानदानाचं रक्त वाहात होतं त्याच्या अंगात. अशा माणसाचं प्रदर्शन कशाला मांडायचं? सर्वसाधारणपणे सामान्य माणसाला राजेशाहीचं भावनिक आकर्षण असतंच. अफगाण माणसाला ते

जरा जास्तच आहे. म्हणूनच त्याला हा प्रदर्शनाचा प्रकार आवडला नाही.

शिवाय सरकारने जाहिरातबाजी केली तेवढी श्रीमंतीसुद्धा कुठेच दिसली नाही. की त्या सगळ्या श्रीमंती वस्तू पक्षकार्यकर्त्यांनी पळवल्या? अशी शंका बोलून दाखवायलाही काही लोकांनी कमी केलं नाही. पण तसे नसावे. कारण अजूनपर्यंत तरी मिळालेल्या या नवीन अधिकाराचा असा दुरुपयोग कोणी केलेला ऐकिवात तरी नव्हता.

या प्रदर्शनापाठोपाठच, क्रांतीपूर्वी तराकी ज्या घरात राहात होता ते घर राष्ट्रीय स्मारक म्हणून समारंभाने देशाला अर्पण करण्यात आलं. ते घर पाहायलाही फारच थोडे अफगाण लोक जायचे. परदेशी लोकच जास्त जायचे.

दाऊदखानला मारून चालू केलेलं हे हत्यासत्र किती तरी दिवस चालू होते, आणि ते शेवटपर्यंत चालूच राहणार होतं. या हत्यासत्राचं गोंडस पुस्तकी नाव असतं 'शुद्धीकरण'. क्रांतिकारी सरकारचे शत्रू, संभाव्य शत्रू, होऊ घातलेले शत्रू, किंवा जे मित्र नाहीत ते– अशा सगळ्यांना काढून टाकून, वातावरण 'शुद्ध' करणं हे मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानच आहे. मार्क्सवाद्यांना आपल्या शत्रूंची आणि मित्रांचीसुद्धा सतत भीती वाटत असते. त्यामुळे त्यांना नाहीसं करणं हे ओघानं आलंच. त्यानुसार एकदा शाही खानदानाचा सफाया करून झाल्यानंतर, दाऊदचे मंत्री, लष्करी अधिकारी, मोठमोठे व्यापारी, दुकानदार, जमीनदार, सरकारी अधिकारी, कलावंत, बुद्धिवादी आणि शेवटी जुन्या परचम पक्षाचे सदस्य यांना नाहीसं करायला, तुरुंगात टाकायला सुरुवात झाली. हे 'शुद्धीकरणाचं' कधीही न संपणारं काम सुरू झालं. त्यामुळेच पक्षकार्यकर्त्यांचे महत्त्व एवढं वाढलं की, वेगवेगळ्या कचेऱ्यांमधील दैनंदिन काम सुरळीत-पणानं होईनासं झालं. आज आपण अधिकारावर आहोत, उद्याचा काय भरवसा? या भीतीनं कामाचा वेग नाहीसा झाला. शिवाय, आपण अमुक एक गोष्ट स्वतःच्या जबाब-दारीवर केली आणि ती 'वरच्या' लोकांना पसंत पडली नाही तर जिवाशीच गाठ आहे हे सत्य सर्वजण ओळखून असल्यामुळे कोणीही काम करीत नसे. निर्णय घेतले जात नसत. आजचा दिवस ढकलायचा, उद्याची वाट पाहायची, ही वृत्ती बळावली.

क्रांती झाल्यानंतर दोन महिन्यांनी मुकुंदाच्या ऑफिसात व्यवस्थित कपडे केलेला माणूस एक दिवस आला आणि म्हणाला, "माझं नाव अमुक अमुक. मी पी. डी. पी. चा पक्ष कार्यकर्ता आहे. आजपासून ऑफिस प्रेसिडेन्ट म्हणून माझी इथे बदली झाली आहे."

क्रांतीनंतर अशा बदल्या, बदल्यांचे अधिकृत हुकूम वगैरे न काढताही व्हायला लागल्या होत्या. म्हणून मुकुंदाच्या ऑफिसच्या लोकांना त्या माणसाचे म्हणणे खरे वाटले. मोठ्या इतमामाने त्याला त्याची खोली दाखवली. पी. ए., टायपिस्ट, स्टेनो वगैरे सगळे त्याला भेटून गेले. मग अफगाण एंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स् भेटायला गेले; त्याला ऑफिसच्या कामाची माहिती दिली. कोणती कामं सुरू आहेत, पुढं काय करायचं वगैरे त्याला सांगितलं. रशियन आणि भारतीय सल्लागारांची बैठक घेणार का म्हणून त्याला विचारलं, तेव्हा सगळ्यांच्या लक्षात आलं की या प्रेसिडेन्टला तर काहीच माहिती

नाही. काही तरीच असंबद्ध बोलतोय हा. तेव्हा मग शंका येऊन एकाने मेयरला फोन केला आणि सांगितलं की, " अमुक अमुक नावाचा नवा प्रेसिडेन्ट इथे आला आहे."

मेयर बुचकळ्यातच पडला. तो म्हणाला, " हा कोणता नवा प्रेसिडेन्ट ? आपला प्रेसिडेन्ट तर इथं माझ्यासमोरच बसला आहे, आमची बोलणी सुरू आहेत. नव्या प्रेसिडेन्टचा हुकुमनामा मी काढलाच नाही तर येईल कुठून नवा प्रेसिडेन्ट ? "

तेव्हा मग सगळ्यांच्या डोक्यात प्रकाश पडला की, हा कोणी बनावट प्रेसिडेन्ट आहे. मग सगळ्यांनी मिळून त्या माणसाला बदडून काढलं आणि हाकलून दिलं. ही गोष्ट जेवढी विनोदी आहे तेवढीच विदारकही आहे. लोक पक्षकार्यकर्त्यांना कसे घाबरून असत, कितीही मोठ्या अधिकारावरच्या लोकांना किती सहजपणानं नोकरीवरून काढलं जाई याचं हे उदाहरण आहे. म्हणूनच अत्यंत संशयाचं वातावरण तेव्हा तिथे होते. कोणता माणूस कधी आणि कशासाठी तुरुंगात जाईल, मारला जाईल याचा कसलाही भरवसा राहिला नव्हता. निरनिराळ्या ऑफिसेसमधून कामं काही होतच नव्हती. जी होत असत ती पक्षसंघटनेसंबंधीच असत. सगळ्या ऑफिसांतून आता सर्व थरांवरच्या लोकांना, मुलींनाही मार्क्सवादाचे धडे देण्यासाठी क्लासेस सुरू केले गेले. आणि प्रत्येकाला या क्लासला जावंच लागे. अगदी ऑफिसला झाडू मारणाऱ्यापासून प्रेसिडेन्टपर्यंत सर्वांना हे शिक्षण सक्तीचे होते. ज्यांना लिहिता वाचता येत नाही त्यांना अगोदर लिहाय-वाचायला शिकवलं जाई आणि नंतर मार्क्सवादाचे धडे दिले जात. ऑफिसच्या परीक्षां-पेक्षा या परीक्षांचं महत्त्व केवढं तरी जास्त आहे, हे सगळ्यांना कळून चुकलं होतं. ब्रेन-वॉशिंगचं हे काम पद्धतशीरपणानं सुरू झालं. आपला बुद्धिपालट होऊ द्यायचा की नाही हे ठरवण्याचं स्वातंत्र्य अर्थातच लोकांना नव्हतं. कारण बुद्धिपालट होऊ दिला नाही तर आपली नोकरीच काय पण जीवही जाईल, ही खात्री प्रत्येकाला पटलेली होती.

## समाजवादी कायदे

सामाजिक सुधारणांचे कायदे सरकारने अंमलात आणायला सुरुवात केली. हे नवे कायदे आपल्या लोकांना पचतील का, रुचतील का, याचा विचार सरकारने केला नसल्यामुळे या नव्या कायद्यांबद्दल लोक सुरुवातीपासूनच साशंक होते. समाज सुधारायला हवा, नवीन कायदे हवेत, ही गरज समाजाला वाटू लागण्याअगोदरच जर नवीन कायदे केले तर काय होतं त्याचं अमानुल्ला हे ढळढळीत उदाहरण समोर असताना, नवीन सरकारने नवीन कायदे केले. अंमलबजावणीलाही सुरुवात केली. तेव्हा एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली की, पन्नास वर्षांचा मोठा काळ मध्ये जाऊनही अमानुल्लाचा काळ आणि आजचा काळ यांमध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

मुळात मुस्लिम समाजाला कसल्याही सुधारणा, बदल सहनच होत नाही. जे

काय कुराणात लिहिलेलं आहे ते प्रमाण मानूनच मुस्लिम समाजाचे कायदेकानू बनलेले आहेत. त्यामध्ये फरक केलेला कोणीही खपवून घेत नाही. त्यातूनही आधुनिक शिक्षण घेतलेला, स्वतंत्र विचार करू शकणारा, सामाजिक सुधारणांची गरज भासणारा असा जो गट आहे त्याने जरी काही वेगळे करायचे म्हटले तरी, मुल्ला-मौलवींची एवढी लोखंडी पकड सर्व मुस्लिम समाजावर असते की, हे मूठभर लोक काहीही करू शकत नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांना या धर्मान्ध मुल्ला-मौलवींना घाबरून गप्प बसावं लागतं.

मुख्य म्हणजे प्रत्येक मुस्लिमला, इस्लामच्या विरुद्ध, कुराणात सांगितल्याच्या विरुद्ध काही केलं ( आणि ते उघडपणानं केलं, उघडकीला आलं ) तर नरकात जाण्याची भीती आणि आपल्याला कोणी ‘ काफर ’ म्हणेल याची महाभयानक भीती त्याच्या मनात ठाण मांडून बसलेली असते. त्यापुढे भल्याभल्यांचं काही चालत नाही. त्या भीतीतून जे बाहेर पडलेले असतात ते मग समाजातून वाळीत टाकले जातात. शत्रू मानले जातात. इतर मुस्लिम समाज पुन्हा मुल्ला-मौलवींच्या जबरदस्त पंजाखाली चिरडला जाण्यासाठी एकत्र होतो, त्या समाजाला मग स्वतःच्या उज्ज्वल भविष्याचे, स्वार्थाचेही भान राहात नाही. कुराण आणि मुल्लामौलवी यांच्या सीमारेषेबाहेर मुस्लिम समाज पडूच शकत नाही. शहानंतरचा इराण, हे त्याचे एक ज्वलंत उदाहरण आहे.

म्हणूनच नव्या क्रांतिकारी सरकारने अत्यंत मागासलेल्या दरिद्री अफगाण समाजाच्या सुधारणेचे कायदे आणले तेव्हाच हे कायदे आपल्या भल्यासाठीच आहेत याचे भान न ठेवल्यामुळे आंधळेपणाने नव्या सरकारविरुद्ध बंडखोरीची पहिली ठिणगी पडली.

त्याशिवाय, परमेश्वराचे अस्तित्वच न मानणाऱ्या मार्क्सवादी सरकारमुळे आणि या सरकारच्या नव्या कायदेकानूंमुळे इस्लाम धोक्यात आला आहे, अफगाण संस्कृती नामशेष होऊ लागली आहे, अशा बातम्या बी. बी. सी.ने फारसीमधून द्यायला सुरुवात केली. बी. बी. सी.च्या बातम्या खोट्या कधीच नसतात. पण ज्या तऱ्हेनं त्या दिल्या जातात, ज्या भाषेमध्ये त्या दिल्या जातात, ज्या स्वरात त्या दिल्या जातात, त्याने केवढा तरी फरक पडतो. या आपल्या खास, वैशिष्ट्यपूर्ण शैलीतून बातम्या देऊन सर्वसामान्य अफगाण माणसाला ‘ शहाणं ’ करण्याची, त्याला रोजच्या रोज ताज्या बातम्या, माहिती देण्याची जबाबदारी बी. बी. सी. अगदी इमानेइतबारे पार पाडू लागली. एखादे बातमीपत्र एखाद्या देशाच्या इतिहासात केवढे महत्त्वाचे कार्य करू शकते याचे जिवंत उदाहरण म्हणजे बी. बी. सी. ! एखाद्या विशिष्ट समाजाच्या मताला हवे तसे वळण द्यायचे अलौकिक कसब बी. बी. सी.मध्ये आहे, ही गोष्ट निर्विवादपणे सिद्ध झाली आहे ती अफगाणिस्थानात.

या संदर्भात अफगाणी सरकारी बातमीपत्र अत्यंत उणे पडत होते. नव्या क्रांतिकारी सरकारचा प्रचार अत्यंत भडक असल्यामुळे, अतिरंजित असल्यामुळे, सुरुवातीपासूनच लोकांच्या मनात, अफगाण बातमीपत्राबद्दल, माहितीबद्दल, जी एक अविश्वासाची

भावना निर्माण झाली ती कधीच गेली नाही. बी. बी. सी.चा मुकाबला करू शकेल असं अफगाण सरकारी बातमीपत्र नव्हतंच.

नव्या क्रांतिकारी सरकारने जुने इस्लामी कायदे बदलून, नवे नागरी कायदे चालू केले. त्यामुळे मुल्लामौलवींना काहीही महत्त्व राहिलं नाही. जुनाट परंपरा डळमळीत झाली. हेतू तोच होता. कित्ती तरी खेडोपाडीच्या मुल्लामौलवींना तुरुंगात टाकण्यात आलं. त्यामुळे समाजाच्या त्या वर्गाने नवीन सरकारशी शत्रुत्वच पत्करले. सर्वसामान्य माणसालाही मुल्लामौलवींचं फारसं प्रेम नव्हतंच; परंतु या कम्युनिस्टांनी त्यांना तुरुंगात टाकलं म्हणून त्यांच्या श्रद्धांना धक्का बसला. ही गोष्ट त्यांना आवडणं शक्यच नव्हतं.

मुलीच्या बापाला भरमसाठ पैसे दिले तरच इथे लग्न व्हायची प्रथा आहे. त्यामुळे श्रीमंत असतील त्यांची चार चार लग्ने होतात; तर गरीब, मध्यमवर्गीयांमधल्या मुलांमुलींना मध्यमवय उलटून गेलं तरी लग्नाशिवाय राहावं लागतं. ती पद्धत कायद्याने बंद करून ३०० अफगाणी रुपयांच्यावर पैसे देण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे रुढिप्रिय म्हातारी माणसं नाराज झाली. एक तर आर्थिक तोटा झालाच, पण खानदानाच्या इभ्रतीचाही प्रश्न होताच. लाख दीड लाख अफगाणी रुपये देऊ शकणाऱ्या, घेऊ शकणाऱ्यांच्या इज्जतीचा असा निकाल लावलेला श्रीमंत लोकांना आवडला नाही. गरीब, मध्यमवर्गीयांना यामध्ये किती फायदा होतो आहे याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आलं. आणि परंपरा मोडल्याचा गाजावाजा करून त्या कायद्याच्या हेतूवरच घाव घातला गेला. शिवाय एवढा कायदा करूनसुद्धा, प्रत्यक्ष नगद पैसे देणं बंद झालं तरी पंचतारांकित हॉटेलात जेवणावळी घालणं, लग्नाअगोदर कपडालत्ता, फर्निचर या वस्तू पोचवून देणं, या गोष्टींनी नगद पैशांची जागा घेतली. मूळ हेतू कुठल्या कुठे जाऊन फक्त नाराजी तेवढीच उरली.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या सरकारने नवी शिक्षणपद्धती अंमलात आणली. या पद्धतीनुसार प्राथमिक शाळेपासून विद्यापीठ पातळीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचा जुना अभ्यासक्रम बदलून अगदी नवा अभ्यासक्रम सुरू केला. सगळी पाठ्यपुस्तकं, विशेषतः इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वाङ्मय या महत्त्वाच्या विषयांवरची पुस्तकं बदलली. रशियन शिक्षणतज्ज्ञांनी शिफारस केल्याप्रमाणे नवीन कोर्स आखला गेला. रशियन भाषेच्या शिक्षणाला अर्थातच प्राधान्य मिळाले. रशियन भाषेच्या माध्यमातून शिकवल्या जाणाऱ्या शाळा वाढल्या. प्राथमिक वर्गापासूनच सर्वच शाळांतून रशियन भाषा शिकवण्याचा त्यांचा बेत होता. पण एवढा स्ट्रॉंग डोस कदाचित पचायचा नाही म्हणून तो बेत गाळण्यात आला. कळत न कळत कम्युनिझमची तत्त्वे प्राथमिक वर्गापासूनच शिकवली जाऊ लागली, आणि त्या बाबतीतला आपला प्रामाणिकपणा, स्वामिनिष्ठा सिद्ध करण्याची हिरीरी अफगाण लोकांनाच जास्त !

त्याचबरोबर आज प्राथमिक शाळेत जाणारी आपली मुलं आणखी बारा वर्षांनी मार्क्सवादी होतील, इस्लामवर अविश्वास दाखवणारी होतील, आपल्या संस्कृतीपासून

तोडून काढलेली, संपूर्णपणानं वेगळीच अशी व्यक्ती घडणार आहे, हा विचार इथल्या सर्वसाधारण लोकांना अतिशय भयावह वाटू लागला.

इंग्लिश वाङ्मयाच्या माध्यमिक मुलांसाठी, अगदी सुरुवातीची अक्षरओळख करून देणारी चित्रांची पुस्तकं असतात, त्यांची नवीन आखणी सुरू होती. त्या कमिटी-वर एक भारतीय प्रोफेसर होते, एक रशियन बाई होती. आणि बरेचसे अफगाण प्रोफेसर्सही होते. इंग्रजीमध्ये Q हे अक्षर आल्यावर सगळे अडले. कारण Q या अक्षरापासून सुरू होणारा, चित्रामध्ये दाखवता येईल आणि विद्यार्थ्याला बघितल्यावर चटकन् समजेल असा Queen या शब्दाखेरीज दुसरा शब्द कुणाला आठवेना. आणि अफगाण प्रोफेसर्सना Queen हा शब्द घालायचा नव्हता. कारण Queen म्हणजे राणी. ते तर सरंजामशाहीचं, राजेशाहीचं प्रतीक; ते कसं दाखवायचं ? खूप वेळ चर्चा झाल्यानंतर ती रशियन प्रोफेसर बाई म्हणाली, " तुम्ही एवढा घोळ कशाला घालता आहात ? Queen हा शब्द द्यायला काय हरकत आहे ? मुलांना चटकन समजल्याशी कारण ! " तेव्हा कुठे Queen हा शब्द घातला गेला.

इथे भारतीय डॉक्टर्स, प्राध्यापक, शिक्षक विशेषत्वाने लोकप्रिय होते. आता जे लोक आपली मुदत पुरी करून परत जाऊ लागले त्यांच्याऐवजी दुसरे भारतीय लोक आणण्या-ऐवजी रशियनच डॉक्टर्स, प्राध्यापक, शिक्षक, त्याप्रमाणे इतर तंत्रज्ञही रशियनच आणण्याची सुरुवात झाली. त्यामुळे प्रत्येक ऑफिसात, प्रत्येक ठिकाणी रशियन लोकांची वाढती संख्या पाहून अफगाण लोक बिचकायला लागले. या बदलाचा अर्थ कळण्या-एवढा शहाणपणा नक्कीच त्यांच्यामध्ये आहे. म्हणून हा बदल त्यांना मुळीच आवडला नाही.

मुलां-मुलींचं शिक्षण सक्तीचं केलं. मूल सहा वर्षांचं झालं की त्याला शाळेत घातलंच पाहिजे हा दंडक. मुलींना शाळेत घातलं नाही तर शिक्षा बापाला होई. आज जरी नाही तरी उद्या आपल्या मुलींना रशियन पुरुष शिकवणार म्हणून लोक घाबरले. खेडोपाड्यांत शाळा नाही, अशा ठिकाणच्या मुलांना, मुलींना शिकवण्यासाठी काबूलला घेऊन जाणार आहेत, अशी बातमी मुद्दामहून, खोडसाळपणाने पसरवली गेली. पण त्यावर अशिक्षित, गरीब, गावंढ्या माणसाचा विश्वास चटकन बसला. जाहीरशहाच्या वेळेपासूनच सुरू असलेलं फुकटचं शिक्षण, राहणं, जेवणखाण, त्याशिवाय कॉलेजातल्या मुलांना विडीकाडीसाठी पॉकेटमनी, एवढ्या सोयी असलेलं हे शिक्षण सगळ्यांना आता अगदी नकोसं झालं. विशेषतः सर्वात जास्त ज्यांना जरूर आहे त्या अशिक्षित, अर्ध-शिक्षित लोकांना. कारण असल्या परधार्जिण्या शिक्षणामुळे आपला इस्लाम धोक्यात येतो आहे अशी त्यांची दृढ भावना झाली. कोणत्याही विषयावर चर्चा सुरू झाली तरी ती शेवटी अशी 'इस्लाम धोक्यात आहे', 'आमची संस्कृती धोक्यात आहे,' या मुद्द्यावर येऊन ती पोचू लागली.

एखाद्या समाजाच्या परंपरागत संस्कृतीशी जुळवून न घेतल्यामुळे, त्याच्या मुळाशीच घाव घातल्यामुळे केवढं नुकसान होतं, हाती आलेली संधी कशी निसटून जाऊ लागते याचा विचार मार्क्सवाद्यांनी करायला हवा आहे.

# ७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६२६
दा. क्र. २३५५२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## क्रांतीची वाटचाल

खल्क आणि परचम या दोन्ही साम्यवादी पक्षांनी मिळून ही क्रांती घडवून आणली होती; तरी त्या पक्षांचे आपापसांत काही बरे नाही हे सर्वांनाच माहीत होते. त्यानुसार कुठे कुठे परचमींना हालवायला सुरुवातही झाली होती. तरी पण ही त्यांची कारस्थानं गुपचूपपणानं शिजत होती. जेव्हा बबरक कारमलचे उपपंतप्रधानपद काढून घेऊन त्याला चेकोस्लोव्हाकियाला राजदूत म्हणून पाठवले तेव्हा मात्र सर्वांनाच विस्मय वाटला! लोकांची आपापसांत कुजबूज सुरू झाली. बबरकसारख्या एवढ्या महत्त्वाच्या माणसाकडून त्याचे उपपंतप्रधानकीसारखे महत्त्वाचे खाते का काढून घेतले? एखाद्या मंत्र्याला त्याचे मंत्रिपद काढून घेऊन त्याला कुठे तरी राजदूत म्हणून पाठवणे याचा अर्थ काय होतो, ते सर्वांनाच माहीत आहे. अफगाण लोकांनाही त्याचा अर्थ माहीत आहेच. चेकोस्लोव्हाकियाला बबरक गेला आणि त्याच्यापाठीमागे अफवांचे पेव फुटले.

अफवांची एक गंमत असते की, जेव्हा सर्वसामान्य लोक चविष्टपणाने त्या एकमेकांना सांगतात, तेव्हा सांगणाऱ्यांचा त्या अफवांवर गाढ विश्वास असतो. पण ऐकणाऱ्याला मात्र वाटत असते की, या अफवांमध्ये काही अर्थ नाही. संधिसाधू लोकांनी उठवलेल्या गावगप्पा आहेत या. पण हळूहळू असे आढळून येऊ लागते की, ऐकलेल्या अफवा या निव्वळ गावगप्पा नव्हत्या, त्यांमध्ये सत्याचा बराच अंश होता. त्या बातम्या होत्या! जसजशा खऱ्या गोष्टी बाहेर येऊ लागतात, तसतसे वाटणारे आश्चर्य वाढतच जाते. आज ऐकलेली अफवा, चार दिवसांनी रेडिओ, टी. व्ही.वर बातमी म्हणून सांगितली जाते. वृत्तपत्रांतून सरकारी मालमसाला लावून छापली जाते. त्यामुळे एक खात्री पटते की, चार दिवसांनी येणाऱ्या बातमीची वाट पाहण्यापेक्षा आजच्या अफवेवर विश्वास ठेवावा हे उत्तम.

नवीन राजवटीने दाऊदची माणसे काढून प्रत्येक ठिकाणी आपापली माणसे कामाला लावली होती. पण हळूहळू त्या माणसांचीही उचलबांगडी होऊ लागली. एकदाच नाही तर पुन्हा पुन्हा. कुणाचा घरमालक, कुठला तरी दुकानदार, सैन्यातले लोक, हे असे एकदम 'नाहीसे'च होऊ लागले. त्यांचं काय झालं ते त्यांच्या

घरच्यांनासुद्धा कळेनासे झाले. राजरोसपणाने पकडून तुरुंगात टाकणं किंवा बंदुकीची गोळी घालून ठार मारणं याव्यतिरिक्त हे नाहीसं होणंही घडतच होतं. सर्वांत भयंकर प्रकार म्हणजे, ऑफिसमधून जेव्हा कुणाला तरी कोणी तरी भेटायला येई तेव्हाचा. ऑफिस व्यवस्थित चालू असताना, 'भेटायला म्हणून बाहेर कोणी तरी आलंय' असा निरोप एखाद्याला मिळायचा. तो माणूस ऑफिस बिल्डिंगच्या बाहेरे गेला की, त्याला जीपमध्ये घालून घेऊन जात. त्याला कुठं नेलं, पुढं त्याचं काय झालं हे कळायला काहीही मार्ग नसे. घरच्या लोकांना तर काही पत्ताच नसे. पण ऑफिसमधल्या सहकाऱ्यांनादेखील, बाहेर गेलेला माणूस बराच वेळ आला नाही की मग तो नाहीसा झाल्याचं लक्षात येई. हवेत विरून गेल्यासारखी ही माणसं अदृश्य होत; की मग त्याच्या घरची माणसं आशाळभूतपणाने वेगवेगळ्या तुरुंगांचे उंबरठे झिजवत. तुरुंगात तर हजारो माणसं असताना कुणाचा कोण तिथं आहे याचा पत्तासुद्धा लागत नसे. ही माणसं मग सरकारकडे अर्ज, विनंत्या करीत बसत; "आमचं अमुक अमुक माणूस कुठं आहे ? मेलेलं असलं तरी कळवावं." अर्थातच या पत्रांना उत्तरं कधीच येत नसत.

या नाहीसं होणाऱ्यांमध्ये, मारले जाणाऱ्यांमध्ये, तुरुंगात जाणाऱ्यांमध्ये, परचम पक्षाचे लोक जास्त आहेत ही गोष्ट स्पष्ट होऊ लागली. ज्यांची माणसं मरतात, नाहीशी होतात, ते लोक घाबरून आपापल्या घरातच बसून सरकारला शिवीगाळ करत, सूड घेण्याची भाषा बोलत. पण उघडपणाने एक शब्द काढायची कुणाची हिंमत होत नसे.

सर्वसामान्य लोकांच्या अपेक्षेपेक्षा काही वेगळेच वळण या क्रांतीनं घेतलं. समाजवादाची आश्वासनं मिळाल्यामुळे, राजेशाहीला उलथून सर्वसामान्य माणूस प्रथमच सत्तेवर आल्यामुळे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, जमीनसुधार कायदे, भूमिहीन शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनी, या सर्वांमुळे सर्वसामान्य अफगाण माणसाच्या नव्या सरकारबद्दलच्या अपेक्षा फार उंचावल्या होत्या. केवढी तरी आशा त्यांना वाटत होती. त्यासाठी थांबून वाट पाहण्याची त्यांची तयारी होती. मुळापासूनच बदल घडवून आणण्याच्या या प्रक्रियेमध्ये काही माणसे मारली जायचीच, काही तंटेबखेडे व्हायचेच, हेही लोकांनी गृहीत धरलं होतं. पण दिलेली आश्वासनं पूर्ण करण्याऐवजी हे नवे क्रांतिकारी सत्ताधीश आपापसातच भांडत होते. सुधारणांच्या नावाखाली त्यांच्या परंपरागत श्रद्धांना धक्का लावत होते. हेसुद्धा एखादे वेळी खपवून घेतलं असतं, जर त्या बदल्यात सर्वसामान्य माणसाचा खरोखरच फायदा झाला असता तर. पण तसं काही होतच नव्हतं. उलट हे नवं सरकार आपल्या सत्तेच्या खेळामध्ये सर्वसामान्य माणसाच्याही जिवावर उठले होते. तेव्हापासूनच नव्या सरकारबद्दल संशयाचं, भीतीचं, अविश्वासाचं वातावरण सुरू झालं.

मध्येच एकदम अफवा उठली की, बबरक चेकोस्लोव्हाकियाला गेलाच नव्हता कधी. तो इथून गेला तो थेट मास्कोला गेला. आणि अजूनही तिथेच आहे. कोणी म्हणालं की त्याला मारूनच टाकलंय म्हणून. पण ही अफवा अफवाच राहिली. कारण

आठ-दहा दिवसांनी बातमी दिली गेली की, बब्रकने राजदूत म्हणून आपली अधिकार-सूत्रे चेकोस्लाव्ह सरकारसमोर पेश केली.

पाठोपाठ खुद्द संरक्षणमंत्री कादर, लष्करप्रमुख शाहपूर, आणि जमूरियत हॉस्पिटलचा मुख्य, कादरचा मित्र आणि पूर्वीच्या परचम पार्टीचा आघाडीचा कार्यकर्ता डॉ. मीर अमीर अकबरी या तिघांनाही तुरुंगात टाकल्याच्या अफवा पसरल्या. चार दिवस एखादी अफवा मुरली की तीच अफवा 'बातमी' म्हणून रेडिओ काबूल रीतसरपणे देत असे. असा आतापर्यंतचा रिवाज होता. तो मोडून या वेळी ज्या दिवशी भल्या पहाटे कादर, शाहपूर, मीर अमीर अकबरी यांना पकडले त्याच दिवशी त्यांच्या अटकेची बातमी अधिकृतपणे देण्यात आली. तीसुद्धा अशी की, 'साम्राज्यवादी शक्तींशी संधान ठेवून या तिघांनी सरकारविरोधी, प्रतिक्रांतिकारी कारवाया सुरू केल्या होत्या म्हणून नाइलाजाने, अफगाण लोकांचे हित लक्षात घेऊन, त्यांना तुरुंगात टाकावे लागले आहे. अशा लोकांच्या देशद्रोही कारवाया सरकार कधीही खपवून घेणार नाही. वगैरे.... वगैरे....'

त्यापाठोपाठ सरकारने 'अनीस' या फारसी वृत्तपत्रात कादरने सरकारला पत्र लिहिलेलं, आपले अपराध कबूल केल्याचं, क्षमायाचनेचं पत्र प्रसिद्ध केलं. शिवाय दाऊदखानबद्दलचं सामान्य माणसाचं मत पाहून, दाऊद प्रदर्शनाबद्दलची अफगाण लोकांची प्रतिक्रिया पाहून, सरकारने असंही जाहीर केलं की, खुद्द दाऊदखानला, त्याच्या खानदानाला मारण्याची तराकी, अमीन यांची मुळीच इच्छा नव्हती, परंतु कादरच्या अट्टाहासामुळे मारावं लागलं होतं!

पण लोकांचा कादरच्या त्या तथाकथित पत्रावर किंवा सरकारच्या खुलाशावर, कशावरच विश्वास बसेनासा झाला. फक्त जे जे काय घडत आहे तेवढं फक्त पाहणं शिल्लक उरलं.

पण प्रत्येक सरकारी ऑफिसमधल्या पार्टी-वर्कर्सनी, काबूल शहराच्या आजूबाजूच्या सैनिकी तळावर, लहान मुलांच्या शाळांनी, इतर सामाजिक संस्थांनी आपापल्या ठिकाणी सभा घेऊन त्या तिघांना रीतसरपणाने दूषणे ठेवण्याचे समारंभ साजरे करायला सुरुवात केली. त्याच्या पाठीमागे कोण आहे हेसुद्धा लोकांना कळले होते. पण सगळे गप्प होते. उघडपणाने बोलायचं धाडस कुणामध्येही नव्हतं.

२७ एप्रिलची क्रांती घडवून आणण्यामध्ये कादरनेच पुढाकार घेतला होता. राजघराण्याशी काहीही संबंध नसलेले त्याचे सर्वसामान्य घराणे, त्याचा रशियाविरोधी राष्ट्रीय साम्यवाद, त्याच्या रशियाविरोधामुळे मुल्लामौलवींचा त्याला असलेला पाठिंबा, यामुळे कादर बराच लोकप्रिय होता. तोच आता तुरुंगाच्या गजांआड गेल्यामुळे, आता प्रथमच सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये काही तरी खळबळ माजली. आतापर्यंतच्या वरच्या अधिकाऱ्यांचे, मंत्र्यांचे सत्तेवर येणे-जाणे, मारले जाणे या सर्व गोष्टी सामान्य अफगाण माणसापासून फार दूर होत्या. कारण ते लोक जमीनदारवर्गातले, सरदार

घराण्यातले, राजघराण्याशी या ना त्या बाजूने काही तरी संबंधितच होते. त्यांचा सामान्य माणसाशी कसलाही संबंधच नव्हता. क्रांतीनंतर प्रथमच सर्वसामान्य, नोकरपेशातली माणसं सत्तेवर आली होती. पण त्यांनीही आपापसांत तंटेबखडे करून, आपल्यातल्याच एकाला तुरुंगात टाकलं होतं. म्हणून अफगाण माणूस अस्वस्थ झाला. उघड काहीही बोलायची हिंमत नाही, पण दबल्या आवाजात त्यांच्या आपापसांत चर्चा सुरू झाल्या.

शिवाय आतापर्यंत कोणत्याच बड्या राष्ट्राचा प्रत्यक्ष शिरकाव अफगाणिस्थानात होऊ दिला नव्हता, पण या क्रांतीनंतर मात्र रशिया आणि अमेरिका आपापल्या हालचाली अफगाणिस्थानात सुरू करतील अशी परिस्थिती या सत्ताधारी लोकांनीच निर्माण केली. त्याचीही काळजी अफगाण माणसाला वाटू लागली.

कादर वगैरेंना तुरुंगात टाकल्यानंतर, इतर मंत्र्यांना भराभर तुरुंगात टाकायला सुरुवात झाली. नवीन नेमणुका झालेले मंत्रीही काही दिवसांचेच मेहमान असत. इतक्या उच्च पातळीवर चाललेल्या या धरपकडीमुळे अत्यंत घबराट मात्र पसरू लागली. हे काय चाललंय काय हेच कुणाला कळत नाहीसं झालं.

या साम्यवादी क्रांतीचा खटाटोप मुळात केलाच कशाला, याचा शेवट काय होणार आहे, याची उत्तरं अफगाण माणूस या धरपकडीतून शोधण्याचा केविलवाणा आणि निष्फळ प्रयत्न करू लागला.

म्हणूनच क्रांती झाल्याच्या दोन तीन महिन्यांच्या अवधीतच प्रतिक्रांती होणार असल्याच्या अफवा ऐकू येऊ लागल्या. या सगळ्या गावगप्पाच असतील असं म्हणून त्या अफवांकडे दुर्लक्ष करूनही चालत नसे. २७ एप्रिलला सौरक्रांती झाली आणि पाठोपाठ २० ऑगस्ट या दिवशी संरक्षण मंत्रालयात सकाळी ९॥–१० च्या सुमाराला गोळीबाराला सुरुवात झाली. पूर्वीच्या अनुभवाने अर्थातच लोकांना वाटले की हा दुसरा उठाव असावा. आजूबाजूला असलेल्या कार्टोग्राफीचं ऑफिस, बँक वगैरेंच्या ऑफिसातले लोक भराभर निघून गेले. पण त्यानंतर मात्र सगळे व्यवहार सुरळीत चालूच राहिले. संरक्षण मंत्रालयामधला गोळीबारही थांबला. तिथेच काय पाचपन्नास माणसं मेली असतील तेवढीच. दुसऱ्या दिवशी बांधकाममंत्री आणि नियोजनमंत्री यांना तुरुंगात टाकल्याचे कळले. हा प्रकार झाला तो प्रतिक्रांतीचाच प्रयत्न असावा. पण जिथल्या तिथेच तो दाबला गेला असावा.

या प्रकारानंतर पुन्हा एकदा नव्या जोमाने सरकारने धरपकडीला, मारामारीला सुरुवात केली. खल्क आणि परचम या पक्षांतला बेबनाव होता तो आता शत्रुत्व ठरला. दोन्ही पक्ष दुसऱ्याच्या ' रशियाधार्जिणे 'पणाचं भांडवल करून, आपल्याला सोयीस्कर पडेल असं ते वापरत असत. खल्क किंवा परचम, कोणताच पक्ष रशियाधार्जिणा आहे किंवा नाही या विधानाला काही अर्थच उरलेला नव्हता. अर्थ उरला तो फक्त सत्तास्पर्धेला. त्यासाठी कोणाचाही धार्जिणेपणा पत्करायला त्यांची तयारी होती.

क्रांती होऊन सहा महिने झाल्यानंतर, म्हणजे ऑक्टोबर १९७८ मध्ये

महापौरांनी काबूल महानगरपालिकेच्या सगळ्या ड्रायव्हर्सना बोलावून, त्यांची सभा घेतली. त्यामध्ये भारतीयांसाठी काम करणारे ड्रायव्हर्स मात्र नव्हते. आणि त्या सभेमध्ये महापौरांनी ड्रायव्हर्सना सांगितले की, " यापुढे आपल्या ऑफिसात काम करणाऱ्या रशियन लोकांना गाड्या द्यायच्या नाहीत. फक्त ऑफिसला जाण्या-येण्यापुरत्याच गाड्या वापरायला द्यायच्या. कारण हे रशियन्स परचमींचे मित्र आहेत; उद्या जर वेळ आली तर ते आपल्याला मदत करणार नाहीत, तर परचमींना मदत करतील! तेव्हा रशियन लोकांपासून सावध रहा." नंतरच्या घटना पाहिल्या की असं वाटतं, नियती कुणाच्या तोंडून कधी काय बोलत असते कुणास ठाऊक!

आमच्या ड्रायव्हरला, गुलअमीरला ही गोष्ट त्याच्या मित्रांकडून समजल्यावर त्याने, अगदी मुद्दामहून आम्हाला सांगितली. मग म्हणाला, " आता आता कुठं हे सत्तेवर आलेत. आत्ता कुठं यांनी राज्य करायला सुरुवात केली, तर यांची ही तऱ्हा; लगेच आपापसांत भांडायला सुरुवात केली, आणि आपल्याच रक्ताच्या माणसाशी भांडायला यांना परक्याची, रशियाची मदत पाहिजे! खल्क पक्ष काय किंवा परचम पक्ष काय सगळा चमत्कारच आहे!"

" तुझा पक्ष कोणता आहे?" मी त्याला विचारलं. कारण आतापर्यंत हेज्बे इस्लामी ( इस्लामी पक्ष ) या पक्षाचं नाव पुन्हा पुन्हा कानावर पडायला लागलं होतं. निरीश्वरवादी कम्युनिस्टांशी, इस्लाम धोक्यात आणणाऱ्या सरकारशी, मुकाबला करायला हा पक्ष तयार झाला होता.

गुलअमीर म्हणाला, " बराई, मन हेस्बे नान अस्. मला हेस्बे खल्क, हेज्बे परचम, हेज्बे इस्लामी काय करायची? मला नान (भाकरी) पाहिजे. तोच माझा पक्ष."

अत्यंत साधं, सोपं, आणि सरळ उत्तर त्यानं दिलं होतं. आणि तरीही विचार करायला लावणारं.

पण सत्तास्पर्धेत गुंतलेल्यांना अशा तऱ्हेची उत्तरं कळतच नाहीत. कळली तरी वळत नाहीत. पुंजीवाद काय किंवा समाजवाद काय, स्वतःचा वाद अंमलात आणण्यासाठी प्रथम सत्ता प्राप्त करणं भाग असतं. आणि एकदा सत्ता काबीज केली की सत्तेवरची आपली पकड कायम ठेवणं भाग असतं; तेवढं एकच ध्येय उरतं. त्यासाठी मग कोणत्याही विधिनिषेधाची पर्वा रहात नाही. त्यातून सुटका नसते. आणि मग त्यातून पुंजीवाद, समाजवाद मागे राहून फक्त सत्तावादच तेवढा उरतो. मानवी कल्याणाची भव्य स्वप्नं पाहणाऱ्या या वादांवरची तत्त्वज्ञानाची रेशमी वस्त्रं गळून पडतात; आणि बाकी उरतं ते सत्तास्पर्धेचं नागडंउघडं, भयानक स्वरूपच फक्त. आणि त्याचंच निर्लज्ज प्रदर्शन. या रुळलेल्या मार्गानेच अफगाण मार्क्सवादीही जाऊ लागले. आपापसांतली भांडणं भांडत; दहशतीचं वातावरण निर्माण करीत, लोकांपुढे आपल्या सत्तेचं, मोठेपणाचं खोटंनाटं प्रदर्शन करीत...

टी. व्ही.वर, रेडिओवर केव्हाही तराकीचं नाव आलं की, फक्त 'प्रेसिडेन्ट

तराकी ' असा उल्लेख न करता, पूर्वी मोगल बादशहाच्या वेळी जशा ललकाऱ्या व्हायच्या, त्याप्रमाणे तराकीबद्दलची सगळी माहिती दिली जाऊ लागली. ते वाक्य असं, " मुन्शी, ओ मोमीन, कमिटी ए मरकझी हेस्बे डेमोक्रॅटिक खल्क, वा रईस-ए-शोरोए इन्किलाबी, वा रईस-ए-शोरोए अली दफा ए-वतनदार, जमूरीयत डेमोक्रॅटिक दा अफगाणिस्थान नूर महंमद तराकी."

याचा अर्थ असा– " खल्क डेमोक्रॅटिक सेंट्रल पार्टीचे जनरल चिटणीस, आणि लोकांच्या क्रांतीचे अध्यक्ष, आणि राष्ट्राचे संरक्षण करणाऱ्या मोठ्या कमिटीचा मुख्य, आणि डेमोक्रॅटिक रिपब्लिक अफगाणिस्थानचा अध्यक्ष नूर महंमद तराकी."

एवढं सगळंच्या सगळं, मोठंच्या मोठं वाक्य दर वेळी तराकी यांच्या नावामागे लावलं जाई! त्या पाठीमागचा हेतू, आणि ठिकठिकाणी तराकीची मोठमोठी पोस्टर्स लावणं, यामागचा हेतू एकच होता. तराकीच्या, पर्यायाने नवीन सरकारच्या सत्तेची, अधिकाराची जाणीव लोकांना सतत करून देणं. तराकीला ' कॉम्रेड तराकी ', अमीनला ' कॉम्रेड अमीन ' म्हणून त्यांच्या नावांभोवती एक विशिष्ट वलय निर्माण केलं जाऊ लागलं.

पण लोक आता या सस्त्या कारवायांनी फसेनासे झाले. क्रांती झाल्यानंतर हेस्बे इस्लामी, जमियत-ए-इस्लामी, शोला-ए-जावेद या पक्षांच्या सरकारविरुद्धच्या कारवाया उघडपणानं कुठे कुठे चालू झाल्या. इथल्या मुल्लामौलवींना दुखवून चालणार नाही हे आता सरकारच्या लक्षात आले. म्हणूनच रेडिओ, टी. व्ही.वरचे थांबवलेले कुराणाचे पठण पुन्हा मधून मधून चालू झाले. कुठून तरी एखादा मुल्लामौलवी रेडिओवरून, टी. व्ही.वरून, नव्या सरकारला आपला पाठिंबा असल्याचे तावातावाने सांगू लागला. हे नवं सरकार इस्लामला प्रामाणिक असल्याची ग्वाही देऊ लागला. तराकीला भेटायला म्हणून कुठून तरी लोक येत ( खरं म्हणजे ते आणवले जात), त्यांच्या समोर बोलताना तराकी म्हणे, " आमचा इस्लामला सर्व तऱ्हेनं संपूर्णपणानं पाठिंबा आहे." एवढंच नव्हे तर नवरोजच्या दिवशी तराकी, अमीन नमाज पढताना टी. व्ही.वर दाखवले गेले!

या प्रकारांना लोक हसत!

पाकिस्तान सीमेवरच्या, पिढीजाद लुटारूचा धंदा करणाऱ्या पठाणांनी सरकारला त्रास द्यायला सुरुवात केली होती ती निव्वळ, नव्या सरकारने त्यांचे ' हप्ते ' थांबवले होते म्हणून. पण पुढे या प्रकाराला वेगळेच वळण लागले. त्या भागातल्या पठाण टोळीवाल्यांनी नव्या सरकारला आपला पाठिंबा कधीच दिला नाही. आतापर्यंत अफगाणिस्थानात ज्यांची सत्ता चालत होती, त्या महंमदझाई, अचकझाई वगैरे पठाणांचे सरकारविरुद्धचे मत बळकट, स्पष्ट होत चालले. नव्या सरकारमुळे सर्वात जास्त तोटा झाला तो पठाणांचा. हे पठाण टोळीवाले श्रीमंत, जमीनदार खानदानाचे, सत्ता चालवण्याची मक्तेदारी असलेले. त्यांना नवीन सरकार सहन होणे शक्यच नव्हते.

अशा तऱ्हेनं, समाजवादी नवीन सरकारने मुल्लामौलवी, श्रीमंत, जमीनदार वर्ग;

त्यांच्या शुद्धीकरणाच्या पद्धतीमुळे नोकरपेशातला, धंदेवाला, सैन्यामधला मध्यमवर्ग, आणि मुल्लांनी चिथावल्यामुळे गरीब, अशिक्षित असा अगदी सर्वसामान्य माणूस— सर्वांनाच या नवीन सरकारने दुखवून ठेवले. त्यांचे झगडे पाकिस्तान सीमेवर चालू झाले. त्या भागातल्या बंडखोर पठाण टोळीवाल्यांवर बॉम्बफेक करण्यासाठी सरकारने अफगाण वैमानिक पाठवले. पण सुरुवातीला त्या वैमानिकांनी आपल्याच लोकांवर बॉम्बफेक करण्याचं नाकारलं. पण जेव्हा त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आली तेव्हा ते वैमानिक विमानं घेऊन तर गेलेच, पण बॉम्बफेक न करता ते थेट पाकिस्तानात पळून गेले! सात-आठ दिवस ही अफवा साऱ्या गावात फिरत होती. शेवटी सरकारने बातमी दिली की, " इंजिनाच्या बिघाडामुळे आपला एक पायलट पाकिस्तानात उतरला होता, पण तो आता परत आला आहे."

या बातमीवर अर्थातच कुणाचा विश्वास बसला नाही. कारण त्याच सुमारास अफगाण सरकारने 'पाकिस्तान बंडखोरांना मदत करते आहे' असा आरोप करायला सुरुवात केली होती. हे जर खरं असेल तर सरकारी पायलट आश्रयासाठी पाकिस्तानात कसा जाईल किंवा पाकिस्तान त्याला कसं येऊ देईल ? हे लोकांना कळत नाही.

## लाल झेंडा : लाल दिवस

सौर क्रांतीनंतर सहा महिन्यांनी नव्या सरकारनं आपला 'रोज ए-बैराग', ध्वजदिन साजरा केला. खूप धुमधडाक्याने, भरपूर गाजावाजा करून साजरा केला. त्या दिवशी अफगाणिस्थानचा नवा झेंडा अस्तित्वात आला. क्रांतिकारी सरकारचे म्हणणे असे की, पूर्वीचा झेंडा होता तो साम्राज्यशाहीचे प्रतीक होता. म्हणून तो झेंडा आम्हाला नको. आता आम्ही क्रांती करून लोकांचे राज्य आणले आहे; म्हणून आमचा आम्हांला नवा झेंडा असायला हवा.

क्रांतीचा रंग लाल म्हणून झेंड्याचा रंग लाल. समृद्धीचे प्रतीक म्हणून झेंड्याच्या मध्यभागी धान्याच्या कणसाचे चक्र, आणि त्यामध्ये खल्क (जनता) असं सोनेरी अक्षरात लिहिलेलं. हेच इथल्या एकुलत्या एका राजकीय पक्षाचेही नाव.

अशा या नव्या झेंड्याचे मोठ्या थाटामाटाने उद्घाटन झाले. प्रचंड मोठी, म्हणजे आठ तास सतत चालू असलेली मिरवणूक शहरातून निघाली होती. या मिरवणुकीत अफगाणिस्थानातल्या वेगवेगळ्या प्रांतांतल्या सत्तावीस टोळीवाल्यांचे गट होते. काबूल शहरामधल्या प्रत्येक ऑफिसमधले सगळे लोक शाळा—कॉलेजातले विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर्स, नर्सेस, होमगार्ड्स, पोलीस, त्यांच्या परंपरागत आदिवासी वेषामधली कित्येक नृत्यपथकं, आर्मी एअरफोर्सची पथकं.... हजारो लोकांनी या मिरवणुकीत भाग घेतला होता. संपूर्ण शहर या लाल झेंड्याने बेहद शृंगारलं होतं. तराकीने खल्क पॅलेस-मध्येच—पूर्वीचा अर्ग पॅलेस अजूनही खल्क पॅलेसपेक्षा अर्ग पॅलेसच जास्त करुन म्हटलं

जातं– मोक्याच्या जागेवर नवा झेंडा चढवून, झेंड्याचे उद्‌घाटन केले आणि तिथेच मानवंदना घेतली. अमीन, तराकी कोणी पॅलेसच्या बाहेर, आठ तास चालणाऱ्या या प्रचंड मिरवणुकीला एकदाही सामोरे आलेच नाहीत. खल्क पॅलेसभोवती मिलिटरीचा सक्त पहारा होता; टँक्स होते, अँटी एअरक्राफ्ट गन्ससुद्धा होत्या. कुणाला वाटावं कोणत्याही क्षणी इथं युद्ध सुरू होणार आहे की काय ?

२५–३० सन्माननीय निमंत्रित अम्बॅसेडर्स खल्क पॅलेसच्या दोन्ही बाजूंना फूटपाथवर उभे होते! त्यांना बसायला खुर्च्या नव्हत्या. सकाळी सात सव्वासात वाजल्यापासून दुपारी साडेतीनपर्यंत तिथं ऑक्टोबरच्या टळटळीत उन्हात उभ्या असलेल्या त्या सगळ्या ‘ His Excellencies ’ना चहा-पाणीही मिळालं नाही. मध्येच एकदा साडेअकरा वाजता कोणी तरी येऊन पाण्याच्या ग्लासेसचा ट्रे फिरवून गेला होता. एक एक करता करता शेवटी सगळे अम्बॅसेडर्स फूटपाथवरतीच रुमाल टाकून, जमिनीवर अवघडून बसले. गर्दी एवढी प्रचंड होती की, त्यांच्या गाड्या त्यांच्यापर्यंत पोचणं अशक्य होतं. सुरक्षिततेच्या व्यवस्थेमुळे अफगाण सैनिक त्यांना चालत निघून जाऊ देत नव्हते. अफगाण सरकारची ही गैरव्यवस्था म्हणायची की त्यांची विनोदबुद्धी म्हणायची ? काहीही असू शकतं.

त्याचं एक उदाहरण. ज्या दिवशी क्रांती घडत होती तेव्हा मशिनगन्सचे आवाज काबूलभर दणादण घुमत होते. रस्त्यावरून सैन्यातील टँक्स विशिष्ट बिल्डिंग्जवर गोळाबारी करीतच गस्त घालत होते. अशा वेळी श्री. गुहा म्हणून एक बंगाली एंजिनियर आपल्या जीपमध्ये बसून घाईघाईनं घरी निघाले होते. हातघाईचा लढाईचा भाग जरासा मागे पडला आणि त्यांच्या लक्षात आले की, कशी कुणास ठाऊक, पण त्यांची जीप रस्त्यावरून जाणाऱ्या दोन टँक्सच्यामध्ये सापडली होती! आपल्या मागेपुढे ते महाकाय टँक्स पाहून श्री. गुहा चांगलेच घाबरून गेले. तेवढ्यात रस्त्यावरच्या चौकातला लाल दिवा लागला आणि काय आश्चर्य, गुहांच्या जीपसमोरचा, गोळाबारी करणारा तो महाप्रचंड टँकही थांबला! गुहांनी कालीमातेचं स्मरण केलं. पण तेवढ्यात लाल दिव्याचा हिरवा दिवा झाला. आणि पुन्हा एकदा तो टँक चालू लागला. आता या गोष्टीला तुम्ही मूर्खपणा म्हणणार, रहदारीच्या नियमांचे काटेकोर पालन झाले म्हणून शाबासकी देणार, की विनोदबुद्धी म्हणणार ? पण ही गोष्ट प्रत्यक्ष घडली हे मात्र शंभर टक्के खरं आहे.

रोज-ए-बैरागच्या दिवशी माझी मुलगी पुणे–मुंबई–दिल्ली–काबूल अशी यायची होती. दुपारी चार वाजता येणारं तिचं विमान, उशीर होता होता संध्याकाळी साडेसात वाजता आलं. सकाळच्या रहदारीची बंधनं संपून आता सगळे रस्ते मोकळे झाले होते. विमानतळावरून टॅक्सीने येताना रस्त्यावर दुतर्फा लालभडक झेंडे निऑन साईनमध्ये झगमगत होते. सकाळी पाहिलेला ‘ तराकी झिंदाबाद ’, ‘ हूरा.... हूरा.... ’च्या आरोळ्या देणारा तो प्रचंड मानवी समुद्र अजून डोक्यात ठणठणत होता. उन्हात

चार तास हिंडून जीव थकला होता. मुलगीही उशीर होत गेलेल्या प्रवासाने जाम वैतागलेलीच होती. गेल्या वर्षीच्या काबूलमध्ये आणि आजच्या लाल काबूलमध्ये पडलेला फरक पाहून ती थक्क झाली होती. मुकुंदाने टॅक्सीवाल्याला सहजपणानं विचारलं, "तू गेला होतास की नाही आज सकाळच्या परेडमध्ये ?"

तो टॅक्सीवाला एकदम चिडून म्हणाला, "मी कशाला जाऊ त्या परेडमध्ये ? सगळे धरून आणलेले लोक होते त्या परेडमध्ये. सत्ताधारी बदलले म्हणून कुणी आपल्या देशाचा झेंडा बदलतं की काय ? तुमच्याकडे अगोदर इंद्रा गांधी होती. मग कोणी मुसलमान सत्तेवर आला. (हा उल्लेख फक्रुद्दीन अली अहंमद यांचा होता !) त्यानंतर आता मोरारजीभाई सत्तेवर आला. तरी पण त्यांच्यापैकी कोणीही तुमचा राष्ट्रध्वज बदलला नाही. माणूस बदलला की कोणी असा राष्ट्रध्वजच बदलतं की काय ? पण आम्ही मात्र आमचा झेंडा बदलला ! कारण काय माहीत आहे का ? या रशियन लोकांनी सांगितलं असणार की झेंडा बदला म्हणून. त्याशिवाय का हा लालभडक रंग एका मुसलमान देशाच्या झेंड्यावर आला ? तरी बरं, त्यांचा तो विळा-कोयता त्यांनी आमच्या डोक्यावर मारला नाही ! पण हे आम्ही चालू देणार नाही. बघा तुम्ही, एक वर्षाच्या आत या सरकारचा तख्ता आम्ही पालटून दाखवू की नाही ते. एकही रशियन माणूस आम्ही अफगाणिस्थानात जिवंत ठेवणार नाही." तो टॅक्सीवाला धो धो बोलत होता.

जुन्या झेंड्याचे तीन रंग होते. लाल; काळ्या रंगाच्या बारीक पट्ट्या; बाकीचा रंग हिरवा; वर गरुडाचे मानचिन्ह. अफगाण स्वतःला मूळ आर्यांचे वंशज समजतात, म्हणून गरुडाचे मानचिन्ह. अफगाण लोकांना स्वतःच्या आर्यवंशी असण्याचा एवढा अभिमान आहे की, त्यांच्या एअर लाइन्सचे नाव 'आर्याना एअरलाइन्स' आहे. एवढंच नव्हे तर एकदा दाऊदखान सध्याचे 'अफगाणिस्थान' हे नाव बदलून 'आर्याना' असं नवं नाव ठेवण्याचा विचार करीत होता. त्याबद्दल लोकांचं मत काय आहे हे अजमावून पाहात होता. दाऊदखान स्वतःही क्रांती करूनच सत्ताधीश झाला होता; म्हणून लाल रंगाचा पट्टा आणि जुन्या राजेशाहीचं प्रतीक म्हणून काळ्या रंगाचा पट्टा झेंड्यावर होता. हिरवा रंग शांतीचं प्रतीक म्हणून मानला गेला होता. प्रत्येक मुसलमानाला हिरवा रंग प्यारा. इस्लामचा उदय झाला त्या सौदी अरेबियामध्ये मैलोगणती वाळवंट पसरलेलं; पाण्याविना जीव कासावीस झालेला; वर टळटळीत ऊन, पायाखाली निखाऱ्यांसारखी भाजणारी वाळू, अशा वेळी हिरव्या रंगाचं केवढं अप्रूप असतं प्रत्येक मुसलमानाला.

त्याउलट लाल रंग ! उन्हामध्ये लाल रंग कसा भाला खुपसल्यासारखा डोळ्यांत घुसतो. म्हणून नकोच तो रंग. इथले लोक रोजच्या वापरात, ड्रॉइंग पेपरवर, कपड्यांमध्ये लाल रंग शक्य तोवर टाळतातच. शिवाय परमेश्वराचं अस्तित्वच न मानणाऱ्या कम्युनिस्टांचा हा रंग; त्यामुळे लाल रंगाचा भरपूर द्वेष ! अशा या लाल रंगाचाच झेंडा तराकीच्या सरकारने अफगाणिस्थानावर रोवला, म्हणून त्या टॅक्सीवाल्यासारखे किती तरी लोक संतापले !

या रोज-ए-बैरागप्रमाणेच सौर क्रांतीचा पहिला वाढदिवस सरकारने केवढ्या तरी धूमधडाक्याने साजरा केला. जशनची तयारी महिनाभर अगोदरपासूनच सुरू होती. जशनच्या दिवशी तर सगळ्या काबूल शहराला लाल रंग दिल्यासारखा दिसत होता. प्रत्येक दुकान, घराच्या दर्शनी भागावर, 'कष्टकऱ्यांचा, कामगारांचा विजय असो!', 'सौर क्रांती जिंदाबाद', 'तराकी झिंदाबाद'च्या लालभडक कापडाच्या पताका फडफडत होत्या. दुकनांच्या पाट्या लाल; घराची, दुकानांची दारं-खिडक्या लाल; रस्त्यावर, चौकाचौकांतून हरतऱ्हेच्या झिंदाबादच्या प्रचंड मोठ्या लालबुंद पताका, चौकाचौकांतून हजारो लाल दिव्यांच्या माळा लटकत होत्या. रस्त्याच्या कडेचे विजेचे खांब, फूटपाथवरचे लोखंडी कठडे लाल झाले होते. एवढंच काय, काबूल महानगरपालिकेची चार पाच मजली मोठी इमारत संपूर्णपणं लाल रंगानं रंगवली गेली होती! त्या दिवशी सकाळी आपल्याकडच्या २६ जानेवारीच्या दिल्लीला निघणाऱ्या परेडसारखी साडेतीन तासांची परेड निघाली होती. रशियन मिलिटरी टँक्स, बॉम्बर्स, अँन्टी एअरक्राफ्ट गन्स, मशिनगन्स, मिसाइल्स वगैरे शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्याचं दमदार प्रदर्शन झालं. शाळकरी मुलांमुलींनीही परेडमध्ये भाग घेतला होता. बॉम्बर, हेलिकॉप्टर्समधून 'सौर क्रांती झिंदाबाद', 'तराकी झिंदाबाद'च्या लाल रंगाचे छोटे छोटे कागद हजारोंच्या संख्येने लोकांवर उधळले गेले. शेवटी तर शांतीचं प्रतीक म्हणून पांढरी शुभ्र कबुतरंसुद्धा उडवली गेली! त्या दिवशी म्हणजे बरोबर वर्षभराने नूरमहंमद तराकी आणि अमीन हे प्रथमच लोकांमध्ये उघड्यावर आले होते. अगदी आपल्या कुटुंबियांसमवेत.

'जशन'चा एवढा गाजावाजा झाला आणि दीड दोन महिन्यांनी खुद्द काबूल शहरातच, 'जादेमेवांड' या अत्यंत गजबजलेल्या बाजारभागात बंडखोरांनी उठावाचा प्रयत्न केला. आतापर्यंत काबूल शहराबाहेर बंडखोरांबरोबर सरकार लढत होते. आता ते बंडखोर शहरामध्येच येऊन पोचले. अर्थातच सरकारने धडाधड गोळीबार, बॉम्बफेक करून ४–५ तासांतच सगळ्या बंडखोरांना पकडलं तरी किंवा मारलं तरी. त्या निमित्तानं आणखी हजार दीड हजार लोकांना पकडून तुरुंगात टाकलं. रोज वेळी अवेळी काबूल शहराच्या आसपासच्या भागातच गोळीबार, बॉम्बफेक एकदमच सुरू होई. तशीच एकदम थांबूनही जाई. काबूल शहराभोवतीनं हे बंडखोर जमाव करून राहात. आणि गनिमी काव्यानं छापे घालून सरकारशी लढाई करत. म्हणूनच सरकारने आता काबूलमधल्या सरदारांच्या मोठमोठ्या वाड्यांमध्येच सैन्याचे छोटे छोटे तळ तयार केले. रात्री अकरा वाजता कर्फ्यू सुरू होते. तरी साडेसात-आठ वाजल्यापासनच रस्त्यांवर शुकशुकाट होतो. रात्रीची गस्त वाढते. दिवसा हेलिकॉप्टर्स घिरट्या घालीत असतात.

## अफगाणिस्थान आणि साम्यवाद

अफगाणिस्थानसारख्या छोट्या देशाचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनाचा विचार केला

की, इथं कम्युनिस्टांचं राज्य आलं कसं हा एक अभ्यासाचा विषय ठरतो. इथले मूठभर रईस लोक सोडले तर संपूर्ण देश अतिशय दरिद्री आहे. खरं म्हणजे जिथं एवढं दारिद्र्य आहे, तिथं तर साम्यवादाचं आकर्षण वाटायला हवं. पण ते रोमॅन्टिक आकर्षण इथल्या सर्वसामान्य माणसाला वाटत नाही. मुख्य कारण म्हणजे इस्लामचा विलक्षण पगडा लोकांवर आहे. त्यांना इतर कोणत्याही विचारांची जरूरच वाटत नाही. ज्यांना तशी जरूर वाटते त्यांना तसं कबूल करण्याचं धारिष्ट्य नाही.

इस्लाममध्ये कसल्याही तऱ्हेची तडजोड नाही. एक अल्लावर विश्वास ठेवणारा किंवा काफर, असे समस्त मनुष्यप्राण्याचे फक्त दोनच भाग इस्लामने पाडले आहेत. त्यातल्या त्यात मग खिश्चन, ज्यू, हिंदूसुद्धा बरा; कारण खिश्चन, ज्यू तर प्रेषितांना मानणारेच, शिवाय पोथीनिष्ठ, त्यामुळे त्यांच्याशी तेवढं शत्रुत्व नाही. हिंदूंशी शत्रुत्व असलं तरी ते निदान देवधर्मावर श्रद्धा ठेवणारे तरी आहेत. पण देवधर्म नाहीच असं म्हणणाऱ्या साम्यवाद्यांची भयंकर चीड; आणि तेवढीच कसली तरी भीती यांना वाटते. जादूटोणा, भुताखेतांवर अजूनही अतोनात विश्वास असणाऱ्या सामान्य अफगाण माणसाला कम्युनिस्ट हा सैतानाचाच अवतार वाटतो. म्हणूनच कम्युनिस्ट होणं म्हणजे नरकात जाणं, सैतानाचा दास होणं हेच समीकरण सर्वसाधारण मुस्लिम माणूस मांडतो. 'काफर' म्हणवून घेण्याची भीती, सैतानाचा दास होण्याची भीती, नरकात जाण्याची भीती, या भीतीपोटी मुस्लिम माणूस दुसरा कसला विचारही करीत नाही.

अफगाणिस्थानात कामगारांचे शोषण, वर्गकलह जवळजवळ नाहीच. मुळातच कारखाने, उद्योगधंदे एवढे कमी आहेत की श्रमिकवर्ग, हा राजकीय शक्ती म्हणून उभाच राहू शकत नाही. अफगाणिस्थानातली आठदहा मोठी शहरं, गावं सोडून दिली तर बाकी सगळी समाजव्यवस्था, कारभार 'खानखेल' या विस्तृत, एकत्र कुटुंबपद्धतीवरच चालतो. बराचसा आपला ग्रामपंचायतीसारखा. टोळीवाल्यांची जुनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था अजूनही चालू होती. दारिद्र्य भयानक असूनही इस्लामवरची आंधळी श्रद्धा आणि कुराणप्रणित कायद्यांशी, रीतिरिवाजांशी पक्की बांधलेली वागणूक, उपाशी पोटाची कळ त्यांच्या मस्तकात जाऊ देतच नाही. म्हणूनच त्यांना साम्यवादाचं मुळीच आकर्षण वाटत नाही. सर्वसाधारणपणे प्रत्येक मुसलमानानं स्वतःला संपूर्णपणानं कुराणाच्या, मुल्लामौलवींच्या स्वाधीन करून टाकलेलं असतं. कुराणानं, इस्लामनं, मुल्लामौलवींनी आखून दिलेल्या चौकटीबाहेर तो जाऊच शकत नाही. त्याबद्दल कसले प्रश्नही तो विचारू शकत नाही.

पण साम्यवादाचं आकर्षण इथल्या शहरी मध्यम वर्गाला म्हणजे शिक्षण पेशातल्यांना, नोकरदारांना, एंजिनिअर्स, डॉक्टर्स अशांसारख्या इतर धंदेवाइकांना वाटलं. एक तर या मध्यमवर्गाला माहीत असतं की कोणताही ईझम आला तरी आपल्या परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. त्यामुळे वेगवेगळे राजकीय बदल करून पाहण्याची त्या वर्गाला सवड असते, तेवढी बौद्धिक पात्रता असते, स्वस्थताही

असते. इस्लाममध्ये ज्या प्रश्नांना उत्तरं नाहीत त्या प्रश्नांची उत्तरं या वर्गाने मार्क्सवादामध्ये शोधण्याचा प्रयत्न चालवला. भारतातले सहा रुपये एवढाच पगार जेवूनखाऊन मिळणाऱ्या लष्करातल्या शिपायांना, दाऊदखाननं दुखवून ठेवलेल्या आर्मी जनरल्सना आणि बुद्धिवादी मध्यमवर्गीयांशी नातं असलेल्या, आर्मीमधल्या मध्यम श्रेणीच्या अधिकाऱ्यांना मार्क्सवाद आकर्षक वाटला, नव्या मनूचा उद्गाता वाटला, काळाची गरज पुरी करणारा वाटला. सौर क्रांती यशस्वी झाली ती मुख्यतः आर्मीमधल्या या गटामुळेच. ही क्रांती लोकांची नव्हतीच, ती होती लष्कराची आणि पक्षकार्यकर्त्यांची !

या क्रांतीने सर्वसामान्यांच्या अपेक्षा, भलीमोठी आश्वासनं देऊन उंचावून ठेवली आणि वाटचाल केली ती मात्र चाकोरीबद्ध कम्युनिस्टांप्रमाणे, सत्तेच्या राजकारणाची. जमीनदारांकडून काढून घेतलेल्या जमिनी मिळाल्यावर भूमिहीन शेतमजुरांना सुरुवातीला केवढा तरी आनंद झाला होता. पण मग नंतर त्यांना असं वाटू लागलं, आज जमीनदारांच्याकडून या जमिनी काढून घेतल्या, उद्या आमच्याकडूनही काढून घेऊन रशियासारख्या सरकारजमा कशावरून करणार नाहीत ? शिवाय मुल्लामौलवींना या व्यवहारात काडीचेही महत्त्व न मिळाल्यामुळे आणि साम्यवादाच्या शत्रुत्वामुळे त्यांनी सांगायला सुरुवात केली की नुकसानभरपाई न देता अशी दुसऱ्याची वस्तू काढून घेणं हे पाप आहे, हे कुराणाला मंजूर नाही. या म्हणण्यापुढे कोणी आपले म्हणणे मांडूच शकत नाही. 'कुराणाला मंजूर नाही' म्हटलं की सगळे वाद मुस्लिमांच्या लेखी आपोआपच मिटतात. त्यावर पुन्हा चर्चा करायची नसते. ती होतही नाही.

शेकडो वर्षांच्या झंझावाती इतिहासामुळे, सतत आक्रमकांना तोंड द्यावं लागल्यामुळे अफगाण माणूस अत्यंत संशयी आहे. परक्या माणसांचा त्याला तसूभरही विश्वास वाटत नाही. हा त्याचा राष्ट्रीय स्वभावच बनलेला आहे. त्यामुळे नजरेसमोर प्रत्यक्ष फायदा दाखवणारे, आधुनिक तंत्रज्ञान त्यांना हवे आहे, पण ते तंत्रज्ञान तयार करण्यामागची वैचारिक मूल्ये त्यांना नको आहेत. हे तंत्रज्ञान तयार करण्यामागची जी शोध घेण्याची चौकस अशी मानवी वृत्ती आहे ती नको आहे. त्यामागचा कोणताही 'वाद' तर मुळीच नको आहे. त्यांना रशियन लष्करी साहित्य हवे आहे, पण मार्क्सवाद नको आहे. त्यांना पाश्चात्य देशांतले ट्रॅक्टर्स, ट्रक्स हवे आहेत, पण पाश्चात्य जीवनमूल्ये नको आहेत. पण या तंत्रज्ञान, लष्करी साहित्य, ट्रॅक्टर्स, ट्रक्सच्या पाठोपाठ ती ती जीवनमूल्ये येतातच, त्याला कोणी अडवू शकतच नाही. हे पाहिल्यानंतर अफगाण माणूस अस्वस्थ झाला. प्रगत राष्ट्रातील विचारसरणी, राहणी, जीवनमूल्ये यामुळं आमच्या परमपवित्र, श्रेष्ठ इस्लामी संस्कृतीचा ऱ्हास होईल अशी त्यांना भीती वाटते.

सुरुवातीपासूनच अफगाणिस्थानातल्या या सगळ्या राजकारणात रशिया फार गुंतला होता. गेल्या शंभर-दीडशे वर्षांपासून झारच्या कारकीर्दीपासूनच, हिंदी

महासागरात प्रवेश मिळावा म्हणून अफगाणिस्थान आपल्या अंकित करण्याच्या रशियन कारवाया सुरूच होत्या. म्हणूनच अफगाण माणूस रशियावर अतिशय चिडून असतो. १९७९ च्या मध्यावर अशी परिस्थिती होती की, काबूल शहर सोडून (कारण तिथे रशियन्सना भरपूर संरक्षण असते.) जिथे कुठे रशियन माणूस, बायका, मुलं, सैनिक जो कोणी रशियन सापडेल त्याला अत्यंत हालहाल करून मारतात. त्या बाबतीत अफगाण माणसाच्या क्रौर्याला सुमार नाही. यावर उपाय म्हणून रशियाने गोरे रशियन्स देशाच्या अंतर्भागातून काढून घ्यायला सुरुवात केली. पण जिथे बंडखोरांचा सर्वात जास्त जोर आहे त्या पाकिस्तान सरहद्दीवरच्या भागात उजबेकिस्तानातले रशियन लष्कर पाठवायला सुरुवात केली. हे लोक आता रशियन असले तरी वांशिकदृष्ट्या ते अफगाण लोकांना जवळचे आहेत. त्यांची भाषा फारसी. रशियात बळजरीने त्यांना विलीन करून घेण्या-अगोदर त्यांचा धर्मही मुसलमानच होता. ते दिसतात, वागतात अफगाण लोकांसारखेच. अफगाण कपडे घालून ते अफगाण सैन्यात बेमालूम मिसळून जातात आणि बंडखोरांशी लढतात.

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक बाबतीत आधुनिक जगाशी मुळीच न पटणारा अफगाण माणूस आता बी. बी. सी., व्हॉइस ऑफ अमेरिका, रेडिओ इराण, ऑल इंडिया रेडिओ, रेडिओ पाकिस्तानवरच्या बातम्या ऐकतो. जगातल्या घडामोडींची नोंद घेतो आणि त्याचे संदर्भ अफगाणिस्थानशी लावून पाहतो. इथले लोक म्हणतात, “ रशियन्स ही जात फार खतरनाक. सैतानाचाच अवतार आहे ती. शंभर वर्षांची जरी त्यांच्याबरोबर मैत्री असली तरी ते तुम्हाला कधी दगाफटका करतील ते सांगता येणार नाही. एके काळी उजबेकिस्तान आमचं होतं. समरकंद, बुखारा ही शहरं आमची होती. ती रशियानं बळजबरीनं खालसा केली आणि आता त्यांचा सबंध अफगाणिस्थान-वरच डोळा आहे. पण आम्ही त्यांना पुरून उरू. थोडे दिवस जाऊ देत. आमची तयारी चालू आहे. एक रशियन इथे शिलक ठेवणार नाही, पाहा तुम्ही ! ”

## खास मेजवानी

अध्यात्मामध्ये अद्वैतमत सगळ्यांनाच झेपत नाही. त्यांना मग देव म्हणून कोणी तरी म्हसोबा, खासोबा लागतोच. त्याचप्रमाणे निखळ, शुद्ध मार्क्सवाद सगळ्याच मार्क्सवाद्यांना पेलत नाही. त्यांनाही कोणी तरी स्टॅलिन, ब्रेझनेव्ह, माओ लागतोच.

सत्ताधारी अफगाण मार्क्सवाद्यांची मक्का अर्थातच मास्को आहे. मार्क्सवादा-मध्ये परमेश्वराच्या कल्पनेला स्थान नाही. ‘ धर्म ही अफूची गोळी आहे ’ असं म्हण-णाऱ्या मार्क्सच्याच वादाची गोळी मात्र मार्क्सवादी ‘ चढवून ’ बसतात आणि मग भजनपूजनाच्या वेळी त्यांना आपापली दैवतं लागतातच.

काबूल म्युनिसिपालिटीने रशियन ऑक्टोबर रेव्होल्यूशन, अधिकृतपणे साजरी

केली तेव्हा रशियन आणि भारतीय तंत्रज्ञांना बाबरशहा गार्डनमध्ये मेजवानी दिली. त्या वेळेस म्युनिसिपालिटीच्या पार्टीवर्कर्सनाही आमंत्रण होते. या समारंभाचा मुख्य पाहुणा होता रशियाचा उपराजदूत, आणखी एक रशियन वकिलातीचा अधिकारी. (की त्या राजदूताचा शरीररक्षकच ' ऑफिसर ' बनून आला होता, कुणास ठाऊक!) मेजवानीच्या मोठ्या हॉलमध्ये शिरताच एक गोष्ट लगेच नजरेत भरली. त्या हॉलच्या मोठ्या भिंतीवर, मध्यभागी, पूर्वी दाऊदखानचा खूप मोठा फोटो असायचा. त्यानंतर अलीकडे तराकीचा फोटो असायचा. पण आज मात्र मधला तराकीचा फोटो काढून एका बाजूला लावला होता. आणि त्याच्या जोडीनं, दुसऱ्या बाजूला ब्रेझनेव्हचा फोटो लावला होता!

अफगाणिस्थान हे मुस्लिम राष्ट्र होतं म्हणून इथे दारू प्यायला सक्त मनाई धर्मानेच केलेली. सगळे पितात ती गोष्ट वेगळी. पण चार लोकांत, उघड्यावर नव्हे. नव्या सरकारने दारूच्या बाबतीत स्पष्ट मत दिलेलं नव्हतं. तरी पण चार लोकांसमोर दारू पिणं हे इथं शिष्टसंमत, जनमान्य नाही. असं असूनही त्या दिवशी ऑक्टोबर रेव्होल्यूशनचे शुभ चिंतण्यासाठी ' टोस्ट ' दिले, घेतले, अफगाण–रशिया मैत्रीसाठी ' टोस्ट ' दिले-घेतले गेले. ( आणि नंतरही प्रत्येकाचे ग्लासेस पुन्हापुन्हा भरले जातच होते.) हे एवढं महत्त्व त्याला दिलं गेलं होतं. नंतर काबूलचा महापौर, रशियन उपराजदूत यांची लांबलचक, रटाळ व कंटाळवाणी, तेच तेच पुन्हा पुन्हा सांगणारी भाषणं झाली. दर वेळी कॉम्रेड ब्रेझनेव्ह किंवा कॉम्रेड नूरमहंमद तराकी यांच्या नावाचा उल्लेख आला की जमलेले सगळे लोक पाच मिनिटं टाळ्या वाजवायचे. आम्ही सुरुवातीला एकदोनदा टाळ्या वाजवून नंतर टाळ्या वाजवणं बंद केलं. त्या दीडदोन तासांच्या व्याख्यानामध्ये कमीतकमी १५–२० वेळा तरी ही दोन्ही नावं आली आणि प्रत्येक वेळी टाळ्या वाजवल्या गेल्या. सौर क्रांती, ऑक्टोबर क्रांती, अफगाण रशिया मैत्रीचे उल्लेख आले की दर वेळी हूरा...हूरा....च्या आरोळ्या उठत होत्या. अफगाणिस्थानने ब्रिटिशांच्या विरुद्ध केलेल्या लढ्यांचा, विशेषतः तिसऱ्या अँग्लो–अफगाण युद्धाचा गौरवपूर्ण उल्लेख झाला. भांडवलशाही, देशद्रोही, वसाहतवादाच्या विरुद्ध सतत लढून शेवटी विजयी ठरलेल्या क्रांतिकारी अफगाण सरकारचे, लोकांचे तोंडभरून कौतुक झाले.

पण एकदाही, चुकून एकदाही, आणि विशेषतः काही भारतीयांना सन्माननीय पाहुणे म्हणून बोलावले असतानादेखील, कोणी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा साधा उल्लेखही केला नाही! वेगवेगळ्या पातळ्यांवर ब्रिटिशांविरुद्ध सतत लढत राहिलेल्या भारतीयांचा उच्चारही झाला नाही. कदाचित आपण आपल्याच हजारो लोकांचे रक्त न सांडता, प्रत्यक्ष लढाई न करता, स्वातंत्र्य मिळवलं, किंवा ते आपल्याला मिळालं म्हणून त्याचं महत्त्व या लाल क्रांतीवाल्यांना वाटत नसेल, असा कडवट विचार मनात आल्यावाचून राहिला नाही. दहा पंधरा क्रांतिकारक फाशी गेले, आणखी पाचदहा जणांनी काळ्या पाण्याची भयानक शिक्षा भोगली, शेकडो लोकांनी बंदुकीच्या गोळ्या

खाल्ल्या, लाठीमार खाल्ला, तुरुंगवास भोगला, परकीयांना परत जाणं भाग पाडलं, म्हणजे काही ' क्रांती ' होत नाही, असंही त्यांना वाटत असावं. पण मन विषण्ण झालं !

मुकुंदाच्या ऑफिसातले चारपाच रशियन अधिकारी आपापल्या बायकांना घेऊन आलेले होते. सगळ्यांचे चेहरे निर्विकार. उपराजदूत बोलला तेव्हा जास्त उत्साहाने त्यांनी सर्वांनी टाळ्या वाजवल्या. महापौरांच्या भाषणाचा तर्जुमा रशियन भाषेत करून सांगितला तेव्हाही टाळ्या वाजवल्या. पण चेहऱ्यावर भाव नाहीत. कसलेच. ही अत्यंत अवघड कला या लोकांनी तंतोतंत अंमलात आणली आहे. मागे एकदा त्यांच्या गटप्रमुखाकडे, पोक्रोस्कीकडे जेवायला गेलो होतो, तेव्हा किंवा इतर काही मेजवानीच्या प्रसंगी (ते लोक कुणा परक्याच्या घरी जात नाहीत हे सुरुवातीलाच त्यांनी स्पष्ट करून टाकल्यामुळे पोक्रोस्कीशिवाय इतरांना आमच्या घरी जेवायला बोलावण्याचा प्रश्नच आला नाही), त्यांची वागणूक तशीच होती. निर्विकार ! जणू काही त्यांना ऐकता येत नाही, बोलता येत नाही. त्यांच्यापैकी एकदोघींना इंग्रजी येतं असं कळलं म्हणून बोलायला गेले तर, मी जणू मंगळावरची भाषा बोलतेय, एवढे त्या बायकांनी मख्ख चेहरे केले. नाही म्हणायला पोक्रोस्कीची बायको, व तो स्वतः खूप बोलत. त्याची बायको तर इंग्रजी येत नसूनही बोलायची. फारसीमध्ये. तिचं आणि माझंही फारसी दिव्यच असल्यामुळे घडाघडा बोलणं होत नसे पण गप्पा होत. पोक्रोस्कीला इतर सगळे जरा घाबरूनच असतात, हे पहिल्याच वेळी लक्षात आलं. शहाणी लहान मुलं लोकांकडे गेल्यावर जशी आईच्या नजरेच्या धाकात वागतात, तशी ही माणसं पोक्रोस्कीशी वागायची. जाहीर आहे की पोक्रोस्की हा कुणी तरी मोठा बॉस होता, रशियन वास्तुविदांच्या ऑफिसातला बॉस नव्हे,— तर तिकडे मास्कोमध्ये पार्टीच्या ऑफिसातला किंवा तत्सम बॉस. युरी नावाचा एंजिनिअर होता. तो एकटाच पोक्रोस्कीशी बराचसा बरोबरीच्या नात्याने वागायचा. कविता वगैरे करायचा म्हणे. इतर वागणंही पुष्कळच सरळ होतं.

आणखी एक चमत्कारिक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे पूर्वी ओळख करून दिलेली एखाद्या माणसाची बायको, दुसऱ्या वेळेला बदललेली असायची. पहिली बाई गायब होऊन, दुसरीच बाई ' बायको ' म्हणून येत असे ही गोष्ट दोनतीनदा वेगवेगळ्या लोकांच्या संदर्भात घडली होती. या गोष्टीचं आश्चर्य अजूनही गेलेलं नाही. एकट्या पोक्रोस्कीची बायको मात्र तीच राहिली. त्याची मुलंही काबूलला होती. घरसंसारी माणूस होता तो. पण त्या पोक्रोस्कीची बायकोही इतरांच्या ' बायकां 'त मिसळायची नाही. त्यांच्याशी बोलतही नसे, हेसुद्धा लक्षात आलं. त्यांच्या घरी जेवायला गेलो होतो, तेव्हा दुसरेच कोणी दोघं तिघं रशियन्स आपापल्या बायका मुलांना घेऊन आले होते. पोक्रोस्की आणि त्याच्या बायकोशी मिळून मिसळून वागत होते. त्या दोघांची, आपल्या ऑफिसातल्या कॉम्रेडशी वागायची पद्धत, आणि या नव्या कॉम्रेडशी वागायची पद्धत केवढी वेगळी होती !

बाबरशहा उद्यानामधली ही मेजवानी झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी ऑफिसा-

तल्या सगळ्या अफगाण लोकांना एक खास रशियन चित्रपट दाखवला गेला. ही पद्धत क्रांतीपूर्वीपासूनही सुरू होतीच. दर गुरुवारी बऱ्याचशा ऑफिसांतून रशियन चित्रपट दाखवले जात. किती तरी अफगाण लोकांना हे रशियन चित्रपट पाहायला आवडायचे नाहीत. भयंकर कंटाळवाणे असतात असं त्यांचं म्हणणं असायचं. म्हणून बरेच लोक ते चित्रपट पाहायला जात नसत. नंतर ते चित्रपट पाहणे सक्तीचे केलेले होते.

तर मेजवानीच्या दुसऱ्या दिवशी जो रशियन चित्रपट दाखवला गेला त्यामध्ये रशियाने, सैनिकीकरणामध्ये, युद्धसामुग्रीमध्ये, लढाईच्या तंत्रामध्ये, दुसऱ्या महायुद्धानंतर किती प्रगती केली आहे हे दाखवलं होतं. रशियाचे युद्धसामर्थ्य, युद्धसामुग्री किती जबरदस्त आहे, किती अद्ययावत आहे, किती प्रबळ आहे हे दाखवलं होतं. तो चित्रपट पाहिल्यानंतर मुकुंदाच्या हाताखाली काम करणारे अफगाण आर्किटेक्टस् मुकुंदाला म्हणत होते, " अशी फिल्म आम्हाला दाखवण्याचा हेतू काय ? आम्हाला भीती दाखवण्यासाठी ? आम्ही जर त्यांचा ' सल्ला ' मानला नाही तर त्याचे परिणाम काय होतील ते सूचित करण्यासाठी ? आमच्यावर दडपण आणण्यासाठी ? " किती संतापले होते ते लोक.

पण आपला हा संताप वांझोटा आहे, याची सर्वांनाच कल्पना आली होती. आपल्या कुटुंबातली माणसं तुरुंगात गेली, मारली गेली तरी आपण काहीही करू शकत नाही, ही जाणीव फार भयंकर होती. फक्त घाबरटपणा मात्र वाढत चालला आहे, असहाय्यपणा वाढत चालला आहे, याची खंत त्या लोकांना वाटते. अशी ही संतापलेली, असहाय माणसं, ठिकठिकाणच्या लढाईमध्ये निर्वासित झालेली माणसं, पाकिस्तानात पळून जायला लागली. तिथे जाऊन बंडखोरांशी त्यांच्या वाटाघाटी चालू झाल्या. ते लोक बंडखोरांना मिळाले आणि एक एक करीत, जवळजवळ सगळ्या प्रांतांतून बंडखोरांच्या हालचाली वाढू लागल्या. रशियन सीमेजवळचा बदक्षान, पाकिस्तान सीमेजवळचा पख्तिया, मध्य अफगाणिस्थानातले घोडबंदर, बामीयान या प्रांतामध्ये तर रोजच बंडखोर आणि सरकार यांच्यामध्ये चकमकी झडू लागल्या.

## अमेरिकन राजदूताची हत्या

एकाच ठराविक दिवशी, सर्व बंडखोर प्रत्येक प्रांतात उठाव करून हे सरकार उलथून टाकण्याचा बेत करीत होते. त्यांची तयारी चालू होती. अशा अफवा ऐकू येत असताना एकदमच एक दिवस अमेरिकन राजदूत अडॉल्फ डब्ज याचा खून झाला. आणि सगळं काबूल शहर हादरलं.

१४ फेब्रुवारी १९७९ ला गावातले सगळे व्यवहार सुरळीत चालू होते. शाळा, कॉलेजं सुरू होती, ऑफिसं चालू होती. दुकानं उघडी होती. एका दुकानातून लोकर घेऊन माझ्या मैत्रिणीला आणि मला दुपारी बारा वाजायच्या आत घरी पोचायचं होतं.

दुपारी प्रत्येकीचे नवरे, मुलं जेवायला घरी येतात. त्याच्या आत बाजारहाट आवरावा लागतो म्हणून घाई चालली होती आमची. पण तेवढ्यातच बघता बघता दुकानं फटाफटा बंद व्हायला लागली. लोक पळायला लागले. काय गोंधळ चाललाय ते कळेना. पण अशा वेळी सुखरूप घरी पोचलेलं बरं म्हणून टॅक्सीला हाका घातल्या. पण एकही टॅक्सीवाला थांबत नव्हता. बससाठी बस-स्टॉपवर आलो तर बसेसही न थांबता धुमाट वेगानं पळत होत्या. कशासाठी एवढा गोंधळ चालला होता, कुणालाच माहीत नव्हतं. पण प्रत्येकजण पळत होता. आपल्यालाही आता पळतच घरी जावं लागणार की काय म्हणून जीव धास्तावला. आम्ही आमच्या घरापासून चांगले २–३ मैल दूर होतो. आम्ही दोघी घाबरून घाईघाईनं घराच्या दिशेनं निघालो.

तेवढ्यात आमच्या पाठीमागून, हॉटेल काबूलच्या दिशेनं धडाधड बंदुकीचे बार ऐकायला आले. मग मात्र गडबड, गोंधळ जाऊन एकतऱ्हेची शिस्तबद्ध घबराट पसरली. दहा महिन्यांपूर्वी झालेल्या उठावाच्या आणि सत्ताबदलाच्या आठवणी, अजून प्रत्येकाच्या मनात ताज्या होत्या. तेव्हा उठलेला गदारोळ अजून संपलेला नव्हता. बंदुकीचे बार ऐकायला आले की पाठोपाठ काय होतं ते सगळ्यांना अगदी पाठ झालेलं होतं. ‘ कूदेता ’...‘ कूदेता ’ (कू–द-एता हा मूळ फ्रेंच शब्द) असा दबल्या आवाजातला आरडाओरडा सुरू झाला. लोक सैरावैरा पळू लागले. काबूल हॉटेलच्या समोरचा रस्ता, ‘ खाना-ए-खल्क ’कडे जाणारा रस्ता, पाहता पाहता सैन्याच्या लोकांनी भरून गेला. त्यांनी ते रस्ते बंद केले. त्यामुळे त्या बाजूने जाणारा रहदारीचा लोंढा परतून मागे येत होता. गाड्या, बसेस, माणसं उलटी येत होती. एकच गोंधळ माजला. लाल-हिरव्या दिव्यांची अजिबात पर्वा न करता सगळी रहदारी भन्नाट धावत होती. धुमाट पळणाऱ्या टॅक्सींच्या मागून आम्ही ‘ टॅक्सी ’ म्हणून उगाचच ओरडत होतो, त्या थांबणार नाहीत हे माहीत होतं तरी.

शेवटी आमची कीव येऊन एका अफगाण माणसानं आपली गाडी थांबवली. म्हणाला, “ मी तुम्हांला तुमच्या घरापर्यंत सोडणार नाही. पण तुम्ही आमच्या देशात पाहुणे म्हणून आला आहात. मी तुम्हाला तोराबस्वानला सोडतो. चालेल का ? ”

आम्ही म्हटलं, “ चालेल.” आमची घरं तिथून जवळच होती. आम्ही गाडीत बसत असताना बाजूने पळणारा एकजण त्या गाडीवाल्याला तेवढ्या घाईत रागारागानं म्हणाला, “ इकडे कूदेता सुरू झालाय आणि तू या परदेशी बायांना गाडीत कशाला घेतोस ? ”

आमच्या हृदयाचा ठोका चुकला ! आता त्या गाडीवाल्यानं ‘ नेत नाही ’ म्हटलं तर ? पण तो बिचारा सज्जन होता. त्यानं वेडीवाकडी वळणं घेत, धुमाट वेगानं दहा मिनिटांत आम्हांला तोराबस्वानला सोडलं. आम्ही त्याला ‘ बेस्यार तशकूर ’–आभार, म्हटलेलं त्यानं ऐकलंही नाही, दुसऱ्या क्षणी तो आणि त्याची गाडी

नाहीशी झालेली होती.

तोराबखान हे इथलं मोठं शॉपिंग सेंटर. आता इथली पण सगळीच दुकानं बंद झाली होती. पण बाकी सगळं शांत होतं. कसलीही गडबड नाही. धावपळ नाही. लोक मात्र घोळक्या-घोळक्यानं उभं राहून आपापसांत कुजबुजत उभे होते. आम्हांला एवढं आश्चर्य वाटलं! शहराच्या त्या भागातली गडबड अजून इथपर्यंत पोचली कशी नाही ?

मैत्रीण म्हणाली, " हा ' कू ' एकदाचा सुरू झाला म्हणायचा."

" एकदाचा ? " मी आश्चर्यानं विचारलं.

" तर काय ग. गेले सहा महिने रोज ऐकतोय की इथे पुन्हा एकदा ' उठाव ' होणार म्हणून. त्याचीच वाट बघून बघून जीव वैतागला होता. झाला एकदाचा कू. आता फोडा मेल्यांनो एकमेकांची डोस्की ! " लोकर न घेताच परत यावं लागल्यामुळे मैत्रीण जाम वैतागली होती.

मी घाईघाईनं घरी आले. मुलांना कल्पना नव्हती. मुकुंदाला काहीच कल्पना नव्हती. त्या दोघांची शाळा आणि ऑफिस शहराच्या दुसऱ्या भागात. हा भाग शांतच होता. मला वाटलं अर्ध्या तासापूर्वी, भर दुपारी साडेअकरा वाजता, रस्त्यात उभी राहून मी काय स्वप्न वगैरे पाहिलं काय ?

मग दोनचार मित्रमंडळींना फोन केले. एक जण म्हणाला, " मी आज ऑफिसात जरा उशीरा गेलो. दहा–सव्वादहाला. तेव्हा रस्त्यात माझी गाडी अडवून तपासली होती. पिस्तुल बंदूक वगैरे काही गाडीत आहे का ते पाहायला. बाकी काही नाही."

दुसरा म्हणाला, " तो इराकचा परराष्ट्रमंत्री आज दुपारी परत जायचा आहे ना, त्यासाठी काही रस्त्यांमध्ये रहदारीचे फरक केलेत. बाकी गडबड वगैरे काही नाही. "

मागाहून त्यांनी सांगितलं की, त्यांचं ऑफिस हॉटेल काबूलच्या जवळपास असल्यामुळे त्यांना सगळं माहीत होतं. पण ते फोनवर मुद्दामहूनच काही बोलले नाहीत. कारण ते फोनवर बोलत असताना अफगाण लोक त्यांचं बोलणं चोरून ऐकतात.

पण मला काही चैन पडेना. पख्तुनिस्तान चौकातला सकाळचा गोंधळ, ओरडा काही साधासुधा नव्हता. काही तरी भानगड नक्कीच झाली होती.

मुकुंदा जेवणानंतर ऑफिसला जाऊन आल्यानंतर खरी बातमी कळली. अमेरिकन राजदूत अडॉल्फ डब्ज याला कोणी तरी बंदुकीच्या गोळ्या घालून ठार मारले होते. म्हणजे ११–११॥ वाजता दुपारी आम्ही दोघींनी जेव्हा बंदुकीचे आवाज ऐकले होते ते तेच होते ! आणि ही बातमी दुपारी दोन–सव्वादोन वाजता लोकांना कळली होती.

मुकुंदाच्या ऑफिसातला कॅनेडियन म्हणाला, " डब्जला कोणी तरी पळवून हॉटेल काबूलमधल्या एका खोलीत ठेवलं होतं. आणि मग तिथंच त्याला मारलं." कोणी म्हणालं, " तो स्वतः आपणहूनच काबूल हॉटेलमध्ये कुणाला तरी भेटायला गेला होता."

कोणी म्हणालं, "डब्जला पळवणाऱ्यांनी मारलंच नाही. त्याला मारलं आर्मीच्या लोकांनी." नक्की काय झालं ते कुणालाच माहीत नव्हतं. तेव्हा एक अफगाण, आरेफ रझा विनोदानं म्हणाला, "आपण आता सगळे संध्याकाळी बी. बी. सी.च्या बातम्या ऐकू या. म्हणजे नक्की काय झालं ते आपल्याला कळेल." आरेफ विनोदानं म्हणाला, पण ते खरंच होतं. कारण काबूल रेडिओ ही बातमी कितपत देईल ही शंकाच होती. जी बातमी देईल त्यावरही किती विश्वास ठेवायचा हासुद्धा प्रश्न असतोच.

नंतर मग दिवसभर सगळीकडे शांत होतं. पुन्हा दुकानं वगैरे उघडली. रहदारी सुरळीत चालू झाली. संध्याकाळी आम्ही दोघं पुन्हा एकदा काबूल हॉटेलच्या भोवतीनं चक्कर मारून आलो. सकाळी याच भागात एवढा गोंधळ उडाला होता हे कुणाला सांगूनही खरं वाटलं नसतं, एवढा सगळीकडे सुरळीतपणा आला होता. फक्त काबूल हॉटेलच्या प्रवेशदारावर, दोन लष्करी माणसं हातात मशिनगन्स घेऊन उभी होती. आणि डाव्या बाजूच्या, दुसऱ्या मजल्यावरच्या, पाच नंबरच्या खिडकीच्या लाकडी चौकटीचे टवके उडालेले दिसत होते. आजूबाजूच्या भिंतीवरचं नवं प्लॅस्टर ओलं दिसत होतं.

संध्याकाळी साडेपाचच्या फारसी बातम्यांमध्ये आणि नंतर सहा वाजता टी. व्ही.वर बातमी सांगितली ती अशी—

"अध्यक्ष तराकी आणि परराष्ट्रमंत्री अमीन यांनी अमेरिकन राजदूत डब्ज यांच्या दुःखद मृत्यूसंबंधी अध्यक्ष कार्टर आणि परराष्ट्रमंत्री व्हॅन्स यांना शोकसंदेश पाठवले आहेत. 'खल्क'च्या दुश्मनांनी डब्ज यांना पळवून नेलं होतं. त्यांना सोडवण्यासाठी आमचे लोक तिथं गेले तेव्हा डब्ज स्वतः आणि त्यांना पळवून आणणारे चार लोक एका खोलीत गोळ्या लागलेल्या स्थितीत मरून पडलेले आढळले."

दुसऱ्या दिवशापासून बी. बी. सी., व्हॉइस ऑफ अमेरिका, इथले लोक, यांच्याकडून हळूहळू डब्जच्या मृत्यूचं चित्र स्पष्ट होऊ लागलं. मुख्य म्हणजे कोणी एक अमेरिकन पत्रकार त्याच वेळी काबूल हॉटेलमध्ये रहात होता. एका पत्रकाराच्या आयुष्यात क्वचितच असा योगायोग येत असावा! त्याने त्या योगायोगाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. तिथे घडलेली सगळी घटना त्याने स्वतः पाहिलीच (जी काय पहायला मिळाली तेवढी) पण ताबडतोब हॉटेलमधले नोकर-चाकर, रूम-बॉइज्, प्रवेशदाराशी असलेली माणसं वगैरे जो कोणी सापडेल त्याच्याशी तो पत्रकार बोलला आणि त्याने आपली ही 'स्टोरी' ताबडतोब बी. बी. सी. व्हॉइस ऑफ अमेरिकेकडे पाठवली... त्याची हकीगत आणि इथल्याच इतर लोकांकडून कळलेली हकीकत अशी होती :

त्या दिवशी सकाळी १० वाजता डब्ज आपल्या घरातून आपल्या ऑफिसकडे जायला निघाले. त्यांनी नेहमीची गाडी न घेता, दुसऱ्याच एका छोट्या गाडीतून ते जात होते. गाडीवर राजदूताचा ध्वज होता. सोबत आणखी एक अमेरिकन माणूस

होता. तो कोण होता, त्याचं पुढं काय झालं वगैरेबद्दल नंतर अफगाण, अमेरिकन सरकारे गप्पच आहेत. आपल्या गाडीचा पाठलाग होत आहे, हे डब्जच्या ड्रायव्हरच्या लक्षात आले. त्याने ते लगेच डब्जना सांगितले. पाठलाग चुकवून आपली गाडी पुढे काढायला डब्जने 'नको' म्हटले. त्या दिवशी डब्ज आपला नेहमीचा रस्ता सोडून दुसऱ्याच रस्त्याने जात होते. तोराबस्खान या गर्दीच्या चौकामध्ये, मशिनगन्स घेतलेल्या, वाहतुकीच्या पोलिसचा पोशाख घातलेल्या लोकांनी त्यांची गाडी अडवली. गाडीचं दार उघडून ते लोक डब्जच्या शेजारी बसले, आणि त्यांनी गाडी काबूल हॉटेलकडे न्यायला ड्रायव्हरला सांगितले. रस्त्याला लागून असलेल्या, दुसऱ्या मजल्यावरच्या, कोपऱ्यातल्या पाच नंबरच्या खोलीचा ताबा त्यांनी घेतला. आणि तराकीला फोन केला की, 'नूरीस्तानचा नसीरुद्दीन हा मुल्ला कित्येक दिवस तुरुंगात आहे; त्याला सोडून द्या, नाही तर आम्ही डब्जला मारू!'

यानंतरच्या हकीकतीमध्ये अफगाण आणि अमेरिकन असे दोन भाग पडतात. अफगाण सरकारच्या म्हणण्याप्रमाणे आणि श्री. अमीनने पत्रकारपरिषदेमध्ये सांगितल्याप्रमाणे, "त्या नूरीस्तानी लोकांचा फोन आल्यावर आम्ही ताबडतोब अध्यक्ष कार्टर यांच्याशी संपर्क साधायच्या प्रयत्नाला लागलो. तोपर्यंत त्या लोकांना सांगितले की, त्या मुल्लाला आम्ही ताबडतोब सोडून देत आहोत. पण त्या मुल्लाचा ठावठिकाणा लागून त्याला तुरुंगातून इथे आणीपर्यंत थोडा तरी वेळ हवा की नको? पण त्या लोकांनी फक्त दहा मिनिटांचाच अवधी दिला होता. जेव्हा दहा मिनिटे संपायला आली तेव्हा मात्र डब्जला वाचवण्यासाठी आमचे लोक हॉटेलात घुसले. त्या खोलीत जाऊन पाहतात तर डब्जच्या डोक्यामध्येच गोळी लागली होती. दुसरी गोळी खांद्याला लागली होती. तिसरी गोळी दंडाला लागली होती. अमेरिकन राजदूतावरचा हा निर्घृण हल्ला पाहून आमच्या लोकांनी त्या नूरीस्तानी लोकांना गोळ्या घातल्या आणि जखमी डब्जना इस्पितळात पोचवले. तिथे ते शुद्धीवर न येताच मरण पावले!"

अमीनने आपल्या मुलाखतीमध्ये सांगितले की, "महिन्यापूर्वीच आम्ही डब्जना शरीरसंरक्षक देऊ केले होते. त्याला त्यांनी नकार दिला होता. ट्रॅफिक पोलिसांनी अडवले किंवा लाल दिवा लागलेला असला तरी गाडी न थांबवता पुढे जाण्याची खास परवानगी डब्जला देण्यात आली होती. तरी त्यांनी गाडी का थांबवली? आपला पाठलाग होतो आहे हे ड्रायव्हरने त्यांच्या ध्यानात आणून दिले होते तरी डब्जने तिकडे दुर्लक्ष का केले?

"आम्ही जेव्हा फोनवरून नूरीस्तानी लोकांशी बोलत होतो तेव्हा तिथे अमेरिकन लोक होतेच. काबूल हॉटेलसमोर उभं राहून रशियन सैनिक अधिकारी आमच्या सैनिकांना सल्ला देत होते असं म्हणतात ती खोटी गोष्ट आहे. काबूल हॉटेल हे खूप मोठं हॉटेल आहे. जगभरातले लोक तिथं राहतात. त्याचप्रमाणे काही रशियन्सही तिथं त्या वेळी होते. डब्जना लागलेल्या गोळ्या परदेशी बनावटीच्या होत्या ही गोष्ट खरी आहे.

पण अफगाणिस्थानात बंदुकीच्या गोळया तयारच होत नाहीत. त्यामुळे इथे वापरली जाणारी प्रत्येक गोळी परदेशी बनावटीचीच असते.”

अमीन पुढे म्हणाले, “ अफगाणिस्थानात हेरगिरीसाठी जगातली बलाढ्य राष्ट्रं लाखो रुपये खर्च करीत असताना, आमची क्रांतीची तयारी सुरू होती हे कुणालाही कळलं नाही. आम्ही आमची क्रांती यशस्वी केल्यानंतर मात्र लोक म्हणायला लागले की आम्हाला रशियाची फूस होती, रशियाने आम्हाला मदत केली वगैरे. हा खोडसाळपणा आहे.”

अमेरिकेचे म्हणणे असे होते की, खोलीत शिरल्यानंतर नूरीस्तानी लोकांचे अध्यक्ष तराकी, यांच्याशी बोलणं झाल्यावर, डब्जने स्वतः रशियन राजदूताला फोन करून सांगितले की, “ या बाबतीत तू जर अफगाण सरकारवर दडपण आणलेस तरच माझ्या सुटकेची आशा आहे.” त्यावर रशियन राजदूताने खटपट करायचं वचन दिलं होतं. आणि तो स्वतः अमीनकडे गेला. त्या दिवशी दुपारी दोन वाजता इराकचे परराष्ट्रमंत्री परत जाणार होते. त्याबद्दलची पाहणी करायला, अमीन विमानतळावर गेला होता. तिथून त्याला बोलावून आणले. अमीन आणि पुसोनॉव्ह—रशियन राजदूत हे दोघे बोलत असतानाच, अमेरिकन दूतावासातले डब्जचे दुय्यम अधिकारी अमीनकडे बोलणी करायला गेले होते. तेव्हा त्यांच्याशी न बोलता अमीन पुसोनॉव्हशीच बोलत राहिला. अमेरिकन अधिकाऱ्यांना बाहेरच्या खोलीतच थांबवून ठेवण्यात आलं होतं.

“ काबूल हॉटेलच्या समोरच इथली सरकारी बँक आहे. त्या बँकेच्या पहिल्या मजल्यावर अफगाण सैन्याचे लोक गेले; आणि त्यांनी तिथून काबूल हॉटेलच्या ‘ त्या ’ खोलीवर गोळीबार केला. त्या वेळी तिथं काही रशियन लोक होते. त्यांच्यापैकी एकाच्या हातात हिरव्या रंगाची पिशवी होती. त्या पिशवीतून त्याने काही तरी वस्तू काढून त्या अफगाण सैनिकांच्या हातात दिल्या, आणि हातवारे करून त्यांना काही तरी सांगितल्या-नंतर मग गोळीबार झाला.”

डब्जला हालवल्यानंतर ‘ त्या ’ खोलीची साफसुफी करून, झालेली मोडतोड दुरुस्त करून, दोन तासांतच ती खोली पहिल्यासारखी करून मगच अमेरिकन लोकांना पाहण्यासाठी आत जाऊ दिलं. त्याअगोदर, डब्ज त्या खोलीत जखमी असताना जाऊ दिलं नाही म्हणून अमेरिकेने निषेध व्यक्त केला.

ज्या धार्मिक संघटनांशी डब्जना पळवून नेणाऱ्यांचा संबंध जोडला गेला होता, त्यांपैकी एका संघटनेनं जी नूरीस्तान भागातील आहे, त्या प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसल्याचे जाहीर केलं. नाना तऱ्हेच्या गोष्टी बोलल्या जात होत्या. ज्या वेळी डब्जना ‘ पळवून ’ नेत होते त्याच वेळी ‘ मेक्रेरियॉन ’ भागातल्या रशियन लोकांच्या घरावर आणि ‘ दर-अल-अमन ’ भागातल्या रशियन एम्बसीवर गोळीबार झाला होता म्हणे !

कोणी म्हणतं, डब्जला पळवून वगैरे नेलेलं नव्हतंच. ते स्वतःच कुणाला तरी

भेटायला हॉटेल काबूलमध्ये गेले होते. डब्ज हा सी. आय. ए.चा माणूस होता, हे उघड गुपित होतं. चिलीमधलं अलेन्देचं सरकार उलथून पाडण्यात त्याचा हात होता असंही कोणी म्हणतं. या गोष्टी विचारात घेतल्या की, डब्जचा मृत्यू हा काही सरळ मामला नाही हे लगेच लक्षात येतं. शिवाय अमेरिकन राजदूत इतक्या सहजासहजी पळवला जातो हीसुद्धा आश्चर्याची गोष्ट. शिवाय जर बंडखोरांना सरकारशी सौदाच करायचा होता तर ते रशियन राजदूताला पळवतील की अमेरिकन राजदूताला ? अमेरिकन राजदूत मेला काय जगला काय, त्याचं सोयर-सुतक अफगाण क्रांतिकारी सरकारला जास्त वाटेल की रशियन राजदूताचं ? डब्जवर गोळीबार झाला, तो बारा वाजायच्या पाच दहा मिनिटं मागे-पुढे आणि त्याच वेळी दुकानं बंद झाली. मी स्वतः दुकानं अगोदर बंद होताना पाहिली आणि नंतर गोळीबाराचे आवाज ऐकले होते. बँक बंद झाली. कधी नव्हेत त्या गावातल्या बसेस बंद झाल्या होत्या. खल्क महालाकडे जाणारे सगळे रस्ते रोखले गेले होते—यांपैकी कोणत्या गोष्टी सरकारी हुकुमाने घडल्या होत्या ? लोकांनी आपणहूनच दुकानं, बसेस वगैरे बंद केल्या होत्या काय ? काही तरी 'गडबड' होणार आहे, होत आहे अशी सरकारची आणि काही जाणकार लोकांचीही अपेक्षा होती काय ? अमेरिकन राजदूत काबूल हॉटेलमध्ये 'सापडला' आहे असं कळल्यावर अमीन म्हणाला होता, 'किल दॅट बास्टर्ड' ते खरं का ? डब्जबरोबर चार अफगाण मारले गेले होते ते लोक सकाळी घरून निघताना सांगून निघाले होते की, "आज फार मोठ्या कामगिरीवर आम्ही निघालो आहोत. कदाचित परत येणार नाही." ते खरेच, की निव्वळ कुणाची कल्पनाशक्ती होती ती ? शिवाय ते चौघे, डबल एजंट्स, पार्टी-वर्कर्स होते का ?

या प्रश्नांची आणि इतरही बऱ्याच प्रश्नांची उत्तरं कदाचित कधीच मिळायची नाहीत. या प्रश्नांची खरी उत्तरं जर बाहेर आली तर एखादे वेळी अफगाण सरकार आणि अमेरिका या दोघांनाही ती सोयीची नसतील. ती त्यांना नकोशी, न रुचणारी असण्याची शक्यताच फार आहे. डब्ज यांचं शव नेण्यासाठी अध्यक्ष कार्टर यांनी स्वतःचं खास विमान पाठवलं होतं. शिवाय डब्ज यांना ज्या गाडीतून पळवून नेलं ती गाडीही दुसऱ्या एका खास विमानानं अमेरिकेला तपासणीसाठी रवाना झाली. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी काही अमेरिकन तज्ज्ञ इथे येऊन गेले. सगळं काही खास अमेरिकन ढंगानं झालं. तरी पण डब्ज यांच्या मृत्यूचं गूढ पूर्णतः उलगडलं नाही. आमच्यासारख्याच तटस्थ बघ्यांना मात्र हिचकॉकचा एखादा सिनेमा मध्यंतरापर्यंतच पाहिल्यासारखा वाटला.

## अफवांचेच राज्य !

डब्जच्या खुनाचा बाकीचा परिणाम काय झाला असेल तो असो, पण त्यानंतर

सगळे अफगाण मंत्री मेक्रेरिऑन या भागात राहायला गेले. अगोदरच सगळे रशियन्स तिथेच राहतात म्हणून त्या नावाला जरा वेगळंच वळण प्राप्त झालेलं होतं. त्यातच आता सगळे मंत्री तिथेच रहायला गेले. अर्थातच तिथे अगोदरपासूनच असलेला 'बंदोबस्त' आणखीनच वाढला. त्या भागातल्या चौकाचौकांत रणगाडे सतत उभे राहू लागले. रस्त्यावरचे सशस्त्र सैनिक जाणाऱ्या-येणाऱ्याची कसून तपासणी घेत. अफगाण लोक या प्रकारानं प्रक्षुब्ध झाले. ते त्यांची टिंगलही करत. म्हणत, "आमचा देश हळूहळू कसा 'लोकसत्ताक' होत चाललाय ते पाहा बरं. जुलमी जाहीरशहा एकटाच केव्हाही कुठल्याही चायखान्यात (आपल्याकडचा 'इराणी' पण झोपडीतला) जाऊन चहा पीत बसायचा. लोकांशी गप्पा मारायचा. पण तो जाऊन लोकशाहीवादी दाऊदखान सत्तेवर आला. तेव्हा त्याने चायखान्यात जाणं बंद केलं तरी पण तो शहरातून आपली गाडी स्वतःच चालवीत, एकटादुकटासुद्धा हिंडायचा. आणि आता हे तराकी अमीनच काय पण त्यांचे फालतू मंत्रीसुद्धा पहाऱ्यात बंद असतात! लोकशाहीचा डांगोरा पिटणाऱ्या या लोकांना लोकांचीच भीती वाटते की काय?"

अर्थात लोकांची भीती वाटावी असंच सगळं चाललं होतं. हेरत शहरातलं तराकीचं जुनं घर पहाऱ्यात असूनसुद्धा लोकांनी जाळून टाकलं. काबूल सोडून इतरत्र रोजच्या लढाया सुरू होत्या. कधी कळायचं की, अमुक शहर बंडखोरांनी घेतलंय; अमुक प्रांतामध्ये बंडखोरांचाच वरचष्मा आहे. पण या बातम्या तशा फसव्या असतात. कारण दिवसा ते शहर सरकारच्याच ताब्यात असे. पण रात्र पडली की, आजूबाजूच्या डोंगरावरून बंडखोर टोळधाडीसारखे येतात. सरकारी ऑफिस, सैन्यतळ लुटत; पैसा, औषधं, शस्त्रास्त्रं यांसारख्या वस्तू लुटून घेऊन जात. सकाळ व्हायच्या वेळेस परत पहाडावर निघून जात. सरकारी रणगाडे, जड मशिनगन्स पहाडावर चढू शकत नाहीत, म्हणून हेलिकॉप्टर्समधून गोळीबार करावा तर सरकारी हेलिकॉप्टर्स खाली आणि बंड-खोरांचं राहण्याचं ठिकाण वर अशी स्थिती होते. तेव्हा बंडखोर हेलिकॉप्टर्सच पाडतात. अशी स्थिती असे. त्यामुळे पहाडावर बंडखोरांचंच राज्य सुरू होतं. अजूनही आहेच.

१९७९ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच अफगाण सरकारने गाजावाजा करून एक मोठा समारंभ घडवून आणला. पाकिस्तानात पळून गेलेले अफगाण नागरिक परत आले म्हणून त्यांचा सत्कार केला; स्वागत केलं. आणि "आता बंडखोरांच्या कारवाया संपुष्टात आल्या आहेत, लोकांचा बंडखोरांवरचा विश्वास उडून गेला आहे, सरकारचा विश्वास वाटू लागला आहे. बाकीच्या लोकांनी, सर्वांनी परत यावे. सरकार त्यांचे स्वागत करील. त्यांना मोफत जमिनी कसायला दिल्या जातील. त्यांच्या जुन्या गुन्ह्यांबद्दल त्यांना क्षमा मिळेल. सरकार त्यांना दुस्वासाने वागवणार नाही." असे आश्वासनही दिले गेले.

खरी गंमत अशी होती की, हे तथाकथित परत आलेले लोक भटक्या जमातीचे होते. आपल्या शेळ्यामेंढ्या, उंट घेऊन दरवर्षीच हे लोक या वेळी, उन्हाळा सुरू झाला की पाकिस्तानातून परत येतात, आणि उत्तर अफगाणिस्तानात जातात; आणि

पुन्हा थंडीला सुरुवात झाली, बर्फ पडायची वेळ आली की पुन्हा आपला कुटुंबकबिला घेऊन उत्तर अफगाणिस्थानातला मुक्काम हालवून मजल दरमजल करीत पाकिस्तानात जातात. शेकडो वर्षांपासून त्यांची ही पद्धत चालू आहे. तेव्हा पाकिस्तानातून परत आलेले हे लोक त्या भटक्या जमातीचे आहेत. हे लोक आता पाच-सहा महिन्यांनी परत पाकिस्तानात जातील, तेव्हा अफगाण सरकार काय करणार आहे ? अफगाण सरकार त्यांना अडवू शकत नाही.

अफवांना तर अगदी ऊत आला होता. आणि गंमत म्हणजे, प्रत्येक अफवेमध्ये काही ना काही सत्यतेचा धागा असतोच. हे नंतर कळायचं. त्यामुळे ऐकण्यात येणाऱ्या अफवेकडे दुर्लक्षही करता येत नसे. मध्येच कळलं की तराकी अमीननं आपापली कुटुंबे मास्कोला पाठवली आहेत. कारण बंडखोरांची फितुरांची एवढी भीती त्यांना वाटते आहे. तरी तराकी आणि अमीनभोवतीच्या रक्षणाची संपूर्ण जबाबदारी रशियाने उचलली होती. त्यांच्या घरातल्या स्वैपाकापासून व्यक्तिगत संरक्षकांपर्यंत सगळ्या थरांवर रशियन सैनिक पेरलेले होते. तरी त्यांना आपल्याच अफगाण लोकांची भीती वाटते आहे, म्हणून म्हणे त्यांनी आपापली बायकामुलं मास्कोला सुरक्षित ठिकाणी पाठविली आहेत. ही अफवा एवढी पसरली की शेवटी सरकारने आपणहूनच जाहीर केले की, फक्त तराकीची बायको तेवढी कसल्या तरी ऑपरेशनसाठी मास्कोला गेली आहे. महिन्याभरानं ती परत आली तेव्हाही ती परत आल्याची बातमी देऊन टाकली होती.

ही अफवेची भानगड जेव्हा अगदी दाट होती, तेव्हा एकदा एकाच्या घरी आम्ही आठ दहा जण जमलो होतो. तेव्हा शर्मानं अतिशय गंभीर चेहरा करून सांगितलं की, खुद्द तराकी क्यूबाला पळून गेला आहे, अशी अगदी खात्रीलायक बातमी त्याला लागली आहे !

झालं ! या बातमीवर अगदी गंभीरपणानं चर्चा सुरू झाली. बातमी होतीच तशी गंभीर. कोणी म्हणालं, " तरीच, गेल्या चारपाच दिवसांत टी. व्ही.वर तराकी दिसला नाही." कोणी म्हणालं, " कालच मी अर्ग महालाच्या समोरच्या रस्त्यावरून जात होतो, तर तिथे जरा गडबड वाटलीच बरं का मला ! "

त्यानंतर मग आम्ही सगळेच या अफवेची ' बातमी ' कधी होते याची वाट पाहात होतो. त्या बाबतीत आणखी काही कुणाला कळलं तर बाकीच्यांना सांगायचं ठरलं. पण आठ दहा दिवस झाले तरी तराकीची काहीच बातमी कळेना. तेव्हा आम्ही सगळे अस्वस्थ झालो. आणि एक दिवस पुन्हा असेच कुठे तरी जमलो असताना शर्माला घेराव घातला. त्यावर पडेल आवाजात आणि त्याहीपेक्षा पडेल चेहऱ्याने तो म्हणाला, " अभी अभी तो सब कह रहे थे की तराकी, अमीनकी फॅमिलीज् मॉस्को भाग गयी है। तो सभीने उसपर विश्वास किया। और वाकई तराकीकी वाइफ मॉस्को गयी भी थी। फिर मैने सोचा, उसकी वाइफ मॉस्को जा सकती है, तो वो खुद क्यूबा क्यूं न जाये ? मै तो ऐसेही मजाक कर रहा था। मुझे क्या मालूम की आप लोग इस चीझको इतना

सीरिअसली लेंगे ?"

त्याचं हे बोलणं ऐकून आमची हसता हसता पुरेवाट झाली. यातला गंमतीचा भाग जाऊ दे; एक गोष्ट मात्र सिद्ध होते की, कितीही अफलातून गोष्ट कोणी सांगितली तरी त्यावर आम्ही चटकन विश्वास ठेवत होतो. कारण तशा अफलातून गोष्टी घडतही होत्या !

'कुंदूस' या शहराला गेलेल्या अमीनच्या भावाचाच खून झाला. अतिशय कडक बंदोबस्त असूनसुद्धा ! त्याच्या बहिणीचे घर लुटले गेले. सगळ्या पुरुषांना मारून टाकून, बायकांना पळवून नेलं बंडखोरांनी ! आणि मागे चिठी ठेवली होती, "तुम्ही आमच्याशी जसे वागलात तसेच आम्हीही तुमच्याशी वागू. तेव्हा संभाळून."

अत्यंत कडक बंदोबस्त असतानासुद्धा, खुद्द अमीनच्या ऑफिसच्या टेबलावर अधून मधून चिठ्या ठेवलेल्या सापडत. एका चिठ्ठीत लिहिलं होतं, "तुम्ही रशियाच्या फार जवळ जात आहात. हे आम्हाला खपणार नाही. रशियापासून चार पावलं दूर रहा, नाही तर परिणाम फार वाईट होईल !" एकदा लिहिलं होतं, "सुरुवातीपासून आम्ही तुम्हाला साथ दिली. पण तुम्ही आता तुमचे मार्ग बदलले आहेत. नको त्या गोष्टी करू लागला आहात. जर तुम्ही पूर्वीसारखे वागला नाहीत तर तुम्हालाही हाकलून देण्यात येईल."

अफगाण सरकारने रशियाला किती जवळ करायचं यावरून खुद्द खल्क पार्टीमध्ये, आर्मीमध्ये फूट पडत चालल्याचं बोललं जात असे. अफगाण सैनिकांनी सरकारला सांगितलं होतं की, "आम्हाला रशियन बनावटीच्या बंदुका नकोत, त्या फार जड असतात. त्यांची रचना जुनी आहे, त्यामुळे त्या चांगल्या चालतही नाहीत. त्यापेक्षा अमेरिकन बनावटीच्या बंदुका आणा ! त्या जास्त चांगल्या आहेत !"

रशियाशी मैत्री ठेवण्याच्या मुद्द्यावरून खुद्द मंत्रिमंडळातही भांडाभांडी चालू झाली. कपडे बदलावेत इतक्या सहजपणानं मंत्र्यांना काढून टाकलं जाऊ लागलं. सौर क्रांती घडवून आणण्यात ज्याने जास्तीत जास्त पुढाकार घेतला होता त्या लेफ्टनंट जनरल वतनझार, परराष्ट्रमंत्रीसारख्याचे खाते पटकन काढून घेतले जाते; आणि मग त्याचा ठावठिकाणासुद्धा कुणाला माहीत नसतो. लोक म्हणतात, तो आपणहूनच पळून गेला आहे. हवेत विरून गेल्यासारखी, महत्त्वाची माणसं एकदम नाहीशीच होऊ लागली. आणि या सगळ्या बातम्यांची चर्चा चालू असताना खुद्द तराकी आणि अमीन हे स्वतःच सी. आय. ए.चे हस्तक असल्याचा निर्वाळा लोक देऊ लागले ! दोघेही बरीच वर्षे अमेरिकेत राहून आलेले होते. इथे परत आल्यानंतरही बरीच वर्षे अमेरिकन मदतीनं चालणाऱ्या शाळांशी, अमेरिकन वकिलातीशी त्यांचा संबंध टिकून राहिला होता. या गोष्टी त्या दोघांच्याही विरोधी जाणाऱ्या आहेत. तरी पण एका समाजवादी देशाचे मार्क्सवादी राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान एकदम सी. आय. ए.चे हस्तकच ! मोठी विलक्षण गोष्ट वाटते ही. पण लोक तसंच बोलत हे मात्र खरं. एकदोघांना त्याबद्दल

उलटसुलट विचारलं तेव्हा उत्तर मिळालं, " तसं खात्रीनं कसं सांगता येईल ? पण सगळे तसं म्हणतात हे मात्र खरं."

एकानं उत्तर दिलं, " तराकी, अमीन हे दोघे एकदम सी. आय. ए.चे हस्तक आहेत असं मला तरी वाटत नाही. तरी पण ते अगदी खास मार्क्सवादी नसतीलही कदाचित. मला तर असं वाटतं की, अमेरिकेमध्ये जे कम्युनिस्ट आहेत त्यांच्या गटाचे असतील हे; अमेरिकन कम्युनिस्ट."

## काही झालेच तर...

इतर सगळ्या देशांच्या वकिलातींनी जर काही गोंधळ झालाच, तर काय खबरदारी घ्यायची, कसे वागायचे, याबद्दलच्या संपूर्ण सूचना आपापल्या नागरिकांना दिल्या होत्या. या दृष्टीनं सुरुवात केली यू. एन.च्या लोकांनी. त्यांचा सगळा खाक्याच निराळा. जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी भयानक उदासीनतेनं काम करणाऱ्यांची यांची जात. यू. एन.ची आणि त्यापाठोपाठ आपली स्वतःची प्रतिष्ठा फक्त संभाळत असतो हा माणूस. त्यात तो 'गोरा' असेल आणि 'काळ्या' देशात काम करीत असेल तर सगळाच लखल उजेड. या उजेडात मग काळ्या देशात काम करणारे काळे यू. एन. वालेही प्रकाशमान होऊन उठतात. तर अशा या यू. एन.नं आणीबाणीच्या वेळी काळजी कशी घ्यायची याबद्दलच्या सूचनांची यादीच तयार केली. त्यानुसार घरात लांबलचक दोर ( पाणीपुरवठा बंद झाल्यावर विहिरीतून पाणी काढायला. पण इथे तशा प्रकारच्या विहिरी किती आहेत हा अभ्यासाचा विषय आहे. ) बादली, वीज गेली तर मेणबत्त्या, पंधरा दिवस पुरेल एवढं धान्य, खान्याच्या वस्तू, पाणी भरून ठेवावं असं सांगण्यात आलं. आणि शेवटी असे सांगितले की, तशीच कठीण वेळ आल्यानंतर केव्हाही जाण्यास सोपे पडावे म्हणून सर्वांनी आपापली सूटकेस, पासपोर्ट, इतर पेपर्स नेहमी तयार ठेवावेत. बॉम्बफेक वगैरे सुरू झाल्यावर काय करावं हे सांगितलेलं होतं. पण मुख्य महत्त्वाची सूचना होती की, ऑफिसातल्या अफगाण माणसांशी कमीतकमी संबंध ठेवा, अनोळखी माणसाशी बोलू नका, घराबाहेर पडू नका. कठीण अवस्था नंबर एक, नंबर दोन, असे भाग पाडून त्या त्याप्रमाणे काय करायचं त्याच्या सूचना दिल्या होत्या. शहराचे विभाग पाडून प्रत्येक विभागावर एक वरिष्ठ, एक कनिष्ठ वॉर्डन नेमला. जरा काही खुट्ट झालं की हे वॉर्डन्स आपापल्या पाल्यांना सूचना द्यायचे. 'घराबाहेर पडू नका' हीच एकुलती एक सूचना बहुतकरून असायची.

आपल्या वकिलातीने यू. एन.चीच सही सही नक्कल केली. सूचनांची तीच यादी, तसेच वॉर्डन्स नेमणं वगैरे सगळं तसंच. पण गंमत अशी व्हायची की, गावात हिंडणाऱ्या लोकांना बातम्या अगोदर लागत, आणि मग आपल्या जबाबदारीच्या ओझ्याखाली घरीच बसलेला वॉर्डन लोकांना कळवी. आपले लोक वॉर्डन्सना वकिलातीच्या

लोकांनाही फार छळू लागले. 'आणीबाणीसाठी आम्ही धान्य वगैरे भरून ठेवू. पण मग रोज ताजा भाजीपाला, फळं वगैरे आम्हाला एम्बसी घरोघर आणून देईल का?' किंवा 'बॉम्बिंगमध्ये आमच्या सामानाचं (इंपोर्टेंट) नुकसान झालं तर वकिलात आम्हांला नुकसान भरपाई देईल का?... द्यायलाच हवी.' कित्येकांनी तर बॉम्बिंग सुरू झालं की आपापला बोरी-बिस्तरा घेऊन वकिलातीच्या हॉलमध्येच जाऊन राहण्याची नोटीस वकिलातीला देऊन टाकली. पण आपली वकिलात अशी वस्ताद की काय वाट्टेल ते झालं, कितीही गंभीर परिस्थिती आली तरी 'आपण नाही बुवा कुणाच्या भानगडीत पडणार' असं म्हणून मदत करणं टाळण्याचं कसब शिकल्यामुळे निर्धास्त होती. एकदा याद्या दिल्यावर आणि वॉर्डन्स नेमल्यावर वकिलातीची जबाबदारी संपली होती. अशा तऱ्हेनं अडचणीच्या वेळी मदत करण्यासाठी म्हणून उभी केलेली ही संपूर्ण यंत्रणा विनोदाचा विषय झाली! यू. एन.मध्ये काम करणाऱ्या भारतीयांनी वकिलातीची टिंगल करायची, आणि त्यांनी त्यांची टवाळी करायची. हा एक गप्पांचा खमंग विषयच झाला होता.

## जनगणनेचा किस्सा

आजतागायत अफगाणिस्थानात व्यवस्थित अशी जनगणना झालीच नव्हती. त्याचं साधं कारण होतं की, अमुक एका आकड्याच्या वर लोकसंख्या गेली की यू. एन. कडून विविधोपचाराने मिळणारी मदत मिळाली नसती. म्हणून आतापर्यंत जनगणनेचे काम दोनदा हाती घेऊनही, आकडा वर जातो आहे, अशी शंका आली की सोडून दिले होते. (तरीसुद्धा अफगाणिस्थानची लोकसंख्या वीस दशलक्ष असावी असा तज्ज्ञांचा मान्य झालेला अंदाज.) पण आता रशियासारखा खंबीर पाठीराखा असल्यामुळे नव्या सरकारने मोठ्या उत्साहाने हे आवश्यक काम हाती घेतले. आणि जोमानं जनगणना सुरू झाली. काबूलमध्ये सरकारी लोक घरोघरी जाऊन मोजणी करीत होते. इतरत्र काय चाललं होतं ईश्वर जाणे. जनगणनेचे फायदे, आवश्यकता, सरकार रेडिओवरून, टी. व्ही.-वरून सतत लोकांना सांगू लागले. लोकांनी सरकारी नोकरांना या बाबतीत मदत करावी असे आवाहन केले जाऊ लागले. तरी पण सध्याच्या लोकांची मनःस्थिती अशी की, सरकारने काहीही केले, कितीही चांगली गोष्ट केली तरी त्याला विरोधच करायचा. त्यामुळे अर्थातच या जनगणनेविरुद्ध लोकमत बिघडविण्याचे काम पद्धतशीरपणाने सुरू झाले. घराघरांत शिरून सरकारी लोक तुमच्या घराची तलाशी घेतील, तुमच्या घरातली तरुण पुरुष माणसं किती ते त्यांना कळलं की त्यांना सक्तीनं सैन्यात जावं लागेल, तुम्हांला जर एकापेक्षा जास्त बायका असतील तर त्यांना सरकार घेऊन जाणार आहे, अशा तऱ्हेच्या गोष्टी लोकांना सांगण्यात येऊ लागल्या. अर्थातच जनगणनेसाठी आलेल्या सरकारी नोकरांना घराघरांतून विरोध जाणवू लागला. हा विरोध हजारा

लोकांकडून जास्त तीव्र होता. एक तर हजारा लोक शिया आहेत. इतर अफगाण सुन्नी आहेत. त्यामुळे तो झगडा आहेच. शिवाय अमानुल्लाच्या राजवटीपर्यंत हे हजारा लोक गुलामगिरीत होते. अमानुल्लाने त्यांची गुलामगिरीतून सुटका केली होती. तेव्हा या लोकांना सतत भीती वाटते की नवे सरकार आमची शिरगणती करून आम्हाला पुन्हा गुलाम तरी करणार किंवा तुरुंगात टाकणार. शेजारचा इराण हा प्रामुख्याने शिया पंथीय, त्यामुळे इराणच्या चिथावणीमुळे हजारा सरकारविरुद्ध लढत आहेत, म्हणून सरकारचा हजारा लोकांवर जरा विशेषच रोष होता.

किती तरी दिवस धुमसणाऱ्या या वातावरणाचा स्फोट शेवटी जून १९७९ च्या २३ तारखेला झाला. जादेमेवांड या दाट वस्तीच्या जुन्या शहरातल्या एका गल्लीतल्या घरामध्ये जेव्हा जनगणना करणारे लोक गेले तेव्हा काही तरी कारणावरून बोलाचाली झाली...वाढली...आणि हाणामारीला सुरुवात झाली. त्याच वेळी त्या भागातल्याच पोलीस चौकीवरही सशस्त्र हल्ला झाला. बघता बघता घरातून बंदूकधारी लोक बाहेर पडले आणि त्यांनी रस्त्यावरच्या रणगाडेवाल्यांना, शिपायांना मारायला सुरुवात केली. ताबडतोब जादा सैन्य तिथं पोचलं आणि बॉम्बर हेलिकॉप्टर्सही तिथं पोचली. संध्याकाळच्या आत भयंकर धुमश्चक्रीनंतर शांतता प्रस्थापित करण्यात आली. किती तरी माणसं मेली. त्याच वेळी गावात इतरत्र आणखी १०–१५ ठिकाणी असाच उठाव करायचा बंडखोरांचा बेत होता. पण याचा अगोदरच सुगावा लागल्यामुळे, सरकारने ताबडतोब योग्य ती खबरदारी घेतली होती. तीन दिवस जुन्या काबूलमधले वीज-पाणीच नव्हे तर सगळी दुकानं, अगदी 'नान'ची दुकानंसुद्धा बंद ठेवून सरकारने तिथल्या लोकांची अक्षरशः भाकरीसुद्धा तोडली होती. संचारबंदी सतत चालू होती. आणि त्या वेळात घराघरांत शिरून संशयितांना पकडून नेण्यात आलं. ज्या धर्मशाळेत बंडखोर लोक नेहमी जाऊन-येऊन असतात असा संशय सरकारला होता, ती धर्मशाळाच बॉम्ब टाकून उडवून दिली होती. तिथल्या लोकांना अगदी जेरीला आणलं होतं.

लोकांचाच काय पण सैन्यामधल्या लोकांचाही विरोध संपत नाही. संधी मिळाली की त्याचा स्फोट होतोच. जादेमेवांडमधल्या गडबडीनंतर दोन महिन्यांनी खुद्द सैन्याच्याच लोकांनी खूप मोठा उठाव केला. त्यांचा बेत होता की, ७ ऑगस्टला सकाळी एकाच वेळी अर्ग महाल, करघा, बालाहिसार, दारुलअमन या सगळ्या सैन्य-ठाण्यांनी एकदमच उठाव करायचा. या बेताचाही सुगावा सरकारला लागताच सरकारने ठिकठिकाणच्या संशयितांना पकडलं, त्यांची आपापसांतली बिनतारी यंत्रे निकामी केली, त्यांचे रस्ते अडवून धरले. बालाहिसार हा छोटासा किल्ला बाजूला असल्यामुळे त्यांना कल्पनाच नव्हती. त्यांनी ठरल्याप्रमाणे सकाळी गोळाबारीला सुरुवात केली. तिथल्या प्रचंड मोठ्या शस्त्रास्त्र-साठ्यावर राखण करण्यासाठी बरेच मोठे रशियन सैन्य तिथे होते. सुरुवातीलाच सगळ्या रशियन्सना मारून टाकण्यात आले. सरकार आणि बंडखोरांची जोराची लढाई झाली. अगदी २७ एप्रिल १९७८ ची आठवण यावी इतके आवाज दिवसभर

दणदणत होते.

शेवटी संध्याकाळच्या सुमारास सैन्याने बंडखोर सैन्याला ताब्यात घेतले. सरकारने बातमी दिली की, काबूलमधल्या इराणी आणि पाकिस्तानी लोकांनी ही गडबड केली होती. अर्थातच यावर कुणाचाच विश्वास बसला नाही. कारण काबूल शहराजवळच्या लष्करी तळाभोवतीनं होणाऱ्या हालचाली, दिवसभर चाललेली ही जोरदार लढाई, याचा खरा अर्थ काय आहे हे कळण्याएवढे हे लोक आता शहाणे झाले होते. आता-आतापर्यंत हे लोक रेडिओवर उस्ताद सरहांग, नाशनाझ, महंमद वली, अहमद जाहीर या गायकांची आणि हंगामा, उस्ताद महावेश या गायिकांची गाणी फक्त ऐकायचे. बातम्या ऐकणं त्यांना माहीत नव्हतं. पण आता हे लोक सगळ्या जगभरच्या बातम्या ऐकतात. आपल्या सरकारच्या बातम्या ऐकतात. आणि त्याचा अन्वयार्थ त्यांना लावता येतो. खरं काय खोटं काय हेसुद्धा समजू लागलेलं होतं. याच वेळी एक अफवा मात्र अत्यंत अस्वस्थ करणारी ऐकायला मिळाली की, एक-दीड महिन्याने, म्हणजे ऑक्टोबर महिन्यामध्ये रशिया अफगाणिस्थानावर स्वारी करणार आहे; कारण अफगाण सरकारला क्रांती करून सव्वा वर्ष झालं तरी अजून बंडखोरांचा बीमोड करता आलेला नाही. काबूलमधल्या एका शीख व्यापाऱ्यानेच—तो माझ्या मैत्रिणीचा घरमालकही आहे,—ही गोष्ट आम्हाला सांगितली. तो म्हणाला, “आमच्या बाजारपेठेत असं बोललं जातं आहे.”

त्यानं सांगितलेल्या गोष्टीवर आमचा विश्वास बसत नाही. हे पाहून तो पुढे म्हणाला, “एकदा अफगाणिस्थान आपल्या कब्जात आलेलं आहे, ते पुन्हा निसटून जातं की काय अशी भीती रशियाला वाटत असणार. म्हणूनच रशिया इथं येईल. आमच्या गुरुग्रंथसाहेबातदेखील लिहून ठेवलेलं आहे की, रशियाचे गोरे लोक काबूल कंदाहारला १९८० साली येतील म्हणून.”

प्रत्यक्ष काबूलमध्येच पुन्हा पुन्हा बंडखोरांच्या हालचाली चालू झाल्यानंतर, सर्वप्रथम अमेरिकेने आपले सगळे मदत कार्यक्रम बंद केले. त्या लोकांना परत अमेरिकेला पाठवून दिले. एवढंच नव्हे तर अमेरिकन वकीलातीमध्ये, यूसिसमध्ये, वगैरे ठिकाणी काम करणाऱ्या पुष्कळशा अमेरिकनांना परत पाठवून दिले. वकिलात चालू ठेवण्यापुरती आणि यूसिसचे ऑफिस चालू ठेवण्यापुरतेच लोक शिल्लक ठेवले. जे मागे राहिले होते त्यांच्या बायका-मुलांनाही अमेरिकेत परत पाठवून दिले. अफगाण सरकारने बातम्यांत सांगितले की, आम्ही या साम्राज्यवाद्यांना परत पाठवून दिले. पण त्या बातमीमध्ये एक छोटीशी चूक राहून गेली होती. ती म्हणजे ही बातमी देण्याअगोदर चोवीस तास अमेरिकेने आपल्या माणसांना परत पाठवून दिले होते! आणि अगोदरच जाहीर केलं होतं की, ‘आमची माणसं काबूलमध्ये सुरक्षित राहतील अशी खात्री वाटत नाही, म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.’

हे लोण पसरत पसरत गेलं. जवळ जवळ प्रत्येक देशाने मदत कार्यक्रमात काम

करणाऱ्या आपापल्या नागरिकांना परत बोलावून घेतलं. सहा महिन्यांच्या आत अमेरिका, ब्रिटन, पाकिस्तान, जपान, इराण, फ्रान्स, या देशांनी आपल्या वकिलातीमधून हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच माणसं शिल्लक ठेवली. पाकिस्तानी, इराणी लोकांना तर इथे फारच धोका वाटत होता, म्हणून त्यांच्या वकिलातीमध्ये प्रत्येकी तीन माणसं उरली होती. ते लोकही आपापली घरं सोडून वकिलातींच्या इमारतीमध्ये रहायला गेले, एवढी त्यांना स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती. सगळ्यांची कुटुंबे तर अर्थातच परत गेली. भारतीय लोक मात्र जेवढे होते तेवढे अजूनही होते. आपल्या सरकारचा काही कुणाला परत बोलावून घ्यायचा विचार नव्हता. अफगाणिस्थानचे आणि आपले मैत्रीचे संबंध, आपले आणि रशियाचे संबंध लक्षात घेता, भारत सरकारचा हा निर्णय योग्य आणि अपेक्षितच होता. आपण आपले लोक अफगाणिस्थानातून काढून घेणे म्हणजे, नव्या सरकारवर आपला विश्वास नाही असं दाखवण्यासारखं होतं. त्यामुळे रशियाही नाराज होणार. रशियाला नाराज करणे आपल्याला परवडण्यासारखे नाही. आणि मुख्य म्हणजे अजूनही इथली परिस्थिती तेवढी वाईट झालेली नाही. बाकीचे सगळे लोक एकएक करून निघून जायला लागल्यावर भारतीय काय करतात इकडे अफगाण लोकांचे फार लक्ष होते. भारताचे अफगाण सरकारशी जसे मैत्रीचे संबंध आहेत तसेच अफगाण लोकांनाही भारताबद्दल मैत्री वाटते, हे एक वैशिष्ट्य आहे. म्हणून प्रत्येक वेळी भारताची काय प्रतिक्रिया होते तिकडे या लोकांचं बारीक लक्ष असतं. आणि त्या त्या वेळच्या प्रतिक्रियेनुसार त्यांचं सुखदुःख ते व्यक्त करतात.

अमेरिका खूप प्रमाणावर पाकिस्तानला पैशाची, युद्धसामुग्रीची मदत देणार आहे, असं बरेच दिवसांपासून कानावर येत होतं. त्यासंबंधात एकदा मुरादअली म्हणाला, “ आता अमेरिका जेव्हा पाकिस्तानला मदत देईल तेव्हा हिंदुस्थान त्याला आडकाठी आणणार नाही, निषेध करणार नाही अशी अम्हाला आशा वाटते.”

त्यावर मुकुंदा म्हणाला, “ त्याला आम्ही विरोध करूच; कारण रशियाविरुद्ध आघाडी उघडायची म्हणून पाकिस्तानला मदत हे निमित्त झालं. तरी पण त्यामुळे आम्हाला प्रत्यक्ष धोका आहे. पूर्वी दोनदा असा अनुभव आलाच होता. पाकिस्तानात अमेरिकन मदत येणं याचा अर्थ आम्हाला पाकिस्तानकडून धोका आहेच, शिवाय अमेरिकेकडूनही आहे.”

हे म्हणणं त्याला पटलं. तरी तो खट्टू झालाच.

## क्रांती अशी असते का ?

जेव्हा सैन्यातलेच लोक उठाव करून सत्ता काबीज करतात तेव्हा ती ‘ क्रांती ’ म्हणायची का ? क्रांती म्हटली की सर्वसाधारण आम जनतेचा जो सहभाग अपेक्षित

असतो तो या अशा प्रकारच्या सैनिकी क्रांतीमध्ये अभावानेच आढळतो. शिवाय सैन्यामधला या उलट-सुलट शक्ती एकमेकांविरुद्ध जेव्हा याच सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाच्याच नावाने उभ्या राहतात तेव्हा आम जनता प्रथम गोंधळते, कंटाळते, आणि मग घाबरते. आज आधुनिक तत्त्वज्ञानाची भाषा बोलणारे हे क्रांतिवादी लोक आणि मध्ययुगात आपापसांत लढून सत्ता काबीज करणारे सरदार यांमध्ये काय फरक राहिला, असा प्रश्नही लोकांना पडतो. कारण मुळात सत्ता काबीज करायची हे ध्येय दोघांचेही सारखेच असते. सर्वसामान्यांना तरी या क्रांतीमध्ये सत्तासंघर्षापेक्षा जास्त काहीच दिसत नाही. कारण मानवतेच्या समाजकल्याणाच्या सामान्यांच्या हक्कांची, अधिकाराची श्रेष्ठ भाषा बोलणारे हे लोक एकदा सत्तेवर आले की त्यांना इतर सगळ्या गोष्टींचा विसर पडून, स्वतःचा जम कसा पक्का बसवायचा याचाच घोर लागलेला असतो. त्यांच्या सगळ्या हालचाली त्या एकाच ध्येयावर केन्द्रित झालेल्या असतात. कारण जोपर्यंत सत्ता हातात नाही तोपर्यंत आपण काही करू शकत नाही, आणि काही करू शकत नाही म्हणून सत्ता टिकवू शकत नाही; म्हणून सत्ता टिकवणं भाग पडतं... या भयानक वर्तुळात सापडलेल्यांना मग दडपशाही, सामाजिक अन्याय, अत्याचार करावाच लागतो. त्यातून त्यांची सुटका नसते. म्हणजे मग शेवटी ज्या समाजाच्या उद्धारासाठी ही क्रांती घडवून आणलेली असते तो समाजच या क्रांतिकारी सत्तेचं भक्ष्य बनतो. हजारो माणसांना मारण्याचा, त्यांना छळण्याचा हा भयंकर अधिकार त्यांना कोणत्या नैतिकतेच्या आधाराने मिळतो ? एखादा समाज जेव्हा संक्रमणावस्थेतून जात असतो तेव्हा काही हजार माणसं मरायची हे ऐतिहासिक सत्यच आहे. तेव्हा त्यासाठी तक्रार करण्याचं काहीच कारण नाही. पण जेव्हा या माणसं मारण्याच्या कृत्याला एखाद्या तत्त्वज्ञानाची डूब दिली जाते, तेव्हा ती एक काळजी करण्यासारखी गोष्ट होते. कारण मग समाजाची संक्रमणावस्था खरं म्हणजे प्रत्यक्षात त्यांना वाटणारी भीती कधीच संपत नसते; आणि मग माणसं मारण्याची क्रियाही सतत चालूच राहते. रशिया आणि चीन ही त्याची दोन धगधगती उदाहरणं आहेत. तिथे समाजवादी सरकारे इतकी वर्षे सत्तेवर असूनसुद्धा तिथली ही ' शुद्धीकरणा 'ची ( फॅसिस्टांसारखीच ) क्रिया अजून थांबलेली नाही.

राजेशाही, सरंजामशाहीचा नायनाट करून लोकशाही आणणं हेच मार्क्सिझमचं अंतिम ध्येय. पण या प्रक्रियेमध्ये एक शाही जाऊन दुसरी शाहीच सत्तेवर आणली जाते, याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष होतं. आमच्या समाजवादापेक्षा वेगळी भाषा बोलणारे ते सगळे आमचे शत्रू. म्हणूनच त्यांच्याकडून आमच्या समाजवादाला धोका आहे. तेव्हा त्यांना नाहीसं करणं हे कर्तव्य मानलं जातं. त्यांना जगायचा अधिकार नाही असं म्हणून त्यानुसार समाजातल्या प्रत्येक घटकाला आळीपाळीने क्रांतीचा संभाव्य शत्रू समजून, त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेणारे आणि Dictatorship of Proletariet कामगारांची हुकूमशाही स्थापन करायला निघालेल्या मार्क्सवादामध्येही फॅसिझमची

बीजं असतात की काय अशी शंका यायला लागते.

हिटलरने ज्यूंना जसं छळलं त्यामध्ये आणि आजच्या अफगाणिस्थानातले समाजवादी सत्ताधीश आपल्याच रक्ताच्या देशबांधवांना जसं छळत आहेत त्यामध्ये मुळात काय फरक आहे ? आपल्याला विरोध करणाऱ्या किंवा विरोध करण्याची क्षमता असलेल्या सर्व घटकांचा नायनाट करणं हीच वृत्ती दोन्हीच्या मुळांशी आहे.

प्रत्येक अफगाण माणसाची हकीगत वेगळी, तपशील वेगळा. पण परिणाम एकच. त्याच्या घरातली कर्तीसवरती माणसंच नव्हेत तर बायका-मुलं, म्हातारीकोतारी माणसंही मारली जात आहेत. तुरुंगात जात आहेत. आजचा प्रत्येक अफगाण माणूस हा एक चालती बोलती जिवंत कादंबरी आहे. त्याच्या घरातल्या मुलीबाळींना, शाळा–कॉलेजात, नोकरीच्या ठिकाणी हुकूम होईल त्या रशियन मित्रांशी किंवा अफगाण कॉम्रेडशी ‘ मैत्रीचे ’ संबंध ठेवावे लागत आहेत. ‘ नाही ’ म्हटलं तर त्या मुलीच नाहीशा होऊन जातात. अशा मैत्रीतून उद्भवणारी प्रकरणं निस्तरण्यासाठी खास सरकारी हॉस्पिटल्स होतीच. स्त्रियांशी साधं मोकळेपणानं बोलता येणं हीसुद्धा एक पर्वणी वाटणाऱ्या, इस्लामच्या बंद पडद्याआड असलेल्या अफगाण लोकांना, विशेषतः अधिकारावर असलेल्या पुरुषांना मार्क्सवाद ‘ शिकवण्या ’साठी ऑफिसांतून रशियन मुलींची आयात सुरू झाली ! तराकीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर एकदीड महिन्यातच प्रत्येक ऑफिसमध्ये मार्क्सवादाचे धडे देण्यासाठी क्लासेस काढण्यात आले होते. पण त्या वेळी पुरुष पार्टीवर्कर्स पुरुषांचे क्लासेस घेत असत, बाया बायकांचे क्लासेस घ्यायच्या. ते क्लासेस अजूनही चालू होतेच. पण नंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सोयीसाठी खास रशियन स्त्री-कॉम्रेड्सना आणण्यात आलं.

“ म्हणजे मग आमच्यासारख्या सर्वसाधारण लोकांच्या पोरीबाळींना ‘ मैत्री ’ ठेवण्याची जबरदस्ती करण्यात येते, त्याची कळ त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लागू नये म्हणून ही ‘ नाजुक सोय ’ आमच्या सरकारने करून ठेवली आहे. लाचलुचपत काही पैशांनीच फक्त होत नाही.” अत्यंत कडवटपणानं, रस्ता बांधणीच्या कामावर मुकादमाचं काम करणारा हसन म्हणाला, “ दोन्ही बाजूंनी आम्हीच लुबाडले जात आहोत. आमचं मानसिक खच्चीकरण पद्धतशीरपणानं चाललंय. आमच्या बायकांना पडद्यात ठेवणारे आम्ही, आमच्या मायबहिणींचं रक्षणही करू शकत नाही. आणि तिकडे त्या रशियन पोरींच्या नादानं आमच्या अफगाण अधिकाऱ्यांनी स्वतःला विकायला काढलं आहे. त्यांच्याकडून आता कसलीही कामं करवून घ्यावीत. हे प्रकारही त्यांना पुरे पडत नाहीत की काय कुणास ठाऊक ? म्हणून आता आमच्या खेड्यापाड्यांतून आमच्याच सैन्यानं कसले तरी रासायनिक बॉम्ब्स टाकायला सुरुवात केली आहे. त्यातली पावडर माणसाच्या अंगाला चिकटते, आणि मग ती सर्व अंगभर पसरत जाते. कातडीच्या रोगानं पछाडलेला हा रोगी मग खंगत खंगत एक दिवस मरून जातो ! फार भयंकर आहेत हे बॉम्ब. माझ्या मावशीच्या गावात हे बॉम्ब टाकले होते; त्याच्या भीतीनं

सगळे गावकरी गाव सोडून गेले. माझी मावशी एकटीच मागे राहिली आहे त्या गावात. तिला काही पळता येत नाही, चालता येत नाही. काय होणार तिचं कुणास ठाऊक!"

"आता तिच्या नशिबात काय असेल ते होईल. मी तरी काय करणार? क्रांती क्रांती म्हणतात ती अशीच असते का हो रानडेसाहेब! मला काही कोणता ईझम-बिझम कळत नाही. पण हे आमचेच लोक आम्हाला फार छळताहेत. सर्व दृष्टींनी आम्हाला जगणं अशक्य करताहेत एवढं मात्र कळतंय मला." हसन कळवळून म्हणाला.

## रमेशचंद्राचे भाषण

सर्वसाधारणपणे सगळ्यांचीच मनःस्थिती ही अशी असताना, काबूलमध्ये 'जागतिक शांतता परिषद' मोठ्या गाजावाजाने साजरी करण्यात आली. परिषदेमध्ये बोलणाऱ्यांची संपूर्ण भाषणं टी. व्ही. रेडिओवरून लोकांना ऐकवली जात होती. ही परिषद जागतिक आहे म्हणतात, पण ती फक्त नावालाच. म्हणजे फक्त जगभरच्या देशातून लोक आलेत, एवढ्याच अर्थापुरती. कारण येणारा प्रत्येकजण एका विशिष्ट राजकीय विचारसरणीचाच पुरस्कार करणारा आहे. या परिषदेचा अध्यक्ष आहे डॉ. रमेशचंद्र. हा भारताचा प्रतिनिधी. याचे भाषण चांगले एक-दीड तास झाले. ते संपूर्ण भाषण टी. व्ही. रेडिओवरून ध्वनिक्षेपित करण्यात आलं. रमेशचंद्राने तराकीच्या सरकारची, मार्क्सवादी विचारांच्या धोरणांची तोंड फाटेस्तवर स्तुती केली; रशिया-धार्जिण्या समाजवादाची निर्लज्ज भलावण केली. कुणाला वाटावं हा रमेशचंद्र खल्क पार्टीचा मेंबर आहे!

टी. व्ही.वरचं त्याचं भाषण ऐकतानाच आम्हाला अतिशय अस्वस्थ वाटत होतं. रमेशचंद्र आपल्या भाषणात पुन्हा पुन्हा सांगत होता की, 'आम्ही तुमच्याबरोबर आहोत. साम्राज्यवादाविरुद्ध लढण्यासाठी आम्ही तुमच्या बाजूने, तुमच्या बरोबरीने लढू. तुमच्या नव्या सरकारला भारताने ताबडतोब मान्यता दिली होती ही गोष्ट लक्षात घ्या. आम्ही तुमचे मित्र आहोत. आम्ही तुम्हाला मदत करू..." वगैरे वगैरे. परिषदेला आलेल्यांनी भरपूर टाळ्या वाजवून या भाषणाचं स्वागत केलं होतं.

आमच्या मनात मात्र सारखं येत होतं, आमच्याप्रमाणेच हजारो अफगाण, खेड्यापाड्यांतून असलेले, डोंगरदऱ्यांवर राहणारे, मोठ्या शहरात राहणारे, सगळ्यांनीच हे व्याख्यान ऐकलेलं असणार. त्यांची काय समजूत होईल? त्यांचा गैरसमज होईल की रमेशचंद्र हा भारत सरकारच्या वतीने बोलत आहे. त्यांचे म्हणणे हे भारत सरकारचे म्हणणे आहे. म्हणजे भारत सरकारही आमच्या या जुलमी सरकारच्याच बाजूने आहे की काय? या जुलमी सरकारला भारत सरकार मदत करणार आहे का?

आणि झालेही तसेच. दुसऱ्या दिवसापासून अफगाण लोकांची नाराजी त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होऊ लागली. रमेशचंद्र हा हिंदुस्थानातून आलेल्या रशियाधार्जिण्या

डाव्या पक्षातर्फेच फक्त बोलत होता, भारत सरकारचा त्यामध्ये काहीही सहभाग नव्हता, हे आपण स्पष्ट करायला नको होतं का ? अमेरिकेतूनसुद्धा जसे काही कम्युनिस्ट आले होते, तसाच रमेशचंद्रही भारतातून आला होता, ही गोष्ट कुणाच्या ध्यानातही आली नाही, इतकं त्याचं भाषण, त्याचा आवेग जळजळीत होता. आणि रमेशचंद्र हा फक्त रशियाधार्जिण्या भारतीय कम्युनिस्ट पार्टीचाच म्होरक्या आहे हे ज्यांच्या लक्षात आलं, त्यांच्या मनात हेसुद्धा आलंच की, एवढ्या आग्रहीपणानं, एवढ्या आत्मविश्वासानं आश्वासनं देण्याएवढं या विशिष्ट पक्षाचं वजन भारतात आहे की काय ? हा विचार अफगाण लोकांना अस्वस्थ करणारा होता. तेवढाच तो भारतीयांनाही अस्वस्थ करणारा होता. रमेशचंद्राचं हे भाषण सर्वच भारतीयांना अस्वस्थ करणारं, संकोच वाटायला लावणारं ठरलं. ' इथे एवढ्या तावातावाने बोलणाऱ्या, स्वतःकडे फार मोठेपणा घेऊन बोलणाऱ्या रमेशचंद्राला भारतात कोणी ओळखतही नाही, त्याला भारतामध्ये काहीही किंमत नाही.' असं आपापल्या संबंधात येणाऱ्या अफगाण लोकांना पटवून देता देता भारतीयांची चांगलीच तारांबळ उडाली होती. एवढं त्याचं भाषण दाहक, बेजबाबदार, विषारी होतं. त्याच्या एवढ्या आग्रहीपणाने इतर कुठल्याही देशाचा प्रतिनिधी बोलला नव्हता.

आणि म्हणूनच सर्व भारतीयांना भीती पडली होती की, जर उद्या खुद्द काबूलमध्येच बंडखोरांच्या हालचाली फार मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या, सरकारला त्या हालचालींवर नियंत्रण ठेवणं कठीण झालं तर सर्वप्रथम रशियन एम्बसीवर बंडखोर हल्ला करतील, आणि त्यानंतर भारतीय दूतावासावर त्यांची धाड पडेल ! भारतीयांना इथं राहणं मग अतिशय धोक्याचं ठरेल. आणि हे सगळं तसं म्हटलं तर उगाचच, म्हणजे भारतसरकारच्या धोरणाशी काहीही संबंध नसताना घडणारं !

या बाबतीत दूतावासातल्याच एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी बोलणं केल्यावर अत्यंत कंटाळलेल्या सुरात त्यानं उत्तर दिलं, " त्याला आम्ही काय करणार ? रमेशचंद्राला काही भारत सरकारने पाठवले नव्हते. लोकशाहीतला एक स्वतंत्र नागरिक म्हणून त्याच्यावर आपण कसलंही बंधन घालू शकत नाही, त्याला हवं तसं तो बोलू शकतो."

" पण आपली ही लोकशाही इथल्या लोकांना कळत नाही. रमेशचंद्राच्या बोलण्यामुळे इथे जी भयंकर गैरसमजूत झालेली आहे ती दूर करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत की नाही ?"

या प्रश्नाला उत्तर मिळाले, " तुम्ही असं म्हणता, पण आमच्याकडे अधिकृत पातळीवर तरी अशा गैरसमजाची नोंद झालेली नाही. आणि त्या बाबतीत काय करायचं याचे हुकूम आम्हाला वरून आलेले नाहीत..." थोडक्यात, हा प्रश्नच निकालात काढण्यात आला.

आपल्या दूतावासाच्या या भयानक उदासवाणेपणानं चालवलेल्या कारभाराची ही फक्त चुणूक आहे. आपण एवढा अतोनात पैसा खर्च करून आपले दूतावास

परदेशात कशासाठी चालवतो ? मूळ हेतू असा की, ज्या देशात आपला दूतावास असतो त्या देशाच्या सरकारशी आपल्या सरकारचे योग्य ते म्हणजेच आपल्या सरकारला हवे तसेच आणि तेवढेच संबंध प्रस्थापित करणं, ते चालू ठेवणं, असा असतो. पण सगळा सावळा गोंधळ होतो तो तिथेच.

एक तर, कित्येकदा आपल्या सरकारचीच धोरणं अगदी ठाम, निश्चित, कसल्याही शंकेला, संशयाला जागा न राहू देता, आखलेली असतात की नाही यांची शंका यावी, इतकी ती सैल बांधणीची असतात. कारण आपल्या विदेश मंत्रालयात काम करणारे वरील बाबूलोक स्वतःची राजकीय मतं पूर्णपणे बाजूला सारून, सरकारी धोरणाप्रमाणेच फक्त कामकाज करीत नाहीत. म्हणूनच त्यांच्याकडून येणाऱ्या आदेशांमध्ये भोंगळपणा, उलटसुलटपणा, अस्पष्टपणा असतो.

शिवाय प्रत्येक बारीकसारीक गोष्टीसाठीसुद्धा वरच्या हुकुमांवरच, दूतावासातल्या अधिकाऱ्यांना अवलंबून असावं लागतं. वेळेनुसार आपापले निर्णय तिथल्या तिथेच घेण्याचं स्वातंत्र्य त्यांना क्वचितच असतं. त्यामुळे कित्येकदा जे प्रश्न सहजपणानं सोडवता आले असते तेही या निव्वळ दिरंगाईमुळे अडचणीचे, घोटाळ्याचे होऊन बसतात.

आणखी एक उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे, दूतावासातले अधिकारी रोजच्या व्यवहारातच आकंठ बुडलेले असतात. पगारवाढ, बदल्या, रजेची मंजुरी, रोजचा पत्रव्यवहार याच गोष्टींना केवढं तरी महत्त्व मिळून बसतं. दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांना परराष्ट्रांशी संबंध कशा प्रकारचे ठेवायचे त्यापेक्षा या रोजच्या गोष्टी जास्त महत्त्वाच्या वाटतात.

क्वचित कधी आपणहून उत्साहाने, काही करण्याचे प्रयत्नही होतात. नाही असं नाही. अगदी सुरुवातीलाच तराकीच्या मागे उभा असणारा, आणि नंतर चक्क ' इंटिरिअर अफेअर्सचा मिनिस्टर ' झालेला, फकीर मोहम्मद फकीर हा मुकुंदाच्या ऑफिसमध्ये साधा कारकून होता. हे लक्षात आल्यानंतर दूतावासातल्या एका अत्युच्च पदाधिकाऱ्याने मुकुंदाला बोलावून सांगितले होते की, " तुझ्या जुन्या ओळखीचा फायदा घेऊन त्या फकीर मोहम्मदशी पुन्हा संबंध जुळव. ओळख वाढव. तुला काय लागेल ती मदत आम्ही देऊ. काहीही करून त्याला गाठ. त्याला आंब्याच्या करंड्या पाठवू की ' शिवासरीगल ' मद्याचा पेटारा पाठवू म्हणून विचार...."

पण ते व्हायचे नव्हते. पूर्वी अतिशय नम्रतेनं मुकुंदाशी बोलणाऱ्या फकीर मोहम्मदचा पी. ए. मुकुंदाने फोन केला की तेवढ्याच नम्रपणाने क्षमायाचनेच्या सुरात म्हणायचा, " साहेब मीटिंगमध्ये आहेत." शंभर वेळा फोन करूनही तेच उत्तर मिळत होतं. तेवढ्यातच दूतावासातल्या त्या अधिकाऱ्याचीच बदली झाली. त्यामुळे ते प्रकरण तितकंच राहिलं.

## तराकीला मारले !

दोन-अडीच महिन्यांपूर्वी शर्मानं उगाचच आपली गंमत म्हणून 'तराकी क्यूबाला पळून गेला' म्हणून स्वतःच तयार केलेली अफवा आपापसांतचं पसरवून दिली होती. ती अफवा सप्टेंबरमध्ये खरी झाली. म्हणजे, तराकी हॅवानाच्या अलिप्त देशांच्या संमेलनाला गेला. जायच्या अगोदर तराकी हॅवानाला जाईल की नाही म्हणून वेगवेगळे अंदाज बांधले जात होते. काहींचं म्हणणं होतं की, तो जाईल; काही म्हणत, त्याला जायची इच्छा नाही. कारण आपण इथून गेलो की आपल्या माघारी इथं काय होईल याची त्याला भीती वाटतेय; आपल्या हातची सत्ता जाईल अशी त्याला धास्ती वाटते आहे. कोणी म्हणत, त्याची इच्छा नसतानाही अमीनच्या आग्रहावरून त्याला जावंच लागेल. कोणाचा अंदाज होता की, तराकी एकदा देशाबाहेर गेला की परत येणारच नाही. कारण त्याच्या जिवालाच धोका आहे. तर कुणाचं मत होतं की, जर आपण हॅवानाला गेलो नाही तर आपण भित्रे आहोत असं लोक म्हणतील; म्हणून तरी तराकी हॅवानाला जाईलच.

कारण काय झालं असेल ते असो, पण शेवटी तराकी हॅवानाला जाऊन आला. तो परत आलेल्या दिवशी विमानतळावर त्याचं केवढं तरी मोठं स्वागत झालं. अमीन आणि तराकी यांच्यामध्येच अतिशय बेबनाव झालेला आहे, अशा अफवा किती तरी दिवस ऐकत होतो, पण त्या दिवशी अमीन आणि तराकी ज्या पद्धतीनं दिलखुलास हसतमुखानं, एकमेकांच्या गळयात पडले त्यावरून ती अफवा, अफवाच ठरणार असे वाटले. विमानतळ ते अर्ग महालापर्यंतचा रस्ता केवढा तरी शृंगारला होता. टी. व्ही.वर दोन तीन दिवस तो सगळा परतीचा स्वागतसोहळा रोज दाखवीत होते.

तरी पण तराकी परत आल्यानंतर काबूलच्या वातावरणात फार फरक पडला होता. आल्याआल्या दोन तीन दिवसांतच एकदम चार मंत्री आणि तेसुद्धा परराष्ट्र, गृह, संपर्क अशांसारख्या महत्त्वाच्या मंत्र्यांची उचलबांगडी झाली. नेहमीप्रमाणेच या वेळीही ही बातमी अफवा म्हणून लोकांना अगोदर कळली. कोणी म्हणत, आपल्या जिवाला धोका आहे असं वाटल्यामुळे ते आपणहूनच पळून गेलेत. तर कोणी म्हणत,

तराकी नसताना त्यांनी तराकीलाच उलथून टाकण्याचा प्रयत्न केला होता, म्हणून त्यांना काढून टाकण्यात आलं. पण दोन दिवसांनंतर दिलेल्या बातम्यांत कसलेही कारण न देता फक्त त्या मंत्र्यांना काढल्याचे सांगण्यात आले. तराकी परत येण्याच्या अगोदर चारपाच दिवसच अगोदर काबूल शहराच्या आसपास ७–८ मैलांवरच तीन वरिष्ठ लष्करी जनरल्सना भर दिवसा मारण्यात आलं होतं. याही वेळी दोन मतप्रवाह होते. कोणी म्हणत की बंडखोरांनी त्यांना मारलं, तर कोणी म्हणत ते तिघेही तराकीचे सरकार उलथून टाकण्याच्या प्रयत्नात होते, म्हणून त्यांना अफगाण लष्करी अधिकाऱ्यांनीच मारलं.

या अशा घटना–अफवा कळत असतानाच काबूल शहरातच रोजचे गोळीबाराचे आवाज सातत्याने येत; काबूल शहरामधले महत्त्वाचे रस्ते अचानकपणेच रहदारीसाठी बंद होत. मध्येच कोणी बातमी सांगितली की, तराकी आणि अमीन हे दोघेही वेगवेगळे जाऊन रशियन राजदूताला भेटून, चर्चा करून आले आहेत. शिवाय तराकी हॅवानाहून परत येताना मध्ये मॉस्कोला थांबला होता, तिथं ब्रेझनेव्हशी काही तरी गुफ्तगूं करून आला आहे.... आता दोन-चार दिवसांतच काही तरी महत्त्वाचे घडणार आहे, काही तरी भयंकर घडणार आहे. खुद्द तराकीला हातपाय बांधून तळघरात टाकलं आहे असं कोणी सांगायचा, तर दुसरा म्हणायचा–नाही; अमीनलाच मारून टाकलंय आणि आता पुढे काय करायचं याबद्दलच्या मॉस्कोहून येणाऱ्या सूचनांची वाट पाहणं चालू आहे. अर्ग महालामध्येच खूप मोठं नाटक घडत होतं. संपूर्ण काबूल शहर कसली तरी वाट पाहात बसलं होतं...

फार वाट पाहावी लागलीच नाही. १६ सप्टेंबरला संध्याकाळी ७ च्या पश्तू बातम्यांमध्ये टी. व्ही.वर तराकीसंबंधीची बातमी देण्यात आली होती. पश्तू असल्यामुळे मला काहीच कळलं नाही. फक्त एवढंच कळलं की, नेहमी तराकीच्या नावामागे लावली जाणारी, ‘ मुन्शी, ओ मोमीन... ’ ही लांबलचक बिरुदावली लावलेली नाही. त्या अर्थी काही तरी घोटाळा झालाय असा तर्क मी केला. पाठोपाठच्या फारसी बातम्यांनी उलगडा झाला. प्रकृति-अस्वास्थ्यामुळे तराकीने आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता; आणि रेव्होल्यूशनरी कौन्सिलने एकमुखाने हाफिजुल्ला अमीनला आपला ‘ मुन्शी ओ मोमीन...’ वगैरे वगैरे, निवडला होता ! बातम्यांत जरी त्यांनी सांगितले होते की, ‘ प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे ’ तरी तराकी जाण्यामागे काय घडलं असावं याची कल्पना सगळयांनाच आली.

त्याचे असे झाले होते—

मॉस्कोला ब्रेझनेव्हने तराकीचे हार्दिक स्वागत केले. तेव्हा ब्रेझनेव्हने तराकीला जरा नाराजीनेच विचारले, “ क्रांती करून तुम्हाला दीड वर्ष झालं, तुमचं बस्तान कसं बसलं नाही ? बंडखोरांचा बंदोबस्त कसा करता येत नाही तुम्हाला ? किती दिवस ही अंतर्गत लढाई चालायची ? ” त्यावर तराकीने उत्तर दिले की, “ अमीनमुळे या गोष्टी

शक्य होत नाहीत.'' ब्रेझनेव्हने सल्ला दिला की, 'अमीनला दूर करावे.'

काबूलला आल्यानंतर तराकीने अमीनला अर्ग महालामध्ये 'भेटायला ये' म्हणून तीनतीनदा निरोप पाठवला. पण अमीन गेला नाही. कारण तराकी व ब्रेझनेव्ह-मध्ये काय बोलणे झाले होते ते सर्व शब्दशः अमीनला त्याच्या हेरांकडून कळले होते. आपला जीव धोक्यात आहे, याची जाणीव अमीनला झालेलीच होती. त्याला हेसुद्धा कळले होते की, तराकीच्या स्वागताला अमीन जेव्हा विमानतळावर जाईल तेव्हाच त्याला त्याच्याच गाडीतून पळवून नेण्याचा बेत पक्का झाला होता. म्हणूनच विमानतळावर सुरुवातीचा स्वागताचा सोहळा पार पडल्यावर एक क्षणभरही तिथे न थांबता अमीन दुसऱ्याच एका गाडीतून आपल्या ठिकाणी निघून गेला होता. आणि तराकीच्या आमंत्रणाला जुमानत नव्हता. एवढेच नव्हे तर अर्ग महालाच्या भोवतीनं असलेल्या पहाऱ्यामध्ये अमीनने आपल्या लोकांची योजना केली होती. सैन्यामध्येसुद्धा तराकीचा पक्ष आणि अमीनचा पक्ष असे दोन तट पडले होते. एकदा तर,– म्हणजे तराकी सत्ते-वरून जाण्याच्या तीन दिवस अगोदर– या दोन गटांमध्ये चकमक उडाली होती, खुद्द अर्ग महालामध्येच ! अमीन आणि तराकी हे वेगवेगळ्या वेळा साधून रशियन राजदूत पुजोनॉव्हला भेटून आले होते. पण त्यातून काहीच निष्पन्न होत नव्हतं. म्हणून शेवटी, किती दिवस हे असंच चालू ठेवायचं, कधी तरी संपवायलाच हवं, असा विचार करून, शेवटी अमीन तराकीला भेटायला गेला. जिना चढून जात असताना, एकदमच दिवे गेले ( घालवले गेले. ) आणि त्या अंधारातच गोळीबाराला सुरुवात झाली. मेजर तरोन या सैन्याधिकाऱ्याला असं काही होईल ही कल्पना असल्यामुळे तो सावध होता. ( हाच तरोन तराकीबरोबर हैवानाला गेला होता. ब्रेझनेव्हशी बोलणी झाली तेव्हा तो तिथे हजर होता. ) त्याने ओरडून अमीनला खाली बसायला सांगितलं. अमीनला त्याने ढकलूनच बाजूला सारले, आणि तो स्वतः मध्ये पडला. अमीनवर झाडलेल्या गोळ्या तरोनला लागल्या. त्यानंतर झालेल्या गोळीबारात तराकी गंभीररीत्या जखमी झाला होता. त्याला तपासायला गेलेला डॉक्टर जेव्हा त्याला तपासून खोलीच्या बाहेर आला तेव्हा तो डॉक्टरसुद्धा थरथरत होता, एवढी तराकीची अवस्था भयंकर झाली होती.

परंतु कोण आपल्या बाजूचं आहे, आणि कोण विरुद्ध बाजूचं आहे याचीच अमीनला खात्री नसल्यामुळे, अमीनने दोन दिवस तराकीच्या जखमी होण्याची बातमी गुप्त ठेवली होती. जेव्हा त्याला सर्व परिस्थितीचा अंदाज आला, आपली माणसं त्यानं आपल्याभोवती गोळा केली, तेव्हा त्याने तराकीच्या राजीनाम्याची बातमी देऊन स्वतः अधिकारसूत्रे ग्रहण केल्याचे जाहीर केले.

भयंकर जखमी झालेला तराकी आठ दिवस जिवंत होता. पण कोमामध्ये होता. आठ दिवसांनंतर तराकी मेल्याची अधिकृत बातमी देण्यात आली. पण तराकी मेला हे दुसऱ्याच दिवशी लोकांना कळून चुकलं होतं. अफगाणिस्थानचा एके काळचा अध्यक्ष,

कॉम्रेड नूर महंमद तराकी याचे कुठे दफन केलं वगैरेचा काहीसुद्धा पत्ता लागला नाही. पण मेजर तरोन आणि इतर तीन लष्करी अधिकारी यांचे लष्करी इतमामाने दफन करण्यात आले. मेजर तरोनला तर 'शहीद' ठरवून, लष्करी इतमामाने दफन करण्यात आले, तो समारंभ टी. व्ही.वरही दाखवण्यात आला. जलालाबाद या शहराचं नाव बदलून ते 'तरोनशहर' करण्याचं ठरवलं गेलं होतं. मेजर तरोनचं एवढं कौतुक व्हायचं कारण म्हणजे तराकीच्या हॅवाना ट्रिपच्या वेळी तो तराकीबरोबर त्याचा शरीररक्षक म्हणून गेला होता. आणि ब्रझेनेव्ह–तराकीचं संभाषण त्याने अमीनला येऊन सांगितलं होतं.

अमीन आणि तराकी हे वीस बावीस वर्षे मित्र होते. एकाच ध्येयानं झपाटलेले हे दोघे वर्षोनवर्षे एकत्र काम करीत होते. 'खल्क' पक्षाची स्थापना, नंतरची त्यामध्ये पडलेली फूट, आणि त्यानंतरचं सगळं पक्षाचं राजकारण, निवडणुकांचं शहाचं राजकारण यामध्ये दोघांनी एकमेकांना साथ दिली होती. त्या दोघांचे इतक्या वर्षांचे इतके घनिष्ठ संबंध असताना, अडचणीच्या काळात दोघांनी एकमेकांच्या विचाराने, वाईट दिवस ओढून काढले होते. असं असताना एकदा सत्ता हातात आल्यानंतर, ती टिकवण्यासाठी त्या दोघांनी एकमेकांचं शत्रुत्व पत्करलं होतं. दोघेही एकमेकांच्या जिवावर उठले होते. शेवटी एकाने दुसऱ्याला मारून टाकलं होतं. हा काय प्रकार म्हणायचा ? हा मनुष्यस्वभाव की सत्तास्पर्धेचं निर्घृण राजकारण ? त्यामध्ये शेवटी कोणी टिकून रहायचं हा मूळ मुद्दा. अगोदर तू मला मारतोस की मी तुला त्याअगोदरच मारू शकतो– हे त्यातलं खरं उघडं वाघडं सत्य. तेच तेवढं खरं. बाकी सगळं झूठ.

अमीनने अधिकार ग्रहण करताच, अर्ग महालामध्ये कॅबिनेट मीटिंग घेतली. त्या बैठकीला येणाऱ्या मंत्र्यांना राजवाडा-संरक्षकांनी दारावरच अडवले. आणि प्रत्येकाला आपापली पिस्तुलं काढून ठेवायला सांगितली. तेव्हा त्या मंत्र्यांनी नकार दिला. ते म्हणाले, "अमीन जर स्वतःचे पिस्तुल आमच्या स्वाधीन करून, निःशस्त्र होऊन बैठकीच्या टेबलावर बसत असेल तर आम्हीही आमची पिस्तुलं काढून देऊ."

त्या गोष्टीला अमीनची तयारी नव्हती. म्हणून मग शेवटी कॅबिनेट बैठक सुरू झाली तेव्हा प्रत्येक मंत्र्याने आणि अमीननेही आपापली पिस्तुलं आपल्यासमोर, टेबलावर काढून ठेवली आणि ती बैठक पार पडली.

तराकी गेल्याच्या दुसऱ्या दिवशी अमीनने राष्ट्राला उद्देशून टी. व्ही.वर, रेडिओवर भाषण केले. त्या भाषणाची सुरुवातच अमीनने, 'बिस्मिल्ला ए रहमान ए रसूल...' या खास इस्लामी पद्धतीने केली ! केवढी आश्चर्याची बाब होती ही ! एके काळी याच अमीनने, त्या वेळी तराकीही त्याच्याच बाजूचा होता; प्रत्येकाने आपापल्या नावात असलेला महंमद किंवा अहमद काढून टाकावे असे आवाहन केले होते. त्याप्रमाणे तराकीने आपल्या नावातील महमद नाव काढून, नूरमहंमद तराकीऐवजी फक्त नूर तराकी एवढेच नाव शिल्लक ठेवले होते. आपापल्या भाषणातून टी. व्ही. वर, रेडिओवर बातम्या देताना वगैरे एकमेकांच्या नावाअगोदर 'कॉम्रेड' लावण्याची प्रथा चालू केली

होती. त्यानुसार प्रत्येक सरकारी माणूस बरेच दिवस ‘कॉम्रेड’ बनला होता. पण या दोन्ही गोष्टींना लोकांकडून भयंकर विरोध होतो आहे, हे लक्षात आल्यावर या दोन्ही गोष्टी नंतर टाळल्या जाऊ लागल्या होत्या. कॉम्रेडच्याऐवजी आता ‘रफीक’– ‘मित्र’, हा शब्द वापरायला सुरुवात झाली होती. आणि आता तर अमीनने धार्मिक स्वातंत्र्य देण्याचं कबूल केलं होतं, निधर्मीपणाची भाषा टाकूनच दिली होती !

अमीनने बिसमिल्ला तर चांगला केला. सत्तेवर आल्याआल्याच त्याने आपल्या विश्वासातल्या माणसांना, बंडखोर नेत्यांना भेटण्यासाठी, त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी पाठवायला सुरुवात केली; विशेषतः ‘इख्वानी’ म्हणजे इस्लामी पुनरुत्थानवाल्यांकडे मैत्रीची, तडजोडीची भाषा करण्यासाठी. नवीन घटना तयार करण्याचे ठरविले. ज्या लाल झेंड्यामुळे लोकांचा सौर-क्रांतीकारकांबद्दल वाटणारा द्वेष स्पष्ट झाला होता, ज्या लाल झेंड्यामुळे लोक एवढे भडकले होते, तो झेंडा बदलून दुसऱ्या डिझाइनचा करण्याचे अमीनने ठरवले. त्याप्रमाणे चांगला नमुना तयार करावा म्हणून चित्रकारांना आवाहन करण्यात आलं.

तराकीने दिलेली ‘रोटी कपडा मकान’ ही घोषणा बदलून अमीनने त्याऐवजी ‘कसेल त्याची जमीन’ आणि ‘न्याय, कायदा आणि ध्येय’– या घोषणा दिल्या. माणसं, घोषणा बदलल्या तरी प्रचाराचं तंत्र तेच आहे. तावडतोब या नवीन घोषणांचे फलक तयार करून ठिकठिकाणी लावण्यात आले. आणि पाठोपाठ, एका रात्रीतच त्या फलकांवर लोकांनी स्वतःचं डोकं लढवून तयार केलेल्या घोषणा झळकू लागल्या !

म्हणजेच तराकी जाऊन अमीन सत्तेवर आला तरी लोकांच्या प्रतिक्रियांमध्ये काहीही फरक पडला नाही. कारण सत्तेवर येऊन जेमतेम महिना होतो न होतो तोच अमीन, त्याचा जावई (आणि पुतण्या) असदुल्ला हे दोघेही ठार झाल्याची बोलवा सुरू झाली. आणखी एकदोन मंत्री, आपापसांतल्या मारामारीमध्ये जबर जखमी झालेत, असंही कोणी म्हणालं. पण फक्त असदुल्ला जबर जखमी झाल्यामुळे त्याला मॉस्कोला पाठवण्यात आलं होतं. त्याच दिवशी संध्याकाळी टी. व्ही.वर दर्शन देऊन अमीनने लोकांच्या मनातला, त्याच्याबद्दलचा संशय पुसून टाकला. काही तरी गडबड नक्कीच चालू होती. कारण शेरखान मुद्दामहून सांगून गेला, “दोनचार दिवसांत आम्ही तुम्हाला नवीन सरकार देतो की नाही ते पहा!”

दारुल अमन इथल्या सैन्याच्या लोकांनी आता बंडखोरांवर गोळीबार करायला सरळ नकार दिला. या वेळी मात्र अमीनच्या सरकारने नेहमीप्रमाणे इराण, पाकिस्तानला दोष न देता, अफगाण लष्करामधल्याच भांडवलशाही घटकांना दोषी ठरवलं होतं.

त्याच वेळी एकदा नेहमीच्या वाण्याकडे सामान आणायला गेले होते तेव्हा फूटपाथवरून चार-सहा लोकांचा छोटासाच घोळका गेला. त्या वेळी दुकानदार दुकानात नव्हता, त्याचा १२–१३ वर्षांचा छोटा मुलगा होता. त्या घोळक्याला पाहून तो मुलगा एकदम उत्तेजित झाला. भडाभडा बोलू लागला. त्याचा तो आवेश पाहून मलाच

धास्ती वाटू लागली की कुणी येणारा जाणारा आमचं बोलणं ऐकणार तर नाही ? दुसरा कोणी दुकानात आला की तेवढ्यापुरता तो मुलगा बोलायचा थांबला होता, त्या माणसाला हवी ती वस्तू झटकन देऊन वाटेला लावून, पुन्हा त्याची सरबत्ती चालू व्हायची.

तो मुलगा म्हणत होता, "ते पहा....ते पहा...ते इख्वानी आहेत."

आतापर्यंत हे लोक डोंगरदऱ्यांत दूरवरच्या वस्त्यांमध्ये पाकिस्तान सीमेवरच्या भागात लपून असायचे. आता ते थेट काबूलमध्येच तुरळक प्रमाणावर दिसू लागलेत. त्यांना ओळखायचं कसं ते त्या अफगाण मुलानं मला सांगितलं. ते लोक हिरव्या रंगाचं पागोटं एका विशिष्ट पद्धतीनं बांधतात. कंबरेला पांढरं फडकं गुंडाळतात. इख्वानींना प्रत्यक्ष पाहिल्यामुळे तो मुलगा अतिशय उत्तेजित होऊन बोलत होता. अर्थात तो जे काय बोलला ती सगळी अक्कल, माहिती आपल्या बापाकडून घरी होत असलेल्या चर्चांवरून त्याने मिळवली होती हे निश्चितच.

त्या मुलाच्या म्हणण्याप्रमाणे आतापर्यंत पंचवीस हजार अस्कर–अफगाण सैनिक बंडखोरांना सामील झालेत. याचा अर्थ पंचवीस हजार बंदुका आणि लाखो गोळ्या बंडखोरांना मिळाल्या आहेत. त्याशिवाय किती तरी मशिनगन्स, बॉम्ब लढाऊ हेलिकॉप्टर्स बंडखोरांनी हस्तगत केलेली आहेत. आता यापुढे बंडखोरांना काबुलच्या घराघरांतून मदत मिळेल. आम्ही आता एकूण एक रशियन माणसाला मारल्याशिवाय राहणार नाही.

पण हे सगळं त्याचं म्हणणं मी पुन्हा पुन्हा ऐकलेलं असंच होतं. त्याने जो नवा दृष्टिकोण सांगितला तो असा होता : "आमचं सरकार रशियाचं कर्जदार आहे. लाखो डॉलर्सचं कर्ज आमच्या सरकारने रशियाकडून घेतलेलं आहे. रशियाचं हे सगळं कर्ज जर आम्ही फेडायचं ठरवलं तर आम्हांला भाकरीसुद्धा खाता यायची नाही. आणि आम्ही जोपर्यंत हे कर्ज फेडत नाही तोपर्यंत आम्हांला रशियाची गुलामगिरी पत्करावीच लागते. आमच्या पेट्रोलचंच पहा ना. आमचं पेट्रोल असून रशियाला त्याचा फायदा मिळतो. आमचंच पेट्रोल आम्हाला रशियाकडून विकत घ्यावं लागतं. बाकीचे देश पहा आपापल्या पेट्रोलवर केवढे श्रीमंत झाले. आम्ही मात्र कर्जदारच राहिलो आहोत."

"मग बंडखोरांना कोण पैसा देतो आहे ?" मी विचारलं. या माझ्या प्रश्नाला उत्तर देत तो म्हणाला, "अमेरिका मदत देते आहे. म्हणून तर ते लढू शकतात."

"मग तोही त्यांचा कर्जबाजारीपणाच झाला नाही का ? तुमच्या सरकारने कर्जासाठी रशियाची गुलामगिरी पत्करली आहे, तर बंडखोरांना पैशासाठी अमेरिकेची गुलामगिरी पत्करावी लागेल. मग दोघांत फरक तो काय राहिला ?" माझ्या बोलण्याने ते पोरगं बिचारं चक्रावूनच गेलं. हा मुद्दा बहुतकरून त्यांच्या घरगुती गप्पांत निघालाच नसावा. कारण तो पुटपुटत म्हणाला, "तरी पण फरक आहेच. रशियन काय, कम्युनिस्ट काय,

ते काफर असतात. अमेरिकन काफर नाहीत...”

“ते का नाहीत काफर? ते काय मुसलमान आहत का?” मी विचारलं. “नाही.... ते खिश्चन आहेत. पण ते काफर नाहीत.” ते पोरगं बिचारं बावचळलं होतं. मग तो म्हणाला, “ते मुसलमान नसले तरी ते खुदाला मानतात. खुदाच्या प्रेषिताला मानतात, म्हणून ते काफर नाहीत...पण मग आमच्यासारख्या लहान देशांनी काय करायचं तरी काय? कुठं जायचं आम्ही? मदतीशिवाय आम्ही सुधारू शकत नाही. आणि मदत घेतली की गुलामगिरी आलीच. खानम साहेब, तुमचा हिंदुस्थान देश फार चांगला. तुमच्या सरकारने कुणाकडून मदत घेतली नाही ना, त्यामुळे आमच्यासारखी गुलामगिरी तुमच्या नशिबाला आली नाही.”

त्याचं बोलणं ऐकून मी मनात आपल्याच नशिबाला बोट लावलं. आपल्याकडच्या निवडणुकांसाठी, आणि इतर ‘सांस्कृतिक’ कार्यक्रमासाठी जो काय बाहेरचा पैसा इथे येतो त्यामुळे काय काय प्रकार इथे होतात ते सगळे या पोराला सांगून त्याची काळजी कशाला वाढवायची, असा विचार करून मी काही बोललेच नाही.

अमीन सत्तेवर येऊन दीड महिनाच झाला आणि बंडखोरांबरोबरच्या लढाईबरोबरच पत्रकांची लढाई सुरू झाली. आतापर्यंत बंडखोर आपली पत्रकं गुप्तपणानं छापून, आपापसांतच वाटत असत. त्यांचे अस्तित्वही सर्वांनाच माहीत होतं आणि ती पत्रकं बरीच लोकप्रियही होती. त्याचा मुकाबला करण्यासाठी सरकारनंही आता रेडिओ, टी. व्ही.वरच्या फतव्यांबरोबरच पत्रकं वाटण्याचं सुरू केलं. प्रथम जेव्हा अशी सरकारी पत्रकं वाटली गेली, म्हणजे भिंतींवर, झाडांवर चिकटवलेली आढळली तेव्हा, थबकून वाचणाऱ्या अफगाण माणसाच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट दिसत होती. ही आमची पत्रकं अशी उघड्यावर कशी आली? आता त्याचा काय परिणाम होणार आहे? हीच भावना प्रत्येकाच्या मनात होती, पण पत्रक वाचून झाल्यावर लक्षात आलं की, हे पत्रक सरकारनंच काढलेलं होतं! या पत्रकातून सरकारने हवाईहल्ला झाला तर काय काय करायचं याबद्दलच्या सूचना दिलेल्या होत्या. रेडिओ, टी.व्ही.वरसुद्धा त्या सूचना पुन्हा पुन्हा देत होते. याचा अर्थ स्पष्ट होता की, सरकार हवाई हल्ल्याची अपेक्षा करीत होते. म्हणजेच चारपाच दिवसांपूर्वी बंडखोरांनी काबूल नजिकचा बेग्राम हा विमानतळ तिथला लढाऊ विमनांसह काबीज केला म्हणून ऐकलं होतं ते खरंच म्हणायचं! बंडखोरांनी काबूल शहर आता चोहोबाजूंनी आवळत आणलं आहे असं म्हणू लागले. काबूलहून कंदाहार, हेरत, जलालाबाद, कुंदूस वगैरे ठिकाणी जाणाऱ्या बसेस (रेल्वे इथं नाहीच) त्यांनी बंदच पाडल्या होत्या. कारण लष्करी रणगाड्यांच्या संरक्षणाखाली या बसेस, टॅक्सी, गाड्या पाठवल्या तरीही बंडखोर त्यांना अडवतात. प्रवाशांना लुटतात. एखादा चुकून कोणीही ‘गोरा’ त्यात असेल तर रशियन समजून त्याला मारतात. रणगाड्यांवरचे अस्कर तर सरळ बंडखोरांनाच जाऊन सामील होतात आणि जाताना बरोबर शस्त्रास्त्रं, रणगाडेसुद्धा घेऊन जातात. त्यामुळे सरकारने आता या

रस्त्यांवरची सगळी वाहतूक बंद करून ठिकठिकाणी छोट्या छोट्या विमानांची वाहतूक सुरू केली, अफगाण लोक म्हणतात, "आमचा देश किती श्रीमंत झालाय पहा. आमचे लोक आता तुमच्यासारखे रस्त्यावरून प्रवास करीत नाहीत, आम्ही आता विमानातून प्रवास करतो!"

## जस्ट लाइक दॅट

सत्तेवर आल्याआल्याच अमीनने रशियन राजदूताला परत पाठवायचे बेत रचले होते; कारण तराकी-अमीनमधलं जे काय भयंकर नाट्य घडलं होतं, त्यामध्ये या पुसोनॉव्हचा पाठिंबा तराकीला होता अशी अमीनची खात्री होती. आमची आपापसांतली भांडणं होत असताना, एकाचीच बाजू घेणारा हा कोण तिसरा टिकोजी-राव? असं अमीनचं म्हणणं होतं. अर्थात अमीनचं हे म्हणणं आम्हाला कळलं ते एका तरुण कार्यकर्त्याकडून. अलिकडच्या तराकी-अमीनच्या प्रकरणापासून तळाच्या कार्यकर्त्यांची फारच पंचाईत झाली होती. तराकी-अमीनने, बबरक कादरला काढलं होतं, तेव्हा तर खल्कपक्ष आणि परचमपक्ष या दोघांत दुफळी पूर्वीपासूनच होती. अर्थातच पक्षकार्यकर्त्यांच्या आपापल्या निष्ठा होत्याच. पण आता मात्र तराकी-अमीन हे दोघेही एकाच खल्क पार्टीचे असूनही त्यांच्यामध्ये तर चक्क मारामारीच झाली होती. तत्त्वज्ञान बाजूला सोडून सत्तास्पर्धेच्या या उघड्यावाघड्या प्रवाहात धारेला लागल्याशिवाय पक्ष-कार्यकर्त्यांना आता गत्यंतरच उरलं नव्हतं.

पुसोनॉव्ह काबूलमध्ये असणं हे अमीनला अत्यंत गैरसोयीचं होतं, अपमानास्पद होतं. त्याने रशियन सरकारकडे तगादा लावला की, पुसोनॉव्हला परत बोलावून घ्या. हा पुसोनॉव्ह अधून मधून असा बारा वर्षं काबूलच्या रशियन वकिलातीत सुरुवातीला उच्चपदस्थ अधिकारी म्हणून आणि नंतर बरीच वर्षं राजदूत म्हणून राहिला होता. अफगाणिस्थानच्या राजकारणात मुरलेला होता तो. हा वरिष्ठ मुत्सद्दी ब्रेझनेव्ह आणि अमीन यांच्यामधला वादाचा आणि प्रतिष्ठेचा मुद्दा झाला. पण मग कुठे, काय कळ फिरली कुणास ठाऊक, एक दिवस पुसोनॉव्हला रशियाने परत बोलावून घेतले. तो जाणार म्हणून मोठी मेजवानी अफगाण सरकारने देऊन त्याची बोळवण केली.

त्या वेळी तो पार्टीवर्कर म्हणाला, "डावपेचांच्या या खेळात अमीनचा हा विजय असला तरी हा विजय त्याला फार महागात पडू नये एवढीच इच्छा आहे."

असं बेभरंवशाचं वातावरण असतानाच एका मोठ्या कॉकटेल पार्टीला गेलो असताना एका अफगाण वृत्तपत्राचा संपादक भेटला. त्याच्याबरोबर, परराष्ट्र मंत्रा-लयातला त्याचा एक अधिकारी मित्र होता. दोघेही भरपूर पिऊन खूप बडबडत होते. पण ती असंबद्ध नव्हती. कुठेही अफगाण-भारतीय एकत्र आले की सुरू होणारी, 'तुम्ही आम्ही मित्र. तुमची आमची मैत्री किती जुनी, अगदी आर्यांच्या काळापासूनची.'

ही रेकॉर्ड इथेही पुन्हा पुन्हा वाजत होतीच. पण या वेळी ते दोघेही आलटून पालटून बोलत होते. ते म्हणत होते, " पूर्वी आम्ही ( म्हणजे आर्य ) हिंदुस्थानात गेलो आणि आम्ही तिथल्या मूळच्या द्रविडी संस्कृतीचा पराभव केला.... मग तुमच्याकडचे बुद्ध इथे आले. आम्ही बुद्ध झालो आणि आम्ही जगभर बुद्ध धर्माचा प्रसार केला..." प्रत्येक वेळी तो ' आम्ही ' वर जोर देऊन बोलत होता.

मग तो म्हणू लागला, " मग आम्ही मुसलमान झालो आणि आम्ही हिंदुस्थानात इस्लाम नेला. Just like that.... त्याप्रमाणं आम्ही...." पण त्यावरच त्याच्या रेकॉर्डची पिन अडकली होती. पुढे चालतच नव्हती. त्याच वेळी आणखी कुणी तरी, तो अडलेला पाहून, वेगळाच विषय काढून बोलायला लागलं आणि त्याचं ते Just like that च्या पुढचं बोलणं राहूनच गेलं. मला मात्र अत्यंत चुटपूट लागून राहिली की पुढं त्याला काय म्हणायचं होतं ? ...त्याप्रमाणं आताही आम्ही हिंदुस्थानात येऊन तुमच्या संस्कृतीचा नाश करू ?... पूर्वी आम्ही इस्लाम हिंदुस्थानात नेला त्याचप्रमाणे आता आम्ही मार्क्सवाद हिंदुस्थानात घेऊन येणार आहोत ?.... काय म्हणायचं काय होतं त्याला ? ' जस्ट लाइक दॅट ' याचा अर्थ काय लावायचा ?

त्यानंतर पाकिस्तानची निर्मिती, कायदेआझमचं श्रेष्ठत्व यावरून त्या दोघांचंच आपापसांत भांडण सुरू झालं. तेव्हा ते भांडण थांबावं म्हणून कोणी तरी म्हणालं, " जसे आम्ही तुमचे मित्र, तसेच रशियाही तुमचा दोस्तच आहे. ते तर आता अगदी खास दोस्त आहेत तुमचे. आहेत की नाहीत ? एवढी मदत देतात ते तुम्हाला, तेव्हा ते तुमचे मित्र असणारच."

त्यावर आत्तापर्यंत बडबड करणारे ते दोघेही अफगाण एकदम स्तब्ध झाले म्हणाले, " रशियनांचं जाऊदे. आपण त्यांच्याबद्दल बोलायलाच नको. त्यांच्याबद्दल काय बोलायचं, काय करायचं ते वरचे लोक ठरवतीलच. आपण आपले सांस्कृतिक विषयावरच बोलू या... राजकारणाबद्दल आपण बोलायचंच नाही... रशियाबद्दल आपण बोलाचंच नाही."

आम्हाला आश्चर्य वाटलं म्हणजे, ते दोघेही एवढे प्यायलेल्या स्थितीत होते तरी रशियनांचा विषय निघाल्यावर दोघेही एकदम ताळ्यावर आले होते. त्यांच्या बाबतीतलं त्यांचं भान सुटलं नव्हतं. त्यांच्याबद्दल चर्चा करण्याची त्यांची इच्छा मुळीच नव्हती. त्या दोघांचं रशियनांबद्दल न बोलण्याचं एकमत झालेलं होतं !

आपल्या जिवाला धोका आहे याची अमीनला एवढी खात्री वाटत होती की त्याने अर्ग महालाच्या बाहेर पडायचं सुरुवातीपासूनच बंद केलं होतं. सौर क्रांतीची डॉक्युमेन्टरी फिल्म अर्धवटच काढून झाली होती, ती पूर्ण करायची ठरल्यावर असं ठरलं की, ' त्या ' दिवशी अमीन जसा रणगाड्यामध्ये बसून अर्ग महालामधून टी. व्ही. स्टेशनवर गेला होता, तसेच त्याने पुन्हा एकदा जावे आणि त्याचे चित्रण करावे. पण ही कल्पना काही अमीनला पसंत पडली नाही. त्याने टॅंकमध्ये बसून रस्त्यावरून

मिरवीत जायला साफ नकार दिला. जेव्हा त्या ' विजययात्रेचं ' महत्त्व त्याचे लोक त्याला पटवून द्यायला लागले तेव्हा अमीन म्हणाला, "ही गोष्ट एवढी महत्त्वाची असेल तर माझी डमी वापरा!"

लोकांचं आपल्याबद्दलचं मत चांगलं व्हावं म्हणून ' जुलमी तराकीने मारलेल्या ' लोकांच्या नावांची यादी प्रसिद्ध करण्याचं त्यानं ठरविलं. त्याप्रमाणे, तुरुंगात मेलेल्या, किंवा मारल्या गेलेल्या माणसांच्या नावांच्या याद्या प्रसिद्ध होऊ लागल्या. पण त्याचा उलटाच परिणाम होऊ लागला. आपापल्या नातेवाइकांची नावं, आपल्या माणसांची नावं त्या याद्यांमध्ये पाहून काबूलमध्ये हाहाःकार उडाला. पहिल्या दिवशी फक्त साडे-तीनशे नावं असलेली ही यादी आठदहा दिवसांतच तीस हजारांवर गेली. आपल्या माणसांची नावं त्या यादीमध्ये पाहून लोकांनी आक्रान्त मांडला. गृहमंत्रालयासमोर रोज हजारो लोक जमत. अमीनला शिव्यागाळी करीत. आपल्या मेलेल्या माणसांचा बदला घेण्याची धमकी देऊ लागले. अमीनची कल्पना होती की, या लोकांना तराकीनेच मारलं आहे या सांगण्यावर लोक विश्वास ठेवतील. पण झालं उलटंच. लोक अमीनलाच दोषी ठरवू लागले. कारण जेव्हा तराकी जिवंत होता तेव्हाही लोकांची धरपकड करण्यात, लोकांना मारण्यात अमीननेच पुढाकार घेतला होता. तोच याला जबाबदार आहे असं तेव्हाही बोललं जायचं. आणि आता तर या याद्यांमुळे लोकांचा सुप्त संताप उफाळून वर आला होता. गृहमंत्रालयासमोर आपल्या दुःखाचा उत्पात मांडणाऱ्यांना पोलीस हाकलून देऊ लागले. पण बुरखा घालून आलेल्या बायका शिपायांच्या आरडाओरडीला, धाकदपटशाला मुळीच भीक न घालता तिथेच शिव्याशाप देत, रडत भेकत उभ्या रहात. त्यांना हाताला धरून बाजूला करणं किंवा ढकलून देणं, तिथल्या पडदा पद्धतीमुळे अशक्य होतं. तिथली गर्दी आणि गर्दीचा संताप रोज वाढतच होता. म्हणून मग एक दिवस त्या याद्या देणं सरकारनं बंदच केलं.

आरेफ रझाच्या एकत्र कुटुंबातली सगळी कर्तीसवरती पुरुष माणसं, बायकांसुद्धा सरकार घेऊन गेले होते. मागे उरलेल्यांनी म्हाताऱ्या कोताऱ्यांना, आजारी माणसांना आणि कुटुंबातल्या बेवारशी झालेल्या पंचाहत्तर मुलांना एकत्र आणले आणि त्यांची देखभाल करणं सुरू केलं. पकडून नेलेल्यांपैकी किती तरी जणांची नावंच त्याच्या काका, मामांची नावं त्या याद्यांमध्ये आली होती. अत्यंत संतापलेला आरेफ रझा म्हणत होता, "अरे, ही माणसं नाहीत, माणसांना मारणारे सैतानाचे हस्तक आहेत हे!" त्याचा १२ वर्षांचा धाकटा भाऊ शाळेत फुटबॉल खेळत होता. खेळता खेळता त्यानं जोरानं ठोकलेला बॉल उडून दूर गेला आणि हॉलच्या भिंतीवरच्या अमीनच्या फोटोवर आदळला. फोटोची काच फुटून, फोटो खाली पडला. त्याच्या या गुन्ह्याबद्दल त्या बारा वर्षांच्या मुलाला पोलीस घेऊन गेले आणि त्यांनी त्या मुलाला मारून टाकलं!

"मला जर बंदूक मिळाली तर त्या अमीनला गोळी घालीन मी!" आरेफ रझा म्हणाला.

" तुझा संबंध येणार कागद पेन्सिलींशी; फार फार तर पेन्सिल तासण्यासाठी ब्लेड मिळेल तुला. बंदूक कुठून मिळणार ? " मुकुंदा त्याला म्हणाला.

" बंदूक नाही मिळाली तर सुऱ्यानं भोसकीन, विष खायला घालीन त्याला. काहीच जमलं नाही तर हातानं गळा दाबून खून करीन त्याचा." आरेफ संतापून बोलत होता. " आणि आता अर्ध्या दिवसाची सुट्टी दिली आहे सगळ्या कचेऱ्यांना. आपापल्या नातेवाइकांचे फतेहा पढण्यासाठी आमचे लोक का मेले, कसे मेले, कोणी मारलं त्यांना याची उत्तरं मिळत नाहीत. आम्हांला आमच्या माणसांची प्रेतंही मिळत नाहीत. त्यांनाच आपापले खड्डे खणायला लावून, त्याच खड्डयात बुलडोझरनी त्यांची प्रेतं ढकलून त्यांना गाडून टाकलं या सरकारनं; आणि म्हणे आता फतेहा पढा त्यांच्यासाठी. केवढी दयाबुद्धी ही ! आमच्या जखमेवर मीठ चोळतो आहे हा अमीन. त्याच्या देहाची चळण झाली पाहिजे, किडे पडतील त्याच्या शरीरात."

हा इतका द्वेष, संताप, सूड आला कसा ? कुठून आला ?

## असे का झाले ?

सौर क्रांती झाल्यानंतर पहिले २–४ महिने लोक या नव्या सरकारच्या बाबतीत साशंक होते. तरी पण त्यामध्ये शत्रुत्वाची भावना नव्हती. कादर तर लोकांचा आवडताच होता. तराकी, अमीन यांची भाषणं ऐकून हे लोक आपल्यासाठी खरो-खरच काही तरी करतील अशी अपेक्षा बाळगून होते. समाजवादाची भाषा बोलणारे हे लोक कम्युनिस्ट वाटत नव्हते. अगदी सुरुवातीला रशियाही अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करीत नव्हता.

पण मग खल्क आणि परचम यांची आपापसांतली भांडणं विकोपाला जाऊन सरकारमध्येच दुफळी माजली. नको असलेल्यांना बाजूला केले गेले. आणि मग दोन पातळ्यांवर हे आपापसांतले भांडण विकोपाला जाऊ लागले. राजकीय पातळीवर मार्क्सवाद्यांची जी खास वाटचाल असते त्याच रुळलेल्या वाटेनं इथले सत्ताधीशही जाऊ लागले. म्हणजेच ' शुद्धीकरणा 'ला सुरुवात झाली. मार्क्सिझमच्या सगळ्या संभाव्य शत्रूंचा नायनाट करण्याचे कार्य चालू झाले. दाऊदखानपासून सुरू झालेल्या या मृत्युसत्रात त्याचे नातेवाईक, मित्र, मंत्री, निकटचे सैनिकी, मुलकी सरकारी अधिकारी जमीनदार, व्यापारी, दुकानदार, धार्मिक नेते, बुद्धिवादी, पांढरपेशे, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ— सगळ्यांचाच बळी जाऊ लागला. एक न संपणारी मृत्युमालिका चालू झाली.

दुसरं भांडण होतं ते इस्लामशी. इस्लाम काय किंवा मार्क्सवाद काय, या दोन्हीही बंदिस्त विचारसरणी. कमालीचे चाकोरीबद्ध पंथ आहेत. ' प्रश्न विचारायचे नाहीत ', ' आमच्याकडे सर्व प्रश्नांना उत्तरं आहेत.' या दोन तत्त्वांवर मार्क्सवाद आणि इस्लाम उभे आहेत. मार्क्सवादाला प्रश्न विचारणारे, आव्हान देणारे, ' बूर्झ्वा ' ठरतात, आणि

इस्लामला प्रश्न विचारणारे, आव्हान देणारे 'काफर' ठरतात. बदलत्या जगाचे संदर्भ मार्क्सवाद आणि इस्लाम लक्षातच घेत नाही. उलट ते संदर्भच चुकीचे असल्याचे त्यांच्या पद्धतीप्रमाणे सिद्ध करून दाखवले जाते. पाणी वाहात राहिलं नाही तर त्याचं डबकं होतं, त्यावर शेवाळ जमतं, त्याप्रमाणे मुळातल्या तत्त्वांना बदलत्या परिस्थितीनुरूप वळण न दिल्यामुळे, मूळच्याच तत्त्वांना चिकटून राहिल्यामुळे, कोणत्याही धर्माला काय किंवा ईझमला काय साचलेपणा येतोच. बंदुकीच्या जोरावर किंवा धार्मिक मूल्यांच्या जोरावर किती दिवस तग धरून राहणं शक्य आहे ? या संघर्षातून आता कोणता नवा दिवस जन्माला येणार आहे याचा विचार मुळापासून व्हायला हवा आहे.

पोथीनिष्ठा हे दोघांमधले साम्य. एकजण कुराणापलीकडचे काही पाहात नाही, तर दुसऱ्याचा 'सत्तास्पर्धा' हा धर्मग्रंथ आहे. त्याच्याव्यतिरिक्त चर्चा इस्लाममध्ये, मार्क्सवादामध्ये संभवतच नाही. पुस्तकात लिहिलेला शब्द तो अखेरचा, त्याच्याबद्दल शंका घ्यायच्याच नाहीत. शब्दप्रामाण्याला आत्यंतिक महत्त्व, तेच अंतिम सत्य.

इस्लाम हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. तू जन्माला आला आहेस तर सगळं जग इस्लाममय करून सोडणं हे तुझं परम, आद्य कर्तव्य आहे. निदान इस्लामेतरांनी तुझी गुलामी पत्करलीच पाहिजे. तसं त्यांना कबूल असेल तरच इतरांना जगण्याचा हक्क आहे. तेव्हा एका हातात तलवार घे, दुसऱ्या हातात कुराण घे आणि जग जिंकायला नीघ. ही इस्लामची शिकवण आहे.

तर 'धर्म ही अफूची गोळी आहे' असं म्हणणारा मार्क्सवाद, इस्लामइतक्याच कडवेपणानं सगळं जग मार्क्सवादी करणं हे आपलं परम, आद्य कर्तव्य मानतो. जे भांडवलशाहीचा पुरस्कार करतात, जे उदारमतवादी, मध्यममार्गी आहेत, किंवा जे मार्क्सवादी नाहीत, त्यांचा जगण्याचा हक्क मार्क्सवाद मान्य करीत नाही. जगभर कामगारांची हुकूमशाही स्थापन करणे हेच अंतिम ध्येय असलेल्या मार्क्सवादामध्ये, मार्क्सवाद्यांच्या शत्रूंचं निराकरण करणे हे परमपूज्य कर्तव्य मानलं जातं. आणि जे मार्क्सवादी आहेत त्यांनीसुद्धा, सैनिकी शिस्तीप्रमाणेच मार्क्सवादी सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेचंच पालन केलं पाहिजे. त्याबद्दल चर्चा, वादविवाद किंवा प्रश्न विचारणं, विरोध हा गुन्हा समजला जातो. लगेच त्या प्रतिक्रांतिकारी घटकाला नाहीसं करणं हेसुद्धा कर्तव्य ठरतं.

विचारसरणीमध्ये आणि त्याच्या अंमलबजावणीमध्ये एवढं साम्य असलेले हे दोन पंथ एकमेकांच्या सान्निध्यात राहूच शकत नाहीत, टिकूच शकत नाहीत. कारण हे दोन्ही पंथ एकमेकांना नाहीसे करण्यासाठीच टपलेले असतात.

इस्लामची सुरुवात झाली ती अत्यंत मागासलेल्या अशा समाजामध्ये. त्यामुळे इस्लाममधले सगळे सामाजिक संबंध त्या काळानुरूप होते, म्हणजेच विकासाला मर्यादा घालणारे, बंधनांनी जखडून गेलेले, अत्यंत चाकोरीबद्ध असे आहेत.

आणि एखादा समाज जेव्हा यांत्रिक सुधारणेचा परमोच्च बिंदू गाठतो, तेव्हाच

मार्क्सवादाला सुरुवात होते, तात्त्विकदृष्टया !

म्हणजे मुळातच इस्लाम आणि मार्क्सवादामध्ये, सुरुवातीलाच केवढा तरी प्रचंड विरोधाभास आहे. म्हणूनच मुस्लिमांना आधुनिक यांत्रिकीकरण हवे असते—काळाची गरज म्हणून, पण त्यामागचे जे शोध घेण्याचे, मानवी विकासाचे तत्त्वज्ञान असते ते त्यांना नको असते. कारण त्यामुळे आपल्या परमपवित्र, रचनाबद्ध संस्कृतीला धक्का पोचेल अशी त्यांची धारणा असते.

तर मार्क्सवादामधल्या यांत्रिक सुधारणेच्या समाजामध्ये, चाकोरीबद्ध, विकासाला मर्यादा घालणाऱ्या समाजाकडून कमालीच्या संपूर्ण निष्ठेची अपेक्षा करणाऱ्या इस्लामला स्थान नसते.

म्हणूनच हे दोन्ही पंथ एकमेकांचे अट्टल शत्रू होतात. इतक्या साम्य असलेल्या आणि त्याच वेळी एवढा मोठा विरोधाभास असलेल्या या दोन शक्ती जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा प्रचंड संघर्ष होणार हे ठरलेलंच आहे. म्हणूनच सौर क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या समाजवादी सरकारच्या सामाजिक सुधारणा त्या अतिशय योग्य, आवश्यक, समाजाला फायदेशीर असूनदेखील, त्या मान्य करणं सर्वसामान्य अफगाण लोकांना फार कठीण गेलं. राजकीय पातळीवर, इस्लामशी जन्मजात शत्रुत्व असलेल्या मार्क्सवादाशी अफगाण लोकांचं पटणं ही अशक्यप्राय गोष्ट आहे.

आजच्या अफगाणिस्थानात सर्वात केविलवाणे कोण असतील तर ते, आजच्या जगातल्या विविध तत्त्वज्ञानांची ओढ असणारे, सुशिक्षित अफगाण. त्यांना चाकोरीबद्ध मार्क्सवाद नको आहे तसाच चाकोरीबद्ध इस्लामही नको आहे.

" जर उद्या समजा, बंडखोरांना विजय मिळाला आणि या मार्क्सवाद्यांची सत्ता संपुष्टात आली तर ते तुम्हाला चालेल काय ? " या प्रश्नाला बहुसंख्य अफगाण लोकांचे उत्तर असते की, " नाही. आम्हाला जसे हे मार्क्सवादी नकोत तसेच ते इख्वानीही नकोत. पाकिस्तानचा झीया आणि इराणचा खोमेनी अशांसारख्यांचं राज्य आम्हाला मुळीच नको आहे."

या लोकांचं खरं दुःख आहे ते हेच आहे. त्यांना हवा तसा नेता व पक्षच सध्या इथे नाही. कोणतेच टोकाचे, अतिरेकी तत्त्वज्ञान त्यांना नको आहे. अफगाणिस्थानसारख्या सर्व दृष्टींनी मागासलेल्या देशाला या संकटातून, मागासलेपणाच्या बंधनातून ओढून बाहेर काढून नव्या उदयोन्मुख, स्वस्थ समाजव्यवस्थेकडे नेणारा नेता त्यांना हवा आहे. पण अशी काही अपेक्षा करणं म्हणजे गुलबकावलीच्या फुलाची अपेक्षा करण्यासारखंच आहे ते. इस्लामविरोधी असलेल्या, लोकांच्या नावडत्या राज्यकर्त्यांना बदलून त्या जागी इस्लाम खपवून घेणारे दुसरे मार्क्सवादीच आणायच्या खटपटीत रशिया गुंतलेला होता. कट्टर मुस्लिमांना दुखवून चालणार नाही हे रशियाने केव्हाच ओळखून ठेवले होते. म्हणूनच रशियाने १०–१५ वर्षांपूर्वी जेव्हा अफगाणिस्थानला मदत म्हणून पॉलिटेक्निक इन्स्टिटयूट काबूलमध्ये बांधून दिली ! तेव्हा तिथं

शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक लहानशी मशिदही बांधून दिली ! पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच रशियन भाषेच्या माध्यमातून तांत्रिकी शिक्षण इथे दिले जाते. आणि सर्व शिक्षण मोफत मिळालेला विद्यार्थी जेव्हा इथून बाहेर पडतो तेव्हा तो विद्यार्थी मार्क्सची तत्त्वे डोक्यात घेऊनच बाहेर पडतो ही गोष्ट निराळी, पण मशीद बांधून दिलीच. रशियाची दृष्टी फार दूरवर पोचते हेच खरं.

## नवी विटी नवे राज्य

तराकीला काढल्यानंतर रातोरात त्याचे फोटो गायब झाले होते. अपेक्षा अशी होती की, दोन दिवसांत अमीनचे फोटो ठिकठिकाणी झळकू लागतील. पण तसे झाले नाही. म्हणजे अमीनचे फोटो झळकले पण त्यांची संख्या तराकीच्या फोटोंच्या संख्येच्या मानाने खूपच कमी होती. न्हूर टी. स्टुअर्ट या अमेरिकन बाईला दिलेल्या मुलाखतीत अमीनने सांगितले की, "आता यापुढे व्यक्तिपूजेला स्थान नाही. तराकीने स्वतःचे वैयक्तिक महत्त्व अवास्तव वाढवून ठेवले होते. कित्येकदा आपल्या सहकाऱ्यांचा विचार न घेताच तो महत्त्वाचे निर्णय घेऊन टाकत असे. त्यामुळे सगळ्यांची परिस्थिती मोठी चमत्कारिक होत असे. तराकीने हुकूमशाहीच गाजवली. म्हणूनच त्याला दूर करणे आम्हाला भाग पडले. तसे केले नसते तर पुन्हा एकदा भांडवलदारांच्या कारवायांना आम्ही बळी पडलो असतो. पूर्वीसुद्धा अमानुल्लाच्या वेळी भांडवलदारांनी त्याला सत्तेवरून हटवण्याचा प्रयत्न केलाच होता. त्या वेळेस ते यशस्वी झाले. पण आता तसे होणार नाही. कारण आता सर्वसामान्य जनतेच्या सामाजिक जाणीवा वाढल्या आहेत. आपल्या शक्तीची त्यांना ओळख पटली आहे. आता भांडवलशाहीचा शिरकाव अफगाणिस्थानात आम्ही होऊ देणार नाही. मुजाहिदना भांडवलदारांकडून मदत मिळते आहे. पूर्वी जमीनदार, सरदार, लोकांची पिळवणूक करीत होते. त्यांचा बंदोबस्त आम्ही करू लागल्यावर त्यांनी 'इस्लाम धोक्यात आहे' असा खोटा प्रचार करून आमच्याविरुद्ध कारवाया चालवल्या आहेत. आमची गरीब जनता ही मुसलमानच आहे. पण या जनतेची पिळवणूक पूर्वी श्रीमंतवर्ग करीत असे तेव्हा कुठे यांना या गरीब मुसलमानांचे प्रेम आलं नाही ? आत्ताच कसं आलं ?

"आम्ही सत्तेवर आल्यानंतर मुल्लामौलवींना तुरुंगात टाकलं ही सत्य गोष्ट आहे; पण ते मुल्लामौलवी होते म्हणून त्यांना तुरुंगात टाकलं नाही तर एका विशिष्ट वर्गाचं नेतृत्व करीत होते म्हणून त्यांना तुरुंगात टाकलं. धर्माच्या नावाखाली या लाचलुचपतखोर मुल्लामौलवींनी गरीब कष्टकरी जनतेची पिळवणूक करण्याचं काम चालवलं होतं, म्हणून त्यांना तुरुंगात टाकलं.

"रशियाशी आमची दोस्ती आहे. पहिल्यापासून होती. पुढेही राहील; पण याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक गोष्ट आम्ही रशियाच्याच मदतीने करतो. आम्ही

सौर क्रांती केली, त्याचा सुगावासुद्धा कुणाला लागला नाही. अमेरिका हजारो डॉलर्स हेरगिरीसाठी इथे खर्च करते, पण अमेरिकेला कसली शंकाही आली नव्हती. क्रांती केली ती आम्ही आमच्या किंमतीवर आणि कष्टकरी जनतेच्या मदतीमुळे..."

काबूल टाइम्सची चार पानं भरून अमीननं मुलाखत दिली होती. प्रश्नाचे उत्तर टाळण्यासाठी केलेली शाब्दिक करामत किंवा उद्धटपणा त्यामध्ये नव्हता. अमीनचं म्हणणं सरळ स्वच्छ होतं, पटणारं असंच होतं.

मुल्लामौलवींबद्दलचं किंवा बंडखोरांना मिळणाऱ्या मदतीबद्दलच्या अमीनच्या म्हणण्यात केवढं तरी मोठं सत्य होतं. असं असूनही मग या लोकांच्या वागणुकीचा चांगला परिणाम का होऊ शकला नाही? ज्या कष्टकरी जनतेच्या भल्यासाठी हे नवे कायदे केले होते, मुल्लामौलवींना तुरुंगात टाकलं होतं, त्यांनासुद्धा त्याचे महत्त्व कसे कळले नाही? एरवी हे लोक मुल्लामौलवींची अतोनात टिंगलटवाळी करतात, जमीनदारांबद्दल तर त्यांच्या मनात धास्तीच होती. असं असूनही जेव्हा हे दोन्ही वर्ग सरकारच्या सेवेला बळी पडले तेव्हा ज्यांनी या दोन्ही वर्गांचे जुलूम सहन केले त्यांनीच कसे सरकारविरुद्ध शस्त्र उभारले?

यावर विचार करता करता मला असे वाटायला लागले की, सरकारने या लोकांचा काटा काढला, नवे सुधारक कायदे केले, पण त्यापाठोपाठ जे पूरक कार्य करायला हवे ते केले नाही. आपल्या धोरणांचा प्रत्यक्षात कसा फायदा लोकांना होणार आहे, त्याचा खरा अर्थ काय हे सरकारने लोकांना समजावून सांगितलेच नाही. मोठाल्या शहरांतून फक्त पुस्तकी प्रचारकाची भाषणबाजी केली. सरकारने घेतलेल्या या निर्णयांचा, धोरणांचा थेट परिणाम फक्त काबूल-कंदाहारसारख्या शहरांत होणार नव्हता, तर तो डोंगरदऱ्यांत, दूरवर कुठेकुठे वसलेल्या छोट्या छोट्या खेडेगावांतून होणार होता. काही काही ठिकाणी तर ही खेडेगावं म्हणजे १००–१५० घरांची वस्तीच होती. आधुनिक यांत्रिकी युगाशी आणि अफगाणिस्थान हे एक राष्ट्र आहे या कल्पनेशी अत्यंत दूरचं नातं सांगणारी ही खेडी आपापलं एकाकी, टोळीजीवन जगत होती. त्यांची आध्यात्मिक गरज मुल्लामौलवी पुरी करीत होते, तर ऐहिक गरजा जमीनदार पुऱ्या करीत होता. जरी त्या दोघांकडून त्यांची पिळवणूक होत होती तरी हे दोन्ही घटक त्या खेड्यातल्या जीवनाला अत्यंत आवश्यक असे घटक होते, त्यांच्याशिवायचे इतर जीवन त्यांना माहीतच नव्हते. बाकीच्या जगाशी संबंध यायचा तो या दोघांमार्फतच, त्यामुळे त्यांना बाकीच्या जीवनाची गरजही वाटत नव्हती. अशा या दोन्ही घटकांना खेड्यांतल्या समाजजीवनापासून एकदमच असं उचलून नेल्यानंतर पडलेली पोकळी भांडवलशाहीच्या प्रचाराने–म्हणजेच पूर्वीच्याच घटकांच्या हस्तकांनी भरून काढली गेली.

ही पोकळी पडूच न देण्याची खबरदारी घेण्यामध्ये क्रांतिकारी अफगाण सरकार अपयशी ठरले. मुल्लामौलवींना काढल्यानंतर त्यांच्या जागी पक्षकार्यकर्ते स्वतःच मुल्लामौलवींचं कार्य करू लागले असते, प्रत्यक्ष किंवा राजकारणापासून दूर असलेले तटस्थ लोकच

मुल्लामौलवी म्हणून गेले असते– म्हणजे लोकांना त्रासदायक वाटणारी धार्मिक दडपशाही न करता फक्त कायद्याचा अर्थ लावणं, न्यायनिवाडा करणं वगैरे कामं केली असती तर मुजाहिदीनं आणि इख्वानी लोकांचा पाय या खेडेगावांतून टिकलाच नसता. कुणाची एखादद्दुसरी मेंढी चोरीला गेली म्हणून, कुणाला पहिली बायको जिवंत असतानाही दुसरी किंवा तिसरी शादी करायची म्हणून, कुणाच्या बिघा-दोन बिघा जमिनीच्या वारसा हक्काचा तंटाबखेडा निघाला म्हणून, वर्षोनुवर्षे एकमेकांना ओळखणाऱ्या मुल्लाकडे न जाता, अनोळखी अशा सरकारी माणसाकडे जाण्याची कल्पनाच त्या खेडुतांना असह्य वाटू लागली. त्या लोकांना अगोदरच सरकारी माणसांची भीती कोण वाटायची, त्यात आता तर सरकार कम्युनिस्ट झालंय म्हणे! या समाजवादी सरकारबद्दल आपलेपणा वाटण्याऐवजी तुटलेपणाचीच भावना जास्त बळावली!

त्याचप्रमाणे जमीनधारणेचे नवे कायदे केल्यानंतर, जमिनीचा नवा ताबा मिळालेल्या छोट्या शेतकऱ्यांचीही काळजी सरकारने केलीच नाही. या शेतकऱ्यांना फक्त जमिनीचा ताबा मिळून काय उपयोग होता? त्याबरोबर बी-बियाणं, अवजारं, पाणीपुरवठा हवा होता. तो मिळाला नाही; म्हणून आणि "आज जमिनदाराकडून सरकारने ही जमीन हिसकावून, नुकसानभरपाई न देता, तुम्हाला ती दिली आहे. हे एक तर इस्लामप्रमाणे पापकर्म आहे. शिवाय उद्या तुम्ही कष्ट करून शेतं पिकवाल आणि हेच सरकार तुमच्या जमिनी पुन्हा तुमच्याकडून हिसकावून घेईल." अशा इस्लामी प्रचाराला बळी पडून शेतमजूर, शेतकऱ्यांचा वर्गही सरकारविरुद्ध गेला.

क्रांतिकारी सरकारचे नवे कायदे, कारवायांना बळकटी आणणारे कार्य न झाल्यामुळे अफगाण जनतेचा नव्या सरकारवर विश्वासच बसला नाही. या सरकारची त्यांना खात्री वाटेना. सरकार बोलते एक, करते एक, आणि त्याचा परिणाम काही भलताच होतो,– असा अनुभव येऊ लागला.

अफगाण लोकांचा रशियाद्वेष तर जास्तच भडकत चालला होता. आतापर्यंत इतर ठिकाणी रशियन्सना मारण्याचे, अगदी हालहाल करून मारण्याचे प्रकार चालू होतेच, पण १३ डिसेंबर १९८० रोजी सकाळी ११-११॥ वाजता खुद्द काबूलमध्येच एक रशियन जोडपं मारलं गेलं. जुन्या काबूलमधल्या पुले किश्ती या अत्यंत गजबजलेल्या बाजारात एका रशियन माणसाला सुऱ्याने भोसकून मारण्यात आलं. तो जागच्याजागीच ठार झाला. त्याच्या बायकोवर गोळ्या झाडण्यात आल्या. ती जबर जखमी झाली होती. तिला नंतर हॉस्पिटलमध्ये नेलं. पुढं तिचं काय झालं कुणास ठाऊक! ही बातमी सांगणारा प्रत्येक अफगाण माणूस कसल्याशा समाधानाने ही बातमी सांगतोय याची स्पष्ट जाणीव होत होती. आणि हीच गोष्ट मनाला अस्वस्थ करू लागली. रशियन लोकांच्या द्वेषाचं आणि त्यांना मारण्याचं वेडच या लोकांना लागलंय की काय असे वाटते. द्वेषापोटी माणसाला मारायचंच असं एकदा या लोकांनी ठरवल्यानंतर, उद्या जर समजा, आपल्या परराष्ट्रीय धोरणातील बदलामुळे या लोकांना भारतीयांबद्दल राग आला,

द्वेष वाटू लागला, तर हे लोक भारतीयांनाही एवढ्याच त्वेषानं मारायला लागतील! हा विचार भयंकर अस्वस्थ करणारा होता.

बंडखोर हे सरकारविरुद्ध लढत होते, सर्वसाधारण लोकांना बंडखोरांबद्दल वाटणारी सहानुभूती वाढतच होती, अफगाण सैन्यही बंडखोरांना सामील होत होते, रशियन लोकांना संरक्षणाशिवाय हिंडणं अशक्य झालं होतं. (खरे तर तेच लोक एकटेदुकटे पूर्वीसुद्धा कधी हिंडत नसत. असं असताना ते जोडपं एकटंच इतक्या दाट वस्तीच्या, जुन्या शहरात, की जिथं बंडखोरांच्या कारवाया एक दोनदा झाल्या होत्या—त्या भागात कशासाठी गेले होते ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट होती.) त्यामध्ये आणखी एका विलक्षण गोष्टीची भर पडली. मुकुंदाच्या ऑफिसमधल्या सर्व थरांवरच्या अफगाण लोकांनी, दर महिन्याला होणाऱ्या त्यांच्या बैठकीत ऑफिस प्रेसिडेन्टकडे, अचानकच पगारवाढ मागितली. पूर्वी दाऊदखान जायच्या अगोदर आर्याना एअरलाइन्सच्या कर्मचाऱ्यांच्या इतर मागण्यांमध्ये पगारवाढही होती. पगारवाढ मागण्याचा तो प्रसंग पहिलाच होता. आणि आता हा दुसरा प्रसंग. म्हणून या अगदी छोट्याशा घटनेचं फार महत्त्व वाटलं मला.

अगदी साध्या-सुध्या कारणासाठी लोकांची रवानगी तुरुंगात होत होती. अशी परिस्थिती असताना, या लोकांनी आपल्या कम्युनिस्ट सरकारकडे पगारवाढ मागण्याचं धारिष्ट्य दाखवावं ही अतिशय कौतुकाची बाब वाटली मला.

अर्थातच त्या समाजवादी प्रेसिडेन्टने खास भांडवलदारी उत्तर देऊन त्यांची बोळवण केली, "आपला देश गरीब आहे, आपण अजून धडपडतो आहोत, आपल्यासमोर किती तरी प्रश्न आहेत, बंडखोरांशी, साम्राज्यवाद्यांशी लढून आपल्याला आपला देश घडवायचा आहे. अशा कठीण वेळेला, तुम्हाला पगारवाढ देणं कसं शक्य आहे?"

या पगारवाढीच्या प्रश्नाचं पुढं काय होतंय हे पहायची फार उत्सुकता वाटत होती मला. पगारवाढीच्या पहिल्या मागणीनंतर अफगाणिस्थानचा इतिहासच बदलला होता. दुसऱ्या पगारवाढीच्या मागणीनंतरही इतिहासाला विलक्षण कलाटणी मिळाली.

## एका राष्ट्राचा मृत्यू

छोट्याशा काबूल शहराभोवतीनं उंचच उंच पहाड आहेत. डोंगरांच्या कुशीतलं हे शहर दिवसासुद्धा शांत असतं. संचारबंदी ११ वाजता चालू होते. तरी रात्री आठ वाजल्यानंतरच शहर गाढ शांततेत झोपलेलं असतं. या वर्षाची पहिली हिमवृष्टी झाली होती ती भरपूर. अगदी सतत ८–१० तास बर्फ पडत होतं. दोन-तीन दिवस झाले तरी ते बर्फ वितळलेलं नव्हतं. बर्फ पडताना किंवा बर्फ पडलेलं असताना, एक विशिष्ट

तऱ्हेची शांतता पसरते, तशी निरामय शांतता काबूलच्या गल्लीगल्लीतून झिरपत होती. अशा या शांत वेळी एकदम एखादा प्रचंड मोठा, महाकाय भुंगा घुमावा तसा आवाज करीत एक विमान काबूलच्या शांततेचा भंग करीत आलं. डिसेंबरच्या २४–२५ च्या मध्यरात्री दोन ते तीनच्या दरम्यान पहिलं विमान आलं. त्याचा आवाज जरासा कमी होतोय न होतोय तोपर्यंत दुसरं विमान आलं. त्याचा आवाज जरासा कमी होतोय न होतो तोच तिसरं विमान आलं. मग... चौथं आलं... मग पाचवं आलं, सहावं.... सातवं... ...

ही काही ती एक चिमणी आली, दाणा घेऊन गेली... ती गोष्ट नाही. तर प्रत्यक्षात ते तसं घडलं होतं, आणि ती विमानं रात्री २–२॥ वाजल्यापासून सकाळी साडेसात वाजेपर्यंत सतत येतच होती, आणि जात होती... झोपेचं तर वाटोळं झालंच होतं, पण त्या भयंकर घरघराटाने डोकं फिरायची वेळ आली होती. मुख्य म्हणजे हे काय चाललंय ते कळतही नव्हतं. मुख्य विमानांची प्रत्यक्ष वाहतूक सकाळी थांबली, तरीसुद्धा किती तरी वेळ तो आवाज कानात घुमतच होता.

दुसऱ्या दिवशी पुन्हा सकाळी अकरा वाजल्यापासून तीच ती विलक्षण विमान-वाहतूक सुरू झाली. ती संध्याकाळी साडेसात वाजल्यापासून मध्यरात्री पर्यंत. तिसऱ्या दिवशीसुद्धा त्याच धर्तीवर विमानवाहतूक चालूच होती. दोन रात्री, दोन दिवस, ही वेड लावणारी विमानवाहतूक चालूच होती. दर चार ते पाच मिनिटांनी विमान यायचं. कधी कधी तर आकाशात एकाच वेळी ५–६ विमानं घिरट्या घालताना दिसायची. काही तरी अघटित घडते आहे. यामध्ये बरंच काही काळंबेरं आहे ही भावना सतत मनात होती. पण एकदोघांना तसं बोलून दाखवलं तर त्यांनीच मला खुळ्यात काढलं. एक ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध तर म्हणाले, "तुम्ही लेखक लोक, तुम्हांला बऱ्या नाही नाही त्या कल्पना सुचतात." सर्वांचं एकच म्हणणं होतं की, अफगाण सरकार आपल्या पायलट्सना रशियाकडून घेतलेल्या नव्या विमानांवर सराव करायला लावते आहे.

पण हा असा डोकेफिरू सराव? ना कधी देखिले ना ऐकिले. तो सगळा प्रकारच अत्यंत मन विस्कटणारा होता. आमचा घरगडी तर म्हणाला, "कोण तिथं वर घिरट्या घालतंय कोणास ठाऊक! येऊन जाऊन काय, तर आमच्यावर बॉम्ब्स टाकायचे असतील, तर ते लौकर टाका म्हणावं. या आवाजानं आणि त्याच्या ताणानं वेड लागून मरण्या-पेक्षा बॉम्बखाली पटकन मरून गेलेलं बरं!"

ताजमहंमदचं हे म्हणणं म्हणजे संपूर्ण काबूल शहरवासियांचं प्रतीक होतं. कारण जो भेटेल तो या विमानवाहतुकीनं रडकुंडीला, चिडीला आलेला होता. "काय वाटेल ते होऊ दे, पण हे विमानांचे आवाज थांबू देत." अशा निर्णयाला प्रत्येकजण आला होता. म्हणूनच २६ ला दुपारनंतर ही अफलातून विमानवाहतूक बंद झाली, तेव्हा सर्वांनीच सुटकेचा निःश्वास टाकला होता. २५ आणि २६ डिसेंबरला बी. बी. सी. व्हॉइस

ऑफ अमेरिका जीव तोडून सांगत होते की, अफगाणिस्थानात रशियन सैन्य, शस्त्रास्त्रांचा खूप मोठा साठा घेऊन उतरत आहे. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे काबूलमधले असंख्य लोक या बातम्या ऐकत होते. पण अशा अफलातून बातम्यांवर विश्वास ठेवायला लोक कचरत होते. असं काही होत असेल यावर विश्वास ठेवायला कुणाच्या मनाची तयारीच होत नव्हती. बंडखोर काबूलवर मोठा हल्ला करणार आहेत म्हणून हेरतहून, कंदाहारहून अफगाण सैन्य, टँक्स इथं आणले जात आहेत, असंही कोणी म्हणून आपापलीच समजूत घालून घेत होतं. विमानांचा आवाज थांबल्यानंतर लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता.

मध्येच बातमी कळली की, आपले राजदूत, त्यांचे फर्स्ट सेक्रेटरी, मिलिटरी आताशे दोन दिवसांच्या सुट्टीवर जलालाबादला गेलेत. काबूलमध्ये विमानांच्या या अफलातून येरझाऱ्या सुरू असताना, आपला राजदूत सुट्टी घेऊन जातो? तेव्हाच मी गमतीनं म्हटलं होतं, "आता इथं काही तरी गडबड होणार हे सांगायला बी. बी. सी. नको की व्हॉइस ऑफ अमेरिका नको. परिस्थिती गंभीर असताना आपला राजदूत रजेवर गेलाय ना? म्हणजे नक्कीच इथं काही तरी महत्त्वाचं घडणार. आपला इतर ठिकाणचा नेहमीचा अनुभव तसाच नाही का?"

बोलाफुलाला गाठ पडावी तसं माझं भाकित तंतोतंत खरं ठरलं. २७ डिसेंबरला दुपारी साडेचार वाजता आपले राजदूत जलालाबादहून परत काबूलला आले, आणि संध्याकाळी साडेसहा वाजता....

* * *

एखाद्या देशात परकीय सैन्य घुसते म्हणजे नक्की काय? हा एक विलक्षण उत्सुकता वाटणारा आणि तेवढीच भीती वाटू लावणारा प्रश्न. यासंबंधातल्या वेगवेगळ्या उपांगांचे दर्शन घडवणारे 'ऑक्युपेशन'वरचे किती तरी चित्रपट पूर्वी पाहिलेले होते. समाजवादी राष्ट्रांनी काढलेले, तर कधी पाश्चात्य राष्ट्रांनी काढलेले. या चित्रपटांतून व्यक्त जीवनाबरोबर समाजामध्ये काय घडतं, कसं घडतं यांची चित्रणं पाहायला मिळतात. पण या सर्वच चित्रपटांतून एक साम्य आढळते, ते असे की, क्वचित एखाददुसरे उदाहरण सोडले तर या प्रकारच्या चित्रपटांतून घुसखोरी करणारे सैन्य हे जर्मन आहे. ते जर्मन सैन्य, नंतर पराभव पत्करावा लागल्यामुळे त्या त्या देशातून निघून गेलेले होते. आणि म्हणूनच ते तसे चित्रपट विशेषतः पूर्व-युरोपीय देश काढू शकले. जेव्हा जर्मन सैन्याने घुसखोरी केली होती तेव्हा ते 'ऑक्युपेशन' ठरवले गेले; आणि रशियन सैन्याने घुसखोरी केली तेव्हा त्याचे नाव 'लिबरेशन' ठेवले गेले. हंगेरी, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया या देशांनी रशियन 'लिबरेशन'वर चित्रपट काढले, रशियन 'ऑक्युपेशन'वर काढले नाहीत. कारण रशियन सैन्य त्या त्या देशांतून परत गेलेलेच नाही.

जेव्हा सरळसरळ युद्धच सुरू असतं तेव्हा जय-पराजय आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या मानापमानाचे चटके स्वीकारायची आणि त्या प्रसंगाला तोंड देण्याची लोकांची तयारी आपोआप होत असते. पण ही गोष्ट झाली जुनी. आता जग बदलते आहे; युद्धाची जात बदलते आहे; त्याबरोबर जगाचे व्यवहारही बदलत आहेत. त्यानुसार प्रत्येक घुसखोरीची पद्धत वेगळी. पण प्रत्येक वेळी वाटणारी कडेलोटाची मानहानी, दुःखं, शल्यं, तीच असतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर, समाजावर ओरखडा काढणारी.

अफगाणिस्थानातल्या गेल्या पन्नास वर्षांतल्या राजकीय महत्त्वाच्या घटनांचे वर्णन केलं तर त्याच्या अरेबिअन नाइट्सपेक्षाही सुरस, रम्य आणि चमत्कारिक कहाण्या होतील. खास मध्ययुगीन सरदारांप्रमाणे आपापसांत सड, हेवेदावे, विश्वासघात आणि प्रेमप्रकरणंसुद्धा यामध्ये आहेत. एकमेकांना दारू पाजून गाफील करणं आहे. तशीच समोरासमोरची पिस्तुलबाजीही आहे. अंधाऱ्या जिन्यावर गाठून मारणं आहे. तशीच मध्यरात्रीला दारावर पडणारी ती महाभयंकर थापही आहे. विषप्रयोगही आहेत. अशांसारख्या मध्ययुगीन घटना घडत असताना एकदम अचानकच विसाव्या शतकातली, ऑक्युपेशनसारखी महाभयंकर घटना घडली.

'ऑक्युपेशन'साठी शब्दकोशातला मराठी प्रतिशब्द आहे 'ताबा'; पण प्रत्यक्षात जे काय घडतं ते सगळं या 'ताबा' किंवा 'आक्रमण' शब्दात मावत नाही. प्रत्यक्षात जेव्हा असं आक्रमण होतं तेव्हा जे आक्रमित राष्ट्र असतं, त्यानं फक्त आपला भू भाग तेवढाच गमावलेला नसतो, तर आक्रमण करणारे राष्ट्र या आक्रमित राष्ट्राचा आत्माही कब्जात घेण्याच्या प्रयत्नात असते. म्हणूनच अपमान, द्वेष त्या राष्ट्राच्या माणसाच्या नसानसांतून झिरपू लागतात. कोणी हा अपमान गिळून टाकतात, कोणी आपला आत्माच आक्रमक राष्ट्राकडे गहाण टाकतात, तर कोणी सतत धगधगतच राहतात. पण प्रत्येक माणसावर याचा परिणाम होतो. प्रत्येकजण मुळापासून निखळून पडलेला असतो.

२७ डिसेंबर १९८० ला संध्याकाळी एके ठिकाणी ख्रिसमसच्या कॉकटेल पार्टीला जायचं होतं. संचारबंदी रात्री ११ वाजता सुरू व्हायची, तरी भारतीय वकिलातीच्या आदेशाप्रमाणे सर्वांनी ९ वाजण्याच्या अगोदरच आपापल्या घरी परतणं आवश्यक होतं. म्हणून सगळ्या मेजवान्या लवकरच आटपायच्या. 'पार्टी ऐन रंगात आली असताना साडेसात वाजता एकाएकीच बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज दणादण घुमू लागले. काय होतंय याचा कानोसा घेईपर्यंत दिवे गेले. टेलिफोन बंद पडले. कॉकटेल असल्यामुळे सगळेजण आपापल्या मुलांना घरी ठेवून आले होते. घरी मुलं एकटी घाबरतील, ही एकच भावना सर्वांच्या मनात होती. घराच्या बाहेर पडायची तर सोयच नव्हती. फायरिंग अगदी कोपऱ्यावरच चालू होतं. आकाशातून रॉकेट्स जाताना दिसत होती. टेलिफोनवर मुलांशी बोलून, "घाबरू नका, आम्ही येतोच आहोत," असं

सांगण्याचीही आशा खुंटली होती. मुकुंद आणि त्याच्यासारख्या २–४ उत्साही लोकांनी रस्त्यावर जाण्याचं धारिष्टच दाखवलं, पण त्यांना स्पर्श न करता, गोळ्या त्यांच्या आजू-बाजूने जाऊ लागल्यावर ते धावत पळत आत आले. आम्ही पन्नाससाठ मोठी माणसं एकत्र होतो तरी बावरून गेलो होतो, गोंधळून गेलो होतो. इथून घरी कसं परतायचं त्याचीच फिकीर पडली होती सगळ्यांना.

ज्यांनी आपली मुलं घरी ठेवली होती ते आईबाप तर गोळीबाराच्या धास्तीपेक्षा-सुद्धा 'मुलं घाबरतील' या विचारानेच रडकुंडीला आले होते. ज्यांनी कुणी आपली मुलं बरोबर आणली होती, ती मुलं तर कोणत्याही क्षणी भोकाड काढून रडण्याच्या बेताला आली होती. मेणबत्त्यांच्या अंधुक प्रकाशात सगळ्यांचे चेहरे भयंकर कावरे-बावरे, उत्तेजित दिसत होते. तेवढ्यात एका लहानशा मुलानं आईला विचारलं, "मम्मी, अब हम सब इकठाही मरेंगे ?"

त्या मम्मीनं आपल्या पोराला छातीशी गच्च आवळून धरलं.

ज्यांच्याकडे पार्टी होती ते स्वतः सैन्याधिकारी होते. अफगाण सैनिकांना शिक-वण्यासाठी इथे आलेले. त्यांनी आपल्या आणखी १–२ लष्करी अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन, "मी तुमचा उस्ताद आहे..." असं सांगत, कसंबसं जाऊन कोपऱ्यावरच्या अफगाण अस्करला गाठलंच. (अफगाणिस्थानात अजून तरी उस्तादला–शिक्षकांना खूपच मान मिळतो. म्हणून तर तराकी, अमीन वगैरे राजकीय नेत्यांचे जे एके काळचे उस्ताद होते ते जमीनदार, श्रीमंत घरातले असूनही त्यांना कसलाही धक्का लागला नाही.) तर तो अस्कर हातातल्या छोट्या मशिनगनने अधून मधून फायरिंग करीत होता. त्याला आमच्या यजमानांनी सांगितलं, "माझ्याकडे बरेच मेहमान आले आहेत. आम्ही सगळेच हिंदुस्थानी आहोत. (उस्तादप्रमाणेच 'मेहमान' हा अजून तरी इथला मानबिंदू आहे.) त्यांना सगळ्यांना इथून बाहेर पडून आपापल्या घरी जायचं आहे. कसं जायचं ते सांग. आणि ही काय गडबड चालू झाली आहे ?"

तो सैनिक म्हणाला, "हा गोळीबार कोणी सुरू केलाय, का, ते मला माहीत नाही. मी आपला स्वसंरक्षणासाठी अधून मधून फैरी झाडतो आहे झालं. पण तुम्ही जर डाव्या बाजूचे मुख्य रस्ते टाळून (कारण या बाजूला अर्ग महाल, रेडिओ काबूल, टी. व्ही. सेंटर, प्राइममिनिस्ट्री वगैरे महत्त्वाची ठिकाणं आहेत.) उजव्या बाजूच्या गल्लीबोळांतून बाहेर पडलात तर तुम्हाला काही होणार नाही. आणि पटकन निसटून जा. कदाचित हे प्रकरण वाढेलही." असं सांगून त्याने पुढच्या चौकातल्या आणखी दोन सैनिकांना सांगितलं की, "इथून आता भारतीयांच्या गाड्या जातील, त्यांना न आडवता पुढे जाऊ द्यात."

मग सगळ्यांनीच परतायची घाई केली. त्या घरात सगळे एकत्र होतो तेव्हा फार जाणवलं नव्हतं. पण परत येताना, संपूर्णपणानं निर्मनुष्य झालेले रस्ते, आकाशात चाललेली रॉकेट्सची आतिषबाजी, बॉम्बस्फोटांचे, फायरिंगचे भन्नाट आवाज हे सगळं

मिळून कसल्या तरी भयाची भावना निर्माण करीत होते. आणि पाहता पाहता एकदमच आमच्या डोळ्यांदेखत एक रॉकेट आले ते समोर दिसणाऱ्या काबूल रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या बैठ्या आणि पसरट इमारतींवरच झेपावले. दुसऱ्याच क्षणाला धुऽऽम्म असा खूप मोठा दमदार आवाज घुमला, आणि त्या इमारतीची एकच पिवळी ज्योत पेटल्यासारखी दिसली. पाठोपाठ इमारतीवरच कावळ्याच्या छत्रीच्या आकाराचा पांढऱ्या शुभ्र धुराचा एक प्रचंड मोठा ढग आकाशात तरंगू लागला. केवढं तरी भीषण-रम्य, सुंदर दृश्य दिसलं ते!

घरी आलो तर जयदेव फाटकाजवळच्याच, बर्फानं आच्छादलेल्या गुलाबाच्या वेलाच्या आडोशाने घराबाहेरच उभा. आम्हांला पाहून पुढं झाला.

"घाबरलास काय रे?" मी विचारलं.

"छे ग, आपला घरमालक आत केव्हा जातो याची वाट पाहात होतो. अग आई, टी. व्ही. चालता चालता एकदमच बंद पडला, तेव्हा जरा कोपऱ्यापर्यंत जाऊन पाहून यावं म्हणून निघालो, तर तो मला जाऊच देईना."

"किती वाजता बंद पडला?" आम्ही विचारलं.

"बरोबर आठ वाजून दहा मिनिटांनी."

"अरे मग, टी. व्ही. सेन्टर, रेडिओ स्टेशन उडालेलं पाहिलं आम्ही." आम्ही त्याला ताजी माहिती पुरवली.

"झालं आता. अगोदरच संध्याकाळी एवढं बोअर व्हायला होतं. त्यात आता हा टी. व्ही. पण नाही..." जयदेव कुरकुरू लागला. लढाई एवढी जोरात चालू होती, पण त्याचं त्याला काहीच वाटत नव्हतं. तो म्हणाला, "या मारामाऱ्या तर यांच्या कायमच सुरू असतात. आज फार तर जरा जास्त असतील. पण टी. व्ही. नाही म्हणजे...."

मुरादअली त्याच्या घराच्या आगाशीत फेऱ्या घालीत उभा होता. आम्हाला पाहताच पुढं आला. नेहमीप्रमाणे 'खूब अस्त? चतुर अस्त?' (नमस्कार वगैरे)चे काहीही उपचार न करता एकदमच म्हणाला, "आजचं प्रकरण जरा वेगळंच दिसतंय, बरं का? काही पत्ताच लागत नाही. आणि तुमचा मुलगा कुठं बाहेर निघालाय त्याला जाऊ देऊ नका. तुम्ही पण जाऊ नका."

मुरादअली "काही पत्ता लागत नाही" म्हणाला होता त्याचं आश्चर्यच वाटलं आम्हाला. कारण मुरादअली पूर्वी सैन्यात जनरल होता. म्हणूनच की काय कुणास ठाऊक, पण काबूलमध्ये कुठं खुट्ट वाजलं तरी पाच दहा मिनिटांत त्याला त्यासंबंधी खित्रंबातमी लागायची, की ताबडतोब तो येऊन आम्हाला सांगायचा. पण या वेळी मात्र गडबड कुणी सुरू केली, कोण कोण लोक त्याच्यात गुंतलेत ते त्यालाही कळलं नव्हतं. उलट आम्हीच त्याला सांगितलं की काबूल रेडिओ, टी. व्ही.ची बिल्डिंग जळताना आम्ही पाहिली म्हणून.

नक्की काय काय पाहिलं हे सांगितल्यावर तो म्हणाला, "बिल्डिंग जळाली नसेल, त्या बिल्डिंगच्या पाठीमागे मोकळ्या पटांगणात शस्त्रास्त्रांचा प्रचंड मोठा साठा होता, तोच एकदम उडाला असेल. म्हणून असा धुऽऽऽम्म आवाज आणि कावळ्याच्या छत्रीच्या आकाराचा पांढरा ढग दिसला तुम्हाला."

घरात येऊन आम्ही तिघं आपापसांतच चर्चा करू लागलो. खरं म्हणजे तेच तेच परत परत बोलत होतो. नवीन कळायला काहीच मार्ग नव्हता. पहिले बार ऐकल्यानंतर वाढतच जाणारं टेन्शन आता मनात ठाण मांडून बसलं होतं. कसली तरी चमत्कारिक उत्कंठा वाटत होती. कशाबद्दल हे भांडण, कुणामध्ये, म्हणजे बंडखोर आणि सरकार, की लष्करामधल्याच दोन घटकांमध्ये—काहीच कळलं नव्हतं. तेवढं जरी कळलं असतं तरी एवढं अस्वस्थ वाटलं नसतं. कशासाठी भीती वाटते, कुणाची भीती वाटते हे नक्की कळलं की भीतिसुद्धा कमी होते. मुरादअलीकडून नक्कीच काय ते कळेल याची खात्रीच वाटत होती. पण त्यालाही काही माहीत नाही म्हटल्यावर या वेळचं प्रकरण काही तरी वेगळंच आहे याची जाणीव झाली. भीतीच्याही पलीकडची अशी काही तरी मनःस्थिती झाली होती. ज्याची भीती वाटायची तेच अनोळखी स्वरूपात समोर येऊन ठेपलं होतं. अशा वेळी मन आणि शरीर दोन्ही, कसलीही परिस्थिती आली तरी त्याला तोंड द्यायची तयारी करू लागते. म्हणजे, बारीकसारीक आवाज झटकन टिपला जातो, तो आवाज कसला त्याची नोंदही तेवढ्याच झटकन होते. बुद्धी तल्लख होते. पटापट विचार करू लागते. प्रत्येक बारीकसारीक हालचालही वेगानं होऊ लागते.

आता तर करण्यासारखं काहीच नव्हतं. मनात फक्त विचारचक्रं सुरू होती. किती माणसं मारली जात होती कुणास ठाऊक! त्यामध्ये आपल्या ओळखीच्यापैकी कुणी असेल का? आत्तापर्यंत डोंगरदऱ्यांतून सुरू असलेली, अफगाण सैन्य आणि मुजाहिद, हेजबे इस्लामी यांच्यामधली लढाई आता काबूल शहरातच सुरू झाली असेल का? या लढाईचा शेवट काय होणार आहे?— या लढाईचा आपल्याला किती त्रास होणार आहे? सुखरूपपणे मायदेशी परत जाता येईल ना? आपल्या माणसांच्या गाठीभेटी पुन्हा होतील ना? अशा विचारांचं थैमान मनात माजलं होतं.

'काय होईल ते उद्या कळेलच.' असा विचार करून आम्ही चक्क पडून राहिलो; पण झोप लागेना. जेट फायटर्सचा घरघराट, बॉम्बिंगही थांबलं होतं. फायरिंग मात्र चालूच होतं. आम्ही तिघंही मधूनमधून उगाचच खिडक्यांचे पडदे बाजूला सारून बाहेर पाहात होतो. बाहेर काळामिट्ट काळोख होता. त्या काळोखात रस्त्यावरचं, झाडांवरचं, पहाडांवरचं बर्फ मंदपणानं चमचमत होतं. ट्रान्झिस्टरची बटणं फिरवून फिरवून कंटाळलो. आमच्या इथं, त्या दोन दिवस दोन रात्रींच्या विमानांच्या असह्य घरघराटानंतर आज काय काय भयंकर घडत होतं, आणि जगाला त्याची खबरच नव्हती. त्यांची आपली गाणी बजावणी चालूच होती!

शेवटी मुकुंदानं चक्क शॅम्पेनची बाटली उघडली, ३१ डिसेंबरच्या नववर्षाच्या

पार्टीसाठी आणून ठेवली होती ती. म्हणाला, "आपण आजच आपलं नववर्ष साजरं करूया; खरोखरच्या नव्या वर्षाचं कुणी पाहिलंय ?"

जयदेव म्हणाला, "तुम्हा मोठ्या माणसांची मजा असते बुवा."

मग मुकुंदाने त्यालाही थोडीशी शॅम्पेन दिली. पहिल्या घोटालाच मिटक्या मारीत म्हणाला, "मंजू, सौमित्रला ( माझी मोठी मुलगी आणि धाकटा मुलगा ) आता कल्पनाही नसेल की तुम्ही मला चक्क शॅम्पेन प्यायला दिली आहेत म्हणून. इथं जे काय काय चाललंय त्याचीही कल्पना नसेल म्हणा त्यांना. आपापल्या हॉस्टेलवर झोपले असतील बिचारे. आता परत गेलो की शॅम्पेन प्यायलो म्हणून खूप चिडवीन त्यांना, भाव खाईन. अर्थात इथून परत गेलो तरच, म्हणा."

डोक्यावरचा ताण कमी करण्यासाठी पुन्हा ट्रान्झिस्टरची बटणं पिरगळायला सुरुवात केली. आणि एकदमच काबूल रेडिओनं बातमी दिली, ( त्या वेळचं ध्वनिक्षेपण कुठून तरी रशियातून झालं होतं म्हणे. ) "दुष्मनाने खल्क, साम्राज्यवादी अमेरिकेचा हस्तक हाफिजुल्ला अमीन याचा सफाया करून लोकांचा लाडका, खरा तारणहार बबरक कारमल आता रईस-ए-जमुरियत अध्यक्ष झाला आहे !"

बाप रे !

या बातमीचं विलक्षणच आश्चर्य वाटलं. याच बबरकला, तराकी अमीन, दोघांनी मिळून साम्राज्यवादी अमेरिकेचा हस्तक ठरवून बदनाम केलं होतं ! चेकोस्लोव्हाकियाला राजदूत म्हणून गेलेला बबरक तिथंच भूमिगत झाला होता. तो इथं आला कधी ? त्यानं अमीनला मारलं कधी ?

याचा अर्थ एका गटाचे खल्क पक्षाचे कम्युनिस्ट जाऊन आता दुसऱ्या गटाच्या कम्युनिस्टांचं– परचम पक्षाचं राज्य सुरू झालं म्हणायचं !

पण ज्या विमानांच्या घरघराटानं दोन सबंध दिवस, रात्र सगळं काबूल शहर बेचैन झालं होतं, त्याच विमानातून आलेले रशियन सैनिक, रशियन शस्त्रास्त्रं, रशियन रणगाडे सकाळी उठल्यावर रस्त्यारस्त्यावरून दिसणार आहेत याची त्या रात्री कुणालाही स्वप्नातसुद्धा कल्पना नव्हती. अर्थात त्या लढाईच्या वर्तुळात सापडलेल्या लोकांव्यतिरिक्त. एवढंच काय पण संध्याकाळी जे रणगाडे गावातून हिंडत होते, त्यांमध्येसुद्धा रशियन सैनिकच होते हेसुद्धा कुणाच्या लक्षात आलं नव्हतं. कारण एक तर उजेड भरपूर नव्हता, टँकमधल्या सैनिकाची लोखंडी टोपीच फक्त दिसते, आणि मुख्य म्हणजे त्या वेळेस इथे आलेले रशियन सैनिक हे युरोपिअन रशियातले नव्हते. ते होते आशियाई, मुस्लिम रशियामधले.

दुसरा दिवस शुक्रवार. सुट्टीचा दिवस. सकाळपासून काबूल रेडिओवर आलटून-पालटून पश्तू आणि फारसीमध्ये, 'अमेरिकेचा हस्तक', 'दुष्मनाने खल्क', 'साम्राज्यवादी' अमीन आणि त्याची जुलमी हुकूमत यावर ताशेरे झाडायला आणि खरोखरच्या लोकशाहीवादी सोशॅलिस्ट बबरकचे कोडकौतुक, गुणवर्णन चालू झाले होते. सकाळी ९

वाजता नेहमीप्रमाणेच टी. व्ही.सुद्धा सुरू झाला! पण फक्त दहा मिनिटंच. तरी पण सुरू झाला; आणि सुरुवातीलाच प्रथम, ज्या तराकीला 'अमेरिकेचा हस्तक' ठरवून, अमीनने मारुन सत्ता बळकावली होती, त्या नूर महंमद तराकीचा फोटो झळकला! तराकी आता नव्या लोकशाही समाजवादी अफगाणिस्थानचा राष्ट्रपिता झाला आहे! आश्चर्याचे धक्के बसायला सुरुवात झालीच होती. कारण तराकी हा अमीनच्या गटाचा, बबरकशी असलेले त्याचे शत्रुत्व जगजाहीर झाले होते, असं असताना तराकीच्या मृत्यूनंतर, अमीनला मारल्यानंतर, बबरकला एकदम तराकीचं एवढं प्रेम कसं काय आलं होतं? आणि का? प्रत्येक राष्ट्राला असा कोणी तरी राष्ट्रपिता लागतोच म्हणून?

पुन्हा एकदा सकाळी साडेसात वाजल्यापासून आपल्या आवाजानं आसमंत दणाणून टाकणाऱ्या फायटर्सची बेफाम वाहतूक सुरू झाली होती. मशिनगन्स बसवलेली हेलिकॉप्टर्स तर झाडांच्या शेंड्याला चिकटतील इतक्या खालून जात होती. आज प्रत्यक्ष बॉम्बिंग किंवा फायरिंग काबूलमध्ये होत नव्हतं. या भयंकर आवाजानेच लोकांच्या मनात दहशत निर्माण करण्याचं, मानसशास्त्रदृष्ट्या प्रभावी तंत्र या लोकांनी चांगलंच आत्मसात केलेलं दिसत होतं.

सकाळी सकाळीच मुरादअली थ्रीपीस सूट वगैरे घालून आला. "तबरीक! तबरीक!" करून आम्हालाच अभिनंदन वगैरे म्हणू लागला. त्यानं 'तबरीक' म्हटल्यावर मग आम्हीही त्याचं अभिनंदन केलं. पण अगोदर, आपणहून नाही. कारण या नव्या घटनेचा त्याच्यावर काय परिणाम झालाय कुणास ठाऊक! पण स्वारी आज खुषीत होती. क्रूरकर्मा अमीन मारला जाऊन, मवाळ असलेला बबरक सत्तेवर आला म्हणून. मुरादअलीचा एक लष्करी जनरल भाऊ अमीन–तराकीच्या जमान्यात सरकारने मारला होता. दुसरा भाऊ नाहीसा झाला होता. अफगाण परराष्ट्र खात्यामध्ये उच्चाधिकारावर असलेल्या एकाची मुलगी ती मुरादअलीची धाकटी सून, म्हणूनच स्वतः मुरादअली, त्याचा मुलगा ओमर हे अजूनपर्यंत तरी सुखरूप होते.

"आता आमच्या देशाच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळेल. कारण बबरक हा जहाल कम्युनिस्ट नाही. तो सगळ्यांशी जुळवून घेईल. आमच्या देशात आता अमन (शांतता) आणील." अशी आशा मुरादअली बोलून दाखवीत होता.

आमच्याकडून मुरादअली निघाला तो रस्ता ओलांडून समोरच्याच घरात गेला. तिथं बबरकचा बाप राहतो. मुरादअली त्याच्याकडे जातो की नाही हे आम्ही पाहातच होतो. त्या समोरच्या घरातल्या माणसांना तर आम्ही रोजच पाहात होतो. त्या घरातला एक म्हातारा (तोच बबरकचा बाप असं आजच मुरादअलीकडून कळलं होतं. तोही जाहीरशहाच्या आर्मीमध्ये जनरल होता. मुरादअली आणि तो दोघेही गेली ४०-५० वर्षे मित्र होते.) रोज सकाळी आपल्या छोट्या नातवंडाला कडेवर घेऊन जायचा. दहा मिनिटांनी परत यायचा तेव्हा ते मूल चॉकलेट चघळत यायचं. त्या घरातल्या बायका क्वचितच दिसायच्या. पण दिसायच्या तेव्हा त्या बुरखा वापरत नाहीत ही गोष्ट लक्षात

आली होती. शिवाय खूप फॅशनेबल, सुरेख आहेत हेसुद्धा लक्षात आलं होतं. बबरकचा १५–१६ वर्षांचा एक धाकटा भाऊ ( किंवा पुतण्या ) तंग जीन्स घालून सतत भटकत असायचा. माझी मुलं ' हाय कौबॉय ' म्हणून त्याला चिडवायची. पण त्याला त्याचंच फार कौतुक वाटायचं. आज त्या घरातून काहीही हालचाल ऐकू येत नव्हती. ते घर आज शांत होतं.

जयदेवनं घराची दुसरी चावी घेतली आणि सायकल घेऊन तो पसार झाला. घराची दारं, खिडक्या बंद करून, कपडे करून निघेपर्यंत १५–२० मिनिटं गेली. आम्ही निघालोच होतो, तेवढ्यात जयदेव धापा टाकीतच परत आला. चांगलाच हादरून गेलेला दिसत होता तो. " बाप रे बाप! अरे बाबा, गावात रशियन सैन्य घुसलंय, दहा दहा फुटांवर त्यांचे सैनिक उभे आहेत. चौकाचौकांत, रस्त्याच्या मध्ये टँक्स उभे आहेत. ठिकठिकाणी खड्डे खणून त्यांत मोठाल्या मशिनगन्स ठेवल्यात. रशियानं अफगाणिस्थान चक्क जिंकून घेतलाय. फार भयंकर आहे ते... फारच भयंकर... "

रशियन सैन्य काबूलच्या रस्त्यावर? काय अर्थ लावायचा त्याचा? पण मग अफगाण सैन्य कुठे आहे? अमीनला नाहीसा करून बबरक सत्तेवर आला त्याचा अर्थ काय?

कल्पनाशक्तीच्या पलीकडच्या गोष्टी घडत होत्या. अशी काही गडबड झाली की, आमच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आम्ही हातातल्या पर्समध्ये, पिशवीमध्ये ( वर ब्रेड, त्याखाली कॅमेरा ) मोठाल्या कोटांच्या खिशात कॅमेरे लपवून बाहेर पडलो. गाडीनं, टॅक्सीनं, पायी, जसं जमेल तसं, जिथं जिथं जाऊ देत होते तिथं तिथं जाऊन, भटक भटक भटकलो. जयदेव म्हणाला होता ते अक्षरशः खरं होतं. जिकडे पाहावं तिकडे पोझिशन घेऊन उभे असलेले रशियन सैनिक, लहानमोठे रणगाडे उभे होते. लष्करी जीप्समधून, लांबोळ्या, काळ्याकुळकुळीत गाड्यांमधून रशियन लष्करी अधिकारी हिचकॉकच्या चित्रपटातल्या एखाद्या गुप्त हेरासारखे ओव्हरकोट, कपाळावर ओढलेल्या फेल्ट हॅट्स, काळे गॉगल्स घातलेले रशियन अधिकारी ( अशा तऱ्हेचं काम करणाऱ्यांचा हा जगभरचा युनिफॉर्म वगैरे आहे की काय? ) शहरातून चकरा मारताना दिसत होते. त्यांच्या गाड्यांचे ड्रायव्हर्सही रशियन लष्कराचेच लोक होते. दंडाला पांढऱ्या कापडाच्या पट्ट्या बांधलेले, बबरकच्या परचम पार्टीचे कार्यकर्ते छोट्या गाड्यांतून हिंडत होते, चौकाचौकांत उभे होते. पण त्यांच्या हातात शस्त्रं नव्हती. आणि काल संध्याकाळपर्यंत ठिकठिकाणी उभे असणारे, बंदूकधारी अफगाण सैनिक आज गायब झाले होते. फक्त अफगाण वाहतूक पोलिस तेवढे हातातलं स्टॉप....गो...चं फळकूट नाचवीत उभे होते.

कालच्या रात्रीच्या लढाईच्या खुणा ठिकठिकाणी दिसत होत्या. मुख्य पोस्ट ऑफिसची इमारत, टेलिफोन एक्स्चेंज, इंजिनिअर मिनिस्ट्री, रेडिओ, टी. व्ही. वगैरे किती तरी बिल्डिंग्जवर बॉम्ब पडून पडझड झालेली दिसत होती. काही ठिकाणचे रस्ते

उखडलेले होते. काबूलच्या महत्त्वाच्या सुंदर रस्त्यांवर खड्डे खणून त्यांत तोफा ठेवलेल्या होत्या.

घरातलं कोणी माणूस मेल्यावर त्या घरातलं वातावरण असतं तसं वातावरण काबूल शहराचं झालं होतं. मरणकळा आलेलं, घाबरलेलं, सुन्न झालेलं. रस्त्यावर लोक खूप होते. पण सगळे गरीब, कनिष्ठ, मध्यमवर्गीयच होते. श्रीमंत वर्गातला एखाद-दुसराच कोणी बाहेर पडला होता. एखादी जत्रा भरल्यासारखे शेकड्यांनी लोक–अगदी बुरखा घेतलेल्या बायका, तान्ह्यामुलांना घेऊन रस्त्यावर आलेल्या होत्या. मुलं रडत नव्हती की पक्षांचेही आवाज येत नव्हते. कोणीही कुणाशी बोलत नव्हतं. एक तऱ्हेची गूढ शांतता पसरली होती.

मुकुंदाने फोटो काढण्याचा किती तरी वेळा प्रयत्न केला. कॅमेरा लपवून फिल्म घ्यायचा प्रयत्न केला. पण काहीच जमेना. फोटो किंवा फिल्म घेताना कुणी रशियन अधिकाऱ्यानं पाहिलं तर त्याचा परिणाम चांगला होणार नाही याची खात्रीच होती. म्हणून जीव जरा धाकधुक करीत होताच. त्यातूनच काही तरी भानगड झाली तर वकिलात आम्हाला फैलावर घेणार याचीही खात्रीच होती. मुकुंदा इथे सरकारी अधिकारी म्हणून आलेला, या नसत्या उठाठेवी तुम्हाला कोणी सांगितल्या होत्या करायला म्हणून आपल्या वकिलातीने आग पाखडली असती. पण फोटो किंवा फिल्म काही तरी घ्यायची फार इच्छा होती. म्हणून शेवटी त्यातल्या त्यात मवाळ चेहरा दिसणाऱ्या एका रशियन सैनिकालाच, अगोदर इंग्रजीत, मग फारसीत, मग हातवारे करून, फोटो काढू का ? म्हणून विचारलं. आम्ही भारतीय आहोत एवढंच त्याला कळलं. त्याचा मवाळ चेहरा किंचितसा रुंदावला. गंमत वाटल्यासारखं हसू आलं त्याला. आमच्या भोवती अफगाण पोराटोरांची आणि रशियन सैनिकांची छोटीशी गर्दीच जमली. आमचं हातवारे करून, कॅमेरा दाखवून खुणा करून विचारणं सुरूच होतं. बरीच गडबड माजली, पण उत्तर हवं ते मिळत नव्हतं. तेवढ्यात वाहतूक पोलिसाकडे लक्ष गेलं. आमचा गोंधळ बघून तोच पुढं आला. त्याला पुन्हा तेच विचारलं. तेव्हा तो रागारागानं म्हणाला, “ जा....जा...निघून जा...फोटो कसले काढता ? हा काय फोटो काढण्यासारखा प्रसंग आहे का ? जा तुम्ही...” त्याच्या त्या ‘जा’ म्हणण्यात, रागाबरोबरच, विषाद, अपमान, स्वतःच्या असाहाय्यतेचा संताप, या सगळ्या भावना होत्या. मला आठवलं, दाऊदला मारलं होतं तेव्हा आम्हाला फोटो काढायला आनंदानं परवानगीच तेवढी दिली नव्हती, तर उत्तेजनही दिलं होतं. सैनिक पोज घेऊन उभे राहात होते.

काबूल शहराच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या कर्तिपरवान या भागात जायला टॅक्सी केली. तो भाग काबूल शहर आणि करघा लष्करी कॅम्प यांच्यामध्ये येतो. म्हणूनच अतिशय महत्त्वाचा. तिथं असलेलं काबूल इंटर कॉन्टिनेन्टल हे हॉटेल एका छोट्याशा टेकडीवर आहे. तिथून सगळं काबूल शहर दिसतं. म्हणून तिथे जायला निघालो. तर

टॅक्सीवाला म्हणाला, " तिथं कशाला जाता ? चांगला नाही तो भाग. खूप रणगाडे आहेत तिथं."

तेव्हा मुकुंदा म्हणाला, " वा ! तेच तर बघायला जात आहोत आम्ही. तुम्ही बहादूर अफगाण लोकांनी एवढी लढाई केलीत काल, तीच तर पाहायची आहे आम्हाला."

" कसलं आलंय बहादूर अफगाणिस्थान ! आज आमचं अफगाणिस्थान संपलं. इमरोज अफगाणिस्थान मुर्दा शुद... मेलं. आजपासून हे शोहरवीस्थान–रशियस्थान झालंय. पण बघा तुम्ही," रस्त्यावरच्या, टॅंक्समध्ये बसलेल्या, रशियन शिपायांकडे हात दाखवत तो म्हणाला, " यांतल्या एकेकाला ठेचून मारू आम्ही. आज नाही उद्या आम्ही यांना आमच्या देशातून हाकलून देऊ. एक वर्ष... दोन वर्षं...पंचवीस वर्षं लागली तरी हरकत नाही; पण एकही रशियन माणूस आम्ही इथे राहू देणार नाही." टॅक्सीवाल्याचा तो आवेश पाहण्यासारखा होता.

कर्तिपखान या भागात तर असंख्य रणगाडे आणि रशियन सैनिक होते. पण या भागातलं वातावरण बरंच मोकळं वाटलं. गळ्यात अडकवलेल्या पाटावर सिगरेट्स विकणाऱ्या अफगाण पोरांकडून रशियन सैनिक हे अमेरिकन सिगरेट्स, च्युइंग गम विकत घेत होते. जेमतेम मिसरूड फुटलेले हे सैनिक अतिशय उत्सुकतेनं सगळीकडे बघत होते, पण हातातल्या मशिनगनवरची पकड ढिली होत नव्हती.

मध्येच कासम भेटला. हा तर परचम पार्टीचा कार्यकर्ता. एरवी तावातावाने वादविवाद करणारा आज मात्र पराकोटीचा गोंधळलेला, बावरलेला दिसत होता. त्याच्याच पक्षाचा बबरक सत्ताधीश झाला म्हणून तब्रीक... तबरीक.... म्हणून त्याचं अभिनंदन केलं. पण त्यावर काहीच न बोलता, किती तरी वेळ फक्त मान हालवीत राहिला. मग म्हणाला, " हे काही ठीक झालं नाही. हे आम्हालाही पसंत नाही. याचे परिणाम चांगले होणार नाहीत. बरं झालं नाही हे."

दिवसभर हिंडून हिंडून, विलक्षण थकून संध्याकाळी घरी परतलो. डोक्यात विचारांचं काहूर माजलं होतं. रस्त्यावरची ती मुकी गर्दी, जा...जा.... म्हणून फोटो काढू न देणारा वाहतूक पोलीस, पक्षकार्यकर्ता कासम, टॅक्सी-ड्रायव्हर, बब्रकचा म्हातारा बाप, कुणाचेच चेहरे डोळ्यांसमोरून जात नव्हते. प्रत्येकाच्या नजरेतला अपमान, विषाद पुन्हा पुन्हा आठवत होता. असं वाटलं, आज एका देशाचा मृत्यू पाहिला आपण. अफगाण लोकांबद्दल सहानुभूती वाटू लागली. पुन्हा पुन्हा पडणारा प्रश्न पुन्हा एकदा मला अस्वस्थ करू लागला.

हे असं का झालं ? हे असंच व्हायचं हे ठरलेलं असतं का ?

मनात आलं, या छोट्याशा, गरीब देशात कम्युनिझम आणून, हाताशी आलेली एक मोलाची संधी या लोकांनी, मार्क्सवादाच्याच रुळलेल्या मार्गाने जाऊन, मातीमोलानं फुकट घालवली. पण हे असेच व्हायचे होते. समाजवाद असा ' आयात '

केला, ठरलेल्याच, घातक समाजवादी मार्गाने वाटचाल केली की हे असंच व्हायचं. प्रत्येक छोटा, गरीब, विकसनशील देश आपल्या इतिहासाला साक्ष ठेवून, स्वतःच्या मातीला प्रामाणिक राहून मार्क्सवाद नव्या पद्धतीनं का नाही राबवून घेत ? त्याऐवजी स्वतःच मार्क्सवादाची गुलामगिरी का पत्करतो ? जगातली पहिली मार्क्सवादी सत्ता स्थापन झाल्यानंतरच्या गेल्या पन्नास वर्षांत जगात केवढा फरक पडला आहे. प्रत्येक देशाचे प्रश्न, माणसं, वृत्ती वेगळी, त्यानुसार मार्क्सवादाचा विचार व्हायला नको का ? ज्या समाजासाठी समाजवाद आणायचा, त्या समाजामध्ये त्याची जाणीव, त्याची हाव निर्माण करायला नको का ? कुणा एका व्यक्तीच्या किंवा पक्षाच्या इच्छेमुळं समाजवाद आणता येईल का ?

तसा आणता येणार नाही. हट्टानं आणला तरी तो समाजाला नकोसा होईल. तो समाजामध्ये मुरणार नाही. तो अयशस्वी होईल. त्याला यशस्वी करण्यासाठी समाजाला त्या दृष्टीनं तयार करणं, समाजाची तयारी होईपर्यंत वाट पाहणं हे सर्वांत जास्त महत्त्वाचं नाही का ?

इथे काहीही घडलं नाही. हट्टानं, लष्करी साहाय्यानं समाजवाद ‘ आयात ’ केला गेला. म्हणूनच आज हे रशियन सैनिक जिकडे तिकडे दिसत होते. ‘ नियती ’ मुळीसुद्धा न मानणाऱ्या मार्क्सवादाची नियती ही अशी ठरलेलीच असते की काय ? आणि त्याबरोबर एखाद्या छोट्याशा देशाचा हा असा मृत्यूसुद्धा ठरलेलाच असतो का ? अटळ असतो का ?

## हे असे घडले होते

रशियन्स आल्याचा तणाव अजूनही मुळीच कमी झाला नव्हता. तरीही सरकारी एलानप्रमाणे आणि एम्बसीच्या आदेशाप्रमाणे दुसऱ्या दिवशी सगळी दुकानं उघडली होती, ऑफिसला जाणं आवश्यक होतं.

सकाळी-सकाळीच धाड धाड आवाज करीत एक रणगाडा आमच्या गल्लीत शिरला. तो गल्लीत येताक्षणीच आठ दहा बंगले असलेल्या त्या आमच्या छोट्याशा गल्लीला जणू विजेचा शॉक बसला. टॅंकचा आवाज ऐकताच एकेकजण हळूच अंदाज घेत घेत, आपापल्या घराच्या आगाशीत येऊन उभा राहिला. बाहेर रस्त्यावर येण्याची कुणाचीही हिंमत झाली नाही. एरवी शांत असलेली ती गल्ली आता आणखीनच स्तब्ध झाली. गळक्या नळातून पाण्याचे थेंब टिप टिप करीत पडावेत तसा एकएक क्षण मोठ्या मुष्किलीने संथपणे पुढे सरकला होता. इथं आता काही तरी होणार होतं. त्याची वाट पहात होतो आम्ही सगळे.

टॅंकच्या पाठोपाठ चारपाच लष्करी जीप्सही आल्या. टॅंक तर आमच्या घराच्या फाटकापलीकडेच उभा राहिला. पाठोपाठ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जीप्स उभ्या राहिल्या.

त्यातून भराभरा रशियन सैनिक उतरले आणि 'पोझिशन्स' घेऊन उभे राहिले. गल्लीच्या दोन्ही बाजूंना खड्डे खणून त्यांत मोठ्या मशिनगन्स ठेवल्या गेल्या. आणि बबरकच्या वडिलांच्या घरावर रशियन सैनिकांचा पहारा सुरू झाला. त्यांच्या घरासमोरच महंमद रफीची (संरक्षणमंत्री) सासुरवाडी होती. त्या घराच्या फाटकाशीच रशियन सैनिक उभे राहून त्या घराचं रक्षण करू लागले. एका लष्करी जीपमधून उतरलेले रशियन आणि अफगाण अधिकारी बबरकच्या वडिलांच्या घरी गेले. जवळजवळ तासभर ते त्या घरात होते. तेवढ्या वेळात गल्लीतलं वातावरणही पुष्कळ निवळलं होतं. इथं काही मारामारी होत नाही, असं दिसून आलं होतं. आगाशीत उभे असलेले लोक आता आपापल्या फाटकाशी येऊन उभे होते. पण अजून रस्त्यावर फक्त सैनिकच होते. या वेळीही फोटो, फिल्म काढायचा खूप प्रयत्न केला. झुडपाआड उभं राहून, फाटकाआड उभं राहून आयुष्यात क्वचितच कधी 'असा' फोटोजिनिक प्रसंग येतो. ही संधी हातची जाऊ नये असा अट्टाहास होता. पण कशाच्या आडून फोटो किंवा फिल्म घेतली असती तर त्यात रणगाड्याचे टायर्सच फक्त येते होते. जरा बाजूला उभं राहून घेतली असती तर टॅंकवर उभे राहून सगळीकडे नजर फिरवणाऱ्या रशियन सैनिकांना आम्ही नक्कीच दिसत होतो. आपल्या हातातला कॅमेरा पाहून त्यांनी काय केलं असतं? उगाच नसता धोका पत्करायलाच नको, म्हणून शेवटी फोटोंचा नाद सोडून दिला. त्याचं अजूनही वाईट वाटतं आहे.

ताසाभराने समशेरखानच्या घरातले ते 'पाहुणे' निघून गेले. त्यानंतर मग टॅंकही गेला. खड्ड्यातल्या मशिनगन्ससुद्धा उचलून नेल्या. फक्त दहा-बारा सैनिक मात्र अखंड पहारा देत राहिले. बबरकच्या वडिलांनीच त्यांना निघून जायला सांगितलं होतं, असं नंतर मुरादअलीनं आम्हाला सांगितलं. "आमच्या देशात आमच्याच रक्षणासाठी रशियन सैन्य! केवढी शरमेची गोष्ट ही!" असं म्हणताना, सत्तरीच्या मुरादअलीच्या डोळ्यांत पाणी तरळलं. म्हणाला, "आता हे आमचं नालायक सरकार आम्हाला सांगतंय की, आम्हीच रशियाकडून साम्राज्यवाद्यांशी लढण्यासाठी मदत मागितली होती! हीच, अशीच मदत मागितली होती काय?"

कम्युनिस्ट गटाचे देश सोडून, इतर सगळ्या जगाने या रशियन आक्रमणाची निंदा केली. भारताने प्रथमच, अगदी ताबडतोब आपले मत दिले नाही. जर भारतानेही रशियन आक्रमणाची निंदा केली तर अफगाण सरकारचा रोष ओढवणार, आणि जर पाठिंबा दिला तर संपूर्ण अफगाण जनता भारताविरुद्ध जाणार. मुख्य म्हणजे खुद्द भारताची स्थितीसुद्धा 'कशात काय अन् फाटक्यात पाय' अशी आहे. पण भारताची प्रतिक्रिया काय होते आहे याची लोक अतिशय उत्सुकतेने वाट पाहात होते!

खुद्द भारतीय दूतावासात वातावरण जरा तापलेलंच होतं. लाख सव्वालाख रशियन सैन्य, शस्त्रास्त्रांचा प्रचंड मोठा साठा घेऊन इथं तीन दिवस येत होतं आणि त्याचा मुळीसुद्धा सुगावा लागू नये? कसली शंकाही कोणाच्या मनात येऊ नये?

याबद्दलची जबाबदारी एकमेकांच्या अंगावर ढकलण्यात सगळे उच्चाधिकारी गुंतलेले होते! दोन दिवस दोन रात्री वेड लागेल अशी विमान वाहतूक चालू होती, तेवढे दिवस काबूल विमानतळ कसलंही कारण न देता बंद होता, (भारतातून आठवड्यातून दोनदा पत्रं यायची म्हणून सगळ्याच भारतीयांचं लक्ष या विमान वाहतुकीवर सतत केन्द्रित असतं.) बी. बी. सी., व्हॉइस ऑफ अमेरिका त्या विमान वाहतुकीसंबंधी धोक्याचे इशारे देत होते, अफगाण–रशिया सीमेवरच्या हालचालींच्या बातम्या देत होते. तरी आपल्या भारतीय दूतावासाला कसली शंकाही आली नाही! एवढंच नव्हे तर सगळं काही ठीक असल्यासारखे आपले राजदूत, फर्स्ट सेक्रेटरी जलालाबादला सुट्टीवर गेले होते! जरी बी. बी. सी., व्हॉइस ऑफ अमेरिका बातम्या भडक करून देते तरी तिकडे अगदीच दुर्लक्ष करायचं का? मग सामान्य माणूस आणि वकिलातीचे अधिकारी यांच्यामध्ये फरक काय राहिला? आणि शिवाय आपले तेथील मिलिटरी अॅटॅची, एअरफोर्स अॅटॅची करीत काय होते? त्यांना साधी शंकासुद्धा येऊ नये? अर्थात हे खरंच की, अगोदर सुगावा लागला असता तरी आपण त्यासंबंधी काय करणार होतो? काहीही नाही. तरी पण आपल्या बुद्धिदारिद्र्याची, तत्परतेच्या अभावाची चीड येते, तशीच कीवही आली.

मुकुंदाच्या ऑफिसातल्या कित्येकांना आणि त्याच्याबरोबरीच्या सगळ्या अधिकाऱ्यांना रातोरात पकडून नेलं होतं. एका अफगाण अधिकाऱ्याची रशियन बायको रडत भेकत ऑफिसमध्ये चौकशीला आली होती, की माझा नवरा कुठे आहे? तेव्हा लोकांनी उत्तर दिलं, " इतके दिवस तुम्ही इतरांना तुरुंगात टाकीत होता, मारत होता. आता तुमची पाळी आली आहे. तू तर रशियन आहेस. रडतेस काय अशी? तू चालती हो तुमच्या देशात. कशाला आलीस इथं? "

स्वतःच्या असाहाय्यपणाने सगळेच संतापून गेले होते. संध्याकाळी गाडी ठेवायला ड्रायव्हर आला, त्याच्याशी बोलायला लागले तर एरवी उत्साहानं इकडच्या तिकडच्या गप्पा मारणारा, गावातल्या अफवा रंगवून सांगणारा, मेहराब त्या दिवशी मात्र म्हणाला, " आज माझ्याशी काही बोलू नका; नाही तर मला रडू येईल."

दोन-चार दिवस गेल्यानंतर रस्त्यावरचे रशियन सैनिक नाहीसे झाले. दिवसा रस्त्यावरच्या रणगाड्यांची संख्याही कमी झाली. त्याऐवजी पुन्हा आता अफगाण सैनिक दिसू लागले. हळूहळू ' त्या ' दिवशी अर्ग महालामध्ये, इतरत्र काय काय झालं त्याच्या हकीगती कळू लागल्या. अर्थातच सरकारचं म्हणणं आणि लोकांचं म्हणणं यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता. सरकारचं म्हणणं असं होतं की, अमीन सुरुवातीपासूनच साम्राज्यवादी होता. तराकीचा काटा काढल्यानंतर त्याने अमेरिकेशी संधान बांधले, अमेरिकेचा चार्ज द अफेअर्सलाही तो भेटला होता म्हणे. आणि पाकिस्तानशीही त्याने संधान बांधले होते. पाकिस्तानचा परराष्ट्रमंत्री आगाशाही काबूलला येणार होता तो तेवढ्याचसाठी, आगाशाही काबूलला आल्यानंतर एक दिवस टी. व्ही. रेडिओवर

कार्यक्रम सुरू असतानाच अमीन मोठ्या नाट्यमय पद्धतीनं एकदमच आपला समाजवादाचा बुरखा काढून फेकून देणार होता. आणि आपण अमेरिकेचे दोस्त असल्याचे जाहीर करणार होता. ही बातमी अगोदरच कळल्यामुळे, सैन्यातल्या काही प्रामाणिक अधिकाऱ्यांनी अमीनला धमकी दिली होती की, "शहावली इथं येता उपयोगाचा नाही. नाही तर आम्ही त्याचं विमान खाली पाडू, त्याला मारू, तुलाही मारू."

म्हणून शहावलीचं इथं येणं तीनदा लांबणीवर पडलं होतं. आणि शेवटी साम्राज्यवाद्यांच्या कब्जात अफगाणिस्थान जाऊ नये म्हणून रशियाकडून मदत मागविली गेली. म्हणूनच रशियाने आपले सैन्य, शस्त्रास्त्रं पाठवली. इंपीरिॲलिस्ट, अमेरिकेचा एजंट, देशद्रोही अमीनचा खटला रेव्होल्यूशनरी कौन्सिलसमोर चालला होता. कौन्सिलने त्याला देशद्रोहाबद्दल देहान्ताची शिक्षा दिली होती; म्हणून त्याला गोळ्या घालून ठार करण्यात आले.

इतरांचं, म्हणजे लोकांकडून कळलेलं म्हणणं काही वेगळंच होतं. तराकीच्या अनुभवाने अमीन शहाणा झाला होता. स्वतःच्या, अफगाणिस्थानच्या भविष्याची वाटचाल ही तारेवरची कसरत कशी आहे हे त्याला कळून चुकले होते. रशियाकडून आपल्याला केवढी भीती आहे हे त्याला समजले होते. तराकीला काढून सत्तेवर आल्यानंतर त्याने एकदम अमेरिकेशीच संधान बांधले नव्हते, पण मुजाहिद, इख्वानी, यांच्याशी चर्चा करण्यासाठी त्याने आपली खास माणसं पाठवली होती. कारण बंडखोरांशी लढाई किती दिवस चालू ठेवायची ? कधी तरी त्यांच्याशी समझोता करणं भागच होतं. त्याशिवाय देशाचा कारभार सुरळीतपणे चालणं अशक्य आहे हे, अमीन ओळखून होता. आगाशाही येणार होता तोसुद्धा तेवढ्याचसाठी की, बंडखोरांना पाकिस्तानकडून मिळणारी मदत बंद करण्याची आणि पख्तुनिस्तानचा प्रश्न सोडवण्याबाबत बोलणी व्हायची होती. ती बोलणी यशस्वी झाली असती, बंडखोरांशी समझोता झाला असता तर अमीनचे, पर्यायाने अफगाणिस्थानचेच बस्तान चांगले बसले असते. पण तेवढ्यात इराणमधले तणावाचे वातावरण फारच चिघळत चालले होते. इराणमधल्या अमेरिकन ओलिसांचा प्रश्न अटीतटीला पडला होता. अमेरिका इराणवर हल्ला करील की काय अशी भीती निर्माण झाली होती. म्हणून रशियाने, इराणच्या सरहद्दीवर, हेरत शहराच्या परिसरात आपली सैनिकी ठाणी टाकण्याची परवानगी अमीनकडे मागितली.

अमीनने त्याला साफ नकार दिला. रशियाने पुन्हा पुन्हा आग्रह धरला, पण अमीनने ठामपणाने नाही म्हटले होते. म्हणूनच रशियाने 'मदत' देण्याच्या बहाण्याने अफगाणिस्थानात आपल्या फौजा आणल्या आणि अमीनला मारून, बबरकला गादीवर बसवून, स्वतःचा अंमल चालू केला. अमीन आणि रशिया यांच्यामधली ही तणातणी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासूनच चालू झालेली होती.

अमीनचा जबर जखमी झालेला जावई, मॉस्कोहून बरा होऊन आला म्हणून

दारुल अमनच्या नव्या राजवाड्यात २७ डिसेंबरला आनंदोत्सव साजरा होत होता. दोन दिवसच अगोदर अमीन तिथे राहायला गेला होता. पण मेजवानीमध्येच, अमीनला व्हिस्कीमधून विषप्रयोग झाला होता. आपली तब्येत बिघडताच आपल्याला विषप्रयोग झालेला आहे हे त्याच्या लक्षात आलं. लगेच त्याने तसं आपल्या मुलाला, विश्वासातल्या माणसांना सांगितलं. ताबडतोब अमीनच्या वैय्यक्तिक डॉक्टरला– तो रशियन होता– बोलावून आणण्यात आलं. त्याने औषधोपचार करताच अमीनची प्रकृती सुधारू लागली. हा आता वाचतो आहे हे लक्षात आल्यावर त्याच्याकडून सैनिकी ठाण्यांच्या करारपत्रांवर सह्या देण्याची त्याला जबरदस्ती करण्यात आली. पण तो सही करायला तयार होईना. म्हणून त्याला एक गोळी घालून जखमी करण्यात आलं. तरीही तो ऐकेना. तेव्हा त्याला तसेच, त्या जखमी अवस्थेत रशियन वकीलातीमध्ये नेण्यात आलं. तिथे पुन्हा त्याला धाकदपटशा दाखवून सही करायला सांगितलं. तरी तो ऐकेना. म्हणून शेवटी त्याला रशियन वकीलातीमध्येच गोळ्या घालून ठार मारण्यात आलं.

त्याच वेळी ठरल्याप्रमाणे, रेडिओ काबूल समोरच्या इमारतीमधल्या लष्करी जेवणघरामध्ये रशियन आणि अफगाण लष्करी अधिकाऱ्यांचे दारू पिणे चालू होते. बोलता बोलता त्यांची आपापसांत बाचाबाची चालू झाली. तेव्हा रशियन लष्करी अधिकाऱ्यांनी अफगाण लष्करी अधिकाऱ्यांना त्या हॉलमध्येच कोंडून ठेवले. भोवती पहारे बसवले.

तोपर्यंत अर्ग महलामधून आणि रशियन वकिलातीमधून ठिकठिकाणी ‘ निरोप ’ गेलेच होते. रशियन लष्कराने एकाच वेळी ३–४ महत्त्वाच्या ठिकाणी अचानकच हल्ला करून अर्ग महाल, गृहमंत्रालय, पंतप्रधानाचे मंत्रालय, संरक्षण मंत्रालय या इमारती काबीज केल्या, आणि काय होतं आहे ते कळायच्या आत, रशियन सैनिकांनी तिथल्या अफगाण संरक्षकांना मारून, जिथेतिथे स्वतःचे पहारे बसवले. रेडिओ काबुल, टी. व्ही. स्टेशनच्या आवारात साठवलेला प्रचंड मोठा दारुगोळा, अमीनच्या सैनिकांनीच उडवून दिला,–रशियन लोकांच्या ताब्यात सापडू नये म्हणून. पण त्या दोन्ही महत्त्वाच्या इमारती मात्र रशियन्सनी काबीज केल्या. पाठोपाठ पोस्टऑफिस, टेलिफोन एक्स्चेंजच्या इमारतीही आपल्या ताब्यात घेतल्या. अमीनच्या निष्ठावान अफगाण सैन्याधिकाऱ्यांना काय होतंय ते कळून, त्यांनी काही हालचाली करीपर्यंत सगळ्या काबूल शहरभर रशियन सैन्य पोझिशन्स घेऊन उभं होतं. आणि शिवाय अफगाण सैन्याचा पेट्रोलचा साठा ठिकठिकाणी रिकामा करण्याचं काम रशियन हस्तकांनी अगोदरच केलं होतं.

रशियन सैनिकांना काबूलच्या रस्त्यावर पाहिल्यावरची अनिवार्य भीती, प्रचंड आश्चर्य, आत्यंतिक चीड, अपमान, धक्का ह्या भावना फार फार मोठ्या होत्या; पण माणसाला कसलीही सवय होते हेच खरं. तशीच त्या रशियन्सचीही सवय झाली. आमच्या घरासमोरचा टँक तास–दीड तासाने निघून गेला होता. पण सैनिक मात्र राहिलेच होते. ज्या दिवशी बबरक स्वतः आपल्या वडिलांना भेटायला यायचा त्या

दिवशी पुन्हा टँक, जीप्स गाड्या भरून आर्मीचे लोक, वायरलेसची सशस्त्र गाडी हा सगळा सरंजाम यायचा. आम्ही तिथे असेपर्यंत म्हणजे रशियन्स अफगाणिस्थानात घुसल्यानंतर चार महिन्यांमध्ये दोनतीन वेळा हा प्रकार पाहिला. बबरक जेव्हा जाहीर-शहाच्या जमान्यात विरोधी पक्षनेता होता, पार्लमेन्टवर निवडून आला होता, तेव्हा त्याच्या या लष्करी जनरल बापाने " माझा या मुलाशी काही संबंध नाही " असे जाहीर केले होते. तसेच त्याने याही वेळी पुन्हा एकदा जाहीर केले. पण त्याच्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. लोक म्हणत, " आतून हे सगळे एकच आहेत. वरून दाखवण्यापुरते असे बोलतात. नाही तर याच्या घरासमोर रशियन सैनिकांचे पहारे कशाला लागतात यांना ! "

एक मात्र खरे की, बब्रकचा भाऊ रोज सकाळ-संध्याकाळ चालतच आपल्या ऑफिसात जाऊन यायचा.

गल्लीत येणाऱ्याजाणाऱ्या प्रत्येकाला, 'दरेश' थांब,–असं मोठ्यांदा ओरडून, हातातली संगीन त्याच्या छातीला लावूनच थांबवावयाचे, त्याची झडती घेऊनच त्याला पुढे जाऊ द्यायचे, हा त्या सैनिकांचा खाक्या होता. आम्ही तिथेच राहतो, याची खात्री पटल्यावर दुसऱ्या दिवसापासून आम्हाला मात्र कधीच त्रास दिला नाही. आमची ती छोटीशी गल्ली एखाद्या स्फोटक आगीसारखी धगधगत होती. पण त्याचीही पुढे पुढे सवय झाली. काही वाटेनासं झालं. एवढेच नव्हे तर हातात आडव्या मशिनगन्स घेऊन गस्त घालणाऱ्या त्या रशियन सैनिकांशी गल्लीतल्या ५–७ वर्षांच्या अफगाण मुलांमुलींनी नंतर नंतर मैत्रीच जमवली. त्या सैनिकांकडे सुरुवातीला आश्चर्याने बघत उभं राहता राहता, ती मुलं पुढे पुढे त्यांच्या गनवरून हात फिरवून पाहू लागली. त्यांच्या बरोबरीनं लेफ्ट राइट करीत फेऱ्या मारू लागली सॅल्यूट ठोकू लागली, आणि शेवटी तर ते सैनिक खुर्चीवर जेवायला बसले की चक्क त्यांच्या मांडीवर बसून, त्यांच्या थाळीतून एखाद दुसरा घास खाऊ लागली होती ! त्या सैनिकांनाही आपल्या लहान भावंडांची, मुलांची आठवण येत होती की काय कुणास ठाऊक !

पण मुरादअलीने मात्र कधी चुकून आपल्या नातवंडांना त्या सैनिकांच्या वाऱ्यालादेखील उभं राहू दिलं नव्हतं. बबरकच्या वडिलांचं घर आणि महंमद रफीची सासुरवाडी कायम बंद दरवाजाआड लपलेलीच होती. दूर कुठल्या तरी बाजूच्या रस्त्याच्या लहानलहान गल्ल्यांतून दिवसभर गायब होणारे हे रणगाडे रात्री आठ वाजले की मुख्य रस्त्यांवर येऊन, चौकाचौकांत उभे राहात. आणि कितीही दुरून येणारा टँक असला तरी ठराविक वेळ झाली की, लोकांच्या बंद दाराआड कोंडलेली कुत्री भेसूर भुंकायला लागायची.

एक दिवस हा सगळा ताण असह्य होऊन आरेफनं एकदा एका रशियन सैनिकाला चिडीनं विचारलं, " का आलात तुम्ही आमच्या देशात ? चालते व्हा इथून. आम्ही किती द्वेष करतो तुमचा ते कळत नाही का तुम्हाला ! जा....जा.... चालते व्हा.... ! "

आरेफ इतका संतापला होता की, संतापाच्या भरात त्याने आपल्या मातृभाषेत-ताजिक-मध्येच बोलायला सुरुवात केली होती.

पण काय आश्चर्य! कारण तो रशियन सैनिकही ताजिक भाषेतच उत्तर देऊ लागला, “कमाल आहे! मला तर तुम्हा लोकांचंच आश्चर्य वाटतंय. आपला इस्लाम धोक्यात आहे, साम्रज्यवादी अमेरिका अफगाणिस्थानातून नामशेष करणार आहे, म्हणून तुमच्या मदतीसाठी, इस्लामच्या रक्षणासाठी आम्ही इथं आलो आहोत. तर तुम्ही आम्हालाच चालते व्हायला सांगता आहात! कृतघ्न आहात तुम्ही!”

पूर्वी एकदा केलेलीच चालबाजी रशियाने पुन्हा या वेळीही केली होती. अफगाणिस्थानात घुसवलेले पहिले सगळे सैनिक ताजिक, उजबेक टोळीवाले होते. पण त्या वेळेप्रमाणे या वेळचा अनुभवही रशियाला बरा आला नसावा. कारण १०–१५ दिवसांनी हे मूळचे मुसलमान रशियन सैनिक जाऊन त्या जागी गोरे सैनिक आले.

कामावर असताना सिगारेट्सची पाकिटं, च्युइंग गम विकत घेणारे रशियन सैनिक हळूहळू कामावर नसताना रस्त्यातून भटकताना, लहानमोठ्या दुकानांतून दिसू लागले. ते जवळ आले की आपोआपच आजूबाजूची माणसं बाजूला व्हायची. आपापसांतील बोलणंही बंद व्हायचं. सगळ्यांच्या नजरा फक्त त्यांच्यावरच रोखलेल्या, एखाद्या बंदुकीसारख्या ठासून भरलेल्या द्वेषानं. एकदा एका मोठ्या डिपार्टमेन्टल स्टोअर्समध्ये मी होते. तेव्हा काचेचं मोठं दार ढकलून दोन रशियन सैनिक आत आले. हातात मशिनगन्स, गळ्यात, कमरेला काडतुसांच्या माळा लटकवलेल्या, ते दोघे आत येताच सगळा कलकलाट एकदम थांबला. टाचणी पडली तर आवाज येईल एवढी शांतता. फक्त त्या दोघांच्या बुटांचाच तेवढा टॉक टॉक आवाज. ज्या ज्या काउंटरजवळ ते सैनिक जातील तिथले लोक बाजूला जाऊन स्तब्ध उभे. सेल्सगर्ल तिला दाखवलेली वस्तू तेवढीच पटकन पुढे करायची. सगळ्या दुकानातून एक फेरफटका मारून ते दोघे निघून गेले. त्यांच्या पाठोपाठ दार बंद झालं आणि सगळ्यांनीच एकदम बोलायला सुरुवात केली. प्रत्येकाजवळ म्हणण्यासारखं काही ना काही होतंच. प्रत्येकाच्या बोलण्यातून संताप, खंत, अपमान निथळत होता.

रशियन्सना बघून पचकन थुंकणं तर अगदी सर्रास चालायचं. पण हे सगळं लांबून, पाठीमागं. प्रत्यक्ष समोरून तो येताना दिसला की फूटपाथ बदलून चालणं हा नियम, आणि आपापसांत चर्चा करताना त्यांचा उल्लेख ‘काका’ (अंकल), ‘मामा’, असा व्हायचा.

एकदा दोघा रशियन सैनिकांनी दोन तीन अफगाण मुलींची चेष्टा केली, काही कॉमेन्ट्स केल्या, शीळ घातली. त्या मुली मुकाट्यानं निघून जाण्याऐवजी त्यांच्याकडे पाहून हसल्या. सैनिक स्वतःवरच खूष होऊन निघून गेले. नंतर मग आजूबाजूचे लोक येऊन त्या मुलींना रागाने बोलू लागले. तेव्हा त्यातली एक मुलगी म्हणाली, “ते जेव्हा आम्हाला त्रास देत होते तेव्हा तुमची कुणाची हिंमत झाली नाही पुढे येऊन त्यांना अडवायची.

ते गेल्यानंतर आम्हालाच कशाला बोलता ? असेल हिंमत तर त्यांच्यामागं जाऊन त्यांना खडसावून या.’’ पण ती हिंमत कुणाचीच झाली नाही. म्हणूनच हजारो अफगाण मुलींना रशियन सैनिकांशी ‘ दोस्ती ’ करून रहावं लागलं. ‘ नाही ’ म्हणण्याचा प्रश्नच येत नव्हता. बाहेर गेलेली आपली मुलगी परत येईलच अशी खात्री अफगाण पालकांना आता वाटेनाशी झाली होती.

एकदा एकाकडे जेवायला गेलो असता, तिथं एक बल्गेरिअन आणि एक डॅनिश असे दोघे जण भेटले. गप्पांचा विषय अर्थातच रशियनांचे अफगाणिस्थानातील आक्रमण. त्या डॅनिश माणसानं तर ताबडतोब रशियाचा धिक्कार केला. पण मला उत्सुकता होती, हा बल्गेरिअन काय म्हणतो आहे ? त्यानं दिलेल्या थातुरमातुर उत्तरांनी माझं समाधान होत नव्हतं. तेव्हा मी त्याला सरळ सरळ प्रश्न विचारले. तेव्हा तो म्हणाला, “ बाई, आमच्या देशातसुद्धा ते असेच घुसले होते. अजूनही ते तिथं आहेत. मला या अफगाणांची सगळी दुःखं कळताहेत. त्यांना कसा अपमान वाटत असेल तेही मला कळतं आहे. आणि हेही कळतं आहे की, हे जे मूठभर बंडखोर यांच्याविरुद्ध लढत आहेत त्याचा काहीही उपयोग नाही. हे सिंदबादचं भूत एकदा मानगुटीवर बसलं की उतरत नाही.’’

पण एवढं बोलूनही तो बल्गेरिअन अमेरिकेलाही तेवढीच शिवीगाळ करीत होता. त्यानं अमेरिकेला नावं ठेवली की तो डॅनिश माणूस भांडायला उठायचा. त्यानं रशियाला शिव्या दिल्या की बल्गेरिअन चिडायचा. वातावरण जरा तंगच झालं होतं. एवढ्यात रस्त्यावरून दोनचार रणगाडे धडधडत जाऊ लागले. साहजिकच आम्ही सगळे उठून खिडक्यांतून बाहेर बघू लागलो. ते रणगाडे निघून गेल्यानंतर, यजमानांची सात-आठ वर्षांची छोटी मुलगी आपल्या आईला विचारते, “ ममा, त्या टॅक्सना हॉर्न असतात का ग ? ’’

वातावरण एकदम सैल झाले. आम्हाला सगळ्यांना तिच्या त्या प्रश्नाचं हसू आलं. तो डॅनिश माणूस म्हणाला, “ यावरून हेच सिद्ध होतं की, रशियन रणगाडे इथं किती मोकळेपणानं हिंडत आहेत. त्यांचं अस्तित्व ही किती सामान्य गोष्ट झाली आहे. टॅक्सीज हिंडाव्यात तसे हे रणगाडे फिरत आहेत. पण त्यांची भीती केवढी ! ’’

“ या बाबतीत दुमत नाही. पण कधी हे रणगाडे रशियन असतात तर कधी अमेरिकन.’’ बल्गेरियनानं टोला हाणलाच !

## ‘ आक्रमित ’

सत्तेवर आल्याआल्याच बबरकने जाहीर केले की, ‘ जल्लाद ’– मांग, अमीनने राजकीय आकसाने तुरुंगात टाकलेल्या सर्वांना सोडून देण्यात येईल. पहिल्या दिवशी दीडशे ते दोनशे लोकांना, काबूलपासून ७–८ मैलांवरच्या पुलेचरखी तुरुंगातून शहरातल्या

मुख्य, पख्तुनिस्तान चौकात आणून, मोठ्या समारंभाने मुक्त केले. दुसऱ्या, तिसऱ्या दिवशीही पुन्हा दीडशे दोनशे लोकांना आणून सोडले. पण एकदा सरकार खरोखरच लोकांना सोडते आहे हे पाहिल्यावर सरकारने तुरुंगात टाकलेल्यांचे हजारो नातेवाईक त्या चौकात रोज गर्दी करू लागले. म्हणून सरकारने जाहीर केले की, उद्या पुलेचरखी तुरुंगाचे दरवाजे उघडून सर्वांना एकदमच सोडले जाईल.

दुसऱ्या दिवशी हजारो लोकांचा प्रचंड मोठा समुदाय पुलेचरखी तुरुंगासमोर गोळा झाला. तुरुंगाची दारं उघडायला वेळ लागत होता. वाट पाहणं असह्य झालेले काही लोक दरवाजावर चढून पलीकडे जाऊ लागले. तेव्हा एकदमच दरवाजे उघडले गेले. बाहेरच्या लोकांचा पूर आत वाहू लागला. तुरुंगातून सोडलेले कैदी त्याच वेळी बाहेर येण्यासाठी धडपडत होते. आत जाणाऱ्यांचा, बाहेर येणाऱ्यांचा एकच गोंधळ उडाला. रडण्या–ओरडण्याला, लोकांनी सरकारला शिवीगाळ करण्याला, आणि हातात कर्णे घेऊन बबरकचे कौतुक करणाऱ्या पार्टीवर्कर्सच्या भाषणांना ऊत आला. हलकल्लोळ माजला. त्याचा फायदा घेऊन अमीनचा उजवा हात असलेला शहावली तुरुंगातून पळून जायचा प्रयत्न करू लागला. शहावलीला पाहताच संतापलेला जमाव त्याला मारण्यासाठी त्याच्यामागे धावू लागला. या सगळ्या अस्ताव्यस्त गोंधळाने बावरून, घाबरून गेलेल्या रशियन सैनिकांनी गोळ्या झाडायला सुरुवात केली. मग तर एकच दंगल उसळली.

पण हळूहळू सगळी गर्दी शांत होऊ लागली. शहावलीला पुन्हा तुरुंगात टाकलं; सोडलेल्यांमध्ये तराकीची बायको होती. लायक, नवीन, हे त्याचे मंत्री होते. ज्या लोकांना आपला सुटून आलेला नातेवाईक दिसत होता त्यांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. ज्यांना त्या गर्दीमध्ये आपल्या माणसाचा चेहरा दिसत नव्हता ते लोक बेभान होऊन रडत होते. त्यांच्या नावाने वेड्यासारखे हाका मारीत, सैरावैरा धावत होते.

ज्या बायकांना आपल्या मुला-माणसांचे चेहरे सुटून आलेल्यांमध्ये दिसत नव्हते त्या बायका मूक-आकान्ताने रडत होत्या. लहान मुलं आई... बाबा... ओरडत सैरावैरा धावत होती. आपल्या पकडून नेलेल्या आई–बाबांना जिवाच्या आकान्ताने हाका मारीत होती. शोधीत होती. म्हातारीकोतारी, तरणीताठी, लहान मुले, बायका, पुरुष... माणसांचा समुद्र उसळला होता तिथे. ज्यांची माणसं सापडली होती त्यांचा आनंद आणि ज्यांची माणसं सापडली नव्हती त्यांचं दुःख, घोर निराशा.... दोन्हीही सहन-शक्तीच्या पलीकडचं होतं. आशा–निराशेचा, सुखदुःखाचा तो प्रचंड उद्रेक पाहून अंतःकरण पिळवटून निघत होतं; रडू येत होतं.

मुक्ततेचा हा अलौकिक सोहळा नंतर मग टी. व्ही.वर पुन्हा पुन्हा दाखवीत होते. अर्थातच रशियन्सनी केलेला गोळीबार सोडून. हाच कार्यक्रम नव्हे तर टी. व्ही.-वरचे इतरही सगळेच कार्यक्रम रशियन्स आल्यापासून बरेच सुधारले होते. काही काही

कार्यक्रम तर सुंदरच होत असत. मग कळलं की हल्ली टी. व्ही.वरचे निर्माते संयोजक सगळेच जवळ जवळ रशियन्स होते. त्यामुळे बरेचसे कार्यक्रम रशियनच असत. उदाहरणार्थ : रशियन सर्कस, किंवा मुलांना अगदी लहान वयापासून व्यायाम, ॲथलेटिक्स कसं शिकवतात, सुंदर रशियन कार्टून्स, मंगोलियन, ताजिक, उज्बेक नाचगाणी, सिनेमा यांचं प्रमाणही फारच वाढलं. अफगाण कार्यक्रमही चांगलेच होऊ लागले. विशेषतः करमणुकीचे आणि राजकारणेतर कार्यक्रम सुरेख होत. राजकीय, प्रचारकी कार्यक्रमांतही शिस्त आली. विविधता आली. सरकारच्या ओव्या गाणारे लोक टी. व्ही.वर पुन्हा पुन्हा दिसू लागले. आपण साम्राज्यवाद्यांचे, बंडखोरांचे हेर आहोत, अमेरिकेनं आपल्याला पैसे दिलेत हे कबूल करणारे, त्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करणारे टी. व्ही.वर दिसू लागले. अफगाणिस्थानात घातपाताची कृत्ये करायला पाकिस्तान, इराण, अमेरिकेनं पाठवलेल्याचा दावा करणारी माणसं आपला भोळा-भाबडा युक्तिवाद टी. व्ही.वर सांगू लागली. वेगवेगळ्या तऱ्हेचे कार्यक्रमही होऊ लागले. आणि ज्या दिवशी गावात काही तरी गडबड होणार अशी दाट अफवा असायची त्या दिवशी हटकून टी. व्ही. वर पाकीजा, अमर-अकबर-ॲन्थनी, मुगले आझम, आणि अंकूर (!) असले चित्रपट दाखविले जायचे. राजकपूरच्या आणि इतर चित्रपटांतील गाणी दाखवली जायची. मुगले आझम, अंकूर वगैरे चित्रपट दोनतीन वेळा दाखवले गेले. पण पाकिझा, अमर-अकबर-ॲन्थनी, तर आणखीनच जास्त वेळा दाखवले गेले. कधी कधी तर एका आठवड्यात दोन दोन हिंदी चित्रपट दाखवले जात होते.

पण लोकांची आशा दुर्दम्य आहे. जिद्द वाखाणण्यासारखी आहे. हजारो लोकांना पुढच्या दारांनी सोडलं आहे तरी, किती तरी माणसं मागच्या दारानं तुरुंगात जात आहेत. किती तरी माणसं मारली जात आहेत. इथं आलेले रशियन्स आता परत जाणार नाहीत, याची खात्री पटत चालली आहे. लोक म्हणताहेत, रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत आम्ही लढू. पण एकेका रशियन माणसाला ठेचून काढू. शेवटचा रशियन आमचा देश सोडून जाईपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. सगळ्या थरांवरचे लोक तेच तेच म्हणतात. बंडखोरांनी अमुक एक ठाणं घेतलं, सरकारची एवढी शस्त्रास्त्रं पळवली, अमुक इतकी सरकारी माणसं, लष्करी लोक बंडखोरांना जाऊन मिळाले. अशा अफवा ऐकून हे लोक आनंदित होत आहेत. आपला अंतिम विजय आता हाताच्या टप्प्यावर आलाय असंच धरून चालत आहेत. आणि जलालाबाद-सारखं मोठं शहर बंडखोरांनी घेतलं यासारख्या अवास्तव अफवेवरही खुषीनं, उत्सुकतेनं, कसली शंकाही न घेता विश्वास ठेवत आहेत. त्यांना मधूनच एकदम वस्तुस्थितीचं भान सुटल्यासारखं होतं.

एकदा एक परचम पक्षीय म्हणाला, "रशियन्स आमच्या मदतीला आल्याचं एवढं दुःख तुम्हाला का वाटतंय ते मला कळतच नाही. असं पहा, पाकिस्तान तुमचा शत्रू आहे. आमचाही शत्रूच आहे. आता रशियन्स इथे आलेत. आता आम्ही

बलवान झालो आहोत. तिकडे तुम्ही, इकडे आम्ही. आपण त्या पाकिस्तानचं चंदन करून टाकू या.”

“पण गृहस्था, ती उद्याची गोष्ट झाली. आज तुमचंच चंदन होत चाललंय. ते कुठं कळतंय तुम्हाला?” मुकुंदा म्हणाला. पण हे म्हणणं त्याला मुळीच पटत नाही. तो म्हणतो, “आता रशियाची भरपूर मदत मिळेल आम्हाला. इतकी वर्षं आम्ही अंधार-युगात काढली. आता पाहा, दहा वर्षांत अफगाणिस्थानचं सगळं रूपच पालटून जाईल. आम्हीसुद्धा यांत्रिक, तांत्रिक ज्ञानात केवढी तरी प्रगती करू. जगाबरोबर येऊ आम्ही.”

रशियन सैन्य अफगाणिस्थानात शिरले त्याचा पाश्चात्य देशांमध्ये काय परिणाम होणार याच्यासंबंधीचे अंदाज बांधले गेले. तसे अंदाज बांधणं काही फारसं अवघड नव्हतं. ते परिणाम अपेक्षितच होते. अमेरिकेने थयथयाट केला. त्याला इतर पाश्चात्य राष्ट्रांनी साथ दिली. अमेरिकेनं दिलेल्या धमक्या दिवसेन् दिवस जास्तच उग्र होऊ लागल्या. एक काळ असा येऊन ठेपला की, काही तरी ठिणगी पडेल आणि तिसरं महायुद्ध सुरू होईल.

पण प्रत्यक्षात अमेरिकेनं, आपल्या कडक बोलण्याला साजेसं वर्तन मात्र केलं नाही. अर्थात पाकिस्तानात पळून गेलेल्या अफगाण निर्वासितांसाठी मदतीचा ओघ वाढला. पैसा, औषधपाणी, कपडे वगैरे वस्तू भरपूर आल्या, पण शस्त्रास्त्रांची मदत नगण्यच राहिली. अमेरिकन मदतीमुळे, अफगाणिस्थानातून पळून गेलेले निर्वासित श्रीमंत झाले, त्यांनी आपला जमीनजुमला जमवला, पेशावरसारख्या छोट्या, गावंढ्या गावाचं रूप पालटून एकदम त्याला आंतरराष्ट्रीय महत्त्व आलं. जगभरातून येणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या बातमीदारांसाठी, आपल्या मदतीची पाहणी करायला आलेल्या अमेरिकन लोकांसाठी, पाकिस्तानशी बोलणी करायला आलेला चिनी, ब्रिटिश, अमेरिकन आणि अफगाण बंडखोर नेत्यांसाठी, आणि श्रीमंत अफगाण निर्वासितांच्या सोयीसाठी पेशावरचा हॉटेलसचा धंदा रातोरात आन्तरराष्ट्रीय पातळीवर जाऊन पोचला. काबूल हॉटेलमध्ये मारल्या गेलेल्या अमेरिकन राजदूत, डब्जच्या बायकोने पेशावरहून, अफगाण निर्वासितांसाठी मदतीची योजना चालू केली. काबूलमधून हाकलून दिले गेलेले पाश्चात्य बातमीदार, पेशावरला आपलं दुकान मांडून बसले. आणि तिकडून रशियन आक्रमणावर, आफगाण लोकांच्या दुर्दैवावर प्रसिद्धीचे झगमगते झोत टाकले जाऊ लागले. मॉस्कोमध्ये होणाऱ्या ऑलिंपिकवर बहिष्कार घालण्याचं प्रकरण तर केवढं गाजलं, वाजलं; रशियन आगेकूच रोखण्यासाठी पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या ‘पीनटस्’ची चर्चा होऊ लागली. “खपवून घेणार नाही”, “हे चालणार नाही”, अशी अमेरिकन भाषा रंगू लागली. जगातले तणाव वाढू लागले.

त्याच वेळी “रशियाच्या या अफगाण आक्रमणाला एवढे अवास्तव महत्त्व देऊ नये” असा आश्चर्यकारक, अनपेक्षित, एकुलता एक अमेरिकन आवाज उठला. “असे अवास्तव महत्त्व देऊन आपणच अफगाणिस्थानचा प्रश्न जास्त चिघळण्याला जबाबदार

ठरणार आहोत. आपण जेवढे जास्त महत्त्व देऊ, चर्चा करू, तेवढ्या प्रमाणात रशियाला आपले सैन्य काढून घेणं अपमानास्पद, अशक्य होऊन बसेल. या प्रश्नाची जेवढी जास्त चर्चा आपण करू तेवढं हे प्रकरण उगाचच अटीतटीला पडेल. तेव्हा अमेरिकेनं अत्यंत शांतपणानं, धीरगंभीरपणानं या प्रसंगाला सामोरं गेलं पाहिजे.”

हा अफलातून सल्ला देणारा अमेरिकन माणूस होता जॉर्ज केनन. हा रशियामध्ये पंचवीस वर्षे अमेरिकन वकिलातीमध्ये उच्चाधिकारी होता. मॉस्कोमधली अमेरिकन वकिलात सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतरची सगळी सिद्धता यानेच केली होती. तेव्हा तो फर्स्ट सेक्रेटरी होता. काही वर्षांनी तो अमेरिकन राजदूत म्हणून पुन्हा मॉस्कोला गेला. आणि पंचवीस वर्षे त्याने रशियाला अगदी जवळून पाहिले, रशियासंबंधीचा अधिकारी माणूस म्हणून त्याचा लौकिक मान्य आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या अगोदर, दुसरं महायुद्ध चालू असताना, आणि महायुद्धानंतर लगेचच, केननचे अमेरिकेला, ब्रिटनला सततचे सांगणे होते की, जर्मनी–हिटलर हा आपला खरा शत्रू नाहीच. त्याच्याशी असलेले आपले तणावाचे संबंध, त्याच्याबद्दल वाटणारी भीती, वाटाघाटी करून दूर करता येईल. प्रत्यक्ष बोलणी करून मैत्री स्थापन करता येईल. खरी भीती आहे ती कम्युनिस्ट रशियाकडून; स्टॅलिनच्या विस्तारवादी धोरणापासून; हिटलरपासून तात्कालिक धोका होता, पण स्टॅलिनपासून दूरपर्यंत परिणाम करणारी भीती होती. पूर्व-युरोप सगळाच्या सगळा गिळंकृत करण्याचे बेत स्टॅलिन आखत होता; कारण रशियाला जिवंत ठेवण्यासाठी बाजारपेठ आणि कच्चा माल पुरवणारी मांडलिक राष्ट्रे हवी होती; आणि अशा वेळी आपण जर्मनीशी शत्रुत्व पत्करून रशियाशी मैत्री केली तर, त्याचा पुरेपूर फायदा रशिया करून घेईल. आपल्याला मात्र रशियाच्या मैत्रीपासून काहीही फायदा होणार नाही. उलट जर जर्मनी कमजोर झाली, महायुद्धामुळे सगळा युरोप कमकुवत झाला तर त्याचा बरोबर फायदा रशिया स्वतःच्या फायद्यासाठी करून घेईल. आणि तेव्हा आपण मात्र काहीही करू शकणार नाही. आपल्या डोळयांदेखत रशिया पूर्व-युरोपची राष्ट्रे गिळंकृत करील.

पण केननचे हे म्हणणे तेव्हा रुझवेल्टला, चर्चिलला कुणालाच कळले नाही, पटले नाही. हिटलरचे वाढते सामर्थ्य, हिटलरची भीती, यापुढे त्यांना दुसरे काहीही सुचत नव्हते. त्यांनी रशियाशी मैत्री जोडली. महायुद्ध संपले, युद्धाने विकल झालेल्या युरोपची पूर्वराष्ट्रे रशियाने आपल्या ताब्यात घेतली; तेव्हा अमेरिका, इंग्लंडला फक्त पहात राहण्याशिवाय काहीही करता येणं अशक्य होतं! केननचे म्हणणे तंतोतंत खरे ठरले. म्हणूनच त्याच्या अफगाण प्रश्नाबद्दलच्या विधानाला महत्त्व मिळते.

अशा माणसाने म्हटले होते की, रशिया अफगाणिस्थानात घुसला, या घटनेला अमेरिका जरुरीपेक्षा जास्त महत्त्व देते आहे. तशी जरूर नाही. उलट त्यामुळे परिस्थिती बिघडेल.

जॉर्ज केननचे म्हणणे होते की, आज जरी रशियाने आपले सैन्य अफगाणिस्थानात

घुसवले असले तरी कायम तिथेच राहण्याचा रशियाचा इरादा नाही. इराणची परिस्थिती निवळली; अफगाणिस्थानात एखादा कणखर माणूस सत्तेवर टिकून राहिला की रशिया हळूहळू आपले सैन्य काढून घेईल.

अर्थातच या त्याच्या म्हणण्याकडे कोणीच लक्ष दिले नाही.

केननच्या म्हणण्यामध्ये अगदीच अर्थ नव्हता असं म्हणता येणार नाही. कारण मुळातच रशियन सैन्य अफगाणिस्थानात आले, ते बंडखोरांशी मुकाबला करण्यासाठी. बंडखोरांचा अड्डा असलेल्या, पाकिस्तान सीमेकडे न जाता, इराणसीमेवरच्या हेरतकडे रवाना झाले होते! तेव्हाच ही गोष्ट अतिशय आश्चर्याची वाटली होती आम्हाला. पण त्याच वेळी इराणने पकडून ठेवलेल्या अमेरिकन ओलिसांचा प्रश्न अत्यंत चिघळला होता. अमेरिकन फौजा इराणवर चालून येतील की काय अशी भीती निर्माण झाली होती. त्यावर उतारा म्हणून तर रशियाने, अफगाण बंडखोरांचे निमित्त करून, आपल्या फौजा अफगाणिस्थानात घुसवल्या नव्हत्या? नाही तर अमीनकडे, हेरंतभोवती रशियन लष्करी तळ टाकण्याची परवानगी मागणे, त्याने ती नाकारताच, त्यालाच मारून, बबरकचं बाहुलं पुढं करून रशियन आर्मी अफगाणिस्थानात घुसवणे, हा उपद्व्याप कशाला केला गेला? कारण अफगाणिस्थानात घुसणं रशियाला अगदी सोपं होतं. रशियन हद्दीतून काबुलला तीन मिनिटांत रशियन जेट फायटर्स येऊ शकतात अशी महत्त्वाची माहिती एका रशियन माणसानेच सांगितली होती. सगळे रस्ते, विमानमार्ग रशियन्ससाठी कायम खुले असताना, एवढ्या मोठ्या प्रचंड संख्येनं, एवढा मोठा शस्त्रास्त्रांचा साठा घेऊन, रशियन सैन्य अफगाणिस्थानात त्याच विशिष्ट वेळी का घुसलं असेल?

या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर तेव्हाही मिळालं नाही, आणि कदाचित ते कधीच मिळणार नाही. अफगाणिस्थानात सैन्य घुसवावं की नाही या बाबतीत रशियन पॉलिटब्युरोमध्येही दोन मतं होती अशी बातमी नंतर फुटली होती. खुद्द ब्रेझनेव्हची तशी इच्छा नव्हती असंही बोललं जात असे. इतरांनी फक्त अंदाज बांधायचे. अर्थातच एकाच कोणत्या तरी कारणाने रशियन सैन्य घुसले असं म्हणणं म्हणजे हा प्रश्न फारच सोपा होता असं म्हणण्यासारखं आहे. 'अफगाण बंडखोर ताब्यात येत नाहीत' हे कारण तर अगदीच मामुली, कमी महत्त्वाचं होतं त्या वेळी. तसं म्हटलं तर आत्तापर्यंतच्या अफगाणिस्थानच्या इतिहासात काबूलला अमीर कोण आहे या गोष्टीला फारसं महत्त्व खेड्यापाड्यांतून, दऱ्याखोऱ्यांतून राहणाऱ्या सर्वसामान्य अफगाण माणसानं कधी दिलंच नव्हतं.

या वेळी मात्र कम्युनिस्ट सत्तेवर आले म्हणून, जमिनीचं वाटप झालं म्हणून, मुल्लामौलवींना पकडून नेलं म्हणून, हुंडापद्धत बंद केली म्हणून, अशा वेगवेगळ्या कारणांमुळे जराशी खळबळ माजली होती. सत्तेसाठी हपापलेले वेगवेगळे घटक, बंडखोरीनं सरकारविरुद्ध लढत होते. तरीसुद्धा, अफगाणिस्थानातल्या जनजीवनात (इथली शहरं, मोठी गावं सोडून), अस्वस्थता येऊनसुद्धा प्रचंड वादळ वगैरे निर्माण झालं

नव्हतं. ते झालं रशियन सैन्य आल्यानंतर. आणि मग पुन्हा तोच प्रश्न उभा राहतो, रशियन सैन्य का आलं ?

इराणमधली अत्यंत तणातणीची परिस्थिती, अमेरिकेच्या इराण आक्रमणाची भीती; व्हिएटनाम, कांपुचिया, इंडोनेशिया प्रकरणामुळे त्या भागात निर्माण झालेली अस्थिरता, त्यामुळे रशियन वर्चस्व सिद्ध करण्याची निर्माण झालेली निकड, तेलासाठी हिंदमहासागरापर्यंत पोचण्याची निर्माण झालेली आवश्यकता, या गोष्टीसुद्धा महत्त्वाच्या होत्या. कदाचित जास्त महत्त्वाच्या होत्या. शिवाय अफगाण बंडखोरांचा बंदोबस्त, साम्राज्यवाद्यांची अफगाणिस्थानला वाटणारी भीती ही हुकमी पानं हातात होतीच.

अर्थात हे सगळे अंदाज इतरांनी बांधायचे. रशिया अफगाणिस्थानात का घुसला याचं खरं कारण कदाचित कधीच कुणाला कळणार नाही. अफगाणिस्थानात एवढ्या घाईनं, एवढ्या प्रचंड प्रमाणावर सैन्य घुसवायची खरोखरच काय आवश्यकता होती ? हे गूढच राहणार आहे.

एक मात्र खरं की, एकदा हे सैन्य घुसवल्यानंतर, रशिया आता अफगाणिस्थानात चांगलाच अडकला आहे. परत जाणं म्हणजे जगात नाचक्की होणं. आणि तिथे टिकून राहणं म्हणणे बंडखोरांच्या वाढत्या गनिमी काव्याच्या त्रासदायक युद्धाला सामोरं जाणं, अफगाणिस्थानचा प्रचंड खर्च स्वतःच्या सैन्याचा प्रचंड खर्च सहन करणं असं हे व्यस्त समीकरण आहे.

## हा तर मातीचा गुण

" अमेरिका, इराण, पाकिस्तान यांच्या अफगाणिस्थानातील कारवायांमुळे अफगाणिस्थानचे सार्वभौमत्व धोक्यात आले होते म्हणून रशियाने अफगाणिस्थानच्या मदतीसाठी सैन्य, शस्त्रास्त्रं पाठवली आहेत. साम्राज्यवाद्यांच्या इथल्या कारवाया संपल्या की रशियन सैन्य परत जाणार आहे," असा प्रचार अफगाण सरकारने, रशियाने चालवला आहे. पण त्यावर कुणाचाच विश्वास बसत नाही.

' मदतीला ' आलेल्या रशियन सैन्याची ती प्रचंड संख्या, अध्यक्ष अमीनला मारून बबरकला अध्यक्ष करणं, अफगाण सैन्यालाच पहिले दोन दिवस निःशस्त्र अवस्थेत ठेवणं, आणि अफगाणसरकारच्या मुलकी खात्यातूनही रशियन लोकांचं वाढतं महत्त्व, या गोष्टींमुळे रशियावरच्या अविश्वासात, द्वेषात भरच पडत चालली आहे. अफगाण सरकारच्या प्रत्येक खात्यात, आता अफगाण मंत्र्यापेक्षाही रशियन सल्लागारांचं महत्त्व, अतोनात वाढत चाललेलं महत्त्व, त्याची खंत सगळ्यांनाच वाटत आहे.

सौर क्रांतीच्या अगोदरपासूनच या रशियन लोकांची काम करण्याची जी विशिष्ट पद्धत होती ती आता तर चांगलीच स्पष्ट झाली आहे. या अनुभवामुळेच खरं म्हणजे सुरुवातीला मुकुंदाचं त्याच्या रशियन सहाध्यायांशी बिनसू लागलं होतं. हा अनुभव

थोड्याफार प्रमाणात सर्वांनाच येत होता. पण– ' जाऊ दे झालं. आपल्याला काय त्याचं ?' म्हणून इतर गप्प बसत. मुकुंद भांडायचा.

रशियन आक्रमणानंतर तर त्या लोकांचं वागणं फारच उद्धट, बेपर्वाईचं झालं होतं. अफगाण लोकांना ही अपमानास्पद वागणूक मुकाट्यानं गिळून टाकावी लागत होती. पण एका भारतीयाने परक्या देशात काम करताना, तिसऱ्याच एका परदेशी माणसाचं काय म्हणून ऐकून घ्यावं ? कोणत्या इमारतींना नव्या शहर-आखणीत प्राधान्य द्यायचं, त्या इमारतीबद्दलच्या अपेक्षा काय, त्याच्या खर्चाची चर्चा या सगळ्या गोष्टी अफगाण माणसांनी ठरवायच्या असताना, त्याबद्दलचे अखेरचे निर्णय घेणारा पोक्रोस्की कोण ?

खरं म्हणजे पोक्रोस्की कोण हे जगजाहीर झालेलं असताना, मुकुंद उगाचच भरीला पडत होता. कारण त्याचा खरा राग रशियन टीमच्या काम करण्याच्या पद्धतीवर होता. १०–१२ लोकांच्या त्यांच्या टीमपैकी २–४ लोक खरे काम करणारे असत; बाकीच्यांची तिथली उपस्थिती संशयास्पद वाटायची. चर्चा करताना, एरवी गप्पा मारताना, ऑफिसात काम करताना, बैठकींच्या वेळी, समारंभाच्या वेळी, असे प्रत्येक वेळी सगळ्यांचे वेगवेगळ्या तऱ्हेचे फोटो काढण्याचं काम एका ' इंजिनिअर 'कडे होतं. म्हणजे तो माणूस इंजिनिअर म्हणून इथे आला होता. पण काम फोटोग्राफरचं करायचा. इतके डझनावारी फोटो काढूनसुद्धा त्याने कधी एकही फोटोची प्रत कुणाला दाखवली नव्हती. म्हणून त्याच्याबद्दल संशय यायला लागला.

चर्चेच्या वेळी मुकुंद कागदाच्या कपट्यांवर भराभर वेगवेगळी स्केचेस काढून द्यायचा. मुद्दे लिहून ठेवायचा. चर्चा संपल्यानंतर त्या कपट्यांचा खरं म्हणजे काहीही उपयोग नसे. पण हे सगळे कपटे एकत्र करून घेऊन जाण्याचं काम दुसऱ्या एका रशियन ड्राफ्ट्समनकडे होतं. सुरुवातीला या गोष्टींचा अर्थच मुकुंदला कळायचा नाही. नंतर मग या गोष्टी चमत्कारिक, त्रासदायक वाटू लागल्या. त्या वेळेस रशियन टीममध्ये काम करणाऱ्या एका अफगाण माणसानेच या गोष्टींचा हेतू सांगितला. तो म्हणाला, ऑफिसमधल्या प्रत्येक अफगाणच काय पण प्रत्येक भारतीयावर रशियन टीमने एक एक फाइल केलेली आहे. त्या फाइलमध्ये त्या माणसांचे तऱ्हेतऱ्हेचे वेगवेगळ्या पोझेसमधले फोटो, त्याची संपूर्ण माहिती, त्याची मिळेल तेवढी कौटुंबिक, इतर माहिती, त्याच्या लकबी, स्वभाव वगैरेबद्दलची माहितीसुद्धा लिहिली गेलेली असते !

ही गोष्ट खरी आहे असं आणखीही एकदोन अफगाण लोकांनी सांगितले. इतर खात्यांमध्ये जिथं जिथं रशियन्स काम करायचे तिथं तिथं हीच पद्धत होती. अफगाण म्हणत, "आम्ही त्या बाबतीत काय करू शकतो ? जिथं आमच्याच लोकांना या गोष्टी चालतात, तिथं आमच्या नावडीला कोण विचारतो ? ते लोक ( म्हणजे रशियन्स) आपापल्या पद्धतीने काम करतात, असं म्हणून आमचेच वरिष्ठ त्यांची बाजू घेतात."

ही गोष्ट अत्यंत चीड आणणारी होती. म्हणूनच एकदा वादविवाद चालू

असताना, मुकुंद चिडून त्या फोटोग्राफर इंजिनिअरकडे बोट दाखवून म्हणाला, "हा माणूस काय करतो इथं ? हा म्हणे इंजिनिअर आहे. पण त्यानं केलेलं एकही इंजिनिअरिंगचं काम पाहण्यात आलं नाही. मला तर त्याच्या धंद्याबद्दलच शंका येत आहे. असा माणूस जर वास्तुविद्या आणि बांधकाम तंत्राबाबतीत आम्हाला सल्ला देऊ लागला तर तो निव्वळ रशियन आहे म्हणून आम्ही ऐकून घ्यायचं काय ? फार तर फोटोग्राफीबद्दल त्यानं लोकांना सल्ला द्यावा."

असं काही बोलण्याचं मुकुंदचं धारिष्ट्य पाहून सगळेजण थक्क झाले. इतके की, अफगाणच काय पण कोणी रशियनही म्हणाला नाही, 'हे सगळं बोलणारा तू कोण ?'

बैठक संपल्यानंतर एक वरिष्ठ अफगाण अधिकारी कार्यकर्ता म्हणाला, "हिंदुस्थान देश हा रशियाचा मित्र आहे, म्हणूनच केवळ तुझ्यासारख्याला आम्ही खपवून घेत आहोत."

पण इतर अफगाण अधिकारी, मुकुंदच्या ऑफिसात रशियन टीममधल्यासुद्धा दोन चार अफगाण लोकांनी मुकुंदचं अभिनंदन केलं. "रानाडेसाब, तुम्ही आम्हांला विलक्षण धीर दिला आहे. रशियन्सनाही कोणी ठणकावू शकतो ही कल्पनाही आम्हाला नव्हती."

घरी आल्यावर मुकुंद म्हणाला, "हे प्रकरण बहुधा आपल्या वकिलातीकडे जाईल, आणि आपल्याला कदाचित ताबडतोब परत जावं लागेल. आज लष्करच्या भाकरी चांगल्या खरपूस भाजून आलोय. परत जायच्या तयारीला लाग."

नंतर काय झालं कुणास ठाऊक. पण तो छायाचित्रकार इंजिनिअरच ८-१५ दिवसांत रशियाला परत गेला. मुकुंदच्या बोलण्यामुळं गेला असं म्हणणं अवास्तव होईल, पण तो गेला हे खरं. आणि त्यानंतर मग ते फोटो काढण्याचे प्रकारही थांबले. एका परक्या माणसाला इथं एवढं गुदमरायला होत होतं, तिथं अफगाण माणसाला काय वाटत असेल ? एके काळी जिवाच्या भीतीनं वावरणारे रशियन्स आता जेत्याच्या मग्रूरीनं काबूलचे बाजार पालथे घालू लागले आहेत.

म्हणूनच पुढे किरती जवळच्या भव्य निळ्या मशिदीतल्या मुल्लाने एक दिवस, संध्याकाळच्या नमाजाच्या वेळी, मशिदीत जमलेल्या गर्दीपुढे भाषण दिले, "तुम्ही सच्चे मुसलमान आहात. आपला देश मुस्लिम आहे. असं असताना हे काफर, रशियन-कम्युनिस्ट ( मुस्लिम लोक 'कम्युनिस्ट' हा शब्द शिवी म्हणून वापरतात. ) इथे काय करीत आहेत ? तुम्हाला हे सहन कसं होतं ? तुम्ही गप्प कसे बसता ? या गोष्टीची तुम्हाला शरम वाटली पाहिजे."

त्या मुल्लाचं भाषण संपलं. आणि पंधरावीस मिनिटांतच तीन रशियन रणगाडे धडधडत तिथं जाऊन पोचले. नमाज पढायला आलेले लोक मुल्लाच्या भाषणावर चर्चा करीत अजून मशिदीच्या आवारातच रेंगाळत उभे होते. रणगाडे तिथे पोचता-पोचताच त्यांनी चौफेर गोळीबाराला सुरुवात केली. त्या मशिदीच्या तीन बाजूंनी दुकानंच दुकानं

आहेत. समोर मोठा रस्ता; पलीकडे काबूल नदी. दुकानं फटाफटा बंद झाली. एकच पळापळ सुरू झाली. रशियन सैनिकांनी मशिदीच्या आवारातल्या लोकांना, त्या मुल्लाला पकडून नेलं. त्या गोळीबारात किती माणसं मेली, किती जखमी झाली याचा हिशोबही कुणी लावला नाही. कारण हे अंदाज खोटे असतात, हे आता सगळ्यांनाच अनुभवावरून कळून चुकलंय. शिवाय हिशोब लावून तरी काय करायचं ?

या प्रसंगाची चर्चा घराघरांतून झाली. आतापर्यंत मुल्लामौलवींना पकडून नेलं होतं, मारलंही होतं. पण असं मशिदीत शिरून नव्हे, आणि तेही आपल्या लोकांनीच नव्हे, तर परक्यांनी! इस्लाममध्ये वर्णव्यवस्था नसली तरी मुल्लामौलवींना विशिष्ट अधिकार नक्कीच आहेत. आणि कोणत्याही अधिकारीवर्गाबद्दल सर्वसाधारण लोकांना वाटणाऱ्या तिरस्कारासारखा तिरस्कारही इथल्या मुल्लामौलवींबद्दल वाटतोच. एरवी हा प्रसंग कुठल्या तरी खेडेगावात किंवा काबूलसारख्या शहरात घडला असता तरी त्याचे परिणाम वेगळे झाले असते. पण सध्याच्या या विशिष्ट परिस्थितीमुळे मुल्लाला पकडण्यापेक्षासुद्धा, रशियनांनी पकडलं आणि त्याला कोणीही विरोध करू शकलं नाही याची खंत त्या लोकांना फार वाटली.

म्हणूनच जेव्हा सद्यःस्थितीबद्दल चर्चा होते, तेव्हा या लोकांचं खरं दुःख दिसून येई. राजकारणात रस नसलेले, जाण नसलेले लोकच नव्हे तर पक्षकार्यकर्तेसुद्धा आता रशियन सैन्याच्या उपस्थितीबद्दल अतिशय रागावलेले, अपमानित झाले होते. पक्षकार्यकर्ते म्हणत, " आम्हाला समाजवाद हवा आहे, पण रशियन्स नको आहेत."

" पण त्यालाही तुम्हीच जबाबदार नाही का ?"

या प्रश्नाला त्यांचं उत्तर असतं, " आम्हाला काही कळेनासंच झालंय. एक धोका टाळण्यासाठी आम्हाला दुसरा धोका टाळावा लागला. त्यातून आमची सुटका नव्हतीच, पण त्याचे परिणाम एवढे भयानक होतील असं मात्र वाटलं नव्हतं."

इतर सामान्य लोक म्हणत, " आम्हाला राजकारणातलं काय कळतंय ? आम्हाला एवढंच कळतं की, जे काही चाललंय ते फार वाईट आहे. समाजवाद आणण्यासाठी एवढी माणसं मारायची ? समाजच राहिला नाही तर समाजवाद कुणासाठी ? शेकडो वर्षं आम्ही ज्या पद्धतीनं जगलो त्याऐवजी एकदमच आता वेगळ्या पद्धतीनं जगायचं ? आणि तेही कोणी तरी उपटसुंभ उठतो आणि सांगतो म्हणून ? आपला देश विकून, सत्ता काबीज करणारे हे लोक आमचे शत्रू आहेत. रशियन्स तर आमचे शत्रू आहेतच, पण हे आमचे म्हणायचे तेही आमचे शत्रूच आहेत ! "

" पण मग तुमचे मित्र कोण ? मुजाहिद ? इख्वानी ?"

" नाही, तेही नकोत आम्हाला. उद्या जर ते लोक सत्तेवर आले तर आज खुमेनीच्या इराणमध्ये, झियाच्या पाकिस्तानात जे काय होतंय ते इथं होईल. त्यामध्ये आणि आजच्या परिस्थितीत काय फरक आहे ? आमच्या लेखी मुजाहिद किंवा हे मार्क्सवादी सारखेच. आम्हाला मध्यममार्गी, उदारमतवादी असा कोणी हवा आहे.

आणि तसा कोणी नाही हेच आमचं दुर्दैव आहे ! तेच आमचं दुःख आहे. आम्हाला चांगला नेता नाही, म्हणूनच या भलत्याच लोकांचं फावतं."

या अफगाण लोकांचं दुर्दैव आहे ते हेच की, सर्वांना संभाळून घेईल असा नेताच इथं नाही. इथल्या सत्ताधारी राजकीय नेत्यांचं पितळ उघडं पडलंच आहे. जाहीरशहा किंवा दाऊदखानाच्या काळातले, उदारमतवादी, लोकशाहीवादी नेत्यांना मारून तरी टाकलंय, किंवा ते तुरुंगाच्या गजाआड आहेत, किंवा देश सोडून ते लोक परागंदा झालेत. त्यामुळे बबरकविरुद्ध उभा राहू शकेल असा नेताच कोणी इथे नाही. जेव्हा राजकीय नेतृत्व मार्गदर्शन करायला अपुरं पडतं, तेव्हा धर्मान्ध धार्मिक नेत्यांच्या हातातच एखाद्या राष्ट्राचे, जमातीचे नेतृत्व जातं.

या संदर्भात बोलताना मोहंमद सुलतान म्हणाले, "एक चांगला नेता नसणं आणि आहेत त्यांच्यामध्ये आपापसांत भांडणं असणं हे आमचं दुखणं आहे. हे दुखणं फार पुरातन काळापासून चालत आलेलं आहे. अलेक्झांडर प्रत्येक स्वारीच्या अगोदर आपल्या आईशी सल्लामसलत करीत असे. त्याशिवाय त्याने आपल्या सैन्याच्या हालचालीसुद्धा केल्या नाहीत. पण अफगाणिस्थानावर स्वारी करून त्याने अफगाणिस्थान जिंकला. त्या अगोदर त्याने आपल्या आईला काही विचारले नव्हते. त्यामुळे त्याची आई रागावली. आणि तिला काळजी वाटू लागली. तिने आपली नाराजी अलेक्झांडरला कळवली. तेव्हा अलेक्झांडरने अफगाणिस्थानची पोतंभर माती आईकडे पाठवली आणि कळवले की, ही माती जमिनीवर पसरून त्यावरून आपल्या अत्यंत विश्वासू सरदारांना चालत जायला सांग. त्याप्रमाणे आईने केले. अफगाणिस्थानच्या मातीवरून चालत गेल्यानंतर अलेक्झांडरचे अत्यंत स्वामिनिष्ठ आणि विश्वासू सरदारही आपापसांत भांडू लागले ! तेव्हा त्या अफगाण मातीचा गुण त्याच्या आईला कळला, आणि तिची काळजी मिटली ! तर असा हा आमच्या मातीचाच गुण आहे ! त्याला कोण काय करणार ?"

## बबरकचे वार्तालाप

सत्तेवर आल्यानंतर पंधरा दिवसांनी बबरक कारमलने जगभरच्या वार्ताहरांना बोलावून त्यांच्याशी बातचीत केली, आणि ती संपूर्ण प्रेस मुलाखत टी. व्ही.वर दाखवली हे विशेष ! जगभरातले वार्ताहर आपापले टेप-रेकॉर्डर्स, कॅमेरे, टी. व्ही.कॅमेरे सांभाळत, आपापले प्रश्न परजीत आलेले होते. अगदी फिजी, फिलिपिन्ससारख्या छोट्या देशांतले वार्ताहरसुद्धा आलेले होते. साधारणपणे दीड तास शब्दांचे आणि आरोपप्रत्यारोपांचे ताशे वाजत हा सोहळा चालला होता.

पूर्वी तराकी आणि अमीनच्या प्रेस मुलाखती संपूर्ण वेळ टी. व्ही.वर, सेन्सॉरची कात्री न लावता, दाखवीत नसत. त्यातला सरकारला हवा तेवढाच भाग दाखवीत असत.

त्यावरून कळले होते, आणि इतरही वृत्तान्तांवरून कळले होते की, तराकी किंवा अमीन कधीच संतापून, चिडून उत्तर देत नव्हते. तराकी तर फार शांतपणानं उत्तरं द्यायचा. अवघड प्रश्न असला तरी तो त्रासल्यासारखा दिसायचा, पण त्याची भाषा किंवा मूड कधीच खराब झाला नव्हता. एरवी भाषणं वगैरे देतानासुद्धा तराकी कधीच वेडीवाकडी भाषा वापरायचा नाही. कधी संतापायचा नाही. पासष्ठ वर्षांच्या तराकीचा चेहरा अगदी सुरुवातीला बावरल्यासारखा दिसायचा. पण नंतर विलक्षण आत्मविश्वास तराकीमध्ये आला होता. तराकीचा चेहरा नेहमी शांत, गंभीर, हसतमुख. घरातला आजोबा जणू. एखादी गोष्ट न कळत्या माणसाला शांतपणानं, समजावून सांगावी तसा तो बोलायचा. खूप बोलायचा. न कंटाळता बोलायचा. सत्तेवर आल्या-आल्याच तराकीने अमीनच्या विशीतल्या मुलीशी लग्न केलं अशा अफवा पसरल्या होत्या. पण त्या अफवा उठल्या आणि विरून गेल्या. त्यात काहीच अर्थ नव्हता.

अमीनच्या बाबतीतही नव्या लग्नाच्या अफवा पसरलेल्या होत्या. अमीन हा अरेरावी करणारा, करडा माणूस दिसायचा. पहिल्यापासूनच अमीनच्या चेहऱ्यावर विलक्षण आत्मविश्वास होता. बोलणं मोठ्या आवाजातलं, अतिशय आग्रही, श्रोत्यांना क्वचित कधी धमकावणारं. मधूनच कधी एखादे वेळी भाषणाची सुरुवात "बिसमिल्ला ए-रहीम..."नं करायचा, तेव्हा चेहरा अतिशय त्रासलेला असायचा. अमीनही तराकीप्रमाणेच खूप बोलायचा. पण हे सगळ्याच अफगाण माणसांचं वैशिष्ट्य आहे. बोलायची संधी मिळाली, कोणी ऐकणारा समोर आहे म्हटलं, की त्यांची रसवंती धो धो वाहते.

पण पहिल्याच प्रेस बैठकीमध्ये बबरक मात्र जेवढ्यास तेवढं, कमीत कमी बोलत होता. बब्रक त्या दिवशी अतिशय नरम होता. दीड तास सतत सिगरेट पीत होता. त्याला स्वतःला उत्कृष्ट इंग्रजी येतं. पण इंग्लिशमध्येच चाललेल्या प्रेसमुलाखतीसाठी मुद्दामहून फारसी भाषान्तर करणारा तिथे बसवला होता. अफगाण लोकांनाही कळावी म्हणून ही व्यवस्था केली असावी. पण एकदोनदा त्यानं चुकीचं, किंवा संपूर्ण अर्थ न येणारं भाषान्तर केलं तेव्हा त्याने स्वतः त्या चुकीची दुरुस्ती केली होती. संपूर्ण वेळात हेच काय ते दोनचार क्षण मोकळेपणाचे गेले. बाकी संपूर्ण वेळ वातावरण फारच ताणलेलं, बिघडलेलंच होतं.

अफगाणिस्थानसारख्या देशात रशियन सैन्य घुसलं होतं, या विलक्षण घटनेमुळे सगळ्या जगाला अक्षरशः धक्का बसला होता. त्याचे पडसाद या प्रेस कॉन्फरन्समध्ये पाहायला मिळाले. बी. बी. सी. व्हॉइस ऑफ अमेरिका, जर्मनी, इथले वार्ताहर, टी. व्ही.वाले हे लोक बबरकवर अपेक्षेप्रमाणे तुटून पडले होते. त्यांचे प्रश्न सरळ, नेमकेपणानं विचारलेले असायचे. त्या प्रश्नांना उत्तर देणं बबरकला कठीण जातंय असं दिसू लागलं की कम्युनिस्ट गोटातल्या देशाचा एखादा वार्ताहर मध्येच बबरकला रुचेल असा प्रश्न विचारायचा.

महत्त्वाचे प्रश्न होते ते असे :

सौर क्रांतीनंतर आतापर्यंत किती रशियन इथे मारले गेले ?

आपल्या चेहऱ्यावरची एकही रेषा न हालवता बबरकने उत्तर दिलं, " दहा पंधरा लोक मेले असतील."

रशियन सैन्य उघडपणानं अफगाणिस्थानात येण्याच्या अगोदरपासूनच रशियनांबद्दल अफगाण लोकांना वाटणारा भयंकर द्वेष आणि त्यापायी ठिकठिकाणी मारले जात असलेले रशियन्स, ही गोष्ट जगजाहीर झालेली असताना बबरक सांगत होता की फक्त दहा-पंधरा लोक मारले गेले असावेत !

या उत्तरानंतर पत्रकारांनी बबरकला फैलावर घ्यायला सुरुवात केली. ते प्रश्न असे :

किती रशियन सैन्य अफगाणिस्थानात आहे ?

रशियन सैन्याला कोणी बोलावलं ?

अमीनने रशियन सैन्याला बोलावले, तेव्हा तुम्ही कुठे होतात ?

जर तुम्ही अमीनला साम्राज्यवादी अमेरिकेचा हस्तक म्हणता, तर अमीनने अमेरिकेऐवजी रशियाची मदत कशी आणि का मागितली ?

बबरकने सांगितले, " रशियाकडून सैनिकी मदतीची मागणी अमीनने केली नव्हती; तर क्रांतिकारी कौन्सिलने केली होती." तेव्हा ताबडतोब प्रश्न विचारला गेला, " अमीन स्वतः अध्यक्ष असताना हा महत्त्वाचा निर्णय अमीनला डावलून घेण्यात आला होता का ? निर्णय घेतला तेव्हा अमीन कुठे होता ?"

हे सगळेच प्रश्न बबरकला गैरसोयीचे होते. या प्रश्नांना उत्तरं देताना बबरक चिडचिड करू लागला. संतापून बोलू लागला. पत्रकारांना 'भांडवलशहांची कुत्री' म्हणू लागला. प्रश्नाचं नेमकं उत्तर टाळून अत्यंत उर्मटपणानं बोलू लागला. पण पत्रकार पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारत होते. म्हणत होते, " मि. प्रेसिडेन्ट, तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीत. मी उत्तराची वाट पाहात आहे."

कोणी विचारलं, " किती टक्के अफगाण लोकांचा पाठिंबा आहे तुम्हाला ?"

त्यावर बबरकचं उत्तर होतं, " टक्केवारी मला सांगता येणार नाही. पण जवळ जवळ सगळ्याच लोकांचा पाठिंबा आहे मला."

महत्त्वाच्या प्रश्नांची नेमकी उत्तरं न देता बबरक जेव्हा उठून जायची तयारी करू लागला तेव्हा एका पत्रकाराने ( बहुतेक तो पश्चिम जर्मनीचा होता ) स्पष्टच विचारले, " आत्तापर्यंत तुमच्याच लोकांनी आपापसांत मारामाऱ्या करून, तराकी, अमीन आणि आत्ता तुम्ही सत्तेवर आलात. आपल्याला मारून कोणी दुसराच सत्तेवर येईल अशी भीती तुम्हाला वाटत नाही का ?"

या प्रश्नावर क्षणभर थक्क होऊन बबरक पाहातच राहिला. मग म्हणाला, " मला तशी भीती वाटत नाही. कारण मला माझ्या लोकांचा पाठिंबा आहे."

" की रशियन सैन्य इथे आहे म्हणून ?" कोणी तरी मध्येच पुटपुटलं.

" रशियन सैन्य परत जाणार आहे की इथेच आता कायम राहणार आहे ?"

" परत जाणार आहे."

" केव्हा ?"

" योग्य वेळ येईल तेव्हा."

" योग्य वेळ कधी येईल ?"

" इराण, पाकिस्तान, अमेरिकेच्या इथल्या भांडवलशाही कारवाया थांबल्या की. बंडखोरांना त्यांच्याकडून मिळणारी मदत बंद झाली की."

" म्हणजे बंडखोर अफगाण सरकारविरुद्ध लढत आहेत, त्यांची संख्या वाढते आहे, रशियाला त्यांचा विरोध आहे, या गोष्टी तुम्ही मान्य करता का ?"

बंदुकीतून निघणाऱ्या गोळ्यांसारखे प्रश्न विचारले जात होते. त्या प्रश्नांना उत्तरं देणं बबरकला जमत नव्हतं. एवढ्या कौतुकाने बोलावली गेलेली प्रेस कॉन्फरन्स एकदमच संपवली गेली. जगभराच्या वार्ताहरांना सामोरं जाण्याची तयारी नव्हती, हे बबरकच्या उत्तरांवरून, त्याच्या पद्धतीवरून सिद्ध झालंच होतं. मग हा घोळ घातला कशाला हे कळलंच नाही. रशियन सैन्य अफगाणिस्थानात घुसले, त्याच्यानंतर दोनच दिवसांनी मॉस्को रेडिओने बातमी दिली होती की, " प्रेसिडेन्ट अमीनच्या मागणीनुसार आमचे सैन्य अफगाणिस्थानात पाठवले गेले."

बबरकनेही सुरुवातीला तसेच सांगितले होते. पण ते उत्तर अडचणीचे ठरल्यावर पुन्हा उत्तर फिरवलं गेलं. या घुसखोरीला, घटनात्मक बैठक, मान्यता असल्याचा त्यांचा दावा असा हास्यास्पद ठरला होता.

याचा वचपा काढायचा म्हणूनच की काय, चारपाच दिवसांनंतर लगेच दुसरी प्रेस मुलाखत बबरकने घेतली. तीसुद्धा संपूर्ण वेळ टी. व्ही.वर दाखवली गेली. पहिल्या कॉन्फरन्सला शंभराच्या आसपास पत्रकार आले होते, तर दुसऱ्या प्रेस कॉन्फरन्सला वीस पंचवीसजणच उपस्थित होते. आणि ते सगळेच समाजवादी देशांतून आलेले किंवा समाजवादी वृत्तपत्रांचे पत्रकार होते. हसतमुखानं पत्रकारांचं स्वागत करीत बबरक म्हणाला, " आज आपले मित्रच इथं आले असल्याकारणाने आजची प्रेस मुलाखत चांगली होईल अशी मला खात्री वाटते."

सगळे पत्रकार मित्रच आहेत म्हटल्यावर ती प्रेस मुलाखत कशी काय होणार याची कल्पना अगोदर आलीच. आणि झालंही त्याचप्रमाणे. सगळे मिळून सात आठच प्रश्न विचारले गेले. प्रश्नसुद्धा साधे, सोपे, बबरकला हवे तसेच होते.

" रशियन सैन्य परत कधी जाणार ?" " तुमचं परराष्ट्र धोरण काय राहणार आहे ?" " किती लोकांना तुम्ही तुरुंगातून सोडलंत ?" अशा पद्धतीचे प्रश्न विचारले गेले.

त्यांची उत्तरेही तशीच निरुपद्रवी होती. ' गरज संपली की रशियन सैन्य परत

जाईल.' 'अलिप्ततावादाचेच आमचे परराष्ट्रीय धोरण आहे.' 'तुरुंगात असलेल्या सगळ्या कैद्यांना आम्ही सोडलं'....वगैरे वगैरे.

भारतातल्या 'न्यूएज' या डाव्या विचारसरणीच्या मासिकाच्या वार्ताहराने विचारले, "बांगला देशपासून मध्यपूर्वेपर्यंतच्या सर्व देशांचे कोणते भवितव्य तुम्हाला दिसते आहे?"

त्यावर बबरकने पटकन उत्तर दिले, "या सर्व देशांत एकतेची भावना येईल अशी आशा वाटते. या संपूर्ण भागात क्रांती घडवून आणण्याची आशा आम्ही करतो आहोत."

त्यानंतर कोणी प्रश्नच विचारीना. तेव्हा बबरक म्हणाला, "मला वाटतं, तुमचे प्रश्न संपले आहेत. मी आता तुमची रजा घेतो; आणि माझ्या क्रांतिकार्याला लागतो." असं म्हणून बबरकने सगळ्या वार्ताहरांचे आभार मानले आणि तो निघून गेला.

हे सगळं प्रकरण वीसपंचवीस मिनिटांत संपलंदेखील!

या दोन्ही प्रेस बैठकांची भरपूर टवाळी अफगाण लोक करीत होते. त्यांना चेष्टा करायला आणखी एक विषय म्हणजे, तराकीच्या बायकोने कार्टरला पाठवलेलं पत्र. आणि बबरकने– अफगाण सरकारने सी. आय. ए.ला पाठवलेलं पत्र.

रशियन सैन्य अफगाणिस्थानात शिरले म्हणून अमेरिकेनं आग पाखडायला सुरुवात केली. तेव्हा तराकीच्या बायकोनं कार्टरला पत्र लिहिलं की, "पूर्वी माझ्या नवऱ्याला–तराकीला मारून अमीन सत्तेवर आला. तेव्हा तुम्ही गप्प बसलात. त्या 'जल्लाद' (फाशी देणारा मांग) अमीनचे हात हजारो लोकांच्या रक्ताने माखलेले आहेत. अशा जुलमी अमीनला मारलं म्हणून आता मात्र तुम्ही एवढा कांगावा करीत आहात. हे तुम्हाला शोभतं का?"

खुद्द बबरकने खुमेनीला पत्र लिहिले, "तुम्ही अमेरिकेचे शत्रू आहात. आम्हीसुद्धा अमेरिकेचे शत्रू आहोत. तुम्ही आम्ही सच्चे मुसलमान आहोत. आपण एकमेकांचे मित्र आहोत. भाऊभाऊ आहोत. अमेरिकेविरुद्ध लढण्यासाठी तुम्हाला लागेल ती मदत द्यायला आम्ही तयार आहोत."

पाठोपाठ रशियानेही खुमेनीला सर्व तऱ्हेची मदत देण्याची इच्छा प्रगट केली.

रशियन सैन्य अफगाणिस्थानात घुसले. त्यानंतर साम्राज्यवादी बंडखोरांविरुद्ध लढायला आलेलं हे सैन्य, बंडखोरांचे अड्डे असलेल्या पाकिस्तान सीमेकडे न जाता, थेट इराणच्या सीमेकडे, हेरतजवळ गेले होते ही गोष्ट आवर्जून लक्षात ठेवण्यासारखी आहे. म्हणजे मग बबरकने, ऐतिहासिक शत्रुत्व असलेल्या इराणच्या खुमेनीला लिहिलेल्या पत्राचं आणि रशियाने इराणला देऊ केलेल्या सर्वतोपरी मदतीचं रहस्य कळतं.

बबरकने दुसरं पत्र सी. आय. ए.च्या मुख्य कचेरीला लिहिले होते. अमीन हा सी. आय. ए.चा हस्तक होता. याची बबरकला एवढी खात्री वाटत होती की,

त्याच्यासंबंधाने सगळी हकीगत कळावी, सगळे कागदपत्र, पुरावे मिळावेत, म्हणून बबरकने थेट सी. आय. ए.च्या मुख्य ऑफिसला पत्र लिहिले, " ज्या अर्थी अमीन हा सी. आय. ए.चा हस्तक होता त्या अर्थी त्याच्या वरची फाइल, इतर कागदपत्रे, पत्रव्यवहार तुमच्याकडे असलाच पाहिजे. तेव्हा ती फाइल आणि इतर कागदपत्रे ताबडतोब पाठवून द्यावी ! ही बातमी देऊन टी. व्ही.ने सांगितले की, आता त्यांच्याकडून लेखी कागद पुरावे आले की आम्ही ते पुरावे जनतेसमोर सादर करू."

यासंबंधात सी. आय. ए.च्या संबंधित माणसाकडे व्हॉइस ऑफ अमेरिकाने विचारणा केली असता ' नॉनसेन्स ' एवढंच उत्तर त्यानं दिलं.

## माणूस वेडा का होत नाही ?

गावातल्या ताज्या अफवा सांगण्यासाठी हुसेन आला होता. तो सांगत होता की, पाकिस्तानात अफगाणिस्थानचे सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत म्हणे. मदत अर्थातच अमेरिका करणार आहे. दुसरी अफवा म्हणजे जाहीरशहाचा मुलगा पाकिस्तानात आलेला आहे. आणि तोही आता वेगवेगळ्या पक्षांशी संधान बांधतो आहे.

" पण जर समजा, तोच उद्या बबरकला प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहिला तर तुम्ही लोक त्याला पाठिंबा द्याल का ? म्हटलं तरी तो जुलमी नादीरशहाचा मुलगा आहे."

यावर हुसेन म्हणाला, " आम्हाला इख्वानी नकोत. आम्हाला मार्क्सवादीही नकोत. तिसरा पक्ष डोळ्यांसमोर नाही. सरकारविरुद्ध लढणारे सहा पक्ष आहेत. त्यांचं आपापसांत मुळीसुद्धा पटत नाही. अशा वेळी, जर कोणत्याच राजकीय पक्षात रस नसलेला जाहीरशहाचा मुलगा पुढे आला तर त्याला मान्यता देणारे पुष्कळ लोक निघतील. शिवाय नाही म्हटलं तरी अजून किती तरी लोकांना राजेशाहीचं कौतुक, प्रेम आहेच. नव्या जमान्यात जुनी राजेशाही, नवीन स्वरूपात मिळाली तर सगळ्यांना हवीच आहे. त्यामुळे अफगाण लोक त्याला मान्यता देतील. पण प्रश्न आहे तो राजकीय पक्षांचा. ते मान्यता देतील की नाही याचा."

सरकारने तुरुंगातून सोडलेल्यांमध्ये त्याचा मोठा भाऊ सुटून आलाय. पण वडिलांचा काहीही पत्ताच नाही. ते जिवंत आहेत की नाहीत तेही त्यांना माहीत नाही. मग म्हणाला, " तुरुंगातून इतक्या बायका सुटून आल्या आहेत, त्यांची संख्या पाहून आम्हालासुद्धा आश्चर्यच वाटलं ! इतक्या बायकांना, मुलींना कशासाठी तुरुंगात टाकलं होतं ? आमच्या बायका तर बिचाऱ्या पडद्यात वावरणाऱ्या आहेत. शहर गावातल्या मूठभर बायकांनी बुरखा काढून टाकलाय, त्या नोकऱ्या करतात. पण म्हणून काही त्या युरोपिअन बायकांप्रमाणे राजकारणात भाग घेत नाहीत. त्यांना कशाला पकडलं ? बरं

पकडलं तर पकडलं, पण... तुम्हाला माहीत आहे का, तुरुंगातून सुटून आलेल्यांपैकी ऐंशी टक्के बायका गरोदर आहेत. काय भयंकर अत्याचार हा! आणि वर या दुर्दैवी बायकांना सहानुभूती दाखवण्यासाठी, त्यांना मदत करण्यासाठी म्हणून सरकारने त्या बायकांची सोय लावण्यासाठी, ठिकठिकाणी दवाखाने उघडले आहेत!"

हे ऐकून सुन्न झाले मी. केवढी भयानक परिस्थिती होती ही. या बायका आता काय करतील? त्यांच्या घरातल्या माणसांनी त्यांचा स्वीकार केला असेल का? कोण त्यांच्याशी लग्न करील? समाजामध्ये अशा बायकांना कोणतं स्थान मिळेल? माझ्या पांढरपेशा मनाला असंख्य प्रश्न पडले.

हुसेन म्हणाला, "मी स्वतः त्यांच्यापैकी कुणा एकीशी लग्न करायला तयार आहे. तिनं ॲबॉर्शन करून घेतलं पाहिजे; आणि जर काझीसमोर तिनं सांगितलं की तिच्या इच्छेविरुद्ध, मताविरुद्ध तिच्यावर जबरदस्ती झाली, अत्याचार झाला आहे, तर मी तिच्याशी लग्न करीन."

आम्हाला हुसेनचं फार कौतुक वाटलं. पण तसं काही बोलायला लागल्यावर तो म्हणाला, "मीच नव्हे तर माझ्यासारखे किती तरी लोक अशा लग्नाला तयार आहेत. का तयार आहेत माहीत आहे का? एक पैसाही न देता आम्हाला बायका मिळतील म्हणून. नाही तर मला 'चांगल्या' मुलीसाठी किती तरी पैसे मोजावे लागले असते. तेवढा पैसा माझ्याजवळ असता तर आत्तापर्यंत माझे लग्न झाले नसते का? आता एक पैसाही खर्च करावा लागणार नाही. उलट त्या मुलींवर, तिच्या कुटुंबावर उपकार केल्यासारखंच होईल. जन्मभर ते लोक माझे ऋणी राहतील. शिवाय मला माझं घर, संसार, बायको, मुलं, सगळं काही मिळेल. असं हे साधं गणित आहे."

त्याच्या या साध्या गणितामागे केवढं मोठं विदारक आर्थिक सत्य आणि सामाजिक कटुता भरलेली होती!

तुरुंगात गेलेल्यांच्या मुलाखती टी. व्ही.वर दाखवतात. नेहमीच. त्यामध्ये पुरुष, बायका तर होत्याच, पण एकदोनदा तर ७–८ वर्षांची मुलंही होती! १२–१३ वर्षांची मुलं तर सर्रास पकडून नेलेली होती. त्यांनी सांगितलेल्या तुरुंगातील छळाच्या हकिगती अंगावर शहारे आणणाऱ्या होत्या. तो कार्यक्रम पाहताना असं वाटायचं, इतका छळ सोसून ही माणसं जिवंत कशी राहिली? त्यांना वेड कसं लागलं नाही? इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही जिवंत राहण्याची धडपड करण्याएवढा मनुष्यप्राणी चिवट आहे का? जीवनातले कोणते धागे त्याला वेड लागू देत नाहीत? शरीराचा अतोनात छळ चालू असताना, मनाच्या कोणकोणत्या अवस्था होत असतील? कशा होत असतील? कोणती दुर्दम्य आशा शरीर आणि मनाचा समतोल संभाळून ठेवत असेल?–की हा सगळा शारीरिक छळ, मानसिक कोंडलेपणा याचीही सवय होते? त्या गोष्टीसुद्धा काही दिवसांनी अंगवळणी पडतात? मनुष्याच्या जीवनाचं हे काय कोडं आहे?

असा विचार करतानासुद्धा डोकं फिरायची वेळ यायची. या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळणं अशक्य होतं. पण तारेकचे अनुभव ऐकल्यानंतर काय होत असावं याची कल्पना आली.

तारेकचं सगळं घराणंच आर्मी जनरल्सचं. त्याचा आजा हा अमानुल्लाच्या फौजेत जनरल होता. इंग्रजांशी केलेल्या युद्धात याने खूप मोठा पराक्रम गाजवला होता. म्हणून त्याच्या नावाचे स्मारक काबुलमध्ये बांधलेले आहे. तारेकचा बापही जाहीर-शहाच्या फौजेत जनरल होता. त्याचे भाऊ सैन्यामध्ये छोटे मोठे अधिकारी आहेत. हा मात्र मुकादमी करतो. जेमतेम शालान्त परीक्षा यानं दिलेली आहे. शिक्षणाचा कंटाळा म्हणून पुढे शिकलाच नाही. म्हणून मग सैन्यामध्येही अधिकारी दर्जा मिळाला नाही. एक वर्ष सैन्यामधली आवश्यक सेवा—नोकरी केल्यानंतर सैन्याबद्दलही त्याला जिव्हाळा वाटेनासा झाला. मग एखाद वर्षाचा चित्रकलेचा कोर्स करून स्वारी मुकादमी करायला लागली.

दाऊदला मारल्याच्या आठव्या दिवशीच त्याच्या घरातल्या सगळ्या पुरुषांना पकडून नेलं होतं. आणि पुलेचरखी इथल्या तुरुंगात ठेवलं होतं. हळूहळू त्या तुरुंगातली गर्दी वाढत चालली होती. जेमतेम आडवं होता येईल एवढीच जागा प्रत्येकाला मिळायची. रोजच्या रोज ट्रकमधून माणसं तुरुंगात आणली जायची. एकदा मध्यरात्रीला १५० माणसांना घेऊन एक टक आला. त्या माणसांना कुठल्या कोठडीत बंद करायचं म्हणून ट्रकबरोबरचा माणूस जेलरला विचारू लागला. तुरुंगाधिकारी म्हणाला, “ आता एका माणसालाही जागा नाही. सगळ्या कोठड्या गच्च भरल्या आहेत. या माणसांना घेऊन तू दुसरीकडे कुठे तरी जा.”

यावर त्या दोघांची बाचाबाची चालू झाली. तुरुंग अधिकारी होता तो तिथं आला. हा माणूस पक्षाचा होता. त्यानं या अडचणीतून सोपा मार्ग काढला. त्या सगळ्या दीडशे माणसांना ओळीनं उभं केलं, आणि त्यांच्यावर मशिनगनच्या फैरी झाडल्या, आणि सगळ्यांना मारूनच टाकलं !

रात्रीच्या शांततेत त्यांची भांडणं, आरडाओरडी, मशिनगनचे आवाज, मरणाऱ्यांचं कण्हणं, सगळं काही तारेक आणि त्याच्या बरोबरच्या कैद्यांना ऐकू येत होतं ! तारेक म्हणाला, “ पुलेचरखी हा खूप मोठा तुरुंग आहे. आमच्या विभागातच नव्हे तर सगळ्याच विभागांतून असे प्रसंग अधूनमधून घडायचे.”

कैद्यांमध्येसुद्धा सरकारने हेर मिसळलेले असत. त्यामुळे कैदी आपापसांतही बोलत नसत. कारण काही बोललं की, लगेच वरच्या अधिकाऱ्यांना कळवलं जायचं. तारेक म्हणाला, “ दीड वर्षामध्ये मी आपल्या वडिलांशी, भावांशीसुद्धा बोललो नव्हतो. इतर कुणाशीही एक शब्द बोललो नाही.”

कैद्यांनी माहिती सांगावी म्हणून त्यांना भयंकर छळत. त्यांच्या घरच्या बायकांना आणून त्यांच्यासमोर पुरुषांना छळत. आणि माहिती सांगा, म्हणून बायकांना सांगत.

आणि जर तुम्ही काही सांगितलं नाहीत तर तुमच्यादेखत तुमच्या बायकांवर अत्याचार करू म्हणून धमकी देत. पुष्कळदा ही नुसती धमकी न राहता, प्रत्यक्षातही तसे घडत असे. दिवसाला फक्त अर्धी नान आणि एक कांदा त्यांना खायला मिळायचा. आणि सर्वसाधारणपणे अफगाण माणूस दिवसभरात कमीतकमी चार नान खातो. शिवाय मटण, फळे, भाज्या ते वेगळंच. महिनोन् महिने चाललेली ही उपासमार आणि छळ यामुळे किती तरी लोकांना वेड लागलं होतं. पण ज्यांचे काही तरी लागेबांधे कुठे तरी पोचत होते, किंवा ज्यांच्याकडे जेलच्या अधिकाऱ्यांना द्यायला भरपूर पैसा होता, त्यांना आपापल्या घरून जेवणखाण येत असे. त्यांचा छळही होत नसे.

रोज सकाळी हजेरी व्हायची. जेलच्या शिपायानं कैद्याचं नाव घेतलं की त्यानं 'साब' म्हणायला हवं, हा दंडक होता. एकदा हजेरी सुरू असताना, एकाला 'साब' म्हणायला क्षणभराचाच उशीर झाला, तेव्हा त्याला तिथल्या तिथेच गोळी घालून ठार करण्यात आलं. आणि इतरांना दहशत बसावी म्हणून त्याचं प्रेत दिवसभर तिथंच पडलेलं होतं.

रात्र पडली की, कैद्यांना घेऊन जात. आणि त्यांच्या छळाला सुरुवात व्हायची. रात्रभर पुलेचरखी कैद्यांच्या किंकाळ्यांनी, रडण्याने, आणि अधिकाऱ्यांच्या ओरडण्याने, शिवीगाळीने, बंदुकीच्या आवाजाने गाजायची. रात्री कुणालाही झोप लागत नसे. बराकीमध्ये बंद असलेले सगळेच्या सगळे हजारो कैदी, छळ चाललेल्या कैद्यांच्या किंकाळ्या, ओरडा ऐकत जागेच असायचे. आपली पाळी कधी येते, याची प्रत्येकाला सतत धास्ती वाटायची. एकदा 'चौकशी' करून झाली की प्रकरण संपत नसे. पुन्हा पुन्हा, त्यांच्या मनाला येईल तेव्हा ते कैद्यांना घेऊन जात. सतत अर्धपोटी, अपुऱ्या कपड्यांमध्ये काबूलसारख्या भयंकर थंडीत कुडकुडणारा ( काबूलचं तपमान ऐन थंडीत –२९ असतं ) कैदी सतत भीतीच्या, मृत्यूच्या छायेत वावरत असे. नमाज पढण्याची कैद्याला बंदी होती.

एकदा एक कैदी लपवून आणलेलं कुराण वाचत होता. ते लक्षात येताच पहाऱ्यावरच्या शिपायानं ते कुराण पायदळी तुडवलं आणि म्हणाला, "आता तुझा अल्ला काय करतो ते पाहूच दे मला ! आपल्यासारख्या गरीबांचं भलं अल्ला करणार नाही तर समाजवादच करील हे लक्षात ठेव."

जेलचा मुख्य अधिकारी पक्षकार्यकर्ता होता. तो आपल्या खोलीत बसून माइकसमोर सतत मार्क्सवादावर बोलायचा. मार्क्सवाद कसा गरीबांचं कल्याण करणारा, सामाजिक न्याय देणारा आहे वगैरे वगैरे तो सारखं सांगायचा. जेलमध्ये ठिकठिकाणी लाउड-स्पीकर्स लावले होते. त्यावरून सगळ्यांच्या कानावर ते भाषण गेलं पाहिजे अशी व्यवस्था केली होती. पण कैद्यांसमोर येऊन त्याने एकदाही भाषण केले नाही. कैद्यांचा छळ जेवढ्या सातत्याने सुरू होता, तेवढ्या सातत्याने ब्रेन वॉशिंगचाही प्रयोग सतत चालू असायचा.

सुरुवातीला काही महिने दहा वर्षांखालच्या मुलांना आपापल्या आयांबरोबरच बराकीत कोंडून ठेवत असत. पण नंतर मुलांना वेगळ्या बराकींत ठेवायला लागले. त्या वेळी अगदी तीन-चार वर्षांच्या मुलांनाही त्यांच्या आयांपासून दूर नेलं. दुसऱ्या बराकीत नेल्यावर सगळ्या मुलांना सांगिगलं की तुमची आई, बाप, भाऊ-बहिणी सगळे जग मेले आहेत. आयांना सांगितले, तुमची मुलं मेली आहेत म्हणून. अशा स्थितीत एकदा बराकी बदलताना एक आई आणि तिची पाच वर्षांची मुलगी अगदी समोरासमोर आल्या. छळामुळे भकास, भयंकर दिसणाऱ्या आपल्या 'मेलेल्या' आईला असं एकदमच समोर पाहून ती मुलगी मानसिक धक्क्यानं तिथल्या तिथंच नेली! आपल्या मुलीची ती अवस्था पाहून आईला वेड लागलं. तारेक म्हणाला, "किती तरी वेळा अशा भयंकर गोष्टी घडायच्या. ज्या दिवशी असं काही कळायचं तेव्हा कैदी नान खायचे नाहीत. उपास करायचे. त्या न खाल्लेल्या नानचे छोटे छोटे तुकडे करून ते तुकडे हातानं मळून त्याचे मणी आम्ही करीत होतो. अशा मण्यांच्या माळा प्रत्येक कैद्याकडे होत्या! त्याच माळांची 'तस्बे'–जपाची माळ करून आम्ही जप करीत होतो. वेडं होणाऱ्या डोक्याला, मनाला सावरण्याचा प्रयत्न करीत होतो."

लहान लहान मुलांनासुद्धा त्यांनी आपापल्या आईबापांबद्दल सांगावं म्हणून छळीत. अगदी मोठ्या माणसांच्या शिक्षा त्या पोरांना देत. मोठ्या मुलांनी कसाबसा तग धरला होता. पण लहान मुलं मात्र बिचारी किती तरी मरून गेली. जेव्हा कुणा एखाद्या लहान मुलाचा असा मृत्यू झाल्याचं कळत असे तेव्हा कैदी संतापानं, असहायपणानं रडत, गजावर रक्त येईपर्यंत, बेशुद्ध पडेपर्यंत आपलंच डोकं आपटून घेत. तारेक म्हणाला, "आम्ही जिवंत राहिलो, आम्हाला वेड लागलं नाही हा खरोखरच एक चमत्कारच आहे. कधी कधी मी जिवंत आहे, माझं डोकं फिरलं नाही हे माझं मलाच खरंही वाटत नाही."

बदक्षान प्रांतातला एक कुणी मलीकझाद नावाचा सरदार सरकारला नकोसा झाला होता. त्याच्या शोधावर गेलेल्यांनी चुकून मुलेकझाद नावाच्या एका ८० वर्षांच्या गरीब माणसाला पकडून आणले. तो मलीकझाद एवढा महत्त्वाचा माणूस होता की, 'मुलेकझाद' या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्याला हेलिकॉप्टरने काबूलला आणलं. आपल्याला ही अशी 'स्पेशल ट्रीटमेन्ट' का मिळते आहे ते त्या गरीब बिचाऱ्या मुलेकझादला कळलंच नाही. मात्र 'चौकशी' सुरू झाल्यावर लगेच ध्यानात आलं त्याच्या. आर्मीचे लोक आणि तो स्वतः यांच्यामधला संवाद असा असायचा :

पोलीस : तू समाजाचा शत्रू आहेस. गरीब शेतकरी, कामगारांचा तू शत्रू आहेस.

मुलेकझाद : पण तुम्ही तर त्यांचे मित्र आहात असं स्वतःला म्हणवता. मग माझ्यासारख्या गरीब कामगाराला तुम्ही का तुरुंगात टाकलंत? तुम्ही समाजवादी, कम्युनिस्ट लोक कामगारांनाही छळता का?

पोलीस : आम्ही खरोखरचे समाजवादी आहोत. म्हणूनच तुझ्यासारख्या सरदाराला पकडले आहे. तुझ्यासारखे जमीनदारच गरीबांची, कामगारांची पिळवणूक करतात.

मुलेकझाद : जर मीच सरदार असतो, तर तुम्ही मला पकडायच्या अगोदर मीच तुम्हाला पकडलं असतं. मी अगदी गरीब शेतमजूर आहे. तुम्ही माझ्यासारख्या गरीबांना, कष्टकऱ्यांना छळता, तुम्हीच खरे गरीबांचे शत्रू आहात.

तारेक सांगत होता, हाच संवाद सकाळ-संध्याकाळ सतत चालायचा. आम्हाला सर्वांनाच तो संवाद तोंडपाठ झाला होता. इतका की, त्या प्रकरणाच्या गंभीरपणाला विनोदाची झालर लागली होती. मुलेकझादसुद्धा ऐंशी वर्षांचा होता. पण त्यांच्या छळाला पुरून उरला होता. शेवटी आठ महिन्यांनंतर तो खरा सरदार, मलीकझाद त्यांना सापडला तेव्हा त्यांनी या मुलेकझादला एके दिवशी सोडून दिलं आणि ' आता घरी जा ' म्हणून सांगितलं.

तेव्हा मुलेकझाद म्हणाला, " तुमच्या चुकीमुळे तुम्ही मला सरदार समजून हेलिकॉप्टरनं आणलंत. आता मला तुम्ही हेलिकॉप्टरनेच माझ्या गावी सोडून दिलं पाहिजे. सगळीकडे लढाई चालूच आहे. मी जाणार कसा ? " दोन दिवस तो जेलच्या अधिकाऱ्यांशी भांडत होता, एवढी त्याची हिंमत होती. पुढे मग निघून गेला बिचारा ! काय झालं त्याचं कुणास ठाऊक !....

तारेक तीन तास आपल्या तुरुंगवासातले अनुभव सांगत होता. तो इतका बेहोष झाला होता की, सगळा वेळ सोफ्याच्या कडेवर बसूनच घडाघडा बोलत होता. झपाटलेल्या माणसासारखा बोलत होता. चहाचा घोट घेतानाच जे काय त्याचं तोंड मिटेल तेवढंच.

" तुरुंगातून सुटल्याचा आनंद ? तो फक्त क्षणभरच झाला. बाहेर आल्यावर कळून चुकलं की, आपण लहान तुरुंगातून मोठ्या तुरुंगात आलो आहोत. इतके लोक सोडलेत पण अजून हजारो लोक तुरुंगात आहेत. आता काही दिवसांनी पुन्हा एकदा तुरुंगभरती चालू होईल. मला राजकारणातलं काहीही कळत नाही. मला कोणता वादही कळत नाही. मला एवढंच कळतं की, इतक्या माणसांना हे असं मारणं, असं धरणं हे पाप आहे. जगातलं कोणतं तत्त्वज्ञान असं माणसांना मारायला सांगतं ? सांगत असेल तर ते तत्त्वज्ञानच चूक म्हणायला पाहिजे. राक्षसी, सैतानी तत्त्वज्ञान आहे ते !

" दीड वर्ष तुरुंगात काढल्यावर मला आता एवढं कळायला लागलं आहे की, राजेशाही असू दे, लोकशाही असू दे, भांडवलवाद असू दे, नाही तर समाजवाद असू दे, सगळ्यांना आपली सत्ता टिकवण्याचीच फक्त काळजी असते. त्यासाठी मग ते काय वाटेल ते करायला तयार होतात. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून जाहीरशहा, दाऊदखान, तराकी, अमीन आणि आता बबरक यांमध्ये काय फरक

आहे ? बाकीचे निदान बबरकसारखे देशद्रोही तर नव्हते ? त्यानं तर परक्यांनाच आपल्या देशात आणलं आहे. पेपरवाले काय वाटेल ते छापतात. पण तुम्ही स्वत: इथली परिस्थिती पाहिली आहेच. मी तुम्हाला काय काय सांगितलं आहे. इतर लोकही तुम्हाला आपापल्या हकीगती सांगत असतात. तुम्हाला जसं दिसलं तसं लिहा. बबरकनं आपल्या प्रेस बैठकीमध्ये सांगितलेल्यावर विश्वास ठेवू नका. हिंदुस्थानातल्या लोकांना खरं काय झालं, काय होतं आहे ते कळू दे. रशियन सैन्य तुमच्या देशात आलं की काय होतं ते त्यांना कळू दे." तारेक अगदी तळमळून बोलत होता. किती सांगू आणि किती नको अशी त्याची स्थिती झाली होती. म्हणाला, "जगाचं आमच्याकडे लक्षच नाही. अमेरिकेचा आम्हाला काहीही उपयोग नाही. उलट कार्टर आमचा उपयोग स्वतःच्या फायद्यासाठी करून घेतो आहे. अमेरिकेचा काही भरंवसा नाही. २५ वर्षांनंतर अमेरिका, व्हिएटनामला रशियन कुत्र्यांसमोर टाकून निघून गेली. अमेरिका काय, रशिया काय, चीन काय– सगळे सारखेच. आमच्यासारख्या लहान, दुबळ्या देशांवर टपलेले.... आपल्याच गुर्मीत असलेले, सतत गुरगुरत असलेले." माझ्या मनात आलं, अश्युवित्झ, सैबेरिया इथल्या कैद्यांच्या छळामुळे गदगदा रडणाऱ्या जगाला पुलेकिरतीमधल्या कैद्यांच्या छळाबद्दल काहीही वाटत नाही. का ? ते काळे आहेत म्हणून ? अशियन आहेत म्हणून ? ते गरीब आहेत म्हणून ? ती काय माणसं नाहीत ?"

गार झालेला चहाचा कप एका घोटात संपवून तारेक पुन्हा सांगू लागला, "एकदा अम्नेस्टी इंटरनॅशनलचे लोक तुरुंग पाहायला येणार होते. म्हणून सगळा तुरुंग आमच्याकडून साफसूफ करून घेतला. अगदी घरच्यासारखा साफ केला. मग प्रत्येक बराकीमध्ये मोजकेच कैदी ठेवले. आम्हाला बाकीच्यांना डोंगरावर घेऊन गेले. त्या वेळेला ३६ तास आम्ही हजारो माणसांनी, ऐन थंडीत, अंथरुणापांघरुणाशिवाय उघड्यावर काढले. त्या वेळेस किती तरी जणांनी पळून जायचा प्रयत्न केला. पण मशिनगनधारी किती तरी शिपाई आमच्यावर नजर ठेवून होते. ज्यांनी पळून जायचा प्रयत्न केला त्यांना सरळ गोळ्या घालून ठार मारण्यात आलं.

"परत आल्यानंतर आम्हाला कळलं की बराकीत राहिलेल्यांना त्या ३६ तासांत कसलाही त्रास दिला नव्हता. उलट त्यांना जेवायखायला भरपूर दिलं होतं. चिलाव, पुलावसुद्धा दिला होता. अंथरुण-पांघरुणसुद्धा दिलं होतं ! मला एवढा हेवा वाटला त्या लोकांचा... गेल्या दीड वर्षात पोटभर जेवल्यावर कसं वाटतं, हातपाय पसरून शांतपणानं झोपल्यावर कसं वाटतं, मनात भीती नसते तेव्हा मनाला दुसरं काय वाटत असतं, या सगळ्या साध्यासुध्या गोष्टी आम्ही विसरूनच गेलो होतो. आम्हाला आशा होती की, आम्ही आज नाही उद्या सुटू, तुरुंगातून बाहेर पडू. अशी आशा का वाटत होती– याला काहीही कारण नाही; पण वाटत होती खरी. म्हणूनच आम्ही जिवंत राहिलो, वेडे झाले नाही."

२७ डिसेंबरच्या रात्री जेव्हा काबुलमध्ये रशियन सैन्यानं आपला अंमल बसवला तेव्हा तुम्हाला काही कळलं का ? किंवा त्याच्या अगोदर काही कल्पना होती का ? असं विचारल्यावर तारेक सांगू लागला,

"त्या दिवशी संध्याकाळी गावात गडबड चालू झाली त्याच वेळी रशियन शिपाई जेलमध्येही आले. आल्याआल्या काही न बोलता त्यांनी गोळीबारच सुरू केला. दोन चार शिपाई मेल्यावर बाकीच्या शिपायांनी घाबरून, 'आम्ही दोस्त आहोत, आम्ही दोस्त आहोत', असं ओरडायला सुरुवात केली. त्यांनी हातातल्या बंदुका खाली टाकून दिल्या आणि ते हात वर करून उभे राहिले. तेव्हा रशियन सैनिकांनी भराभरा सगळ्या अधिकारी, रखवालदार, शिपाई.... सगळ्यांना गोळा करून नेलं. आणि ठिकठिकाणी रशियन सैनिक उभे राहिले. त्या रात्रीच आम्हाला सांगण्यात आलं की, आता अमीनला मारून बबरक प्रेसिडेन्ट झाला आहे. आमच्यामध्ये जे परचमी होते त्यांना अतिशयच आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी परचम पक्षाचे कार्यकर्ते जेलमध्ये आले. तेव्हाच जवळ जवळ निश्चित झालं होतं की, परचमी कैद्यांना सरकार सोडून देणार आहे. ताबडतोब परचमी लोकांच्या नावांच्या याद्या तयार करणं सुरू झालं. जे उघडउघड परचमी होते त्यांचा काहीच प्रश्न नव्हता. पण बाकीच्यांनासुद्धा आपलं नाव त्या यादीत यावं असं वाटत होतं. म्हणून मग आपण परचमी आहोत हे सांगावं म्हणून रखवालदाराला किंवा परचमी कैद्याला लाच देणं सुरू झालं. आपलं नाव परचमी लोकांच्या यादीत यावं म्हणून त्या दिवशी लाखो आफगाणींची लाच दिली गेली. पण मग शनिवारी सकाळी ११ वाजल्यापासूनच थोड्या थोड्या लोकांना सोडायला सुरुवात झाली. आणि नंतर मग सगळ्यांनाच एकदम सोडले. आत्तापर्यंत तीस हजार कैद्यांना सोडलं असावं. तरी अजून दहा हजार लोक तरी पुलेचरखीमध्ये असतील. आणि आता थोडे दिवस गेले की पुन्हा नव्यानं तुरुंगभरती चालू होईल. पुन्हा एकदा कैद्यांचा अतोनात छळ चालू होईल. पुन्हा नव्या दमानं माणसं मारली जातील. तराकी जाऊन अमीन आला किंवा अमीन जाऊन बबरक आला म्हणून आमच्यासारख्यांना काय फरक पडणार आहे ?"

## हे सोपे नाही

प्रेसिडेन्ट बबरक कारमल, यानं घेतलेल्या दोन्ही प्रेस मुलाखती, 'ती' तीन पत्रं, या गोष्टी एवढ्या पोरकटपणाने हाताळल्या गेल्या म्हणून बबरकची, अफगाण सरकारची भरपूर टिंगल करणारी माणसं, दुसऱ्या एका गोष्टीमुळं चकित झाली आहेत. भयभीत झाली आहेत. आता शाळकरी मुलांना मार्क्सवादाचे धडे रोज दिले जातात. जुनी समाजव्यवस्था, जुनी मूल्ये, यांच्याविरुद्ध पद्धतशीर शिक्षण मुलांना दिलं जातं. एवढंच नव्हे तर आता आपल्या आईबापांविरुद्ध इतर नातेवाईक, शेजारी यांच्या विरुद्ध हेरगिरी

करण्याचं तंत्र त्यांना शिकवलं जातं आहे. तुमचे आईबाप, भाऊबहिणी, इतर नातेवाईक सरकारला नावं ठेवतात का ? आपापसांत काय चर्चा करतात ? तुम्हाला सरकारविरुद्ध काही शिकवतात का ? टी. व्ही. पाहताना, रेडिओ ऐकताना ते काय काय बोलतात ? याचा शोध घेण्याचं शिक्षण मुलांना दिलं जातं. जर अशी ही माहिती गोळा करून तुम्ही आम्हांला सांगितलीत तर आम्ही तुम्हाला बक्षिसं देऊ. तुम्हाला अभ्यास न करता परीक्षेत चांगले मार्क देऊन पास करू. तुम्हाला परदेशात पाठवू. तुमचा फायदा सरकार करून देईल. असं या मुलांना सांगितलं जातं.

'आम्हाला असं असं शाळेत सांगितलं—' म्हणून या मुलांनी आज घरी येऊन आपल्या आईबापांना सांगितलं आहे. पण उद्या बक्षिसाच्या आशेनं, अभ्यास न करता परीक्षेत पास होण्याच्या आशेनं ही मुलं उद्या घरच्यांबद्दल शाळेत जाऊन सांगणारच नाहीत याची खात्री आता आईबापांनाच वाटेनाशी झाली आहे.

* * *

काबूल इन्टर कॉन्टिनेन्टल हे हॉटेल गावाच्या पश्चिमेला एका छोट्याशा टेकडीवर आहे. एक मुख्य रस्ता हॉटेलकडे वर जातो. खाली पायथ्याशी दाट लोकवस्ती आहे. घरं, दुकानं वगैरे. या सगळ्यांना जोडणाऱ्या छोट्या छोट्या गल्ल्या, दळणवळणांचे रस्ते आहेत. एके दिवशी भर दुपारी त्या एकाच मोठ्या रस्त्यावरून दोघे रशियन अधिकारी पायीच जात होते. तेव्हा त्यांना कोणी तरी सुऱ्यानं भोसकून मारलं.

काही मिनिटांतच तो सगळा भाग रशियन सैनिकांनी गजबजून गेला. सगळे लहानसहान रस्ते, बारीकसारीक गल्ल्यासुद्धा रशियन सैनिकांनी भरून गेल्या. रहदारी एकदम बंद झाली. आणि पाठोपाठ रशियन सैनिक प्रत्येक घराची, दुकानांची कसून झडती घेऊ लागले. इंच न् इंच त्यांनी विंचरून काढला. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्याच्याबद्दल संशय घेता येईल असा एकही माणूस त्यांना सापडला नाही. घराघरांत फक्त बायकाच होत्या.

तेव्हा एक अडचण रशियनांच्या लक्षात आली की, इथल्या पडदापद्धतीमुळे रशियन सैनिकालासुद्धा कुणाच्याही घरात शिरून, घराची तलाशी घेणं, बुरख्याआडची बाईच आहे की पुरुष हे पाहणं अशक्य होतं. तो खुनी इथंच कुठं तरी आहे हे माहीत असूनही त्या दिवशी त्यांना काहीच करता आलं नाही. जर का त्यांनी पडदा पद्धतीचा अवमान केला असता तर मग मात्र कधी नव्हेत अशा मारामाऱ्या काबूलमध्ये झाल्या असत्या. तेवढं धारिष्ट्य रशियनांकडे नव्हतं. याचा एकच परिणाम झाला, म्हणजे— रशियाने लौकरच स्त्री-पोलिसांची रवानगी अफगाणिस्थानात केली.

इथलं सततच बिघडत चाललेलं वातावरण, इतर देशांनी आपापल्या लोकांना मायदेशी परत पाठवून देणं, अफगाणिस्थानवरच्या चर्चेच्या वेळी यूनोमधलं भारतीय प्रतिनिधीचं भाषण, त्यावरच्या उलटसुलट प्रतिक्रिया आणि त्यानंतरचंही भारत सरकारचं

अफगाणिस्थानबद्दलचं गुळमुळीत धोरण, या सर्वांचा परिणाम म्हणून की काय कुणास ठाऊक, पण भारतीय शासनाने आता इथे काम करणाऱ्या भारतीय तंत्रज्ञांना हळूहळू, पण निश्चितपणे परत बोलावण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रत्येक खात्यातील दोनचार दोनचार माणसांना भारतामध्ये परत जाण्यास सांगण्यात आले. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे एकजण परत गेला की, त्याच्या जागेवर दुसऱ्याला पाठवण्याची तयारी सुरू होई. पण या वेळी तशी आश्वासनेही वेगवेगळ्या अफगाण खातेप्रमुखांना मिळाली नाहीत. परत जाणाच्या भारतीयांची संख्या नजरेत भरेल एवढी जास्त होती. एखाददुसऱ्या खात्यामध्ये तर एकही भारतीय सल्लागार शिल्लक राहणार नव्हता. रशिया सोडून इतर राष्ट्रांचे सल्लागार तर केव्हाचेच परत गेले होते. आता भारतीयही परत जात होते. हे प्रकरण साधं नाही, ही गोष्ट अफगाण अधिकाऱ्यांच्या ताबडतोब लक्षात आली.

आमचे जेव्हा इकडे परत येण्याचे ठरले तेव्हा मुकुंदाच्या कार्यालयाचा प्रेसिडेन्ट कधी नव्हे तो स्वतः मुकुंदाच्या खोलीत येऊन विचारू लागला, "भारतीय तंत्रज्ञांनी इथं काम करावं, आम्हाला मदत करावी या बाबतीतलं भारत सरकारचं धोरण बदललं आहे का? एकापाठोपाठ, जवळजवळ सगळ्याच लोकांना परत पाठवल्यानंतर, आम्ही त्याचा काय अर्थ घ्यायचा? हा प्रश्न फक्त मलाच नव्हे तर सर्वच खात्यांना पडला आहे."

मुकुंदाने वकिलातीच्या उच्चाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्याला प्रेसिडेन्टचं म्हणणं सांगितलं. कारण हा प्रश्न काही लोकांना परत पाठवलं याचा नाही; तर या गोष्टीला राजकीय रंग चढतो. काहीही कारण न देता इतक्या मोठ्या संख्येनं जर तंत्रज्ञांना परत पाठवलंत तर त्याचा अर्थ भारत सरकारचा सध्याच्या अफगाण सरकारवर विश्वास नाही असाच घ्यायचा का? किंवा यापुढे, ही अशा तऱ्हेची मदत दिली जाणार नाही, असा अर्थ होतो का?

नेमक्या याच गोष्टी, प्रत्यक्ष काहीही न बोलता भारताला कृतीने अफगाण सरकारला सांगायच्या आहेत का? तोच हेतू आहे का? की फक्त आपल्या नागरिकांची सुरक्षितता एवढाच हेतू परत बोलावण्यामागे आहे?

अफगाण लोकांची यामुळे जर गैरसमजूत होत असेल तर ती दूर करण्याची जबाबदारी आपल्या वकिलातीची नाही का?

या सगळ्या गोष्टी मुकुंदाने सांगितल्यावर तो उच्चाधिकारी अत्यंत निर्मळपणानं म्हणाला, "त्यांना काय वाटतं हा त्यांचा प्रश्न आहे. आम्ही काही केलं की त्यांच्यापैकी कुणीही उपटसुंभानं उठावं आणि भारत सरकारच्या हेतूबद्दल शंका घ्याव्यात याला काय अर्थ आहे? त्यांचं शंकासमाधान करायला वकिलात मुळीच बांधलेली नाही."

पण हा प्रश्न कोणाच्या तरी शंकांचं वकिलातीनं समाधान करणं एवढ्यापुरताच मर्यादित नव्हता, याचं भानच वकिलातीच्या लोकांना नव्हतं. अफगाण सरकारला, लोकांना, त्यांचं आपापसांत शत्रुत्व असलं तरी त्या दोघांनाही भारताबद्दल विशिष्ट प्रेम

आहे. आपलेपणा आहे. आधार आहे. भारताच्या मतांना इथे किंमत आहे, आदर आहे. असं असताना इतक्या सहजपणानं, क्षुल्लकपणानं त्या लोकांना का दुखवायचं ? हेतू तोच असता तर काहीच प्रश्न नव्हता. पण तसे कसलेही धोरण नसताना तसं मत होऊ देणे हे केवढं तोट्याचं आहे याची कल्पना संबंधित अधिकाऱ्यांना यायला नको का ? पण त्याबाबत काहीही करायला आपल्या वकिलातीची तयारी नव्हती, ही गोष्ट आम्हाला अत्यंत तापदायक वाटली.

## जिवावर बेतले तेव्हा

चांगल्या गोष्टींप्रमाणे वाईट गोष्टींचीही सवय लगेच होते. काहीही कारण नसताना एकदमच जेट फायटर्सची दणदणत चालू होणारी वाहतूक, अचानक एकदमच गोळीबार सुरू होणं, कोणी तरी कोणाला तरी रिव्हॉल्वरनं गोळी घालणं, पाठोपाठ कुठून तरी क्षणातच जीप येऊन जखमी माणसांना उचलून नेलं जाणं, या सगळ्या गोष्टी भयंकरच आहेत. पण रोज रोज या गोष्टी पाहून त्यांचीही सवय झाली आम्हाला. त्याबद्दल विशेष असं काही वाटेनासं झालं. फक्त त्या त्या घटनांची मनात नोंद तेवढी होत होती. पण एखादे वेळेस आपण स्वतःच जेव्हा अशा प्रसंगात अडकतो तेव्हा, इतके दिवस झालेली सवय फुकटच गेली असं म्हणावं लागतं.

एक दिवस, संध्याकाळी फिरून घरी परतत असताना, रस्त्यात एकजण भेटले. आपल्या गाडीत मुलांना बरोबर घेऊन ते आमच्याच घरी निघाले होते. तेव्हा त्यांच्या-बरोबर, दाटीवाटीने गाडीत बसून आम्ही घरी निघालो. आमच्या गल्लीत वळलो तर घराच्या अलीकडे १० पावलांवरच दोन गाड्या आडव्या, उभ्या, अशा रस्त्यातच ताटकळत होत्या. ऐन थंडीचे दिवस असल्यामुळे रस्त्यात भरमसाठ बर्फ साठलेलं होतं. आम्हाला वाटलं त्या गाड्या रस्त्याकडेला सारून ठेवलेल्या बर्फात फसलेल्या आहेत. त्या गाड्यांच्या आगेमागे तिघेजण उभे होते. आणि त्यांचा आपापसांत काही तरी आरडाओरडा चालला होता. बर्फात अडकलेल्या अशा गाड्या बाजूला काढणं अतिशय कष्टाचं आणि वेळखाऊ काम असतं. म्हणून मुकुंदा त्याच्या मित्राला म्हणाला, " आम्ही इथंच उतरतो. तू जा परत. पोराबाळांना घेऊन कुठं बर्फात चालत येतोस ? उद्या ये."

असं म्हणून मुकुंद पुढच्या दाराने झटकन खाली उतरलादेखील. मी मागच्या दाराने उतरत होते आणि त्याच वेळी आम्ही सर्वांनी, मुकुंदपासून ३–४ फुटांवर उभ्या असलेल्या त्या अफगाण माणसाच्या हातात पिस्तुल पाहिलं! त्याने ते मुकुंदावरच रोखलेलं होतं !

पिस्तुल... पिस्तुल... गाडीत ये... असं काही तरी बडबडत, कशी कोण जाणे पण मीसुद्धा मुकुंदशेजारी जाऊन उभी राहिले.

"इथं कशाला आलात?" त्या माणसानं दरडावून आम्हाला विचारलं.

"ते काय ते....ते आमचं घर... आम्ही घरी जातोय आमच्या." आम्ही दोघांनीही एकदम घाईघाईनं उत्तर दिलं.

आमचं वेगळ्याच उच्चारातलं, मोडकं तोडकं फारसी, माझी साडी बघून त्यानं मग अस्खलित उर्दूमध्ये विचारलं, "आप हिंदुस्थानी है?"

"हां... हां...."

"तब तो आप हमारे दोस्त है. आपको डरनेकी कोई बात नहीं. जाइये...आप अपने घर जाइये..."

एवढ्या वेळात आमचा मित्र आमच्या मागे जाऊ लागला होता. पण तेवढ्यात पाठीमागून दुसरी गाडी गल्लीत शिरत होती. मित्राची गाडी मागे जाता जाता थांबली, मागच्या गाडीतल्या ड्रायव्हरनं बहुधा त्या माणसाच्या हातातलं पिस्तुल पाहिलं असावं; कारण तो गल्लीत शिरता शिरताच मागल्या पावली परत फिरला. त्या क्षणभरात पिस्तुल-धारी आणखी पुढे सरकला होता. पण मग पाठोपाठ दोन्ही गाड्या रिव्हर्स घेऊन निघून गेल्यावर, आम्ही दोघंच त्या पिस्तुल रोखलेल्या माणसासमोर उभे होतो.

"आप जाइये... चले जाइये..." त्याच्या बोलण्यात घाई वाटली. आता त्याचं पिस्तुल आमच्यावर रोखलेलं नव्हतं, तरी ते अजूनही त्याच्या हातातच होतं. पण त्याच्या उर्दू बोलण्यावरुन, पिस्तुलाचा रोख बदलल्यामुळे एक खात्री झाली होती की, हा माणूस काही आता आपल्याला मारणार नाही. म्हणून धीर येऊन मुकुंदने त्याला विचारलं, "तुमची गाडी बर्फात अडकली आहे का?"

"अं?.... हो.... हो."

"मग मी मदत करू तुम्हाला? तू जा ग घरी." असं मला दटावल्यासारखं सांगून मुकुंदने गाडीच्या मडगार्डला धरून गाडी वर उचलायचा प्रयत्न चालवला. त्याबरोबर मग इतर दोघे गाडी वर उचलू लागले. पण ती गाडी मुळी बर्फात अडकलेली नव्हती. शिवाय ती गाडी भयंकर जड होती. तसूभरही उचलली जात नव्हती. त्या गाडीत बरंच ओझं असावं असं मुकुंदाला वाटलं. पाच दहा मिनिटं उगाचच खटपट केल्यानंतर तो रिव्हॉल्व्हरवाला पुन्हा आपलं पिस्तुल नाचवीत मुकुंदला म्हणाला, "अब बहोत हो चुका... आप जाइये.... अपने घर जाइये.... चले जाना..." आता पुन्हा एकदा त्याच्या बोलण्यात हुकुमत होती.

मुकुंदा घरी आल्यावर आम्ही आमच्या घरातले दिवे बंद केले आणि खिडक्यांचे पडदे बाजूला सारून बाहेर पाहू लागलो. त्या गाड्यांच्या डिकीतलं सामान काढून आमच्या शेजारच्याच घरात नेणं चाललं होतं. ते काय सामान होतं ते काही कळलं नाही. पण २०-२५ मिनिटं त्या गाड्या तिथं उभ्या होत्या.

त्या गाड्यांची काय भानगड होती ते अर्थातच आम्हाला नक्की कळलं नाही. आमचे फक्त अंदाज होते की कसलं तरी भूमिगत काम चाललं होतं. शस्त्रास्त्रं, किंवा

असलंच काही तरी चोरून आणलं गेलं होतं. म्हणूनच त्या गाडीचं वजन एवढं जास्त वाटलं होतं. ज्या अर्थी त्या माणसाच्या हातात अगोदरपासूनच पिस्तुल होतं त्या अर्थी आपल्याला कुणाकडून तरी धोका आहे. आपला पाठलाग वगैरे होण्याची शक्यता आहे याची त्यांना अपेक्षा असावी. किंवा ते स्वतःच कुणाच्या तरी येण्याची वाट पाहात, दबा धरून बसले असावेत. आम्ही मध्येच टपकल्यामुळे त्यांचा बेत कदाचित बिघडला असावा.

तुम्ही भारतीय आहात, आमचे मित्र आहात असं तो म्हणाला होता, याचा अर्थ ते लोक सरकारी होते की बंडखोर ? कारण सर्वसाधारणपणे भारतीय माणसाला दोघेही मित्रच मानतात.

त्या वेळेस त्यानं आम्हाला नीटपणानं न पाहताच गोळी झाडली असती तर ? किंवा चुकून ट्रिगरवरचं बोट दाबलं गेलं असतं तर ? किंवा बर्फात पाय निसटून मुकुंदा धडपडला असता तर हा माणूस आता आपल्यालाच काही तरी करतोय असं समजून त्यानं गोळी झाडली असती तर ? मुकुंदा अत्यंत शांतपणानं त्याच्याशी बोलत होता, तसं न बोलता घाबरून घाईघाईनं काही सांगताना, त्याचाच संशय येऊन, किंवा आम्ही पाकिस्तानी आहोत असं समजून त्यानं जर रिव्हॉल्व्हर झाडलं असतं तर ?....

...या सगळ्या जर–तर ना एकच उत्तर होतं, आणि ते फार भयंकर होतं !

त्या दिवशी ज्या घरात गाडीतलं सामान हालवलं जात होतं, त्याच घरातला कोणी तरी काही दिवसांनी मरण पावला होता. त्याचा जनाजा काढलाच नाही. गाडीतून शवपेटी नेली गेली. आमचा घरमालक त्या घरच्या माणसांना जाऊन भेटून आलेला दिसला. म्हणून नंतर मग मी मुरादअलीला विचारलं, कोण मेला ? आजारपणानं वगैरे मेला की त्याला कुणी मारलं ? तो सरकारी माणूस होता की बंडखोरांपैकी होता ?

मुरादअली म्हणाला, "कशाला आता आपल्या डोक्याला त्रास करून घेतेस ? महिन्या दोन महिन्यांत तुम्ही परत जाणार आता. अफगाणिस्थानातले तुमचे दिवस हे एक फार वाईट स्वप्न होतं असं समज."

पण ती एक अशक्य गोष्ट होती.आजूबाजूला इतक्या भयंकर गोष्टी नित्य घडत असताना, त्या विसरण्याचा प्रयत्न करणं हेसुद्धा अशक्य होतं.

रात्रीचे आठ वाजले की प्रत्येक चौकाचौकात रणगाडे येऊन उभे राहायचे. प्रत्येक रणगाड्या चार रशियन्स दोन अफगाण शिपाई असत. रात्री अकरापासून संचारबंदी सुरू झाली की त्यांची गस्त सुरू व्हायची. आपल्या फ्लॅटशेजारीच रोज येऊन उभ्या राहणाऱ्या रणगाड्यामधल्या शिपायांशी आमच्या शेजारच्या गृहस्थांची ओळख झाली. आपल्या फ्लॅटच्या गॅलरीत येऊन उभं राहिलं की, रणगाड्यामधले शिपाई आणि तो समोरा-समोर यायचे. महिन्या दीड महिन्याने ते दोघे एकमेकांना 'सलाम' वगैरे करू लागले. क्वचित कधी सिगरेट, पाणी यांची देवाण-घेवाण झाली.

एक दिवस दोघे रशियन सैनिक याच्या दाराशी येऊन याला विचारू लागले,

" आम्हाला ' प्यायला ' देशील का ? " जर्मन भाषा त्या सगळ्यांना येत असल्यामुळे भाषेचा प्रश्न पडला नाही.

त्या दोघां रशियन सैनिकांना ' नाही ' म्हणायचा त्याला धीर झाला नाही. एखादादुसरा पेग मारून ते जातील अशा कल्पनेनं त्यानं त्या दोघांना घरात घेतलं. त्यांनी व्हिस्कीची एक संपूर्ण बाटली संपवली. त्या वेळी रात्रीचे दहा वाजले होते. तेव्हा त्यांच्यांपैकी एकजण बाहेर गेला आणि त्यानं बाकीच्या चौघांना बोलावून आणलं. आणखी ग्लासेस, व्होडका, रम, व्हिस्कीच्या बाटल्या बाहेर आल्या. त्यांचं पिणं थांबेच ना. तेव्हा ' यजमान ' घाबरला. मित्राला फोन करतो असं म्हणून त्यानं भारतीय वकिलातीच्या फर्स्ट सेक्रेटरींना फोन करून सगळी हकीगत सांगितली. तेव्हा सेक्रेटरी म्हणाले, " घाबरू नकोस; अकरा वाजले की ते लोक आपापल्या कामावर जातील."

पण तसं झालं नाही. ते लोक पीतच राहिले ११ वाजून गेले तरी. यजमानांनी पुन्हा फोन केला. काहीही करून या लोकांना माझ्या घरातून घालवा म्हणून विनंती केली. उद्या जर माझं काही बरंवाईट झालं तर त्याला तुम्हीच जबाबदार ठराल असं सांगितलं. माझ्या माघारी बायको–मुलांना त्यांची आठवण काढत मी गेलो असा निरोप द्यायला सांगितला...

मग मात्र धावपळ सुरू झाली. पण एकदा संचारबंदी सुरू झाल्यावर घराबाहेर पडायचे धारिष्ट कोण दाखवणार ? राजदूतापर्यंत ही खबर पोचवली गेली. संचारबंदीच्या काळात काही मदत लागली तर अफगाण सरकारने आम्हा सगळ्यांनाच एक इमर्जन्सी फोन नंबर देऊन ठेवला होता. त्या नंबरवर सेक्रेटरींनी स्वतः फोन केला. पण त्या फोनवरच्या माणसांना जेव्हा कळलं की या प्रसंगामध्ये चार रशियन्स गुंतलेले आहेत. तेव्हा त्यांनी वेगवेगळी कारणं दाखवून मदतीला माणसं पाठवण्याचं नाकारलं. पहाटे पाच वाजता पिऊन तर्रर झालेले ते सहाजण आपली बैठक मोडून उठले. त्यांनी आपापले ग्लासेस धुऊन पुसून ठेवले. दिवाणखाना आवरून ठेवला. आणि यजमानांचे आभार मानून ते सहाहीजण आपल्या रणगाड्यांवर स्वार होऊन निघून गेले. तेव्हा यजमानांचा नर्व्हस ब्रेक डाउन झाला होता ! भीतीनं. त्यांना हॉस्पिटलमध्ये हालवावं लागलं.

या प्रसंगाने आम्हा भारतीयांना कळून चुकले की, असा काही अनवस्था प्रसंग इतर कुणावरही आला तर भारतीय दूतावास, अफगाण सरकार, कोणीही, कसलीही, कोणतीही मदत करू शकत नाही. कारण त्यामध्ये रशियन्स गुंतलेले होते. जर यजमानांच्या घरी त्यांची बायको, मुली असत्या तर ? योगायोग म्हणूनच केवळ त्या भारतात होत्या. पण इतरांवर कुणावर असा प्रसंग गुदरला तर ?... तर कोणीही मदतीला येणार नव्हतं याची खात्रीच झाली होती. या प्रसंगामुळे सगळ्यांच्याच– भारतीयांच्या, अफगाण लोकांच्याही तोंडचं पाणी पळालं होतं. बड्यांच्या राजकारणात बळी जाणाऱ्या सामान्यांचा कोणी वाली नसतो ! आपल्या देशात, आपल्या लोकांमुळे जेव्हा परके घुसतात तेव्हा सर्वसामान्यांना अत्यंत मानहानीचं, लाजिरवाणं जिणं जगावं लागतं !

सतत परकीयांच्या बंदुकीच्या धाकाखाली वावरावं लागतं. मुलीबाळींना ' त्याच्या 'शी मैत्री ठेवावीच लागते. आणि राष्ट्राध्यक्षांपासून अगदी कनिष्ठ नोकरदारांपर्यंत सर्वांनाच हळूहळू परकीयाचेच हुकूम पाळावे लागतात. स्वतःवरचा अधिकारही गमावून बसावा लागतो. कसल्याही तक्रारीला जागाच उरत नाही. अलीकडे अलीकडे तर रात्रीची दुकानं लुटण्याची, दुकानांची चोरी करून आगी लावून देण्याचे प्रकार किती तरी वाढलेत. पण तक्रार कुणाकडे करायची ? जे चोर आहेत त्यांच्याकडेच ?

एके दिवशी भर दुपारी एका हातगाडीवाल्याला शिपाई घेऊन जाताना पाहिलं. त्याला ओढून घेऊन जाणारे शिपाई अफगाणच होते. पण त्यांच्यावरचा अधिकारी रशियन होता. रस्त्यावरचे दोनचारशे लोक थिजून जागच्याजागी उभे होते. तो ठेलेवाला रडत ओरडत होता. आक्रान्त करीत होता. पण पुढे होऊन " याला का घेऊन जाता ? " म्हणून विचारायची एकाचीही हिंमत झाली नाही. त्या हातगाडीवाल्याचा तो असाहाय्य आक्रोश पाहून माझ्या डोळ्यांना पाणी आलं; ते पाहून मी ज्या दुकानात उभी होते तो दुकानदार मला म्हणाला, " बीबी, कशाला रडतेस ? ही आमची क्रांती आहे बरं, क्रांती ! "

## अल्ला-हो-अकबर

कंदाहारला ऐतिहासिक महत्त्व खूप असलं तरी एकदा अफगाणिस्थानची राजधानी कंदाहारहून काबूलला आल्यावर कंदाहारचं महत्त्व गेलं ते गेलंच. या लहानशा शहरात फक्त दोनच मोठे रस्ते आहेत. बाकी सगळ्या धुळीनं भरलेल्या गल्ल्याच. नाही म्हणायला १५–२० वर्षांपूर्वी अमेरिकेनं कंदाहारला खूप मोठा विमानतळ बांधून दिला होता तो आहे. त्या वेळेस अमेरिकन मदतीनं दक्षिण-पश्चिम अफगाणिस्थानात हेलमंड नदीवर धरण बांधायचं काम चालू होतं. तेव्हा येणाऱ्या जाणाऱ्या अमेरिकन लोकांना सोपं पडावं म्हणून हा विमानतळ बांधला गेला होता. अर्थात मुख्य हेतू असा होता की, जो जुना व्यापारी मार्ग ' सिल्करूट ' होता, त्याचे पुनरुजीवन करावे. कंदाहार हे आशिया आणि युरोप यांमधलं खूप मोठं व्यापारी ठाणं करण्याचा बेत अमेरिकेच्या मनात असावा. आणि त्या वेळच्या अफगाण सरकारची अर्थातच त्याला मान्यता होतीच. त्यामुळेच कंदाहारचा विमानतळ हा एक प्रचंड मोठा, सुसज्ज प्रकार आहे.

पण गाव अगदी छोटंसं. शांत. इथं असलेल्या हिंदू व्यापाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. सातआठ कुटुंबे तर थेट, अफगाणिस्थानात इस्लाम आला त्याच्याही अगोदरपासूनची आहेत. हे मुख्यतः व्यापाऱ्यांचं गाव असल्यामुळे राजकारणापासून तसं दूर. त्यामुळे जाहीरखानला पदच्युत करून दाऊदखान आला, दाऊदखानला मारून तराकी आला, तराकीला मारून अमीन आला, तेव्हा कंदाहारमध्ये खळबळ अशी माजलीच नाही. काबूलमध्ये काय घडत होतं, त्याचं समाजवादी सरकार आलं

म्हणून त्याचं त्यांना फारसं सोयरसुतक नव्हतं. कारण त्यांच्या आयुष्यात काहीही फरक झाला नव्हता. हळूहळू मुजाहिद, इख्वानी लोकांच्याच कारवायांना सुरुवात झाली होती. तीसुद्धा प्रत्यक्ष कंदाहार शहरात फारच कमी, आजूबाजूच्या छोट्या छोट्या खेड्यांतून, वस्त्यांवर, मारामाऱ्या चालू होत्या. क्वचितच कधी बंडखोर यायचे आणि गावातल्या सरकारी कचेरीवर धाड घालून, हाताला येईल ते, काय सापडेल ते घेऊन जायचे. बस्स. एवढीच गडबड तिथं व्हायची.

पण अमीनला मारून बब्रक सत्तेवर आला, आणि येताना रशियन सैन्यालाही घेऊन आला. काबूल शहर सगळं रशियन फौजेनं काबीज केलं होतं. ठिकठिकाणच्या लष्करी ठाण्यांवर रशियन्स पोचले होते. तेव्हा मात्र कंदाहारमध्ये खळबळ माजली. म्हणजे जवळ जवळ सगळ्या व्यापाऱ्यांनी आपापली कुटुंबं बाहेर पाठवली. हिंदूंनी भारतात, तर मुस्लिम व्यापाऱ्यांपैकी काहींनी पाकिस्तानात, तर काहींनी भारतात. व्यापार-धंदा आपोआपच कमी होत चालला होता. जवळपासचा जो काय पैसा होता तोही लोकांनी बाहेर पाठवला.

रशियन सैन्याच्या आगमनानंतर इख्वानी, मुजाहिद, कंदाहर शहरात आले आणि त्यांनी आपल्या कारवाया चालू केल्या. सुरुवातीलाच त्यांनी काफरांच्या विरुद्ध म्हणजे रशियनांच्या विरुद्ध कारवाया चालू केल्या. त्यांच्याविरुद्ध जिहाद पुकारला. संध्याकाळ झाली की, ‘ अल्ला हो अकबर ’च्या आरोळ्या उठू लागल्या. दुकानं, ऑफिस बंद ठेवण्याचा आदेश मिळाला. ऑफिसं तर रडत खडत कशी बशी चालू राहिली. म्हणजे १–२ दिवस बंद असत, पण मग परत चालू व्हायची. चालू असली तरी दुपारी एक-दोनलाच लोक निघून जायचे. पण दुकानं मात्र सतत बंद होती. अर्थात पुढचं दार बंद ठेवून मागच्या दाराने हव्या त्या वस्तू मिळत असत.

कंदाहारनंतर काही दिवसांनी जलालाबादही चार-आठ दिवस बाजार बंद करून बसले होते. पण कंदाहार, जलालाबादकडे सरकारने मुळी लक्षच दिले नाही. मग बंडखोर काबूल शहरात आले. भूमिगत पत्रकं वाटणं जोरात चालू झालं. जिहादची हाक देण्यात आली. आणि एक दिवस संध्याकाळच्या नमाजाच्या वेळी ठिकठिकाणी लोक आपापल्या घरांच्या छपरांवर चढून अल्ला हो अकबरची आरोळी ठोकू लागले.

ती आरोळी प्रथमच ऐकली तेव्हा अंगावर साप कोसळल्यासारखं वाटलं. ‘ अल्ला-हो-अकबर ’ ही आरोळी एकदम फाळणीच्या वेळेचीच आठवण करून देते. काश्मिरी, पंजाबी, सिंधी लोकांना तर या आरोळीनं चांगलंच अस्वस्थ केलं होतं. “ ही आरोळी ऐकली की आम्हाला काय वाटतं याची कल्पनाही येणं तुम्हाला शक्य नाही.” ते लोक म्हणत.

‘ अल्ला-हो-अकबर ’ ओरडणाऱ्यांची संख्या भराभर वाढली, पण लगेच कमीकमीही होत गेली. असं ओरडणं म्हणजे आपल्या मनातल्या संतापाला वाट करून देणं होतं. पण याचा काहीही उपयोग नाही हे कळणारे जास्त होते. पुष्कळदा

बंडखोरांच्या आणि सरकारच्या धाकाने काय करावं हेच लोकांना कळत नसे.

आरेफच्या घराच्या दोन्ही बाजूंना पक्षकार्यकर्त्यांची घरं होती. एक दिवशी संध्याकाळी बंडखोरांपैकी एकजण त्याच्या घरी गेला आणि म्हणाला, " तू ' अल्ला-हो-अकबर ' ओरडत का नाहीस ? तू सरकारचा चमचा आहेस. इस्लामवर तुझा विश्वास नाही ? तू काफरांना सामील आहेस. जर का तू ओरडला नाहीस तर तुझ्या घरावर बॉम्ब टाकू." आरेफ साफ घाबरून गेला. प्रार्थनेची वेळ होताच, त्याचे म्हातारे आई-बाप, व भाऊ सगळे घराच्या छपरावर जाऊन आरोळी देऊन आले. पण ते खाली येतात तर दोन्ही बाजूंचे दोन पक्षकार्यकर्ते शेजारी हातात पिस्तुलं घेऊन त्याच्यासमोर उभे. आरेफला म्हणाले, " ज्या अर्थी तू ओरडलास त्या अर्थी तुम्ही सगळे बंडखोरांना सामील आहात. तुला जिवंत ठेवता उपयोगाचा नाही. अस्तनीतला साप निघालास तू ! "

आरेफ अगदी रडकुंडीला आला. त्यांची विनवणी करू लागला. म्हणाला, " मी काय करू ? मी जर ओरडलो नसतो तर त्यांनी माझ्या घरावर बॉम्ब टाकला असता. मी ओरडलो तर तुम्ही मला मारता. मी काय करू ? "

त्याला दमदाटी करून शेजारी निघून गेले.

' अल्ला-हो-अकबर 'चा उत्साह कमी होऊ लागल्यावर बंडखोरांनी ' काबूल बंद 'चा आदेश दिला. तशी पत्रकं वाटली गेली. प्रत्येक दुकानात जाऊन दुकान मालकाला बजावून सांगण्यात आलं की, " जर तू दुकान बंद ठेवलं नाहीस तर तुला आम्ही मारू. दुकान जाळून टाकू...." प्रत्येक ऑफिस बंद राहिलं पाहिजे, कोणीही कामावर जाता उपयोगाचं नाही. शाळा—कॉलेजं बंद राहिलीच पाहिजेत, अशा धमक्या देण्यात आल्या. प्रत्येक घराच्या उंबरठ्यामध्ये तशी पत्रकं ठेवण्यात आली. त्याप्रमाणे २१ फेब्रुवारी १९८० ला सगळं काबूल शहर संपूर्णपणानं बंद पडलं होतं. ऑफिसं, दुकानं, शाळा—कॉलेजं सगळं काही बंद होतं. फक्त नानची दुकानं तेवढी उघडी होती, बाकी सगळे व्यवहार बंद पडले होते. पण सकाळी आठ-साडेआठ वाजल्यापासूनच गोळीबाराचे आवाज ऐकू यायला लागले होते, त्या अर्थी सगळं काही सुरळीत चाललं नव्हतं. हळूहळू हे आवाज वाढू लागले. दिवसभर कुठे कुठे गोळाबारी चालूच होती.

दुसरा दिवस शुक्रवार, सुट्टीचाच दिवस. त्या दिवशी सकाळपासूनच बायकांचे, मुलांचे, पुरुषांचे मोर्चे निघणार आहेत असं बंडखोरांनी आदल्या दिवशीपासूनच जाहीर केलं होतं. त्याप्रमाणे मोर्चे निघाले. अल्ला-हो-अकबरच्या आरोळ्या ऐकून, गलबला ऐकून आम्ही घराबाहेरच फूटपाथवर येऊन उभे होतो. शेजारच्याच घरातून मुरादअली, त्याची सून, मुलगा, नातू हेही सगळे बाहेर येऊन उभे होते. पलीकडच्या रस्त्यावरून जाणारा मोर्चा ऐकू येत होता पण दिसत नव्हता; पाहायची तर इच्छा होती. तसं आम्ही दोघी आपापसांत बोलत होतो. तेव्हा मुरादअली म्हणाला, " पळा मग.... मी बघतो तुमच्या घराकडे.... " मग आम्ही सगळेच पळत पळत मुख्य रस्त्यावर गेलो.

अडाणी दिसणाऱ्या, नखशिखान्त बुरखे घातलेल्या, सुशिक्षित आधुनिक कपडे

घातलेल्या, आणि डोक्याला रुमाल गुंडाळून बुरख्याची लाज राखणाऱ्या, कडेवरच्या मुलांना संभाळत शेकडो बायकामुली अल्ला-हो-अकबरच्या घोषणा देत शांतपणानं चालल्या होत्या. लहान लहान मुलंमुली मोर्चात होती, पुरुष होते, हिरवी पागोटी घातलेले इख्वानी, मुजाहिद होते. ते लोक तर मोर्चाच्या अग्रभागी होते. मोर्चातल्या बायकांनी तर आम्हालाही मोर्चामध्ये बोलावले; पण आम्ही बुरखा तर घातला नव्हताच, पण डोक्याला गुंडाळायला रुमालही आमच्याकडे नव्हता. म्हणून ते राहूनच गेलं. परत येताना सिकंदरा म्हणाली, माझ्याकडे रिव्हॉल्व्हर असतं तर मी निदान एका तरी रशियन माणसाला नक्कीच ठार मारलं असतं.

शहराच्या वेगवेगळ्या भागांतून हे मोर्चे निघाले होते. सगळ्यांना अर्ग महालावर जायचं होतं. बबरक तिथं राहतो म्हणून. पण नंतर कळलं की, बबरक रशियन वकिलातीतच राहतो आहे. तरी पण ते सगळे मोर्चे अर्ग महालाकडे निघाले. मोर्चे पांगवण्यासाठी पोलिसांनी हेलिकॉप्टर्समधून काही आकाशातच बार काढले, तर काही वेळा गोळीबारही केला. आश्चर्य म्हणजे त्या दिवशी रस्त्यांवर एकही रशियन सैनिक नव्हता. अफगाण शिपाई ठायी ठायी भरपूर होते. तरी पण मोर्चे, घोषणा देणं चालूच राहिलं. तेव्हा मग जुन्या शहरात, जिथे बंडखोरांचे अड्डे आहेत अशी सरकारला शंका होती, त्या ठिकाणी मोर्चावर भरपूर गोळीबार करण्यात आला. मोर्चाच्या अग्रभागी चालणारे सगळे मुल्लामौलवी पळून गेले, किती तरी पुरुष, बायका-मुलं जखमी झाली, मेली; त्यामुळे मुल्लांवर लोक अतिशय संतापले होते.

पोलिसांनी काही ठिकाणी घराघरांत शिरून लोकांना मारलं. तरी सर्वसाधारणपणे पाहता सरकारने बरेच समजुतीने घेतले. सरसहा सगळीकडेच गोळीबार, धरपकड केली नाही. नाही तर त्याच दिवशी काबूलमध्ये हाहाकार माजला असता. दुसऱ्या दिवशी सरकारनेच सुट्टी जाहीर करून तणातणी होण्याचा प्रसंगच टाळला. पण रेडिओ, टी. व्ही.वरून, हेलिकॉप्टर्समधून पत्रकं वाटून लोकांची केवढी गैरसोय होते आहे, मोर्चातल्या लोकांनी कुणाकुणाची दुकानं लुटली, कुणाच्या गाड्या जाळल्या, त्यामुळे जनतेचंच नुकसान झालं आहे, असे सरकार सतत सांगत होते. भांडवलदारी अमेरिका, पाकिस्तान, इराणच्या प्रचाराला बळी पडू नका, त्यामध्ये तुमचंच नुकसान आहे. तुम्ही कमकुवत झालेलेच त्यांना हवे आहे. अशा तऱ्हेचं सांगणं सांगून सांगून सरकार समाजाला समजावते आहे. हे संपाचं मोर्च्याचं प्रकरण भडकू न देण्याचा प्रयत्न करत होते.

अशा तऱ्हेचे संप, बायका-मुलांनीसुद्धा भाग घेतलेले हे मोर्चे, हे सगळं अफगाणिस्थानात अघटित अशी घटना होती. पूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणावर असा संप, मोर्चा कधी निघाला नव्हता. तीन दिवसांच्या संपूर्ण हरताळानंतर, मोर्चानंतर, हळूहळू दुकानं उघडली. ऑफिसं चालू झाली. दैनंदिन आयुष्य नेहमीसारखे झाले. तरी पण लोकांच्या मनातला रशिया-द्वेष वाढतच चालला होता. शिवाय रशियन फौजेची

वागणूकही नेक राहिली नाही. संचारबंदी सुरू झाली की दुकानं फोडून सामान लुटण्याचे प्रकार व्हायला लागले होते. संचारबंदी अकरा वाजता सुरू होते, तरी नऊ वाजल्यानंतर कोणी माणूस रस्त्यात दिसला की त्याचं घड्याळ, बूट, कोट काढून घेणं सुरू झालं!

## जगावे कोणी?

बबरक कारमल पुन्हा पुन्हा टी. व्ही.वर येऊन लोकांशी बोलू लागला. दर वेळी आपल्या भाषणाची सुरुवात 'बिसमिल्ला'नं करतो. दोस्ताने अझीझ–लाडक्या मित्रांनो, म्हणतो, वतनपरस्तानूं–देशावर प्रेम करणाऱ्यांनो, असं म्हणून आपल्या देशबांधवांच्या भावनांना आवाहन करतो. "आपला देश अतिशय संकटात आहे, भांडवलदारांच्या कारवायांना बळी पडू नका, आपल्या देशाचे नुकसान करू नका, साम्राज्यवाद्यांच्या कारवाया संपल्या की रशियन सैन्य परत जाणार आहे. ते आपले खरे दोस्त आहेत, आपल्या संकटकाळात आपल्याला मदत करण्यासाठी ते इथं आले आहेत. मी पण तुमच्यासारखाच सच्चा मुसलमान आहे. सच्च्या मुसलमानांना 'अमन'–शांती हवी असते. अमेरिकेचे हस्तक असलेल्या, पळपुट्या मुल्लांच्या भरीला पडून बंडखोरीची कृत्यं करू नका, त्याने आपले वतन कमकुवत होईल...."

गोंधळाच्या आवर्तात आपल्या देशाला सांभाळायचा, भडकलेल्या लोकांना समजावण्याचा, बबरक आटोकाट प्रयत्न करतो आहे. पण आता लोकांचा कोणावरच विश्वास बसत नाही. पायंडा म्हणाला, "गेली पंधरा वर्षे हा बबरक, 'मी कम्युनिस्ट आहे. मी कम्युनिस्ट आहे' म्हणून आम्हाला ओरडून सांगत होता. पण हा जाहीरशहाला, दाऊदखानला सामील म्हणून आम्ही याच्यावर विश्वास ठेवला नव्हता. यानं रशियन सैन्य इथं आणलं तेव्हा आमचा विश्वास बसला. आता हा आम्हाला सांगतोय की तो सच्चा मुसलमान आहे, आणि त्याला वाटतं की आम्ही लगेच त्याच्यावर विश्वास ठेवावा. कसं शक्य आहे ते? यानं जर पुन्हा पंधरा वर्षे 'बिसमिल्ला' म्हटला तर कदाचित आमचा विश्वास बसेल!"

आजच्या सर्वसाधारण अफगाण माणसाची खरी शोकान्तिका तीच आहे की, त्याचा कुणावर विश्वासच बसत नाही. आपल्याला कोणी एक नेता नाही याची फार मोठी खंत त्याला वाटते आहे. बंडखोरांचं राजकारण म्हणजे मुल्लामौलवींचं राजकारण झालं आहे. कम्युनिस्टांच्या विरुद्ध ठामपणानं उभा राहील असा राजकीय पक्षच तिथे नाही. धर्मसत्तेच्या राजकारणाला आजकालच्या जगात स्थान नाही, याची जाणीव त्याला झाली आहे. पुळपुट्या, आकसानं वागणाऱ्या, धर्मान्ध मुल्लामौलवींचं वर्चस्व त्याला मुळीच नको आहे, काही झालं तरी नको आहे. कारण शेजारच्या इराणमध्ये खुमेनीने आणि पाकिस्तानातल्या झियाने कसं राज्य चालवलंय हे त्यांना प्रत्यक्ष दिसतंच आहे!

बबरकला हाकललं, तरी नंतर कोण ? हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा झाला आहे. जर दुसरा मार्क्सवादीच येणार असेल तर बबरकला काढण्यात काही अर्थच नाही. बबरकच्या ऐवजी मुल्लापक्षाचा कोणी आला तर मूठभर धर्मान्धांना सोडून कुणालाच ते पसंत पडणार नाही. वेगवेगळया घटकांना पसंत पडेल असा माणूस मिळणं ही जवळ जवळ अशक्य कोटीतली गोष्ट आहे.

रशियन्स अफगाणिस्थानातून परत जातील की नाही हा प्रश्न आता मागे पडून पाकिस्तानात ओतल्या गेलेल्या अमेरिकन लष्करी मदतीमुळे तेथे युद्धाची ठिणगी कधी पडते, हा प्रश्न निर्माण झाला आहे. रशियन्स इथे आल्यानंतर सहा आठ महिन्यांनी, जर समजा, रशियन्स परत गेलेच तर काय होईल ? अशी चर्चा व्हायची. तेव्हा सर्वांचेच मत पडायचे, की रशियन परत गेल्यानंतर, संपूर्ण अफगाणिस्थानची कायदा, सुव्यवस्था कोसळली असती,राजकीय खून, मारामाऱ्या यांना ऊत आला असता, वैय्यक्तिक हेवेदावे, सूड वर उफाळून येतील, आणि कधी नव्हे अशी अंतर्गत लढाई चालू होईल. पण म्हणून रशियनांनी परत जाऊ नये असं मात्र कोणीच,–पक्षकार्यकर्तेसुद्धा यामध्ये आहेत– म्हणत नसत. ते म्हणत, प्रथम रशियन्स परत जाऊ देत, आम्ही आमची एकमेकांची डोकी फोडू, काही करू ! ते आमचं आम्ही पाहून घेऊ; पण रशियन्स परत जाऊ देत !

पण अमेरिकन लष्करी मदतीचा राक्षस पाकिस्तानात आल्यामुळे आता मात्र सगळेजणच चकित झाले आहेत. रशियनांविरुद्ध लढायला अमेरिकाच उभी राहिल्यामुळे ( दुसरं कोण राहणार ? ) त्यांना कुठे तरी समाधान वाटत असलं तरी युद्धाची– फार मोठ्या युद्धाची भीती, धास्ती वाटते आहे. आता हे प्रकरण फक्त अफगाणिस्थानापुरतेच मर्यादित राहणारे नाही याची जाणीव झाली आहे. आणि एका गोष्टीचं भयंकर दुःख, खंत वाटते आहे की, ही बडी राष्ट्रे आमचा, आमच्यासारख्या छोट्या राष्ट्रांचा वापर करीत आहेत स्वतःच्या सत्ताविस्तारासाठी, आणि त्यामध्ये आम्हाला काहीही मत नाही, इच्छा नाही.

गेल्या तीन वर्षांत अफगाणिस्थान केवढा तरी घुसळला गेला. द्वेष हे एकच नाणं सध्या तिथं चालतं आहे. समाजवादावर विश्वास असलेल्या पक्षकार्यकर्त्यांनाही समाजवाद हवा आहे, पण रशियन्स नको आहेत. अशा वेळी भांबावून गेलेल्यांना मग बंडखोरांनाच सहानुभूती दाखवण्याशिवाय गत्यंतर उरत नाही. बंडखोरांची संख्या, सरकारविरोधकांची संख्या जसजशी वाढत चालली आहे, तसतशी रशियाची पकडही घट्ट होत चालली आहे. हजारो तऱ्हांनी, वेगवेगळी बंधनं लोकांवर घातली जात आहेत. रशियाशी लढण्यासाठी पाकिस्तानला मिळालेल्या अमेरिकन मदतीचा आनंद मानायचा, की पुढे होणाऱ्या संभाव्य युद्धाची काळजी करायची ? कारण उद्या रशियाचा पराभव करून बंडखोर विजयी ठरलेच,– तसे होणार नाही, पण अमेरिकन मदतीमुळे समजा तसं झालंच,– तर आज रशियाला बबरक कारमलने इथे आणले तसेच उद्या एखादा मुल्ला अमेरिकेला इथे आणील. म्हणजे एक मालक जाऊन दुसरा मालक येईल, आणि गुलामी जशीच्या तशीच राहील.

त्याचा काय फायदा ? किंवा व्हिएटनामसारखे पंचवीस तीस वर्षे हे भयानक युद्ध लढत बसावं लागेल... हे सगळंच चित्र भीतिदायक आहे !

हजारो वर्षांचा डोळे दिपविणारा इतिहास लाभलेल्या, आर्थिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेल्या या देशात ‘ समाजवादी क्रांती ’सारखी अत्याधुनिक गोष्ट आयात केली गेली. या ‘ इंपोर्टेड ’ क्रांतीला टिकवून धरणं हे केवढं तरी मोठं आव्हानात्मक कार्य होतं. त्यासाठी जनमत जागृत करायला हवं होतं. आपल्याला बदल हवा आहे ही गरज लोकांना मुळात वाटायला हवी, त्यासाठी वाटेल तो स्वार्थत्याग करण्याची वृत्ती बळावली पाहिजे. त्यासाठी ईर्षा निर्माण करायला हवी होती. ते काहीही न केल्यामुळे, अफगाण क्रांती अयशस्वी ठरली. म्हणूनच क्रांतिकारी अफगाण सरकारला पहिल्या दिवसापासूनच बळाचा वापर करावा लागला. आणि एकदा बळाचा वापर सुरू झाला की प्रकरण हाताबाहेर जायला वेळ लागत नाही. अशा वेळी सत्ताधाऱ्यांना अंतर्गत विरोधाला तोंड द्यायचं असतं. तसंच टपून बसलेल्या बाहेरच्या घटकांनाही थोपवून धरायचं असतं. आपल्या हातातून हा देश निसटत चालला आहे, तसं होऊ देता उपयोगाचं नाही म्हणून ही लहान राष्ट्रे, टपूनच बसलेल्या मोठ्या राष्ट्रांच्या कब्जात अलगदपणाने जातात.

या संघर्षात छोटा, अविकसित देश टिकूच शकत नाही का ? कोणत्या तरी एका मोठ्या शक्तीच्या आश्रयाला जाण्यावाचून इलाजच नाही का ? छोट्या देशांचं भवितव्य हेच आहे काय ? पण एकदा हे भवितव्य बदलण्याचा, आपला असा वेगळाच मार्ग शोधण्याचा प्रयत्न दाऊदखानने केला होता.

जाहीरशहाला पदच्युत करून दाऊदखान हा लोकसत्ताक अफगाणिस्थानचा अध्यक्ष झाल्यानंतर त्याने भारत सरकारला एक अत्यंत गुप्त असा प्रस्ताव मांडला होता. भारत सरकारने नव्या अफगाण लोकसत्ताकाची संपूर्ण आखणी, बांधणी, योजना ठरवून द्यायची होती, कारभाराची, व्यवस्थापनाची मांडणी करून द्यायची होती, प्रत्येक खात्याची आधुनिक, नीटनेटकी पुनर्रचना करून द्यायची होती, थोडक्यात म्हणजे एखादी आजारी कंपनी, दुसरी चांगली कंपनी जशी चालवायला घेते, आखणी करून देते, त्याच धर्तीवर भारताने नव्या अफगाण प्रजासत्ताकाची घडी बसवून द्यायची होती.

भारत हासुद्धा विकसनशील, गरीब, धडपडणारा देश आहे. तीस वर्षे त्याने आपला कारभार नेटकेपणाने इतर कुणाला घुसखोरी करू न देता चालवला आहे. ब्रिटिशांकडून सुरळीत कारभाराची यंत्रणा, त्याचा वारसा भारताला मिळाला आहे. शेकडो वर्षांपासून अफगाण–भारत यांमधल्या चढउताराच्या परस्पर संबंधामुळे भारताला अफगाणिस्थान, अफगाण लोक समजले आहेत, शिवाय भारत हा जगाच्या सत्तास्पर्धेत नसलेला, अलिप्त, विस्तारवादाचा विरोधी असा देश आहे. या सर्व कारणांमुळे दाऊदखानला भारताचा आधार हवा होता, भारताचा भरवसा वाटत होता.

दाऊदखानच्या त्या विनंतीला मान देऊन भारत सरकारने हे काम स्वीकारायचे

ठरवले. त्याप्रमाणे वेगवेगळया खात्यातले दहापंधरा अधिकारी काबूलमध्ये आले. त्यांनी सर्व परिस्थितीचा अगदी कसून, संपूर्णपणे अभ्यास केला. आणि आपली योजना तयार केली.

पण तेवढ्यात असं काही तरी चालू आहे, याची बातमी रशियाला लागली. आणि ताबडतोब ब्रेझनेव्हकडून इंदिरा गांधींना ' संदेश ' आला की, " अशा तऱ्हेची कोणतीच मदत भारत सरकारने अफगाणिस्थानच्या सरकारला देता उपयोगी नाही. या भानगडीत भारताने पडू नये. अफगाणिस्थानची सगळी जबाबदारी रशियाची आहे." त्यानंतर काबूलमध्ये आलेले आपले ' ते ' अधिकारी परत गेले.

त्याचा अर्थ उघड होता की, इंदिरा गांधींना ब्रेझनेव्हच्या शब्दाला मान द्यावा लागला होता. त्या अधिकाऱ्यांपैकीच एकानं ही हकीकत मला सांगितली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८२८
दा. क. २३५५४
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## आणखी काही
## वाचनीय व संग्राह्य पुस्तके

### आठवणी

**वाटेवरच्या सावल्या**
वि. वा. शिरवाडकर

**शंख आणि शिंपले**
**कारागृहाच्या भिंती** ( डायरी )
ना. ग. गोरे

**एवरेस्टच्या कुशीत मी**
शेर्पा तेनसिंग

**विनोद चिंतामणी**
चिं. वि. जोशी

**सहजीवन**
रमाबाई गोखले

REFBK-0023554
REFBK-0023554

### आत्मकथा

**तराळ-अंतराळ**
शंकरराव खरात

**जडण-घडण**
वामन चोरघडे

**जीवन सेतु**
सेतु माधवराव पगडी